# हरिपाठ रहस्य

(श्रीगुलाबरावमहराजकृत हरिपाठाच्या प्रतिज्ञांसहित)

: लेखक :

**वेदान्तकेसरी श्री बाबाजीमहाराज पंडित**

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥
॥ श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ ॥

**पाठक्रम : १** **अर्थक्रम : ९**

**देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी साधियेल्या ॥१॥**
**हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥२॥**
**असोनी संसारी जिव्हे वेगु करी । वेदशास्त्रे उभारी बाह्या सदा ॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे व्यासांचिया खुणे । द्वारकेचे राणे पांडवां घरी ॥४॥**

*

प्रतिज्ञा - नामधारकास चारी मुक्तींची प्राप्ति, नाममहिमा व भागवतप्रामाण्य.

*

सरळ अर्थ :- देवाच्या देवळात जो क्षणभर उभा राहील त्याला चारी मुक्ती प्राप्त होतात. मुखाने हरि हरि म्हणणाऱ्या नामधारकाच्या पुण्याची गणनाच कोणी करू शकत नाही. संसार सोडून वनात न जाता संसारात राहूनच जिव्हेला हरिनामाचा छंद अधिकाधिक लावावा.'भगवन्नामस्मरण हे सर्व साधनात श्रेष्ठ आहे म्हणून हेच एक साधन करा' असे हात उभारून सर्व वेदशास्त्रे गर्जनापूर्वक डांगोरा पिटत आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, भगवान् व्यासांनी पांडवांना भगवत्प्राप्तीच्या ज्या स्वानुभवाच्या खुणा सांगितल्या त्या खुणांनुसार पांडवांनी भगवत्प्राप्ती करून घेतली व भगवंतास सर्वस्वी आपलेसे करून घेतले.



(१)

**देवाचिये द्वारी उभा क्षणभरी ।**
**तेणे मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥**

***देव म्हणजे सगुण श्रीहरी***

विवरण - 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी'' या चरणाचा अर्थ करताना, *कोणी देव म्हणजे जीव-ब्रह्मैक्य व द्वार म्हणजे त्याचे साधन नामस्मरण होय, आणि *क्षणभर म्हणजे जन्मभर असा अर्थ करितात, तर *कोणी देवाचे द्वारी उभा राहणे म्हणजे सेवक या नात्याने सेवातत्पर होणे होय आणि हरिनामस्मरण हे त्याचे द्वार होय; *किंवा ज्ञान हे द्वार होय असे म्हणतात. *कोणी म्हणतात, देव म्हणजे ज्ञातृज्ञेयविहीन केवळ चिन्मात्र स्वरूप होय आणि द्वार म्हणजे जीव-ब्रह्मैक्याची स्मृति. ही स्मृति होण्याचे साधन हरिनामस्मरण होय.

या सर्व मतांचा संकलित एक अर्थ असा दिसतो की,* देव म्हणजे सच्चिदानंद निर्गुण आत्मस्वरूप व *त्या आत्म्याशी ज्ञानाने ऐक्य होणे हे त्याचे दर्शन आणि *हरिनामस्मरण हे त्याचे साधन होय.

पण या हरिपाठात जे हरिनामस्मरणाचे माहात्म्य श्रीज्ञानेश्वर महाराजांनी गायिले आहे व हरिनामस्मरणाचे जे फळ सांगितले आहे आणि सगुण श्रीहरीच्या स्वरूपाची जी त्यांनी मीमांसा केली आहे, त्यावरून पाहता श्रीज्ञानेश्वरमहाराजांना देव म्हणजे निर्गुण ब्रह्मस्वरूप येथे अभिप्रेत असेल असे दिसत नाही. भगवान् सगुणही आहे व निर्गुणही आहे यात शंका नाही. पण येथे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी देव या शब्दाने सगुण श्रीहरीचाच उल्लेख केला आहे. भगवद्भक्तिमंदिराचा पाया रचिणाऱ्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सगुण भगवद्भक्तीचा मार्ग दाखविण्याकरिता हरिपाठ रचिला आहे.

भक्तीमार्गात भक्ती करण्याकरिता भगवंताचे सगुण स्वरूप घेतले जाते व ज्ञानमार्गात नामरूपरहित निर्गुण स्वरूप वृत्तीला आलंबन असते. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी ''भक्ति पाविजे व्यक्त । अव्यक्त योगे'' (ज्ञा.अ.१२-२३) असे स्वतःच म्हटले आहे. येथे ''हरि मुखे म्हणा'' असा उपदेश करून देवाचा नामाशी त्यांनी संबंध दाखविला आहे. नामाचा संबंध आला की रूपाचा संबंध येतोच. श्रीज्ञानेश्वरमहाराजादि सर्व संत भगवान् आचार्यांप्रमाणे पूर्ण केवलाद्वैतवादी आहेत.

संतांचा वेदान्तविचार तोच आचार्यांचा वेदान्तविचार व आचार्यांचा जो वेदान्तविचार तोच संतांचा वेदान्तविचार होय.

नामरूपयुक्त स्वरूपाला सगुण म्हणतात आणि निर्गुण स्वरूपाचे वर्णन करताना ''रूप वर्ण व्यक्ति । नाही द्रष्टा दृश्य स्थिती'' तें नामरूपवर्णव्यक्ति रहित आहे असे ते सांगतात. निर्गुणस्वरूप नामरूपरहित व येथे नामरूपाचा देवाशी संबंध दाखविला असल्यामुळे नामरूपाने साकार होणारा सगुण श्रीहरीच येथे 'देव' या शब्दाने घेतला आहे असे स्पष्ट दिसते.

***लक्षणा नको***

येथे नामस्मरणाचे द्वारा सगुण साकार स्वरूपाचे स्पष्ट वर्णन किंवा उल्लेख असताना देव शब्दाने सगुण श्रीहरि सोडून जेव्हा निर्गुण स्वरूप कित्येक घेतात तेव्हा तसा अर्थ लक्षणेने घेतला जात नाही. वाच्यार्थ सोडून म्हणजे शब्दाचा प्रथम जो अर्थ लक्षात येतो तो सोडून, त्याच्या जवळचा अर्थ घेणे याला लक्षणा म्हणतात.

सगुणातच निर्गुण असते. म्हणून देव या शब्दाचा सगुण श्रीहरि हा अर्थ सोडून निर्गुण परमात्मा असा अर्थ घेतला की तेथे लक्षणा केली जाते. तत्त्वमसि महावाक्याचे ठिकाणी आपण लक्षणेने जीवब्रह्मैक्य साधतो, हे खरे आहे पण तेथे जीव व ब्रह्म यांच्या विरुद्ध धर्मामुळे लक्षणेवाचून त्यांचे ऐक्य होऊ शकत नाही म्हणून तेथे वाच्यांशाची लक्षणा करितात. वेदान्ताच्या सृष्टिदृष्टिवादाला किंवा सत्तात्रयवादाला अनुसरून जेव्हा परमात्मा मायिक मानला जातो तेव्हा मायाधर्माची निवृत्ति करण्याकरिता वाच्यांश जो मायिकभाव त्याची लक्षणा करितात.

पण वेदान्तातील सर्वोत्तम जो दृष्टिसृष्टिवाद किंवा सत्ताद्वयवाद आहे त्यांत शुद्ध परब्रह्मालाच ईश्वरत्व मानले असल्यामुळे त्या वादानुसार प्रतिबिंबरूप जीवाच्या अपेक्षेने, माया संबंधावाचून, परमेश्वराला सगुणत्व येत असल्यामुळे त्या वादात सगुण परमात्माही निरुपाधिकच ठरत असल्यामुळे सगुण श्रीहरीची लक्षणा करून निर्गुण स्वरूप घेण्याची आवश्यकता राहत नाही. श्रीज्ञानेश्वर माउलीने ज्ञानेश्वरीत अमृतानुभवात हा सत्ताद्वयवादच स्वीकारला असल्यामुळे माउलीच्या या ग्रंथांतही देव या शब्दाची लक्षणा करण्याची जरूर नाही.

''आनंदपदी जया म्हणती हरि'' सगुण श्रीहरि आनंदांशाचे ठिकाणी साक्षात्कृत होतो असे नाथमहाराज म्हणतात. या अभंगाच्या पूर्वार्धात ''सत्पद तें ब्रह्म । चित्पद तें माया '' सत्पद म्हणजे ज्ञेयरूप सदंशाचे ठिकाणी ब्रह्माचा अनुभव व चिदंशाचे ठिकाणी स्फुरणरूप मायाशक्तीचा अनुभव येतो असे नाथ म्हणतात.

अमृतानुभवात माउली म्हणते की, ''एऱ्हवी सच्चिदानंद भेदे । चालिली तिन्ही पदें । परी तिन्ही उणी आनंदें । केली एके ॥'' सत् चित् आनंद या तीन अंशाने





ब्रह्म स्फुरत असते. हा ब्रह्माचा तीनपणा आनंदांत एकवटतो.

नाथ आणि माउली या दोघांच्याही म्हणण्याचा विचार केला तर नामरूपरहित सदंशभूत निर्गुण ब्रह्मप्रत्ययात ज्ञानवृत्ती राहते म्हणून तीनपणा भासतो पण आनंदांशाचे ठिकाणी प्रत्ययाला येणाऱ्या सगुण श्रीहरीचे ठिकाणी निर्गुण ब्रह्मप्रत्यय व मायाप्रत्यय आटतात. हा निष्कर्ष नाथांनीच त्या अभंगातील ''सत्पद निर्गुण चित्पद सगुण । सगुणनिर्गुण हरिपायी'' या दुसऱ्या चरणात काढला आहे.

***सगुणाचे सगुणपण स्वरूपभूत होय***

सर्व संतांनी परमेश्वराला सगुण मानिले आहे ते मायेच्या सत्त्वादि गुणांनी युक्त असे मानिले नाही. सगुण परमात्माही मायागुणरहितच आहे, असे त्यांचे स्पष्ट म्हणणे आहे. ज्यांत सच्चिदानंदाचा तीनपणा प्रत्ययाला येत नाही उलट सच्चिदानंदाची आटणी होऊन सच्चिदानंदमात्र स्वरूपाचा प्रत्यय येतो व ज्याच्या ठिकाणी षड्गुणैश्वर्य अमर्याद आहे, त्याला सर्व संत सगुण परमात्मा म्हणतात. हे परमेश्वराचे ऐश्वर्य मायिक नाही.

नाथ म्हणतात, ''हे साही गुण भगवंती । सहज स्वाभाविक असती॥'' भगवंताचे षड्गुणैश्वर्य स्वाभाविक म्हणून स्वरूपभूत आहे.

श्रीधराचार्य (भागवत टीकाकार) म्हणतात- 'न ह्यन्येषामिव देशकालादिपरिच्छिन्नं तवाष्टगुणितमैश्वर्यमपि तु परिपूर्णं स्वरूपानुबंधित्वात् अपरिमितमित्यर्थः।' (भागवत दशम स्कं. अ८७ श्लो. २५) भगवंताचे षड्गुणैश्वर्य इतर योग्यादिकांप्रमाणे मर्यादित नाही. निरुपाधिक ब्रह्म जसे अमर्याद आहे तसे त्याचे षड्गुणैश्वर्य देखील स्वरूपभूत असल्यामुळे, अमर्याद आहे.

सारांश, सगुण श्रीहरि पूर्ण निरुपाधिक असल्यामुळे देव शब्दाने माउलीने तोच येथे घेतला आहे. लक्षणेने निर्गुण स्वरूप घेण्याची आवश्यकता नाही.

येथे सगुण भगवद्रूप सोडून निर्गुण स्वरूप जे कित्येकांनी मानले आहे त्याला एक समज कारणीभूत आहे असे वाटते. तो समज म्हणजे भगवंताचे खरे निरुपाधिक स्वरूप निर्गुणच आहे व सगुण स्वरूप हे निर्गुणापेक्षा औपाधिक असून ''द्वे वाव ब्रह्मणो रूपे मूर्तं चैवामूर्तं च'' या बृहदारण्यक श्रुतीत ''नेति नेति'' म्हणून त्याचे खंडनही केले आहे, हा होय. पण या श्रुतीवरील शंकराचार्यांच्या भाष्याचा विचार केल्यास असे दिसते की, तेथे भगवंताच्या रामकृष्णादि सगुण स्वरूपाचा किंवा नामरूपरहित निर्गुण स्वरूपाचा मूर्त व अमूर्त या शब्दांनी उल्लेख नसून स्थूल व सूक्ष्म किंवा व्यक्त व अव्यक्त अशा पांचभौतिक सृष्टीचा निषेध केला आहे.

शंकराचार्य म्हणतात ''यदेतन्मूर्ताख्यं भूतत्रयमिदं मर्त्यम्'' पृथ्वी, आप, तेज या तीन भूतांचे प्राधान्य ज्यात आहे ते मूर्त समजावे आणि ''वायुश्चान्तरिक्षं च भूतद्वयं एतदमृतम् अमूर्तत्वात्'' वायु व आकाश यांचे प्राधान्य ज्यात आहे ते अमूर्त होय.

येथे पंचभूतांच्या दोन राशी केल्या आहेत. एक भूतत्रयात्मक व दुसरी भूतद्वयात्मक. भूतत्रयात्मक राशी ही सर्व कार्यरूप व्यक्त सृष्टी असून भूतद्वयात्मक राशी ही अव्यक्त अपंचीकृत सूक्ष्म सृष्टी आहे. या दोन्ही प्रकारच्या कार्यकारणात्मक सृष्टीच्या पलीकडे आत्मस्वरूप आहे किंवा कार्यरूप सृष्टी व कारणरूप सृष्टी, ज्या जीवशिवाच्या उपाधी आहेत त्या औपाधिक जीवशिवांच्या उपाधींचा निषेध करून परमात्मा त्यांच्या पलीकडे आहे असे ''नेति नेति'' या श्रुतीने दाखविले आहे असा शंकराचार्यांच्या भाष्याचा आशय आहे. अर्थात् परमेश्वराचे सर्व कार्यकारणात्मक प्रपंचाचे पलीकडे असलेले निर्गुण स्वरूप, अमूर्त या शब्दाने येथे दाखविले गेले नाही. त्याचप्रमाणे परमेश्वराचे रामकृष्णादि सगुण स्वरूपाचाही मूर्त या शब्दाने उल्लेख केला नाही. परमेश्वराची सगुण व निर्गुण दोन्ही स्वरूपे प्रकृतीच्या पलीकडेच आहेत. सर्व वैष्णव पंथांत सगुण रामकृष्णांचे स्वरूप मायेच्या पलीकडेच मानतात व आचार्यांनी ब्रह्मसूत्रभाष्यात वैष्णव मतातील हा सिद्धान्त मान्य केला आहे. या दोन्ही रूपात श्रेष्ठ-कनिष्ठ भाव कोणत्याही संतांनी मानलेला नाही. शंकराचार्यांच्या उपनिषद्भाष्य, ब्रह्मसूत्रभाष्य व गीताभाष्य यांचा सखोल विचार केल्यास त्यावरूनही, भगवंताचे रामकृष्णादि सगुण स्वरूप पांचभौतिक व नाशिवंत ठरू शकत नाही आणि नाथादिकांनी तर या दोन रूपातील श्रेष्ठकनिष्ठ भावाचा सर्वस्वी निषेधच केला आहे.

ते म्हणतात, ''निर्गुणाहुनि सगुण न्यून । म्हणे तो केवळ मूर्ख जाण । सगुण निर्गुण दोन्ही समान । न्यून पूर्ण असेना ।। माझें स्वरूप निज निर्गुण । अथवा वैकुंठीचें सगुण । दोन्ही एकचि निश्चयें जाण । सगुण निर्गुण समसाम्य ।।'

काही फरकच करावयाचा असल्यास ''विघुरले ते तूप होये । थिजलें त्यापरीस गोड आहे। निर्गुणापरीस सगुणी पाहे । अति लवलाहे स्वानंदु ।।'' नाथांनी निर्गुणापेक्षा सगुणात सुखलाभ अधिक आहे असा स्वानुभव सांगितला आहे म्हणूनच ज्ञानमार्ग व त्यातील निर्गुण ब्रह्मप्राप्तीपेक्षा भक्तिमार्ग व त्यातील सगुण परमेश्वराची प्राप्ति श्रेष्ठ आहे.

''ऐसा सांडोनि सोहळा । कोण लावुनी बैसे डोळा'' असे तुकाराम

(३)



महाराजादि सर्व संतांचे स्वानुभवाचे म्हणणे आहे. भगवंतानेही गीतेमध्ये बाराव्या अध्यायात ज्ञानमार्गात सोहंभावाने निर्गुण ब्रह्माशी ऐक्य पावणाऱ्यांपेक्षा सगुण रामकृष्णादि स्वरूपाचे ठिकाणी भक्ती करणारे जे भक्त आहेत, ते भगवंताशी अत्यंत समरस होतात असे सांगितले आहे.

नाथ भगवंताच्या देहाला ''भगवद्देहो सृादिानंदघन'' सृादिानंदघन म्हणतात व

श्रीज्ञानेश्वर महाराज- ''तरी पार्था परियेसा । मी तंव येथ ऐसा । रत्नीं किळावो जैसा । रत्नचि कीं तो'' (ज्ञा.अ.१४-३७३) सगुण परमात्मा ब्रह्मरत्नाचे तेज आहे म्हणतात आणि

शंकराचार्यही ''दिव्यम् अप्राकृतम्'' भगवंताचे जन्म वगैरे प्रकृतिजन्य नाही असेच म्हणतात. म्हणून या अभंगातील देव सगुण श्रीहरीच घेतला पाहिजे व त्याचेच नामस्मरणाचा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी उपदेश केला आहे. निर्गुण स्वरूप घेतल्याने प्रस्तुत अभंगाची अर्थसंगती लागत नाही व पुढेही भगवंताच्या सगुण स्वरूपाचे निरुपाधिकत्व श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगणार आहेत.

सगुण रामकृष्णांची ज्या देवळात किंवा ज्या ठिकाणी स्थापना झाली असेल त्या देवळाच्या द्वारात जो कोणी क्षणभर उभा राहील त्याला चारी मुक्तींचा लाभ होतो असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात. अर्थात देवदर्शनाकरिता देवाच्या मंदिरात जाणाऱ्या ''ज्या पुरुषाचे अंतःकरण क्षणभरच कां होईना पण परमात्मभावनेने म्हणजे- हा त्रैलोक्याचा व अनंत ब्रह्मांडाचा स्वामी, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सर्वव्यापी परमात्मा आहे, अशा भावनेने भरलेले असेल व म्हणूनच जो साधुसंताच्या शिकवणीनुसार त्या परमात्म्याचे रामकृष्णादि नामस्मरण करीत असेल अशा एवंगुणविशिष्ट श्रद्धापूर्ण मुमुक्षू साधकाचाच 'उभा क्षणभरी' म्हणून उल्लेख केला आहे असे समजावे.

ज्याच्या मनात भगवान् श्रीरामकृष्णांविषयी आदरभाव नाही तो त्यांचे नावही घेत नाही व दर्शनालाही जात नाही. त्याचा येथे उल्लेख नाही. श्रीरामकृष्णांविषयी प्रेम व आदरभाव बाळगणारा पुरुष रामकृष्णांचे दर्शनाकरिता गेला असता त्याला चारी मुक्तींची प्राप्ती होते अशी माउलीची प्रतिज्ञा आहे. अकस्मात् एखादा पुरुष, रामकृष्णाचे मंदिरात दर्शनाकरिता गेला असता, दर्शनापूर्वीच त्याला हे रामकृष्णाचे मंदिर आहे असे कळल्यावर त्याच्या तोंडात रामकृष्णाचे नाव येते व आदराने तो जर क्षणभर देवाच्या द्वाराशी उभा राहील तर त्याला चारी

मुक्तींचा लाभ होईल.

अर्थात,''जोपर्यंत ही आदराची भावना, तोपर्यंतच मुक्तींचा लाभ'' यात संशय नाही.ज्या देवाचे दर्शन घेण्यास आपण जातो, त्या देवाचे नाव आधी आपल्या मुखात येते व मग देवळात जाऊन आपण रूप पहातो.देवाचे रूप पाहिल्यावर ते मनात शिरते व मन तदाकार होते.

***नामधारकास चारी मुक्तींची प्राप्ति***

जर परमात्मा खरोखर वेदान्तशास्त्राप्रमाणे सर्वत्र व्यापक आहे तर तो देवळातील मूर्तीत नाही असे थोडेच आहे? मग देवळातील प्रतिमा देव नव्हे असे कसे म्हणता येईल? जेथे परमात्मा आहे तो देशच वैकुंठ म्हटला जातो.म्हणून मंदिर वैकुंठच आहे व

(१) मंदिरात गेलेला पुरुष देवदर्शनाचे वेळी वैकुंठातच असतो ही सलोकता मुक्ति होय; आणि

(२) देवळातील देवाच्या, तो दर्शन घेणारा, समीपही असतो म्हणून त्याला समीपता मुक्तीहि प्राप्त होते.

(३) त्या क्षणापुरते त्याचे मन तदाकार होते ही त्याची सरूपता मुक्ति असून

(४) क्षणभर देहाचा विसर पडल्यास ती सायुज्यमुक्ति होते.

अशा रीतीने नामधारकास चारी मुक्तींचा लाभ होतो.ही काही नामधारकाची केवळ स्तुती नव्हे, यथार्थ वस्तुस्थिती आहे.पूर्ण श्रद्धेने हीच स्थिती अनुभवाला येऊ शकते व अश्रद्धेमुळे प्राप्त झालेलेही अनुभवता येत नाही.

भगवान् म्हणतात, 'एरव्ही मी तरी कैसा । मुखाप्रति भानु कां जैसा । कहीं दिसे न दिसे ऐसा । वाणीचा नोहे'' (ज्ञाने ९-६३) मी सर्वत्र असल्यामुळे श्रद्धावान् नामधारकास कोठेही चारी मुक्तींचा अनुभव घेता येतो व अश्रद्धावान् पुरुषाला तसा अनुभव घेता येत नाही.येथे देवाच्या द्वाराशी उभा राहणाऱ्याला चारी मुक्तींचा लाभ सांगितलेला आहे.

यावरूनही देव या शब्दाने श्रीज्ञानेश्वर महाराजांना सगुण श्रीहरीच येथे अभिप्रेत आहे असे स्पष्ट दिसते.कारण सगुण श्रीहरीच्या भजनाने चारी मुक्तींचा लाभ शास्त्रकारांनी सांगितला आहे.निर्गुण स्वरूपाचे 'सोहंभावे उपासिती' ह्या योगे कैवल्यरूप एकच मुक्ति सांगितलेली आहे, म्हणून निर्गुण स्वरूप येथे घेता येत नाही.



(४)

## हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा ।
## पुण्याची गणना कोण करी ॥२॥

***नाममहिमा व श्रीहरिसाक्षात्काराचा उपाय***

देवाच्या दाराशी क्षणभर उभा राहिल्याने जो क्षणभर चारी मुक्तींचा लाभ होतो, तोच अखंड अविनाशी लाभ कायमचा प्राप्त व्हावा म्हणून दुसऱ्या चरणात अखंड व आजन्म ''हरि मुखें म्हणा'' असा भगवन्नामाचा निश्चित अचूक उपाय श्रीज्ञानेश्वरमाउली प्रतिज्ञेवर सांगतात.ज्या देवाचे दर्शनास आपण जातो त्या देवाचे नाव अगोदर आपल्या वाणीवर येते व नामाबरोबर मनात रूपही येते.पण ही स्थिती क्षणभरच राहते, म्हणून कल्पनेसारखी वाटते.

* क्षणभर जे मनात येते त्यालाच ''कल्पना' म्हणतात व

* जे मनात पूर्ण टिकून राहते त्याला 'साक्षात्कार' म्हणतात. कोणत्याही गोष्टीचा लाभ होऊन त्याचे सुख अनुभवण्याकरिता ती टिकली पाहिजे आणि दृढ श्रद्धेशिवाय ती टिकू शकत नाही.

*पूर्वपुण्याने श्रद्धा व पूर्वपापामुळे अश्रद्धा उत्पन्न होत असते.

अश्रद्धा, कुकल्पना ह्या सर्व पूर्व पापामुळे उत्पन्न होतात व अनंत जन्मीचे पाप नाहीसे झाल्याशिवाय दृढ श्रद्धा उत्पन्न होत नाही. भगवंताच्या अस्तित्वावर श्रद्धा नसणे व भगवद्विन्मुख होऊन ''बळे देह मी म्हणतां । कोटी ब्रह्महत्त्या माथां ॥'' मी देह म्हणणे हेच मुख्य पाप होय. या पापामुळे पुढे अनेक प्रकारची पापे पुरुषाच्या हातून घडतात.अनादि काळापासून 'देह म्हणजे मी' असे आपण म्हणत आलो व त्यामुळेच अनादिकाळापासून अनंत पापांचा साठा आपण करून ठेवला. तेवढा पापांचा साठा नाहीसा करणारे कर्मरूप प्रायश्चितच नाही.एका भगवन्नामस्मरणाने मात्र अनंत जन्मीचे पातक नाहीसे होते म्हणून नामस्मरण हा सुलभ व अमोघ श्रीहरिप्राप्तीचा उपाय होय, म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज ''हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा'' असा उपदेश करितात.क्षणभर देवाचे नाव मुखात आले तरी क्षणभरच मन भगवदाकार होते.

या अनुभवावरून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात,''हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा'' या द्विरुक्तीने महाराजांनी अखंड नामस्मरण करण्यास अत्यंत कळवळून सांगितले आहे व ज्याप्रमाणे क्षणभर नाम वाणीवर आल्याने क्षणभर मनात श्रीहरीचे रूप येते तसेच अखंड नामस्मरणाने भगवंताचे रूपहि मनात अखंड राहील.

''बहुता सुकृतांची जोडी । म्हणूनि विठ्ठली आवडी''

वेदान्त सिद्धान्ताप्रमाणे जीवच भगवत्स्वरूप आहे, पण अनंत जन्मांच्या पापामुळे मनात उत्पन्न झालेले अश्रद्धा, चित्तचांचल्य, दुष्ट वासना, बुद्धिमांद्य इत्यादि दोष भगवत्प्राप्तीला प्रतिबंध करतात. नामस्मरणाने सर्व पापांचे क्षालन होऊन अखंड नामस्मरणाने पापवासनाही नाहीशी झाली म्हणजे अपरिमित पुण्याचा साठा होतो व त्या अपरिमित पुण्याचे साठ्यामुळे श्रीहरीची आवड उत्पन्न होते. वैदिक, पौराणिक जेवढी योगयागादि पुण्य कर्मे सांगितली आहेत त्या सर्व पुण्यरूप कर्मांचे अनुष्ठान करूनही, भगवन्नामस्मरणाचे पुण्य जोडता येणार नाही; असे एका भगवन्नास्मरणाचे अगाध माहात्म्य आहे.* पुण्यावाचून दृढ श्रद्धा नाही आणि दृढ श्रद्धेवाचून श्रीहरीचा साक्षात्कार नाही.

नाथ म्हणतात, ''भावो तेथे भाग्य पहाहो । भावो तेथे निःसंदेहो । भावो तेथे प्रगटे देवो। निजस्वभावो स्वानंदे''

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात,''म्हणोनि समस्ता या भजना । मी साक्षीभूत पै अर्जुना । येथ प्रतिफळे भावना । आपुलाली (ज्ञा. ४-७३)

नाथही म्हणतात, ''आस्तिकासी सर्वत्र पाही । नास्तिकासी कोठेचि नाही'' सारांश, दृढ श्रद्धापूर्वक अखंड भगवन्नामस्मरणाने भगवत्साक्षात्कारहि अखंड होतो.

**असोनी संसारी जिव्हे वेगु करी ।**

**वेदशास्त्रें उभारी बाह्या सदा ॥३॥**

***नामधारकास संन्यास नको***

भगवत्प्राप्तीकरिता जेवढी काही साधनसंपत्ती पाहिजे म्हणून शास्त्राने सांगितली आहे, तेवढी साधनसंपत्ती तिच्या प्राप्तीचे स्वतंत्र साधन न करिता देखील केवळ एका अखंड भगवन्नामस्मरणाने प्राप्त होते. संसारात घरी राहूनच जिव्हेला नामस्मरणाचा तीव्र वेग उत्तरोत्तर सतत वाढविला म्हणजे कार्य झाले. भगवन्नामस्मरणाचा एवढा प्रभाव आहे की, ज्याने भगवन्नामस्मरणाचा अखंड तीव्र वेग आपल्या जिव्हेला लावला त्याला संसार सोडून संन्यास घ्यावा लागत नाही. भगवन्नामस्मरणाच्या बळावर तो जरी संसारात राहिला तरी पद्मपत्रावरील जळाच्या बिंदुप्रमाणे तो संसारात अत्यंत अलिप्त राहतो. कोणतेही पापरूप वा पुण्यरूप कर्म त्याला स्पर्श करीत नाही. नाथ म्हणतात, '' मजमाजी रंगली चित्तवृत्ति । यालागीं विसरला गृहासक्ति । तया गृहाश्रमींच माझी प्राप्ति । निश्चये जाण उद्धवा॥

(५)



'' न लगती सायास जाणें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण'' असे तुकाराम महाराजही म्हणतात.

एवढेच की, वाणीला भगवन्नामाचा सतत चाळा लागला पाहिजे. भगवन्नामस्मरणावाचून क्षणभर देखील मनाला इकडे तिकडे भटकण्याचा अवसर मिळता कामा नये. चार वेद व सहा शास्त्रे हात वर करून हरिनामाचा महिमा सांगत आहेत असे वेदशास्त्रांचे तात्पर्य जाणणारे श्रीज्ञानेश्वरमहाराजादि संत या सर्वांचे म्हणणे आहे.

* वेदांचा संवाद श्रुतींचा अनुवाद । नामाचा मकरंद पुराण वदे'' असे नाथ म्हणतात.

* अठरा पुराणांचे पोटी । नामेविण नाही गोठी'' असे तुकाराम महाराज म्हणतात.

* ऋग्वेदात 'तमुस्तोतार' या ऋचेने व ''मर्ता अमर्तस्य ते'' या ऋचेने सर्वांपेक्षा नामाचे श्रेष्ठत्व वर्णन केले आहे.

* शांतिपर्वातही भीष्माचार्यांनी, राजा युधिष्ठिराचे प्रश्नास उत्तर देताना ''एष मे सर्वधर्माणां धर्मोऽधिकतमो मतः। यद्भक्त्या पुंडरिकाक्षं स्तवैरर्चेयेन्नरः सदा'' सगुण श्रीहरीचे नामस्मरण व स्तवन करणे हाच सर्व धर्मात श्रेष्ठ धर्म आहे असे सांगितले आहे. सारांश, वेदादि शास्त्रांतून भगवन्नामाचे माहात्म्य मुक्तकंठाने वर्णिले आहे.

*मनुस्मृतीतही ''जप्येनैव तु संसिध्येद् ब्राह्मणो नात्र संशयः'' ( २-८७) नुसत्या जपाने देखील ब्राह्मण सिद्ध होतो मग तो दुसरे काही कर्म करो वा न करो, असे नाममाहात्म्य वर्णिले आहे आणि ब्राह्मणादि सर्व वर्णांना नामस्मरणाचे ठिकाणी अधिकार सांगितला आहे. *छांदोग्यातही सनत्कुमार-नारद संवादात नामाची उपासना सांगितली आहे.

* यदन्यत् कुरुते कर्म यदि वा न करोति च ।
कृतेन जपयज्ञेन परां सिद्धिमवाप्नुयात् ॥ (सांबपुराण ४७-३)

* करो वा न करो अन्य कर्म । जपयज्ञेंचि गति पावे परम''
(श्रीगुलाबराव महाराज- संप्रदाय सुरतरु भाग १- अ. २ ओवी २५३)

**ज्ञानेदव म्हणे व्यासांचिया खुणें ।**

**द्वारकेचें राणे पांडवां घरी ॥४॥**

***भागवताचे प्रामाण्य***

या शेवटल्या चरणात केवळ नामस्मरणादि भक्तीने भगवान् श्रीहरि कसा आपलासा करून घेता येतो हे भारत व भागवतातील अत्यंत सात्विक व पूर्ण धर्मशील, तसेच अखंड नामधारक पांडवांचे उदाहरण देऊन श्रीज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या प्रतिपाद्य नाममाहात्म्याला पुष्टी दिली आहे.भगवान् व्यासांनी परमेश्वर प्राप्तीची 'भगवन्नामस्मरण' ही अंतःकरणातील गुप्त खूणगाठ पांडवांना सांगितली व पांडवांनी दृढ विश्वासाने त्या खुणेप्रमाणे वागून अनंतकोटी ब्रह्मांडनायक अशा द्वारकाधीश भगवान् श्रीकृष्णपरमात्म्याला आपल्या घरी राबविले.याही चरणात नामस्मरणाने पांडवांना सगुण श्रीहरीची प्राप्ती झाली असे सांगून पहिल्या चरणातील देव म्हणजे निर्गुण नसून सगुणच आहे असे स्पष्ट केले आहे

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

---

**पाठक्रम : २** **अर्थक्रम : ११**

---

**चहूं वेदीं जाण षट्शास्त्रीं कारण । अठराहि पुराणें हरीसी गाती ॥१॥**

**मंथुनी नवनीता तैसें घे अनंता । वायां व्यर्थ कथा सांडी मार्ग ॥२॥**

**एक हरि आत्मा जीवशिवसम । वायां तूं दुर्गम न घाली मन ॥३॥**

**ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे ॥४॥**

*

प्रतिज्ञा - वेदशास्त्रनिर्णय व नाममहिमा.

*

सरळ अर्थ :- चारी वेदातील जाण म्हणजे ज्ञान श्रीहरीचेच आहे. सहा शास्त्रांनी ठरविलेले जगाचे कारण श्रीहरीच होय.अठरा पुराणांनी हरीचेच वर्णन केले आहे.ज्याप्रमाणे दह्याचे मंथन करून नवनीत घेतले जाते, त्याप्रमाणे जगाचे मंथन करून तूं श्रीहरीला घे.नामस्मरणावाचून व्यर्थ कथालाप व नामस्मरणावाचून व्यर्थ मार्ग यांचा त्याग कर.श्रीहरी व आत्मा एक आहेत.तो श्रीहरी जीव व शिव





यात व्यापून आहे. हरिनामावाचून योगादि मार्ग अवघड व कष्टदायक आहेत म्हणून ते व्यर्थ आहेत.त्यात तूं चित्त देऊ नकोस.तर मग काय कर? हरि हरि म्हण.श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''हरि हरि म्हणणे'' हाच माझा नित्याचा पाठ आहे. हरिनामस्मरण हेच माझे वैकुंठ होय किंवा हरिनाम हाच माझा वैकुंठ परमात्मा होय. तो परमात्मा श्रीहरि मला सर्वत्र घनदाट भरलेला दिसतो.

***अखंड नामस्मरणाकरिता अद्वैतसत्तेची जाणीव पाहिजे***

विवरण :- श्रीहरीची अखंड प्राप्ती व्हावी म्हणून त्याचे अखंड नामस्मरण केले पाहिजे, असे श्रीज्ञानेश्वरमाउलीने मागील अभंगात कळवळून सांगितले.पण श्रीहरीचे अखंड नामस्मरण होण्याकरिता त्याचा क्षणभरही विसर पडता कामा नये व श्रीहरीचा कधी विसर पडू नये असे वाटत असेल तर त्याचे आत्मवत् अखंड प्रेम लागणे जरूर आहे.कोणत्याही वस्तूचे ज्या मानाने आपल्याला प्रेम असेल त्या मानाने त्या वस्तूचे मनात स्मरण होत असते.आपले स्वतःचे आपल्याला निःसीम प्रेम आहे, म्हणूनच आपल्याला आपला विसर पडत नाही; व जेवढे काही करितो तेवढे ते आपण सर्व आपल्याकरिता करीत असतो.आपल्या सुखाला कारणीभूत होतात म्हणूनच आपण दारा(पत्नी),पुत्र, धन इत्यादी विषयांवर ममता, प्रेम करीत असतो.जोपर्यंत आपल्या सुखाला ते कारणीभूत होतात तोपर्यंत त्यांचे प्रेम राहते. आपले स्वतःचे प्रेम कधी नाहीसे होत नाही.म्हणून आपल्याला आपला विसर पडत नाही.पण धनपुत्रादि विषयाचे प्रेमात खंड पडतो म्हणून एकाच विषयाचे आपल्याला सारखे अखंड प्रेम राहत नाही.केव्हा स्त्रीचे प्रेम, तर केव्हा पुत्राचे प्रेम असते.ज्या विषयाचे ज्यावेळी प्रेम असते त्यावेळी त्या विषयावाचून दुसऱ्या विषयाचा विसर पडतो.

याचे तात्पर्य हे की, आपले आपल्याला अखंड प्रेम आहे म्हणून आपल्याहून जे विषय भिन्न आहेत त्यांचे प्रेम खंडित असते व आपल्याशी ज्याचे ऐक्य होईल त्याविषयाचे प्रेम अखंड राहील.याचे प्रत्यंतर आपण देहाचे ठिकाणी पाहतो.'देहच मी' असे देहाशी ऐक्य केल्यामुळे, बाह्य स्त्रीपुत्रादि विषयांपेक्षा देहाचे प्रेम आपल्याला अखंडच आहे. म्हणून श्रीहरीला आपण आपल्याहून जोपर्यंत भिन्न पाहू तोपर्यंत श्रीहरीचे अखंड प्रेम जडणे शक्य नाही व त्याचे अखंड नामस्मरणही होणे शक्य नाही.म्हणजे ''श्रीहरीचे अखंड नामस्मरण घडायला श्रीहरी माझ्याहून भिन्न नाही; तो माझेच स्वरूप होय किंवा माझे खरे स्वरूप म्हणजे श्रीहरि होय. मी म्हणून श्रीहरीहून निराळा कोणी नाही'' असे अद्वैतज्ञान होणे अवश्य आहे. एवढेच नाही

तर जोपर्यंत दृश्य जगत् किंवा दृश्य विषय आपल्याहून किंवा श्रीहरीहून भिन्न आहेत, अशी द्वैतबुद्धी आहे तोपर्यंत पूर्वसंस्कारानुसार चित्त विषयांकडे धाव घेणारच व चित्त विषयांकडे धावले असता श्रीहरीचे प्रेम व ध्यान यात खंड पडल्यावाचून राहावयाचा नाही.

नाथ म्हणतात - ''नाम घेतां हे वैखरी । चित्त धांवे विषयांवरी ॥१॥ कैसे होताहे स्मरण । स्मरणामाजी विस्मरण ॥२॥ नामरूपा नव्हता मेळ । नुसता वाचेचा गोंधळ ॥३॥

श्रीहरीचे अखंड प्रेम व ध्यानपूर्वक नामस्मरण घडावे अशी इच्छा असल्यास, जीव, जगत् यांपैकी काही एक श्रीहरीहून निराळे नसून तोच सर्वत्र भरला आहे व त्याचीच एक अद्वैत सत्ता आहे, असा अनुभव आला पाहिजे.श्रीहरीच्या अद्वैतसत्तेचा अनुभव येण्याकरिता आधी श्रुतिसंतांच्या वचनांवरून श्रीहरीच्या अद्वैत सत्तेचे परोक्ष ज्ञान झाले पाहिजे, ते श्रीज्ञानेश्वरमहाराज या अभंगातील प्रथम चरणात करून देतात.

**चहूं वेदीं जाण षट्शास्त्रीं कारण ।**
**अठराहि पुराणे हरीसी गाती ॥१॥**

### *अद्वैतसत्तेची परोक्ष जाणीव*

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे चार वेद आहेत व मंत्र, ब्राह्मण असे प्रत्येकाचे दोन भाग आहेत. वेदांतून कर्म, उपासना व ज्ञान असे तीन भगवत्प्राप्तीचे क्रममार्ग सांगितले आहेत.''तुझे वाक्य व्यक्तीं न येतां देवा । जो आपुलिया जाणे जाणिवा । तो कहींचि नोहे हें मद्भावा । भरवंसेनि आले'' (ज्ञा.१०-१७५) भगवंतांनी आपल्या मुखाने वेद निर्माण करून जर आपल्या प्राप्तीचा मार्ग सांगितला नसता तर जीवाला स्वबुद्धीने भगवत्प्राप्तीचा मार्ग जाणणे मुळीच शक्य नव्हते.ज्याप्रमाणे जन्मलेल्या मुलाला आपल्या आईचे वय स्वबुद्धीने जाणणे शक्य नाही त्याप्रमाणे 'कां जे महर्षि आणि या देवां । येरां भूतजाता सर्वां । मीचि आदि म्हणूनि पांडवा। अवघड जाणतां (ज्ञा.१०-६८) सृष्टीत उत्पन्न झालेल्या ऋषि, देव किंवा इतर जीव यांपैकी कोणालाही सृष्टीचे कारणरूप जो श्रीहरि त्याच्या स्वरूपाची माहिती स्वबुद्धीने होऊ शकत नाही.''जी आपणयातें तूंचि जाणसी । आणि कां ते सांगावयाही समर्थ होसी'' म्हणून परमेश्वरच एक आपल्या स्वरूपाला जाणतो व तोच दुसऱ्यालाही आपले स्वरूपज्ञान करून देऊ





शकतो.

वेदांतील कर्म-उपासना-ज्ञान हे तीन मार्ग श्रीहरीनेच प्रगट केले आहेत. त्यावर विश्वास ठेवूनच प्रथम चालले पाहिजे.त्या विश्वासानुसार श्रीज्ञानेश्वरमहाराज मुमुक्षूंना प्रथम परोक्षज्ञानाने श्रीहरीची अद्वैत सत्ता कशी आहे हे सांगतात.

चहूं वेदी म्हणजे चारी वेदांतून जाण म्हणजे जेवढे काही पदार्थज्ञान होते ते सर्व एका श्रीहरीचेच अनेक नामरूपांच्या द्वारा ज्ञान होते.कर्ममार्गात यज्ञादिक कर्मांचे ज्ञान, पापपुण्याचे ज्ञान, कर्मकर्त्याचे ज्ञान, इंद्रादि देवतांचे ज्ञान, हविर्द्रव्याचे ज्ञान, कर्माने प्राप्त होणाऱ्या स्वर्गनरकादि लोकांचे ज्ञान असे अनेक पदार्थांचे ज्ञान होते.येथे 'जाण' या पदाचा ज्ञान असा अर्थ घेतला पाहिजे.'जाण' ह्या शब्दाचा येथे 'समज' असा अर्थ घेऊ नये.कारण गाती हे क्रियापद वेद, शास्त्र व पुराणे यातून श्रीहरीचे वर्णन केलेले आहे असे दर्शवीत आहे.बाकीची ''जाण'' व ''कारण'' ही दोन पदे, वेद व शास्त्र यातून श्रीहरीचे वर्णन कशा रूपाने आले आहे हे दाखविण्याकरिता आहेत.वेदांतून जे निरनिराळ्या पदार्थरूपाने ज्ञान होते ते सर्व श्रीहरीचेच ज्ञान होय असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला ''अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाऽहमहमौषधम्'' (गीता ९-१६) इत्यादि श्लोकांनी मीच सर्व कर्म, यज्ञ, औषधी वगैरे स्वरूपाने नटलो आहे असे सांगितले असून श्रीज्ञानेश्वर माउलीनेही टीका करताना तोच अर्थ विशद केला आहे.

'तोचि जाणीवेचा जरी उदय होये । तरी मुद्दल वेद मीचि आहे । आणि तो विधानातें जया विये । तो क्रतुहि मीचि ॥ मग तया कर्मापासूनि बरवा । जो सांगोपांग आघवा । यज्ञ प्रगटे पांडवा । तोहि मी गा ॥ स्वाहा मी स्वधा । सोमादि औषधी विविधा । आज्य मी समिधा । मंत्र मी हवि ॥ होता मी हवन कीजे । तेथ अग्नि तो स्वरूप माझें । आणि हुत वस्तु जें जे। तेहि मीचि'' *(ज्ञाने.अ.९.२६५-२६८)*

अर्थात् कर्म मार्गातील निरनिराळ्या पदार्थांचे ज्ञान हे श्रीहरीचेच ज्ञान होय. त्या त्या रूपाने जी वस्तु जाणली जाते ती श्रीहरिवस्तूच जाणली जाते.

उपासनामार्गात प्रणवोपासना, सामोपासना, अक्षिपुरुषोपासना, दहरोपासना इत्यादि उपासनांचे प्रकार दिले आहेत. या उपासनेमुळे परमेश्वरप्राप्ति होते. उपासनेमध्ये ज्या पदार्थाच्या ठिकाणी श्रीहरीची भावना करावयाची असते ते सर्व पदार्थ दृश्य कोटीतीलच असतात.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात - 'द्रष्टा श्रीगुरुमूर्ती । न रिघतां दृश्य पथीं

। तरी कां ह्या उपास्ती । आकळता तो ॥'' ज्या दृश्य पदार्थाच्या ठिकाणी श्रीहरीची भावना आपण करितो, त्या दृश्य पदार्थाच्या रूपाने जर श्रीहरि प्रगट झाला नसता तर उपासनेच्या योगाने द्रष्टृस्वरूप श्रीहरीची प्राप्ती झाली असती कां? कधीही नाही; असा अर्थ. अर्थात् उपासनेतील उपास्यरूपानेही परमेश्वर श्रीहरीच नटला आहे असे माउलीचे म्हणणे आहे. ज्ञानमार्गात तर श्रीहरीच्या अद्वैत सत्तेचा अनुभवच सांगितला आहे. त्या ज्ञानविचाराने आपल्यालाही श्रीहरीच्या अद्वैतसत्तेचा अनुभव घेता येतो.

त्याचप्रमाणे न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा, उत्तर मीमांसा ही जी सहा शास्त्रे आहेत, त्यांतून जो जगत्कारणाचा शोध लावला गेला ते जगत्कारण परमेश्वर श्रीहरीच होय.

*न्याय व वैशेषिक ही दोन शास्त्रे, ईश्वर व पृथ्व्यादि भूतांचे परमाणु जगताला कारण आहेत असे मानतात.

*सांख्यशास्त्रात प्रकृतीला जगताचे कारण मानले असून *योगशास्त्रात, ईश्वर व प्रकृती या दोघांना जगताचे कारण मानले आहे.

*पूर्वमीमांसाशास्त्र धर्माला जगत्कारण मानते तर *उत्तरमीमांसा एका ईश्वरालाच जगताचे कारण समजते. याप्रमाणे निरनिराळ्या दर्शनाने निरनिराळे जगताचे कारण ठरविले असले तरी तो जगत्कारणाचा सर्व निर्देश एका श्रीहरीचाच, निरनिराळ्या नावाने, केला गेला आहे. निरनिराळे काही जगत्कारण नाही. याचे उपपादन वेदांतील उपनिषद् भागांतून केलेले आहे. पुराणांतून श्रीहरीच्या अवतारलीलांचेच प्राधान्याने वर्णन आलेले असल्यामुळे तेथे स्पष्ट श्रीहरीचे गुणानुवाद गायिलेले दिसतात.

याप्रमाणे उपनिषदातील ज्ञानविचाराने पाहता एका श्रीहरीवाचून दुसरी वस्तूच नाही म्हणून *वेदातील नाना पदार्थांचे ज्ञान, *उपासना मार्गातील उपासनाप्रकारांचे ज्ञान व *उपास्य-प्रकारांचे ज्ञान, *षड्दर्शनातील निरनिराळे जगत्कारण व *पुराणातून आलेले सर्व वर्णन, एका श्रीहरीचेच आहे. कारण सर्वत्र त्याचीच एक अद्वैत सत्ता आहे असे वेदान्ताचे म्हणणे आहे; हे माउलीचे सांगणे आहे.

श्रुतिसंतांचे वचनांवर विश्वास ठेवून परोक्षज्ञानाने श्रीहरीची अद्वैत सत्ता ग्रहण केली तरी अपरोक्ष अनुभवाने ती जाणल्यावाचून दृढनिश्चय होत नाही. म्हणून श्रीज्ञानेश्वरमाउली श्रीहरीची अद्वैतसत्ता कशी साक्षात् अनुभवगोचर करावी, हे या पुढील चरणात सांगत आहे.



(८)

## मंथुनी नवनीता तैसें घे अनंता ।
## वायां व्यर्थ कथा सांडी मार्ग ॥२॥

***अनंताला घ्यावे कसे?***

मागील चरणात परोक्ष ज्ञानाने जे श्रीहरीचे अद्वैत सत्तास्वरूप सांगितले आहे, तसा प्रत्यक्ष अनुभव येणे यालाच श्रीहरीला 'घेणे' किंवा श्रीहरीची प्राप्ति म्हणतात. श्रीहरीच्या अद्वैत सत्तेचा प्रत्यक्ष अनुभव येण्याकरिता, श्रीहरीहून निराळे भासणारे जीव व जगत् हेही श्रीहरीस्वरूपच आहेत, श्रीहरीवाचून जीवजगत् निराळे पदार्थ नाहीत असा साक्षात् अनुभव आला पाहिजे किंवा एका श्रीहरीवाचून दुसरी वस्तूच नाही असा अनुभव आला पाहिजे. लक्षणैक्य असले म्हणजेच वस्त्वैक्य(वस्तूचे ऐक्य) मानण्यात येते. म्हणून जीव, जगत् यांचे ठिकाणी श्रीहरीची अद्वैत सत्ता अनुभवाला येण्याकरिता किंवा जीव जगत् श्रीहरीच आहे असे अनुभवाला येण्याकरिता श्रीहरीची लक्षणेच जीव,जगत् यांचे ठिकाणी प्रतीत व्हायला पाहिजे.

***श्रीहरीची लक्षणे***

श्रुतिसंतांनी जी श्रीहरीची लक्षणे सांगितली आहेत ती अशी आहेत:- ''सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म'' सदासर्वदा असणारे किंवा अविनाशी, ज्ञानस्वरूप व अमर्याद असे ब्रह्म. ''सत्यज्ञांनानंत गगनाचे प्रावर्ण। नाही रूप वर्ण गुण जेथे॥'' अविनाशी, ज्ञानस्वरूप, आकाशाहून व्यापक, ज्याचे ठिकाणी, रूप, वर्ण, गुण नाहीत. ''अस्ति तावद् ब्रह्म नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावं सर्वज्ञं सर्वशक्तिसमन्वितम्'' ब्रह्म अविनाशी उपाधिरहित, ज्ञानस्वरूप, सर्वज्ञ व सर्वशक्ति आहे. नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः। अव्यक्तोऽ यमचिंत्योऽ यमविकार्योऽयमुच्यते॥ (गी.२.२४-२५) हा अनादि नित्य सिद्ध । निरुपाधि विशुद्ध । म्हणोनि शस्त्रादिकीं छेद। न घडे यया ॥ अर्जुना हा नित्य । अचळ हा शाश्वत । सर्वत्र सदोदित । परिपूर्ण हा ॥ (ज्ञा.२.४५-४७) उपनिषदादि ग्रंथांतून सांगितलेल्या श्रीहरीच्या लक्षणांचा संग्रह केल्यास, थोडक्यात श्रीहरीची लक्षणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

श्रीहरि *अविनाशी, *अपरिणामी म्हणजे ज्याच्या लक्षणात कधीही बदल होत नाही, *सत्वादि मायागुणरहित, *सर्वगत, *ज्ञानस्वरूप, *सुखस्वरूप, *निरवयव, *निराकार, *निर्गुण, *नामरूपरहित, *वाणीमनाला अतर्क्य,

*एकजिनसी, *अद्वितीय, *परिपूर्ण, *अकर्ता, *अभोक्ता, *सर्वातीत, *निर्विकल्प असा आहे.

### *विश्वाभासाचा आडवारा*

श्रुतिसंतांच्या वचनानुसार श्रीहरीची अद्वैतसत्ता आहे असे जरी परोक्षज्ञानाने आपण मान्य केले तरी अपरोक्ष तसा अनुभव येत नाही.कारण हे जे नामरूपात्मक सर्व विश्व आहे ते वर सांगितलेल्या श्रीहरीच्या लक्षणाचे दिसत नाही.विश्व या शब्दाने जीव, जगत् या दोघांचाहि बोध घेतला पाहिजे.भोक्ता जीव व भोग्य जगत् मिळूनच आपण विश्व म्हणतो.वर सांगितल्याप्रमाणे श्रीहरी सच्चिदानंदस्वरूप आहे पण जगत् जड विनाशी व दुःखरूप अनुभवाला येते आणि जीवही आपल्याला अज्ञानोपाधियुक्त कर्ता, भोक्ता, सुखी, दुःखी, अपूर्ण असे मानतो.हे दोन पदार्थ एकजिनसी, एकरूप अनुभवाला येण्याऐवजी भिन्न वाटतात.जीवजगताच्या अशा अनुभवामुळे, जीवजगतात श्रीहरीची अद्वैतसत्ता प्रत्ययाला येत नाही.

या विश्वाभासाचा श्रीहरीच्या अद्वैतसत्तानुभवाला प्रतिबंध होतो. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ज्या श्रीहरीचे नामस्मरण करण्यास आम्ही सांगतो तो श्रीहरि अनंत म्हणजे अद्वैतसत्तारूप आहे हे खरे; पण तुम्हाला त्या श्रीहरीचा अनंतरूपाने अनुभव नाही, तसा त्याचा प्रत्यक्ष अनुभव येण्याकरिता तुम्ही जगताचे विचारमंथन केले पाहिजे. म्हणजे वस्तुतः जगत् व जीव काय आहेत? याचा विचाराने शोध करून त्यांच्या निर्णित झालेल्या यथार्थ रूपाने त्यांचे ग्रहण केले पाहिजे.कारण ज्याप्रमाणे दह्यामध्ये नवनीत गुप्त असते व मंथन करून आपण ते दह्यापासून अलग करतो व घेतो, त्याप्रमाणे या जगात किंवा नामरूपात गुप्त किंवा झांकला असलेला श्रीहरि, जगाचे विचाररूप मंथन करूनच घेतला पाहिजे. विचाररूप मंथनाने जड, विनाशी व दुखःरूप अशा जगाहून निराळा पण जगामध्येच मिसळून असलेला व ज्या सच्चिदानंदरूप श्रीहरीवाचून जड, विनाशी अशा जगाची स्थितीच राहू शकत नाही त्या श्रीहरीला सच्चिदानंद धर्माने अलग करून घेता येते.''तैसें विचारिता निरसलें । तें प्रपंच सहजे सांडवलें । मग तत्त्वतां तत्त्व उरलें । ज्ञानियांसी । (ज्ञा.२-१३१)

श्रुतिशास्त्रानुसार बुद्धीने विचार करून पाहिले असता, एका श्रीहरीवाचून दुसऱ्या कशाचीच सत्ता सिद्ध होत नसल्यामुळे, श्रीहरीहून निराळे जीवजगद्रूप विश्व आहे असे जे वाटते, ते खोटे ठरून एका श्रीहरीचीच अद्वैतसत्ता आपली बुद्धि ग्रहण

(९)



करिते व विश्वाची सत्ता बुद्धीतून निघून जाते.

### *श्रीहरीच सर्वांचा मार्गदर्शक*

श्रीहरीची अद्वैतसत्ता ग्रहण होण्याकरिता जे विचाररूप मंथन करावयाचे तो मंथनाचा मार्ग, कोणत्याही जीवांना स्वयंबुद्धीने कळणे शक्य नसल्यामुळे, श्रीहरीनेच त्याचे मार्गदर्शन केले आहे.

''अगा उदरींचा गर्भ जैसा । न देखे आपुलिया मातेची वयसा । मी आघवेया देवा तैसा । नेणवें कही ॥ (ज्ञा.१०-६५) गर्भाला म्हणजे पोटी जन्मलेल्या मुलाला स्वबुद्धीने आपल्या आईच्या वयाची जशी कल्पना येऊ शकत नाही, तसे जगाचे कारण, जीवाला स्वबुद्धीने कळणे शक्य नाही.''येथ आपले वाडपण जैसें । आपणचि जाणिजे आकाशे । कां मी येतुली घनवट ऐसें । पृथ्वीचि जाणें ॥'' किंवा आकाशाचे व्यापकपण आकाशच जाणू शकते व पृथ्वीची घनता पृथ्वीच जाणू शकते, त्याप्रमाणे ''तैसा आपुलिये सर्वशक्ति । तुज तूंचि जाणसी लक्ष्मीपति । येर वेदादिक मति । मिरवती वांया ॥ जी आपणयातें तूंचि जाणसी । आणिकातें सांगावयाहि तूं समर्थ होसी ॥ (ज्ञा.१०-१८०) सर्वशक्ति व सर्वज्ञ परमेश्वराने आपल्या स्वरूपाचा विचार जीवाला सांगितला तर त्याचे स्वरूप कळू शकेल, एरव्ही नाही. म्हणून श्रीहरीच स्वतः सर्व जीवांचा आद्य गुरु झाला व त्याने उपनिषदादि द्वारा स्वस्वरूपाचा विचार प्रकट केला.

सृष्टीच्या उत्पत्तीनंतर प्रकट होणाऱ्या जीवाला, सृष्टिपूर्वी काय होते? किंवा या सृष्टीचे कारण कोणते? हे कसे कळणार? पण भगवंताने ''सदेव सौम्येदमग्र आसीत् ।'' कार्य उत्पत्तिपूर्वी कारणरूपाने असते या सिद्धान्तानुसार, ही कार्यरूप सृष्टी उत्पत्तीपूर्वी सत्स्वरूप होती असे वेदमुखाने सांगून, सदात्मा जगाचे कारण आहे असे सूचित केले.त्या सदात्म्यानेच पुढे ''सोऽ कामयत बहुस्यां प्रजायेयेति'' मी बहुरूप व्हावे अशी कामना केली व त्या संकल्पाबरोबर आकाशादि सृष्टी उत्पन्न झाली.जगताचे मी कारण असून जगत् हे माझे कार्य आहे, हे जे भगवंताने वेदमुखाने सांगितले, त्याचा वेदान्ताने विचार करून, जगताचा व श्रीहरीचा, श्रीहरीची अद्वैत सत्ता सिद्ध करण्याच्या दृष्टीने, कोणता व कशा प्रकारचा कार्यकारणभाव मानणे शक्य आहे हे दाखविले आहे.

### *श्रीहरि व जगत् यांचा संबंधविचार*

जगात चार प्रकारचे कार्यकारणभाव दिसतात. त्यापैकी जगत् व श्रीहरि यांचा कार्यकारणसंबंध कोणता व कशा प्रकारचा असणे शक्य आहे हे वेदान्त्यांनी ठरविले आहे. पण श्रीहरीच्या अद्वैतसत्तेच्या दृष्टीने व त्याच्या स्वरूपलक्षणाच्या दृष्टीने श्रीज्ञानेश्वरादि संतांनी कोणता संबंध मान्य केला हे आपण पाहू.

(१) जगात दिसून येणारा पहिला कार्यकारण संबंध म्हणजे पुत्रपिता हा होय. पण जगत् व श्रीहरी यांच्यात हा कार्यकारण संबंध मानता येत नाही. कारण अद्वैतसत्ता मानताना, ज्याची अद्वैतसत्ता मानावयाची, त्या वस्तुवाचून कार्यदशेत किंवा कारणदशेत दुसऱ्या वस्तूची सत्ता प्रतीत होता कामा नये. येथे तर पिता व पुत्र या दोन भिन्न वस्तूंच्या दोन भिन्न सत्ता दिसतात.

(२) दुसरा कार्यकारण भाव म्हणजे तंतुपटाचा संबंध. या कार्यकारणभावात पुष्कळशा लहान लहान सावयव वस्तूपासून मोठी सावयव वस्तु निर्माण होते. पण श्रीहरि अद्वैतस्वरूप व निरवयव असल्यामुळे, हाही कार्यकारणभाव जगत् व श्रीहरि यांच्या संबंधात मानणे शक्य नाही.

(३) तिसरा कार्यकारणभाव, दूध व त्याचे कार्य दही यात आहे. पण या कार्यकारण भावात कार्यदशेला कारण आले की, कारणाचा नाश होतो, कारण शिल्लक राहत नाही. श्रीहरि अविनाशी व अपरिणामी असल्यामुळे, हाहि कार्यकारणभाव जगत् व श्रीहरि यांच्यात मानणे शक्य नाही.

(४) चवथा कार्यकारणभाव म्हणजे विवर्त कार्यकारणभाव होय, या कार्यकारणभावात कारणवस्तूत यत्किचिंतही स्वरूपधर्माचे दृष्टीने बदल न होता, कार्यदशेतही तेच स्वरूपधर्म प्रतीत होतात व त्या धर्मांच्या प्रतीतीमुळे, कारणाच्या सत्तेचीही प्रतीती येते. या कार्यकारणभावाची *माती व त्यापासून झालेला घट, *सुवर्ण व अलंकार, *पाणी व तरंग; ही उदाहरणे होत. श्रीशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराजादि संतवर्यांनी जगत् व श्रीहरि यांच्या विषयी हाच वाद मान्य केला आहे व हाच कार्यकारणभाव जगत् व श्रीहरि यांच्या विषयी मानला असता विचाराच्या दृष्टीने व अनुभवाच्या दृष्टीने कोणताही दोष येत नाही. या कार्यकारणभावात कारणवस्तू जशीच्या तशी कार्यदशेत राहत असल्यामुळे, जगत् व श्रीहरि यांच्या संबंधांत हा कार्यकारणभाव मानल्याने श्रीहरीची अद्वैतसत्ता सहजच सिद्ध होते.



### *मंथन विचार*

विवर्त कार्यकारणभावाप्रमाणे जीव व जगत् यांच्यांतही श्रीहरीचे सच्चिदानंद धर्मच प्रतीत होऊन त्यांची अद्वैत सत्ता अनुभवाला यावयास पाहिजे. पण जीव व जगत् यांचे ठिकाणी भासणाऱ्या परस्पर विरुद्ध धर्मामुळे व श्रीहरीहून भिन्न भासणाऱ्या त्यांच्या भिन्न वस्तुत्वामुळे, श्रीहरीच्या अद्वैतसत्तेचा अनुभव येण्यास प्रतिबंध होतो म्हणून जीव व जगत् यांच्या स्वरूपाचा जसा सध्या अनुभव येतो तोच खरा आहे किंवा श्रीहरीचे जे सच्चिदानंदादि स्वरूपधर्म तेच जीव व जगत् यांचेही स्वरूपधर्म आहेत म्हणजे एक श्रीहरीच अद्वैतसत्तेने सर्वत्र नांदतो, याचा आपल्याला विचार केला पाहिजे. प्रथम जीवाच्या स्वरूपाचा विचार करू.

### *जीवस्वरूपाचा विचार*

आपल्या ठिकाणी मी म्हणून जे स्फुरण होते त्याला जीव म्हणतात. या जीवाला- मी म्हणजे कोण ? हे यथार्थ समजत नाही. मी म्हणजे देहस्वरूप, कर्मकर्ता, सुखदुःखादी फळभोक्ता, अज्ञानी, अपूर्ण, विषयभोगावरच ज्याचे सुख अवलंबून आहे असा, जन्ममरण भोगणारा, असे तो आपल्याला समजतो. हे सर्व त्याचे विपरीत ज्ञान असून स्वरूपाचा यथार्थ विचार न केल्यामुळे ते विपरीत ज्ञान आहे. स्वरूपाचा यथार्थ विचार नसणे यालाच अज्ञान म्हणतात. पण श्रुतिसंतानी दाखविलेल्या मार्गांनी विचार केला असता, त्याचे जीवाचे हे अज्ञान नाहीसे होऊन त्याला स्वरूपाचे यथार्थ ज्ञान होते. विषय, देह, इंद्रियें, प्राण, मन, बुद्धी, अहंकार या सर्वांचा देहात समावेश आहे. मी म्हटल्याबरोबर विचार न करता मनुष्य देहाकडे बोट दाखवून 'मी' जरी म्हणत असला तरी तो आपल्याला अनेक प्रसंगी देहाहून निराळा समजतो, असे दिसून येते. माझा देह असा जेव्हा तो देहाचा उल्लेख करतो तेव्हा तो देहाहून निराळा होऊनच करतो. कारण 'माझा' ही षष्ठि विभक्ति आपल्याहून भिन्न असलेल्या पदार्थाचा आपल्याशी काही संबंध दाखवायचा असल्यासच योजिली जाते. जागृतीत ज्या देहाचा मी म्हणून आपण निर्देश करतो, तो देह अंथरुणावर पडलेला असतो पण आपण त्या देहावर मीपणा ठेवीत नाही. सुषुप्तीत तर देहाला आपण विसरतोच. म्हणून 'मी म्हणजे देह' असे समजणे, हे स्वस्वरूपाचे यथार्थ ज्ञान नव्हे. ते विपरीत ज्ञान आहे. देहाच्या बाहेरच्या विषयाशी व्यवहाराचा संबंध आला असता आपण देहावर मीपण ठेवून व्यवहार करतो. बाहेरच्या विषयाशी व्यवहार होणे बंद पडले की, देहावरचा मीपणा देहाच्या आत

असलेल्या इंद्रियादिकांवर बसतो. पण देहावर मीपण ठेवून जरी आपण बाह्य व्यवहार करितो तरी तो मीपण जसा यथार्थतः देहावरचा नव्हे म्हणजे मी म्हणजे देहरूप नव्हे त्याप्रमाणे इंद्रियें, प्राण, मन, बुद्धि, अहंकार या निरनिराळ्या पदार्थांवर मीपणा बसवून व या रीतीने त्याच्याशी आपले ऐक्य करून, जरी आपण निरनिराळ्या वेळी मानसिक व्यवहार करीत असतो तरी, या सर्व पदार्थांचा माझे म्हणून आपण निर्देश करीत असतो.मी म्हणून त्यांचा निर्देश करू शकत नाही.याचे कारण हेच की मी म्हणणारा जीव सर्वांहून निराळा आहे.

### *जीव मुळांत ईश्वरस्वरूपच*

याप्रमाणे जीव हा सर्व ज्ञेय पदार्थांहून निराळा असल्यामुळे, त्याच्या ठिकाणी उत्पत्ति, नाश, कर्तृत्व, भोक्तृत्व इत्यादि ज्या धर्मांच्या योगामुळेच जीव म्हटले जाते, त्या सर्व धर्मांहूनही तो निराळाच असणे आवश्यक आहे.

जीव हा देह, प्राण, मन इत्यादिकांपैकी कोणालाही ज्ञेय होत नाही. तो ''स्वसंवेद्य'' आहे आणि बाकीचे देहादी सर्व क्षेत्रसमूह जीवाला ''ज्ञेय'' आहेत.जीव आपल्याला जाणून दुसऱ्याला जाणतो व दुसरे पदार्थ आपल्याला जाणत नाहीत व दुसऱ्यालाही जाणत नाहीत.म्हणून तो जीव ज्ञानरूप आहे.ज्ञानाला उत्पत्ती नाश राहू शकत नाहीत, कारण उत्पत्तीनाश जाणण्याकरिता ज्ञान पाहिजेच. वस्तूची भिन्नता, लक्षणाच्या भिन्नतेमुळे होते.ज्ञान हे एकच लक्षण जेथे आहे अशी दोन ज्ञाने मानणे अविचाराचे होय. म्हणून ज्ञानरूप जीव अविनाशीच मानणे भाग आहे. पुनः तो अत्यंत दुःखरहित, अविनाशी सुखाच्या प्राप्तीची इच्छा करीत असतो.असे सुख कोठेच नसते तर इच्छा होणेच दुरापास्त होते; आणि असे सुख त्याच्याहून निराळे व मिळवायचे असते तर तसे सुख अविनाशी होणे शक्य नाही.अविनाशी सुख म्हणजे अंखड सुख; व सुखाला अखंड तेव्हाच म्हणता येईल की, जेव्हा ते केव्हा नव्हते किंवा प्राप्त नव्हते असा अनुभव येणार नाही. असा अखंड सुखाचा अनुभव येण्याकरिता हा जीवच मुळात अखंड सुखस्वरूप असणे अनिवार्य आहे.

हाही एक सृष्टीतील नियम आहे की, ''कोणतीही वस्तू आपल्या स्वरूपभूत धर्माचा त्याग करू इच्छित नाही किंवा तिला त्या धर्माचा कंटाळा येत नाही'' हेच त्या वस्तूचे स्वात्मप्रेम आहे. वस्तू व तिचे स्वरूपधर्म हे अगदी एकरूप असतात. ते परस्परांहून निराळे करिता येत नाहीत. स्वरूपभूत धर्म नाहीसे होऊन वस्तू असू शकत नाही. जीवत्वाला कारणीभूत होणारे अज्ञान, जन्ममरण, कर्तृत्व, भोक्तृत्व





इत्यादि सर्व धर्मांचा जीव त्याग करूं इच्छितो, त्याला त्यांचा कंटाळा येतो.त्याअर्थी हे जीवधर्म, जीवाचे स्वरूपधर्म नव्हेत हे सिद्ध आहे.हे धर्म देहादि क्षेत्रसमूहाचे आहेत व त्यांच्याशी ऐक्य केल्यामुळे जीव आपले ठिकाणी मानून घेतो.

वास्तविक पाहता ज्या धर्माची त्याला इच्छा आहे त्या धर्माचा तो मुळात आहे. म्हणजे जीव हा पूर्ण सच्चिदानंद स्वरूप आहे. ''सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म'' या श्रुतीप्रमाणे सच्चिदानंद स्वरूप ब्रह्म आहे. म्हणजे जीव ब्रह्मस्वरूप आहे. जीवाच्या खऱ्या स्वरूपालाच ब्रह्म म्हणतात.ब्रह्मालाच आत्मा, ईश्वर अशीही नावे आहेत.वरील विचाराने मीच सच्चिदानंद श्रीहरि आहे असा दृढ अनुभव येणे, ही पहिली श्रीहरीप्राप्ती होय.

शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्र भाष्यात ''तस्मात्सर्वदुःखविनिर्मुक्तैक चैतन्यात्मकोऽहमित्येवं आत्मानुभवः॥'' मी सर्व दुःखरहित केवळ सच्चिदानंदस्वरूप आहे असे जाणणे यालाच आत्मानुभव म्हटले आहे. जीवाने आपल्या ठिकाणी सच्चिदानंद श्रीहरीची लक्षणे अनुभविली म्हणजे तो श्रीहरीस्वरूपच होतो. मग तो श्रीहरीहून निराळा राहत नाही. अर्थातच तेव्हां मी म्हणून स्फुरणाऱ्या जीवाचे ठिकाणीहि श्रीहरीचीच अद्वैतसत्ता अनुभवाला येते.'अर्जुनपण न घेता । मी ऐसे जें पंडुसुता । उठतसे तें तत्त्वता। तयाचें रूप' (ज्ञा.१८-१३१५) देहादिकाहून निराळे झालेले मीपणाचे स्फुरण ईश्वरच होय असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

### *दुसरी श्रीहरिप्राप्ति*

ही दुसरी श्रीहरीप्राप्ती आपल्या देहाहून निराळे भासणाऱ्या जगताचा विचार केल्याने होणारी आहे. वास्तविक पाहता देहरूपी क्षेत्र एवढे मोठे आहे की त्यांत स्थूल, सूक्ष्म, कारण या तीनही देहांचा म्हणजे सर्व जगाचाच अंतर्भाव होतो. मग आता आणखी काय विचारमंथन करून श्रीहरीची दुसरी प्राप्ती व्हायची राहिली? अशी शंका येणे शक्य आहे.

त्याचे समाधान असे की, सर्व देहाहून निराळे करून जीवात्म्याला पाहिले असता तो सच्चिदानंद श्रीहरीच आहे असे जरी अनुभवाला येते तरी एवढ्याने श्रीहरीची अद्वैतसत्ता सिद्ध होत नाही जीव हा श्रीहरीच आहे असे सिद्ध झाले तरी जोपर्यंत नामरूपात्मक जगत् ही एक वस्तू आहे असे त्याला ज्ञान आहे आणि श्रीहरीहून जगताचे भिन्न वस्तुत्व व अस्तित्व दाखविणारे, श्रीहरीच्या सच्चिदानंद धर्मांहून भिन्न, विनाशी, जड व दुःखरूप हे धर्म जगताचे ठिकाणी प्रत्ययाला येत

आहेत तोपर्यंत श्रीहरीची अद्वैतसत्ता अनुभवाला येणे शक्य नाही. श्रीहरीची अद्वैतसत्ता अनुभवणे म्हणजे श्रीहरीवाचून दुसरे काहीच नाही असा अनुभव येणे होय.असा अनुभव येण्याकरिता जे आपण नामरूपात्मक जगत् ही एक वस्तू आहे असे म्हणतो व त्या जगताला स्वतंत्र अस्तित्व देतो, त्या जगताचे ते स्वतंत्र वस्तुत्व व अस्तित्व दोन्ही नाहीत असे अनुभवाला आले पाहिजे.तोच विचार येथे करावयाचा आहे.

### *जगताचे मिथ्यात्व*

जगत् व श्रीहरि यांचा जो ''विवर्त कार्यकारण संबंध'' वेदांतात मानला आहे त्याचा विचार केला असता असे दिसून येईल की, विवर्त कार्यकारण संबंधात कार्याचे कारणाहून पृथक् वस्तुत्व व अस्तित्व नसते. कारणाने केवळ भिन्न भिन्न नामरूप धारण करणे हेच त्याचे कार्यदशेत येणे होय. ''तदेतन्नामरूपव्याकरणं ब्रह्मणो बहुभवनम्'' सृदिानंद परब्रह्म, आपल्याच ठिकाणी नामरूपाने विस्तार पावल्यासारखे होते ही त्या श्रीहरीची जगद्रूप कार्यदशा आहे. तैत्तिरीयोपनिषदांत ''सो ऽकामयत बहुस्यां प्रजायेयेति'' या श्रुतीवर भाष्य करताना ''तदा नामरूपे आत्मस्वरूप-अपरित्यागेनैव ब्रह्मणाऽप्रविभक्तदेशकाले सर्वावस्थासु व्याक्रियेते'' ब्रह्माहून अन्यत्र कोठे नामरूपे भासत नाहीत. ब्रह्मस्वरूपाशी अभिन्न असलेल्या देशकालाचे ठिकाणीच नामरूपे असतात.श्रुतीने जगत्कारण ब्रह्म सत्स्वरूप आहे असे सांगितले असून श्रीज्ञानेश्वरमहाराजही ''केवळ जी सत्ता । तो पुरुष गा पांडुसुता'' ब्रह्म सत्तास्वरूप आहे असे म्हणतात.म्हणजे नामरूपात्मक जगताला जी सत्ता आहे ती त्याची स्वतंत्र सत्ता नसून परब्रह्माची सत्ताच नामरूपाचे ठिकाणी आहे. परब्रह्मसत्तेवरच नामरूपाचा पसारा भासतो, म्हणून नामरूपात्मक जगद्रूप पसाऱ्यास स्वतंत्र अस्तित्व नाही. स्वतंत्र अस्तित्वच नाही तर स्वतंत्र वस्तुत्व तरी कोठले असणार? स्वतंत्र अस्तित्वाशिवाय स्वतंत्र वस्तुत्व राहणे शक्य नाही आणि स्वतंत्र वस्तुत्वाखेरीज स्वतंत्र अस्तित्वही राहणे दुर्लभ आहे. अशा रीतीने नामरूपात्मक पसाऱ्याला ब्रह्माहून स्वतंत्र वस्तुत्व व अस्तित्व, विचार करून पाहता, दिसत नाही. म्हणूनच वेदान्ताने नामरूपात्मक जगद्रूप पसाऱ्याला मिथ्या म्हटले आहे.

वेदान्तात जगन्मिथ्यत्वाचा अर्थ असा आहे की, जड, विनाशी, दुखःरूप, परमेश्वराहून निराळे, सद्भावरूप असे हे जगत् आहे असे जे जीव समजतो तसे

(१२)



जगत् मुळीच नाही. ही जगताविषयीची जीवाची भ्रांत कल्पना आहे, त्याच्या कल्पनेमुळे तसे ते भासते.

वास्तविक जगत् हे ब्रह्माहून भिन्न नसून ब्रह्माशी अभिन्न आहे. ब्रह्म जसे सृदिानंदरूप आहे तसेच जगतही सृदिानंद स्वरूपच आहे.

'नहि पुत्रोत्पत्तेरिवार्थान्तर विषयं बहुभवनम् । कथं तर्हि ? आत्मनः अनभिव्यक्तनामरूपाभिव्यक्त्या ।' आत्म्याचे ठिकाणी अव्यक्तदशेत असलेली नामरूपे आत्मस्वरूपाचे ठिकाणी व्यक्त झाली म्हणजे त्यालाच जीव, जगत् ही नावे आपण देतो.वास्तविक पाहता तो नामरूपात्मक देखावा परब्रह्माचाच होय.पण जीव परब्रह्माला जाणत नाही म्हणून त्याला तो नामरूपात्मक देखावा स्वतंत्र एक वस्तु आहे असे वाटते. वेदांताने ही त्याची गैरसमजूत नाहीशी करून नामरूपात्मक जगत् सृदिानंद ब्रह्मस्वरूप कसे आहे हे त्याच्या अनुभवाला आणून देण्याकरिता, जीव जशा प्रकारचे जगत् मानतो तशा प्रकारचे जगत् खोटे ठरवून जगाचे खरे स्वरूप ब्रह्मरूप कसे आहे हे स्पष्ट केले आहे.

### *मायावादाचा उगम*

सृदिानंद परब्रह्मापासून झालेले जगत् सृदिानंद स्वरूपाने जीवाच्या अनुभवाला येत नाही, इतकेच नव्हे तर विपरीत धर्माने अनुभवाला येते याला काही तरी प्रतिबंधक कारण मानल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही रीतीने त्याची उपपत्ती लावता येत नाही, म्हणून शंकराचार्यादिकांनी अशा प्रकारच्या जगद्दर्शनाविषयी मायावाद किंवा अज्ञानवाद मानला आहे.

ज्याप्रमाणे ''क्षीरसागरीची गोडी । माजी बहु थडिये थोडी । हे नाही तया परवडी । पूर्ण जे गा'' (ज्ञा.अ.१३-९१५) ''नाना लवण कणाचिये राशीं । क्षारता एकचि जैसीं कां कोडी एकी उसीं । एकचि गोडी'' (ज्ञा.अ.१३-९१८) क्षीरसागराच्या मध्यभागी जास्त गोडी असते पण कांठाशी मात्र कमी असते असे म्हणता येत नाही. किंवा मिठाच्या खड्यांचा ढीग केला तरी त्या ढिगातील प्रत्येक मिठाचा कण सारखाच खारट राहतो अथवा उसाची मोळी बांधली तरी त्या प्रत्येक उसात गोडी सारखीच असते; त्याप्रमाणे सृदिानंद परिपूर्ण परब्रह्म, जगद्रूप झाले तरी त्याची सृदिानंद परिपूर्णता जगद्दशेतही नाहीशी होणे शक्य नाही असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

असा दृढ सिद्धान्त असताना, ज्यांना जगताचा सृदिानंदरूपाने अनुभव येत

नसेल व उलट जड विनाशी दुःखरूप जगत् भासत असेल अशांना जगताच्या खऱ्या स्वरूपाविषयी अज्ञान आहे किंवा अशांचा जगत्प्रत्यय अज्ञानमूलक व भ्रांत आहे असे म्हणणे भाग आहे.

''यद्यपि कार्यात्मनोद्रिच्यते तथापि यत्स्वरूपं पूर्णत्वं परमात्मभावं तन्न जहाति । पूर्णमेवोद्रिच्यते । पूर्णस्य कार्यात्मनो ब्रह्मणः पूर्णपूर्णत्वम्'' जरी परब्रह्म कार्यरूपाने स्फुरण पावते तरी त्या कार्यदशेत त्याची पूर्ण स्थिती नाहीशी होत नाही. कार्यदशेतही ते पूर्णच राहते.कारण ब्रह्मही पूर्ण व जगद्रूप कार्यही ब्रह्माशी एकरूप म्हणून ते जगद्रूप कार्यही पूर्ण ब्रह्मच आहे, असे शंकराचार्यच म्हणतात. अर्थात् ''नामरूपात्मक पसाऱ्याला आचार्य मिथ्या म्हणत नाहीत. तो सच्चिदानंदरूप न भासता जर जड विनाशी भासत असेल तर तो प्रत्यय किंवा त्या प्रत्ययाचे जगत् मिथ्या आहे असे ते म्हणतात'' हे त्यांच्याच वचनांवरून सिद्ध आहे व त्यांच्या मायावादाचा हाच अर्थ आहे.

### *व्यतिरेक व अन्वय*

श्रीहरीची अद्वैतसत्ता सिद्ध करण्याकरिता ज्याप्रमाणे जीवही श्रीहरिस्वरूपच आहे हे दाखविले गेले त्याप्रमाणे जगतही श्रीहरिस्वरूपच आहे असे सिद्ध होणे आवश्यक आहे.तेच व्यतिरेकान्वय विचाराने सिद्ध होत असल्यामुळे व्यतिरेकान्वयाचा विचार करू.

### *१. व्यतिरेक*

कारणापासून होणारे कार्य, कारणाहून भिन्न असते म्हणजे कारणाहून स्वतंत्र वस्तू असते की कारणाशी अभिन्नच राहते म्हणजे स्वतंत्र वस्तू नसते हे पाहण्यासाठी, कार्यापासून कारण अलग करून पाहात असतात याला व्यतिरेक म्हणतात.

कारणापासून होणारे कार्य, कारणाहून स्वतंत्र राहत असते व ती निराळी वस्तू होते असे तेव्हा म्हणता येईल की, जेव्हा कारण कार्याहून अलग केल्यावरही कार्य दृष्टीस पडेल, पण कारण अलग केल्यावर कार्य दृष्टीस पडणार नाही तर ते कार्य कारणाशी अभिन्न आहे असेच सिद्ध होते.

*मातीपासून घट होतो. माती अलग केल्यास घट बुद्धीत येत नाही.

*छांदोग्योपनिषदांत उद्दालकांनी आपल्या पुत्रास हाच व्यतिरेक सांगून जगत् ब्रह्माशी कसे अभिन्न आहे हे दाखविले आहे.त्याप्रमाणे सद्ब्रह्म जगाचे कारण





असून ते जगापासून अलग केल्यास जग म्हणून काहीच वस्तू बुद्धीत येत नाही. अर्थात् जगत् म्हणून ब्रह्माहून काही निराळी वस्तू नव्हे हे सिद्ध आहे.

जगद्दशेतही ब्रह्मच असून ब्रह्मालाच नुसते जगत् हे नाव दिले गेले असे स्पष्ट कळून येते. व्यतिरेकाप्रमाणेच अन्वयाचा विचार केला तरी हेच सिद्ध होते.

### *२. अन्वय*

अन्वय म्हणजे कार्यात कारणावाचून दुसरी वस्तू नाही, असे अनुभवाला येणे होय.

ज्याप्रमाणे मातीच्या घटात मातीच असते दुसरे काही नसते किंवा सोन्याच्या अलंकारात सोनेच असते दुसरी वस्तू नसते त्याप्रमाणे विवर्तकारण अशा परब्रह्मापासून झालेल्या जगातही सच्चिदानंद श्रीहरीच असणे शक्य आहे, दुसरे काही नाही, असे श्रीज्ञानेश्वरमहाराजादी सर्व अनुभवी संतांनी सांगितले आहे.

या अन्वयाचा जग व श्रीहरि हे निराळे आहेत व त्या निराळ्या जगांत श्रीहरी व्यापून आहे असा अर्थ नाही, तर जग म्हणजे हरीच होय, असा अन्वयात ऐक्यबोध आहे.''नाग मुदी कंकण । त्रिलिंगी भेदली खूण । घेता तरी सुवर्ण । घेईजे की।। ''वेचून आणू कल्लोळ । म्हणोनि घापे करतळ । तेथे तरी निखिळ । पाणीच फावे ।।'' इत्यादी वचनामृतांत श्रीज्ञानेश्वर महाराजांनी अन्वयाने कार्यरूप प्रपंच ब्रह्मरूप आहे असा स्वानुभव सांगितला आहे.

### *दुसरा ब्रह्मानुभव किंवा दुसरी श्रीहरिप्राप्ती*

व्यतिरेकान्वयाने सर्व नामरूपात्मक प्रपंच ब्रह्मस्वरूप आहे असे कळल्यावर हा दुसरा ब्रह्मानुभव किंवा दुसरी श्रीहरिप्राप्ती म्हटली जाते.

चतुश्लोकी भागवतात नाथ म्हणतात, ''अन्वय व्यतिरेकाचे सूत्र। साधूनि साधक पवित्र । स्वये झाले वस्तु चिन्मात्र । सर्वदा सर्वत्र अविनाश ।।६२१।। एवं अन्वय व्यतिरेकयुक्तें । साधन महा राजपंथें । विसरोनि वेगळेपणाते । मदैक्यातें साधक येती ।।६२२।।'' अन्वय व्यतिरेकाचे सूत्र साधूनच चिन्मात्र ब्रह्मस्वरूप होता येते. परब्रह्माशी पूर्णैक्य होण्याकरिता अन्वयव्यतिरेकाने विचार करणे हाच थोर राजपंथ होय.व्यतिरेक ज्ञानविचाराने ''देहीचे जावोनि अहंपण । ब्रह्माहमस्मि स्फुरे स्फुरण'' मी ब्रह्म असा अनुभव येतो व नंतर अन्वय विचाराने सर्व ब्रह्म कळू लागते व नामरूपही ब्रह्मरूप असे कळून येते. त्यामुळे नामरूपांवर स्वाभाविक प्रेम जडते तेव्हा व्यतिरेक ज्ञानाने मिळालेला अहंब्रह्म-स्फूर्तिरूप जो अनुभव ''ते स्फूर्तिहि विरे

संपूर्ण । त्या नांव विज्ञान पूर्णत्वाचे ॥ पूर्ण चिन्मात्र स्थिती होते.''अन्वय माझी पूर्ण भक्ति । व्यतिरेक शुद्ध स्वरूपस्थिति'' अन्वयात सगुण श्रीहरि व त्यांचे प्रेम असते आणि व्यतिरेकात निर्गुण ब्रह्मसाक्षात्कार असतो.

### *द्विविध ब्रह्मानुभव*

शंकराचार्यादि सर्व संतांनी असा द्विविध ब्रह्मानुभव मानला आहे.

**आत्मानात्मप्रतीतिः प्रथममभिहिता सत्यमिथ्यात्वयोगात् ।**
**द्वेधा ब्रह्मप्रतीतिर्निगमनिगदिता स्वानुभूत्योपपत्त्या ।**
**आद्या देहानुबंधात् भवति तदपरा साच सर्वात्मकत्वात् ।**
**आदौ ब्रह्माहमस्मीत्यनुभव उदिते खल्विदं ब्रह्म पश्चात् ॥१॥**
(शंकराचार्य - शतश्लोकी)

''अहं ब्रह्मास्मि व खल्विदं ब्रह्म'' असा द्विविध ब्रह्मानुभव या श्लोकात आचार्यांनी मानला असून ''हे विश्वचि माझे घर । ऐसी जयाची मति स्थिर । किंबहुना चराचर । आपण जाहला ॥'' श्रीज्ञानेश्वर महाराजांनीही असाच दोन प्रकारचा ब्रह्मानुभव या ओवीत मानला आहे. व्यतिरेकान्वयरूप विचारमंथनाने असा दोन प्रकारचा ब्रह्मानुभव दृढ झाला म्हणजे विचाररूप मंथनाचे काम संपते व ज्या सगुण श्रीहरीचे अखंड नामस्मरण होण्याकरिता व आत्मवत् प्रेम लागण्याकरिता एवढे विचाररूप मंथन केले त्या श्रीहरीचीच सर्वत्र अद्वैतसत्ता अनुभवाला येते व त्याचे अकृत्रिम प्रेम अंतःकरणात जडून आपले अंतःकरणही ध्यानाने श्रीहरीस्वरूप होऊन जाते, हे श्रीज्ञानेश्वर महाराजांनीच सांगून ठेवले आहे.

''द्विविध ब्रह्मानुभवापर्यंत ज्ञानविचाराचा प्रांत असून श्रीहरीचे अकृत्रिम आत्मवत् प्रेम लागणे हा ज्ञानोत्तर भक्तीचा प्रांत होय.'हे ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे । तेथ भक्ति माझी उल्लसे ॥'

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी द्विविध ब्रह्मानुभवाला ज्ञाननिष्ठा म्हटले असून ही ज्ञाननिष्ठा बाणली की, स्वाभाविक सगुणाची प्रेमभक्ती होते असे त्यांचे म्हणणे आहे. या भक्तीलाच त्यांनी सहजस्थिती म्हटले आहे.

कोणी ज्ञान व भक्तीत काहीच फरक नाही असा वाद करितात, अशा शाब्दिक वेदान्त्यांना श्रीज्ञानेश्वरामहराजांच्या वचनानेच योग्य स्थळी उत्तर देण्यात येईल.''जै कृष्ण होईजे आपण । तै कृष्ण होय आपले अंतःकरण'' या ओवीतही महाराजांनी, ज्ञाननिष्ठेने श्रीकृष्ण व आपण एक आहोत अशी जाणीव दृढ झाल्यावर सगुण श्रीहरि आपलेच स्वरूप म्हणून सगुण श्रीहरीचे प्रेम आपोआप लागते व



ध्यानाने अंतःकरणही सगुण श्रीहरीरूप होते, असाच सिद्धांत मांडला आहे. अशा ज्ञानविचाराने श्रीहरीची निर्गुण स्वरूपस्थिती व भक्तीने सगुण स्वरूपस्थिती बाणली की, श्रीहरीची पूर्ण प्राप्ती झाली किंवा जीव पूर्ण ब्रह्मरूप झाला.

### *नामस्मरणावांचून दुसरे काही नको*

एवढी श्रीहरीची प्राप्ती होण्याकरिता चित्ताची अत्यंत शुद्धी व्हावयाला पाहिजे.विषयसुखाची वासना हीच मुख्यतः चित्ताची अशुद्धी होय.ही विषयसुखाची वासना हरिप्रेमानेच नाहीशी होते व श्रीहरीचे प्रेम हरिनामस्मरणानेच प्राप्त होते म्हणून मूळची विषयसुखाची वासना कायम राहील व त्या विषयवासनेच्या ओढीमुळे भगवन्नामस्मरणाकडे मन वळणार नाही असा कोणताही शास्त्राभ्यास किंवा वार्तालाप अथवा साधनमार्ग यांचा व्यासंग सर्वस्वी सोडून दिला पाहिजे.

भगवन्नामस्मरणरूप भगवद्भक्ति करणाऱ्याला स्वतंत्र ज्ञानविचार करीत बसण्याची किंवा मनोनाश- वासनाक्षय यांचा अभ्यास करीत बसण्याची आवश्यकता नसते.''यमदमा अवकळा आणिली'' (ज्ञा. ९-१९८) नामधारकाला यमदम वगैरे साधनसंपत्ती सुलभ साधते. त्याचप्रमाणे व्यतिरेक अन्वय हे देखील सहजासहजी साधून ज्ञाननिष्ठा, स्वल्प आत्मविचाराने दृढ बाणते म्हणून ज्यात सगुण श्रीहरीचे नामस्मरण किंवा गुणवर्णन नाही असा कोणताही मार्ग अथवा कथा, श्रीहरीच्या प्राप्तीच्या दृष्टीने व्यर्थ असल्यामुळे त्यांचा त्याग करून एक हरिनास्मरणच करावे, असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

## एक हरि आत्मा जीवशिव सम ।
## वायां तूं दुर्गम न घाली मन ॥३॥

### *आक्षेप* –

कोणी म्हणतील की अहो! तुम्ही वर ज्या स्वरूपाचे व्यतिरेक अन्वयरूप विचाराने ग्रहण करावयाला श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात असे म्हणता, ते सद्ादिनंद स्वरूप निर्गुण निराकार होय- सगुण नव्हे. निर्गुण निराकार श्रीहरि निरुपाधिक अद्वैतसत्तारूप आहे हेच मान्य केले पाहिजे. सगुण साकार श्रीहरि निरुपाधिक अद्वैतसत्तास्वरूप कसा राहू शकतो? तो तर मायिक म्हणून सांगितला आहे. ''प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया'' (गी४-६) असे भगवानच आपल्या मुखाने म्हणतात व ''तैसा अमूर्तचि मी किरीटी । परि प्रकृति जै अधिष्ठी । तै

साकारपणे नटनटी । कार्यालागी'' (ज्ञा.४-४८) असे श्रीज्ञानेश्वर महाराजही म्हणतात. अर्थात् भगवंताचा सगुण साकार देह मायाजन्य पांचभौतिकच मानला पाहिजे. पांचभौतिक देहधारी श्रीहरि अद्वैतरूप कसा असणे शक्य आहे? अर्थात् त्याचे सगुण साकार स्वरूप त्याच्या निर्गुण निराकार स्वरूपापेक्षा कनिष्ठच असले पाहिजे.

शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रभाष्यात ''न स्थानतोऽपि परस्योभयलिंगं सर्वत्रहि'' या अधिकरणावर भाष्य करताना असे म्हटलेही आहे - ''स्यात् परमेश्वरस्यापि इच्छावशात् मायामयं रूपं साधकानुग्रहार्थम्'' साधकावर अनुग्रह करण्याकरिता परमेश्वर मायामय रूप घेतो असे आचार्यांचेच सूत्रभाष्यात दुसरे वचन आहे.या सर्व शंकांचे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या चरणात उत्तर दिले आहे.

***सगुण-निर्गुण ऐक्य***

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात,''एक हरि आत्मा'' आत्मा म्हणजे निर्गुण निराकार स्वरूप व हरि म्हणजे सगुण साकार स्वरूप हे दोन्ही एकच आहेत.ह्या दोन निराळ्या वस्तू नव्हेत.सगुण साकार व निर्गुण निराकार ही दोन रूपे एका आत्मवस्तूची होत, आपल्या सगुण साकार स्वरूपाला उद्देशून भगवान म्हणतात,

''अगा ब्रह्म या नांवा । अभिप्राय मी पांडवा । मीचि बोलिजे आघवा । शब्दीं इही ॥४०४॥ पै मंडळ आणि चंद्रमा । दोन्ही नव्हती सुवर्मा । तैसा मज आणि ब्रह्मा । भेद नाही ॥४०५॥ अगा नित्य जे निष्कंप । अनावृत धर्मरूप । सुख जे उमप । अद्वितीय ॥४०६॥ विवेक आपले काम । सारूनि ठाके जे धाम । निष्कर्षाचे निःसीम । किंबहुना मी ॥४०७॥ (ज्ञा.अ.१४)

निराकार व निर्गुण ब्रह्माचा आणि माझा म्हणजे सगुण साकार स्वरूपाचा केवळ नाममात्र भेद आहे.ज्याप्रमाणे चंद्रालाच चंद्र व मंडळ म्हणतात त्याप्रमाणे 'एकाच आत्मवस्तूची दोन प्रकारची स्थिती आहे व ती दोन्ही प्रकारची स्थिती स्वाभाविकच आहे हे त्यांना मान्य आहे,'' असे त्यांनी दिलेल्या दृष्टांतावरून स्पष्ट दिसते. दुसऱ्याही ठिकाणी असाच नाममात्र भेद दाखविला आहे.

''तरी पार्था परियेसा । मी तंव येथ ऐसा । रत्नीं किळावो जैसा । रत्नचि तो'' ॥३७४॥ कां द्रवपणचि नीर । अवकाशचि अंबर । गोडि तेचि साखर । आन नाही''॥३७५॥ (ज्ञाने.अ.१४) या सर्व ओव्यांवरून श्रीज्ञानेश्वरमहाराजांना निर्गुण श्रेष्ठ व सगुण त्यापेक्षा कनिष्ठ असा भेद मान्य नाही असे स्पष्ट दिसते. ते सगुण निर्गुण दोन्ही रूपे अगदी एकरूपच समजतात.

(१५)



नाथांनीही सगुणनिर्गुण समसमान आहे असेच म्हटले आहे.''पै जे वानी श्यातुका । तेचि वेगळिये वाला एका । म्हणोनि एकदेशिया व्यापका । सरिसा पाडू'' (ज्ञा. १२-२५) एकदेशीय सगुण व व्यापक निर्गुण दोघांचीही स्थिती सारखीच म्हणजे दोघेही निरुपाधिक आहेत असे माउलीचे बजावून सांगणे आहे. ज्याप्रमाणे पाण्याचे ठिकाणी बर्फ नसतो म्हणजे बर्फावाचून आपण पाणी पाहतो पण बर्फ मात्र पाण्यावाचून राहूच शकत नाही.त्यात पाणीच असते, पाण्यावाचून दुसरे काहीच राहत नाही; त्याप्रमाणे जरी नामरूपरहित निर्गुण निराकार ब्रह्माचा अनुभव घेता येतो, तरी नामरूपसहित सगुण साकार परमेश्वराचे ठिकाणी निर्गुण निराकाराशिवाय दुसरे काहीच राहत नाही. म्हणून सगुण साकार परमात्माही निरुपाधिकच असतो. त्याचे निरुपाधिक अवस्थेतील कोणतेही धर्म नित्य असल्यामुळे, ते धर्म राहूनच परमात्मा सगुण साकार होतो.

अर्थातच भगवान् श्रीहरि सगुणसाकार झाला तरी त्याची व्यापकताही नष्ट होत नाही.हे भगवंतांनी स्वतः आपल्या सगुणस्वरूपाचे ठिकाणीच विश्वरूप दाखवून अर्जुनाला प्रत्यक्षच आपल्या व्यापकपणाचा अनुभव आणून दिला.

त्या अनुभवावरूनच अर्जुन म्हणू लागला,''तरी मज पाहतां मुकुंदा । तूं ऐसाचि व्यापक सर्वदा । भक्तानुग्रहे तया मुग्धा । रूपातें धरिसी'' (ज्ञा.११-२८९) भक्ताच्या प्रेमाकरिता हे तूं छोटेसे गोजिरवाणे रूप धारण करतोस.हे विश्वरूपदर्शन म्हणजे अन्वयच होय, असे श्रीज्ञानेश्वर महाराजांचे सांगणे आहे.ते म्हणतात ''प्रथम स्वरूपसमाधान । पावोनि ठेला अर्जुन । सवेंचि उघडले लोचन । तंव विश्वरूप देखे''(ज्ञा. ११-१९५) प्रथम व्यतिरेकाने सृदिानंद आत्मस्वरूप मी आहे असा अनुभव घेऊन डोळे उघडून नामरूपाच्या पसाऱ्याकडे पाहता विश्वरूपाचे दर्शन होते. ''इहींचि दोन्हीं डोळां । पहावें विश्वरूपा सकळा''(ज्ञा.११-१९६) व्यतिरेक व अन्वय या दोन डोळ्यांनी कोणालाही विश्वरूप पाहता येते असे माउली म्हणते. व्यतिरेकान्वयरूप ज्ञानदृष्टी, ज्यांना नाही त्यांना, स्वतःचा देह जसा पांचभौतिक वाटतो तसा भगवंताचा देहही पांचभौतिक वाटावा यात नवल काय?

पण नाथ म्हणतात, ''जीवासी दृढ देहबुद्धी । भगवंतही देहसंबंधी । तैं त्याचे भजनें मोक्ष सिद्धि। न घडे त्रिशुद्धी जीवासी ॥३८॥ ऐसी उठो पाहे शंका । तें विषयीचे उत्तर आईका । जीवा आणि जगन्नायका । देह समत्व देखा, न घडे ॥३९॥ जाति पाहता दोन्ही दगड । परि रत्न गार नव्हे पडिपाड । देहजीवा समत्व दृढ । हे

केवळ मानिती मूर्ख, न ज्ञाते ॥४०॥ भगवद्देह चैतन्यघन । तेथ न वसे देहाभिमान। यालागी करिता त्याचे भजन। अज्ञान जन उद्धरती॥४१॥

## *सगुण साकार पांचभौतिक आहे, ही केवळ कल्पना*

वास्तविक वेदान्तविचाराचे दृष्टीने पाहता, माया किंवा अज्ञान व त्याचे कार्य नामरूपात्मक जगत् हे सर्व कल्पनामात्र आहे. मी अज्ञानी आहे. जगत् आहे. ते उत्पन्न होते. नाश पावते.' इत्यादी सर्व कल्पनांचे जाळे आहे. सच्चिदानंद स्थिती विसरून संसाररूपी कल्पनांचे जाळे जीवाने विणले आहे. ''सर्वकल्पनापनयनार्थ सारपरत्वात् सर्वोपनिषदाम्'' सर्व कल्पनांचा नाश करणे हेच वेदान्ताचे कार्य आहे असे आचार्य म्हणतात. आत्मस्वरूप मुळात निर्विकल्प आहे. तेथे त्यावाचून किंवा त्याशिवाय काही आहे असे जे अनुभवले जाते, ते अर्थातच कल्पनामात्र असणेच संभवते.

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''एऱ्हवी तरी भूमि आतुनि स्वयंभ । काय घडेया गाडगेयांचे निघती कोंभ । परि कुलाल मतीचे गर्भ । उमटले की ॥''(ज्ञा. ९-७४) जमिनीतून घडे, गाडगे यांचे अंकुर निघत नाहीत. घडे, गाडगे म्हणजे मातीवर कुंभाराने केलेली कल्पना होय. त्याप्रमाणेच 'तैसी इये निर्मळ माझ्या स्वरूपी । जो भूतभावना आरोपी । तयासी तयाच्या संकल्पीं । भूताभास असे ॥७९॥ तैसे भूतजात माझ्या ठायीं । कल्पिजे तरी आभासे कांहीं । निर्विकल्पीं तरी नाहीं । तेथ मीचि मी आघवे ॥ (ज्ञा. ९-९०)

भगवान म्हणतात, अर्जुना माझ्या निर्विकल्प स्वरूपाच्या ठिकाणी मजवाचून काही नाही, दुसऱ्या वस्तूची कल्पना केली तरच दुसऱ्या वस्तूचा भास होईल. याप्रमाणे श्रीहरिवाचून हा जो संसार भासतो तो जीवाच्या कल्पनेमुळे. जीव पांचभौतिक सृष्टी आहे अशी दृढ कल्पना करितो म्हणूनच त्याला ही पांचभौतिक सृष्टी भासते. एरव्ही आघवे परब्रह्मच भरले असल्यामुळे वास्तविक पांचभौतिक अशी सृष्टीच मुळी नाही. 'कल्पना' या शब्दाचा अर्थच मुळी, 'काही नाही' असा आहे. वेदान्त शास्त्रात, माया व मायेपासून भासणारा हा जड, विनाशी, दुःखरूप प्रपंच सर्वच खोटे काल्पनिक मानलेले आहे, म्हणूनच त्याचा आत्मस्वरूपाच्या ज्ञानाने नाशही मानला आहे. प्रपंच म्हणजे स्वरूपाचीच विपरीत कल्पना होय.

''या नश्यति सा माया चिन्मात्रे परिकल्पिता'' आत्मज्ञानाने नाश पावणारी माया चैतन्याचे ठिकाणी कल्पित आहे असे वेदान्ताचेच म्हणणे आहे. म्हणजे स्वतःचा

(१६)



देह पांचभौतिक आहे अशी जीव जशी कल्पना करितो त्याचप्रमाणे रामकृष्णादी देह पांचभौतिक आहेत अशी तोच कल्पना करितो.

## *वास्तविक चिद्विलास*

अशा या नामरूपात्मक विश्वाच्या सगुणासाकार पसाऱ्याविषयी, हा सर्व प्रपंच मायागुणयुक्त आहे, पांचभौतिक आहे, उत्पत्तिनाशवान् आहे, जड आहे, वगैरे अशी जीव कल्पना करितो किंवा त्याचा तसा दृढ समज आहे. म्हणून त्याला त्या कल्पनेनुसार तसाच अनुभव येतो. वास्तविक पाहता वर सांगितल्याप्रमाणे हा सर्व पसारा सच्चिदानंद परब्रह्माचे स्फुरण असल्यामुळे, नामरूपासहच परब्रह्म सच्चिदानंदस्वरूप आहे असे वेदान्तशास्त्राचे कंठरवाने सांगणे आहे. ज्या जीवाने वेदान्तशास्त्रानुसार नामरूपात्मक सगुणसाकार विश्व काय वस्तू आहे याचा विचारच केला नाही, त्याला हे विश्व सच्चिदानंद- स्वरूप भासत नसले तरी ज्यांनी विचार केला आहे, अशा ज्ञान्याला मात्र ते सच्चिदानंद स्वरूपच भासते.

*शंकराचार्य म्हणतात, 'सदात्मना सत्यत्वाभ्युपगमात् । सर्वं च नामरूपादि सदात्मनैव सत्यं विकारजातं स्वतस्त्वनृतमेव । अतः सदात्मना सर्वव्यवहाराणां सर्वविकाराणां च सत्यत्वं सतोऽन्यत्वे चानृतत्वमिति।'' नारूपात्मक जगताचे श्रीहरीहून निराळे अस्तित्व नाही व म्हणून निराळे वस्तुत्वही नाही, श्रीहरि हीच वस्तू जगत्स्वरूप भासते असे ज्यांना जगताचे परमेश्वराशी अभिन्नत्व पटले, त्यांचे हे ज्ञान दृढ झाले असता नामरूपात्मक विश्व सच्चिदानंदस्वरूपच भासू लागते. अशा रीतीने ज्ञान्याचे सर्व व्यवहार सत्य म्हणजे श्रीहरिस्वरूप होतात व त्याला सर्व कार्यरूप प्रपंच सत्यच वाटतो. जगत् खोटे आहे असे जे जे म्हटले जाते ते, स्वतः नामरूपात्मक जगाला श्रीहरीहून स्वतंत्र निराळे अस्तित्व आहे किंवा वस्तुत्व आहे असे जेव्हा वाटते तेव्हा, एऱ्हवी नाही.

ज्याप्रमाणे पाणी या दृष्टीने लहरी खोटी नाही, कारण लहरी पाणीच होय. जो अडाणी पुरुष पाण्याहून लहरी निराळी समजतो त्याची लहरी खोटी. कारण तशी स्वतंत्र लहरीच नाही. अर्थात् ज्ञानदृष्टीने विचार करणाऱ्या सर्वच संतांना विश्व म्हणजे चिद्विलासच वाटतो.

शंकराचार्य म्हणतात,''मृद्रूपोहि यथा कुंभस्तद्वद्देहोऽपि चिन्मयः।'' ज्याप्रमाणे घट मातीरूप असतो त्याप्रमाणे ज्याला आपण पांचभौतिक देह म्हणतो तो देखील वस्तुतः चिन्मय आहे, जड नाही.

श्रीज्ञानेश्वर महाराज तर ''सदेह सृ्‌दिानंद । कां नोहावे ते?'' असा प्रश्नच करितात. ज्याप्रमाणे, एखाद्या सज्जनाविषयी हा दुर्जन आहे अशी कल्पना व्हावी किंवा चिंतामणी कांचेचा तुकडा वाटावा त्याप्रमाणे यथार्थतः विचाराने सृ्‌दिानंद स्वरूप असलेले देहादिपदार्थ पांचभौतिक जड आहेत अशी जीवाची विपरीत कल्पना झाली आहे. सृ्‌दिानंदानंत अशा भगवंताचे ठिकाणी त्याच्या व्यतिरिक्त माया नाही व मायाजन्यही काही औपाधिक नाही. म्हणून मूळचे निर्गुण निराकार स्वरूप व तेथेच भासणारे सगुणसाकारस्वरूप दोन्ही निरुपाधिकच आहेत. यालाच चिद्विलास म्हणतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अमृतानुभव ग्रंथात हेच प्रतिपादन केले आहे.

### *श्रीज्ञानेश्वरमहाराजादिकांचा अनुभव*

श्रीहरीचे सगुण साकार स्वरूप निरुपाधिक कसे असूं शकते हे समजण्याकरिता माउलीच्या अनुभव वचनांचा आश्रय केला पाहिजे. जगत्कारण परब्रह्म मुळांत चैतन्यस्वरूप आहे व चैतन्य सशक्तिक असते.तसेच ते परमप्रेमरूपही आहे. म्हणजे अखंड ते स्वात्मप्रेम करीत असते. ''जो प्रियूचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी'' प्रेम करण्याकरिता अखंड एकरूप न राहता शक्तिरूपाने स्फुरण पावून दोनपणाला येते पण वस्तू व त्याची शक्ति हे परस्पराहून भिन्न नसतात. कारण ''चारु स्थळी एकाहारी । एकांगाचा'' परब्रह्माच्या शक्तीचे स्फुरण परब्रह्मावरच होते व त्यात परब्रह्मच भरलेले असते. अशा रीतीने 'जे एकचि नव्हे एकसरे । दोघा दोन्हीपण नाही पुरे । काय नेणो साकारे । स्वरूपे जिये' आत्मस्वरूप सदासर्वदा सारखे अत्यंत अद्वैतरूप राहत नाही. स्फुरण पावून दोनपणाला येते व त्यामुळे दोघेही सगुण साकार होतात पण दोघांनाही पुरेसे दोनपण नसल्यामुळे, म्हणजे दोघे परस्परांहून स्वतंत्र वस्तुरूप व स्वतंत्र सत्ता असलेले असे निराळे होत नाहीत. म्हणून त्यांचे साकारपण अगम्य आहे. म्हणजे ते साकार झाले तरी त्यांचे निराकारपण मोडत नाही आणि सगुण झाले तरी निर्गुणच राहतात.

माझी सद्‌गुरु आई म्हणते ''माया नाही म्हणूनि जें जें साकृत । तें तें निराकृत ब्रह्मरूप'' खरोखर माया वस्तूच नसल्यामुळे, 'जे जे साकार ते ते मायाजन्य' असे सिद्धच होत नाही. म्हणून जे जे साकार भासते ते ते निराकार ब्रह्मस्वरूपच असते व ''सांख्यातील अर्धवट दोनपण । योगांतील अर्धवट एकपण । साकार तितुकें निराकार पूर्ण । हे वेदान्तगुह्य म्हणोनि अनिर्वाच्य ।'' सांख्यशास्त्रांत असंग पुरुष व प्रकृती असे दोन पदार्थ मानिले आहेत पण पंगू व



अंध न्यायाने त्यांचे परस्परांना साह्य होत असते. कोणीही स्वतंत्र नाही म्हणून हा दोनपणा अर्धवटच आहे. योगात प्रकृती ईश्वराच्या स्वाधीन खरी, पण तिला पृथक् वस्तुत्व देण्यात येतेच म्हणून हे एकपणही अर्धवटच आहे, पण वेदान्तात परब्रह्म व नामरूपाने स्फुरण पावणारी त्याची शक्ती ही दोन्ही अत्यंत एकरूप मानिली असल्यामुळे, **जेवढे सगुण साकार आहे तेवढेही निर्गुण निराकारच आहे**. हाच वेदान्ताचा गुरुगम्य गुह्य सिद्धान्त आहे. अमृतानुभवांतील हाच सिद्धान्त माउलीने आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथातहि सांगितला आहे. माउली म्हणते,'ते माया वस्तूच्या ठायी । असे जैसेनि नाही । मग वस्तुप्रभाचि पाही। प्रगट होय।।'' (ज्ञा. १५-८४) परब्रह्माच्या ठिकाणी, माया काल्पनिक असल्याने, ती नाहीसारखी आहे म्हणून त्याचे ठिकाणी जो नामरूपाचा पसारा दिसतो तो संपूर्ण परब्रह्मवस्तूचाच स्वाभाविक म्हणजे निरुपाधिक विलास होय. नामरूपाने प्रगट होणे हा निरुपाधिक परब्रह्माचा स्वभाव आहे आणि नामरूपे प्रगट झाली असता तो ब्रह्मवस्तूचा प्रभाव दिसून येतो. *शंकराचार्यही बृहदारण्यक भाष्यांत म्हणतात,

''यदि हि नामरूपे न व्याक्रियेते तदा अस्यात्मनो निरुपाधिकं रूपं प्रज्ञानघनाख्यं न प्रतिख्यायेत''नामरूपाने परब्रह्म व्यक्त झाले नसते तर परब्रह्माचे निरुपाधिक रूपच प्रसिद्धीस आले नसते. म्हणजे नामरूपाने व्यक्त झालेले परब्रह्मस्वरूप देखील निरुपाधिकच आहे असा भाव.

### *मायाउपाधीचे स्पष्टीकरण*

वेदान्तात माया ही उपाधी मानिली आहे व ती मायाउपाधी म्हणजे नामरूपे होय असे ''नामरूपे न तत्त्वान्यत्वाभ्यां अनिर्वचनीये संसारप्रपंचबीजभूते सर्वज्ञस्येश्वरस्य मायाशक्तिः'' ब्रह्मसूत्रभाष्यांत शंकराचार्य म्हणतात, ही नामरूपे ''सर्वज्ञस्य ईश्वरस्य आत्मभूत इव'' परब्रह्माहून त्यांना पृथक अस्तित्व व वस्तुत्व नसल्यामुळे परब्रह्मस्वरूपच आहेत पण ''अविद्या कल्पिते'' म्हणजे परब्रह्मस्वरूपाचा विचार न करणाऱ्या जीवांनी अज्ञानाने नामरूपाच्या स्वतंत्र वस्तुत्वाची व अस्तित्वाची कल्पना केली म्हणून ती परब्रह्माचे ठिकाणी उपाधिभूत झाली; हे इव या शब्दाने सूचित करितात. उपाधीचे लक्षणच असे आहे की, ती वस्तू बहिर्भूत असून आपले विपरीत धर्म वस्तूवर भासविते. अर्थात नारूपात्मक माया ही जेव्हा परब्रह्माहून बहिर्भूत म्हणजे निराळी वस्तू भासेल तेव्हा ती उपाधी होऊन ती नामरूपे ब्रह्मस्वरूपाचा विसर पाडतात व परब्रह्माहून निराळे नामरूपात्मक जगत् आहे असे भासवितात किंवा जीवाचे ठिकाणी तशी कल्पना होते. आत्मभूत असलेली मायाशक्ति

निराळी कल्पिली गेली म्हणजे तिच्या ठिकाणी व तिच्या कार्याच्या ठिकाणी, परब्रह्माच्या स्फ़ुदिानंद धर्माहून निराळे व विपरीत जड विनाशी इत्यादी धर्म भ्रांतीने भासूं लागतात.

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''हे उपजे आणि नाशे । ते मायावशे दिसे। येऱ्हवी तत्वता वस्तु जे असे । ते अविनाशचि ॥ जैसे पवनें तोय हालविलें । आणि तरंगाकार जाहले । तरी कवण के जन्मलें । म्हणों ये तेथ ॥ तैंचि वायूचें स्फुरण ठेलें । आणि उदक सहज सपाटलें । तरी आता काय निमाले । विचारी पां''(ज्ञा.२.१०५-१०७)

परब्रह्माचे ठिकाणी ऐक्याने राहणाऱ्या नामरूपात्मक मायेचे ठिकाणी जेव्हा भिन्न वस्तुत्वाची कल्पना झाली तेव्हा परब्रह्म विसरून कल्पित, भिन्नवस्तुस्वरूप, नामरूपात्मक मायाच निराळी वस्तू म्हणून भासावयाला लागली व ती काल्पनिक असल्यामुळे कल्पनेचे उत्पत्तीनाशधर्म, तिच्या ठिकाणी सहजच आले.

ज्याप्रमाणे पाण्याकडील दृष्टी सुटून तरंगाकडेच दृष्टी लागली असता तरंगाचे ठिकाणी उत्पत्ती, नाश भासूं लागतात; कारण पाण्याकडे दृष्टी नसली की, तरंग पाण्याहून निराळी वस्तू कल्पिली जाते.पण पाण्याकडे दृष्टी ठेवून तरंगाकडे पाहिले असता उत्पत्तिनाश दिसत नाहीत. कारण वस्तू पाणी असून तरंग काही पाण्याहून स्वतंत्र वस्तू वाटत नाही.उत्पत्ती म्हणजे पूर्वी नसलेली वस्तू भासणे आणि नाश म्हणजे नंतर नसणे.पण तरंग काही वस्तू नव्हे.वस्तू आहे पाणी व ते तरंगाचे पूर्वीही पाणी असते, तरंगांतही पाणी दिसते व तरंगानंतरहि पाणी असते, म्हणून अखंड पाणीदृष्टी ज्यांची आहे त्यांना तरंगाचे उत्पत्ति नाश दिसणे शक्य नाही त्याला तो पाण्यावरील तरंगाचा देखावा केवळ ''पाणी कल्लोळाचेनि मिषें । आपणपें धावे जैसें'' पाणी आपल्या ठिकाणी क्रीडा करीत आहे असे दिसेल; त्याप्रमाणे परब्रह्माची नामरूपात्मक मायाशक्ती परब्रह्माशी एकरूप करून पाहतां ''वस्तु वस्तुत्वे खेळो ये तैसें । सुखें लाहे'' स्फ़ुदिानंद परब्रह्माची नामरूपात्मक मायाशक्ती स्फुरण पावणे म्हणजे स्फ़ुदिानंद परब्रह्माने आपल्याच ठिकाणी स्फ़ुदिानंदाची क्रीडा करणे होय, असा अनुभव येतो.

तात्पर्य, अज्ञानकाळी जोपर्यंत भेद सत्य वाटतो तोपर्यंतच परमेश्वराची नामरूपात्मक मायाशक्ती उपाधिभूत होते. पण ज्ञानाने अद्वैत ब्रह्मसत्तेचा अनुभव आल्यावर ''लाखेचिये मांदुसे । आगीचें ठेवणे कायसें । आंत बाहेर सरिसें । करूनि घाली'' माया उपाधिही निरुपाधिक स्फ़ुदिानंद परब्रह्मस्वरूपच होऊन जाते.

(१८)



कारण वर सांगितल्याप्रमाणे उपाधी नेहमी वस्तुबहिर्भूत असते व अद्वैतांत एकच परब्रह्म वस्तू असते, तिच्या बहिर्भूत म्हणजे तिच्याहून निराळी वस्तूच राहत नाही. वस्तू आपणच स्वतः आपल्याला कधी उपाधी होत नाही, म्हणून ज्ञानदृष्टीने सगुणसाकार श्रीहरि मायिक आहे किंवा त्याचा देह पांचभौतिक आहे असे म्हणता येत नाही. त्याचा देह निरुपाधिक स्फ़ुदिानंदरूपच मानावा लागतो.

### *भौतिक देहाची सामुग्री नाही*

वेदान्ताचे दृष्टीने पांचभौतिक देहाची जी सामुग्री आहे ती परमेश्वराचे देहाचे ठिकाणी नाही, आणि परमेश्वरच सगुण साकार देह घेत असल्यामुळे त्याला पांचभौतिक देह घेता येत नाही व प्राप्तही होत नाही.गीतेच्या पंधराव्या अध्यायातील संसारवृक्षाचे वर्णनावरून हे स्पष्ट दिसते की, ''नाहीं अज्ञानावांचूनि मूळ'' या जड विनाशी संसारवृक्षाला अज्ञान हे मूळ आहे.अज्ञान म्हणजे ''आणि स्वरूप नेणणे जें धनंजया'' आपण कोण हे माहीत नसणे हे अज्ञान ज्याचे ठिकाणी आहे त्याला जीव म्हणतात व अशा अज्ञान्याची सुखाकरिता कर्मप्रवृती होते व त्या कर्मामुळे जन्म व भौतिक देह प्राप्त होतो.अज्ञान जर नसले तर पांचभौतिक देह प्राप्त होतच नाही. ईश्वराचे ठिकाणी नित्यनिवृत्ताविद्यत्वात् कधीच आत्मविस्मृतिरूप अज्ञान नाही. म्हणून त्याला कर्माकर्म नाहीत व त्याला भौतिक देहही प्राप्त होत नाही व अज्ञान जाणून बुजून घेण्यासारखे नाही, म्हणून भौतिक देह ईश्वराला घेताही येत नाही.

कोठे कोठे वेदान्तात ईश्वराची माया उपाधी मानिली आहे हे खरे.पण सर्वच तसे मानीत नाहीत; आणि ज्यांनी मानिली ती माया शुद्धसत्वात्मक मानिली असून ती परमेश्वराच्या स्वाधीन मानिली आहे.ईश्वर मायेच्या स्वाधीन आहे असे कोणी मानीत नाही.या ''शुद्धसत्वात्मक मायेचा आत्मविस्मृती हा धर्म नसून आत्मस्मृती हा धर्म आहे.'' म्हणून मायोपाधिक परमेश्वराला आत्मविस्मृतिरूप अज्ञान नसल्यामळे, भगवंताचा सगुणसाकार देह भौतिक आहे असे म्हणणारे वेदान्ती पढतमूर्ख आहेत.

ब्रह्मसूत्रभाष्यात सगुण कनिष्ठ ठरवून निर्गुणाला जे श्रेष्ठत्व दिले आहे ते रामकृष्णादी सगुण श्रीहरीचे कनिष्ठत्व दाखविले नाही.तेथे अक्षिपुरुष, चतुष्पाद ब्रह्म, षोडशकलं ब्रह्म, पृथ्वीशरीरी ब्रह्म, आकाशशरीरी ब्रह्म इत्यादी जे औपाधिक सगुण ब्रह्म कोठे कोठे उपनिषदांतून सांगितले आहे, त्याची निर्गुणापेक्षा कनिष्ठता दाखविली आहे.

शंकराचार्यांचे मतात निर्गुण म्हणजे ''सत्वरजस्तमांसि गुणास्तद्रहितम् निर्गुणम्'' मायागुणरहित होय. मायेच्या गुणाच्या स्वाधीन असणारा जीव होय, म्हणून तो मायागुणाने सगुण होतो. परमात्मा मायेचाही नियंता असतो आणि अवतारकाळी देखील सर्वज्ञसर्वशक्ती म्हणजे मायेचा नियंताच राहतो असे शंकराचार्यच गीताभाष्यात म्हणतात. तेव्हा त्या दृष्टीने सगुण परमेश्वरही निर्गुणच आहे. असे असतांना त्याला निर्गुण न म्हणता सगुण म्हणतात याचे कारण तो मायागुणाने सगुण नाही पण सच्चिदानंद धर्माने व यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य इत्यादी गुणांनी संपन्न असल्यामुळे त्याला सगुण म्हटले जाते.

हे गुण मायिक नाहीत कारण मायाकार्याचे एक लक्षण आहे की, जेथे वस्तूच्या गुणाला मर्यादा व उत्पत्तिनाश आला तेथे ती वस्तू व ते गुण मायिक ठरतात. पण नित्यता व अमर्याद हे गुण मायेचे नव्हेत, ते ब्रह्मवस्तूचे धर्म आहेत; असे ''सत्यज्ञानमनन्तं ब्रह्म'' या श्रुतिवरून सिद्ध आहे. परमेश्वराचे षड्गुण ऐश्वर्य निरतिशय आहे म्हणून ते मायाकार्य म्हणणे अज्ञानद्योतक आहे. हे शंकराचार्यांच्या गीताभाष्यातील 'ऐश्वर्यादिषट्कं यस्मिन् वासुदेवे नित्यम् अप्रतिहतत्वेन सामरस्येन च वर्तते' या वचनावरून सिद्ध आहे त्याचप्रमाणे भगवंताच्या जन्माविषयी शंकराचार्य म्हणतात, ''वैष्णवीं मायां मूलप्रकृतिं वशीकृत्य अजोऽव्ययो भूतानामीश्वरो नित्यशुद्धमुक्तस्वभावोऽपि सन् मायया देहवानिव जात इव च...लक्ष्यते'' परमात्मा श्रीहरि, नित्य, शुद्ध, मुक्त, अज, अव्यय, सर्व भूतांचा शास्ता असा राहूनच मायेच्या योगाने देहधारीप्रमाणे व जन्मल्याप्रमाणे अज्ञानी जीवाकडून लक्षिला जातो. म्हणजे परमेश्वराचे नित्यत्वादि धर्म न सुटताच अज्ञानी लोकांच्या ठिकाणी असणाऱ्या मायेमुळे, अज्ञानी लोकच त्याला आपल्यासारखा देहधारी झाला, जन्मला असे समजतात किंवा त्यांना तसा तो भासतो. देहवान् जीवाला म्हणतात. जीवात्मा व त्याचा देह हे परस्परांहून भिन्न मानले जातात व अशा आपल्याहून भिन्न असलेल्या देहावर मीपणा बसल्यावर जीव त्या देहाच्या योगाने देहवान् होतो. याला देहदेही भाव म्हणतात. पण परमेश्वराचे ठिकाणी जीवाप्रमाणे भिन्न, मिथ्याकल्पनाभूत, जड असा देह नसल्यामुळे व त्याचा देह सच्चिदानंदघन असल्यामुळे, त्याचे ठिकाणी असा देहदेही भाव नाही.

तात्पर्य, सगुण साकार परमात्मा वेदान्तविचाराप्रमाणे नित्य निरुपाधिकच ठरतो. म्हणून नामरूपरहित निर्गुण व नामरूपसहित किंवा सच्चिदानंदरूप आत्मा

(१९)



व सगुण श्रीहरि हे दोन्ही एकच आहेत. म्हणूनच भगवान् श्रीकृष्ण श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे मुखाने सांगतात की,

'एऱ्हवी दिठी वेधली कवळे । तैं चांदणियाते म्हणे पिवळे । तेवि माझ्या स्वरूपी निर्मळे । देखती दोष ॥ नातरी ज्वरे विटाळले मुख । तें दुधातें म्हणे कडू विख । तेविं अमानुषा मानुष। मानिती मातें ॥ म्हणवुनि पुढती पुढती धनंजया। झणें विसंबती या अभिप्राया । जे इया स्थूलदृष्टि वायां । जाईजेल गा।। पै स्थूल दृष्टि देखती माते । तेंचि न देखणें जाण निरुतें । जैसें स्वप्नींचेनि अमृते। अमर नोहिजे' (ज्ञा.९.१४१-१४४)

### ***सगुण-श्रीहरी निर्विशेषही आहे***

सगुण श्रीहरीचे स्वरूप अज्ञान्याला सविशेषासारखे दिसले तरी ते निर्विशेष आहे, म्हणूनच ते जीवशिवसम म्हणजे जीवात व शिवात व्यापून आहे. जीव व शिव ही दोन्ही औपाधिक रूपे आहेत. जीवाची अविद्या उपाधी असून शिवाची माया उपाधी आहे. हे दोन्ही औपाधिक प्रकार निरुपाधिकावर भासतात. त्याचप्रमाणे सर्व सविशेष प्रकार निर्विशेषावर भासतात व सर्व सविकल्प भाव निर्विकल्पावर भासतात. सर्व नामरूपात्मक जगद्भासाला निर्विकल्प निर्विशेष, निरुपाधिकच आत्मा अधिष्ठान आहे असा वेदान्तसिद्धान्त असून जगाचे अधिष्ठान होण्याकरिता तो साकार झाला पाहिजे किंवा वृत्तीने ग्रहण करण्याजोगा विषय कोटीत किंवा दृष्य कोटीत आला पाहिजे हे आचार्यभाष्यावरूनही सिद्ध आहे, म्हणून अज्ञान्याच्या अज्ञानामुळे भासणारी ही सर्व नारूपात्मक भिन्न जड विनाशी आध्यासिक सृष्टी भासण्यापूर्वी परब्रह्म परमात्मा आपल्या सच्चिदानंद शक्तीने स्फुरण पावतो व साकार होतो व त्यावरच मग अज्ञानी कल्पनाजन्य आपली आध्यासिक सृष्टी पाहतो असा वेदान्तसिद्धान्त आहे. ''चिन्मात्राश्रयमायायाः शक्त्याकारे द्विजोत्तमः। अनुप्रविष्टा या संवित् निर्विकल्पा स्वयंप्रभा'' चिन्मात्र स्वरूपाचा आश्रय करणारी मायाशक्ती स्फुरण पावते तेव्हा त्या स्फुरणात निर्विकल्प चैतन्यच भरलेले असते. म्हणजे चिन्मात्रस्वरूप चिन्मात्रस्वरूपानेच स्फुरते व हेच पुढे अज्ञानी लोकांच्या आध्यासिक सृष्टीला अधिष्ठान किंवा उपादान कारण होते.

श्रीज्ञानेश्वर महाराजांनी अमृतानुभवात हाच सिद्धान्त ''ऐसी ही निरुपाधिके । जगाची जिये जनके । तिये वंदिली मिया मूळिके । देवोदेवी ॥'' या पहिल्या ओवीत सांगितला आहे. अशी शिवशक्ती किंवा चैतन्य व स्फुरण हे दोन्ही चैतन्यमात्रच आहेत.

पुढे एवढे नामरूपात्मक जगत् भासले तरी श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''आपुलिये आंगीं संसारा । देखिलियाहि चराचरा । परी नेदितिच तिसरा । झोंक लागो ॥'' यात शिवशक्तीवाचून तिसरे काहीच नाही आणि शिवशक्ती ज्ञानरूपच आहे म्हणून सर्व नामरूपांसह नामरूपांचा पसारा चैतन्यस्वरूपच आहे, हेच तत्त्व त्यांनी ''दर्शनरिद्धि बहुवसा । चिच्छेषु मातला ऐसा । जो शिळा न पाहे आरसा । वेद्यरत्नाचा'' या ओवीत स्पष्ट मांडले आहे.

तात्पर्य, अज्ञान्याला येणारा जडविनाशी जगत्प्रत्यय खोटा असल्यामुळे, त्या प्रत्ययाने मूळच्या चिन्मात्र स्थितीत काही फरक झाला नाही. ते चिन्मात्रच राहिले आहे. ज्ञानी पुरुषाच्या अनुभवानुसार जेथे सर्व नामरूपात्मक जगत् चिन्मात्र आहे तेथे भगवंताचे साकार स्वरूप कसे पांचभौतिक राहू शकेल? शंकराचार्यही म्हणतात की, भगवंताचे ''अहं बहुस्याम्'' हे काम-संकल्प ''सत्यज्ञानलक्षणाः स्वात्मभूतत्वाद्विशुद्धाः'' स्वरूपभूत असल्यामुळे सृृदिानंदस्वरूपच आहे व अशा संकल्पाने भगवान् जो बहुरूप झाला तो सृृदिानंद रूपानेच बहुरूप झाला. मुळात सृृदिानंद चिन्मात्र असलेल्या सृष्टीला जीव अज्ञानामुळे जडविनाशी पाहातो. त्याची ती दृष्टी अज्ञानजन्य विपरीत कल्पनेने युक्त असल्यामुळे त्या योगाने परब्रह्माच्या मूळच्या चिन्मात्र दशेत काहीच फरक पडत नाही असे ''तत्रैवं सति यत्र यद्ध्यासस्तत्कृतेन दोषेण गुणेन वा अणुमात्रेणापि स न बध्यते'' या वचनात आचार्य म्हणतात. म्हणूनच गीताभाष्यात ''ब्रह्मशब्दवाच्यत्वात्सविकल्पक ब्रह्म तस्य ब्रह्मणो निर्विकल्पकोऽहमेव नान्यः।'' सविकल्पक ब्रह्माचे म्हणजे शिवाचे मी निर्विकल्पक अधिष्ठान आहे असा शंकराचार्य ''ब्रह्मणोहि प्रतिष्ठाऽहं'' या श्लोकाचा अर्थ करितात.

तसे पाहिले तर ब्रह्म सगुण नाही व निर्गुणही नाही, विशेष नाही व निर्विशेष नाही, सविकल्प नाही व निर्विकल्प नाही. ते अनिर्वाच्य आहे. निर्विकल्प चित्त झाले की अनिर्वाच्य स्वरूपाचा अनुभव येतो म्हणून नेहमी सविकल्प दशेत राहणारी, सविशेषाचा विचार करणारी व उपाधीने युक्त अशी जीवाची अंतःकरणवृत्ती ज्या रूपाच्या आश्रयाने निर्विकल्प निरुपाधिक व निर्विशेष होईल ते रूप निर्विकल्प, निरुपाधिक व निर्विशेष म्हटले जाते. कारण ज्ञानात जाणणेच संभवते; विसरणे संभवत नाही. अत्यंत अनिर्वाच्य निर्विकल्प स्थिती होण्याकरिता द्वैताद्वैताची कल्पनाच उठता कामा नये. जाणीव आहे तोपर्यंत अशी स्थिती होणे शक्य नाही

(२०)



आणि ज्ञान आहे तोपर्यंत जाणीव राहतेच. ''तें जाणीव जेथे विराली । तेथें अनिर्वाच्य बोलिली ॥'' (दासबोध समास ८ व्यतिरेक) ज्या स्वरूपाचे ठिकाणी जाणीव राहत नाही तेथे अनिर्वाच्य स्थिती राहते असे समर्थ म्हणतात. पण ही जाणीववृत्ती ज्ञानदशेत मुरत नाही, ती भक्तिदशेत सगुण भगवंताच्या प्रेमाने मुरते असे सर्व संतांचे म्हणणे आहे. म्हणूनच ज्या भगवंताच्या सगुण रामकृष्णादी स्वरूपाच्या भक्तीने जाणीव संपूर्ण नाहीशी होऊन समाधिप्रमाणे जाणीव नेणीवरहित अशी अनिर्वाच्य निर्विकल्प स्थिती प्राप्त होते ते भगवंताचे सगुणस्वरूप जाणीव नेणीवरहित अनिर्वाच्य निर्विकल्प आहे असाच सर्व संतांचा अनुभव आहे. म्हणूनच भगवंताचे सगुणस्वरूप सर्वाधिष्ठान असल्यामुळे जीवशिवात व्यापून आहे असे श्रीज्ञानेश्वमाउलीचे सिद्धान्तभूत म्हणणे आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात की, ''जीवशिव दोन्ही हरिरूपीं तरंग । सिंधु तो अभंग तेणे हरि ॥''

***जीव सविकल्प, श्रीहरि निर्विकल्प***

सारांश, वेदान्ताचा हा सिद्धान्त असा आहे की, ब्रह्म निर्विशेष, चिन्मात्र, निर्विकल्प असून ते सदासर्वदा तसेच राहते व जीवही तसाच व जगत्ही तसेच आहे. पण अज्ञानामुळे जीवास तसे वाटत नाही. त्याला तो स्वतः सविशेष, सविकल्प वाटतो व ईश्वर जगत् हेही तो तसेच पाहतो, पण परमात्मा अज्ञानरहित आहे म्हणून त्याला सर्व अनुभव चिन्मात्रच निर्विशेष निर्विकल्प ब्रह्माचाच आहे. म्हणून त्याची कोणतीही स्थिती चिन्मात्रच आहे व साकार सगुण स्थितीतही तो चिन्मात्रच आहे. असे असल्यामुळे श्रीज्ञानेश्वरमहाराज सगुण श्रीहरीची जीवशिवात येथे व्याप्ती दाखवित आहेत. श्रीहरीची शिवदशा, जीवाने आपल्या अपेक्षेने कल्पिली असल्यामुळे, तीही जीवदशेप्रमाणे स्वकल्पित म्हणून शिवदशेत श्रीहरीची व्याप्ती आहे असे श्रीमाउलीचे म्हणणे आहे. शिवदशा म्हणजे जड विनाशी दुःखरूप जगताचे कर्तृत्व, सर्व जीवांच्या कर्माचे फलदातृत्व वगैरे असणे; पण अशी सृष्टीच वेदान्त विचाराने अज्ञानाभावी सिद्ध होत नसल्यामुळे ''जगचि होत जाये । तो शुद्धिहि नेणे'' अज्ञानी जीवाच्या अज्ञानामुळे त्याला जगत् उत्पन्न होत असलेले, नाश पावत असलेले दिसते पण परमेश्वराला त्याची वार्ताहि नाही ''आणि साक्षीहि होऊं न शके । येरी गोष्टी कायसी'' परमेश्वराला जगाचा साक्षी म्हणावे तर तो जगाचा अभाव म्हणून त्याचा साक्षीही होऊ शकत नाही, तेव्हा जगत्कर्तृत्वादिकांच्या गोष्टी दूरच राहिल्या. शिवदशा म्हणजे शिव परमात्मा, जगताचे उत्पत्ती लय करितो, हे सर्व

जीवाने केलेले आरोप आहेत; ''तो सृजी पाळी संहारी । ऐसें बोलती जे चराचरीं । ते अज्ञान गा अवधारी । पंडुकुमरा'' (ज्ञा.५-८२) हे स्पष्ट माउलीनेच सांगितले आहे.

### *पुनर्व्यतिरेक*

श्रीहरीचे सगुण साकार स्वरूप, भक्ताच्या परम प्रेमामुळे परमप्रेमरूप आत्म्याने घेतले असल्यामुळे, ते परमप्रेमरूप म्हणजे पूर्ण निरुपाधिक आहे म्हणून ते आरोपित जीवशिवाला व्यापून आहे. निर्विकल्प आत्मस्थिती अंतःकरणात सिद्ध होण्याकरिता व्यतिरेक व अन्वय या विचारपद्धतीने द्वैतभावाची पूर्ण निवृत्ती झाल्यावर पुढे द्वैतभावाच्या निवृत्तीचीही निवृत्ती होऊन अनिर्वाच्य निर्विकल्प अवस्था प्राप्त होते. अशा या निर्विकल्प अवस्थेलाच पुनर्व्यतिरेक म्हणतात. येथे अन्वयाचे अन्वयपणही नाहीसे होते. श्रीज्ञानेश्वरमाउलीने अशी स्थिती अमृतानुभवाच्या पाचव्या प्रकरणात सगुण श्रीहरि भजनाने येते हे अनेक दृष्टांतांनी सिद्ध केले आहे. ते म्हणतात,

आत्म्याचे ठिकाणी सच्चिदानंद ही पदे असत्, जड, दुःख या अज्ञानी लोकांच्या खोट्या प्रत्ययाचे अपेक्षेने आली आहेत, आणि ज्ञानदशेत ती तशी पृथक्सारखी प्रत्ययाला येतात. त्यांचा तो भिन्नपणाने येणारा प्रत्यय नाहीसा होऊन निर्विकल्पता प्राप्त होण्याकरिता त्या पदांची आटणी होऊन ते एकपद झाले पाहिजे व एकपदाचा अनुभव घेणाराही भिन्नपणे न राहता अनन्य झाला पाहिजे, ''एरव्हीं सच्चिदानंद भेदें । चाललीं तिन्ही पदें । परी तिन्ही उणी आनंदें। केली एके'' हा स्वरूपाच्या ठिकाणचा तीनपणा प्रेमात किंवा आनंदात नाहीसा होतो असे माउलीचे म्हणणे आहे.

ज्याप्रमाणे कापूर किंवा विष किंवा अमृत हे पदार्थ इंद्रियवृत्तीने पहावयास गेले असता त्यांचा धर्मद्वारा तीनपणा भासतो पण धर्माच्या तादात्म्याने सगुण झालेले ते ते पदार्थ मनात घेतले असता मात्र तीनपणा त्याचा ज्ञात होत नाही.

त्याप्रमाणे सच्चिदानंदाचा तीनपणा आनंदात किंवा प्रेमात नाहीसा होतो आणि श्रीएकनाथमहाराजांनी, ''सत्पद तें ब्रह्म चित्पद ती माया । आनंदपदीं जया म्हणती हरी ।।'' या अभंगात आनंदांशाचे ठिकाणी सगुण श्रीहरि भासतो म्हणजे सगुण श्रीहरि आनंदांशरूप आहे असे म्हटले असल्यामुळे, श्रीज्ञानेश्वरमाउली व नाथ या दोघांच्या वचनात निष्कर्ष काढल्यास सगुण श्रीहरीच्या भक्तीने निर्विकल्प स्थिती





प्राप्त होते असा अर्थ स्पष्ट निघतो. सगुण श्रीहरीशी जोपर्यंत सायुज्यता प्राप्त होत नाही तोपर्यंत खरी प्रेमरूप भक्ती नाही; तोपर्यंत तो अन्वय होय असे ''मी न होतां भक्ति । अन्वयो आहे'' या ओवीत माउलीने म्हटले आहे म्हणजे अत्यंत निरपेक्ष स्वयंसिद्ध अवस्था भक्तीनेच प्राप्त होते किंवा सगुणभक्ती ही अत्यंत निरपेक्ष-स्वयंसिद्ध-सहजावस्था आहे असा अर्थ.

### *जीव-शिवात श्रीहरीच्या व्याप्तीचा अनुभव*

असा हा श्रीहरि जीवशिवात व्यापून आहे. ती व्याप्ती कशी जाणली जाऊ शकते हे पाहिले पाहिजे. जीव मूळात सच्चिदानंदस्वरूप असला तरी तो आपल्याला देहापुरताच समजत असल्यामुळे, त्याला सच्चिदानंदाचा खरा अनुभव नाही. ते अंश झाकले गेले पण त्याला स्वतःचे परमप्रेम आहे. परमप्रेम हे श्रीहरीचेच प्रेमस्वरूप होय. म्हणून तेवढ्या अंशाने ते श्रीहरीचेच जीवात वास्तव्य होय. परमप्रेमरूपाने जीवांत श्रीहरी व्यापून आहे.

त्याचप्रमाणे शिवस्वरूपाचे ठिकाणी भासणाऱ्या नामरूपात्मक प्रपंचामुळे शिवाचेही सच्चिदानंदस्वरूप जीवाला झाकले गेले. म्हणजे नामरूपाच्या भेदामुळे शिवाची केवल अद्वैत सत्ता जीवाला भासत नाही, नामरूपात्मक जगताच्या जड प्रत्ययामुळे शिवाचा चैतन्य प्रत्यय जीवाला येत नाही आणि जगाच्या दुःखप्रत्ययामुळे ब्रह्मानंदाचा जीवाला जगात अनुभव येत नाही. पण वाणीमनाला अतर्क्य अशा विचित्र सृष्टीरचनेकडे पाहून शिवाच्या ठिकाणी जे अगाध सामर्थ्य मात्र दिसून येते. ते अगाध सामर्थ्य त्याचे ठिकाणी त्यापून असलेल्या अधिष्ठानभूत श्रीहरीचेच आहे. कारण लाटेचे ठिकाणी जे सामर्थ्य प्रगट होते ते समुद्राचेच सामर्थ्य असते, म्हणून शिवाचे ठिकाणी श्रीहरीची व्याप्ती सामर्थ्यरूपाने आहे.

### *भक्तिमार्ग सोडून इतर मार्ग दुर्गम*

नामस्मरणध्यानादिक यांच्याद्वारा सगुण श्रीहरीचा भक्तिमार्ग सोडून योगमार्ग, ज्ञानमार्ग इत्यादिकांचा स्वतंत्रपणे आश्रय करणे म्हणजे दुर्गम मार्गात पडणे आहे. ते व्यर्थ आहेत. म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, त्यात मन घालू नकोस. भक्तीवाचून योगमार्ग दुर्गम्य म्हणजे असाध्य एवढ्याचकरिता आहेत की, जीवाची मूळची चिन्मात्र, निर्विकल्प, निर्विशेष स्थिती ती भक्तिप्रेमावचून साध्यच होत नाही. त्याकरिता अहंकार, मग तो कोणत्याहि प्रकारचा असो, निःशेष नाहीसा झाला पाहिजे. भक्तीमार्गानेच निःशेष अहंकार नाहीसा होतो व दुसऱ्या मार्गांत तो

उठत राहतोच व त्याबरोबर उपाधीही जाणवली जाते. म्हणून माउली म्हणते की, त्या मार्गात मन घालू नकोस. तर मग काय करू असे म्हणशील तर अखंड ''हरि हरि'' म्हण.

**ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ ।**

**भरला घनदाट हरि दिसे ॥४॥**

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, हरि हरि नामस्मरण हा माझा पाठ होय. म्हणजे नित्य म्हणण्याचे स्तुतिस्तोत्र होय, आणि हरि हरि असे अखंड नास्मरण हीच वैकुंठप्राप्तीही आहे, अशा अखंड नामस्मरणाने जिकडे तिकडे श्रीहरीच भासू लागतो. ''विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म'' हा तुकाराममहाराजांचा अनुभव आहे. हीच चिद्घनानंद दृष्टी असून हिलाच परमसिद्धीही म्हणतात. हीच भक्तीची परमसीमा हाये. या दृष्टीने श्रीहरीची अद्वैतसत्ता पूर्णपणे अनुभवाला येते.

तुलसीदास महाराज म्हणतात,''समुझत सरस नाम अरु नामी । प्रीति परस्पर प्रभु अनुगामी'' भगवंताच्या नामरूपांत परस्पर प्रेम आहे. नामाबरोबर रूप लक्षात येते व रूपाबरोबर नामही आठवते म्हणून ''को बड छोट कहत अपराधु'' नामरूपामध्ये एकास श्रेष्ठ व एकास कनिष्ठ म्हणणे अपराध होतो.

नाथ म्हणतात ''एका जनार्दनी नाम । शुद्ध चैतन्य निष्काम''

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''नाम परब्रह्म वेदार्थी'' वेदाने नामाला परब्रह्मच ठरविले आहे. म्हणून येथे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात ''हरिनामस्मरणाने सर्वत्र घनदाट श्रीहरीच भरला आहे असा मला अनुभव आला'' म्हणजे सर्व शब्द हरीचेच वाचकनाम असून सर्व रूपे श्रीहरीचीच दिसतात. सर्व नामरूपांत हरीच भरलेला दिसतो. किंबहुना एका श्रीहरीवाचून दुसरे काहीच नाही.

**हृदयीचे गुह्य उमटले आतां ।**

**हृदयी सांवळा व्यापक हा ॥**

(श्रीगुलाबरावमहाराज अभंग १६)

(२२)



॥श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु॥

०००

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

**पाठक्रम : ३** **अर्थक्रम : ६**

**त्रिगुण असार निर्गुण हें सार । सारासार विचार हरिपाठ ॥१॥**
**सगुण निर्गुण गुणाचे अवगुण । हरिविणे मन व्यर्थ जाय ॥२॥**
**अव्यक्तनिराकार नाही ज्या आकार । जेथोनि चराचर त्यासी भजे ॥३॥**
**ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । अनंत जन्मांनी पुण्य होय ॥४॥**

*

प्रतिज्ञा - सगुण निर्गुण वादनिषेध व नाममहिमा.

*

सरळ अर्थ :- त्रिगुणात्मक सगुण हे उपाधियुक्त आहे आणि निर्गुण हे उपाधिरहित आहे. हरिपाठ हा सार व असार यांचा विचार होय. सगुण व निर्गुण हे दोन्ही गुणांचे संबंधाचे प्रकार आहेत. म्हणून सगुण श्रीहरिवाचून सगुण निर्गुणाच्या वादात मन घालू नकोस. तो वाद व्यर्थ आहे. जो इंद्रियातीत आहे व निराकार आहे, ज्याला आकार नाही, जेथून सर्व चराचराची उत्पत्ती होते त्याचे भजन कर. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,''माझ्या अंतःकरणात रामकृष्णाचे अखंड नामस्मरण असून ध्यानामध्ये अखंड त्याचे रूप असते. नामधारक हे मागील पुढील अनंत जन्मी शुद्ध पुण्यवानच असतात.

**त्रिगुण असार निर्गुण हें सार ।**

**सारासार विचार हरिपाठ ॥१॥**

***त्रिगुणात्मक सगुण व निर्गुण औपाधिकच***

विवरण - या चरणातील सार व असार या शब्दांचे निरस्तत्त्व व तत्त्वरूप किंवा त्याज्य व ग्राह्य असे बहुशः अर्थ केले जातात, पण श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी दुसऱ्याच चरणात निर्गुणही गुणाचाच प्रकार सांगितला असल्यामुळे, व सगुण

श्रीहरी व त्याचे नाम इकडे मन न राहता निर्गुणाकडे लक्ष देणे व्यर्थ आहे असे म्हटले असल्यामुळे, निर्गुण सार म्हणजे ग्राह्य आहे; असा अर्थ त्यांना मान्य आहे असे दिसत नाही. म्हणून सार व असार ह्या शब्दांचे अर्थ निराळे घ्यावे लागतात. सार म्हणजे ''सरति गच्छति उपाधिर्यस्मात्'' उपाधिरहित आणि असार म्हणजे ''न सरति उपाधिर्यस्मात्'' उपाधियुक्त सगुण असार म्हणजे उपाधियुक्त आहे. येथे सगुणाचा जो निषेध केला आहे तो सत्व, रज, तम या मायागुणांच्या स्वाधीन असलेल्या जीव व जगत् या सगुणाचा निषेध केला आहे हे ध्यानात ठेवले पाहिजे. निर्गुण सार आहे म्हणजे उपाधीचा त्याचे ठिकाणी निषेध केला आहे. त्रिगुणात्मक सगुण तर औपाधिक आहेच पण ज्याला आपण निर्गुण म्हणतो ते देखील औपाधिकच आहे असे माउलीचे म्हणणे आहे.

कोणी येथे अशी शंका घेतील की, ज्या स्वरूपापासून उपाधी निघून गेली म्हणून जे उपाधिरहित झाले असे म्हणता येते, त्या स्वरूपाला पुनः औपाधिक कसे म्हणावयाचे?

या शंकेचे समाधान असे आहे की जोपर्यंत उपाधी आत्मवस्तुहून निराळी मानिली जाते व त्या उपाधीचा संबंध घेऊन त्या आत्मवस्तूचा निर्देश होतो तोपर्यंत आत्मवस्तु अत्यंत निरुपाधिक होत नाही, हे शंकराचार्यांचेच म्हणणे आहे.

आचार्य म्हणतात, ''न चैषां कश्चिद्विशेषो ब्रह्मण्यस्ति । अध्यारोपित नामरूपकर्मद्वारेण ब्रह्म निर्दिश्यते विज्ञानमानंदं ब्रह्म विज्ञानघन एव परमात्मा इत्येवमादि शब्दैः'' (बृहदारण्यक उप. २।३।६)

ज्यांचे ठिकाणी नाम, रूप, कर्म, भेद, जाती, गुण, यापैकी कोणताच विशेष नाही ते निर्विशेष ब्रह्म होय. कारण नाम, रूप, कर्म, भेद, जाती किंवा गुण यापैकी कशाचा तरी संबंध घेऊनच, ब्रह्माचा निर्देश करावयाचा असतो, करता येतो व ते ब्रह्म त्यामुळे सविशेष होते. निर्विशेष ब्रह्माचा निर्देश करावयाचा म्हणजे ''नेति नेति'' या श्रुतीने सांगितल्याप्रमाणे नारूपादिकांचा निषेध करूनच करता येणे शक्य आहे. आचार्यांनी ''विज्ञानमानंदं ब्रह्म'' असा ब्रह्माचा शब्दाचे द्वारा निर्देश करणे सोपाधिक ब्रह्म निर्देशच होय असे म्हटले आहे. कारण ज्या ब्रह्माचे ठिकाणी निर्गुण असल्यामुळे गुणगुणीभाव नाही त्या ब्रह्माचा निर्देश करताना गुणगुणीभाव कल्पूनच ब्रह्म सच्चिदानंदरूप आहे असा ब्रह्माचा निर्देश आपण करितो.

तैत्तिरीयउपनिषद्भाष्यात आचार्य म्हणतात, ''अतः अस्मात् विशेषण विशेष्यत्वादेव सत्यादीन्येकविभक्त्यन्तानि पदानि । सत्यादिभिर्विशेष्यमाणं ब्रह्म।''



सच्चिदानंद ब्रह्म हे निरुपाधिक आहे असे आपण समजतो पण आचार्य त्याला सोपाधिकच म्हणतात. सच्चिदानंद ब्रह्म निरुपाधिक आहे या म्हणण्याचा अर्थ असा आहे की ते सत्व रज तम या अविद्येच्या गुणविरहित आहे म्हणजे ते अविद्या उपाधिविरहित आहे आणि सच्चिदानंद ब्रह्म सोपाधिक आहे. या आचार्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, त्रिगुणात्मक अविद्या उपाधीचा निरास झाल्यावरही विद्या उपाधी राहतेच व त्या उपाधीमुळे सत्यादी अंशाने जीवाला ब्रह्मानुभव येतो. ''यावद् विदेह- कैवल्यमुपाधेरनिवारणात्'' (पंचदशी तृप्तिदीप श्लो.८४) व हा उपाधीचा संबंध विदेहमुक्तीपर्यंत नाहीसा होत नाही.
विदेहमुक्ती म्हणजे ज्ञान-अज्ञान या दोन्ही जाणीवेरहित अनिर्वाच्य ब्रह्मस्थिती होय.

वास्तविक ब्रह्माचे ठिकाणी कोणतीच उपाधी नाही. ब्रह्माचा अनुभव घेणाऱ्या जीवाच्या अंतःकरणाचा संबंध घेऊनच ब्रह्माला सोपाधिक/निरुपाधिक म्हणणे आहे. ब्रह्माचा ''सत्य ज्ञान अनंत'' इत्यादी नामाने व गुणाने जो निर्देश करणे याला पंचदशीकार विद्यारण्यस्वामी तृप्तिदीपात विधि-उपाधी म्हणतात. जोपर्यंत नामरूप गुण कर्म इत्यादी उपाधीची ब्रह्माचे ठिकाणी जाणीव होते किंवा ज्ञान राहते तोपर्यंत ते ब्रह्म उपाधीभूत म्हणावे लागते.

### *निर्विशेषही औपाधिक*

पुनः ''नेति नेति'' या श्रुतीत सांगितल्याप्रमाणे नाम, रूप, गुण, कर्म, जाति इत्यादी उपाधींचा निषेध करून ब्रह्माचा निर्विशेष भाव होत असला तरी तो उपाधिनिर्मुक्त निर्देश झाला असे विद्यारण्यमुनि म्हणत नाहीत. ते म्हणतात, ''यथाविधिरुपाधिः स्यात्प्रतिषेधस्तथा न किम् । सुवर्णलोहभेदेन श्रृंखलात्वं न भिद्यते'' ज्याप्रमाणे विधी हा उपाधी आहे म्हणजे साक्षात् ब्रह्माचे वाचक म्हणून कोणत्या तरी शब्दाने आपण ब्रह्माचा निर्देश करितो, त्याप्रमाणेच नामादी उपाधींचा निर्देश करून सर्व उपाधिरहित ब्रह्म आहे असे म्हणून आपण ब्रह्माचा निर्विशेष असा निर्देश करितो.

विद्यारण्यस्वामी म्हणतात- अनिर्देश्य ब्रह्म ज्याप्रमाणे विधिउपाधी लावून निर्दिष्ट होते. त्याचप्रमाणे उपाधीचा निषेध केल्यानेही निर्दिष्ट होते. ब्रह्मबोधाला दोन्ही प्रकार जर उपयोगी पडतात तर विधीला उपाधी म्हणायची व प्रतिषेधाला उपाधी का म्हणू नये? याप्रमाणे आचार्यादी वेदान्तनिपुणांच्या मते निर्गुण ब्रह्म विद्योपाधिक ठरते व तेथे म्हणजे अशा प्रकारच्या ब्रह्मानुभवात धर्माची व

धर्मनिषेधाची जाणीव राहते. या जाणीवेलाच ज्ञानस्थिती म्हणतात. अर्थात निर्गुणाला सार म्हणजे उपाधिरहित म्हटले त्याचा सत्वरजतमोगुणयुक्त जी अविद्या, त्या विरहित, एवढाच अर्थ विवक्षित आहे.

त्रिगुणात्मक सगुण उपाधियुक्त आहेच पण त्रिगुणरहित निर्गुणही उपाधियुक्त म्हणजे निषेध उपाधियुक्त आहे असा विचार हरिनामस्मरणाने समजतो म्हणजे प्रेमपूर्वक हरिनामस्मरणाने उपाधीची जाणीव नाहीशी झाल्यामुळे जो सगुण साकार श्रीहरीचा निःशेष उपाधिरहित अनुभव येतो त्या अनुभवाचे दृष्टीने विचार केला असता त्रिगुणात्मक सगुण व त्रिगुणरहित निर्गुण सृदिानंदरूप दोन्ही उपाधियुक्तच अनुभवाला येतात, किंवा त्रिगुणात्मक सगुण व त्रिगुणरहित निर्गुण असा भेद, श्रीज्ञानेश्वर माउली म्हणते हरिपाठात नाहीसा होतो. हरिपाठाने म्हणजे नामस्मरणाने सार व असार खरोखरच भेद आहे काय? याचा विचार होतो व मागे दुसऱ्या अभंगात सांगितल्याप्रमाणे विचार केल्यास अविद्या उपाधि वस्तुतः खरी नसून कल्पनामात्र असल्यामुळे, आणि कल्पना म्हणजे अविद्या उपाधीचा सद्भाव नसताना, ती आहे अशी विपरीत समजूत करून घेणे होय. म्हणून अविद्येच्या अभावी त्रिगुणात्मक सगुण व तद्विरहित निर्गुण, हा भेद जाऊन सर्व एकरूप अविद्याविद्योपाधिरहित असे निरुपाधिक सगुण साकारच अनुभवाला येते, असा हरिनामस्मरणाचा महिमा आहे.

**सगुण निर्गुण गुणाचे अवगुण ।**
**हरिविणें मन व्यर्थ जाय ॥२॥**

### *सगुण श्रीहरि सत्य, निरुपाधिक*
### *सगुण निर्गुण वाद व्यर्थ*

हरिनामस्मरणावाचून सर्व नामरूपात्मक सृष्टी, विद्याविद्योपाधिरहित सगुण साकार श्रीहरिरूप आहे असा अनुभव सगुण निर्गुणाचा वाद करीत बसल्याने येत नाही. कारण त्यात नसलेल्या अविद्या विद्या उपाधीचा संबंध घेतला जातो. वर सांगितल्याप्रमाणे सगुण निर्गुण हे गुणाचेच भेद आहेत. त्रिगुणात्मक सगुण, मलिन सत्त्वाचा म्हणजे ज्या सत्त्वात रजोगुण, तमोगुण प्रधान आहेत अशा सत्त्वगुणाचा (यालाच अविद्या म्हणतात) परिणाम असून निर्गुण हा शुद्ध सत्वाचा म्हणजे ज्या सत्वात रजोगुण, तमोगुण अत्यंत क्षीण आहेत अशा सत्वाचा परिणाम होय. अशा

(२४)



सत्वालाच विद्योपाधि म्हणतात. रामकृष्णादी सगुण श्रीहरीचे रूप मात्र, दोन्ही उपाधिरहित आहे. कारण सगुणाच्या प्रेमभक्तीत जाणीवच नाहीशी होते व जाणीवेवाचून उपाधीचा संबंध जाणला जात नाही. म्हणून त्या श्रीहरीचा आश्रय न करता सगुण निर्गुणाचा विचार करीत बसणे व्यर्थ आहे. म्हणजे यांच्या विचाराने आपली निर्विकल्प अवस्था होत नाही.

कित्येक हरिपाठात ''सगुण निर्गुण गुणाचे अगुण'' असा पाठ आहे. आम्ही आमच्या सद्गुरुमाउलीच्या सांगण्याप्रमाणे गुणाचे अवगुण असा पाठ घेतला. ''सगुण निर्गुण गुणाचे अगुण'' असा पाठ घेतला तरी अगुण याचा त्रिगुणरहित एवढाच अर्थ होतो. पण तेवढ्यावरून ते अविद्या विद्या अशा दोन्ही उपाधिरहित अनिर्वाच्य ठरत नाही. तेथेही निषेधरूपाने गुणांचा संबंध येतो, हे वर दाखविले आहे.

समर्थांनीही आपल्या दासबोधात (दशक ७, समास ३ मध्ये) ''ऐसें जें गुणरहित । तेथें नामाचा संकेत । तोचि जाणावा अशाश्वत । निश्चयेसी ॥'' या ओवीने अनिर्वाच्य अशा शाश्वत ब्रह्माला सोडून निर्गुणालाही नाशिवंत ठरविले आहे. येथे ब्रह्म नाशिवंत नाही. पण ब्रह्माचा सगुणपणा व निर्गुणपणा हा नाशिवंत ठरविला आहे.

आमच्या अवगुण ह्या शब्दातील 'अव' या उपपदाचा व्याप्ती असा अर्थ आहे. (वाचस्पत्य कोश पहा) 'अव' या उपसर्गाचा व्याप्ती असा अर्थ घेऊन अवगुण ह्या पदाचा गुणानेच व्याप्त असा अर्थ घेऊन ''सगुण निर्गुण गुणाचे अवगुण'' म्हणजे सगुण निर्गुण या दोन्ही रूपाचे ठिकाणी गुणाचीच व्याप्ती आहे किंवा दोन्ही गुणाचेच प्रकार आहेत असा अर्थ निष्पन्न होतो. असा अर्थ न केल्यास त्याच चरणाच्या उत्तरार्धात ''हरीविणे मन व्यर्थ जाय '' सगुण श्रीहरीवाचून त्रिगुणात्मक सगुण त्रिगुणरहित निर्गुण याचे ठिकाणी मन घालणे व्यर्थ आहे असे जे माउलीने म्हटले आहे त्याला काही महत्त्वच राहत नाही. कारण निर्गुण स्वरूप अगुण म्हणजे त्रिगुणरहित म्हणून जर तेच श्रेष्ठ आहे तर सगुण श्रीहरीवाचून दुसरीकडे मन जाऊ देणे व्यर्थ म्हणण्याची आवश्यकता राहत नाही म्हणून अवगुण हेच पद तेथे घेतले पाहिजे असे आम्हाला वाटते.

कोणी येथे अशी शंका घेतात की, रज्जूवर भासलेला सर्प, रज्जू कळल्यावर जसा नाहीसा होतो मग सर्प दिसतच नाही, त्याप्रमाणे आत्मज्ञान झाल्यावर आत्म्यावर अविद्येने कल्पिलेल्या नामरूपाची निवृत्ती होते मग ती भासतच नाहीत, तेव्हा जो श्रीहरी नामरूपानेच सगुण होतो तो, नारूपरहित निर्गुण स्वरूपाहून निःशेष उपाधीरहित असा निर्विकल्प कसा म्हणता येईल?

या शंकेचे समाधान असे की, तुम्ही समजता त्याप्रमाणे वेदान्तात ज्ञानानंतर नामरूपांची निवृत्ती मानलेली नाही. तशी नामरूपांची निवृत्ती मानिली गेली असती म्हणजे ज्ञानांतर नामरूपांचा प्रत्ययच न राहता, तर आचार्यांनी आत्म्याशी नामरूपांचे ऐक्य करून पाहता नामरूपे सत्य आहेत असे जे छांदोग्यात म्हटले आहे ते नामरूपांच्या अभावी त्यांना म्हणताच आले नसते. पंचदशीकार विद्यारण्यस्वामी या मुद्याचे आपल्या ग्रंथात असे स्पष्टीकरण करितात की, ''नाप्रतीतिस्तयोर्बाधः। किंतु मिथ्यात्वनिश्चयः'' ज्ञानाने नारूपांचा बाध होतो म्हणजे त्यांची ज्ञानानंतर प्रतीतीच राहत नाही, असा अर्थ नव्हें. ज्ञानानंतर ते मिथ्या आहेत असा निश्चय होतो. म्हणजे आत्म्याहून नामरूपांना स्वतंत्र अस्तित्व नाही म्हणून नामरूपे स्वतंत्र वस्तूही नव्हे. आत्मसत्तेवरच ती भासतात. असा बाधाचा अर्थ आहे.

अर्थात् रज्जुसर्पाप्रमाणे नामरूपे भ्रमजन्य नसून नामरूपे स्वतंत्र वस्तू आहेत व त्यांना आत्म्याहून स्वतंत्र अस्तित्वही आहे अशी जी आपण कल्पना करितो ती भ्रमजन्य असते. म्हणूनच विद्यारण्यस्वामी म्हणतात, ''ईदृङ्‍निवृत्तिरेवात्र बोधजा न त्ववभासनम्'' ज्ञान झाल्यावर नामरूपे दिसतच नाहीत असे नाही. ज्ञानाने त्यांची निवृत्ती होते म्हणजे ती सत्य आहेत असे जे बुद्धीला वाटत होते, ती सत्यत्वबुद्धी नाहीशी होते. ज्ञानाने नामरूपाची जी निवृत्ती होते ती सत्यत्वबुद्धी निवृत्तीरूप आहे. वेदान्तात अशाच प्रकारची निवृत्ती मानिली आहे. कल्पिताची निवृत्ती अधिष्ठानरूप असते. या वेदान्तसिद्धान्तानुसार नामरूपे सच्चिदानंद ब्रह्मरूप अधिष्ठानाशी एकरूप झाली असता शंकराचार्य यांना ''सदात्मनां तु सत्यमेव'' सत्य आहे असे म्हणतात.

ज्याला आत्मज्ञान झाले आहे त्याला सर्व नामरूपात्मक व्यवहार, जर सच्चिदानंद आत्मस्वरूप वाटतो तर नित्य ज्ञानी परमेश्वराला त्याची नामरूपे सच्चिदानंदस्वरूपच वाटली पाहिजेत यात शंका नाही. असा सगुण श्रीहरि परमात्मा नामरूपासह पूर्ण सच्चिदानंदस्वरूप असल्यामुळे, त्याच्या ठिकाणी त्याच्याहून भिन्न असे, उपाधिभूत होण्याजोगे काहीच राहत नाही व स्वतः तो स्वतःसच उपाधिभूत होऊ शकत नाही; म्हणून तो विद्याविद्यारूप, सर्व उपाधिरहित, केवळ चिन्मात्र, निर्विकल्प आहे, असाच अनुभव येतो. म्हणून अशा श्रीहरीला सोडून अविद्याजन्य सगुण किंवा विद्याजन्य निर्गुणाकडे लक्ष देणे व त्याच्या श्रेष्ठ कनिष्ठत्वाचा वाद घालणे व्यर्थ आहे, असे माउलीचे म्हणणे आहे.

'अगुण' असा पाठ घेऊन त्याचा पूर्ण निरुपाधिक असा अर्थ केल्यास

(२५)



''हरीविणें मन व्यर्थ जाय'' या वाक्याला काहीच महत्त्व राहत नाही. हरीवाचून सगुणनिर्गुणात लक्ष घालणे व्यर्थ आहे असे ज्याअर्थी माउली म्हणते त्याअर्थी निरुपाधिक हरीपेक्षा सगुण निर्गुण हे उपाधीचा संबंध घेऊनच सगुण निर्गुण म्हटले जातात हे सिद्ध आहे.

**अव्यक्त निराकार नाहीं ज्या आकार ।**

**जेथोनि चराचर त्यासी भजे ॥३॥**

***सगुण श्रीहरीचाच उल्लेख***

या चरणात ज्या परमेश्वरापासून चराचर सृष्टी उत्पन्न होते व जो अव्यक्त निराकार आहे अशा परमेश्वराचे भजन करण्यास श्रीज्ञानेश्वरमहाराज स्पष्ट सांगत आहेत. तेव्हा सगुण साकार श्रीहरीचे माहात्म्य हरिपाठात सांगितले आहे असे कसे म्हणता येईल? अशी येथे शंका येणे संभवनीय आहे.

या शंकेचे समाधान असे आहे की, अव्यक्त, निराकार, जेथोनि चराचर इत्यादी विशेषणांनी माउलीने सगुण श्रीहरीचाच उल्लेख केला आहे व त्याचेच भजन सांगितले आहे. कारण सगुण श्रीहरी व्यक्त व साकार असला तरी त्याची अव्यक्त निराकार स्थिती त्याच्या सगुण साकार स्थितीतहि कायम राहते. अव्यक्त निराकार स्थिती नाहीशी होऊन तो साकार होत नाही. त्याचे सगुणत्व त्याच्या निर्गुणत्वाशी विरुद्ध नाही. त्याचे साकारत्व त्याच्या निराकारत्वाशी विरुद्ध नाही, हे मागे सांगितले आहे.

भगवंताने आपल्या मुखाने ''जन्म कर्म च मे दिव्यम्''(गी. ४-९) म्हणून सांगितले आहे. शंकराचार्यांनी ''दिव्यम्'' या पदाचा ''अप्राकृतम्'' असा अर्थ केला आहे. अप्राकृतम् म्हणजे प्रकृती किंवा मायाजन्य नाही असा. आचार्यांनी 'तदव्यक्तमाह हि (ब्र.सू.३-२-२३) या सूत्रावरील भाष्यात अव्यक्त म्हणजे इंद्रियांना गोचर नसणारे असा अर्थ केला आहे. अर्थात् व्यक्त स्वरूप ते इंद्रियाला गोचर होणारे होय असा अर्थ होतो. निराकार याचा अर्थ विशिष्ट काळ, विशिष्ट देश विशिष्ट वस्तुत्व याची मर्यादा ज्याला नाही, असा होतो. विशिष्ट देशकालवस्तुत्वाने मर्यादितपणा जो आहे त्याचाच परब्रह्माचे ठिकाणी निषेध आहे.

***सगुण-श्रीहरीही अव्यक्त-निराकार***

अव्यक्त निराकार परमात्मा तसाच राहून व्यक्त व साकार होतो या

म्हणण्याचा अर्थ असा आहे- अव्यक्त म्हणजे इंद्रियाने ग्रहण होण्याजोगा नाही असा. पण श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात ''मग तेंचि इयें शरीरीं । जैं आपुला भावो करी । तैं इंद्रियांचे व्यापारी । डोळाहि दिसे ।।'' ते इंद्रियाचे व्यापारातून व डोळ्यानेसुद्धा दिसते. नाथही वरच्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या म्हणण्यास पुष्टी देतात ''मी अव्यक्त-पणें व्यक्तीतें धरी । मी निर्गुणपणें गुणकर्म करी । मी अजन्मा जन्म धरी। या मताची थोरी माझीं मीच जाणें ।''

त्याप्रमाणे ''ब्रह्म इंद्रिया गोचर नसें । गुण गेलिया डोळा दिसें । हें अनुभव्यासीची भासें । बोलावें ऐसें तें नव्हें ।।'' जीव मायागुणरहित झाल्यास डोळ्यानेहि मग ब्रह्म दिसते. अर्थात् डोळ्याने नामरूपात्मक साकारच दिसणार. ''तरी व्यक्त आणि अव्यक्त । तूंचि एक निभ्रान्त । भक्तीं पाविजे व्यक्त । अव्यक्त योगे ।।'' व्यक्त व अव्यक्त ही दोन्ही एका श्रीहरीची रूपे आहेत. तो ज्ञानयोगाने अव्यक्त भासतो तर भक्तीने व्यक्त भासतो. अव्यक्त म्हणजे व्यापक व व्यक्त म्हणजे एकदेशी असे अर्थ त्या शब्दाचे आहेत, पण दोन्ही परमेश्वराची रूपे एकमेकापासून भिन्न नाहीत. म्हणून अव्यक्त म्हणजे इंद्रियग्राह्य नाही असा आपण अर्थ करितो तेव्हा तो चर्मचक्षूने किंवा भौतिक इंद्रियाने ग्राह्य होऊ शकत नाही इतकाच अर्थ होतो, कारण ज्ञानदृष्टीने तो डोळ्यानेही दिसतो असे वर माउलीचे वचन दिलेच आहे. याच माउलीच्या वचनानुसार पाहिले असता असा अर्थ निष्पन्न होतो की, व्यक्त व अव्यक्त ही श्रीहरीची दोन्ही रूपे चर्मचक्षूने दिसण्याजोगी नसून ज्ञानदृष्टीनेच दिसण्याजोगी आहेत. चर्मक्षूने दिसणारे जीवाचे साकार देह हे जसे तीन परिच्छेदाने मर्यादित असतात व जीव तसेच मानतोही, त्याप्रमाणे भगवंताचे सगुण साकार शरीर तीन परिच्छेदाने मर्यादित नसते व परमात्मा तसे स्वतःविषयी मानीतही नाही.

काळपरिच्छेद, देशपरिच्छेद व वस्तुपरिच्छेद असे तीन परिच्छेद आहेत.

काळपरिच्छेद म्हणजे सर्व काळी नसणे, भूत, भविष्य व वर्तमानकाळापैकी कोणत्यातरी एके काळी असणे. शिवाजीमहाराज पूर्वी होऊन गेले, पण आता नाहीत. हा त्यांच्या देहाला काळपरिच्छेद होय.

देशपरिच्छेद सर्व देशात नसणे, कोणत्या तरी एके ठिकाणी असणे. मुंबईत असलेला मनुष्य त्याचवेळी दिल्लीला राहू शकत नाही हा त्याच्या देहाचा देशपरिच्छेद होय.

वस्तुपरिच्छेद म्हणजे सर्व वस्तुरूप नसणे, कोणत्या तरी नामरूपात्मक एका वस्तुपुरतेच आपले अस्तित्व मानणे.

(२६)



भगवान् श्रीकृष्णाचे साकार शरीर त्रिविध परिच्छेदरहित आहे हे भगवंतांनी त्याच शरीराने विश्वरूप दाखवून अर्जुनाच्या प्रत्ययाला आणून दिले. ज्ञानानंतर जीवाला आपल्या शरीराहून निराळा असलेला जो आत्मा त्या आत्मरूपाने आपले व्यापकत्व अनुभविता येते, शरीराने अनुभविता येत नाही. पण भगवान् श्रीहरि स्वशरीरानेहि आपले व्यापकत्व दाखवू शकतो. अर्जुनाला देव म्हणतात.

आता देखे आघवे भरले । माझ्याचि रूपी ।। *ह्या मूर्तिचिया किरीटी । रोममूळीं देखे पां सृष्टि ।। *वातायनाचेनि प्रभासे । उडत परमाणु दिसती जैसे । भ्रमत ब्रह्मकटाह तैसे । अवयवसंधी ।।''

भागवतातहि यशोदेला आपले शरीर सर्व सृष्टीला आधार कसे आहे हे दाखविले होते असा उल्लेख आहे. सारांश, श्रीहरीचे सगुण साकार शरीर अव्यक्त, निराकार व चराचर सृष्टीला आधार आहे असे म्हणता येते.

तुकाराममहाराज म्हणतात.

जया पासोनि सकळ । महीमंडळ हें झाले ।।१।।
तो एक पंढरीचा राणा । नये अनुमाना श्रुतीसी ।।२।।''

### *सगुण श्रीहरीच्या पूर्णत्वाची उपपत्ती*

शंकराचार्यांनी गीतेच्या चवथ्या अध्यायात, परमेश्वराने अवतार धारण केला असता त्या अवतार देहात निर्गुण परमेश्वराचे मूळचे नित्यशुद्धबुद्धमुक्त, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् इत्यादी धर्म तसेच कायम राहतात असे स्पष्ट म्हटले आहे. हे मागे आलेच आहे. वास्तविक जीवही परमेश्वरस्वरूपच आहे पण त्याचे परमेश्वरधर्म भौतिक देहामुळे लोपले गेले, असे आचार्य ''देहयोगाद्वा सोऽपि'' (ब्र. सू. ३।४।६) या ब्रह्मसूत्रावर भाष्य करिताना म्हणतात. म्हणजे भौतिक देह ज्याला प्राप्त होतो, त्याचे मूळ ब्रह्मस्वरूप लोपले जाते, असा त्याचा अर्थ होतो. श्रीहरीचा देह, जीवाच्या देहाप्रमाणे पांचभौतिक असेल तर त्याच्या ठिकाणी मूळचे परमेश्वरधर्म लोपले गेले पाहिजेत व तसे म्हटल्यास शंकराचार्यांच्या मताचा विरोध येतो. पुनः ज्याचे मूळचे परमेश्वरधर्म लोपले. त्याला जीव म्हणतात. म्हणजे अवतारदशेत परब्रह्माची पूर्ण निरुपाधिक दशा नाहीशी होते किंवा त्यात कमीपणा येतो. असे मानल्यास नित्यशुद्धबुद्धादिक परमेश्वर धर्माने युक्त असलेला परमेश्वर, अवतारकाळी ते धर्म लोपले जाऊन जीव होतो असे म्हणण्यासारखे होते. कारण पूर्ण ब्रह्मदशेत थोडादेखील न्यूनपणा आला की त्याला जीव म्हणतात. परमेश्वर धर्माची प्राप्ती हीच

मुक्ती होय. ही मुक्ती सर्व नित्य मानतात. मुक्तदशेतून पुन्हा जीवदशा प्राप्त होत नाही असा ''उत्पत्त्यसंभवात्'' (२।२।४२) या ब्रह्मसूत्रात वेदान्तसिद्धान्त मांडला आहे.

सारांश, या सर्व सिद्धान्ताला बाध आणून श्रीहरीचा देह भौतिक किंवा मायामय आहे असा अपसिद्धांत स्वीकारायचा नसेल तर श्रीहरीचा देह सच्चिदानंदमय, साकार तरी निराकार, व व्यक्त तरी अव्यक्त, असाच मानला पाहिजे.

किंवा श्रीज्ञानेश्वरमाउलीने अमृतानुभव ग्रंथात म्हटल्याप्रमाणे ''जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी । चारुस्थळीं एकाहारी। एकांगाचा ।। आवडीचेनि वेगें । एकएकातें गिळिताहे आंगें । कीं द्वैताचेनि पांगें । उगळिते आहाती ।। परमप्रेमरूप आत्मा, आपलेच प्रेम करण्याकरिता आपलेच ठिकाणी उल्हास पावतो. या उल्हासात एकरूप आत्मा एकरूप न मोडताच दोनपणाला येतो. म्हणजे ज्याप्रमाणे समुद्र तरंगरूपाने स्फुरण पावतो त्याप्रमाणे प्रेमसागर परमात्माच आपलेच प्रेमसुख घेण्याकरिता प्रेमवृत्तिरूपाने स्फुरण पावून आपल्याच ठिकाणी प्रेम समर्पण करीत असतो. अशी ही प्रेमाची चेंडुफळी नित्य आत्मस्वरूपाचे ठिकाणी अखंड चाललेली आहे.

देहाचे आतच आत्मा आहे असे नव्हे; तो देहाचे बाहेरही आहे. आत्मज्ञानाचे योगाने देहाच्या बाहेरचा नामरूपात्मक विश्वाचा पसारा जाऊन तेथे आत्मस्वरूपाचा अनुभव आला असता, त्या आत्मस्वरूपाचे ठिकाणी तेच प्रेम स्वाभाविकपणे वाहू लागते. प्रेम करणारा भक्त देहधारीच असल्यामुळे व त्याला देहाचे बाहेर नामरूपावरच प्रेम करण्याची सवय असल्यामुळे ''परी आतां ऐसी चाड जीवीं । जे तुजसी गोठी करावी । जवळिक हे भोगावी । अलिंगावयासी ।। अशी आवडी उत्पन्न झाली असता, भगवंतालाही तशीच भक्ताची आवडी उत्पन्न होते. ''तो पहावा हे डोहाळे। म्हणोनि अचक्षुसी मज डोळे । हातिचेनि लीलाकमळें। पूजूं तयातें ।। दोवरी दोनी। भुजा आलों घेऊनि । आलिंगावया लागूनी । तयाचें अंग ।। मग भक्ताची व आपली आवडी पूर्ण करण्याकरिता व भक्ताचे प्रेम नित्य टिकविण्याकरिता भगवान् भक्ताच्या मानुष देहासारखाच अविनाशी सच्चिदानंद देह धारण करीत असतो.

अज्ञानी लोकांना, त्यांच्या अज्ञानामुळे, मुळात सच्चिदानंदरूप असलेला नामरूपांचा पसारा जसा त्यांना जड, विनाशी, जगद्वस्तूरूपाने भासतो तसा

(२७)



भगवंताचा चिदानंद देहही स्वतःच्या देहासारखा भौतिक वाटतो. म्हणूनच भगवान् म्हणतात - ''अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम्'' (गी. ९-११) मूर्ख अज्ञानी लोक माझ्या सच्चिदानंद साकार देहाला भौतिक मानुषदेहच समजतात. असे समजणे म्हणजे सगुण भगवंताचा तिरस्कार करणे होय. कारण पांचभौतिक स्थूलदेह आपण तिरस्कार्यच किंवा तुच्छच समजतो.

देवाने या श्लोकात मानुषदेह धारण केला असता मला तुच्छ लेखतात, माझा परमात्मभाव व माझे सर्वलोकशासकत्व, इकडे लक्ष देत नाहीत, असे जे उद्गार काढलेत त्याचा विचार केला पाहिजे. भगवंताचा साकार देह जर खरोखरच भौतिक असेल तर त्याच्याविषयी तुच्छता दाखविली गेली ती यथार्थच असल्यामुळे, तुच्छता दाखविणाऱ्याला दोष देण्याचे कारणच नाही. भौतिक देहाव्यतिरिक्त जो परमात्मभाव आहे तो देवाचे ठिकाणी व जीवाचे ठिकाणी सारखाच आहे. पण देवाला येथे आपल्या देहात व जीवाच्या देहात काय फरक आहे हे दाखवावयाचे आहे म्हणून देव म्हणतात – जीवाच्या देहाहून त्यांचा परमात्मभाव निराळा आहे म्हणून जीवाचा देह तुच्छ होऊ शकतो. पण मी सगुण श्रीहरि देहासह सच्चिदानंद परमात्मरूप असल्यामुळे माझ्या देहाला तुच्छ समजणारे मूर्ख होत.

**ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्णमनीं ।**

**अनंत जन्मांनी पुण्य होय ।।४।।**

या चरणात ज्ञानराजमाउली, नामस्मरणाचा महिमा वर्णन करिते व आपला अनुभव सांगते की, मी नेहमी रामकृष्ण नामाचा जप करीत असताना ध्यानाने मी रामकृष्णाचे रूप पाहते व मनाने रामकृष्ण नामाचा उच्चार करिते. ध्यानात रूप व मनात नाम असणे हीच खरी भक्ति होय. ही हरिनामाची व हरिरूपाची जोड नामधारकांना त्यांच्या अनंत जन्मांतील पूर्वपुण्यसंचयाने प्राप्त झालेली असते. ही जोड पुढे ''स्वभावो भजनं हरेः।।'' स्वभावच बनून जात असल्यामुळे नामधारक जन्मोजन्मी उत्तरोत्तर अधिकच पुण्यश्लोक असतात, ह्यांत शंकाच नाही.

हरिनामस्मरणाने मागील अनंत जन्मांतील पापांचे क्षालन होऊन पुढेही नामधारक पापापासून अलिप्तच राहतो. जन्म जन्म हरिनाम स्मरणाने अगणित व अक्षय पुण्य संचय होत राहिल्याने नामधारक अनंत जन्म पावेतो अत्यंत सात्विक, धर्मशील व पुण्यशीलच राहतात; हा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे.

''संतबीज पलटे नही जो जाय जुग अनंत ।

उच नीच योनी धरे आखिर संत का संत'' कबीरसाहेब

संत म्हणजे नामधारक भगवद्भक्त !

।।श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ।।

० ० ०

।।श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ।।श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ।।

(२८)

**पाठक्रम : ४** **अर्थक्रम : ३**

**भावेविण भक्ति भक्तिविणें मुक्ति । बळेविण शक्ति बोलूं नये ।।१।।**

**कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित । उगा राहे निवांत शिणसी वायां ।।२।।**

**सायास करीसी प्रपंच दिननिशीं । हरीसी न भजसी कवण्यागुणें ।।३।।**

**ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें । तुटेल धरणें प्रपंचाचे ।।४।।**

*

प्रतिज्ञा - इतर साधनांचा निषेध.

*

सरळ अर्थ :- भावावांचून भक्ति बोलणे व्यर्थ आहे व भक्तिवाचून मुक्त झालो म्हणणेही व्यर्थ आहे. बळ नसताना माझ्यात शक्ती आहे म्हणणे व्यर्थ आहे. देवता कशा प्रसन्न होतील म्हणून अरे बाबा! तू उगीच शिणतोस. त्यापेक्षा स्वस्थ राहून हरिस्मरण कर. संसारात रात्रंदिवस कष्ट करतोस, पण हरीचे नामस्मरण मात्र करीत नाहीस ते कशाच्या भरवंशावर? श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात– हरिनामाचा जप केला असताच प्रपंचाचे धरणे उठणार आहे, एरव्ही नाही.

**भावेविण भक्ति भक्तिविणें मुक्ति ।**

**बळेविण शक्ति बोलूं नये ।।१।।**

***श्रीहरीच्या भक्तीवांचून सर्व व्यर्थ***

विवरण :- मागे सांगितलेला सिद्धान्तच दृढीकरणार्थ येथे पुनः मांडला आहे. सर्वत्र एक श्रीहरीची सत्ता आहे, त्याच्यावाचून दुसरी वस्तूच नाही असा दृढ विश्वास असणे याला येथे भाव म्हटले आहे व श्रीहरीचे नामरूपाचा आत्मप्रेमवत् प्रेम असणे याला भक्ती म्हटले आहे. ''सात्वऽस्मिन् परमप्रेमरूपा'' या नारदीय भक्तिसूत्रांत



सगुण श्रीहरीचे आत्मवत् निःसीम प्रेम असणे यालाच भक्ती म्हटले आहे.

प्राणिमात्राला आपले स्वतःचे निःसीम प्रेम आहे. आपल्यासारखे प्रेम दुसऱ्या कशाचेही नसते. आपल्याकरिताच सर्वांवर प्रेम आपण करीत असतो. आपले निःसीम प्रेम यारूपाने बाहेर प्रगट होते. मी म्हणजे देह, अशी देहबुद्धी जोपर्यंत आहे तोपर्यंत, जीवाला स्वात्मप्रेमाचा खरा अनुभव येत नसला, तरी ज्या देहाला तो मी म्हणून समजतो, त्या देहाचे त्याला जेवढे प्रेम आहे तेवढे दुसऱ्या कशाचेही नाही. यावरून त्याला निस्सीम स्वात्मप्रेमाची कल्पना येऊ शकते.

असा आत्मा निस्सीम प्रेमरूप आहे आणि तोच स्वप्रेमाने, सगुण श्रीहरीरूप व जगत्स्वरूप झाला आहे, त्याच्यावाचून जीव किंवा जगत् स्वतंत्र निराळे पदार्थ नाहीत. असे अद्वैतज्ञान झाले असता, आत्म्याचे निःसीम प्रेम श्रीहरीवर होऊ लागते. याला सर्व संतांनी भक्ती हे नाव दिले आहे. पण ही भक्तीची स्थिती येण्याकरिता, श्रीहरीच्या अद्वैत सत्तेवर दृढ विश्वास ठेवून नामस्मरण केले पाहिजे. प्रथम श्रीहरीच्या अद्वैत सत्तेवर दृढ विश्वास असल्याखेरीज भक्ती प्राप्त होत नाही. भक्ती प्राप्त होत नाही तोपर्यंत मुक्तीची गोष्ट बोलू नये.

जैसा भाव जयापाशी । तैसा देव तयासी । जाणें भाव अंतर साक्षी । प्राणिमात्रांचा ।।१३।। जरी भाव असेल मायिक । तरी देव होय महाठक । नवल तयाचे कौतुक । जशास तसा ।।१४।।(श्रीसमर्थ - दासबोध ३-१०) त्याचप्रमाणे

तुका म्हणे मुख्य पाहिजे हा भाव । भावापाशी देव, शीघ्र उभा ।।

***मुक्तीचा विचार***

मुक्तीची दोन अंगे आहेत. एक त्रिविध दुःखनिवृत्ती व दुसरे परमानंदप्राप्ती. आत्मज्ञानाने सर्व नामरूपात्मक संसार स्वतंत्र वस्तू नाही असे कळल्यावर जरी सर्व दुःख नाहीसे होऊ शकते, तरी सगुण भगवंताच्या प्रेमरूपभक्तीवाचून आत्मज्ञानच दृढ होत नाही. म्हणूनच ज्ञान्याला प्रारब्धभोग भोगावे लागतात असे शास्त्र सांगते. भगवद्भक्तीने परमानंद प्राप्त झाला असता, सहजच प्रारब्धभोगाचा अभिभव होतो म्हणजे ते जाणलेच जात नाहीत. अर्थात मुक्तीत परमानंदप्राप्ती हेच मुख्य अंग असल्यामुळे व भक्तीवाचून ते अंग प्राप्त होत नाही म्हणून भक्तीवाचून मुक्ती होऊच शकत नाही असे माउलीचे म्हणणे आहे. पुनः प्रारब्धभोगामुळे ज्ञान्याचे व्युत्थान होते असे शास्त्र सांगते. व्युत्थान म्हणजे देहावर वृत्ती येणे. पण ''एतेनेश्वरस्योत्थानं प्रत्युक्तम्'' या आचार्य वचनानुसार नित्यमुक्त परमेश्वराला व्युत्थान नसल्यामुळे, प्रेमभक्तीने श्रीहरीशी सायुज्यता पावलेले भक्तही व्युत्थानरहित

होतात म्हणजे देहावर येत नाहीत.

एऱ्हवी जीव व परमेश्वर यांच्यात ब्रह्मदृष्टीने काहीच फरक नाही. दोघांतही परब्रह्म सारखेच व्यापून आहे पण फरक आहे तो ऐश्वर्यदृष्टीने आहे. ज्या 'मी' वृत्तिरूप स्फुरणाला आपण जीव समजतो, ते परमेश्वराचेच स्फुरण होय म्हणून जीवाच्याहि ठिकाणी परमेश्वरैश्वर्य आहेच. पण आचार्य म्हणतात, ''विद्यमानमपि तत्तिरोहितम् अविद्यादि-व्यवधानात्'' कल्पनारूप अविद्यादी दोषामुळे लोपले गेले. ''परमेश्वरमभिध्यायतो यतमानस्य जन्तोर्विधूनध्वान्तस्य . . . ईश्वरप्रसादात् संसिद्धस्य कस्यचिदेवाविर्भवति'' परमेश्वराचे भक्तिरूप प्रणिधानाने ध्यान दृढ झाले असतां, परमेश्वरप्रसादाने परमेश्वराचे शक्तिभूत षड्गुण ऐश्वर्य जीवाचे ठिकाणी प्रगट होते. ''कस्यचिदेव'' या पदावरून एखाद्याचेच म्हणजे ''भक्ति करणाऱ्याचेच व इतराचे नाही'' असा अर्थ स्पष्ट निघतो. हे परमेश्वराचेच ऐश्वर्य प्राप्त झाले म्हणजे व्युत्थानाला कारणीभूत होणारे सर्व प्रतिबंध नाहीसे होतात व अखंड परमानंदाची स्थिती दृढ होते.

सारांश, जसे अंगात शक्ती असल्याशिवाय, मी असे करीन तसे करीन अशा वल्गना करणे, जसे उपहासास्पद होते, तसे श्रीहरीची अद्वैतसत्ता कळली नाही तोपर्यंत मी भक्त आहे म्हणणे व भक्तिप्रेम प्राप्त झाले नसताना मी मुक्त आहे, अशी वल्गना करणे व्यर्थ होय. या चरणात माउलीने भक्तीवाचून नुसत्या कोरड्या शाब्दिक ज्ञानाने मोक्ष होतो असे म्हणणाऱ्यांचा निषेध केला आहे.

**कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित ।**

**उगा राहे निवांत शिणसी वांया ॥२॥**

***इतर देवताफळ निषेध***

सुखाच्या पाठीमागे लागलेला जीव, सुख मिळविण्याकरिता अनेक देवतांची आराधना करिताना दिसतो. परंतु या देवता आपल्या प्रारब्धानुसार ठरलेल्या सुख-दुःखप्राप्तीत काही सुद्धा फरक करू शकत नाहीत.

नाथ म्हणतात- 'अदृष्टा आधीन हें शरीर । तेथ आलियाहि हरिहर । अन्यथा न करवे अणुमात्र । हें वेदशास्त्र संमत ॥'' आपल्या पूर्वकर्मानुसार बनलेल्या प्रारब्ध भोगाचा एक श्रीहरीच संकल्पकर्ता आहे. तोच सर्व प्राणिमात्रांच्या कर्मांचे फळ देणारा आहे. त्याने आपल्या कर्मानुसार ज्या सुखदुःखादी फलांचा संकल्प केला, तो संकल्प अन्यथा करण्याचे सामर्थ्य कोणत्याही देवतेत नाही. कारण ह्या सर्व





देवतांचा स्वामीही तोच आहे, त्याच्या आज्ञेप्रमाणेच देवता वागतात. श्रीहरीची भक्ती सोडून इतर देवतांचे आराधन केले तरी, श्रीहरीचा अनुग्रह झाल्यावाचून देवता प्रसन्न होऊ शकत नाहीत.

ही सांसारिक सुखाची गोष्ट झाली. परमानंदरूप मोक्ष तर कोणतीच देवता देऊ शकत नाही कारण सर्व देवता एक परमात्मा सोडून जीवच असल्यामुळे त्यांनाच परमानंद प्राप्त नाही तर त्या दुसऱ्याला परमानंदाचा लाभ कोठून करून देणार?

आता कोणी असे म्हणतील की, ''सर्व परमात्माच नटला असल्यामुळे देवतांचे भजन करणे ते श्रीहरीचेच भजन होय.''

या शंकेला माउलीचेच उत्तर असे आहे की, सर्व नामरूपाने परमेश्वरच नटला असल्यामुळे कोणाचीही उपसना केली तरी त्याचीच उपासना होते हे खरे आहे. पण जीव हा तशी एका परमेश्वराची भावना ठेवीत नाही. ''गंगेचे उदक गंगें जैसें । अर्पिजे पितरोद्देशें। माझे मज देती तैसें । परी आनानी भावीं ।'' (ज्ञा.९-३५३) जीव निरनिराळ्या देवतांची भावना करितो. म्हणून ते भजन परमेश्वराला प्राप्त होत नाही. आपण करितो ते सर्व परमेश्वराचे यजन व्हावे अशी इच्छा असल्यास परमेश्वरच सर्व ठिकाणी भरला आहे असे ज्ञान हे कर्माचे निर्दोष डोळे आहे. ते प्राप्त झाले पाहिजे. सारांश, ''तैसा मी तो भजावा । मीचि म्हणूनि'' परमेश्वराची अद्वैतसत्ता जाणूनच त्याच भावनेने केलेले भजनच त्याचे भजन होते.

पुनः इंद्रादी देवता ह्या मनुष्यापेक्षा सात्विक असल्यामुळे, त्यांना असे वाटते की, आपल्या उपासकांच्या कामना पुरवून त्यांचा संसार सुखाचा करून दिल्याने उपासक ह्या दुःखरूप संसारातच अधिक आसक्त होऊन परमेश्वर प्राप्तीची इच्छा कधीच करणार नाही. आपण प्रसन्न होणे म्हणजे उपासकाला दुःखरूप संसारातच सतत खितपत ठेवणे होय. म्हणून त्या लवकर प्रसन्न होत नाहीत. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''बाबा! अशा प्रकारे नाना देवतांचे पाठीमागे लागण्यापेक्षा स्वस्थ चित्ताने श्रीहरीचे नामस्मरण कर. श्रीहरीच्या नामस्मरणाने ''अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक'' सर्व त्रैलोक्य तुला सुखरूप भासू लागेल.

**सायास करिसी प्रपंच दिनदिशीं ।**

**हरीसी न भजसी कवण्या गुणें ॥३॥**

(३०)

### *श्रीहरीच्या साह्यावाचून प्रयत्न व्यर्थ*

संसार सुखाकरिता मनुष्य रात्रंदिवस खपत असतो. पण क्षणभरदेखील स्वस्थ चित्ताने परमेश्वराचे नामस्मरण तो करीत नाही.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, 'यालागीं शतजर्जर नावें । रिगोनि केवीं निश्चित होआवें । कैसेनि उघडिया असावें । शस्त्र वर्षी ॥ अंगावरी पडतां पाषाण । न सुवावें केवीं वोडण। रोगे दाटलिया आणि उदासपण । वोखदेंसी ॥ जेथ चहूंकडे जळत वणवा । तेथूनि न निगिजे केवि पांडवा । तेंवी लोकां येऊनिया सोपद्रवा । केंवि न भजिजे मातें ॥ अगा मातें न भजावयालागी । कवण बळ पां आपुलिया आंगी । काय घरी कीं भोगी । निश्चिंती केली ॥ नातरी विद्या कीं वयसा । या प्राणियांसि हा ऐसा । मज न भजतां भरंवसा । सुखाचा कोण ॥ तरी भोग्यजात जेतुलें । तें एका देहाचिया निकिया लागलें । आणि येथ देह तंव असे पडिलें । काळाचिया तोंडी ॥(ज्ञा९ओ.४९०ते५१५)

विषयसुखाच्या पाठीमागे लागलेल्या पुरुषाकडून शास्त्रानुसारच वर्तन होईल याचा मुळीच भरवंसा नाही. उलट कामना वाढल्यानेच मनुष्य स्वैर वर्तनाला प्रवृत्त होतो व त्यामुळे दुःखरूप फळाचीच तरतूद करून ठेवीत असतो. मनुष्याचा सर्व प्रयत्न सुखाकरिताच होत असतो. पण कामनेमुळे धर्माधर्माचा तो विचार करीत नाही. धर्माधर्माचा विचारही त्याला आपल्या विषयासक्त बुद्धीने करता येत नाही. अशा स्थितीत केलेले कर्म, दैवगत्या पापपुण्यापैकी ज्या सदरात पडेल त्याप्रमाणे त्या कर्माचे सुख किंवा दुःखरूप फळ भोगावे लागते. मनुष्याला आपल्या अशुद्ध बुद्धीने धर्माधर्माचा निर्णय करता येत नाही. म्हणूनच भगवंतानी, ''तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते''(गी.१६-२४) शास्त्राप्रमाणे वागायला सांगितले आहे.

आपल्या विषयासक्त बुद्धीने केलेला कोणताही सुखाचा प्रयत्न, दुःखालाच आमंत्रण देणारा जेथे होऊ पाहतो, अशा या घोर संसारात, आपल्या प्रयत्नाने कसे व किती सुख प्राप्त करून घेता येईल! हे जाणूनच भगवंतांनी, दुःखाला कारणीभूत होणाऱ्या पापकर्माचा नाश करून सुखाची प्राप्ती करून देईल, अशा नामस्मरणादि भक्तीनेच प्रारब्धाच्या विरुद्धही प्रयत्न सफल हाऊ शकतो. एऱ्हवी स्वतः जीव किंवा देवता (प्रारब्धात) फरक करू शकत नाही, हेच गीतोपदेशाचे सार आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''एवं भारताचा आवांका । आणूनि श्लोका एका । संजये कुरुनायका। दिधला हाती'' (ज्ञा.१८-१६५९) गीतेसह संपूर्ण भारतातील



उपदेशाचे सार संजयाने ''यत्र योगेश्वरः कृष्णः.... '' या गीतेच्या एका श्लोकांत सांगितले आहे. ते सार म्हणजे - ''पैं स्वर्गापवर्ग दोन्ही । इये पदे तया अधिनी । श्रीकृष्ण बाप जननी। कमळा जया ॥ म्हणोनि जिया वाहिं उभा । तो लक्ष्मीयेचा वल्लभा । तेथ सर्व सिद्धी स्वयंभा । येर मी नेणें'' (ज्ञा.१८-१६४५-४७)

ज्यांनी आपल्या स्वाधीन श्रीहरीला प्रेमाने करून घेतले, त्यांनी सर्व अभ्युदय व मोक्ष, असे दोन्ही प्रकारचे सुख, सहज प्राप्त करून घेतले. श्रीहरीच्या साह्यावाचून कोणताही प्रयत्न सफल होत नाही. ''यत्किंचित् पौरुषं पुंसां मेने कृष्णानुभावितम्'' जो जो प्रयत्न मनुष्याचा सफल होतो, तो तो भगवंताच्या कृपेमुळेच होतो. मनुष्याला मात्र माझ्या प्रयत्नाने मी सुख मिळविले असा व्यर्थच अभिमान वाटतो.

सारांश, ''निंब निंबोळियां मोडूनि आला । तरी तो कावळियांसी सुकाळ झाला । तैसा मद्भक्तिविण वाढिन्नला । दोषांचि लागी॥'' (ज्ञा. ९-४३८) निंबाला निंबोळ्यांचा बहार आला तरी जसा तो कावळ्यांच्या उपयोगाचा असतो त्याप्रमाणे परमेश्वराच्या कृपेवाचून सर्व प्रयत्न दुःखप्रदच होतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''तैसे माझिये भक्तिविण । जळों तें जियालेपण । अगा पृथ्वीवरी पाषाण । नसती काई ॥'' (ज्ञा९-४३६) श्रीहरीच्या भक्तीवाचून जगणे म्हणजे वृक्षपाषाणासारखे होय.

## ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें ।
## तुटले धरणें प्रपंचाचे ॥४॥

### *नामाने संसार निवृत्ती*

मनुष्य संसार सुखाचा व्हावा म्हणून थोडा थोडका खपत नाही. तो रात्रंदिवस खपतो व रात्रंदिवस त्याची चिंता वाहतो. संसारात जितका मनुष्य अहोरात्र खपतो त्याच्यापेक्षा परमेश्वर प्राप्तीकरिता काही जास्त खपावे लागत नाही.

सर्व दुःखाचे मूळ जो संसार तो धरणेकऱ्यासारखा जीवाचे पाठीमागे लागलेला आहे. नव्हे हे संसार धरणे जीवाने स्वतःच आपल्या पाठीमागे विचार न करता व्यर्थच लावून घेतले आहे. जोपर्यंत जीव या संसाराला स्वतंत्र अस्तित्व देतो व संसार ही एक स्वतंत्र वस्तू मानतो तोपर्यंत या संसाराचे बळेच पाठीमागे लावून घेतलेले धरणे कधीच सुटणे शक्य नाही. संसार सत्य आहे असे समजणे हेच संसाराचे धरणे होय. हे संसार धरणे कोणत्याही साधनाने तुटत नाही. साधने उलट त्या

धरण्याला साह्यभूत होतात. ज्ञानाने हे धरणे खोटे आहे असे समजलें तरी ते निःशेष सुटत नाही. त्याला एकच उपाय आहे तो उपाय म्हणजे अखंड नामस्मरण करणे हा होय.

हरिनामस्मरणाने सगुण श्रीहरीचा साक्षात्कार होऊन त्याच्या ध्यानाने त्याची अद्वैत सत्ता अनुभवाला आली असता संसारबंधन निःशेष तुटून कृतार्थ होतो

''घोरे कलियुगे प्राप्ते सर्वकर्म बहिष्कृते । न्यूनातिरिक्तता न स्यात्कलौ वेदोक्त कर्मणाम् ॥ हरिस्मरणमेवात्र संपूर्णफलदायकम् । हरि केशव गोविंद वासुदेव जगन्मय ॥ हरिनामपरा ये च हरिकीर्तन-तत्पराः। हरिपूजारता ये च ते कृतार्था न संशयः।। इत्येतद्वः समाख्यातं सर्व-दुःख-निवारणम् । समस्त पुण्यफलदं कलौ विष्णोः प्रकीर्तनम् ॥'' (नृसिंह पुराण अ.५४ श्लो.५७-६२)

परमेश्वराच्या नामस्मरणादी भक्तिवाचून, आपल्या सामर्थ्याने जीवाला हे संसार धरणे तोडणे, सर्वथा अशक्य आहे

'' जरी अपथ्यशीळा व्याधि । आकळे साधूसी दुर्जनांची बुद्धि । कां रागीं सांडी सिद्धि । आली सांती ॥ म्हणोनि गां पंडुसुता । जैसी सकामा न जिणवेचि वनिता । तैसी मायामय सरिता । न तरवे जीवा'' (ज्ञा. ७-९६)

जीवाला स्वसामर्थ्याने तोडण्याला अशक्य असे संसारबंधन काही संसारातल्यासारखे कष्ट करावे न लागता, केवळ वाचेने उच्चारण्याला सुलभ अशा नुसत्या भगवन्नामाने निःशेष तुटले जाते.

तुकाराममहाराज म्हणतात -

''नाम घेंतां उठाउठी । होय संसाराची तुटी ॥
भवरोग ऐसे जाय । आणिक काय क्षुल्लकें ॥
पथ्य नाम विठोबाचे । आणिक वाचें न सेवी ॥''

एका भगवन्नामावाचून दुसरे काही वाणीने निष्कारण वायफळ शब्द

**नाम झाल्याविण नोहे नामफळ ।**
**द्वैत ते केवळ दुःख दावी ॥**
**चहूंहि वाणीसी लाधला एकांत ।**
**वेदांत सिद्धांत ठेला तेथे ॥**
(श्रीगुलाबरावमहाराज अभंग ७७)

(३१)



उच्चारावयाचे नाहीत हे एकच हित-परिणामी पथ्य सतत पाळिले की, संपूर्ण संसारदुःखाचे धरणे समूळ नाहीसे होते.

''कांहीच न करोनी प्राणी । रामनाम जपे वाणी ।
तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तालागी सांभाळी''
(श्रीसमर्थ दासबोध ४-३-३१)
॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहारजार्पणमस्तु ॥
० ० ०

।।श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ।।श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ।।

---

**पाठक्रम : ५** **अर्थक्रम : २**

---

**योग-याग-विधी येणें नोहे सिद्धि । वांयाचि उपाधि दंभ धर्म ॥१॥**
**भावेविण देव न तुटे संदेह । गुरुविणें अनुभव कैसा कळे ॥२॥**
**तपेविण दैवत दिधल्याविण प्राप्त । गुजेविण हित कोण सांगे ॥३॥**
**ज्ञानदेव सांगे दृष्टान्ताची मात । साधूचे सांगात तरणोपाय ॥४॥**

*
प्रतिज्ञा - इतर साधनांचा निषेध.
*

सरळ अर्थ - योगयागविधी यांच्या योगाने सिद्धी प्राप्त होत नाही. हे सर्व धर्म दंभरूप आहेत, म्हणून व्यर्थ उपाधि होत. श्रीहरीची सत्ता कळल्यावाचून श्रीहरीची प्राप्ती नाही व संशयाची निवृत्ती होत नाही. सद्गुरुवाचून अनुभव कसा येईल? कारण तप केल्यावाचून जसा देव प्रसन्न होत नाही किंवा धनादिकांचे अर्पण केल्यावाचून आपल्याला जसे दानाचे फळ मिळत नाही, तसेच निःसीम प्रेमावाचून गुज म्हणजे एकांतात सांगितले जाणारे गुह्य कोणी सांगत नाही व गुह्यावाचून हित नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, दृष्टांताची किंवा स्वानुभवाची मुख्य गुह्य गोष्ट अशी आहे की, साधूच्या संगतीवाचून तरणोपाय नाही.

**योगयागविधि येणें नोहे सिद्धि ।**
**वांयाचि उपाधी दंभधर्म ॥१॥**

***इतर साधनांचा निषेध***

**विवरण - योग म्हणजे प्राणायामादि अष्टांग योग; हा योग संप्रज्ञात व असंप्रज्ञात असा दोन प्रकारचा आहे. मुख्य योग असंप्रज्ञात असून संप्रज्ञात योग असंप्रज्ञात योगाचे अंग आहे. या योगाचा अभ्यास करणारे योगी दोन प्रकारचे असतात.**

**१. एका जन्मानंतर दुसरा जन्म घेऊन प्रयत्न करणारे जे योगी, त्यांना 'उपायप्रत्यययोगी' म्हणतात.**

**२. कल्पाकल्पाचे ठायी जन्म घेऊन ज्यांना जन्माबरोबर आपोआप योग साधतो त्यांना 'भवप्रत्यययोगी' म्हणतात.**

**याग म्हणजे अग्निहोत्रादि यज्ञकर्म. ही कर्मे स्वर्गप्राप्तीकरिता सांगितली आहेत.**

विधी म्हणजे संध्यावंदनादि नित्यनैमित्तिक विहित कर्मे. ती फलत्यागपूर्वक केली असता चित्तशुद्धी होते.

**पण योगयागविधीपैकी कोणतेही साधन, सिद्धी म्हणजे अत्यंत दुःखनिवृत्ती व परमानंदप्राप्ती करून देऊ शकत नाही. जीवाला अत्यंत दुःखनिवृत्ती व परमानंदप्राप्ती याचीच मुख्यतः इच्छा आहे. म्हणून त्याच्याच इच्छेनुसार अत्यंत दुःखनिवृत्ती व परमानंदप्राप्ती, हाच सिद्धीचा अर्थ आहे व सर्व संतही या प्राप्तीलाच खरी सिद्धी म्हणतात, ''ईश्वरप्रणिधानाद् वा'' या पातंजल योगसूत्रात ईश्वराचे प्रणिधानाने योग सिद्धीस जातो असे म्हटले आहे आणि प्रणिधान म्हणजे ''तज्ञपस्तदर्थभावनम्''** (समाधिपाद-सूत्र २८) **भगवन्नामस्मरण व भगवद्ध्यान होय असे तेथेच सांगितले आहे. भगवंताच्या प्रणिधानावाचून योगात विघ्ने उत्पन्न होतात व योगसिद्धीही होत नाही; भगवंताच्या नामस्मरणाने सर्व विघ्ने दूर होऊन ध्यानाने श्रीहरीचा साक्षात्कार होतो. माझी सद्‌गुरु आई स्पष्ट सांगते -**

### *योगाचीं अष्टांगें भक्तीत सहज प्राप्त*

''योगाचीं अष्टांगें नामींच मिळती । नाम ते वेदान्तीं मिश्रित कीं ।।
नाम घेता वाचें इंद्रिय विस्मृति । या नांव बोलती यम भक्त ।।
नामामध्यें शुद्धि तोष आणि दया । हरिभक्ता राया नियम हा ।।
नाम घेतां देह स्तब्धहि होऊन। भक्तासी आसन हेंचि नित्य ।।
नाम घेता कंठ होतसे सद्‌गद । श्वास तोहि बंद पडे तेव्हां ।।
हेंचि हरिभक्ता प्राणसंयमन । कुंभकादि जाण एका काळीं ।।
नाम घेतां वाचें मनासी आकळ । प्रत्याहार बळ हरिभक्ता ।।





नाम घेतां वाणी मनातें एकाग्र । भक्तासी प्रकार धारणा हा ।।
नामें श्रीहरीचा होय आविर्भाव । हरिभक्ता ठाव हेंचि ध्यान ।।
हरिसंगे पडें सकळ विसर। समाधि साचार संप्रज्ञात ।।
हाचि निर्विकल्प समाधीचा ठेवा । परी तीव्र व्हावा नामवेग ।।
नव्हें हें रूपक, नव्हें सन्निवेश । पाहतां प्रत्यक्ष प्रतीति हे ।।
योगाचे हें गुह्य ज्ञानेश्वर पाय। तेथे भक्तिमाय नेवो अम्हां ।।''

(श्रीगुलाबरावमहाराजकृत यष्टि ९. अभगांची गाथा पृ. १०)

**श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीही भक्तीवाचून योग करणाऱ्यांना योग साध्य होत नाही, असे स्पष्ट म्हटले आहे. ''जिहीं सकळ भूतांच्या हितीं । निरालंबी अव्यक्तीं। पसरलिया आसक्ती । भक्तीविणें ।।६०।। तया महेंद्रादि पदें । करिताती वाटवधे। आणि ऋद्धिसिद्धीचीं द्वंद्वे । पडोनि ठाती ।।६१।। म्हणोनि योगाचिया वाटा । जे निघाले गा सुभटा । तया दुःखाचाची वांटा । भागा आला ।।६२।।** (ज्ञाने.अ.१२) **''योग मार्ग बहुत कठीण । विरळा साधी लक्षांतून । भोळ्याभाळ्या सकळाकारण । नामचि पावन करितसे ।।''** (महिपतीबाबा भक्तलीलामृत)

**पुनः योगी लोक प्रारब्धाने व्युत्थान पावून दुःखभोग भोगतात. जोपर्यंत विषयवासना आहे तोपर्यंत व्युत्थान चुकत नाही, हे ''युंजानानामभक्तानां प्राणायामादिभिर्मनः। अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम् ।''** (भागवत- मुचुकुंदाख्यान) **भगवान् म्हणतात, वासना म्हणजे विषयप्रेम. ते भगवत्प्रेमानेच नाहीसे होऊ शकते. म्हणून भक्तीनेच अत्यंत दुःखनिवृत्ती व परमानंदप्राप्ती ही सिद्धी होते. योगी कितीही मोठा झाला तरी ज्ञान्यापेक्षा कमीच असतो तर मग भक्तापेक्षा कमी असतो हे सांगायलाच नको, कारण ''मुक्तानामपि सिद्धानां नारायणपरायणः। सुदुर्लभः प्रशान्तात्मा कोटिश्वपि महामुने'' याचा भावार्थ तुकाराममहाराजांनी ''आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त। तरी भक्तिसुख दुर्लभ त्या'' या अभंगात सांगितला आहे. भक्तांची स्थिती ज्ञान्यापेक्षाही श्रेष्ठ असते हे भगवंतानी गीतेत स्पष्ट केले आहे.**

**यागादि कर्मे देखील भक्तीशिवाय चित्तशुद्धीलाही कारण होत नाहीत. ''माझे भक्तीविण कर्म धर्म । जाण पां तो केवळ अधर्म । चुकलें मत्प्राप्तीचे वर्म । तो धर्म अधर्मे परिणमे'' असे नाथांचे म्हणणे आहे.**

**भगवत्प्राप्तीची आवड ठेवून केवळ भगवंताची आज्ञा म्हणून कर्मे केली असता, तो धर्म पदरी पडतो. पुनः योगादिक धर्म हरीचा आश्रय केल्याशिवाय होत नाहीत. कारण ''स्वर्गकामो यजेत्'' ज्याला स्वर्गसुख मिळविण्याची इच्छा आहे त्याने**

इंद्रादी देवतांचे यजन करावे असे शास्त्र म्हणते. पण आपल्याला यजनानुसार स्वर्गसुख कोण देणार? इंद्र हाच स्वतः स्वर्गाचे सुख भोगणारा असल्यामुळे, तो स्वतःचे पद दुसऱ्याला कसे देईल? परमेश्वर सर्वांच्या कर्माप्रमाणे प्रत्येकाला त्याच्या कर्माचे फळ देणारा मालक आहे. यागादीकर्माने स्वर्गसुख मिळाले तरी ते सर्व दुःखाची निवृत्ती करून परमानंद देणारे नसते. कर्माने प्राप्त होणारे फळ सर्वच अनित्य असल्यामुळे, स्वर्गसुखाचा भोग संपला की, पुनः मृत्युलोकात यावे लागते. म्हणून स्वर्गसुख क्षणभंगुर आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, असे असूनही ''परी नवल बापा धिंवसा । या याज्ञिकांचा'' यागादी कर्मे करणारे लोक मोठा धिवसा धरून यागादिक कर्मे करितात. कारण यज्ञादिक्रियांमध्ये बरेच कष्ट आहेत, त्या प्रमाणात प्राप्ती नाही. त्यांत स्वर्गातील अप्सरादिभोगाकरिता म्हणून तेवढ्यापुरते ब्रह्मचर्य पाळले जाते. आहुतिशेष म्हणून मद्यपानादी करतात, स्वर्गांत जाण्याच्या वाटेत कोणत्याही देवतेचा अडथळा होऊ नये म्हणून त्यांना पशूंचे मांस अर्पण करितात. अशी ही यज्ञादिक्रिया शंकराचार्यांनी म्हटल्याप्रमाणे,

''अपूता हि ते शत्रुमित्रसंयोगनिमित्तौ हि तेषां रागद्वेषौ । तथा धर्माधर्मौ हिंसानुग्रहनिमित्तौ । हिंसाऽनृतमायाब्रह्मचर्यादि च बव्हशुद्धिकारणमपरिहार्यं तेषाम् । अतो अपूताः'' (छांदोग्य ५-१-१) पुष्कळ प्रकारच्या अशुद्धिकारणाने युक्त आहे. अशी यज्ञादी क्रिया अत्यंत दुःखरहित परमानंदरूप श्रीहरीची प्राप्ती करून देऊ शकत नाही. नाथही असेच म्हणतात.

''निष्कामासी यागयजन । स्वधर्मार्थ करावे यज्ञ । तै पशूचें आलभन । सर्वथा हनन करूं नये ।। ''पशूचे करूं नये हनन । देवातोद्देशे अंगस्पर्शन । या नांव बोलिजे आलभन । हें यज्ञाचरण निष्काम ।।'' जे क्षत्रियादी लोक स्वाभाविक मांसाहारी आहेत त्यांच्या स्वाभाविक स्वैर मांसाहाराला आळा बसावा म्हणून त्यांच्याकरिता पशुहननरूप यज्ञ सांगितले आहेत. यज्ञात पशूचे हनन केलेच पाहिजे असे नाही. महाभारतात ''आलंभयज्ञा क्षात्राश्च'' असे स्पष्ट म्हटले आहे.

कोणी म्हणतील की ''अशुद्धमिति चेन्न शब्दात्'' या ब्रह्मसूत्रावर भाष्य करतांना यज्ञांतील पशुहननादी क्रिया अशुद्ध नाही, कारण वेदानेच ती सांगितली आहे असे आचार्यानी म्हटले आहे ना! तेव्हा तुम्ही त्या क्रियेला अशुद्ध कसे म्हणता?

यावर समाधान असे की, हे सूत्र ज्या संशयाचा निर्णय करण्याकरिता प्रवृत्त झाले तो संशय असा आहेः- ''यज्ञ करणारा जीव मृत्युलोकी जन्म घेतेवेळी ज्या





धान्याचा आश्रय करून राहतो त्याला, त्याच्या यज्ञांतील पशुवधाच्या पापामुळे, धान्याचे दळणे, कांडणे, शिजविणे, इत्यादी क्रियेमुळे होणारे दुःख भोगावे लागते.''

या शंकेला आचार्यानी या सूत्रावरील भाष्यांत उत्तर दिले आहे. ''धान्यात दोन जीव असतात. एक जीव आपल्या पापकर्मानुसार नरकादी दुःख भोगून शेषदुःख भोगण्याकरिता धान्यरूपी योनीत जन्म घेतो व दुसरा यज्ञादिकर्माने जे स्वर्गसुख मिळाले ते भोगून भोग संपल्यावर मृत्युलोकी जन्म घेताना, नुसता पाहुण्याप्रमाणे धान्यादि योनीचा आश्रय करून राहातो. धान्यादी योनीत जन्मून त्या योनीरूपी देहाचा अहंकार धरणारा जीवच कांडणे, दळणे इत्यादिकांपासून होणारे दुःख भोगतो. आपल्या यज्ञादी कर्माचे फळ जे स्वर्गसुख ते भोगून मृत्युलोकी येणारा व धान्यादी योनीचा आश्रय करणारा कांडणादिकांचे दुःख भोगीत नाही. कारण तो स्वर्गातून जन्माला आलेला असतो.'' असे आचार्यभाष्याचे सार आहे. म्हणजे यज्ञांतील पशुहनन नरकप्रद नाही. म्हणून मृत्युलोकीही ते धान्यादी योनीतील जीवाप्रमाणे दुःखप्रद होत नाही. ब्रह्मसूत्रभाष्यातील ''यज्ञकर्म अशुद्ध नाही'' या त्यांच्या म्हणण्याचा एवढाच अर्थ होतो.

छांदोग्यभाष्यातील त्यांच्या वचनाचा अर्थ असा आहे की, तेथील विषयानुसार पाहतां ब्रह्मचारी, वानप्रस्थ व संन्यासी हे ब्रह्मलोकाला जातात. पण अतिकष्टदायक यज्ञादी कर्मे करणारा गृहस्थ मात्र ब्रह्मलोकाला जात नाही. कारण तो यज्ञ करणारा यज्ञादी अशुद्ध कर्माचरणामुळे ब्रह्मलोकाला जाण्यायोग्य पवित्र नसतो. याचा निष्कर्ष नाथांच्या वाक्याप्रमाणे हाच निघतो की, परमेश्वप्राप्तीकरता हिंसात्मक यज्ञ उपयोगी नाहीत.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''ऐसे दीक्षित जे सोमप । जे आपणचि यज्ञाचे स्वरूप । तिहीं तया पुण्याचेनि नांवे पाप । जोडिले देखे ।।३०९।। जे श्रुतित्रयाते जाणुनि । शतवरी यज्ञ करूनि । यजलिया मातें चुकोनि । स्वर्गा वरिती ।।३१०।। स्वर्गा पुण्यात्मकें पापें येईजे । पापात्मके पापें नरका जाईजे । मग मातें जेणे पाविजे । तें शुद्ध पुण्य ।।३१६।। (ज्ञा॰अ९) जे भगत्वप्राप्तीला कारणीभूत होते ते खरे पुण्य होय. त्या दृष्टीने पाहता ''म्हणवुनि मज एकेविण । हें त्रयी धर्म अकारण । आता माते जाणोनि कांही नेण । तूं सुखिया होसी'' (ज्ञा. ९-३३४) एका श्रीहरीवाचून केवळ इतर यज्ञादी धर्मांचा आश्रय केल्याने अत्यंत दुःखनिवृत्ती व परमानंदप्राप्ती होत नाही.

कोणी म्हणतील की, योगयागादिकाने काही सिद्धीच होत नाही काय?

यावर उत्तर असे की, योगयागादिकांनी काहीच सिद्धी होत नाही असे नाही. सिद्धी तीन प्रकारच्या आहेत.

१- पहिली व्यवहार सिद्धी म्हणजे व्यवहारातील अन्नपानादी विषयांची इच्छा झाल्याबरोबर ते विषय प्राप्त होणे.

२- दुसरी अलौकिक सिद्धी म्हणजे अणिमा आणि लघिमा इत्यादी सिद्धी.

३- तिसरी अत्यंत दुःखनिवृत्ती व परमानंदप्राप्तिरूप सिद्धी ! पैकी तिसरी सिद्धी हरिनामस्मरणादी भक्तीनेच होते.

बाकीच्या सिद्धी या तिसऱ्या सिद्धीच्या प्राप्तीत अडथळा करणाऱ्या आहेत.

नामस्मरणादी भक्तीवाचून केवळ यज्ञादी कर्मे केली तर जगात आपण धार्मिक आहोत असे मिरवण्याकरिताच त्या आचरणाचा उपयोग होतो म्हणून भक्तीवाचून त्या कर्माचे अनुष्ठान दांभिक व व्यर्थच म्हणावे लागते.

**भावेविण देव न तुटे संदेह ।**

**गुरुविणे अनुभव कैसा कळे ॥२॥**

***भावावाचून देव कळत नाही***

भावावाचून देव कळणे शक्य नाही. भाव म्हणजे भगवंताचीअद्वैत सत्ता, अस्तित्व! जीव हा देवाला म्हणजे आत्मस्वरूपाला विसरला आहे. म्हणूनच त्याला आत्मविस्मृतिरूप अज्ञानाने नामरूपात्मक प्रपंच खरा वाटतो.वास्तविक त्याचे मुळचे आत्मस्वरूपच नामरूपात्मक प्रपंचरूपाने भासते.

आत्मरूप श्रीहरीची अशी अद्वैतसत्ता अनुभूत होणे याला देव कळणे म्हणतात. पण त्याकरिता त्याला प्रथम त्याच्या हृदयातील आत्म्याचे अस्तित्व, श्रुतिसंतवचनावरून दृढविश्वासाने ग्रहण झाले पाहिजे कारण प्रपंचाच्या पृथक् अस्तित्वाचा व वस्तुत्वाचा भ्रम त्याच्या हृदयातच आहे. जेथे भ्रम होतो तेथेच खरी वस्तू राहते हा नियम आहे. म्हणून हृदयस्थ परमात्म्याची अगोदर ओळख झाली पाहिजे व साक्षात् अनुभव येईपर्यंत श्रद्धेनेच तसे अद्वैत अस्तित्व मानले पाहिजे. तेव्हाच त्या देवाच्या प्राप्तीचा प्रयत्न होऊ शकेल.श्रीहरीच्या अद्वैत अस्तित्वाचा दृढ निश्चय नसला व असलेल्या श्रीहरीला आपण विसरलो, असे कळले नाही तर त्याच्या प्राप्तीची खटपटही संभवत नाही.ज्याप्रमाणे मुलाला आपण असमर्थ आहो असे वाटते म्हणूनच आपले आईबाप आपले संरक्षण करितात असे त्याला वाटते व तो त्यांचा आश्रय घेतो,

(३४)



त्याप्रमाणे आपण आपले आत्मस्वरूप किंवा पूर्णत्व विसरलो असे निश्चित वाटले तर ते प्राप्त करून घेण्याकरिता सद्‌गुरूचा शोध वगैरे करता येतो.

***गुरुवाचून संदेह जात नाही***

आत्मप्राप्ति म्हणजे आत्मरूप श्रीहरीची अद्वैतसत्ता ओळखणे होय. पण श्रीहरीची अद्वैतसत्ता कळण्याकरिता श्रीगुरूची आवश्यकता आहे. आपल्या जीवदशेविषयी व जगताविषयी अनेक प्रकारचे संदेह असतात. त्या सर्व संदेहांचे निरसन करून आपले निःसंदिग्ध आत्मस्वरूप पटवून देणारा श्रीगुरु पाहिजे. जयास वाटे मोक्ष व्हावा । तेणें सद्‌गुरु करावा । सद्‌गुरुवीण मोक्ष पावावा । हें कल्पांती नघडे॥ (श्रीसमर्थ, दासबोध ५-१-४४)

भागवतात मुमुक्षूने कोण्या गुरूला शरण जावे हे सांगतांना ''शाब्दे परे च निष्णातम् ब्रह्मण्युपशमाश्रयम्'' असे म्हटले आहे. नाथ म्हणतात- ''जो शब्दज्ञानीं पारंगतु । ब्रह्मानंदे सदां डुल्लतु । शिष्यप्रबोधनीं समर्थु । यथोचितु निजभावें ॥'' शिष्यांच्या संदेहाचे निरसन करून त्याच्या बुद्धीने पूर्ण आत्मनिश्चय होईल असा बोध करणारा गुरु पाहिजे.

शब्द सुनाय संदेह मिटावत । सुंदर वा गुरु की बलहारी ॥ असे सुंदरदास म्हणतात. निःसंदेह जर अंतःकरण झाले नाही तर अंतःकरणाला अखंडबोध तरी कसा होणार? अनुभवी श्रीगुरूच्या साह्यावाचून आत्मस्वरूपाचा निःसंदेह निश्चय होत नाही व जोपर्यंत निःसंदेह वृत्ती झाली नाही तोपर्यंत अपरोक्ष अनुभव तरी कसा येणार? या चरणात 'न' हा शब्द दोनदा घ्यावा.

''भावेविण देव न'' व ''गुरुविणे संदेह न तुटे''

परमेश्वरावाचून दुसरे काहीच नाही का? हाच- म्हणजे श्रीहरीच्या अद्वैतसत्तेविषयी- मुख्य संदेह असतो. हा संदेह नाहीसा झाला की, श्रीहरीवाचून दुसरी वस्तू नाही असा अनुभव येतो व आतला आत्मप्रेमच बाहेर श्रीहरीवर बसतो. हा संदेह

''जो ज्ञानाचिया अभावा। माजी असें'' (ज्ञाने. ४) यथार्थ ज्ञानाच्या अभावीच राहतो. श्रीगुरूच्या साह्याने तो संदेह शब्दद्वारा व अनुभवाद्वारा सर्वस्वी नाहीसा होतो.

**तपेविण दैवत दिधल्याविण प्राप्त ।**

**गुजेंविण हित कोण सांगे ॥३॥**

### *गुह्य म्हणजे अनुभवप्रक्रिया*

पण हा अनुभव नेहमी गुह्य मानला जातो. भगवंतानी गीतेच्या नवव्या अध्यायात ''इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे'' अनुभवाला गुह्यच म्हटले आहे. हा अनुभवच खरे हित होय. यानेच आत्यंतिक कल्याण किंवा अत्यंत दुःखनिवृत्ति व परमानंद प्राप्तिरूप हित साधले जाते. हा अनुभव म्हणजे श्रीहरीचा आत्मा होय व श्रीहरीच जगत् होय, अशी श्रीहरीची अद्वैतसत्ता अनुभवास येणे होय. पण हा अनुभव अत्यंत गुह्य ठेवला जातो.

ज्याप्रमाणे तपाने शरीर क्षीण केल्यावाचून देवता प्रसन्न होत नाहीत किंवा दानादिकांमध्ये धन दिल्यावाचून आपल्याला दानाचे फळ मिळत नाही; त्याप्रमाणे हित म्हणजे अत्यंत कल्याणकारी हा अद्वैतसत्तेचा अनुभवही, गुजेविण म्हणजे संतसंगतीत एकान्तात होणाऱ्या अत्यंत जिव्हाळ्याच्या गुह्य गोष्टीवाचून कोणी सांगत नाही.

साधुपुरुष आपला अनुभव अत्यंत अमोल म्हणून अत्यंत दक्षतेने जतन करून गुप्त ठेवतात. जसा कृपण पुरुष आपला धनाचा ठेवा, अत्यंत प्रेमामुळे गुप्त ठेवतो व तो ठेवा आपल्याप्रमाणेच अत्यंत दक्षतेने व प्रेमाने सांभाळणारा असेल त्याला तो देतो; त्याप्रमाणे साधुपुरुष, आपल्या हृदयात ठेवलेला संकेतरूपी गुह्य अनुभवठेवा हरिप्राप्तीच्या जिव्हाळ्याने संतसंगतीत ज्या गुह्य गोष्टी होतात त्या गोष्टींतच ते देतात. अर्थात् अशा जिव्हाळ्याच्या गोष्टी, ज्याच्याशी करायच्या तो शिष्यही तसाच हरिप्राप्तीचा जिव्हाळा वागविणारा पाहिजे.

''यालागीं सुमन आणि शुद्धमति। जो अनिंदक अनन्यगति। पैं गा गौप्यहि परी तयाप्रति। चाळविजे सुखें ॥४०॥ तरी परियेंसी गा प्राज्ञा। तूं आस्थेचीच संज्ञा। बोलिलियें गोष्टीची अवज्ञा। नेणसी करूं ॥३६॥ म्हणूनि गूढपण आपलें मोडो। वरी न बोलणेंहि बोलावें घडो। परी आमुचिये जीवींचे पडो। तुझ्या जीवी ॥३७॥ (ज्ञा. अ. ९)

असे भगवान् अर्जुनाला सांगतात, असे श्री ज्ञानेश्वरमाउली म्हणते.

''ब्रुयुः स्निग्धस्य शिष्यस्य गुरवो गुह्यमप्युत'' हरिप्राप्तीचा जिव्हाळा ज्यांच्या अंतःकरणात आहे त्यालाच हरिप्राप्तीचे गुह्य सांगावे अशी शास्त्राची आज्ञा व परंपरा आहे.

**ज्ञानदेव सांगे दृष्टान्ताची मात ।**

**साधूचे सांगात तरणोपाय ॥४॥**

(३५)



### *सत्संगति हाच तरणोपाय*

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, दृष्टांताची किंवा स्वानुभवाची गुह्य गोष्ट ही आहे की, शंकराचार्यांनी म्हटल्याप्रमाणे - ''नहि दृष्टान्तदार्ष्टांतिकयोः चित्कंचिद्विवक्षितांशं मुक्त्वा सर्वसारूप्यं केनचिद्दर्शयितुं शक्यते'' दृष्टांत नेहमी एखादी विवक्षित गोष्ट समजावून देण्याकरिता दिला जातो. म्हणून तो एकदेशीय असल्यामुळे दृष्टांतावरून समूळ अनुभव येणे किंवा सिद्धांत अवगत होणे शक्य नसते. आत्मानुभव हा संकेतरूप म्हणजे अद्वैतरूप असल्यामुळे तो समजावून देण्याकरिता योग्य दृष्टांतच नाही व दृष्टांताने सांगता येत नाही. अशी दृष्टांताची गोष्ट असल्यामुळे, शेवटी सर्व साधने व सर्व दृष्टांत यांचे पर्यवसान संतसंगतीतच होते. म्हणजे शेवटी 'श्रीगुरुलाच शरण जा तरच तुला आत्मानुभव येईल'

असे सर्व शास्त्रांचे निक्षून सांगणे आहे.

दृष्टांताने आत्मानुभवाची सामान्य कल्पना आली तरी वृत्तीचा अनुभव संतसंगतीवाचून येत नाही. म्हणूनच ''आचार्यादेव विद्या विदिता साधिष्ठं प्राप्नोति'' श्रीगुरुपासून प्राप्त झालेलीच ब्रह्मविद्या अनुभवावसायी होते. ''आचार्यवान् पुरुषो वेद'' श्रीगुरूच्या साह्यानेच ब्रह्मस्थिती बाणते. ''आचार्यस्ते गतिं वक्ता'' आचार्यच मार्ग सांगू शकतात इत्यादी वचनात श्रीगुरूच्या संगतीची महति गाईली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजही म्हणतात,

''तें ज्ञान पैं गा बरवें । जरी मनीं आथी जाणावें । तरी संतां या भजावें। सर्वस्वेंसी ॥ जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंटा । तो स्वाधीन करी सुभटा। वोळगोनि ॥ तरी तनु मन जीवें । चरणासी लागावें । आणि अगर्वता करावें। दास्य सकळ ॥ मग अपेक्षित जें आपुलें । तेंहि सांगतील पुसलें । जेणें अंतःकरण बोधिले । ये संकल्पा न ये॥'' (ज्ञा४-६५-६८)

परमार्थ खरोखर साधायचा असला तर सत्संगती अवश्य केली पाहिजे किंवा 'दृष्टांताची मात' याचा दुसरा अर्थ असाही करता येईल की, आपण जे दृष्टांत दिलेले पाहतो ते बहुतेक व्यवहारातले अनुभव असतात, म्हणून दृष्टांताची मात म्हणजे स्वानुभवाची गोष्ट तर ही आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, संताचे संगतीवाचून आत्मानुभव मिळणे शक्य नाही व स्वानुभवावाचून संसारातून तरून जाण्याला उपाय नाही. सत्संगती हाच संसार तरण्याचा निश्चित राजमार्ग आहे. संतसंगतीचे प्रकार

ही संतसंगती तीन प्रकारची आहे. १- पहिला प्रकार म्हणजे आपला सर्व व्यवहार सोडून देऊन त्यांच्या संगतीत जे कष्ट पडतील ते सहन करणे. हे साधु मुख्यतः योगी असतात. २- साधूचा दुसरा प्रकार आपला अधिकार जाणून आपल्या उद्धारार्थ आपल्या घरी चालून आलेले. हे साधू ज्ञानी होत, आणि ३- तिसऱ्या प्रकारचे साधू म्हणजे ज्यांच्या कृपेनेच त्यांची संगती होत असते, यांना भक्त म्हणतात, यांच्याच कृपेने श्रीहरीच्या भक्तीचा लाभ होतो.

**मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद् वा ।**

**महत्संगस्तु दुर्लभोऽगम्योऽमोघश्च ॥ श्रीनारदभक्तिसूत्रे**

काही पुरुष भक्तीला साधन मानतात व त्याचे फल मुक्ती मानतात. भक्तांचे तसे नाही. भक्तांना पहिले जीवन्मुक्ती होते व नंतर ते अहेतुक किंवा निष्काम भक्ती करितात. म्हणून त्यांची भक्ती साधनरूप नसते, फलरूप असते. म्हणजे फलरूप भक्तीचा विषय श्रीहरि असून श्रीहरीप्राप्ती हे तिचे फळ असते. ज्ञान प्राप्त झाल्यावरही श्रीहरीची अहेतुक निःसीम प्रेमभक्ती करणारे महात्मे -
मुक्तानामपि सिद्धानां नारायणपरायणः। सुदुर्लभः प्रशांतात्मा कोटिष्वपि महामुने ॥

हे कोटी ज्ञान्यांमध्ये फार विरळा असतात. सगुण श्रीहरीच्या प्राप्तीकरिता अशा भक्तांचीच सत्संगती केली पाहिजे; त्याशिवाय गत्यंतर नाही. साधुसंतांच्या सत्संगतीचा इष्ट परिणाम मानव प्राण्यावर तर होतोच होतो. पण वन्य, हिंस्र पशुपक्ष्यांवर देखील तो झालेला इष्ट परिणाम प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहता येतो. साधूंच्या सहवासात असताना व्याघ्र व गाय, सर्प व मुंगुस, उंदीर व मांजर, इ. इ. जन्मजात शत्रू आपले मूळचे स्वाभाविक हाडवैर सोडून त्या पवित्र ज्ञा वातावरणात एकजीव होऊन निर्वैर बंधुप्रमाणे बागडत व खेळत आनंदाने राहतात!

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

---

**पाठक्रम : ६** **अर्थक्रम : १४**

---

**साधुबोध झाला नुरोनिया ठेला । ठायींच मुराला अनुभवें ॥१॥**

(३६)



**कापुराची वाती उजळली ज्योति । ठायींच समाप्ति झाली जैसी ॥२॥**

**मोक्षरेखे आला भाग्यें विनटला । साधूचा अंकिला हरिभक्त ॥३॥**

**ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी । हरि दिसे जनी वनी आत्मतत्त्वी ॥४॥**

*

प्रतिज्ञा - सत्संगाचा महिमा, संकेत दृष्टी आणि स्वलोप.

*

सरळ अर्थ - साधूच्या मुखाने आत्मबोध प्राप्त झाला असता जीव अहंकारशून्य होतो आणि आत्मानुभवाने आपल्या अधिष्ठानरूप आत्मस्वरूपाशी समरस ऐक्य पावतो. ज्याप्रमाणे कापूर उजळला असता ज्योती उत्पन्न होते व कापूर जळून गेल्यावर ती ज्योती शेवटी तेथे नाहीशी होते; त्याप्रमाणे साधूच्या उपदेशाने जो आत्मानुभव येतो त्या अनुभवाने जीवही तेथे आत्मस्वरूपाचे ठिकाणीच समाप्त होतो व पूर्णविराम पावतो. मोक्ष पायातळी आल्यानंतर तो हरिभक्त नामधारक साधूचा मुद्रांकित होऊन अत्यंत निरहंकाररूप परमभाग्याने संपन्न होऊन सर्वत्र अत्यंत नम्र होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, मला संतांचे संगतीतच अवीट गोडी वाटते; कारण संतसंगतीनेच मला जनी म्हणजे सचेतन पदार्थात, वनी म्हणजे जड पदार्थात आणि आत्मतत्वी म्हणजे जीवात सगुण श्रीहरीच भरलेला दिसू लागला.

**साधुबोध झाला नुरोनिया ठेला ।**

**ठायींच मुराला अनुभवें ॥१॥**

**कापुराची वाती उजळली ज्योति ।**

**ठायींच समाप्ति झाली जैसी ॥२॥**

***साधूचे लक्षण***

विवरण - साधू म्हणजे सद्भावाचे माहेरघर! सगुण श्रीहरि व निर्गुण आत्मस्वरूप यांचे पूर्ण ऐक्य जाणून सर्वांगी जो चैतन्यघन झाला व सगुण श्रीहरीची अद्वैतसत्ता जाणणारा व त्या सगुण श्रीहरीवर निःसीम आत्मप्रेम करणारा होय. ''आता वंदु संतजन । जे सर्वांगी चैतन्यघन । जया सगुणनिर्गुण समसमान । जे निज जीवन सद्भावा ॥७॥'' (एकनाथी चतुःश्लोकी भागवत) किंवा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे ''इया ज्ञान भक्ति सहज । भक्त एकवटला मज । तो मीचि केवळ''

(ज्ञा.अ.१८-११३०) ज्ञान भक्तीच्या योगाने श्रीहरीच्या दोन्ही निर्गुण व सगुण स्वरूपाशी समरस ऐक्य पावून, समुद्रास मिळालेल्या नदीच्या, समुद्रास मिळू पाहणाऱ्या प्रवाहाप्रमाणे ज्याच्या अंतःकरणात प्रगट प्रेमवृत्तीरूप नदीचा प्रवाह प्रेमसागर सगुण श्रीहरीचे ठिकाणी अनुस्यूत वाहतच असतो त्याला येथे साधू म्हटले आहे. अशा साधुपुरुषाच्या संगतीत, त्याच्या मुखावाटे जो आत्मबोध ऐकायला मिळतो व त्याच्या ठिकाणी वसत असलेल्या भक्तीप्रेमाचा जो आस्वाद मिळतो, त्यामुळे मुमुक्षुही त्याच्यासारखा म्हणजे ''नुरोनिया ठेला । ठायीच मुराला अनुभवे'' असा होतो.

### *नुरोनिया ठेला व ठायीच मुराला*

वेदान्त शास्त्राप्रमाणे, एका श्रीहरीवाचून दुसरी वस्तूच नाही. म्हणून दुसऱ्या वस्तूचा भास हा काल्पनिक ठरतो. दुसरी वस्तू आहे अशी कल्पना होते व त्या कल्पनेने दुसरी वस्तू भासते. आत्मवस्तूचे ठिकाणी मी मी म्हणून जे स्फुरण होते ते आत्मवस्तूचेच होय, पण आत्मविस्मृतीमुळे ते आत्म्याहून निराळे झाले म्हणजे निराळेपणाची कल्पना झाली. या निराळेपणाच्या कल्पनेनेच त्या मीपणाच्या स्फुरणाला अहंकाराचे रूप आले. असे हे मीपण देहाशी ऐक्य करून भासू लागले असता, त्याला देहाहंकार म्हणतात.

अशा या काल्पनिक स्थितीमुळेच आत्म्यावर जीवदशेचा आरोप होतो. ही काल्पनिक जीवदशा आत्म्याला धरूनच भासते. जीवदशा नुसती कल्पनारूप असल्यामुळे, तिच्या योगाने आत्म्याच्या स्वरूप स्थितीत अणुमात्र फरक होत नाही. ते तसेच्या तसेच संचलेले असते. साधुपुरुषाच्या मुखाने आत्म्याचा किंवा आपल्या स्वरूपाचा विचार ऐकून, ज्याला आपण आपले स्वरूप समजतो ते आपले स्वरूप नसून आपण आपल्याविषयी करून घेतलेली विपरीत कल्पना होय, असे समजून आल्यावर संपूर्ण जीवदशा मावळते. म्हणजे आपल्या स्वरूपाविषयी केलेल्या विपरीत कल्पना नाहीशा होतात. आणि जीवदशा नाहीशी झाल्यावर तो जीव आपल्या मूळच्या सच्चिदानंदरूपाने राहतो. याला 'नुरोनिया ठेला' म्हणतात आणि कल्पित पदार्थ ज्या पदार्थावर कल्पिले जातात, त्याच पदार्थाचे ठिकाणी निवृत्त होतात म्हणजे तद्रूप होऊन जातात.

या नियमानुसार, निवृत्त झालेली कल्पित जीवदशा, आत्मस्वरूपाचे ठिकाणी तेथल्या तेथेच निवृत्त होते. कल्पित पदार्थ ज्याच्यावर कल्पिला जातो, त्याला अधिष्ठान म्हणतात. अधिष्ठान व कल्पित पदार्थ यांचे भिन्न अस्तित्व नसते.

(३७)



अधिष्ठानाचे अस्तित्वावरच तो भासतो म्हणून ''ठायीच समाप्ति'' म्हणजे ज्या आत्मरूप अधिष्ठानावर जीवदशा भासली त्याच अधिष्ठानाचे ठिकाणी ती समाप्त होते.

याला श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी कापुराचा दृष्टान्त दिला आहे. कापूर ज्याप्रमाणे उजळला असता, त्याची ज्योती दिसते व शेवटी ती तेथल्या तेथेच मावळते त्याप्रमाणे जीवदशा आत्म्यावर भासते व तेथल्या तेथे आत्म्याचे ठिकाणीच नाहीशी होते; म्हणजे जीव जीवपणाने न उरता ब्रह्मपणाने राहतो. आत्मविचाराने एवढी दशा प्राप्त होते व या प्राप्तीची, 'मी ब्रह्मस्वरूप आहे', अशी जाणीव राहते. पण ही जाणीव राहणे, हेही 'ज्ञानबंधन आहे', असे माउलीचे सांगणे आहे.

### *हरिभक्तीचा लाभ : स्व-लोप*

हे ज्ञानबंधन श्रीहरीच्या भक्तीवाचून तुटत नाही. ज्ञानाचे ठिकाणी हे ज्ञानबंधन तोडण्याचे सामर्थ्य नाही. कारण ते ज्ञानानेच उत्पन्न झाले आहे. हे ज्ञानबंधन म्हणजेच मूळमाया होय. निर्विकल्प अशा आत्मस्वरूपाचे ठिकाणी मी म्हणून म्हणण्याजोगे दुसरे कोणी नाही. अशा निर्विकल्प स्वरूपाचे ठिकाणी अहं ब्रह्मास्मि स्फुरण होते हेच मूळ मायेचे लक्षण. असे नाथादिक संत म्हणतात. या मीपणाच्या जाणिवेनेच द्वैतभ्रम आला.

जे काही द्रष्टा-दृश्य स्वरूपाने स्फुरते, तो श्रीहरीच स्फुरतो. असे अन्वयाने किंवा संकेताने कळून आल्यावर मीपण ठायीच्या ठायीच मुरते. पण ''तरी पुढती जरी विपाये । बुद्धीसी कल्पनेची झोप ये । तरी अभेदबोध जायें । जै स्वप्नी पडिजे ॥ म्हणोनी निद्रेची वाट मोडे । निखिल उद्‌बोधाचेहि घडे ॥''

पुनः मीपण स्फुरून आपल्या अस्तित्वाच्या जाणिवेने द्वैत भ्रम होऊ नये व सर्वस्वी द्वैत कल्पनेचा मार्ग मोडावा एवढ्याकरिता साधुपुरुष आत्मस्वरूप असलेला व भक्ताच्या प्रेमाला विषय होण्याकरिता साकार झालेला प्रेमसागर जो सगुण श्रीहरी, त्याचे ठिकाणी प्रेमभक्ती करून ''मी ब्रह्म'' ही जाणीव ठेवणाऱ्या मनाला निःशेष मुरवितात. श्रीहरीरूप प्रेमसागरात बुडालेले मन पुनः जागे होत नाही. मन नाहीसे झाल्यावर, मी देह किंवा मी ब्रह्म ह्या दोन्ही अज्ञानज्ञानाच्या कल्पना नाहीशा होऊन, निर्विकल्प श्रीहरीशी जीव निर्विकल्प असा समरस होतो. कल्पनामूलक सर्व ज्ञान-अज्ञानाचा सविकल्प भाव जाऊन निर्विकल्प होऊन राहणे याला भक्तिदृष्टीने ''ठायीच मुराला'' असे म्हणतात. यालाच स्वलोप म्हणतात. हीच परमसिद्धी होय.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी या स्थितीचे वर्णन पुढील ओव्यात केले आहे. ''एऱ्हवी न बोलणेचि बोलणे । जेथिचे सर्व नेणिवा जाणणे । काहीच न होऊनि होणे । जे वस्तु गा ॥ सोहं तेही अस्तवले ॥ तैसे आपले नेणणे । फेडिजें कां जाणणे । तेही गिळुनि असणे । ऐसी जे दशा ॥ ऐक्याचे एकपण सरे । जेथ आनंदाचा कणुहि विरे । काहीच नुरोनि उरे। जे काही गा''

अशी निर्विकल्प स्वरूप स्थिती होण्याकरिता नाथ म्हणतात '' निर्विकल्प स्वरूप प्राप्ति । अवश्य पावणे आहे चित्ती । तै करावीं भगवद्भक्ति । उत्कट प्रीति अविश्रम ॥

ही निर्विकल्प स्थिती अखंड नामस्मरणादी भक्तीनेच प्राप्त होते.

**मोक्ष रेखे आला भाग्यें विनटला ।**

**साधूंचा अंकिला हरिभक्त ॥३॥**

दुःखनिवृत्ती व परमानंदप्राप्ती अशी मोक्षाची दोन अंगे आहेत हे वर सांगितलेच आहे. त्यापैकी जीवब्रह्मैक्यरूप ब्रह्मज्ञानाने दुःख निवृत्तिरूप मोक्ष साधतो व परमानंदरूप मोक्ष भक्तीनेच साधतो, पण हरिभक्ताला दुःखनिवृत्तिरूप मोक्ष साधण्याकरिता श्रीहरीच्या भक्तीवाचून स्वतंत्रपणे जीवब्रह्मैक्याचा विचार बाणण्याचा प्रयत्न करावा लागत नाही.

सगुण श्रीहरि पूर्ण ब्रह्मस्वरूपच असल्यामुळे, प्रेमभक्तीने श्रीहरीशी ऐक्य झाल्यावर जीवब्रह्मैक्याचा अनुभव आपोआपच येतो व त्यामुळे दुःखनिवृत्तिरूप मोक्ष सहज साधतो. इतकेच नाही तर भक्तीवाचून नुसत्या जीवब्रह्मैक्य विचाराने आत्म्यावाचून दुसरा पदार्थच नाही, म्हणून द्वैताचे अभावी दुःखाचे कारणच नाही. द्वैताच्या कल्पनेमुळे दुःखाचा भास होतो असे समजले तरी, प्रारब्धभोगकाळी दुःखाचे चटके सहन करावे लागतात; कारण ज्ञानाने सर्व जग अत्यंत खोटे वाटून दुःखही खोटे व दुःख भासू नये; इतके दृढ अपरोक्ष ज्ञान भक्तीवाचून होत नाही, असे नाथादिकांचे म्हणणे आहे.

म्हणजे नुसत्या ब्रह्मज्ञानाने दुःखनिवृत्तिरूप मोक्ष साधत नाही, असे सिद्ध होते. पण भक्तीच्या योगाने श्रीहरीस्वरूप झालेले अंतःकरण दुःख जाणत नाही. ज्याप्रमाणे अत्यंत गाढ झोपेत असलेला माणूस ढेकणाच्या चावण्याने जागा होत नाही, त्याचप्रमाणे भक्त भगवंताच्या प्रेमात मग्न होऊन देहावर येत नाही व देहावर मन आल्याखेरीज दुःख भासणे शक्य नाही, म्हणून दुःखनिवृत्तिरूप मोक्ष किंवा





जीवब्रह्मैक्यरूप मोक्ष 'मोक्ष रेखे आला' म्हणजे हरिभक्ताचे पायातळी येतो. हरिभक्ताचे पाय तो सोडत नाही, असा अर्थ.

भगवद्भक्तीने प्राप्त होणाऱ्या परमानंदरूप मोक्षाने दुःखनिवृत्तिरूपमोक्ष सहज साधतो असा भाव.

''मुक्ति लागती चरणीं । ब्रह्मज्ञान लोटांगणी'' हरि-भक्ताला ब्रह्मज्ञान लोटांगण घालते म्हणून मुक्तीही त्याचे पाय सोडत नाही.

***भक्ति-भाग्य***

हरिभक्तीच्या योगाने हरिभक्ताला दोन्ही प्रकारच्या मोक्ष सिद्धी इतक्या प्राप्त होतात की, ते त्यांचा लाभ दुसऱ्यासही तसाच करून देऊ शकतात. 'जे पुरुषार्थ सिद्धि चौथी । घेऊनियां आपुल्या हातीं । रिगाला भक्तिपंथी । जगा देत ॥ धाडीला जेथ जाय । पाईक जैसा''

जीवब्रह्मैक्यज्ञानरूप मोक्ष हरिभक्तांच्या आज्ञेत राहतो व सेवकाप्रमाणे जेथे ते धाडतील तेथे जातो. ज्या हरिभक्तीने एवढा थोर अधिकार प्राप्त होतो ती हरिभक्ती अत्यंत कठीण साधन आहे असे नाही.ती अत्यंत सोपी आहे.हरिनास्मरण, हरिगुणश्रवणकीर्तनादी हेच तिचे लक्षण आहे. पण एवढी सुलभ भक्ती असूनही उद्धवाने भगवंताला प्रश्न केला की, "ऐसी तुझी सुलभ भक्ति । परी अवघेंचि भक्ति कां न करिती । देवो म्हणे भाग्येविण माझी भक्ति । न घडे निश्चिती उद्धवा''

देव म्हणतात- उद्धवा! माझे ठिकाणी भक्तिप्रेम लागणे याला मोठे भाग्य पाहिजे.भगवद्भक्तिसारखे दुसरे भाग्य नाही व ती भाग्यवानासच प्राप्त होते. ''अहो भाग्यमहो भाग्यं हरिनामरतात्मनाम् । त्रिदशैरपि ते पूज्याः किमन्यैर्बहुभाषितैः।'' (श्रीनारद पुराण ४१-११२) हरिभक्त ''थोरपणा परा सांडिजे'' आपल्याकडे मोठेपण कधीच घेत नाहीत.''मीपणाविण अवघा देवो'' भगवंताचे प्रेम करण्याकरिता एक मीपण आपल्या ठिकाणी ठेवून, त्याच्याशिवाय अवघा श्रीहरीच आहे या स्वानुभवाने ते आपल्याहून जे दुसरे असतील त्यांकडे थोरपण देतात.

''आघवी व्युत्पत्ति विसरिजे''जीवब्रह्मैक्यरूप व्युत्पत्तीसह सर्व शास्त्रव्युत्पत्ती हरीच्या नामप्रेमापुढे तुच्छ समजतात व मनावर येऊ देत नाहीत. अशा रीतीने थोरपणाचा व व्युत्पत्तीचा सर्वस्वी अहंकार सोडून ते ''मग जगा धाकटे होईजे'' सर्व भूतांना श्रीहरिस्वरूप समजून अत्यंत नम्र होतात व म्हणूनच ''तै जवळिक माझी'' ते अखंड निर्विकल्प श्रीहरीशी एकरूप होतात.

''अखंड अगर्वता होऊनि असती । तयांची विनय हेचि संपत्ति ॥ नमितां

मानापमान गळाले । म्हणोनि अवचिता ते मीचि जाहले । ऐसे निरंतर मिसळले। उपासिती ॥ अर्जुना ही गुरवी भक्ति'' (ज्ञा.अ.९-२२५-२७)

अशा हरिभक्ताचे भाग्य वर्णन करिताना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''अखंड अगर्वता होऊनि असती। तयांची विनय हेचि संपत्ती'' असे हे हरिभक्त अत्यंत अभिमानरहित होतात. हरिभक्तीशिवाय समूळ व सर्वस्वी अहंकार नष्ट होत नाही व अहंकारशून्य झाल्याशिवाय श्रीहरीशी निर्विकल्प ऐक्यहि होत नाही. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी 'हे विश्वचि माझे घर । ऐसी मति जयाची स्थिर। किंबहुना चराचर । आपण जाहला'' या ओवीत ज्ञान्याचा उपन्यास करून ''याहीवरी पार्था। माझे भजनी आस्था । तयातें मी माथां । मुकुट करी'' या ओवीत ज्ञान्यापेक्षा हरिभक्ताच्या भाग्याचा मोठा गौरव केला आहे. ''ऐसे मीच होऊनि पांडवा । करिती माझी सेवा ॥ मग वाढतेनि प्रेमे । मातें भजती ते महात्मे । परी दुजेपण मनोधर्मे। शिवतलें नाहीं'' ज्या हरिभक्ताच्या भगवत्प्रेमाचे स्वतः श्रीहरीच कौतुक व गौरव करितो त्या भक्तीची प्राप्ती होणे यासारखे भाग्य दुसरे कोणते असू शकते? भक्तिप्रेमाने हरिभक्ताला प्राप्त होत असलेले हे निरवधी निरभिमानरूप लघुत्व ''लघुत्वाचेनि मुद्दलें। बैसला गुरुत्वाचे सेले'' हेच त्यांच्या अत्यंत श्रेष्ठपणाला कारण होते. म्हणूनच त्यांना भाग्यवान् म्हणावयाचे. हरिभक्त हा अत्यंत श्रेष्ठ अशा भक्तिभाग्याने संपन्न होऊन अत्यंत निरभिमान व विनीत असतो. अशा हरिभक्तालाच साधूचा मुद्रांकित म्हणता येते.

**ज्ञानेदवा गोडी संगति सज्जनीं ।**

**हरि दिसे जनीं वनीं आत्मतत्वी ॥४॥**

**आणिक सायास सोडोनि सकळ ।**
**होई ध्यानशीळ श्रीगुरूचा ॥**
**आळंदीच्या वाटे घाली लोटांगण ।**
**देई आलिंगन सिंहासना ॥**
**ज्ञानेश्वरनामे भरी श्वासोच्छ्वास ।**
**प्यावा ब्रह्मरस ब्रह्मत्वेचि ॥**
॥ श्रीगुलाबरावमहाराज अभंग १२५ ॥



जीव एवढ्या थोर भक्तिभाग्याने संपन्न होतो तो संताच्या संगतीमुळे ''अयं हि परमो लाभो नृणां साधुसमागमः'' (भागवत १२-१०-७) तसेच एवढे थोर संताच्या संगतीचे माहात्म्य आहे म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मला नित्य संतसंगतीची गोडी वाटते. या संतसंगतीचे फळ प्रत्यक्ष माझ्या अनुभवाला आले. जनी म्हणजे जंगम सृष्टी, वनी म्हणजे स्थावर सृष्टी व आत्मतत्वी म्हणजे माझ्या हृदयातही सगुण साकार श्रीहरीवाचून मला दुसरे काही दिसतच नाही. हाच भक्तीचा अनुभव असून यालाच चिद्घनानंद दृष्टी, परमसिद्धी म्हणतात.

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥ श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ ॥

---

## पाठक्रम : ७ — अर्थक्रम : ७

---

**पर्वता प्रमाणें पातक करणे । वज्रलेप होणें अभक्तांसी ॥१॥**

**नाही ज्यासी भक्ति ते पतित अभक्त । हरीसी न भजत दैवहत ॥२॥**

**अनंत वाचाळ बरळती बरळ । त्या कैचा दयाळ न पवे हरी ॥३॥**

**ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान । सर्वांघटीं पूर्ण एक नांदे ॥४॥**

*

प्रतिज्ञा - नाममहिमा व इतर शब्दवादाचा निषेध.

*

सरळ अर्थ - अभक्ताकडून पर्वतप्राय पापे घडतात आणि ती वज्रलेपही होतात. ज्यांना श्रीहरीची भक्ती नाही ते पतित होत व त्यांनाच अभक्त म्हटले जाते. असे श्रीहरीची नामस्मरणादी भक्ती न करणारे पुरुष खरोखर दुर्दैवी समजावेत. जे श्रीहरीच्या भक्तीवाचून नुसत्या वेदान्ताची बडबड करितात अशा वाचाळांना, परमेश्वर दयाळू असला तरी कधी प्राप्त होत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, आत्मा हा स्वयंप्रमाणस्वरूप आहे व हा माझे सर्वस्व धन आहे. तो माझ्या हृदयात व सर्वांच्या हृदयात पूर्णत्वाने व एकत्वाने वास करितो.

**पर्वताप्रमाणें पातक करणें ।**

**वज्रलेप होणें अभक्तांसी ॥१॥**

(४०)

### *नाममहिमा व अभक्ताचा निषेध*

विवरण :- वेदान्तात जीवदशा अनादि म्हणजे जिचा आरंभ मानता येत नाही, अशी मानिली आहे. ही जीवदशा सच्चिदानंद परब्रह्माचे ठिकाणी जीवाने कल्पिली आहे.जीव मूळात, ज्याप्रमाणे पाण्यावर उठणारी लहरी पाणीच असते त्याप्रमाणे ब्रह्मस्वरूपच आहे. पण तो तसे आपल्याला समजत नाही.परब्रह्माहून आपले निराळे अस्तित्व व परब्रह्माहून आपले धर्मही निराळे मानतो.हा पांचभौतिक देह म्हणजे 'मी' हीच त्याची समजूत.या समजुतीनेच ''बळे देह मी म्हणतां । कोटी ब्रह्महत्या माथां'' आधीच कोट्यावधी ब्रह्महत्येचे पातक त्याच्या माथी बसलेले आहे. पुनः या अनादि काळात त्याचे किती तरी जन्म झाले असून त्या अनंत जन्मात किती तरी पर्वतप्राय पापाचे ढीग त्याने करून ठेवलेले आहेत. कारण -

विषयसुखाच्या कामनेने मनुष्याची स्वभावतः शास्त्र सोडून वागण्याची पापरूप प्रवृत्ती असते व इहलोकातील वा परलोकांतील विषयसुख भोगण्याकरिता जे काही पुण्याचरण होते तेही भगवत्प्राप्तीला अंतरायभूतच असते. म्हणून शंकराचार्यांनी 'धर्मोऽपीह मुमुक्षूणां पापमेवोच्यते' धर्माला पापच म्हटले आहे व श्रीज्ञानेश्वर महाराजांचेही मत तसेच आहे.

''स्वर्गा पुण्यात्मके पापें येइजे । पापात्मकें पापें नरका जाइजे । मग माते जेणें पाविजे । ते शुद्ध पुण्य ॥३१६॥ आणि मजचिमाजी असतां । जेणें मी दूर होय पांडुसुता । तें पुण्य ऐसे म्हणतां । जीभ न तुटें कांहीं॥३१७॥''(ज्ञा.अ.९)

जो परमेश्वराची नामस्मरणादिरूप भक्ती करीत नाही अशा अभक्त पुरुषाची या पापपुण्यरूप दोन्ही प्रकारच्या पापामुळे, संसारातून कधीही सुटका होत नाही. पापामुळे नरक व पुण्यामुळे स्वर्गादिलोक असा निरनिराळ्या लोकांत दुःख व सुखभोग घेत तो सारखा फिरत राहतो.अनंत जन्माचे पाप नाहीसे करणारे दुसरे प्रायश्चितच नाही व पुण्य नाहीसे करणारे दुसरे असे कर्मही नाही.भगवन्नामस्मरणाने मात्र पुरुष, पद्मपत्र जसे जळाचा स्पर्श होऊ देत नाही, त्याप्रमाणे दोन्ही पापपुण्यापासून अलग राहतो. ''बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृत-दुष्कृते'' एक परमात्माच आहे दुसरे काही नाही असा ज्याच्या बुद्धीने निश्चय केला व जी बुद्धी परमेश्वरप्राप्तीकरता विषयसुखाची वासना सोडून देऊन परमेश्वरप्रीत्यर्थच सर्व कर्माचा समारंभ करू लागली आणि श्रीहरीच्या नामस्मरणात व ध्यानात गढली, ती बुद्धी पापपुण्यरहित होते.

सारांश, भक्त पापपुण्यरहित असतात आणि अभक्तांना मात्र ती पापपुण्ये



वज्रलेप होतात म्हणजे ती भोग दिल्यावाचून सुटत नाहीत. या पापपुण्यरूप कर्मामुळेच अनेक प्रकारचे हीन किंवा उच्च असे जन्म घ्यावे लागतात.

ज्या पापकर्माने नरकाची प्राप्ती होते त्या नानाप्रकारच्या पापकर्मांचे क्षालन करणारी कर्मरूप प्रायश्चित्ते शास्त्रातून सांगितली असली तरी तितकी प्रायश्चित्तकर्मे करता येणे शक्य नाही.एकाच जन्मात झालेली पातके आपल्या लक्षात नसतात तर अनंत जन्मांतील पातकांची काय आठवण असणार? आणि पापच लक्षात नाही तर त्याचे प्रायश्चित तरी कसे घेता येईल? त्यातही कर्मकांडाचा असा नियम आहे की, प्रत्येक कर्माचे शेवटी कर्मपूर्तीकरिता हरिनामस्मरण केले पाहिजे.

''यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपोयज्ञक्रियादिषु ।
न्यूनं सम्पूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम् ॥'' (स्कंदपुराण)

म्हणजे हरिनामस्मरणावाचून प्रायश्चित्तरूप कर्म देखील जर पापनाशक होऊ शकत नाही तर हरिनामस्मरण हेच मुख्य निर्विवाद प्रायश्चित्त झाले.'

'नामावर विश्वास नसणाऱ्याकरिता कर्मरूप प्रायाश्चित्ते, शास्त्रातून सांगितली आहेत'' असे भागवतादी पुराणे म्हणतात. कर्मरूप प्रायश्चित्त करून एखादे पाप नाहीसे केले तरी, हत्तीला धुतले तरी तो जसा पुनः अंगावर सोंडेने माती घेतो त्याप्रमाणे पापप्रवृत्ती तशीच राहते. त्यामुळे पुनः पुनः पापे घडतात ती नाहीशी नामस्मरणाने होतात.

सारांश, नामस्मरणादी भक्तिमार्ग, जसा पापपुण्यरहित निष्पाप करून सोडतो तसा निष्पाप करणारा दुसरा मार्ग नाही. म्हणून नामस्मरणादी भक्तिमार्गाला तुच्छ लेखून केवळ कर्ममार्गाचा भरंवसा बाळगणारे जे अभक्त आहेत त्यांचे पापपर्वत वाढतच जातात व वज्रलेप होतात.

**नाही ज्यांसी भक्ति ते पतित अभक्त ।**

**हरीसी न भजत दैवहत ॥२॥**

### *अभक्ताचे लक्षण*

या अभंगात श्रीज्ञानेश्वरमहाराज वर उल्लेखिलेल्या अभक्ताचे लक्षण सांगतात.''ज्यांची सगुण भगवंताचे ठिकाणी आवडी नाही व ज्यांचा हरिनामावर विश्वास नाही म्हणून जे भगवन्नामस्मरणादी भक्ती करीत नाहीत असे जे दुर्दैवी त्यांना अभक्त म्हणावे.'' हे अभक्त सर्वथा पतित होत.अभक्त हा जातितः ब्राह्मण असला तरी तो भक्त अशा चांडाळापेक्षाही नीच होतो असे भगवद्भक्त प्रल्हादाचे भागवतात वचन

आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''निंब निंबोळिया मोडोनि आला । तरी तो कावळियांसी सुकाळ झाला । तैसा मद्भक्तीविण वाढिन्नला । दोषांचि लागीं'' (ज्ञा. ९-४३८) ज्याप्रमाणे निंबाचे झाड निंबोळ्यांनी मोडेल एवढ्या निंबोळ्या त्याला आल्या तरी ते कावळ्यांच्याच उपयोगाचे असते, त्याप्रमाणे अभक्त हा पतित म्हणजे पापमयच असतो. तैसी पुण्ये डावलूनि गेली । अभक्तांते ॥ तैसे भक्तिहीनाचें जिणे । जो स्वप्नीही सुकृत नेणें । तेणें संसार दुःखासी भाणे । ओगरिलें ॥ या अभक्ताकडून परमेश्वरप्राप्तिकारक असे पुण्य स्वप्नातही घडत नाही. म्हणून त्याच्यासमोर दुःखरूप संसाराचे ताट वाढलेले असते. ज्या भगवंताचे नामस्मरणाने साक्षात् पूर्णब्रह्म श्रीहरीची प्राप्ती होऊन या दुःखरूप संसारातून कायमची सुटका होते व जे मुखाने उच्चारले की पुरे, इतके सोपे आहे त्या नामस्मरणावर विश्वास न ठेवणारे व नामस्मरण न करणारे पुरुष अत्यंत दुर्भागी समजले पाहिजेत.

''बहुता सुकृताची जोडी । म्हणुनि विठ्ठली आवडी'' भगवंताचे प्रेम व भगवन्नामोच्चार करण्याची इच्छा उत्पन्न होण्यास पदरी पुण्याचा जबरदस्त साठा असायला पाहिजे. अर्थात् ज्यांना भगवन्नामस्मरण करावेसे वाटत नाही ते अत्यंत पापपुरुष असले पाहिजेत यात शंकाच नाही. कारण त्या पापामुळेच नामस्मरण करावेसे वाटत नाही.

**अनंत वाचाळ बरळती बरळ ।**

**त्या कैचा दयाळ न पवे हरि ॥३॥**

***अभक्त ज्ञान्याचा निषेध***

भगवान् श्रीहरि अत्यंत दयाळु आहे. तो सदा भक्ताची वाट पाहत असतो. पण प्रेमाच्या जिव्हाळ्यावाचून, 'मी ब्रह्म आहे' अशी कितीही बडबड केली तरी ते सर्व झोपेतले बरळणेच होय. तशा बडबडण्याने सगुण किंवा निर्गुण या कोणत्याही स्वरूपाची प्राप्ती होत नाही. ती नुसती शाब्दिक बडबडच होते.

''श्रेयः स्तुति भक्तिमुदस्य ते विभो क्लिश्यन्ति ये केवलबोधलब्धये ।

तेषामसौ क्लेशल एव शिष्यते नान्यद्यथा स्थूलतुषावघातिनाम् ॥ (भा. १०-१४)

भागवतकार भगवान् व्यास म्हणतात- भक्तीवाचून आत्मज्ञानाची खटपट करणाऱ्याला भुसा कांडणाऱ्याप्रमाणे क्लेशावाचून काहीच प्राप्ती होत नाही. ''सत्वं न चेद्धातरिदं निजं भवेत्'' या श्लोकात भगवान् व्यास म्हणतात की, सगुणावाचून





ज्ञान शाब्दिकच राहते. मोरोपंत म्हणतात -

''हरिहर भक्ती अनादर करिती धरिती मनात पंचदशी ।

त्यांच्या ज्ञानाग्नीने न जळे एकही पटप्रपंचदशी ॥''

''विशुद्धज्ञानमुत्पन्नं यस्य तस्य महात्मनः।

शिवलिंगस्य पूजायां शिवस्थानेषु सुव्रताः।

प्रियबुद्धिः प्रजायेत स्वभावादेव सर्वदा ॥''

ज्यांना शुद्ध आत्मज्ञान झाले अशा ज्ञानी पुरुषांना भगवंताच्या सगुण मूर्तीविषयी सर्वदा स्वाभाविकच प्रेम असते. ज्या ज्ञान्याला भगवंताच्या सगुण विग्रहाविषयी प्रेम नसेल तो ज्ञानीच नव्हे. तो ज्ञानाची वायफळ बडबड करणारा समजावा असे स्कंदपुराणांतर्गत सूतसंहितेत म्हटले आहे. भक्तीवाचून ज्ञान्याचे ठिकाणी नुसती 'मी ब्रह्म' म्हणून ज्ञानाहंताच राहते.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.''तैसा चित्ती अहंते ठावो । आणि जिभे सकळ शास्त्रांचा सरावो । ऐसेनि कोडी एक जन्म जावो । परी न पविजे माते''(ज्ञा.१५-३९६) जोपर्यंत अहंता आहे तोपर्यंत, कितीही शास्त्रव्युत्पत्तिरूप ज्ञान असले तरी मनुष्य मुक्त होऊ शकत नाही. ज्ञानाने मुक्ती होते असे जे सांगितले आहे ते ''ज्ञाने मोक्षु घडे । तें निमालेनि'' ज्ञानाहंकाररहित अशा ज्ञानाविषयी सांगितले आहे. पण हा ज्ञानाहंकार भक्तीवाचून नष्ट होत नाही; म्हणून भक्तीवाचून खरा परमानंदरूप मोक्ष प्राप्त होत नाही असा सर्व संताचा दृढ सिद्धांत आहे.

***शाब्दिक बडबडच***

नाथ म्हणतात -''निर्विकल्प स्वरूपप्राप्ति । अवश्य पावणें आहे चित्तीं । तैं करावी भगवद्भक्ति । उत्कट प्रीति अविश्रम ॥'' निर्विकल्प स्वरूपप्राप्ती भक्तिवाचून होतच नाही, आणि निर्विकल्प स्वरूप प्राप्तीवाचून ज्ञान म्हणजे नुसती शाब्दिक बडबडच होय. अर्थात् भक्तिवाचून ज्ञानी म्हणजे नुसती अद्वैताची बडबड करणारा होय व त्याला श्रीहरीची प्राप्ती होत नाही. अध्यात्मशास्त्र हे अनुभवाचे शास्त्र आहे.

ज्यांची अध्यात्मशास्त्राचे अध्ययन करण्याची मजल अनुभवापर्यंत गेली नाही असे शब्दज्ञानी भगवंताच्या सगुण निर्गुण रूपाविषयी कनिष्ठ व श्रेष्ठत्वाचा वाद घालतात.

त्यांचा तो वादही निरर्थक, अप्रमाण बडबडच होय. तुकाराममहाराजांनी यांना ''आणिक नका पडूं गबाळाचे भरी'' गबाळ ठरविले आहे. अनंत जन्मांची संसारासक्ती ज्याप्रमाणे आत्मज्ञानाने नाहीशी होते, मग संसाराचे प्रेम ज्ञानी

पुरुषाला कधीच वाटत नाही त्याप्रमाणे परमेश्वराचे रामकृष्णादी सगुण विग्रह खोटे आहेत असे जर ज्ञान होईल, तर भगवंतावर प्रेम बसून प्रेमभक्ती घडणे शक्य नाही. संसार खोटा वाटल्यावर त्याचे प्रेम राहत नाही. श्रीरामकृष्णाचे सगुण साकार विग्रह मिथ्या आहेत असे वाटल्यास ज्ञानापूर्वी देखील मुमुक्षू श्रीरामकृष्णाची भक्ती करणार नाही व ज्ञानानंतर तर सुतराम भक्ती घडणे शक्य नाही. पण ज्ञानसंपन्न झालेले तुकाराममहाराजादी संतांनी ज्ञानानंतरही श्रीरामकृष्णांची भक्तीच केली आहे. आणि नाथ तर ''श्रीकृष्णदेहो सच्चिदानंदघन। म्हणूनि श्रीकृष्णभजन । नारदा पढिये'' असे स्पष्ट म्हणतात. तेव्हा सगुण भगवद्विग्रहाला मिथ्या ठरवून त्याची भक्ती न करणाऱ्या ज्ञान्याचा अनुभव, नाथ तुकारामादी संतांच्या अनुभवाच्या दृष्टीने केवळ शुष्क वाचाळपणा ठरतो व अशा ज्ञान्यांना सगुण साक्षात्कार तर होत नाहीच पण निर्गुण साक्षात्कारही होत नाही. म्हणून हे नुसती वेदांताची बडबड करणारेच असतात.

त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात - ''कर्मकांड तरी जाणे। मुखोद्‌गत पुराणें । ज्योतिषीं तो म्हणे । तेंसेंचि होय ॥८२८॥ शिल्पीं अति निपुण। सूपकर्मीहि प्रवीण । विधि आथर्वण । हाती आथी ॥ ॥८२९॥ नीतिजात सुझे । वैद्यकही बुझे । काव्य नाटकीं दुजे । चतुर नाही ॥८३१॥ पैं व्याकरणीं चोखडा । तर्की अतिगाढा । परी एक आत्मज्ञानीं फुडा । जात्यंध जो ॥८३३॥ तैसें शास्त्रजात जाण । आघवेंचि अप्रमाण । पार्था अध्यात्म ज्ञानेविण । एकलेनि॥८३८॥ (ज्ञा.अ.१३)

सगुण श्रीहरीच्या स्वरूपाची खरी ओळख देणाऱ्या अध्यात्मशास्त्रात ज्याचा प्रवेश नाही अशा शब्दज्ञान्याला भगवान् कसा प्राप्त होऊ शकेल? अनुभवाचा मार्ग न चोखाळता शब्दाचा वाद करीत राहिल्याने कधीही भगवत्प्राप्ती होत नाही.

**ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान ।**

**सर्वाघटीं पूर्ण एक नांदे ॥४॥**

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, हा म्हणजे सगुण षड्‌गुणैश्वर्यसंपन्न परमात्मा आत्माच आहे म्हणजे शुद्ध उपाधिरहित आहे. आपला आत्माच आपल्या प्रेमाकरता सगुण साकार होतो. सगुण साकार झाला म्हणून काही त्याचे ''निर्गुणत्व म्हणजे मायागुणरहितत्व व निराकारत्व म्हणजे कोणत्याही एका नामरूपाने मर्यादित न

**(४२)**



होणे'', हे नष्ट होत नाहीत.

शंकराचार्यांनी सूत्रभाष्यात - ''अस्ति तावत् ब्रह्म नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावं, सर्वज्ञं सर्वशक्तिसमन्वितम्'' ब्रह्म अविनाशी, अविद्यादी दोषरहित, जडधर्मरहित, चैतन्यस्वरूप, तिन्ही काळी बंधरहित, असे स्वभावतः असून ते सर्वज्ञ व सर्व शक्तिमान् आहे; असे ब्रह्माचे लक्षण केले आहे व ''आत्मा च ब्रह्म'' असे म्हणून आत्मा व ब्रह्म याचे ऐक्य त्यांनी दाखविले आहे. यावरील आत्म्याच्या लक्षणात ''नित्यशुद्धबुद्धमुक्त'' या पदाने आत्म्याची निर्गुणता सांगून ''सर्वज्ञं सर्वशक्तिसमन्वितम्'' या पदाने आत्म्याचे सगुणत्व दाखविले आहे. शक्तिरहित आत्म्याचा बोध हा निर्गुण बोध असून सर्वशक्तिसहित आत्म्याचा बोध हा सगुणबोध होय. सगुण निर्गुण असे दोन निराळे आत्मे नाहीत. म्हणजे जो निर्गुण असतो तोच सगुण होतो.

''सगुण उच्छेदावें । आणि निर्गुण प्रतिपादावें ।
परी ते निर्गुणचि स्वभावें । सगुण होते ॥
रघुनाथचरित्र समास १६.

असे समर्थ म्हणतात. असा निर्गुण परमात्मा अवतारकाली सगुण झाला असता, अवतारकाली देखील पूर्ण निर्गुण राहूनच सगुण होतो असे शंकराचार्यांनीच गीताभाष्यात म्हटले आहे.

शंकराचार्य म्हणतात - ''या वासुदेवेऽनीश्वरासर्वज्ञाशंका मूर्खाणां तां परिहरन् श्रीभगवानुवाच । तान्यहं वेद न त्वं वेत्थ । धर्माधर्मादि-प्रतिबद्धज्ञानशक्तित्वात् । अहं पुनः नित्य- शुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभावत्वाद् अनावरणज्ञानशक्तिरिति''

अर्जुनाने भगवंताला विचारले की, 'भगवंता! तुझा जन्म तर सांप्रत झाला. पुष्कळ दिवसांपूर्वी होऊन गेलेल्या विवस्वानाला तूं उपदेश केला म्हणतोस हे कसे शक्य आहे?'

भगवान म्हणतात, 'अर्जुना! अशी शंका मूर्खांना येते खरी. तुम्हा जीवांची ज्ञानक्रियाशक्ति धर्माधर्मामुळेप्रतिबद्ध असते म्हणून तुम्ही जीव मागील विसरता. माझ्या ठिकाणी आत्मविस्मृतिरूप अविद्या मुळीच नाही म्हणून मला धर्माधर्मही नाहीत व माझी ज्ञानक्रियाशक्ती नित्य अमर्याद असते. मी नित्यच, अविनाशी, अविद्यारहित, चैतन्यस्वरूप असतो. अवतारकाळीही माझे हे धर्म नाहीसे होत नाहीत किंवा लोपले जात नाहीत.' या पंक्तीत आचार्यांनी सगुणाचे व निर्गुणाचे सहलक्षण केले आहे हे लक्षात घेण्याजोगे आहे. त्याचा अर्थ असा होतो की, नित्य शुद्ध बुद्ध

मुक्त दशेतच ब्रह्म सर्वज्ञ सर्वशक्तिमान् राहू शकते, अन्यथा नाही व सर्वज्ञ सर्वशक्तिमान् जे असते ते नित्य शुद्ध बुद्ध मुक्त असलेच पाहिजे. याप्रमाणे सगुण श्रीहरि मायागुणरहितच असतो व ज्ञानैश्वर्यादी अपरिमित षड्गुणैश्वर्यामुळे सगुण होतो, आणि मायागुणरहित असल्यामुळे आपल्या भक्ताला मायारहित करून आपल्या ऐश्वर्याने परमानंद प्राप्त करून देतो. म्हणून भक्तांना सगुण श्रीहरि हा निधान वाटतो. म्हणजे आपले सर्वस्व व अमोल ठेवा असे अत्यंत दुर्लभ धन वाटते.

तो स्वतः सगुणरूपानेही अविनाशी असल्यामुळे व बाकीचे सर्व कल्पनामात्र असल्यामुळे, श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, आम्हाला त्याच्यावाचून काहीच प्रमाण वाटत नाही. तोच एक खरा व प्रमाण आहे. बाकीची प्रत्यक्षादी प्रमाणे व त्या प्रमाणाने कळणाऱ्या जगद्वस्तु, स्वयंप्रमाणस्वरूप अशा सगुण श्रीहरीने प्रकाशित होतात. त्याच्या सत्तेने त्या सत्तावान् आहेत. असा हा सगुण श्रीहरि एकदेशी किंवा अव्यापक असा दिसत असला तरी अज्ञान्यांनाच तो एकदेशी किंवा अव्यापक वाटतो. ज्ञानी पुरुषांना तर तो सर्वत्र अणुरेणूपासून भरलेला अनुभवाला येतो. भगवंताची सगुण व निर्गुण दोन्ही रूपे व्यापक आहेत. पण प्रेमवृत्तीमुळे सगुण एकदेशी होते. ज्याप्रमाणे कोणताही विरळ पदार्थ स्नेहाकर्षक गुणाने घट्ट मर्यादित होतो, त्याप्रमाणे विरळ सच्चिदानंद निर्गुण परमात्मा प्रेमामुळे सच्चिदानंदघन बनतो, हाच सगुण श्रीहरि होय. हा सर्वसुखाचे आगर असून पूर्णब्रह्म आहे.

**करिता हरीचे ध्यान ।**
**चित्ती प्रगटे सगुण ॥**
**ध्येय सगुण जे झाले ।**
**ध्यात्या निर्गुणत्व आले ॥**
**ऐसा अनुभव सार ।**
**संत तेचि निराकार ॥**
*॥ श्रीगुलाबरावमहाराज अभंग ५८२ ॥*

(४३)



सारांश, सगुण श्रीहरि, अविद्याकर्म या दोषाने सगुण देहधारी होत नाही. म्हणून तो व त्याचा देह यांचा जीव व जीवदेह यांच्याप्रमाणे भेद नसून दोन्ही पूर्ण सच्चिदानंदघन आहेत. येथील ''आत्मा हा'' या पदाने सगुण निर्गुणाचे ऐक्य दाखविले आहे.'सर्वाघटी' या पदाने सगुणाचेही व्यापकत्व सांगितले.'पूर्ण' या पदाने त्याच्या निरतिशय ऐश्वर्याचा बोध करून दिला. 'निधान' या शब्दाने परमात्म्याच्या अनंत कल्याण गुणांचा निर्देश केला आहे.''नांदे'' या शब्दाने अंतर्बाह्य सर्वत्र एका श्रीहरीची लीला किंवा क्रीडा आहे असे सूचित केले व 'प्रमाण' या शब्दाने श्रीहरीचे स्वयंप्रमाणत्व सिद्ध केले.

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजर्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥ श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

**पाठक्रम : ८** **अर्थक्रम : ८**

**संतांचे संगती मनोमार्गगती । आकळावा श्रीपती येणें पंथें ॥१॥**
**रामकृष्णवाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा रामजप ॥२॥**
**एकतत्त्वी नाम साधिती साधन । द्वैताचे बंधन न बाधिजे ॥३॥**
**नामामृतगोडी वैष्णवां लाधली । योगियां साधिली जीवनकळा ॥४॥**
**सत्वर उद्धार प्रल्हादीं बिंबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ॥५॥**
**ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ । सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥६॥**

*

प्रतिज्ञा - सत्संगमहिमा व नाममहिमा.

*

सरळ अर्थ - संतांचे संगतीत राहून नाथसंप्रदायातील लययोगाचे अथवा मानसिक सगुण ध्यानयोगाचे द्वारे श्रीहरीला प्राप्त करून घेतले पाहिजे. वाचेने प्रेमपूर्वक श्रीहरीच्या रामकृष्णादी नामाचा जप करणे हेच जीवाचे मूळ स्वरूप किंवा शुद्ध स्वरूप आहे आणि रामनामाचा जप हा तर शिवाचा आत्मा आहे. एकतत्त्वस्वरूप

श्रीहरीचे ठिकाणी स्फुरणाऱ्या नामाचे साधन ज्याने साधले त्याला द्वैताचे बंधन राहत नाही. श्रीहरीच्या नामामृताची अवीट गोडी सगुणोपासक वैष्णवांनाच असते. योग्यांना हा अनुभव येणे शक्य नाही. योग्यांना पुष्कळ दिवस जिवंत राहण्याची कला मात्र साधते. प्रल्हादाचे ठिकाणी बाळपणीच नारदांनी केलेला नामस्मरणाचा उपदेश दृढ श्रद्धेमुळे पूर्णपणे ठसला आणि उद्धवाला साक्षात् श्रीकृष्णभगवान् उपदेशदाते झाले. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, हरिनाम हे भगवत्प्राप्तीचे अत्यंत सुलभ व अत्यंत श्रेष्ठ असे साधन आहे व इतर साधनाने हरिप्राप्ती अत्यंत कठीण आहे, हे जाणणारा विरळा असतो.

**संताचे संगती मनोमार्गगति ।**

**आकळावा श्रीपति येणें पंथें ॥१॥**

***भगवत्प्राप्तीकरिता सत्संगतीचे महत्त्व***

विवरण - 'येणे पंथें श्रीपति आकळावा' म्हणजे प्राप्त करून घ्यावा. 'येणें पंथें' याचा उलगडा पूर्व चरणात 'संताचे संगतीं मनोमार्गगति' या पदांनी महाराजांनी केला आहे. भक्तीप्रेमावाचून सगुण श्रीहरीची प्राप्ती नाही. सगुण श्रीहरीचे ठिकाणी आत्मप्रेम बसणे याला भक्तीप्रेम म्हणतात.

''मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा ॥३८॥ महत्संगस्तु दुर्लभोऽगम्योऽमोघश्च ॥३९॥ लभ्यतेऽपि तत्कृपयैव॥४०॥ तस्मिंस्तज्जने भेदाऽभावात् ॥४१॥ तदेव साध्यताम् तदेव साध्यताम् ॥४२॥[(भक्तीसूत्रे)]

हे प्रेम श्रीनारदायार्चांनी संतांच्या कृपेनेच प्राप्त होते किंवा श्रीहरीच्या कृपेनेच प्राप्त होते असे वरील सूत्रात स्पष्ट म्हटले आहे. ''माझ्या स्वरूपीं ज्यांचें चित्त । अखंड जडलें भजनयुक्त । त्यांसीच बोलिजे मद्भक्त । तेचि संतसज्जन'' (एक. भा. स्कं. ११-२९-२५७) नाथ म्हणतात, अखंड भजनाने ज्यांचे चित्त भगवंताचे ठिकाणी जडले त्यांना संत म्हणावे.

***नंद-यशोदा : पूर्व जन्माची कथा***

श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधात अशी कथा आहे की, ब्रह्मदेवाने वसूंमध्ये श्रेष्ठ अशा द्रोण नांवाच्या वसूला आपल्या धरा नावाच्या पत्नीसह मृत्युलोकात प्रगट होण्याला सांगितले असता त्या दांपत्याने ब्रह्मदेवापाशी भगवद्भक्तीप्रेमाची याचना केली व ब्रह्मदेवाने त्यांना ''तुमचे भगवान् श्रीकृष्णाचे ठिकाणी निःसीम प्रेम राहील''





असा आशीर्वाद दिला व त्या नुसत्या आशीर्वादाने त्या वसुदांपत्याचे ठिकाणी नंद यशोदा रूपाने जन्म घेतल्यावर निःसीम प्रेम प्रगट झाले. यावरून भगवत्प्राप्तीकरिता सत्संगतीची अत्यंत आवश्यकता आहे हे सिद्ध होते.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''तो जयाकडे वास पाहे । तेऊति सुखाची सृष्टि होये । तो म्हणे तेथ राहे । महाबोध'' [(ज्ञा.५-७४)] संतांचे सामर्थ्य एवढे आहे की, त्यांची दृष्टी जेथे पडेल तेथे सुखच सुख पिकेल व ते म्हणतील तेथे ब्रह्मबोध स्थिर होईल. ''तें ज्ञान पैं गा बरवें । जरी मनीं आथि जाणावें । तरी संता या भजावें। सर्वस्वेशी'' [(ज्ञा. ४-१६५)] संतांच्या कृपेवाचून ब्रह्मबोध होणे शक्य नाही. कारण ''ते ज्ञानाचा कुरुठा'' ते ज्ञानाचे कोठार असतात. संत कृपा करून हे ब्रह्मज्ञान आपल्या स्वाधीन करतील असा थोर कळवळा आपल्याविषयी त्यांच्या पोटात उत्पन्न झाला पाहिजे व तो तसा कळवळा त्यांना उत्पन्न करण्याकरिता 'तेथ सेवा हा दारवंटा । तो स्वाधीन करी सुभटा । वोळगोनी ॥ तरी तनुमनजीवें। चरणासी लागावे । आणि अगर्वता करावे । दास्य सकळ॥[(ज्ञा. ४. १६५,६६)] त्यांच्या चरणी शरीर, मन व जीवभाव वाहून अंत्यत निष्कपट अंतःकरणाने उ्रा नीच न म्हणता त्यांची सर्व प्रकारची सेवा करावी. या अशा सेवेने त्यांना अत्यंत आपला कळवळा उत्पन्न होतो. ''मग अपेक्षित जे आपुलें । तेही सांगतील पुसिलें । जेणें अंतःकरण बोधिलें । संकल्पा नये'' [(ज्ञा.४-१६८)] मग उत्पन्न झालेल्या कळवळ्याने जेव्हा संत उपदेश करितात तेव्हा त्या उपदेशात त्यांचा शक्तिपात असल्यामुळे त्या शक्तिपाताने आपल्या अंतःकरणात दृढ ब्रह्मबोध ठसून मन निर्विकल्प बनते. मनाला मग पुन्हा विषयांचा विचार शिवत नाही.

किंबहुना श्रीगुरु सत् म्हणजे साकार विग्रह धारण केलेली साक्षात् ब्रह्मविद्याच असल्यामुळे तेच शिष्याच्या हृदयात यांच्या प्रेमामुळे ब्रह्मबोधरूपाने अखंड वास करितात. ''गुरुरित्याख्यया लोके विद्या साक्षाद् हि शांकरी'' श्रीगुरु म्हणजे शंकरापासून प्रकट झालेली साक्षात् ब्रह्मविद्याच होय असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन आहे.

मधुसूदन सरस्वती म्हणतात. ''भगवान् परमानंदस्वरूपः स्वयमेव हि । मनोगतस्तदाकारः किमन्यदवशिष्यते ॥'' भगवान् श्रीहरि पूर्ण परमानंदाची मूर्ती आहे. ती ज्याच्या अंतःकरणात साठविली गेली तो सृदिानंद ब्रह्मस्वरूप होय. समर्थ म्हणतात,

''न करिता शास्त्रव्युत्पत्तीचा श्रम । सकल शास्त्रार्थ होय सुगम ।

सत्समागमाचे वर्म। तें हें ऐसें असे ॥३८॥ जे व्युत्पत्तीने न कळे। तें सत्समागमें कळे। सकल शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ॥३९॥ (दास.दशक ७ समास १)

### *भक्तीने लययोग सहज साधतो*

या संतांचे संगतीत मनोमार्ग-गतीचा अभ्यास सहज होतो, मनोमार्ग म्हणजे मनाची विषयसुखाकडील धाव. तिची गती म्हणजे परमेश्वराचे ठिकाणी लय किंवा स्थिर होणे. ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायांतील १८ व्या श्लोकावरील टीकेत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी 'गति' शब्दाचा अर्थ दिला आहे. ते म्हणतात ''हें चराचर आघवें । जिये प्रकृती आंत सांठवे । ते शिणली जेथ विसावे । ते परम गति मी'' (ज्ञा.९।२७८) अहोरात्र विषयसुखाकरिता विषयांकडे धावणारे मन शीण पावून जेथे लय पावते किंवा स्थिर होते ते आत्मस्वरूप मनोमार्गाची गती होय. संतांचे संगतीत मनाचा लय करण्याचा अभ्यास सुकर होतो. या अभ्यासालाच लययोग म्हणतात. हा लययोग श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी गीतेच्या सहाव्या अध्यायात स्पष्ट केला आहे.

हरिपाठात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी योगादिकांचा निषेध केला असला तरी भगवन्नामसहकारी लययोगाचा त्यांनी निषेध केला नाही. भगवद्भक्तीवाचून जे योगाचा अभ्यास करितात त्यांच्या योगानुष्ठानाचा त्यांनी हरिपाठात निषेध केला आहे हे वर सांगितलेच आहे.''कां जें यया मनाचें एक निके । जें हें देखिले गोडीचिया ठाया सोकें । म्हणवुनि अनुभवसुखचि कवतुकें । दावीत जाईजें'' (ज्ञा. ६-४२०) मनाचा एक मोठा गुण आहे की, ते ज्या ठिकाणी सुखाचा अनुभव येईल तेथे स्थिर होते. मनाच्या या गुणाचा फायदा घेऊन सद्गुरूच्या सांन्निध्यात हरिनामसहकारी लययोगाने परमेश्वराच्या अनुभवसुखाचे कवतुक मनाला वारंवार दाखवीत राहिल्यास ते मन विषयसुखाकडील धाव सोडून श्रीहरीचे ठिकाणी सहज स्थिर होईल. मग -

''जें उन्मनीचें लावण्य । जें तुर्येचें तारुण्य । अनादि जें अगण्य । परम तत्त्व ॥ जें विश्वाचें मूळ । जें योगद्रुमाचे फळ । जें आनदांचे केवळ। चैतन्य गा॥ जें महाभूतांचें बीज । जें महातेजाचें तेज । एवं पार्था जें निज । स्वरूप माझें॥ तें हे चतुर्भुज कोंभेली । जयाची शोभा रूपासी आली । देखोनि नास्तिकी नोकिली। भक्तवृंदे ॥(ज्ञा६.३२०-३२४

जे उन्मनीदशेचे सौंदर्य, जे तुर्येचे रसरसित तारुण्य, अनादी, अपरिमित, जे संपूर्ण जगताचे मूळ, जे योगाचे फळ, जे आनंदाचे जीवन, जे महाभूतांचे बीज,

(४५)



जे तेजाचे तेज, असे जे परमात्मतत्त्व तेच, नास्तिकाकडून भक्तमंडळीला त्रास होऊ लागला असता, सगुण साकार षड्गुणैश्वर्यसंपन्न अत्यंत कोवळे अशा स्वरूपाने प्रगट होते, असे जे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीहरीच्या स्वरूपाविषयी उद्गार काढले आहेत ते प्रत्यक्ष त्यांच्या अनुभवाला येतात. या लययोगाने येणाऱ्या प्रत्यक्ष अनुभवाच्या बळावरच- भगवंताचे सगुणस्वरूप मायिक आहे, निर्गुणापेक्षा कनिष्ठ आहे अशा भक्तिरहित ज्ञान्यांकडून ज्या वल्गना केल्या जातात त्या सर्व मिथ्या व अनुभवशून्य आहेत असे भगवद्भक्त ठासून सांगत असतात. श्रीरामकृष्णाचे सगुणसाकार स्वरूप म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, अनिर्वाच्य सुख होय. या अनिर्वाच्य सुखस्वरूप रामकृष्णादिकांचे ठिकाणी ज्या पुरुषांचे चित्त स्थिर झाले ते स्वतः तसेच ''परब्रह्माचेनि रसें। देहाकृतीचियेनि मुसें । वोतीव जाहले तैसे । दिसती अंगे ''(ज्ञा.६-२७) देहासह अनिर्वाच्य सुखरूप होतात. लययोगाची प्रतीती ''जरी हे प्रतीती अंतरी फाके'' आंगी बाणली की ''तरी विश्वचि हे अवघे झाके'' जडविनाशी जगाचा भास लोपून सर्व एक ब्रह्मप्रत्ययच होतो. कारण ''जेथ हे संसार चित्र उमटें । तो मनोरूप पटचि फाटे'' जड विनाशी जगाची कल्पना करणारे मनच शिल्लक राहत नाही,

''विषयी विसर पडला निःशेष । अंगी ब्रह्मरस ठसावला'' असा श्रीतुकाराममहाराजही आपला अनुभव सांगतात.

भगवंताची सगुण निर्गुण दोन्ही स्वरूपे निरुपाधिक आहेत. तशीच आपलीही सगुण निर्गुण रूपे पूर्ण निरुपाधिक आहेत. हे ज्ञानभक्तीच्या साह्याने म्हणजे ब्रह्मज्ञानाने जीव ब्रह्माचे ऐक्य जाणून घेऊन भक्तिसहकारी लययोगाने किंवा घेरंडाचार्यांनी सांगितलेल्या सगुण ध्यानयोगाने ज्यांनी आपल्या अंतःकरणात अनिर्वचनीय प्रेमरूपी सगुणसाकार ब्रह्मरस ठसविला व सदेह पूर्ण ब्रह्मरूप झाले, त्यांनी श्रीहरि आकळिला यांत संदेह नाही.

नामस्मरणाचा अखंड पाठ करणाऱ्याला लययोगाचा अभ्यास कशाला पाहिजे? अशी येथे शंका येईल. तिचे समाधान असे आहे की, नामधारकाला लययोगाचा स्वतंत्र अभ्यास करावयास येथे श्रीज्ञानेश्वर महाराज सांगत नाहीत, तर संतांचे संगतीत नामस्मरण हरिगुणकीर्तन, श्रवण व संतांची कृपा या त्रयीच्या योगाने भक्तिप्रेम प्राप्त झाले म्हणजे स्वतंत्र अभ्यास न करताच अनायासे लययोग साधतो. ज्याप्रमाणे पायी किंवा बैलगाडीत गेलेल्या माणसाला प्रवासाचे श्रम होऊन प्रवासाची दगदग होते, पण पंजाब मेल किंवा डेक्कन क्वीन सारख्या सुखकर

वाहनातून प्रवास करणाऱ्याला प्रवास काहीच जाणवत नाही, त्याप्रमाणे श्रीहरिप्रेमाने ओथंबलेल्या पुरुषाला योगमार्गाच्या अभ्यासाची जाणीव न होताच त्याचे चित्त योगभूमिकेवरून सहजासहजी (पुढे) जात राहते.किंबहुना नामस्मरणादी भक्ती करणारा पुरुष, सर्व प्रयासाच्या भूमिका ओलांडून एकदम वरच्या भूमिकेवर जातो; असे योगभाष्यकार आपल्या ''ईश्वरप्रसादात् जितोत्तरभूमिकस्य नाधरभूमिषु विनियोगो युक्तः'' या भाष्यपंक्तीत स्पष्ट सांगतात.भक्तिप्रेमाचे शिक्षण संतसंगतीत मिळते व त्याच्या योगाने मनाचा लय करणारा योगही सहज साधतो असा भाव.

संतांच्या संगतीत राहणाऱ्याला हरिनाम, हरिनामाचे प्रेम व भगवत्कथा आवडू लागतात; कारण, संतांच्या घरी रात्रंदिवस याच गोष्टींचा सुकाळ राहतो.

''तेचि संत तेचि संत। ज्यांचा हेत विठ्ठलीं ॥१॥ नेणती कांहीं टाणेंटोणे। नामस्मरणावांचूनि ॥२॥ काया वाचा आणि मनें। धाले चिंतनें डुल्लती ॥३॥ निळा म्हणे विरक्त देहीं। आठवचीं नाही विषयांचा ॥४॥

संतांचे वागणे नेहमी सगुण भक्तिप्रेमानेच पूर्ण भरलेले असल्यामुळें त्यांच्या सत्संगतीत भक्तिप्रेमाचे शिक्षण अनायासे मिळते. वरकांती नामधारक झाला तरी हरिनामाच्या ठिकाणी खरे निःसीम जिव्हाळ्याचे प्रेम जोपर्यंत उत्पन्न होत नाही तोपर्यंत तो परमेश्वराला आकळू शकत नाही. एकीकडे भगवन्नामाचा उच्चार मुखाने चालू आहे तर दुसरीकडे मनात अनेक विचारांची धावपळ चालू आहे. अशा नामस्मरणात नामरूपाशी संबंध नसल्यामुळे ते नामस्मरण म्हणजे नुसता वाचेचा गोंधळ होय, असे श्रीनाथमहाराज स्पष्ट सांगतात. अशा नामस्मरणाने भगवत्साक्षात्कार होणे शक्य नाही. नामस्मरणाच्या ठिकाणी मन स्थिर होण्याकरिता त्याचे निरलस प्रेम लागले पाहिजे. नुसत्या हरिनामाच्या उच्चाराबरोबर परमानंद वाटू लागला म्हणजे हरिनामाचे खरे खरे स्वाभाविक प्रेम लागले असे निश्चित समजावे.ह्या अवीट प्रेमामुळेच हरिनामस्मरण अखंड होते. ह्या नामस्मरणाच्या अनुभवसिद्ध वाटा संतांच्या संगतीतच कळतात. इतरत्र कोठेही कळणे शक्य नाही. ''संतसंगतीं घडे । ब्रह्मसायुज्यता जोडे ॥१॥ मुक्ति लागती चरणी । ब्रह्मज्ञान लोटांगणी'' (श्रीनाथमहाराज)

सगुण भगवंताविषयीचा आपला अनुभव सांगताना भक्तिरसायनात मधुसूदनसरस्वती म्हणतात.

''भगवान् परमानंदस्वरूपः स्वयमेवहि ।
मनोगतस्तदाकारः किमन्यदवशिष्यते''



अनुभवानंदस्वरूप सगुण श्रीहरि एकदा अंतःकरणात साठविल्यावर मग काय करायचे राहते? माझ्या सद्गुरु आईने आमच्याकरिता भक्तिपदतीर्थामृतात हे आधीच सांगून ठेवले आहे -

''आणि वास्तवपणें पाहतां । प्रभूसीं सत्यचि साकारता । लययोगें या शुद्धार्था । जाणती संत ॥ मग परमाणूंचा पुंज । कां लययोगी रूपकंज । तो हा तत्पदलक्ष्यांश निकुंज । श्रीकृष्ण स्वरूपें ॥''

पण येथपर्यंत जी अनुभवानंद स्थिती वर वर्णन केली ती संत सद्गुरु संगतीतच साधू शकते, एरव्ही नाही. म्हणून सत्संगती आवश्यक आहे. पुनः ज्या ज्ञानभक्तीच्या साह्याने पूर्ण म्हणजे निर्गुणसगुण अशा दोन्ही अंगाने श्रीहरीची प्राप्ती होते ते ज्ञान व ती भक्ती संतकृपेवाचून अंगी बाणत नाही.संतकृपेनेच श्रवण करतेवेळी आवश्यक असलेली समन्वयसंगती, मननात आवश्यक असलेली साधक युक्तिसंगती, निदिध्यासनात आवश्यक असलेली शिष्याधिकारानुरूप प्रक्रिया व वृत्तिसंगती, आणि भक्तीत आवश्यक असलेले प्रेमवृतीरहस्य कळू शकते.एऱ्हवी ते कळणे शक्य नाही म्हणून श्रीहरिप्राप्ती संतसंगतीतच होते व संतसंगतीचे द्वाराच श्रीहरीची प्राप्ती करून घेतली पाहिजे.

**रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा ।**

**आत्मा जो शिवाचा रामजप ॥२॥**

### *हरिनाम हेच जीवशिवाचे मूळ स्वरूप*

वाचा म्हणजे वाचेने रामकृष्ण या नामाचा जप करणे, हाच जीवाचा भाव होय; म्हणजे जीवाचे शुद्ध प्रेमस्वरूप होय; आणि रामनामाचा जप हाच शिवाचा आत्मा होय म्हणजे त्याचे शुद्ध स्वरूप होय.जीवत्व व शिवत्व हे दोन्ही मायागुणाचेच प्रकार आहेत.रजस्तमोगुणप्रधान किंवा मलिनसत्वप्रधान मायेमुळे जीवभाव भासतो व जीवाच्या अपेक्षेने, सत्वगुणप्रधान अशा सर्व समर्थ शिवाची जीवानेच कल्पना केली. असे हे जीव-शिव दोघेही मायास्वतंत्र, षड्गुणैश्वर्यसंपन्न, अखंड, साकार, सच्चिदानंदघन असा जो श्रीहरी त्याचे ठिकाणी विवर्तरूप आहेत.

### *अहं ब्रह्मास्मि स्फुरण जीवदशेचे बीज*

'' विवर्त हा वस्तुतः नेहमी अधिष्ठानस्वरूपच असतो.'' म्हणून जीवशिव वस्तुतः श्रीहरीस्वरूपच आहेत, पण मनरूपी कल्पना- उपाधीमुळे जीवाला जीव-शिव इत्यादी भेद भासतो आणि जोपर्यंत वर सांगितल्याप्रमाणे मनाची मनोमार्गगती

होत नाही म्हणजे परमात्मसुखात ते बुडत नाही तोपर्यंत जीवाला त्याची मूळची निर्विकल्प दशा प्राप्त होत नाही. ''तैसा मनासी अस्पर्शन । नयनासी अदर्शन । तेथ जीवभाव लीन । करतांचि न ये'' निर्गुणस्वरूप मनाला अगोचर आहे, नयनालाही अगोचर आहे.अशा स्वरूपाचे ठिकाणी मन कसे लीन करता येणे शक्य आहे? शक्य नाही; म्हणूनच ''अहं ब्रह्मास्मि'' या वृत्त्यनुसंधानाने ऐक्यचिंतन करण्यास वेदांताने सांगितले आहे. पण हे ''अहं ब्रह्मास्मि'' स्फुरणच मूळमाया होय ''ब्रह्म अद्वयत्व परिपूर्ण । तें स्वरूपीं स्फुरे जें मीपण । तेंचि मायेचे जन्मस्थान । निश्चयें जाण उद्धवा'' असे नाथांनी सांगून ठेवले आहे. म्हणजे ''अहं ब्रह्मास्मि स्फुरण जीवदशेचे बीज होय.'' कारण जीवदशेचे मूळ जे मर्यादित व्यक्तिमत्व ते अहं या शब्दाने दाखविले जाते. तेव्हा अशा या ''अहं ब्रह्मास्मि'' वृत्तीने निर्विकल्पतेचा ठेवा कसा हाती येणार? निर्विकल्पता साधण्याकरिता अहंभावच नाहीसा झाला पाहिजे. म्हणजे अंतःकरणच जाणीवरहित अखंड ब्रह्माकार होऊन राहिले पाहिजे. ''तैसा देहाहंकार नाथिला । हा समूळ जयाचा नाशिला । तोचि परमात्मा संचला। आधींच आहे''(ज्ञा६-८४) देहाहंकार समूळ नाहीसा झाला की, जीव परमेश्वररूप झाला.तो मूळचाच परमेश्वर आहे. जीवाला परमेश्वररूप करावे लागत नाही. निर्गुणाचे ठिकाणी ते शक्य नाही, हे वर सांगितलेच.

### *अनध्यस्त विवर्त*

'षड्गुणैश्वर्यसंपन्न सगुण साकार श्रीहरीची नामरूपे, शुद्ध लक्ष्यांशस्वरूपाचे ठिकाणी अनध्यस्त विवर्तरूप आहेत.' म्हणून त्यांचे द्वारा पूर्ण निर्विकल्प स्थिती बाणू शकते. अनध्यस्तविवर्त पूर्ण निरुपाधिक असतो.

श्रीज्ञानेश्वरमाउलीनी अमृतानुभवात ज्याला स्फुरण म्हटले आहे त्यालाच शंकराचार्य विवर्त म्हणतात. पूर्व कारणावस्था कायम राहून नुसता नामरूपांचा बदल होणे याला विवर्त म्हणतात. हा विवर्त दोन प्रकारचा असतो.

१ - विवर्तात जेव्हा अधिष्ठानभूत वस्तू अनुभविली जाते तेव्हा त्या विवर्ताला अनध्यस्तविवर्त म्हणतात. जसे सुवर्णाच्या अलंकारात सोने स्पष्ट दिसते म्हणून सुवर्णालंकार हा **अनध्यस्त विवर्ता**चे उदाहरण होय.

२ - विवर्तात जेव्हा अधिष्ठानभूत वस्तू दिसत नाही, झाकली जाते तेव्हा त्या विवर्ताला **अध्यस्तविवर्त** म्हणतात. रज्जूसर्पाचे ठिकाणी रज्जू भासत नाही. हे विवर्ताचे दोन प्रकार आपल्याला जगात स्पष्ट दिसतात.





जड विनाशी द्वैतरूप जग जोपर्यंत भासते तोपर्यंत ते अधिष्ठानभूत ब्रह्माला झाकून टाकते म्हणून अशा जगाला आचार्य अध्यस्तविवर्त म्हणतात, आणि सगुण रामकृष्णादिस्वरूपांचे ठिकाणी अधिष्ठानभूत सच्चिदानंद ब्रह्माचा स्पष्ट अनुभव येतो म्हणून रामकृष्णादी स्वरूपाला अनध्यस्तविवर्त म्हणतात.

हा भेद श्रीज्ञानेश्वरमाउलीनी ज्ञानेश्वरीच्या अकराव्या अध्यायातील ''हे अवतार जे सकळ । ते जिये समुद्रीचे कां कल्लोळ । विश्व हें मृगजळ । जया रश्मीस्तव दिसे ॥१८०॥ या ओवीत सांगितला आहे. ''जड विनाशी जगाला, अधिष्ठानभूत ब्रह्माचा मृगजळाप्रमाणे अध्यस्त विवर्त ठरवून, अवतारांना समुद्राच्या लहरीप्रमाणे अनध्यस्त विवर्त ठरविले आहे. अवतारांना मृगजळाप्रमाणे माउली समजत नाही.'' हे लक्षात ठेवण्याजोगे आहे.

ज्याप्रमाणे मिठाचा खडा समुद्रात मिळवावयाचा असल्यास तो सर्व समुद्रभर मिळविणे शक्य नाही, तो समुद्राच्या एका अंशातच कोठे तरी मिळविला पाहिजे, समुद्राच्या एका अंशात मिळविणे म्हणजेच सर्व समुद्रभर मिळविणे होय. त्याप्रमाणे निर्विकल्प ब्रह्माशी अत्यंत समरस ऐक्य होण्याकरिता जीवशिवांनी, आपल्या अधिष्ठानभूत शुद्ध निरुपाधिक निर्विकल्प षड्गुणैश्वर्यसंपन्न सगुण साकार श्रीहरीशीच समरस झाले पाहिजे. तो सगुण श्रीहरि भक्ताच्या परमप्रेमाचा विषय आहे आणि परमप्रेम म्हणजे शुद्ध आत्मस्वरूपाचा लक्ष्यांश होय. अशा शुद्ध लक्ष्यांशभूत परमप्रेमाचा विषय जो श्रीहरि तो मायिक राहणे कसा शक्य आहे? म्हणून तो शुद्ध निरुपाधिकच असून त्याची नामरूपेही अर्थातच निरुपाधिकच ठरतात. निरुपाधिक सगुण श्रीहरीचे नामरूप सोपाधिक कसे राहील?

### नामधारक भगवन्नाममय बनतो

परमात्मा सगुण श्रीहरि हा आपला आत्माच होय असे कळून आल्यावर त्याच्यावर आत्मवत् प्रेम जडते व श्रीहरीच्या प्रेमामुळेच त्याच्या नामावरही तसेच प्रेम जडते. त्या प्रेमामुळेच ''माझी मज झाली अनावर वाचा। छंद या नामाचा घेतलासे'' या तुकारामहाराजांच्या स्वानुभवाच्या बोलाप्रमाणे तैलधारेसम हरिनामस्मरण चालू होऊन पुढे तें परा, पश्यंति, मध्यमा, वैखरी अशा चारी वाणींवर सुरू होते. अशा रितीने नामधारक भगवन्नाममय बनतो आणि जो नामधारक असा भगवन्नाममय बनला तो त्या नामाच्या द्वारे लक्ष्यांशभूत श्रीहरीचे ठिकाणी अखंड समरस होऊन राहतो. म्हणून जितक्या प्रेमाने श्रीहरीचे नामस्मरण करण्याचा वाणीला चाळा लागेल तितका जीव प्रेमरूप लक्ष्यांशस्वरूप होत जाईल.

लक्ष्यांश हेच जीवाचे शुद्ध स्वरूप होय व ते नामस्मरणाने साधते. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, वाचेने हरिनामस्मरण करणे हेच जीवाचे प्रेमरूपलक्ष्यांश म्हणजे शुद्ध स्वरूप होय. जीवाला हे प्रथम उमगत नाही, कारण तो अज्ञानी आहे; पण शिव हा ज्ञानी असल्यामुळे त्याला रामनाम हे आपला शुद्ध लक्ष्यांशरूप परमप्रिय आत्माच वाटतो. ''ज्याप्रमाणे

१- निर्गुण ब्रह्मसाक्षात्कारात दृढ परोक्ष ज्ञानाने ब्रह्माचा **सदंश** साक्षात्कृत होतो,

२- अपरोक्ष ज्ञानाने **चिदंश** साक्षात्कृत होतो आणि

३- समाधीच्या अभ्यासाने **आनंदांश** प्राप्त होतो. तेथे परब्रह्माची सत् चित् आनंद अशी भिन्नांश प्रतीती जाऊन सच्चिदानंद एकरूप स्थिती असते.

१- त्याप्रमाणेच सत्पद ते **नामस्मरण** करणे म्हणजे सगुण श्रीहरीचे दृढ अस्तित्व ग्रहण करणेच होय.

२- उत्तरोत्तर पुढे अधिक प्रेमबुद्धीने केलेल्या नामस्मरणाने श्रीहरीचे **ध्यान** घडत जाते. हाच चित्पद साक्षात्कार होय आणि

३- नामरूपांचे ऐक्य होऊन जो प्रेमरूप श्रीहरीचा **बाहेर आविर्भाव** होतो त्यात निरुपाधिक सच्चिदानंदघन साकार श्रीहरीच राहतो.

शब्द व अर्थ यांचा नित्य संबंध आहे. हरीनाम व हरीचे रूप यांचाही त्याच नियमानुसार नित्य संबंध आहे. ज्याप्रमाणे साखर व गोडी; सोने व त्याची कांती, यांचे तादात्म्य असते; त्याप्रमाणे हरि व हरिनाम यांचे तादात्म्य आहे. भक्तिमार्गाच्या प्रक्रियेत नामस्मरणाने सगुण श्रीहरीशी ऐक्य होते. ॐ काराच्या आलंबनाने निर्गुण ब्रह्माशी ऐक्य करण्याची प्रक्रिया जशी वेदान्तांत सांगितली आहे, तशीच नामस्मरणाची प्रक्रिया आहे. बृहदारण्यक भाष्यांत भगवान् आचार्य म्हणतात. ''यदि हि नामरूपे न व्याक्रियेते तदा अस्यात्मनो निरुपाधिकं रूपं प्रज्ञानघनाख्यं न प्रतिख्यायेत'' नामरूपे प्रगट झाली नसती तर भगवंताचे निरुपाधिक सच्चिदानंदघन असे साकारस्वरूप समजलेच नसते.

किंवा याचा दुसरा अर्थ असा होतो- 'रामकृष्ण' हे नामस्मरण म्हणजे जीवाचे ठिकाणी श्रीहरिविषयी असलेले वाचिक प्रेमच होय. भगवंताविषयीचे प्रेम वाचेने नामस्मरण करून जीव व्यक्त करितो. ज्याप्रमाणे उपवर झालेल्या मुलीचा विवाह एकाद्या मुलाशी पक्का ठरल्यावर (पूर्वीच्या रूढीप्रमाणे) ती मुलगी मनात किंवा वाचेने नामस्मरण करूनच प्रेमसुख घेते, त्याप्रमाणे जीवही हरिनामस्मरणाने

(४८)



श्रीहरीचे प्रेमसुख घेतो.

## एक तत्त्वीं नाम साधिती साधन ।
## द्वैताचे बंधन न बाधी त्या ॥३॥

### *सगुणाच्या भक्तीने निःशेष द्वैतनिवृत्ति*

एक तत्त्वी म्हणजे श्रीहरीचे ठिकाणी. श्रीहरी हेच अद्वैत तत्त्व होय. श्रीहरीवाचून दुसरी वस्तुच नाही. वस्तुतः जीवही श्रीहरीस्वरूपच, जगतही श्रीहरीच आणि शिवही श्रीहरीच होय. ह्या तीन वस्तु नसून एका श्रीहरीचे ठिकाणीच या तीन वस्तू निराळ्या आहेत अशी द्वैतकल्पना जीवाने केली आहे; आणि ती द्वैतकल्पनाच जीवाच्या सर्व संसारदुःखाला कारणीभूत आहे. म्हणून श्रीहरीची एक अद्वैतसत्ता ओळखून त्याचेच प्रेम करण्यास श्रुतिसंतांनी अज्ञानी जीवांना उपदेश केला आहे. तत्त्वमस्यादि महावाक्याच्या विचाराने नामरूपात्मक जगत् बाजूला सारून आपले सच्चिदानंद स्वरूप ओळखून जीव जरी अद्वैतरूप झाला व ज्ञाननिष्ठा राखून मी ब्रह्मस्वरूप आहे असा निदिध्यास जरी मरेपर्यंत करीत राहिला व ''प्रारब्ध भोगी उदार'' वा प्रारब्ध भोग भोगण्यास उदार झाला तरी ''परी भक्तीविणे साचार। सकळहि व्यर्थ'' जोपर्यंत तो सगुण श्रीहरीची भक्ती करीत नाही तोपर्यंत सर्व व्यर्थ आहे. कारण, या भक्तीवाचून त्याचे द्वैताचे बंधन पूर्णपणे नष्ट होत नाही. मनाने कल्पिलेले द्वैत जेव्हा निःशेष नाहीसे होते किंवा जेव्हा मन द्वैत विसरून जाईल व पुनः कल्पनाच करणार नाही, किंवा पुनः द्वैताची जाणीव उत्पन्न होणार नाही. हे कार्य भक्तीनेच होते.

''मातृकुळाशी संबंध सुटला । स्वामिनीपणाचा ठावो लाधला । इतुक्यानेचि न मानी पतीला । तरी पतिव्रता ते नव्हे॥''[भक्तिपदतीर्थामृत] लग्न झाल्यावर आई बापाचा संबंध सुटून पतीच्या घरी घरस्वामिनी झाली म्हणून जर स्त्री व्यवहारकाळी आपल्या पतीची प्रेमाने दासी होऊन सेवा करणार नाही तर तिला पतिसुख मिळणार नाही व तिला कोणी पतिव्रता म्हणणार नाही. ''जरी वंदील पतीचे चरण । तरीच शोभे स्वामिनीपण । ना तरी वेश्या हे बोलणं। माथांचि यें ॥''[भक्तिपदतीर्थामृत] घरस्वामिनी होऊन पतीची सेवा करणाऱ्या स्त्रीलाच पतिव्रता व उत्तम गृहिणी म्हणणे शोभते व या व्यतिरिक्त इतरांना वेश्या हीच संज्ञा लोक देतील. अशा स्त्रियांवर ज्याप्रमाणे कोणीही त्यांना वश करून आपली सत्ता चालवू शकतो. त्यांना अनेक कष्ट सोसावे लागतात व कोणाकडूनही गोड प्रेमाचे बोलणे ऐकण्याचा प्रसंग

येत नाही.

त्याप्रमाणेच अहंब्रह्मास्मि या ज्ञानाभिमानाने फुगून जाऊन ''तैसा ज्ञानाभिमानें फुगला । मी ब्रह्मपणें चवताळला'' मी ब्रह्म हे वारे अंगात शिरले असता ''तो सर्वस्वी मुकला । भक्तिसुखाते ॥''(भक्तिपदतीर्थामृत) त्याला प्रारब्ध भोग काळी ब्रह्मानंद भोगता येत नाही.

''लोहश्रृंखला त्यागुनि । कनक श्रृंखला घातली चरणी । तरी चोर नेतील या भये करूनि । व्याकुळ चित्त ॥ (भक्तिपदतीर्थामृत) लोखंडाची बेडी पायाला दुःखद म्हणून ती काढून सोन्याची बेडी पायात घातली तरी पहिल्या दुःखात आणखी 'चोराची भीती' या दुःखाची भर पडते.'' सोनेंहि आपलें नाहीं झालें । पाय दुखणें तैसेचि राहिलें । बंधन असोनि उगेंचि आलें । रक्षकत्व माथां'' सोने आपल्या मालकीचे होत नाही.पाय दुखणे तसेच कायम राहते. सोन्याची बेडी झाली तरी ती श्रृंखलाच होय.म्हणून बंधन आहेच. आणि इतके सर्व राहून पुनः त्या बेडीचे रक्षण करण्याची जबाबदारीही फुकट अंगावर घ्यावी लागते,

''तैसा अहं ब्रह्मास्मि ज्ञाने फुगला । तो अभिमानबंधी मात्र राहिला'' अहंब्रह्मास्मि हे वृत्तिज्ञान ब्रह्मरूप नसून नुसता ब्रह्मरूपतेचा अभिमान होय.म्हणूनच श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात हे ज्ञान बंधनरूपच आहे व भगवंतानेही तसेच सांगितले आहे. कारण ''आणि व्युत्थानभयें तयाला । व्याकुळता न सोडी'' अशा ज्ञान्याला व्युत्थान म्हणजे देहावर येणे चुकत नाही. जो देहावर आला त्याला ''प्रारब्धाचे दुखणे । न सुटे भोगिल्याविणे'' प्रारब्ध भोग भोगणे भाग पडते. पण ''ब्रह्म होऊनि जगी विचरणे । लाजिरवाणे हेहि एक'' ब्रह्मस्वरूप होऊनही प्रारब्धभोग भोगण्याचा प्रसंग यावा याहून लाजिरवाणी गोष्ट दुसरी नाही. एवढा प्रसंग व्युत्थानामुळे येतो.

व्युत्थान टाळण्याकरिता जगदाभासाची पूर्ण निवृत्ति झाली पाहिजे. ती ज्ञानाने होत नाही व योगानेही होत नाही.एका प्रेमभक्तीने अखंड भगवदाकार चित्त राहिल्यास जगदाभास पूर्ण मावळतो.जगदाभास मावळला की, निःशेष द्वैतनिवृत्ती होते. मग द्वैताचा भास कधीच भासत नाही.

म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, अत्यंत एकतत्त्वरूप सगुण श्रीहरीचे ठिकाणी प्राप्त होण्याकरिता ज्यांनी हरिनामस्मरणरूपी साधनाचा उपयोग करून अखंड षड्गुणैश्वर्यसंपन्न सगुण श्रीहरीला अंतःकरणात साठविले त्यांना सर्वत्र एका





श्रीहरीचीच सत्तानुभूती येत असल्यामुळे द्वैताचा भास मुळीच उरत नाही. म्हणून त्यांचे व्युत्थानही होत नाही. व्युत्थानच नाही तर द्वैताचे बंधन कोठून बाधणार!

***पाठभेद***

''एक तत्त्व नाम साधिती साधन'' असाही पाठभेद सापडतो. त्याचा अर्थ - हरिनाम हेच एक तत्त्व म्हणजे अद्वैत तत्त्व आहे. याला आधार ''नामा म्हणे तत्त्व नाम गोविंदाचे'' हा श्रीनामदेवमहाराजांचा अभंग आहे. तत्त्व म्हणजे निरुपाधिक वस्तू. या तत्त्वरूप नामाचे साधन केले असता म्हणजे अखंड चिंतन केले असता द्वैतभ्रमाचे बंधन निःशेष नाहीसे होते, असा अर्थ करावा.भगवंताचे नाम व रूप दोन्ही निरुपाधिकच आहेत. नामस्मरणाचे द्वारा रूपाचे ध्यान होऊन सर्वत्र एकतत्त्वरूप श्रीहरीचाच प्रत्यय येतो.

## नामामृत गोडी वैष्णवां लाधली ।
## योगियां साधिली जीवनकळा ॥४॥

***वैष्णवांची थोरवी व भक्तिरहित योगाचा निषेध***

हरीनाम हे खरोखरच अमृत आहे म्हणजे अविनाशी करणारे आहे. स्वर्गातील एका पदार्थाला अमृत हे नाव आहे, पण तेथे अमृतत्वाचा नुसता आभासच आहे.कारण, ते अमृत पिणारे अविनाशी होत नाहीत.पण या हरिनामरूपी अमृताची गोडी वैष्णवांनाच लाभलेली असते, इतरांना नाही. सर्व औपाधिक विषयांची गोडी, सारखी अखंड टिकणारी नाही. विषयाच्या गोडीचा वीट येतो. तसाच अमृताचाही वीट येतो.पण ही हरिनामामृताची गोडी, या सर्व औपाधिक सुखगोडीहून निराळी आहे.कारण विषयाची गोडी घेणारा जीव व विषय हे परस्परांहून भिन्न, नाशिवंत व औपाधिक असल्यामुळे, विषयाच्या गोडीत वीट उत्पन्न होणे अगदी साहजिक आहे; पण हरि, हरिनाम व हरिरूप हे सर्व वस्तुतः निरुपाधिक अशा परमप्रेमरूप गोडीचे विषय असल्यामुळे, हे सर्व एकरूप व निरुपाधिक आहेत. म्हणून येथील प्रेमगोडी अवीट आहे. असे हे हरिनामाचे अवीट सुख वैष्णवांनाच मिळते.

भगवन्नामाची खरी गोडी वैष्णवांनाच कळू शकते. दुसऱ्या कोणाला त्या गोडीची लज्जत अनुभवास मिळणे शक्य नाही. गोडी म्हणजे अवीट प्रेम. अत्यंत प्रियवस्तू खरी तीच की, जिचा कधीच कंटाळा येत नाही.भगवत्प्राप्तीची इतर साधने भगवत्प्राप्तीनंतर एकाद्याची सुटतील, पण भगवन्नामस्मरण भगवत्प्राप्तीनंतरही

अखंड चालूच राहते. विषयाकडील मनाची ओढ बंद पाडण्याकरिता व भगवतांकडे प्रेम लागण्याकरिता साधकदशेत जरी प्रथम भगवन्नामस्मरण प्रयत्नपूर्वक होत असले तरी पुढे ते प्रेमामुळे अकृत्रिम व स्वाभाविक होते, व प्राप्तीनंतरही अखंड चालूच राहते. ''माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे'' असे श्रीतुकाराममहाराज सांगतात.

**सगुण भगवंताविषयी अखंड प्रेममय अंतःकरण असणे हीच भक्तांची जीवन्मुक्त स्थिती व विदेहमुक्ती होय.**

''वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया'' असे तुकाराम महाराजांनी वैष्णवाचे अंतरंगलक्षण केले आहे. सामान्य जीवांचे प्रेमाचे विषय मायबाप, पुत्रमित्र, वित्त इत्यादी अनेक असल्यामुळे, त्यांचे प्रेम संसारात विखुरलेले असते. वैष्णव जे असतात ते, हेच विखुरलेले प्रेम, सगुण श्रीहरीचे ठिकाणी सर्व संबंध लावून एकत्रित करतात. अशा रीतीने भगवंताला आपल्या संपूर्ण प्रेमाचा विषय करणाऱ्याला श्रीतुकाराम महाराजांनी 'वैष्णव' संज्ञा दिली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीनामदेव महाराज, नाथ, तुकारामादि भगवद्भक्त खरे वैष्णव होत. या वैष्णवांचे संपूर्ण प्रेम श्रीहरीचे ठिकाणी लागल्यामुळे, षड्गुणैश्वर्यसंपन्न प्रेममूर्ती श्रीहरी त्यांच्या अंतःकरणातून बाहेर जातच नाही. तो वैष्णवांना त्यांच्या आवडीनुसार आपले अवीट प्रेम देतो व त्या अवीट प्रेमाने आपल्याला बांधूनही घेतो. या प्रेमाची गोडी अनिर्वचनीय आहे. पण ही प्रेमगोडी एकदमच प्राप्त होते असे नाही. त्याला अभ्यासच करावा लागतो.

ज्याप्रमाणे ''अहो जेविलेचि जेवावे । तैसे सेविलेचि सेवावे । तरीच ते स्वभावें। अवीट होईल'' रोज आपण तेच ते जेवतो व सेवन केलेलेच पुनः पुनः सेवन करितो म्हणून सामान्यतः विषयसेवनाचा वीट येत नाही.

त्याप्रमाणे ''ब्रह्मानंद अवीट पूर्ण । त्याची कैसी काय खूण । हें न कळेचि भक्तीविण । न घडे सेवन पुनः पुनः'' ब्रह्मानंद अवीट आहे याचा अनुभव, सगुणाचे भक्तिप्रेमाने वारंवार सेवन करण्याचा अभ्यास केल्यावांचून येणे शक्य नाही. म्हणून सगुण श्रीहरीच्या नामस्मरणाचा अभ्यास जितका जितका अखंड होण्याच्या मार्गास लागेल तितका तितका भगवंताच्या षड्गुणैश्वर्यसंपन्न साकार स्वरूपाचा साक्षात्कारही अखंड होण्याच्या मार्गास लागून त्याचबरोबर भगवत्कृपेने भगवंताच्या नामरूपाचे प्रेमही अवीट होऊ लागते.

प्रथम प्रयत्नपूर्वक भगवत्स्मरण करताना सत्तामात्र, श्रद्धास्वरूप प्रेम असले





तरी नामस्मरणाच्या अभ्यासाबरोबर ते प्रेमही भगवान् वाढवितो व शेवटी आपल्या नामरूपाचे अवीट प्रेम भक्ताला देतो. हे अनिर्वचनीय प्रेमसुख प्रेमळ वैष्णवांनाच माहीत. याची त्यांना इतकी गोडी लागते की, जीवन्मुक्तदशेतही त्यांचे हरिनामस्मरण सुटत नाही. ''मुक्तिवरील भक्ति जाण । अखंड मुखी नारायण'' इत्यादी संतवचने वरील अर्थाची द्योतक आहेत.

तात्पर्य असे आहे की, श्रीहरीच्या नामरूपाविषयी अलंबुद्धी किंवा तृप्ती कधीच वाटत नाही तशी सगुण श्रीहरीच्या नामरूपाचे ठिकाणी असे प्रेम ज्या योग्यांना नाही त्यांना हे प्रेमसमाधीचे सुख मिळत नाही. एवढेच नाही तर सगुणाच्या भक्तीवाचून योगाचे साध्य जो चित्तनिरोध तो साध्य होत नाही. भक्तीवांचून योगाचा अभ्यास करणारे योगी पुष्कळ दिवस वाचण्याची कला साध्य करू शकतात.

कोणी या कडव्याचा अर्थ योगी 'जीवनकला' म्हणजे 'सतरावी जीवनकला प्राप्त करून घेतात असा करतात. पण *वैष्णवाला लागलेली नामामृताची गोडी व योग्यांना प्राप्त होणाऱ्या सतराव्या जीवनकलेचे सुख हे समान आहे, असे येथे श्रीज्ञानेश्वमहाराजांना दाखवायचे आहे की, *वैष्णवांचे नामामृताचे सुख वैष्णवांनाच मिळते, ते योग्यांना प्राप्त होत नाही, असे दोघांच्या प्राप्तीतील अंतर त्यांना दाखवावयाचे आहे? याचा विचार केला पाहिजे.

भक्त व योगी या दोघांनाही सारखेच सुख प्राप्त होते असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणणे असेल तर ''योगयाग विधी । येणें नोहें सिद्धी'' इत्यादि अभंगात त्यांनी योगाची निंदा करून नामाची स्तुती केली, त्याचा विरोध येतो. अर्थात् हा विरोध येऊ द्यायचा नसेल तर दुसरा पक्ष मान्य केला पाहिजे. नाथही म्हणतात ''साधोनियां योगसाधन । दृढ केले देहबंधन । देहींच्या सिद्धि भोगिता जाण । अधःपतन चुकेना''

किंवा - जीवनकला म्हणजे सतरावी जीवनकला असा अर्थ केला तरी योग्याची ही प्राप्ती वैष्णवभक्ताच्या प्रेमगोडीची बरोबरी करू शकत नाही. कारण योग्यांना जीवनकलेचे सुख, योगदशेपुरतेच मिळते. ते व्यवहार- काळी नसते पण भक्तांना भक्तिप्रेमसुख अखंड असते. म्हणून भगवान् म्हणतात. ''योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना । श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः॥'' [गी६] सर्व योग्यांपेक्षा भगवद्भक्त अखंड ब्रह्मानंद भोगतो.

**सत्वर उद्धार प्रल्हादी बिंबला ।**

**उद्धवा लाधला कृष्ण दाता ॥५॥**

एवढी नामाची महती गातां तर नुसत्या नामस्मरणाने सर्व सिद्धी कोणाला प्राप्त झाली? असा सहज कोणी प्रश्न करील म्हणून त्याला श्रीज्ञानेश्वरमहाराज उत्तर देतात की,

* प्रल्हाद बालकास सत्वर म्हणजे अगदी लहानपणीच वैष्णवाग्रणी भगवान् नारदांनी हरिनामाचा उपदेश केला व तो त्याच्या ठिकाणी दृढ श्रद्धेमुळे पूर्ण ठसला व हरिनामाच्या योगाने प्रल्हाद पूर्ण भगवत्स्वरूप वैष्णव झाला.

* उद्धवालाही तसाच हरिनामाचा उपदेश करणारे श्रीगुरु भगवान् श्रीकृष्ण मिळाले. तोही हरिनामस्मरणादी भक्तिमार्गानेच भगवंताला पूर्ण वश करता झाला

* ''पाहे पां भक्तिचेनि आथिलेपणें। दैत्यीं देवां आणिलें उणें। माझे नृसिंहत्व लेणें। जयाचिये महिमे''(ज्ञा९-४५०) एका नामस्मरणाने प्रल्हादाला एवढी थोरवी आली,

* भगवद्भक्त उद्धवाला भगवान् श्रीकृष्णांनी मुक्तीवरील भक्तिरूप नामस्मरणाचा उपदेश केला व केवळ नामबलावरच ते दोघेही पूर्ण कृतार्थ झाले. या अभंगांत आणखी एक गोष्ट सूचित केली आहे की, प्रल्हादाला नारदांनी व उद्धवाला श्रीकृष्णांनी हरिनामाचा उपदेश केला म्हणजे

''श्रीगुरुवाचून भगवन्नाम, अंतःकरणात विषयवासना असल्यास, विषयकामनापूर्ती करिते व हरिप्राप्तीची इच्छा असल्यास निःशेष पापांचा नाश करून अगणित पुण्य संचयपूर्वक चित्तशुद्धी करिते.''

श्रीगुरुकृपेनेच हरिनामाचे अवीट प्रेम उत्पन्न होते व श्रीगुरुमुखाने घेतलेले नाम सगुण भगवत्साक्षात्कार करून देते.

**ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ।**
**सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥६॥**

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, हरिनाम हे अत्यंत सोपे रामबाणासारखे अचूक साधन असून हरिनामावाचून इतर साधने कठीण आहेत. म्हणजे हरिनामाने जशी अनुभवानंदरूप सगुण श्रीहरीची प्राप्ती सुलभ व निश्चित होते, तशी दुसऱ्या साधनाने होत नाही, हे जाणणारा विरळा असतो. हरिनाम नुसते तोंडाने उच्चारावे लागते यापेक्षा त्यांत कष्ट काही नाही. ''हरिनामाच्या कीर्तनें। बारा वाटा पळती विघ्नें'' काही विघ्न उत्पन्न होत नाही. हरिनामावाचून इतर साधने कष्टदायक असून त्यात विघ्नेही उत्पन्न होतात. हरिनामसाधनात जसा भगवान् साहाकारी असतो तसा इतर साधनमार्गात नसतो. अशा स्थितीत कष्ट सहन करून व



विघ्नाला तोंड देऊन हरिप्राप्ती करून घेणे दुरापास्त आहे.

वाईट खोड

पण मनुष्यस्वभावात अशी काही वाईट खोड आहे की, ज्या साधनात त्याला श्रम पडतील ते साधन करीत असताना आपण परमार्थाचे साधन करीत आहो असा अभिमान वाटून समाधान वाटते आणि अत्यंत अल्प श्रम देणाऱ्या साधनावर, ते महत् फल देणारे आहे असे सांगितले असले तरी, विश्वास बसत नाही व त्याची महतीही वाटत नाही. हरिनामाच्या महात्म्यावर विश्वास बसल्यावाचून नामाची गोडी लागत नाही.

वास्तविक पाहता साधनाची वरिष्ठता किंवा कनिष्ठता, ते कष्टदायक असण्यावर किंवा सुलभ असण्यावर अवलंबून नसून शास्त्राने जे साधन श्रेष्ठ ठरविले तेच एक श्रेष्ठ किंवा कनिष्ठ; असा निर्णय आहे. ''तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ''(गी१६-२४) समस्त श्रुती, स्मृती, पुराणादी शास्त्राने, तसेच आजपर्यंत झालेल्या समस्त संत महात्म्यांनी, स्वानुभवपूर्ण रीतीने हेच एक सांगितले आहे की, नामस्मरण हे श्रेष्ठातले परम श्रेष्ठ ईश्वरप्राप्तीचे अचूक साधन आहे. पण अशा अत्यंत सुलभ व अत्यंत महाफलदायी भगवन्नामावर अचल दृढविश्वास बसण्यास पदरी अनंत जन्मांतील पुण्याचा साठा पाहिजे. त्याशिवाय नामसाधनावर अचल विश्वास बसत नाही म्हणूनच श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, नामस्मरणाची एवढी यथार्थ अगाध योग्यता जाणणारा पुरुष विरळा दिसतो.

''जन्म जन्मांतरी। असेल पुण्यसामुग्री। तरीच नाम जिव्हाग्री। येईल श्रीरामाचे'' हा माउलीचा सिद्धान्त त्रिवार सत्य होय. समर्थ म्हणतात – कांहीच न करोनि प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणें संतुष्ट चक्रपाणी। भक्तालागी सांभाळी ॥२१॥(दशक ४ समास ३)

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजर्पणमस्तु ॥

०००

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

---

**पाठक्रम : ९** **अर्थक्रम : ४**

---

**विष्णु-विणें जप व्यर्थ त्याचें ज्ञान। रामकृष्णीं मन नाहीं ज्याचे ॥१॥**

**उपजोनी करंटा नेणे अद्वय वाटा । रामकृष्णी पैठा कैसा होय ॥२॥**

**द्वैताची झाडणी गुरुविण ज्ञान । त्या कैचे कीर्तन घडे नामी ॥३॥**

**ज्ञानदेव म्हणे सगुण हे ध्यान । नामपाठ मौन प्रपंचाचे ॥४॥**

*

प्रतिज्ञा - इतर साधनांचा निषेध

*

सरळ अर्थ - भगवान् श्रीरामकृष्णांचे ठिकाणी ज्याचे प्रेम नाही म्हणून जो विष्णुवाचून इतर देवतांच्या नामाचा जप करितो त्याचा जप व त्याचे ज्ञान व्यर्थ आहे.जन्मास येऊन ज्यांनी अद्वैतमार्ग किंवा अद्वितीय व सोपा असा हरिनामस्मरणाचा मार्ग ग्रहण केला नाही त्याला करंटा म्हणजे दुर्भागी म्हणावे.दुर्भागी पुरुषच जन्मास येऊन हरिनामस्मरणाचा एक अती उत्तम अद्वितीय व सोपा मार्ग जाणत नाही.अशा करंट्या पुरुषाचा रामकृष्णाचे ठिकाणी प्रवेश होत नाही. द्वैत प्रत्ययाचा नाश करण्याकरिता ज्यांनी श्रीगुरुपासून ज्ञान संपादन केले नाही त्यांना हरिनाम संकीर्तन घडणे शक्य नाही.श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ज्या हरिनामस्मरणाने ध्यान घडून सर्व प्रपंचाचा विसर पडून तो प्रपंचाचा भास मावळतो त्या श्रीहरीचे ध्यान सगुण आहे.

**विष्णुविणें जप व्यर्थ त्याचें ज्ञान ।**

**रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें ॥१॥**

### ***विष्णुनामाचे श्रेष्ठत्व व इतर साधनांचा निषेध***

विवरण - ज्या श्रीहरीचे नामस्मरण करावयाचे तो श्रीहरि कोण? हे या चरणात महाराज स्पष्ट करितात. सत्वगुणाश्रय श्रीविष्णु हे भक्तीचे आलंबन आहे. अर्थात 'विष्णु' शब्दाने त्याने त्याच्या रामकृष्णादी अवतारांचेही ग्रहण केले आहे. त्याचप्रमाणे ''विष्णुविणे'' असा शब्दप्रयोग आहे, म्हणून भगवान् श्रीशिवाचा निषेध केला असे समजता कामा नये.

वैष्णव संप्रदाय : अनादि व सादि

वैष्णव संप्रदाय अनादि व सादि अशा दोन प्रकारचा आहे. मध्वाचार्यादिकांनी प्रवृत्त केलेला वैष्णव संप्रदाय हा सादि असून श्रीज्ञानेश्वरादि संतांनी प्रवृत्त केलेला वारकरी वैष्णव संप्रदाय अनादि आहे.माध्वादि वैष्णव संप्रदायात विष्णुशिव एकरूप

(५२)



मानीत नसले तरी वारकरी वैष्णवसंप्रदायात विष्णुशिवाची एकरूपता मानली आहे.

हरिहरा नाही भेद । करू नये वाद ॥१॥ एकएकाचे हृदयीं । गोडी साखरेच्या ठायी ॥२॥ भेदकासी नाड । एक वेलांटीच आड ॥३॥ उजवे वाम भाग । तुका म्हणे एकचि अंग ॥४॥

कारण जगत्कार्यार्थ शिव तमोगुणाश्रय जरी दिसले तरी भक्तजनांना ते सत्वगुणाश्रयच आहेत असे ''एकं सत्वं द्विधा कृतम्'' या भारत वाक्याने भगवान् व्यासांनी सांगितले आहे.म्हणून विष्णुविणे म्हणजे शिवविष्णु व त्यांचे अवतार सोडून इतर देवता; असा अर्थ समजावा. शिवविष्णूच्या नामावाचून इतर देवतेच्या नामजपाचा येथे निषेध केला आहे. तुकाराममहाराजांनी ''तुका म्हणे भक्तीसाठी हरिहर । अरूपाचे अक्षर विभाग हें ॥ हरिहर म्हणजे भक्ताच्या प्रेमाकरिता अरूप अशा परब्रह्माचे अक्षर विभाग म्हणजे अविनाशी विभाग आहेत.

### ***शिवविष्णु हे शुध्द ब्रह्म***

उपाधीच्या अपेक्षेने कारणब्रह्म व कार्यब्रह्म असे ब्रह्माचे दोन भेद होतात. शंकराचार्यांनी - ''अस्ति ब्रह्म नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्त-स्वभावं सर्वज्ञं सर्वशक्ति-समन्वितम्'' असे जे परब्रह्माचे लक्षण केले आहे.ते परब्रह्म कारणब्रह्म म्हटले जाते. जेथे अमर्याद सामर्थ्य सांगितले जाते तेथे कारणब्रह्म समजावे व जेथे मर्यादित सामर्थ्याचा उल्लेख असेल तेथे कार्यब्रह्म समजावे.कारणब्रह्मदशा निरुपाधिक आहे व कार्यब्रह्मदशा औपाधिक आहे. सगुण साकार शिव व विष्णु हे निरुपाधिक कारणब्रह्मच असल्यामुळे, त्यांचे अवतारहि कारणब्रह्मरूप आहेत आणि तेच भक्तीचे आलंबन आहेत.

अशा निरुपाधिक श्रीरामकृष्णांचे नामस्मरण सोडून उपाधीच्या स्वाधीन असलेल्या कार्यब्रह्मरूप इतर देवतांच्या कल्पित नामाचा जे जप करितात त्यांचा तो जप सच्चिदानंद श्रीहरीच्या प्राप्तीच्या दृष्टीने व्यर्थ आहे. त्या जपाने श्रीहरीची प्राप्ती होत नाही.

त्याचप्रमाणे निरुपाधिक हरिहरांच्या भक्तिवाचून द्वैताचे परिमार्जन करणारे अनुभवजन्य ज्ञानही होत नाही.वेदांतशास्त्राचा अभ्यास करून मिळविलेले शाब्दिक ज्ञान अननुभविक असते. म्हणूनच त्या ज्ञानाने रामकृष्णांच्या स्वरूपाचे निरुपाधिकत्व कळत नाही व त्यांच्या नामस्मरणादी भक्तीकडे मन वळत नाही.

असे ज्ञानी नुसते तोंडाने ''अहं ब्रह्मास्मि'' याचे चिंतन करतात व विषयसुख खुशाल भोगतात अशा वेदान्त्यांचे ज्ञान आत्मसुखाची प्राप्ती करून देत नाही. मुक्त झाल्यावर ''मुक्ताची विषय स्थिती । विषयी स्फुरे ब्रह्मस्फूर्ति'' विषय ब्रह्मरूपाने अनुभवाला आले पाहिजेत. तसे अनुभवाला न येता ज्ञान झाल्यावर विषय हे विषयरूपानेच भासल्यास त्या ज्ञानाचा काय उपयोग? विषय भगवत्स्वरूप दिसावयाला सगुण श्रीरामकृष्णांची भक्तीच केली पाहिजे. जे ज्ञान सगुण भगवंताच्या भक्तीचे पोटी जन्मलेले नाही त्या ज्ञानाचा लाभ व्यर्थ आहे.

''नाम्ना सहस्त्रं दिव्यानां स्मरणे यत्फलं लभेत् । तत्फलं लभते नूनं रामोच्चारणमात्रतः। नाम्ना सहस्त्रं दिव्यानां त्रिरावृत्त्या तु यत्फलम् । एकावृत्त्या तु कृष्णस्य तत्फलं लभते नरः॥'' (ब्रह्मवैवर्तपुराण) भावार्थ - एकसहस्त्र नामावर्तनाचे फळ एका रामनामाने होते व तीन सहस्त्र नामावर्तनाचे फळ एका कृष्णनामाने होते.

सारांश, ज्यांना यथार्थ ज्ञान नाही व ज्यांचे प्रेम भगवान् रामकृष्णांच्या नामरूपाचे ठिकाणी नाही म्हणून रामकृष्णाचे नामस्मरण सोडून दुसरे चिंतन करतात, त्यांचा इतर देवतांचा काम्यजप व त्यांचे शाब्दिक कोरडे ज्ञान हे दोन्ही खोटे! त्यात काही अर्थ नाही.

## उपजोनी करंटा नेणें अद्वय वाटा ।
## रामकृष्णीं पैठा कैसा होय ॥२॥

***नामस्मरण न करणारा अभागी***

करंटा म्हणजे हतभागी, उपजोनि म्हणजे जन्मास येऊन, हरिनामासारखा अद्वय म्हणजे सर्व मार्गांत अद्वितीय, अती सोपा व अती उत्तम मार्ग जो जाणत नाही तो अत्यंत हतभागी दुर्दैवी समजावा. अमूल्य दिव्यरत्न हातात येऊन जो कांच म्हणून फेकून देईल तो जसा अत्यंत मूढ व हतभागी समजला जाईल, त्याप्रमाणे घेण्यास अत्यंत सोपे पण महत्फळ देणारे असे हरिनाम जो कोणी घेणार नाही त्याच्यासारखा हतभागी करंटा तोच!

''नाम जपन क्यों छोड दिया ॥ध्रु०॥
क्रोध न छोडा, झूट न छोडा, सत्य वचन क्यों छोड दिया ॥१॥
कवडीको तो खूप सम्हाला, लाल रतन क्यों छोड दिया ॥२॥
खालस एक भगवान भरोसे। तन, मन, धन, क्यों न छोड दिया ॥३॥

अशा नामविन्मुख लोकांचा रामकृष्णांच्या नामरूपांचे ठिकाणी पैठा म्हणजे शिरकाव

(५३)



होणे शक्य नाही व त्यांना परमानंदरूपी मोक्षही मिळणे शक्य नाही.

''सा हानिस्तन्महच्छिद्रं सा चान्धजडमूढता ।
यन्मुहूर्तं क्षणं वापि वासुदेवं न चिंतयेत्'' (पांडव गीता)

श्रीरामकृष्ण हेच परमानंदस्वरूप आहेत आणि तेथेच ज्यांना प्रेम नाही त्यांना परमानंद मिळणे कसे शक्य आहे?

## द्वैताची झाडणी गुरुविणें ज्ञान ।
## त्या कैंचे कीर्तन घडे नामीं ॥३॥

द्वैतप्रत्यय हाच सर्व दुःखाला कारण आहे. त्याची निःशेष निवृत्ती झाली असताच पुरुष केवलानंदरूप श्रीहरीशी समरस होऊन आनंदरूप होतो, पण ही स्थिती प्राप्त होण्याकरिता सगुण श्रीहरीच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाले पाहिजे. ज्यांना रामकृष्णादी सगुण ब्रह्माचे यथार्थ ज्ञान झाले, त्यांना रामकृष्णांच्या नामरूपांचे ठिकाणी स्वाभाविक आत्मप्रेम उत्पन्न झाल्याशिवाय राहतच नाही, पण हे सगुण श्रीहरीच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान, लययोग किंवा ध्यानयोग यांचे द्वारा ज्यांनी अनुभवाने हस्तगत केले, अशा स्वानुभवी श्रीगुरुवाचून मिळू शकत नाही.

''सद्गुरुवांचुनि नाम नये हातां । साधन साधितां कोटिगुणे ॥१॥ जैसा कांतेविण करणें संसार । तैसा हा व्यापार साधनांचा ॥२॥ जंव सद्गुरु नाही केला भ्रतार । साधन विचार व्यर्थ गेला ॥३॥ नामदेव म्हणे सद्गुरुपासोनि । नाम घ्या जाणोनि नाना कांहीं ॥''

त्याचप्रमाणे संत कबीर स्पष्ट सांगतात की, ''गुरुबिन कौन बताये बाट। बडा बिकट यमघाट ॥ध्रु०॥ भ्रांति की पहाडी नदियां बिचमों अहंकारकी लाट। कहत कबीर सुनो भाई साधो, क्यों तरना यह घाट''

वेदान्ताची पुस्तके वाचून स्वबुद्धीने श्रीहरीच्या स्वरूपाचे ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न करणारे बहुतेक व्यतिरेकज्ञानीच असतात व तेही अनुभवी नसतात. नुसते शाब्दिक ज्ञानाचे अवडंबर माजविणे एवढेच त्यांना अवगत असते. असे शाब्दिक ज्ञान, द्वैत प्रत्ययाची झाडणी म्हणजे निःशेष निवृत्ती करण्याकरिता ज्यांनी संपादन केले; त्यांचें ते ज्ञान द्वैताची झाडणी करण्यास काही उपयोगी पडत नाही.

नाथ म्हणतात ''कैसें निरूपी शुद्ध ब्रह्म । ऐकोनि सात्विका येत प्रेम । परी निज हृदयींचा भ्रम । निरसें ते वर्म नेणेचि'' ब्रह्माचे ब्रह्मनिरूपण ऐकून सात्विक

पुरुषाला प्रेम उचंबळून येईल पण द्वैतभ्रमाचे निरसन ज्याने होते तो अनुभव मात्र स्वतःला नसतो.

''जेंवि अमृत म्हणतां । चवी न लभे सर्वथा'' अमृताचें नाव उ्च्चारल्याने जशी त्याची रुची कळत नाही तसे ''तेंवि शाब्दिक ज्ञानयोग्यता । अनुभव वार्ता स्वये नुपजे'' नुसते शब्दाने ब्रह्माचे वर्णन करता आले म्हणजे अनुभव आला असे नव्हे.

''जेणें स्वये चाखिली नाही चवी । तो दुजयातें गोडी केवि लावी'' स्वतःलाच अनुभव नसता दुसऱ्याला तो अनुभव काय आणून देणार? अनुभवाच्या मार्गाने गेलेलाच अनुभवाचा मार्ग दाखवू शकतो. ''तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः'' (गी४-३४)

भगवान् श्रीज्ञानेश्वर माउली म्हणतात, -

''तें ज्ञान पै गा बरवें । जरी मनी आथि आणावें । तरी संता या भजावें । सर्वस्वेंशी ॥१६५॥ जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंटा । तो स्वाधीन करी सुभटा । वोळगोनी ॥१६६॥ तरी तनुमनजीवें । चरणाशी लागावे । आणि अगर्वता करावे । दास्य सकळ ॥१६७॥ मग अपेक्षित जें आपुलें । तेही सांगती पुसिलें । जेणें अंतःकरण बोधलें । संकल्पा नये ॥१६८॥ जयाचेंनि वाक्य उजियडे । जाहलें चित्त निधडें । ब्रह्माचेनि पाडें। निःशंक होय ॥१६९॥ ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल । तैं मोहांधकार जाईल । जै श्रीगुरुकृपा होईल । पार्था गा॥१७१॥ (ज्ञा.अ.४)

**ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान ।**

**नामपाठ मौन प्रपंचाचे ॥४॥**

### ***सगुण ध्यानाने प्रपंच निवृत्ती***

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी, ज्या श्रीहरीच्या नामाचा जप करायचा तो हरि नामरूपरहित असा घ्यावयाचा? किंवा नामरूपसहित असा घ्यावयाचा? याचा स्वमुखाने निवाडा येथे केला आहे आणि पहिल्या अभंगातील ''देवाचिये द्वारी'' या पदावर प्रकाश पाडला आहे. पहिल्या अभंगाचे विवरण करताना देव म्हणजे सगुण परमात्मा असा अर्थ घ्यावा असे आम्ही म्हटले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ज्या श्रीहरीचे नामस्मरण करायचे त्याचे ध्यान सगुण आहे. नामरूपांचा नित्य संबंध असल्यामुळे, नाम घेतल्याबरोबर रूपही लक्षात येते.

शंकराचार्यही 'नामस्मरणात ध्यान होते' असे विष्णुसहस्रनामभाष्यांत म्हणतात. ''निर्गुणं सत्त्वरजस्तमांसि गुणास्तद्रहितम्'' सत्त्वरजतम हे तीन गुण



मायेचे आहेत त्या गुणाविरहित जे, त्याला निर्गुण म्हणतात. शंकराचार्यांच्या या वचनाप्रमाणे पाहता सगुण षड्गुणैश्वर्यसंपन्न परमात्मा श्रीहरीही मायागुणरहितच आहे; कारण तो मायागुणाने बद्ध नाही म्हणून तोही निर्गुणच आहे.

पण सृ्च्चिदानंद षड्गुणैश्वर्यसंपन्न म्हणून त्याला सगुण म्हणतात आणि विग्रहवान् म्हणून साकार म्हणतात. असे असले तरी तो निरुपाधिक म्हणजे माया उपाधिरहितच आहे. सगुण श्रीहरीचे ठिकाणी आत्मविस्मृतिरूप अविद्याउपाधी कोणीच वेदान्ती मानीत नाही. माया म्हणजे शुद्धसत्वउपाधी कोणी मानतात तरी तो मायेच्या स्वाधीन आहे असे कोणी मानीत नाही. माया त्याच्या स्वाधीन असून तो मायेचा नियंता आहे असेच सर्व ज्ञानी मानतात.

उपाधीच्या स्वाधीन जो होतो त्याचेच मूळचे अमर्याद सर्वज्ञत्वादि सर्वशक्तिमत्वादि ऐश्वर्य मर्यादित होते. जीव मूळचा परब्रह्म असूनही उपाधीच्या स्वाधीन आहे म्हणूनच त्याचे पारमैश्वर्य मर्यादित झाले.

तात्पर्य सगुण श्रीहरी निरुपाधिक आहे त्याच्या नामस्मरणाने त्या निरुपाधिक परमात्म्याचे ध्यान घडून अंतःकरण तद्रूप झाले असता, सहजच प्रपंचाचा विसर पडतो. आत्मज्ञानाने ''विस्मरत्येव सा ध्यानात्, विस्मृतिर्न तु वेदनात्'' (पंचदशी ध्यानदीप श्लो.९६) जगद्विस्मृति ध्यानाने होते असे विद्यारण्यांनी पंचदशीत म्हटले आहे. सगुण श्रीहरि निरुपाधिकच असल्यामुळे, सगुणांतून निर्गुणात मिळतो असे म्हणण्याचे काही कारण नाही. सगुणात मिळणे म्हणजे निरुपाधिक स्वरूपातच मिळणे होय. श्रीज्ञानेश्वरमहाराज याच अर्थाला धरून म्हणतात की, मी सतत हरिनामाचा पाठ करितो व त्यायोगे माझ्या अंतःकरणात सगुण श्रीहरीचे ध्यान ठसले व अंगी ब्रह्मरस ठसावल्यामुळे विषयाचे ठिकाणी निःशेष विसर पडला. या चरणात मला सगुण ध्यानाने प्रपंचाचा विसर पडला असे म्हणून–

श्रीज्ञानेश्वरमहारांजानी, प्रारब्धबळाने भक्तिरहित ज्ञान्याचे जसे व्युत्थान होते म्हणजे त्यांना जगत्स्फूर्ती होते तसे भक्तांचे व्युत्थान होत नाही, त्यांना अखंड भगवत्प्रेमरूप समाधी असते असे सूचित केले आहे.

**आधीपासोनी ध्यावा ज्ञानेश्वरू ।**

**वेळ येतां गुरु-रूपे भेटे ॥**

**॥ श्रीगुलाबरावमहाराज अभंग ६०० ॥**

रहीम कवि म्हणतो - 'भरि सराय रहिम लखी पथिक आप फिर जाय । प्रेम गलि अति सांकली तामे दो न समाय''

परगावाला गेलेला पांथस्थ त्या गावातील धर्मशाळेत उतरावयास गेला असता, पाय ठेवायला जागा नाही असे पाहून जसा माघारी फिरतो, त्याप्रमाणे भक्तप्रेमाने सृदिानंदघन साकार झालेला परमात्मा, नामस्मरणाने भक्तहृदयात शिरला म्हणजे त्याच्या अंतःकरणात जगत्स्फूर्ती होण्याला जागा नसते, म्हणून जगत्स्फूर्ति माघारी फिरते.

अंतःकरणाची ज्ञानवृत्तिरूप गल्ली रुंद (व्यापक) असल्यामुळे तेथे आत्मज्ञानाबरोबर मिथ्या जगत्स्फूर्ति राहू शकते, पण सगुण प्रेमरूप अंतःकरण वृत्ती, इतकी अरुंद गल्ली आहे की, तेथे सगुण भगवत्स्फूर्ती व जगत्स्फूर्ती ह्या दोन्ही एकावेळी राहूच शकत नाहीत.

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

---

**पाठक्रम : १०** **अर्थक्रम : १०**

---

**त्रिवेणीसंगमी नाना तीर्थे भ्रमी । चित्त नाही नामीं तरी ते व्यर्थ ॥१॥**

**नामासी विन्मुख तो नर पापिया । हरीविणे धांवया न पवे कोणी ॥२॥**

**पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मिक । नामे तिन्ही लोक उद्धरती ॥३॥**

**ज्ञानदेव म्हणे नाम जपे हरीचे । परंपरा त्याचे कुळ शुद्ध ॥४॥**

*

प्रतिज्ञा - नामस्मरण प्रमाण व इतर साधन अप्रमाण.

*

सरळ अर्थ - त्रिवेणीसंगमादी नाना तीर्थांचे ठिकाणी भ्रमण केले पण श्रीहरीचे नामस्मरणाविषयी जर चित्तात प्रेमभाव नसला तर ते तीर्थाटण व्यर्थच आहे. जो हरिनामाचे ठिकाणी विन्मुख आहे तो पापाचा पुतळा समजावा. अशा पापात्म्याचा उद्धार करण्यास हरिवांचून कोणीच समर्थ नाही. हरिनामस्मरणाने सर्वपापमुक्त होऊन कृतार्थ झालेले असे पुराणप्रसिद्ध वाल्मिक ऋषि म्हणतात की, हरिनामाने





तिन्ही लोकांचा उद्धार होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, जो कोणी श्रीहरीचे नामस्मरण करितो त्याचे कुळ पिढ्यान्‌पिढ्या शुद्ध होते.

**त्रिवेणी संगमीं नाना तीर्थे भ्रमी ।**

**चित्त नाहीं नामीं तरी तें व्यर्थ ॥१॥**

***नामस्मरण प्रमाण व इतर तीर्थयात्रादि साधने अप्रमाण***

विवरण - पापे ही भगवत्प्राप्तीला प्रतिबंधक आहेत. पापाने भगवत्प्राप्ती अंतरते व पापप्रवृत्ती वाढते. काही पापे संसारातील निरनिराळ्या प्रकारचे दुःख देणारी आहेत. बुद्धिमांद्य व विषयासक्ती हे देखील पापाचेच फळ होय. असे नानाप्रकारचे पाप नाहीसे होऊन, भगवत्प्राप्तीकरिता लागणारी चित्ताची शुद्धी व्हावी म्हणून नाना प्रकारच्या तीर्थांला जाण्याची शास्त्राज्ञा आहे. पापक्षालन झाले म्हणजे चित्त शुद्ध होते. ज्या चित्तातून राजस तामस पापवासना निघून गेली व भगवंताची ओढ ज्या चित्ताला लागली त्या चित्ताला शुद्ध चित्त म्हणतात व त्यायोगे ते सात्विक बनते. सत्वगुणच भगवत्साक्षात्काराला उपयोगी आहे, हे गीतेमध्ये भगवंतानी अठराव्या अध्यायात सांगितले आहे.

तीर्थक्षेत्रादिकांच्या ठिकाणी ज्याच्या मनात श्रद्धा असेल त्याचेच पापक्षालन होऊ शकते, पण हरिनामस्मरणाचा स्वाभाविकच प्रताप असा आहे की, श्रद्धाविरहित घेतलेलेही हरिनाम पापक्षालन करते व प्रयत्नपूर्वक सतत घेण्याचा अभ्यास वाढविल्याने त्याची गोडी लागून मनातील पापवासना देखील बंद पडतात. नामधारकाच्या तीर्थस्नानाने तीर्थे पवित्र होऊन पापी लोकांना निष्पाप करण्यास पूर्ववत् शुद्ध व समर्थ होतात. एवढा भगवन्नामाचा थोर महिमा आहे.

भगवंतांनी जी त्रिगुणात्मक सृष्टी निर्माण केली आहे त्यात तीर्थे इत्यादिकात मनुष्यादिकांचे राजस तामस गुणकर्माचा नाश करणारा सत्वगुणाचा उत्कर्ष ठेवला आहे. त्यामुळे त्या तीर्थादिकांच्या सेवनाने पाप नाहीसे होते, पण नरकाला नेणारी शास्त्रबाह्य वर्तनांची पापप्रवृत्ती नाहीशी होऊन, स्वर्गाला नेणारी नाना पुण्यकर्मे करण्याचीही प्रवृत्ती नाहीशी होऊन भगवत्प्राप्ती करून देणारी हरिनामगोडी चित्ताला लागेल इतकी चित्ताची शुद्धी कोणत्याही कर्माने किंवा प्रयागादि तीर्थस्नानानेही होत नाही, हरिनामस्मरणासह तीर्थाटण केले तरच ते तीर्थाटण चित्तशोधक होते, किंवा तीर्थव्रतादि प्रायश्चित्ते, वर्तमान जन्मातील ज्ञातपापांचे प्रायश्चित्त होऊ शकतात व प्रतिबंधक पापे तर अनेक जन्मांतली संचित आहेत व

त्या पापांचे प्रायश्चित हरिनामांवाचून दुसरे नाही किंवा तीर्थव्रतादिकांना ज्या भगवंताच्या संकल्पामुळे पापक्षालन करण्याचे सामर्थ्य आले त्या भगवंताच्या नामाचे ठिकाणी ज्यांना आदर वाटत नाही, त्यांचे आपल्या स्वामीचा अनादर करण्याचे पाप, तीर्थे नाहीशी करू शकत नाहीत किंवा सर्व पापांमध्ये, भगवन्विन्मुखता या पापाचे तोडीचे पाप नाही. ते पाप करून कितीही तीर्थाटणे केली तरी चित्त शुद्ध होऊन भगवत्प्राप्ती होणे सुतराम् शक्य नाही. याला भगवन्नामस्मरण हेच एक प्रायश्चित्त आहे.

पुनः तीर्थाटणादिक श्रद्धावानांनाच फळतात व भगवन्नामस्मरण अश्रद्धावानाचेही दोष जाळते.

''गंगास्नानसहस्त्रेषु पुष्करस्नानकोटिषु ।
यत्पापं विलयं याति स्मृते नश्यति तद्धरौ ॥''
(गरुडपुराण १-२३०-१८)

सारांश, हरिनामावाचून सर्व कर्मच असल्यामुळे हरिनामाच्या आदरावाचून तीर्थाटणादी व्यर्थ आहेत.

**नामासी विन्मुख तो नर पापिया ।**

**हरिवीण धांवया न पवे कोणी ॥२॥**

***हरिवाचून त्राता नाही***

हरिनामावाचून तीर्थादी प्रायश्चित्ताने अनंत जन्मांतली ज्ञात पातके व अज्ञात पातके नाहीशी होत नाहीत व हरिनामाचा अनादर हे पातक तर हरिनामाचा आदरपूर्वक जप केल्याशिवाय कोणत्याच प्रायश्चित्ताने नाहीसे होत नाही. म्हणून हरिनामाचे ठिकाणी विन्मुख असणारा अश्रद्धावान् पापी पुरुष नेहमी पापीच राहतो. त्याच्या पापाची निष्कृती होण्याचे दुसरे साधनच नाही. ''अर्थवादं हरेर्नाम्नि संभावयति यो नरः। स पापिष्ठो मनुष्याणां नरके पतति स्फुटम्'' (कात्यायन संहिता)

माझी श्रीगुरु आई म्हणते की, ''पुढती पापे करणार नाही । ऐसी आण वाहूनी पाही । पुढती पापे न करिता लवलाही । नामे जळती पापशिखर'' (श्रीगुलाबराव महाराजकृत समग्र ग्रंथावली -सूक्तिरत्नावली,यष्टी.१४ पृ. ८४)

अशा पुरुषाला श्रीहरीवाचून अभय देणारा कोणी नाही. सर्व देवता





कर्माप्रमाणे फळ देणाऱ्या आहेत. कर्माचे निर्दलन करून सद्‌गती देणारा किंवा संसारापासून सोडविणारा एक श्रीहरी व त्याचे नांवच आहे. हरिनामाच्या ठिकाणी विन्मुख असणारा पुरुष हरिनामाचा आश्रय करीत नाही, तोपर्यंत संसारचक्रांतच गोते खात राहणार.

''जे हरिनामी विन्मुख । पाहो नये त्यांचे मुख । त्यासी नाही इहपर सुख । मोक्ष तो नाहिचि की तयाते ॥१०७४॥ नामे सांग होय कर्म । नामे सांग अंगहीन धर्म । नाम दृष्टांते शब्दब्रह्म । वेद पावले श्रेष्ठत्व ॥१०७५॥ विन्मुख हरिनामीं तया । न कळती सकळहि सत्क्रिया । प्रायश्चित्तें जाती वायां । विन्मुख होतां हरिनामी ॥१०७६॥'' (वामन पंडित-यथार्थदीपिका अ. ९)

त्याचप्रमाणे सर्व पातकांचे मूळ, जी अविद्या किंवा देहबुद्धी, ज्या देहबुद्धीला तुकाराम महाराज ''बळे देह मी म्हणतां। कोटी ब्रह्महत्या माथां ।'' कोटी म्हणजे अगणित ब्रह्महत्या म्हणतात. ती देहबुद्धी भगवद्‌भक्तिशिवाय क्षीण होत नाही.

**पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मिक ।**

**नामें तिन्ही लोक उद्धरती ॥३॥**

***नाममहात्म्याला ऐतिह्य प्रामाण्य***

हरिनामस्मरणाने सर्व पापसमूहांचा नाश होऊन मनुष्य उद्धरतो याचे पुराणप्रसिद्ध उदाहरण म्हणजे वाल्मिकीऋषींचे आहे. अनेक जीवहत्या करूनही भगवान् नारदांनी उपदेशिलेल्या भगवन्नामस्मरणाने वाल्या कोळ्याचे जगद्वंद्य वाल्मिकीऋषी झाले. ''उलटा नाम जपत जग साना । वाल्मीकि भये ब्रह्म समाना'' वाल्मिकीऋषीनी स्वतः अनुभवलेले नाममहात्म्य, ते आपल्या तोंडाने सांगतात की, माझ्यासारख्या एकाचाच काय पण त्रैलोक्याचा उद्धार करण्याचे हरिनामांत सामर्थ्य आहे. ''

राम त्वत्तोऽधिकं नाम इति मे निश्चिता मतिः।
त्वया तु तारिताऽ योध्या, नाम्ना तु भुवनत्रयम्'' (अध्यात्म रामायण)

हे हरिनाम चराचराला पावन करणारे आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

'ऐसें माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाची दुःखे ।
अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें'' (ज्ञा. ९-२००)

तसेच,

### *श्री ज्ञानेश्वर माउलीचा साक्षात्कार*

माझी गुरुआई गुलाबरावमहाराज यांना भगवान् ज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह झालेला होता व ही गोष्ट सर्व महाराष्ट्रात महशूरच आहे. अहेतुक सद्गुरुप्रेमाच्या भरात आपली इष्टनिष्ठा व्यक्त करीत करीत, प्रत्यक्ष भगवदवतार श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शरीराची अनध्यस्तविवर्तता व तत्संन्निधानानेश्रीक्षेत्र आळंदी हे त्रैलोक्याला पावन करणारे अविनाशी अलौकिक नित्यतीर्थ आहे. **निरुद्ध भूमिकास्थ** योग्याचे शरीर सत्त्वयुक्त होऊन असंप्रज्ञातसमाधि दृढ झाला असतां त्या सत्त्वयुक्त देहाचा तपानेहि अभीव होत नाही, याला योगवासिष्ठाची संमती व कर्कटी, भृगुसुत शुक्र व काक भूशुंडी यांची उदाहरणे आहेत. ह्याप्रमाणे योग्याचे शरीर जर प्रलयकालात नाश पावत नाही तर

**खेचराच्याही मना । आणि सात्विकाचा पान्हा ॥**
**श्रवणासवे सुमना । समाधि जोडे ॥ ज्ञाने.१३-११५८॥**

अशी ज्यांची प्रतिज्ञा, त्यांच्या दर्शनमात्राने सर्वांस सत्त्वयुक्त करणारे श्रीज्ञानेश्वर माउलीचे परब्रह्मशरीर व तदवच्छिन्न देश हे अविनाशी आहेत. हे श्रीगुलाबराव महाराजांनी श्रुतियुक्त व स्वानुभवाने **'नित्यतीर्थ'** या ग्रंथात सप्रमाण सिद्ध करून दाखविले आहे. त्या ग्रंथांत स्वत:संबंधी ते म्हणतात -

**निगमाचे फळ । गुरुविण न रसाळ ।**
**हे बोलिले केवळ । तातचि अंगे ॥३॥**
**जयाचा दिठिवा वसंतू । जव न निघे निगमवना आतू ।**
**आपुलिये फळी हातू । न घेपती ही ॥४॥ २-१८.अमृ.॥**
**यस्य देवे पराभक्तिः यथा देवे तथा गुरविति ॥**
**जयाची तया प्रकाशती । सकलार्थ स्थिति । श्रुती म्हणे ॥५॥**
**म्हणवोनी सद्गुरूचे चरण । सकळ तीर्था अधिष्ठान ।**
**ऐसे गुरुगीतेचे वचन । प्रमाण आहे ॥६॥**
**ही अवघियांची रीति । परी माझी विशेषस्थिति ।**
**ती सावध होऊनी श्रोतीं ऐकावी प्रेमें ॥७॥**
**माझा सद्गुरु करुणाघन । आळंदीपती कल्याणनिधान ।**
**जेणे आपुलिया नामाचा मंत्र देऊन । कृतार्थ केले मजलागी ॥८॥**
**कैवल्य कनकाचिया दाना । जो न कडसी थोर साना ।**
**दृष्टयाचे दर्शन । पाठावो जो ॥९॥ अमृ.२-५**
**या साच करावया निजवचना । न देखोनी मम पात्रपणा ।**
**अंकी घेवोनी खुणा । सांगितल्या स्वनामाच्या ॥१०॥**
**जो आळंदीत समाधिवासी । जागृत भक्तहृदयदेशी ।**
**त्रिभुवनी वाराणसी । ती आळंदी मी म्हणे ॥**
**(श्रीगुलाबरावमहाराजकृत सूक्तिरत्नावली द्वितीय यष्टी पूर्वार्ध पृ.८५-८६)**

**ह.भ.प. श्री विष्णुबुवा जोगमहाराज पुणें, हे श्री ज्ञानेश्वर माउलीचे एकनिष्ठ भक्त व वारकरी संप्रदायाचे ऐक मोठे अध्वर्यु होते. जोगमहाराज हे श्रीगुरु गुलाबरावमहाराजांना प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वरमाउलीची विभूतीच म्हणत होते. पुण्यातील ज्ञानेश्वरीचे सुप्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. केशवरावमहाराज देशमुख हे आपल्या ओवीबद्ध श्री नारदभक्तिसूत्रविवरणात लिहितात की-**

**जोगमहाराज वर्णन करिती । खात्री झाली ऐसे म्हणती ।**
**प्रत्यक्ष ज्ञानेश्वरविभूती । प्रकटली म्हण**ती जगात ॥१६॥

श्री जोगमहाराज यांनीच श्रीमहाराजांचा पूर्वपरिचय त्याना करून दिलेला होता. ह.भ.प. केशवरावमहाराज देशमुख यांनी श्रीनारदभक्तिसूत्रांचे विवरण १२१६ ओवीबद्ध ग्रंथात केले आहे. त्याग्रंथाच्या प्रारंभी २०० ओव्यात श्रीगुलाबरामहाराज यांचे स्तुतिस्तोत्र गावून प्रस्तुत ग्रंथ त्यांनी श्रीगुलाबरावमहाराज यांच्या चरणी निस्सीम भक्तिप्रेमाने समर्पण केला आहे.

### *श्रीज्ञानेश्वर माउलीचे दर्शन मला आपल्यासारखे कसे होईल?*

ह.भ.प. केशवराावमहाराज देशमुख पुणे, यांनी पत्रद्वारा पृच्छा केल्यावरून त्याना पत्रोत्तर म्हणून आवीबद्ध जे पत्र ता.१९-१-१९०६ रोजी पाठविले,त्यातील सारांश खालीलप्रमाणे-

**स्मरण, ज्ञान आणि ध्यान । यात्रयीचे हेचि लक्षण ।**
**लिहिले तैसे अभ्यासून । पहावे तुम्ही ॥७॥**
**मग जेथे पहाल तेथे ज्ञानेश्वर माउली तत्वतां । ओ देतील हांक मारितां । हे रूपक नव्हे, यया अर्था । प्रमाण आहे ॥८॥**
**व्यासे शुकाचिया आवडी । या प्रत्ययाची घेतली गोडी ।**

**तोचि श्लोक सुख परवडी । घेतो येथ ॥९॥**

**॥श्लोक॥**

**यं प्रव्रजन्तम् उपेतम्अपेतकृत्यम् । द्वैपायनो विरहकातर आजुहाव ॥**
**पुत्रेति तन्मयतया तरवोऽभिनेदुस्तं सर्वभूतहृदयं मुनिमानतोऽस्मि ॥**

**अलकावतीहूनि तात यावे । हे बोलणे कोणे सहावे ।**
**पै केश केश ज्ञानेश्वर म्हणावे । तैंचि फावे ॥१०॥**
**उदित चक्रांचिया आवांका । निकियापरी मारितां हांका ।**
**तैं ऐसा हा का । हातां नये ॥११॥**
**येथे तुम्ही बोलिला ऐसे । की गुह्य काय सांगितले असे ।**
**तरी हे लिहिले तैसे । अभ्यासावे ॥१२॥**
**मग हे गुह्य होय किंवा नाही । प्रत्यय येईल लवलाही ।**
**परी बुद्धि ते सर्वदांही । सरळ असावी ॥१३॥**
**सांडूनि पर मतजाल वितण्ड । मोडावे आग्रहाचे बंड ।**
**करावा कामक्रोध दंड । विवेकाने ॥१४॥**
**वाचेने जपावे श्रीहरिनाम । अन्तरी असावे अति निष्काम ।**
**मानापमान मानावे सम । एकदेशीय मतही सांडोनी ।**
**दैवी सिद्धींची ऐसी रीती । त्या इच्छा असतां दुरी जाती ।**
**इच्छा नसतां लोळती । पायातळी ॥१४॥**

*(पत्र यष्टी ७/१२ ) / हरिपाठरहस्य, पहिली आवृत्ति शके१८७६ पान ११३ ते ११५*

॥श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु॥

जानकीनाथ सहाय करे, तब कौन बिगार करे नर तेरो ।
मंगल, सूरज, सोम, भृगुसुत, बुध, गुरु वरदायक तेरो ।
राहु केतु की नाहीं गम्यता संग शनीचर होत है चेरो ॥१॥
दुष्ट दुःशासन निर्बल द्रौपदी, खेंचत चीर कुमतिके प्रेरो ।
जाकी सहाय्य करी करुणानिधि, बढ गयो चीरको भार घनेरो ॥२॥
गर्भमें राख्यो परीक्षिती राजा, अश्वत्थामा शस्त्रहि फेरो ।
भारत में भंवरीके अंडा ता पर गजको घंटा गेरो ॥३॥
जा पर कृपा करै रघुनन्दन, ताको जगमें भाग्य बडेरो ।
रघुवंशी सन्तन सुखदायी । तुलसीदास चरणको चेरो ॥४॥

**ज्ञानदेव म्हणे नाम जपे हरीचें ।**

**परंपरा त्याचे कुळ शुद्ध ॥४॥**

***नामधारकाचे कुळ पवित्र***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, अखंड हरिनामस्मरण करणारा जो नामधारक आहे तो तर उद्धरला जातोच पण तो आपल्या कुळालाही उद्धरतो. नामधारकाच्या पुण्याचा लाभ एकट्या नामधारकालाच मिळतो. असे नाही तर त्याच्या कुळालाही मिळतो.एवढे सामर्थ्य नामाशिवाय जी इतर साधने आहेत त्यांपैकी कोणातही नाही, आणि हरिनाम निरुपाधिक ब्रह्मस्वरूप आहे हेच त्याच्या एवढ्या माहात्म्याचे कारण आहे.

........................................................................................................

खालील मजकूर पहिल्या आवृत्तीत (१९५६ शके-१८७६) होता पण पुढील आवृत्तीतून सुटून गेल्यामुळे इ.स.२००८नंतरच्या आवृत्तीत समावेश करीत आहोत.–
श्रीज्ञानेश्वरमधुराद्वैत सांप्रदायि मंडळ अमरावती

........................................................................................................

***श्रीज्ञानेश्वर माउलीचा साक्षात्कार***

माझी श्री गुरुआई गुलाबरावमहाराज यांना भगवान् श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह झालेला होता, व ही गोष्ट सर्व महाराष्ट्रास महशूरच आहे. अहेतुक सद्गुरुप्रेमाच्या भरात आपली इष्टनिष्ठा व्यक्त करीत करीत, प्रत्यक्ष भगवदवतार श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शरीराची अनध्यस्तविवर्तता व तत्संनिधानाने श्रीक्षेत्र आळंदी हे त्रैलोक्याला पावन करणारे अविनाशी अलौकिक नित्यतीर्थ आहे. निरुद्ध भूमिकास्थ योग्याचे शरीर सत्वयुक्त होऊन असंप्रज्ञात समाधी दृढ झाला असता त्या





सत्त्वयुक्त देहाच्या प्रलयकालच्या तापानेही अभिभव होत नाही. याला योगवासिष्ठाची संमती व कर्कटी, भृगुसुत शुक्र व काकभृशुंडी यांची उदाहरणे आहेत. ह्याप्रमाणे योग्याचे शरीर जर प्रलयकालात नाश पावत नाही तर
खेचराचियाही मना । आणी सात्विकाचा पान्हा । श्रवणसवे सुमना । समाधि जोडे ॥ज्ञा.१३-११५८॥''
अशी ज्यांची प्रतिज्ञा त्यांच्या दर्शनमात्राने सर्वास सत्त्वयुक्त करणारे श्रीज्ञानेश्वरमाउलींचे परब्रह्म शरीर व तदवच्छिन्न देश हे अविनाशी आहेत. हे श्रीगुलाबरावमहाराजांनी श्रुतियुक्त व स्वानुथवाने ''नित्यतीर्थ'' ह्या ग्रंथात सप्रमाण सिद्ध करून दाखविले आहे. त्या ग्रंथात स्वतःसंबंधी ते म्हणतात -
निगमाचे फळ । गुरुविण न रसाळ । हे बोलिले केवळ । तातचि अंगे ॥३॥
जयाचा दिठिवा वसंतु । जंव न रिघे निगमवना आतु । तंव आपुलिये फळी हातु । न घेपती ही ॥४॥अमृ.२-१८॥
यस्य देवे पराभक्तिः यथा देवे तथा गुरविती ॥ जयाची तया प्रकाशती । सकलार्थ स्थिती श्रुती म्हणे ॥५॥ म्हणवोनी सद्गुरूचे चरण । सकळ तीर्था अधिष्ठान । ऐसे गुरुगीतेचे वचन । प्रमाण आहे ॥६॥ ही अवघियांची रीती । परी माझी विशेष स्थिती । ती सावध होवूनी श्रोती । ऐकावी प्रेमे ॥७॥
॥श्रीमत्सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु॥

०००

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

**पाठक्रम : ११** **अर्थक्रम : ५**

**हरि ङ्गारणीं अनंत पापराशी । जातील लयासी क्षणमात्रें ॥१॥**
**तृण अग्नि मेळें समरस झालें । तैसें नामें केलें जपतां हरी ॥२॥**
**हरि ङ्गारणीं मंत्र हा अगाधा । पळे भूतबाधा भेणे याचे ॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ । न करवे अर्थ उपनिषदां ॥४॥**

*

प्रतिज्ञा - नाममहिमा व वेदाची कुंठित गती.

*

(६०)

सरळ अर्थ – श्रीहरीच्या नामाचा उच्चार केल्याबरोबर अनंत पापांच्या राशी एका क्षणात नाश पावतात. ज्याप्रमाणे अग्नीच्या संगतीने गवत जळून त्याचे नांवही उरत नाही, त्याप्रमाणे हरिनामाच्या जपाने क्षणात सर्व पापांची होळी होते. नुसता हरिनामाचा उच्चार करणे हा एवढा प्रभावी मंत्र आहे की उच्चार करतांक्षणीच त्याच्या भयाने सर्व भूतबाधा नाहीशी होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, माझा श्रीहरि असा अलौकिक सामर्थ्यवान् आहे की, त्याचे सामर्थ्य व स्वरूपस्थिति उपनिषदांनाही अतर्क्य आहे.

**हरिउच्चारणीं अनंत पापराशी ।**

**जातील लयासी क्षणमात्रें ॥१॥**

***नाममहिमा***

विवरण – आपल्या मूळच्या पूर्ण परब्रह्मस्थितीत काही एक न्यूनता किंवा अपूर्णता न येऊ देताच आपल्या स्वाभाविक सर्वज्ञता, सर्वशक्तिमत्ता व नित्य, समस्त, अप्रतिबद्ध अशा *यश, *श्री, *औदार्य, *ज्ञान, *वैराग्य, *ऐश्वर्य या षड्गुणाने भगवान् परमात्मा सगुणसाकार होतो. म्हणजे नामरूपासह प्रकट होतो. ही नामरूपे, निरुपाधिक षडगुणैश्वर्य संपन्न श्रीहरीचे ठिकाणी अत्यंत एकरूपाने राहतात. श्रीहरीचे हे षड्गुणैश्वर्य निरुपाधिक म्हणण्याचे कारण हेच की, परमेश्वर श्रीहरीचे हे ऐश्वर्य निरतिशय म्हणजे अमर्याद आहे. औपाधिक ऐश्वर्य अमर्याद नसते. अशा श्रीहरीची नामरूपे त्याच्याशी अत्यंत अभिन्न असतात, म्हणून त्याच्या नामरूपातही ते सामर्थ्य असणे साहजिकच आहे.

''तुम्हां समचि हें गुणें, अणु उणें नसे नाम, हा ।
दिसे अधिकही तसा गुण तुला असेना महा ।
सदैव भलत्यासही सुलभ, आणखी गायका ।
छळी न, न अधोगति क्षणहि दे जगन्नायका ॥७५॥ (मोरोपंत केकावली)

त्याचप्रमाणे गोस्वामी श्रीतुलसीदासमहाराज सांगतात की, ''समुझत सरस नाम अरु नामीं । प्रीति परस्पर प्रभु अनुगामी । (रामायण) नामरूपाचे सामर्थ्यही अमर्याद आहे. म्हणूनच हरिनामस्मरणाचा प्रभाव एवढा थोर आहे की, हरि हे नाम उच्चारताक्षणी असंख्य पापांच्या असंख्य राशी लय पावतात,



''न कळतां पद अग्निवरीं पडे । न करी दाह असें न कधी घडे । अजितनाम वदो भलत्या मिसें । सकल पातक भस्म करी तसे'' – वामन पंडित, नामसुधा.

त्याचप्रमाणे माझी श्रीगुरु मारुली म्हणते की, ''जाणोनि नाम घेतां वासनाक्षय । नेणोनि नाम घेतां पापमात्रक्षय ॥२९२॥ भ्रमेहि नामाची फल प्राप्ती । येणें अधिक विश्वास वाढला चित्तीं। कीं, उपासनेहून नामगति । श्रेष्ठ जाहली ॥२९३॥'' (श्रीगुलाबरावमहाराज.संप्रदाय सुरतरु अ.२)

**तृण अग्निमेळें समरस झालें ।**

**तैसें नामें केलें जपतां हरि ॥२॥**

***नामस्मरणाने नामधारक सदेह सच्चिदानंदरूप***

गवताचा व अग्नीचा संबंध झाल्याबरोबर ज्याप्रमाणे गवत क्षणात अग्नीशी समरस होते म्हणजे अग्निरूपच होऊन जाते; त्याप्रमाणे नामधारकाचे सर्व कर्मच, देहादी सर्व उपाधीसह श्रीहरीशी एकरूप होऊन जाते. अखंड नामस्मरण करणारा नामधारक सदेह सच्चिदानंद श्रीहरिस्वरूप होऊन जातो. ज्ञानाने, देहादी नामरूपे सोडून सच्चिदानंद जीवात्म्याचे सच्चिदानंद निर्गुण ब्रह्माशी ऐक्य होते व भक्तीचे योगाने –

''ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं ।
भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥ तुका०
सदेह सच्चिदानंद कां न होवावे ते ॥ ज्ञाने०

या संताच्या अनुभवानुसार देहादी नामरूपांसह सच्चिदानंदभगवत्स्वरूप होतो. याचा अर्थ असा की–

देहादिकाला वगळून ब्रह्मरूप होणे याला ज्ञान म्हणतात व देहासकट ब्रह्मरूप होणे याला म्हणतात भक्ती !

**हरि उच्चारणीं मंत्र हा अगाधा ।**

**पळे भूतबाधा भेणे याचे ॥३॥**

***नामस्मरणाने सर्व-दुःख-निवृत्ती***

श्रीहरीचे नाम हा एक अगाध सामर्थ्यसंपन्न मंत्र आहे. ह्या मंत्रराजाच्या

उ्च्चारानेच सर्व भूतबाधा नाहीशी होते. या मंत्रराजापुढे भूतबाधा टिकाव धरू शकत नाही. भूतबाधा या शब्दाचे तीन अर्थ होऊ शकतात.

(१) एक सर्वसामान्य अर्थ - पिशाच्चादिकांची बाधा हा होतो. पूतनेचा वध करून अंगावर खेळत असलेल्या श्रीकृष्णाला उचलून बाजूला केले व भूतबाधा झाली असेल अशी शंका होऊन नामाच्या योगाने श्रीकृष्णाचे रक्षण केले. त्यावेळी शुकाचार्यांनी म्हटले आहे की, ''विष्णोर्नामग्रहणभीरवः'' पिशाचादिक भगवन्नामश्रवण करताच पळून जातात. हरिनामाच्या भयानेच पिशाचादि पळ काढतात.

(२) दुसरा अर्थ - भूते म्हणजे चतुर्विध जारज, अंडज, स्वेदज व उद्‌भिज जीव, प्राणी व देवता वगैरे यांची बाधा म्हणजे आधिभौतिक, आधिदैविक, व आध्यात्मिक या त्रिविध दुःखांची बाधा होत नाही, जारज, अंडज, स्वेदज व उद्‌भिज या चार प्रकारच्या प्राण्यांपासून होणाऱ्या दुःखाला आधिभौतिक दुःख म्हणतात. देवतांचे क्षोभाने प्राप्त होणारे अतिवृष्टी, अनावृष्टी इत्यादिकांसारखे दुःख याला आधिदैविक दुःख म्हणतात. देवताही जीवच आहेत म्हणून त्यांच्यापासून होणारे दुःखाला भूतबाधा म्हणता येते. आपली विषय वासना आपल्याला दुःख देते म्हणजे आपणच आपल्या दुःखाला कारण होतो. आपले मनच आपल्याला दुःख देते व मन पंचभूतांचे कार्यच आहे म्हणून आध्यात्मिक दुःखालाही भूतबाधा म्हणायला हकरत नाही.

(३) भूतबाधा याचा तिसरा अर्थ म्हणजे मुख्य अर्थ असा आहे की, आपले लिंगशरीर व स्थूलशरीर भूतकार्यच असल्यामुळे व त्यामुळेच सर्व दुःख आपण भोगतो, व हे सर्व दुःख अविद्या, काम, कर्म यांचे फळ असल्यामुळे, सर्व संसार व त्यामुळे होणाऱ्या दुःखालाच भूतबाधा म्हणणे बरे. पण ही सर्व प्रकारची भूतबाधा हरिनामस्मरणाने नाहीशी होते. जेवढे दुःख होते ते पापकर्माचे फळ असते. नामस्मरणाने अनंत जन्मांचे संचित पापकर्म क्षणात नाहीसे होते.

''भगवन्नामोच्चारें सकलहि पापें सवासने जळती ।
मळती न नामधारक, पळती यमदूत, विघ्नेही टळती ॥''
(मोरोपंत. आर्या. मंत्रभागवत)

अखंड नामस्मरण करणारा संसारातील, घडणाऱ्या क्रियमाण दोषापासून पद्मपत्राप्रमाणे अत्यंत अलिप्त राहतो, नामस्मरणाने अखंड भगवत्प्रेम प्राप्त झाल्यानंतर भगवद्‌भक्तांचा प्रारब्धभोगही अभिभव पावतो.

* संचित क्रियमाण । भक्ता प्रारब्ध नाहीं जाण ॥

(६१)


* एकाजनार्दनीं भोग प्रारब्धाचा । हरिकृपे त्याचा नाश झाला ॥
असा सर्व साधुसंतांचा स्वानुभव आहे.

### *दुःखानेहि सर्व सुख फळ*

पुनः ''दुःख तें देईल सर्व सुख फळ,'' दुःखामुळे सामान्य अज्ञानी व ज्ञानी यांना जी देहबुद्धी स्फुरते, ती भक्तांना स्फुरत नाही. ज्याप्रमाणे लहान मूल काही दुःख झाले असता आईचा धावा करिते त्याप्रमाणे भक्ताचे चित्त दुःखप्रसंगी श्रीहरीचे ठिकाणी जास्त प्रविष्ट होते. म्हणून भगवद्भक्तांस दुःख हे, दुःखफळ देत नाही तर, सर्व सुखस्वरूप असा परमात्माच प्राप्त करून देते. माउली ज्याप्रमाणे बाळाच्या मागे पुढे राहून त्याचे संरक्षण करिते त्याप्रमाणे सर्वसमर्थ श्रीहरीहि आपल्या भक्ताचे सर्वतोपरी साह्य करीत असल्यामुळे, भक्तांना भौतिक व दैविक दुःख भोगण्याचा प्रसंग येत नाही.

काशीत पाप करी काहीं । परी तेथ यम यातना नाहीं ।
भैरव यातना लवलाही । भोगुनि होई मुक्त शेखीं ॥१५४॥
तैसा नामधारका प्रति । रक्षक, शिक्षक कमलापती ।
म्हणोनि आम्ही निर्भय चित्ती । स्वेच्छा क्षिती वावरू ॥१५५॥ संप्र. सुर. अ.२

नामस्मरणाने भगवान् आपल्या भक्तांस आपले प्रेमदान करून विषय-सुखाची वासनाच नाहीशी करतो म्हणून भगवद्‌भक्ताला आध्यात्मिक दुःखाची बाधा होत नाही.

एवढेच काय पण सर्व दुःखांचे कारण जे अज्ञान किंवा माया व तज्जन्य संसार यांचाही भगवद्‌भक्तांचे ठिकाणी ठाव राहत नाही, तेव्हा इतर क्षुल्लक भूतबाधा त्यांना काय होणार आहे?

तुकाराममहाराज म्हणतात - भवरोगा ऐसें जाय । आणिक काय क्षुल्लकें ॥३॥ तुका म्हणे नोहे बाधा । आणिक कदा भूतांची ॥ - नामस्मरण करता करता सर्व संसारदुःख नाहीसे होऊन एक सर्वत्र परमप्रिय श्रीहरीची अद्वैतसत्ताच अनुभवाला आल्यावर ''तुका म्हणे आम्ही देखतचि नाही । देवावीण कांहीं दुसरें तें'' सर्व विश्वच परमसुखाने दुमदुमून जाते. तेथे दुःखाचे नावहि राहणे शक्य नाही,

सारांश, या चरणात भगवन्नामधारकांचे ठिकाणी सर्व भयाचा निषेध महाराजांनी केला आहे, म्हणजे नामधारकास कर्माकर्माची भीती नाही म्हणून काळाचीही भीती नसते. ते अत्यंत निर्भय असतात. तुकाराममहाराज म्हणतात -

''ज्याचे गर्जता पवाडे । कळिकाळ पाया पडें'' कळिकाळ हाच स्वतः नामधारकास शरण येतो.

**ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ ।**

**न करवे अर्थ उपनिषदां ॥४॥**

### *श्रीहरीचे ठिकाणी वेदाचीहि गती कुंठित होते*

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, माझा सगुण श्रीहरी असा समर्थ आहे म्हणजे त्याची स्वरूपस्थिती इतकी अतर्क्य आहे की, तिचे वेदालाही आकलन झाले नाही. हे ज्ञानेश्वरमहाराजादी सर्व संतांचे म्हणणे भावनाप्रधान नसून कसे सिद्धान्तभूत आहे हे माझ्या सद्‌गुरु आईने आपल्या ग्रंथांतून निरनिराळ्या उपपत्तीने जे अद्वितीय प्रतिपादन केले आहे, त्याला धरूनच मागे विवेचन केले व आताही येथे विवेचन करीत आहे.

समर्थ म्हणतात, ''संदेह वृत्ति न भंगें । म्हणोनि बोलिलेंचि बोलावें लागे'' एकदा सांगितल्याने मनातले संशय जात नसतात म्हणून वारंवार तेच ते सांगितले पाहिजे.

### *निर्गुण ब्रह्मप्राप्तीचा अभ्यास : हरिनामस्मरण*

श्रीहरीच्या नामाचे महात्म्य वर्णन करिताना श्रीज्ञानेश्वरमाउली म्हणते ''तत्त्वमस्यादी वाक्य उपदेशु । नामाचा अर्धांशु नाही तेथें'' म्हणजे तत्त्वमस्यादी महावाक्याचे विचाराने प्राप्त होणारी स्थिती, सगुण श्रीहरीच्या नामस्मरणाने प्राप्त होणाऱ्या स्थितीच्या, अर्धाशांने आहे असे देखील म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे ''नामवज्र कवच । तोचि निर्गुणाचा अभ्यास ॥'' म्हणजे भक्तीवाचून निर्गुण ब्रह्मप्राप्ती होण्याकरिता क्लेश सहन करावे लागतात व त्यामुळे निर्गुणाचा अभ्यास अत्यंत अशक्य होतो. पण हरिनामाचे अभेद्य कवच घातले असता, क्लेश मुळीच होत नाहीत व निर्गुण ब्रह्मप्राप्ती सहजासहजी होते. म्हणून हरिनामस्मरण, हा निर्गुण ब्रह्मप्राप्तीचा अभ्यासही म्हणता येतो. हे श्रीज्ञानेश्वरमाउलीचे उद्‌गार, भावनावश होऊन काढले गेले आहेत असे नव्हे तर ते पूर्ण अनुभवजन्य आहेत.

वास्तविक पाहता परब्रह्म परमात्मा, त्याच्यावांचून दुसरी वस्तूच नसल्यामुळे सोपाधिक नाही तसा निरुपाधिकही नाही, सगुण नाही व निर्गुणही नाही, व्यक्त नाही व अव्यक्तही नाही. तेथे विचाराचा थांग लागत नाही. बोलच खुंटतो. जीवाची



हीच मूळची स्थिती पण तोही आपली मूळची स्थिती विसरला. तो सर्व विपरीतच समजतो. त्याची विपरीत समजूत घालवून त्याला पूर्वस्थितीवर आणण्याकरिता या सर्व कल्पना कराव्या लागल्या. ब्रह्म म्हणजे मूळस्थिती सच्चिदानंदरूप आहे हीही एक त्यापैकीच कल्पना आहे. वास्तविक पाहता जीवाची मूळ ब्रह्मस्थिती निरंश आहे तेथे सत्, चित्, आनंद असे अंश नाहीत. जीवाच्या ठिकाणी असलेल्या अविद्येने जीवाचे ठिकाणी जे उपाधीचे अंश निर्माण केले ते अंश नाहीसे करण्याकरिता ब्रह्माचे ठिकाणी सत्, चित्, आनंद हे अंश, जीवाचे अविद्येचे अपेक्षेने, शास्त्रात सांगितले गेले.

नाथ स्वात्मसुखात म्हणतात. ''सत तेंचि चित । चित तोचि आनंद । वस्तु नोहे त्रिविध। एकपद निजानंदे ॥'' ब्रह्म वस्तु त्रिविध नाही.

पंचपादिकाकारही म्हणतात, ''आनंदो विषयानुभवो नित्यत्वं चेति सन्ति धर्मा ब्रह्मणो ह्यपृथकत्वेपि पृथगिवावभासन्ते'' सच्चिदानंद धर्म एकरूप आहेत, तेथे पृथक्‌पणा नाही, तरी पण भासतो. हा पृथक्‌पणा भासण्याचे कारण, बुद्धिवृत्तीत प्रतिबिंबित झालेला जीव, या बुद्धिवृत्तीच्या साह्यानेच किंवा अंतःकरणवृत्तीच्या साह्यानेच आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाचा अनुभव घेतो व तो घेताना अंतःकरणवृत्तीच्या मर्यादितपणामुळे ब्रह्मानुभवही सत् चित् आनंद असा पृथक् अंशाने येतो.

### *अंतःकरण निर्विकल्प करणारे स्वरूप : निर्विकल्प*

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अमृतानुभव ग्रंथांत पाचव्या प्रकरणात ''सच्चिदानंद'' या तीन पदांनी जो अनुभव येतो त्याचा त्रिविधपणा मोडून एकरूपता केली पाहिजे, असे सांगितले आहे. अशी एकरूप, त्रिविधभेदरहित, निर्विकल्पस्थिती कोणत्या मार्गाने व कोणत्या स्वरूपाचे साह्याने प्राप्त होऊ शकते हे आता आपण पाहू.

जीवाला आत्मविस्मृती पाडून जगत् सत्य भासविणारी, सुखदुःखादी भोग देणारी, अनेक प्रकारची बंध व मोक्षाची जाणीव उत्पन्न करणारी मुख्य जीवाची उपाधी ''कार्योपाधिरयं जीवः'' या वचनाप्रमाणे अंतःकरण होय. अर्थात् हे अंतःकरण जसे असेल तशाप्रमाणे त्याला ब्रह्मानुभव येतो. आत्मविस्मृतिरूप अज्ञानाने युक्त अंतःकरण आहे तोपर्यंत त्याला सर्व ब्रह्मच त्रिगुणात्मक साकार दिसते. म्हणून त्रिगुणात्मक साकार ब्रह्मदर्शनाने अंतःकरण निर्विकल्प होत नाही. आत्मस्वरूपाचा विचार करून आत्मज्ञानाने आत्मविस्मृतिरूप अज्ञान नाहीसे झाले असता, अंतःकरणाला मी त्रिगुणरहित, सर्वनामरूप-जातिगुणकर्मरहित

''तस्मात् सर्वदुःखनिर्मुक्तैकचैतन्यात्मकोऽहमित्येष आत्मानुभवः''(ब्र.सू४।१।२)

सर्वदुःखरहित मी सच्चिदानंदस्वरूप आहे असा अनुभव वृत्तीच्या साह्याने येतो. तेथे वृत्ती राहत असल्यामुळे हीही स्थिति निर्विकल्प नव्हे.

''जैसा गुळामाजी दगडु । सर्वांगें झाला गोडू । तरी परिपाकी दावी निवाडु । वेगळेपणाचा ॥ *कां आंब्याच्या पोटी । असती रसाचिया घोटी । परि त्याहिमाजी असे गांठी । ते वेगळीच पडे ॥ *तैसा आत्मसुखें मी सुखी आहे। ऐसा सुखत्वें फुंजो लाहे । तरी वेगळेपणेंचि राहे । सुखवेदने ॥ *जाहलेनि ज्ञाने। मी मुक्त हें मानिजे मनें । तो ज्ञानबंध म्हणे । उपनिषद्भागु ॥''

इत्यादी स्वात्मसुखातील ओव्यांनी ज्ञानदशेंत सूक्ष्म ज्ञानाभिमान असतो आणि ''जेथ सूक्ष्मत्वें अभिमान असे । तेथ सूक्ष्मत्वेचि विषयो वसे'' अभिमान आहे तेथे विषयही आहेत असे नाथ म्हणतात.

''येथ जाणीव करी तोचि नेणें । आथिलेंपण मिरवी तेंचि उणें । आम्ही जाहलो ऐसें जो म्हणें । तो कांहीच नव्हें ॥(ज्ञा१३६८) असे श्रीज्ञानराजमाउलीचेही म्हणणे आहे.

निर्विकल्प अंतःकरण होण्याकरिता ''जेथ अभिमान समूळ तुटे । तेथ चिन्मात्र पहांट फुटे । समाधि नेटपाटे । म्हणती त्यातें ॥'' निःशेष अभिमान सुटला पाहिजे. जोपर्यंत अभिमानवृत्ती आहे तोपर्यंत सच्चिदानंदाचा पृथग् इव प्रत्यय जाऊन सच्चिदानंदमात्र किंवा निर्विकल्प स्थिती अंतःकरणाची होणे शक्य नाही. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, सच्चिदानंदाचा भेदप्रत्यय ''येन्हवी सच्चिदानंद भेदें । चालिली तिन्ही पदें । परी तिन्ही उणी आनंदे । केली येणें ॥''

आनंद किंवा प्रेम यावाचून नाहीसा होत नाही. हा आनंद, जोपर्यंत अहंकार आहे तोपर्यंत प्रगट होत नाही असे विद्यारण्यांनी पंचदशीमध्ये ''अहमस्मीत्यहंकार सामान्याच्छादितत्वतः'' अहंकाराने आनंद झाकला जातो म्हटले आहे.

### *निर्विकल्प स्थितीसाठी सगुण श्रीहरीचाच आश्रय*

अहंकार नाहीसा होऊन व आनंद प्रगट होऊन सच्चिदानंदाचा तीनपणा जाण्याकरिता म्हणजे सच्चिदानंदमात्र स्थिती किंवा निर्विकल्प स्थिती प्राप्त होण्याकरिता श्रीज्ञानराजमाउली म्हणते की, सगुण श्रीहरीचाच आश्रय केला पाहिजे. याकरिता माउली उपपत्ती देते ती अशी - कांति कठिण्य कनक । तिन्ही मिळूनि कनक एक । द्राव गोडी पियूख । पियूखचि जेवि ॥ उजाळ दृति मार्दव





। या तिही तिही उणीव । हें देखिजे सावेव। कापुरीं एकीं ॥ ऐसें एके कापूरपणीं । तिन्ही इये तिन्ही उणी । इया परी आटणी । सत्तादिकांची ॥''

ज्याप्रमाणे सोन्याचे ठिकाणी, आपण दूर राहून पाहिले असता कांति, कठीणपणा व कनक असा तीनपणा दिसतो, पण सगुण सोन्याच्या ठिकाणी ते एकरूप आहेत. म्हणजे सोने घेतले असता तिन्ही एकदम हाती येतात; किंवा पातळ, गोड व अमृत असे तीनपणाने अमृत आपण पाहतो पण अमृताचे ठिकाणी तीनपणा नाही, अथवा आपल्याला कापराचे ज्ञान पांढरा, सुगंधी, नरम अशा तीनपणाने होते, पण सगुण कापराचे ठिकाणी तीनपण नाही. कापूर तिन्ही मिळून एक आहे. त्याप्रमाणे ज्ञानात अहंकार असतो व अहंकार आहे तोपर्यंत सत्, चित् आनंद यांचा वेगळेपणा आहे. वेगळे राहून जोपर्यंत आपण आत्मानुभव घेतो तोपर्यंत ब्रह्मानुभव सच्चिदानंद भेदानेच येणार किंवा सत्, चित्, आनंद अशा वेगवेगळ्या तीन अंशाने जोपर्यंत ब्रह्मानुभव येतो तोपर्यंत आपण वेगळेच राहतो. पण कापराचे ठिकाणी तीनपणावाचून असलेले त्याचे धर्म कापूर घेतल्याबरोबर ज्याप्रमाणे तीनपणावाचून आपणही घेतो, त्याप्रमाणे सगुण श्रीहरीचे ठिकाणी तीनपणावाचून असलेले सच्चिदानंद धर्म सगुण श्रीहरीला घेतल्याबरोबर, आपल्यालाही तीनपणावाचून म्हणजे सच्चिदानंदमात्र घेता येतात. म्हणजे अंतःकरण सच्चिदानंदमात्र स्वरूप होते; सगुणाच्या प्रेमाने किंवा आनंदाने अंतःकरण निर्विकल्प होते हा सर्व संतांचा अनुभव आहे म्हणून सगुण श्रीहरीचे रूप निर्विकल्प आहे असे सिद्ध होते किंवा अशी निर्विकल्प अवस्था सगुणाच्या आश्रयानेच येते हे सिद्ध आहे. नाथांनी सर्व संतांचा अनुभव म्हणून सगुण श्रीहरीविषयीचा आपला अनुभव सांगितला आहे.

### *सच्चिदानंदाची अंशप्रतीति*

''सत्पद तें ब्रह्म चित्पद तें माया । आनंदपदीं जया म्हणती हरि ॥ सत्पद निर्गुण चित्पद सगुण। सगुण निर्गुण हरिपायी॥'' (नाथ गाथा) केवळ सत्पद म्हणजे नामरूपरहित नुसती सत्ता, घेतली जात असल्यामुळे, नामरूपरहित असे जे निर्गुण ब्रह्म, त्याचा अनुभव या सत्पदाचे ठिकाणी सर्व संत घेतात. गीतेच्या तेराव्या अध्यायात ''केवळ जी सत्ता। तो पुरुष गा पांडुसुता'' निर्गुण ब्रह्म म्हणजे सर्व नामरूपरहित नुसती सत्ता होय असे माउलीचेही म्हणणे आहे, चित्पद म्हणजे आपल्या ठिकाणी स्फुरणारी मीपणाची वृत्ती. ज्ञान झाल्यावर, देहादिकांवरील मीपण सर्वांच्या पलीकडे असणाऱ्या प्रत्यक् स्वरूप आत्म्याचे ठिकाणी बसून मी ब्रह्म किंवा

''अहंब्रह्मास्मि'' स्फुरण उठते.

नाथ म्हणतात हीच मूळमाया होय.

स्वरूप निर्विकल्प पूर्ण । तेथ मी म्हणावया म्हणतें कवण ।
ऐसेहि ठायीं स्फुरें मीपण । तें मुख्यत्वें जाण मूळमाया ॥

चित्पदाचे ठिकाणी मायास्फुरणाचा संबंध असल्यामुळे हा चिदंश सगुण आहे असे नाथ म्हणतात.आनंदाशाचे ठिकाणी लीलाविग्रही सगुण श्रीहरीचा प्रत्यय असतो. या आनंदरूप सगुण श्रीहरीचे ठिकाणी सत्पद निर्गुण व चित्पद सगुण हे दोन्ही एकरूप होऊन जातात. मग सृ्दिानंदाच्या त्रिविधपणाचा भेद राहत नाही. असा हा सगुण श्रीहरी सगुणनिर्गुणरूप आहे.

''भगवान्परमानंदस्वरूपः स्वयमेवहि'' सगुण श्रीहरि परमानंदरूप साकार आहे असे मधुसूदन म्हणतात.

''श्रीकृष्णदेहो चैतन्यघन'' असे नाथ म्हणतात.

श्रीज्ञानेश्वरमाउली या सगुण श्रीहरीच्या रूपाविषयी म्हणते ''ब्रह्मरसाचे ओतिले घोसुले । ब्रह्मविद्येचे सार मथिलें । प्रेमप्रीतीनें घोळलें । तें द्वैताद्वैताहून परतें ॥ *जें रूपा अरूपा वेगळें । जें ब्रह्मरसाचें गोठलें। तें पंढरिये प्रगटलें ॥ * चौथें घोंगडें तेंहि नाहीं । रखुमादेवीवरा विठ्ठलापायी ॥''

चौथे घोंगडें म्हणजे तुर्या. अशीच इतरही संतांची वचने आहेत.आचार्यांनाही हेच मान्य आहे.

जोपर्यंत बुद्धीची जाणीवशक्ती असते, तोपर्यंत वस्तूचे वर्णन करता येते; पण जेव्हा जाणीवच मुरते तेव्हा वस्तूचे वर्णन करणे अशक्य होते. ज्ञानात जाणीव असते हे सर्वांस स्वानुभवाने माहीत आहे.ती जाणीव आनंदावाचून क्षीण होत नाही हे वर श्रीमाउलीच्या वचनाने दाखविलेच आहे.आनंद जर आत्म्याचाच स्वरूपधर्म आहे तर आत्मज्ञानाने जेव्हा चैतन्यधर्माचा अनुभव यतो, तेव्हाच आनंदाचाही अनुभव यावयाला पाहिजे, पण येत नाही; कारण आत्मज्ञानकाळी सत् चित् आनंद हा धर्मभेद कायम राहतो.

हा विषय विद्यारण्यस्वामीनीं आपल्या पंचदशीतील ब्रह्मानंदे आत्मानंदः या १२ व्या प्रकरणात -

चैतन्यवत्सुखं चास्य स्वभावश्चेिदात्मनः।
धीवृत्तिष्वनुवर्तेत सर्वास्वपि चितिर्यथा ।
मैवमुष्णप्रकाशात्मा दीपस्तस्य प्रभा गृहे ।

(६४)



व्याप्नोति नोष्णता तद्वातिरेवानुवर्तनम् ॥''

इत्यादी श्लोकांनी मांडला आहे. या श्लोकांचा अर्थ असा आहे- जसा चैतन्य हा ब्रह्माचा धर्म आहे, तसा आनंद हाही ब्रह्माचा धर्म आहे. मग ब्रह्मज्ञानाने आपल्या बुद्धीत जेव्हा चैतन्यधर्माचा अनुभव येतो तेव्हाच आनंद धर्माचा अनुभव येणार नाही कां? असा संशय घेऊन विद्यारण्य म्हणतात- चैतन्यधर्माबरोबर ब्रह्मानंदाचा अनुभव येत नाही. ज्याप्रमाणे प्रकाश व उष्णता हे दोन धर्म दिव्याचे आहेत खरे पण दिव्याचा प्रकाशधर्मच घरामध्ये अनुभवाला येतो, उष्णताधर्माचा अनुभव येत नाही;

त्याप्रमाणे वृत्तीमुळे ज्ञानाचे वेळी ज्ञानांशाचाच अनुभव येतो आनंदांशाचा अनुभव येत नाही. व्यवहारकाली आत्माकार वृत्ती ठेवणे अशक्य होते व आत्मानंदाची अभिव्यक्ती होण्याला साधन नसते म्हणून व्यवहारकालीही आत्माकार वृत्ती राहून आनंदाभिव्यक्तिही व्हावी एवढ्याकरिता आत्मरूप असलेल्या सगुणश्रीहरीचे प्रेम करणे हाच एक उपाय आहे. या प्रेमाने चित्त सगुणाकार होऊन जाणीव स्फुरत नाही. त्यामुळे त्रिगुणात्मक विषयाचा व निर्गुण अहंब्रम्हास्मि अनुभवाचा आठव राहत नाही व चित्त अविद्या व विद्या दोन्ही उपाधीला विसरते व निर्विकल्प बनते.

याप्रमाणे सगुण श्रीहरीच्या आश्रयाने मन निर्विकल्प बनते. म्हणून सगुण श्रीहरीचे रूप निर्विकल्प होय. हा श्रीहरि प्रेममूर्ती असल्यामुळे ज्याप्रमाणे निरनिराळ्या आंब्याच्या जातीचे, गुणधर्माचे वर्णन आपण करू शकत असलो तरी त्यांच्या निरनिराळ्या गोडीचे वर्णन करण्याला वाणी समर्थ होत नाही, त्याप्रमाणे वेदाने त्रिगुणात्मक सगुणाचे वर्णन केले आहे. पण त्रिगुणरहित निर्गुण अशा सृ्दिानंद स्वरूपाचेही वर्णन वेद करू शकला नाही व सगुण श्रीहरीचेही वर्णन करू शकला नाही.

**पाय पूजनाचा आम्हां अधिकार । इतर निर्धार काही नेणो ॥**
(अभंग १५१)
**विश्व झाले ज्ञानेश्वर । आम्ही दासचि सुंदर ॥**
**(अभंग १४१)**

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात "ज्ञानदेव म्हणे न कळे याची थोरी। आपण चराचरीं नांदतसे॥*जयाते पाहता परतला आगमु। निगमा न कळे दुर्गमु॥" ब्रह्मदेवाला वत्सहरण समयी भगवंतानी चराचरात आपल्या चतुर्भुज रूपावाचून काही नाही हे जेव्हा दाखविले, तेव्हा ते भगवद्रूपाचे व्यापक दर्शन, शुकाचार्य म्हणतात,

"सत्यज्ञानानंतानंदमात्रैकरसमूर्तयः।
अस्पृष्टभूरिमहात्म्या अपि ह्युपनिषद्दशाम् ॥"

जिकडे तिकडे केवळ स्ृादिानंदरूप ब्रह्मरसाच्या ओतलेल्या अशा त्या मूर्ती दिसत होत्या. उपनिषदांची ज्ञानदृष्टी ज्यांना प्राप्त झाली अशांच्या त्या ज्ञानदृष्टीनेही त्या स्वरूपाचा महिमा कळणे शक्य नाही. हा भगवंताच्या स्वरूपाचा देखावा पाहून ब्रह्मदेवाने त्याचे वर्णन असे केले आहे -

"अस्यापि देववपुषो मदनुग्रहस्य स्वेच्छामयस्य न तु भूतमयस्य कोऽपि ।
नेशे महित्ववसितुं मनसान्तरेण साक्षात्तवैव किमुतात्मसुखानुभूतेः"

भगवंता! माझ्यावर अनुग्रह करण्याकरिता हा जो आपण व्यापक स्वरूपाचा प्रत्यय मला दाखविला तो देखील पांचभौतिक नाही. केवळ भक्ताच्या इच्छेनुसार घेतलेला लीलारूप हा तुमचा विग्रह आहे. जेथे या स्वरूपाचाच महिमा जाणणे शक्य नाही तेथे तुझ्या केवळ प्रेमानंदस्वरूपाचा महिमा, अत्यंत मन इंद्रिये यांचा निरोध करून जाणतो म्हटले तरी जाणणे शक्य नाही.

श्रीधरस्वामींनी या श्लोकावर टीका करून कोणते 'भगवद्रूप' मनाचा निरोध करूनही जाणता येणे शक्य नाही याचे स्पष्टीकरण केले आहे. ते म्हणतात-

"अस्यापि सुलभत्वेन प्रकाशितस्यापि वपुषोऽवतारस्य ममानुग्रहो यस्मात्तन्मदनुग्रहं तस्य । किं च स्वेच्छामयस्य स्वीयानां भक्तानां यथा यथेच्छा तथा तथा । तर्हि किमिति ज्ञातुं न शक्यतेऽत आह । न तु भूतमयस्य-अचिंत्य-शुद्ध-सत्त्वात्मकस्य । यदास्यैवं तदा कथं पुनः साक्षात्तव केवलस्य आत्मसुखानुभूतेरेव स्वसुखानुभवमात्रस्य अवतारिणो गुणातीतस्य महिमानमन्तरेण निरुद्धेनापि मनसा को वा ज्ञातुं समर्थो भवेत् ?

या टीकेवरून भगवंताच्या श्रीकृष्णस्वरूपाला श्रीधराचार्यांनी चिदानंदमात्र स्वरूप ठरविले असून त्या अवतारशरीराचा महिमा मनाचा निरोध करूनही कोणाला जाणता येणे शक्य नाही म्हणजे सगुण रामकृष्णाचा महिमा सर्वथा अतर्क्य आहे असे त्यांचे स्पष्ट मत आहे.





पुनः पुढील एका श्लोकावर टीका करताना ते म्हणतात-

यद्यप्युभयोरविशेषेण दुर्ज्ञेयत्वमुक्तं तथापि गुणातीतस्य ज्ञानं कथंचिद्भवेत् न तु सगुणस्य तवाचिन्त्यानंतगुणत्वात् ॥"

निर्गुणाचे ज्ञान कसे तरी स्ृादिानंदरूपाने अथवा सर्व धर्मरहित अशा उपाधिनिषेधाने होईल, पण सगुण रामकृष्णाचे ज्ञान तर वेदाला देखील अशक्यच होय. कारण -

निर्गुणाची प्राप्ती वृत्तिव्याप्तीने होते व सगुणाची प्राप्ती वृत्ती विसरल्याने होते. वृत्ती असल्यावाचून बोलणेच शक्य नाही. म्हणून सगुण स्वरूप अचिंत्य आहे.

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

ग॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

---

**पाठक्रम : १२** **अर्थक्रम : १५**

---

**तीर्थ व्रत नेम भावेविण सिद्धि । वायाचि उपाधि करिसी जना ॥१॥**
**भावबळे आकळे येऱ्हवी नाकळे । करतळीं आंवळे तैसा हरी ॥२॥**
**पारियाचा रवा घेता भूमीवरी । यत्न परोपरी साधन तैसें ॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझे हातीं ॥४॥**

प्रतिज्ञा - हरिनामाविषयी मानसिक साधन व इतर बाह्यसाधनांचा भक्तीत अनुपयोग. सद्गुरु गुणातीत. गुरुकृपेचे आभार.

सरळ अर्थ - साधने दोन प्रकारची आहेत. एक हरिनाम अंतरंग साधन मुख्य प्रधान असून हरिनामाशिवाय सर्व बहिरंग साधने गौण आहेत. अंतःकरणात सगुणप्रेमभक्ती नसता, वरकांती पुष्कळ तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, तसेच अनेक नियम यांचे जरी आचरण केले व सिद्धी मिळविली तरी ती सर्व उपाधीच ठरते. अंतःकरणात आत्मज्ञान व बाहेर सगुण भगवंताचे प्रेम ह्या दोनच साधनानी साधक पूर्णत्वाला पोहोचतो. भावावाचून तीर्थव्रतनेम इत्यादी साधनाने परमानंदरूप सगुण

श्रीहरीची प्राप्ती ही सिद्ध होत नाही. म्हणून भावावाचून तीर्थव्रते इत्यादी साधनांचे अनुष्ठान व्यर्थच उपाधी आहे. भावानेच हातांतील आवळ्याप्रमाणे भगवंताचे आकलन होऊ शकते. दुसऱ्या कशानेही होत नाही. पाऱ्याचा कण भूमीवर पडला व तो उचलून घेण्याची आपण खटपट केली तर जितका प्रयत्न करावा तितके त्या रव्याचे आणखी बारीक कण होत जातात पण कण काही हाती येत नाहीत. सर्व प्रयत्न व्यर्थ जातो. त्याप्रमाणे मानसिक साधनावाचून कोणत्याही बाह्य साधनाने परमानंदरूप सगुण भगवंताची प्राप्ती होत नाही. इतर सर्व साधनांची केवळ दगदग निरर्थक होते. या मुद्याचा ऊहापोह माउलीनी ज्ञानेश्वरीत चांगला केला आहे -

''येथ एक नवलावो । जो जो कीजे तरणोपावो । तो तो अपावो । होय ते ऐक ॥८२॥ एक स्वयंबुद्धीच्या बाही । रिगाले तयांची शुद्धिचि नाही । एक जाणिवेच्या डोहीं । गर्वेचि गिळिलें ॥८३॥ एक वेदत्रयाचिया सांगडी । घेतल्या अहंभावाच्या धोंडी । ते मदमीनाच्या तोंडी । सगळेचि गेले ॥८४॥ एकी वयसेचे जाड बांधले । मग मन्मथाचिये कासे लागलें । ते विषयमगरी सांडिले। चघळूनिया ॥८५॥ एकी यजनक्रियेची पेटी । बांधोनि घातली पोटीं । ते स्वर्गसुखाच्या कपाटी । शिरकोनि ठेले ॥९०॥

या सर्व ओव्यांचा भावार्थ असा की, जो जो भगवत्प्राप्तीचा प्रयत्न होतो तो तो अहंकारानेच होत असल्यामुळे अहंकार आहे तोपर्यंत भगवंताशी निर्विकल्प ऐक्य होत नाही म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात ''एथ एकचि लीला तरले। जे सर्वभावें मज भजले । तया ऐलथडीच सरलें । मायाजळ ॥९७॥'' ज्यांनी आपले स्नेहसंबंध माझ्या ठिकाणी मानून मला संपूर्ण आपली अहंता, ममता समर्पण केली त्यांना तरून जाण्याकरिता मायानदीच शिल्लक राहात नाही. संपूर्ण मायानदीच आटते असा भाव. म्हणून नामसंकीर्तनावाचून इतर बाकीच्या साधनांचा भक्तिमार्गात काडीमात्र देखील उपयोग नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, माझे सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथ निर्गुण म्हणजे मायागुणरहित आहेत व त्यांनी संपूर्ण आपली स्वरूपस्थिती माझे हाती दिली किंवा तेच संपूर्ण माझ्या हाती आले. मीहि त्यांच्या कृपेने त्रिगुणमायारहित झालो.

**तीर्थव्रत नेम भावेंविण सिद्धि ।**

**वांयाचि उपाधि करिसी जना ॥१॥**

(६६)



***हरिनामाविषयीं मानसिक साधन***

विवरण - श्रीज्ञानेश्वर माउली या चरणांत अज्ञानी जनांना उपदेश करिते की बाबांनो सिद्धी म्हणजे परमानंदरूप सगुण श्रीहरीच्या प्राप्तीकरिता तुम्ही तीर्थाटण, कृच्छ्रचांद्रायणादि व्रते, प्रातःस्नानादी नेम यांचे कितीही बाह्य अनुष्ठान केले तरी, भावेविण म्हणजे श्रीहरीची अद्वैतसत्ता जाणून अत्यंत दृढ श्रद्धेने त्याच्या नामस्मरणाचा मानसिक प्रयत्न जोपर्यंत तुम्ही करीत नाही तोपर्यंत, तीर्थव्रतनेमादी बाह्य साधनांची खटपट व्यर्थ आहे. ती सर्व उपाधीच होईल.

सगुण भगवंताचे निःसीम प्रेम व त्या भगवंताच्या संतोषासाठी सर्व काही करावयाचे अशी जर खरोखर मनाची प्रवृत्ती असेल तरच त्यांचा परमार्थात उपयोग होतो. तसे नसले तर तो लौकिक दंभ होऊन त्यायोगे ईश्वरप्राप्ती न होता मनुष्य संसारसागरात अधिकाधिक बुडत जातो.

''यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् (गी.९-२७)

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''जे जे कांही व्यापार करिसी । कां भोग हन भोगिसी । अथवा यज्ञीं यजिसी । नानाविधीं ॥ ना तरी पात्रविशेषे दाने । कां सेवकां देसी जीवने। तपादि साधने। व्रतें करिसी ॥ तें क्रियाजात आघवें । जें जैसें निपजेल स्वभावें । तें भावना करोनी करावें । माझिया मोहरा ॥ परि सर्वथा आपुले जीवीं । केलियाची से कांहींच नुरवी । ऐसी धुवोनि कर्मे द्यावी । माझिया हातीं'' (ज्ञा.९.ओ.३९८-४०१) मनुष्याच्या मनात संसाराचे प्रेम मूळचेच आहे. श्रीहरीची अद्वैत सत्ता म्हणजे श्रीहरीवाचून जीव जगत् वगैरे दुसरे काही नाही, अशा ज्ञानाने, श्रीहरीच्याच प्राप्तीचा उद्देश मनात ठेवून जर श्रीहरिप्राप्तीचा उपाय जे नामस्मरण, त्याचा मनात ध्यास सतत लागला नाही तर तीर्थव्रतादिकांचे बाह्य अनुष्ठान संसारसुख मिळवून देण्यातच उपयोगी पडेल व त्यायोगे जितका जितका मनुष्य संसारात गुरफटतो, तितकी तितकी श्रीहरीची प्राप्ती दुरावते. म्हणून ही सर्व उपाधी होय, म्हणजे संसारांत गुरफटण्याचे साधन होय.

**भावबळें आकळे एऱ्हवीं नाकळे ।**

**करतळीं आंवळे तैसा हरी ॥२॥**

श्रीहरी हा कर्माचे फळ नव्हे म्हणून कोणत्याही कर्माने त्याची प्राप्ती होऊ शकत नाही. कर्म हे उत्पन्न होणारे व नाश पावणारे असल्यामुळे कर्माचे फळही उत्पन्न

होणारे व नाश पावणारेच असते. परमात्मा नित्य आहे म्हणून त्याच्या प्राप्तीचे साधनही नित्यच असावयास पाहिजे. भगवंतावाचून दुसरी नित्य वस्तूच नाही म्हणून तोच स्वतःच्या प्राप्तीचे साधन होऊ शकतो. भगवंताची नामरूपे व सगुणसाकार श्रीहरी नित्य असल्यामुळे त्याची अद्वैतसत्ताही नित्यच आहे; म्हणून भावबळे म्हणजे श्रीहरीची अद्वैतसत्ता ओळखून त्या दृढ विश्वासाने श्रीहरीचे नामस्मरण केल्यास सगुण श्रीहरीची म्हणजे परमानंदाची प्राप्ती अचूक होऊ शकते. याशिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनाने त्याची प्राप्ती होऊ शकत नाही. ही श्रीहरीची निःसंदेह प्राप्ती ही, हातात प्रत्यक्ष आवळा असावा, त्याप्रमाणे होते. दृढ श्रद्धेने मन निःशंक होते व निःसीम प्रेमयुक्त अखंड नामस्मरणाने चित्त भगवदाकार बनते.

''कळे न कळे ज्या धर्म। ऐका सांगतों रे वर्म। माझ्या विठोबाचे नाम। अट्टाहासें उच्चारा ॥१॥ तो या दाखवील वाटा। जया पाहिजे त्या नीटा। कृपावंत मोठा। पाहिजे तो कळवळा ॥२॥ तुका म्हणे मोल। नलगे द्यावें, वेचा बोल। विठ्ठल विठ्ठल। ऐसा छंद मनासी ॥३॥''

कोणत्याही बहिरंग साधनांचा ईश्वरप्राप्तीस काहीच उपयोग नाही. अंतरंग, मुख्य व अचूक साधन म्हणजे अखंड भगवन्नामस्मरण असा दृढ विश्वास पाहिजे.

सारांश, भक्तिभावानेच श्रीहरी आकळला जातो. गीतेच्या नवव्या अध्यायात भगवंताची प्राप्ती सांगताना भगवान् म्हणतात ''प्रत्यक्षावगमम्'' यावर टीका करताना माउली म्हणते ''प्रत्यक्ष फावो लागे तैसे। आपैसयाचि॥ *ऐसें सुलभ आणि सोपारे'' या श्रीहरीची प्राप्ती इतकी सहज व प्रत्यक्ष होते की, तशी एका श्रीहरीवाचून कोणत्याच वस्तूची होत नाही. म्हणजे आपले अंतःकरण तद्रूप होऊन जाते. श्रीहरीवाचून इतर पदार्थास जाणताना जाणणारे अंतःकरणच तद्रूप व जाणला जाणारा पदार्थ हे अलग राहतात, तरी आपण याला प्रत्यक्ष होणे म्हणतो. पण-

श्रीहरीची प्राप्ती इतकी प्रत्यक्ष होते की जितके आपण आपल्याला प्रत्यक्ष आहो, तितकाच श्रीहरी प्रत्यक्ष होतो, म्हणजे आपणच श्रीहरी होतो किंवा परमानंदरूप होतो. यापेक्षा प्रत्यक्ष तेहि दूरच ठरते.

**पारियाचा रवा घेतां भूमिवरी ।**

**यत्न परोपरी साधन तैसें ॥३॥**

***इतर बाह्य साधनांचा भक्तीत अनुपयोग***

(६७)



परमेश्वर प्राप्तीची, तीर्थाटनादी कर्मरूप बाह्य साधने, जी शास्त्रांतून सांगितली आहेत, त्यांच्या अनुष्ठानाने श्रीहरीच्या प्राप्तीची आशा करणे म्हणजे जमिनीवर सांडलेला पारा वेचू पहाण्यासारखे आहे. जमिनीवर सांडलेला पारा वेचावयाला गेले असता, कितीही प्रयत्न केले तरी वेचला जात नाही. वेचण्याच्या प्रयत्नांत त्या पाऱ्याचे, हातात येणार नाहीत, इतके सूक्ष्म कण होत जातात. त्याचप्रमाणे कर्मरूप बाह्य साधनांची स्थिती होते. ही सर्व प्रयत्नरूप साधने अहंकाराशिवाय होऊ शकत नाहीत, व कर्तृत्व-अहंकार आहे तोपर्यंत भक्ती घडत नाही. भक्तीवाचून सगुण श्रीहरीची प्राप्ती होणे शक्य नाही. भक्तीची स्थिती अशी आहे की, तेथे अहंकार तिळमात्र देखील चालत नाही. अभिमान उत्पन्न झाला की, सगुण श्रीहरी तात्काल अंतर्धान पावतो. म्हणून कर्मरूप साधनांचा व अहंकाराचा त्याग करूनच निःसाधन दीन होऊन अखंड नामस्मरण केले असता श्रीहरीची प्राप्ती होते. अहंकार आहे तोपर्यंत साधन आहे व साधन आहे तोपर्यंत अहंकार आहे. अहंकार गेला की, तो निःसाधन झाला.

सर्व प्रयत्न-साधने साहंकाराकरिताच सांगितली आहेत. निरहंकारी साधकांकरिता नामस्मरणावाचून दुसरे साधन नाही.

श्रीहरिनामाखेरीज इतर साधने, साध्य जे असते ते प्राप्त झाल्यावर, बंद पडतात. पण साध्य प्राप्त झाल्यानंतरही पुढे अखंड नामस्मरण चालूच राहते.

''माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे'' तसेच ''बीज आणि फळ । हरीचें नाम'' असे श्री तुकाराम महाराज म्हणतात.

नामस्मरण हे प्रथम साधन असले तरी शेवटी तेच साध्यही आहे. ज्ञानोत्तर

**रूपाविण नाम न पावेचि शोभा ।**

**नामाविण शोभा रूप तेही ॥**

**नामे विप्रलंभ, रूपाने संयोग ।**

**श्री आळंदीरंग दोन्ही ठायी ॥**

॥ श्रीगुलाबरावमहाराज अभंग २९४ ॥

भक्तांचे नामस्मरण केवळ लोकसंग्रहासाठी नसून भगवंताच्या निरतिशय शुद्ध सात्त्विक प्रेमामुळेच असते.

*वृक्षाचेंहि पान हाले ज्याचे सत्ता । राहिली अहंता मग कोठें?
*तुका म्हणे विठो भरला सबाही''

या तुकाराममहाराजांच्या वचनाप्रमाणे श्रीहरीच्या अद्वैत सत्तेवर दृढ विश्वास ठेवून दीनपणाने नामस्मरण केल्यास अहंता उठण्याला अवकाशच राहत नाही, असा ''भावबळें आकळे'' या पदाचा अर्थ आहे.

ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण ।
दिधलें संपूर्ण माझे हाती ।।४।।

सद्गुरु गुणातीत, गुरुकृपेचे आभार

श्रीज्ञानेश्वरमहराज म्हणतात, माझे सद्गुरु निवृत्तिनाथ निर्गुण म्हणजे सत्वरजतम या मायागुणरहित आहेत, सगुण आहेत तरी पूर्ण उपाधिरहित आहेत.

''यालागीं वस्तुप्रभा । वस्तुचि पावे शोभा । जात असे लाभा । वस्तुचिया''

परब्रह्म वस्तु, आपल्या आनंदाने आनंद भोगण्याकरिता सगुणसाकार होते. परब्रह्माच्या सगुणसाकार होण्यात परब्रह्मच स्वतः कारण आहे. परब्रह्मावाचून दुसरे अज्ञानादिक पदार्थ मुळीच अस्तित्वात नसल्यामुळे सगुणसाकाराला मायिक म्हणणे हेच अज्ञान होय, असे माउलीनें अमृतानुभवात सिद्ध केले आहे.

शंकराचार्यहि ''ब्रह्मैवेदं विश्वं समस्तमिदं जगत् वरिष्ठं वरतमम्'' हे सर्व नामरूपात्मक जगत् अत्यंत पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे.''अब्रह्मप्रत्ययः सर्वोऽविद्यामात्रः'' जग ब्रह्मस्वरूप नाही म्हणणे हीच अविद्या होय.किंबहुना सर्वनामरूपासह जग, पूर्ण, अत्यंत शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे हे प्रतिपादन करून सांगण्याकरिताच वेदान्ताचा उपक्रम आहे. जगत् मायिक आहे हे सांगण्याकरिता वेदान्ताची प्रवृत्ती नाही. जग मायिक आहे या म्हणण्याचा अर्थही जड विनाशी असे जगच नाही - आहे ते नामरूपात्मक जग ब्रह्मरूप आहे असाच आहे.

ज्यांना नामरूपात्मक जगत् पूर्ण ब्रह्मस्वरूप दिसत नाही, त्यांचा तो जगत्प्रत्यय मिथ्या आहे, मायिक आहे असे आचार्य, श्रीज्ञानेश्वरमहाराजांदिकांचे सांगणे आहे.याप्रमाणे अज्ञानाच्या अभावी वस्तुतः नामरूपे ही देखील पूर्ण ब्रह्मस्वरूप आहेत म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, माझे सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथ सगुणसाकार रूपानेच, पूर्ण, निरूपाधिक, परमानंदस्वरूप आहेत, व त्यांनी आपल्याला माझे हाती दिले म्हणजे मलाही पूर्ण चिद्घनानंद करून ठेविले.

(६८)



ब्रह्मज्ञानाच्या योगाने, सृदिानंदाचा त्रिविधपणा जाऊन एक सृद्घनानंद प्रत्यय येत नाही. त्यात सृद् या दोन अंशांची प्रतीती राहते व नामस्मरणादी प्रेमरूप भक्तीने आनंदांश प्रधान होऊन त्यात सृदिानंदाचा त्रिविधपणा जाऊन एक सृदिानंदघन प्रत्यय येतो. यात सर्व तिन्ही अंश एकरूप झाल्याने व कोणताही अंश उणा नसल्यामुळे, असा सृद्घनानंद प्रत्यय संपूर्ण प्रत्यय होय व तो संपूर्ण प्रत्यय निवृत्तिनाथांनी मला दिला असे माउलीचे म्हणणे आहे.ज्याप्रमाणे केवळ पाणीच गोठते व त्याला आपण बर्फ म्हणतो त्याप्रमाणे सगुण साकार परमात्मा घन म्हणजे गोठलेले पूर्ण ब्रह्म होय.एवढा थोर लाभ ज्या श्रीगुरु निवृत्तिनाथांनी करून दिला त्या सद्गुरूंचे उपकार कशानेही फिटत नाहीत म्हणून जन्मोजन्मी निःसीम प्रेमरूप भक्ती करावी असे शेवटी श्रीज्ञानेश्वरमहाराज सूचित करतात.

।। श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।।

०००

।।श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ।।श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ।।

---

## पाठक्रम : १३ अर्थक्रम : १२

---

**समाधि हरीची समसुखें विण । न साधेल जाण द्वैतबुद्धि ।।१।।**
**बुद्धीचे वैभव आन नाहीं दुजे । एका केशवराजें सकळ सिद्धि ।।२।।**
**ऋद्धिसिद्धिनिधि अवघीच उपाधी । जंव त्या परमानंदी मन नाहीं।।३।।**
**ज्ञानदेवा रम्य रमलें समाधान । हरीचें चिंतन सर्वकाळ ।।४।।**

*

प्रतिज्ञा - हरिरूप ऐक्यत्व फळ, इतर योगादी सिद्धींचा निषेध, भक्ताचे हरिरूपीं समाधान.

*

सरळ अर्थ - जीवब्रह्मैक्यावाचून, श्रीहरीचे ठिकाणी जोपर्यंत द्वैतबुद्धी आहे तोपर्यंत समाधी साधणार नाही. बुद्धीने अखंड समाधीत असावे हेच खरे बुद्धीचे मोठेपण आहे, दुसरे नाही. पण एका श्रीहरीच्या नामस्मरणाने सर्व सिद्धी होते. ऋद्धिसिद्धिनिधी वगैरे सर्व श्रीहरीच्या प्रेमावाचून उपाधी आहेत.श्रीज्ञानेश्वरमहाराज

म्हणतात, सर्व काळ हरिचिंतनाने मला अत्यंत गोड समाधान प्राप्त झाले.

**समाधि हरीची समसुखेंविण ।**

**न साधेल जाण द्वैतबुद्धि ॥१॥**

***हरिनामाने ऐक्य-समाधि***

विवरण - या चरणाचे दोन अर्थ होतात. समसुखावाचून म्हणजे जीवब्रह्मैक्यज्ञानावाचून, द्वैत बुद्धि म्हणजे जीव निराळा व परमेश्वर निराळा अशा बुद्धीने हरीची समाधी म्हणजे हरीशी ऐक्य साधणार नाही.कारण जीवब्रह्मैक्य ज्ञान नसेल तर द्वैतबुद्धीने परमेश्वराचे ध्यान केले तर आपल्या सुखाकरिताच ते होईल. द्वैतबुद्धीमध्ये ''आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति'' या सिद्धान्तानुसार आपले प्रेम अधिक असते व त्यामुळे परमेश्वराशी एकरूप होणे शक्य नसते. ते जीवब्रह्मैक्यज्ञानाने श्रीहरीवर प्रेम करून त्याचे ध्यान केले असता द्वैत नाहीसे होऊन पूर्ण श्रीहरीशी ऐक्य साधते.दुसरा अर्थ असा आहे की, समसुखेविण म्हणजे जीवब्रह्मैक्याचे ज्ञान नसून देखील हरिनामस्मरणाने, हरीची समाधी, श्रीहरीशी ऐक्य साधेल, पण द्वैतबुद्धी न साधेल, द्वैतबुद्धी कधीही उत्पन्न होणार नाही. हरिनामस्मरणाने ऐक्याच्या ज्ञानावाचून ऐक्य होते व द्वैतबुद्धीही नष्ट होते असा भाव. त्या सगुणरूपातच निर्गुणस्वरूप सामावलेले असते.''नाम वज्रकवच । तोचि निर्गुणाचा अभ्यास'' असे माउलीचे सांगणे आहे. जाण म्हणजे पक्के समज.

**बुद्धीचे वैभव आन नाहीं दुजे ।**

**एका केशवराजें सकळ सिद्धि ॥२॥**

***बुद्धीचे थोरपण - हरिरूप ऐक्य फळ***

बुद्धीत सद्चिदानंद परमात्मा मूळचाच भरलेला असतो; पण विषय हे आपण प्रयत्नपूर्वक बुद्धीत ठासून भरतो.विषयासक्तीने बुद्धी अशुद्ध होऊन तिचे मूळचे शुद्ध स्वरूप नाहीसे होते. भगवत्प्राप्तीसारखा लाभ भुवनत्रयांत दुसरा कोठेही दिसत नाही. बुद्धीची खरी मूळची श्रीमंती भगवत्प्राप्तीतच आहे, अशा बुद्धीलाच व्यवसायात्मिका बुद्धी म्हणतात. जीवांनी बुद्धीतील विषयवासना समूळ काढून टाकली की, त्याची बुद्धी शुद्ध ब्रह्मस्वरूप होते.श्रीहरीचे ध्यान व ध्यानाने श्रीहरीशी ऐक्य साधणे यापेक्षा आपल्या बुद्धीचे दुसरे वैभव नाही.जीव हा श्रीहरीच असल्यामुळे, श्रीहरीला निराळे ठेवून श्रीहरीची प्राप्ती होत नाही. ज्याप्रमाणे घट केला असता



त्यात आकाश भरावे लागत नाही, ते आपोआप भरलेलेच असते त्याप्रमाणे बुद्धी ही स्वभावतः ब्रह्मरूप आहे. ते तिचे वैभव, देहाहंतेचे शहाणपण वागविल्यामुळे, नाहीसे झाले.पण ते नामस्मरणाने श्रीहरीचे ध्यान घडून पुनः तिला प्राप्त होते.बुद्धीत श्रीहरीचे ध्यान ठसावले म्हणजे त्याला काहीच अप्राप्त नसते. श्रीहरीच्या प्राप्तीने सर्व सिद्धी प्राप्त होतात.ज्या बुद्धीने सद्चिदानंद षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीहरीला आपल्या ठिकाणी साठवले, तिचे वैभव काय वर्णन करावे! सद्चिदानंद षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीहरीपेक्षा दुसरे काय श्रेष्ठ आहे! म्हणून अशा श्रीहरीच्या प्राप्तीने सर्व सिद्धी प्राप्त होतात. काहीच प्राप्तव्य उरत नाही. ''किमलभ्यं भगवति प्रसन्ने श्रीनिकेतने'' लक्ष्मीपति परमात्मा प्रसन्न झाल्यावर काय अलभ्य आहे असे शुकाचार्य म्हणतात.

''जैसी दीपकलिका घाकुटी । परी बहु तेजाते प्रगटी । तैसी सद्बुद्धि हे थेकुटी । म्हणो नये ॥ पार्था बहुती परी । हे अपेक्षिजे विचारशूरी । जे दुर्लभ चराचरी । सद्वासना । आणिका सारिखा बहुवस । जैसा न जोडे परिस । कां अमृताचा लेश । दैवगुणे ॥ तैसी दुर्लभ जे सद्बुद्धि । जिये परमात्माचि अवधि। जैसा गंगेसी उदधि। निरंतर॥ तैसे ईश्वरावांचुनि कांही । जिये आणिक लाहणें नाही । ते एकचि बुद्धि पाही । अर्जुना जगी ॥'' (ज्ञा. अ. २ ओ. २३८-२४२)

असे ज्ञानेश्वरीतही ईश्वरपरायण बुद्धीचे महत्त्व महाराजांनी गायिले आहे.

**ऋद्धि सिद्धि निधि अवधीच उपाधि ।**

**जंव त्या परमानंदी मन नाही ॥३॥**

***इतर सिद्धींचा निषेध***

परमात्मा प्रसन्न झाल्यावर भक्तांस अलभ्य असे काहीच राहत नाही. सर्व सिद्धी प्राप्त होतात पण त्या सिद्धीत गुंतून मात्र पडू नये.कारण ''व्युत्थाने सिद्धयः'' या सिद्धीचा उपयोग करताना जीवाचे परमेश्वर श्रीहरीपासून व्युत्थान होते. प्रेमरूपसमाधी राहत नाही.''समाधावुपसर्गाः'' म्हणून ऐक्यसमाधीत त्या उपसर्ग

**निर्गुणी अहंता, सगुणी दीनता ।**

**ऐसी स्थिती येतां उणे काय ॥**

॥ श्रीगुलाबरावमहाराज अभंग ८२५॥

म्हणजे अडथळा करितात. म्हणजे प्रेमभक्तीत अंतर पाडतात.

* ऋद्धी म्हणजे आपल्यापाशी असलेल्या वस्तूंची वाढ होणे.

* सिद्धी म्हणजे अप्राप्त वस्तू प्राप्त होणे.

* निधी म्हणजे सापडलेला ठेवा पुनः कमी न होणे.

ऋद्धी ह्या काम्यर्माने प्राप्त होतात. जोपर्यंत परमानंदरूप परमेश्वराचे ठिकाणी प्रेमाने मन स्थिर होत नाही, तोपर्यंत ह्या सर्व सिद्धी भक्तीत अंतर पाडतात व परमार्थाचा घात करितात; पण श्रीहरीच्या ठिकाणी दृढ प्रेमाने मन जडले की, ''तथापि तत्परा राजन् नहि वांच्छन्ति किंचन''

मग भगवद्भक्त भगवत्प्रेमापुढे कोणत्याही सिद्धीची मुळीच इच्छा करीत नाही. सिद्धीकडे ढुंकूनहि पहात नाही. मागील निरूपणावरून असे स्पष्ट दिसते की, श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी परमानंद हा सगुण श्रीहरीरूपच ठरविला आहे. त्या परमानंदी म्हणजे सगुण श्रीहरीचे ठिकाणी असा अर्थ आहे.

**ज्ञानदेवा रम्य रमले समाधान ।**

**हरीचे चिंतन सर्वकाळ ॥४॥**

***भक्ताचे हरिरूपीं समाधान***

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मला सर्वकाळ हरिचिंतनरूप भक्ती केल्याने रम्य म्हणजे अत्यंत गोड समाधान म्हणजे आनंद प्राप्त झाला, परमानंद प्राप्त झाला. आत्मा परमप्रेरूप आहे व श्रीहरीच आत्मा आहे, आत्मस्वरूप श्रीहरीशी ऐक्य झाल्याशिवाय परमानंद मिळणे शक्य नाही. म्हणून हरिचिंतनाने ऐक्याच्या ज्ञानावाचून ऐक्य झाले व आनंद प्राप्त झाला. भक्तीनेच ज्ञान व आनंद प्राप्त होतो असा अर्थ. या उपपादनानुसार येथील ''रम्य समाधान'' याचा भक्ती असा अर्थ होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, मला हरिचिंतनातच परमानंदरूप भक्ती प्राप्त झाली. या अभंगात ''सर्वकाळ'' हे जे पद आहे त्यावरून भक्ताला जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थेत रम्य समाधान- गोड ब्रह्मसुखच असते असे सिद्ध होते. जागृतीत नामस्मरण व ध्यान या रूपाने ते असते तर स्वप्नात स्वाप्निक प्रत्यक्ष रूपाने असते आणि सुषुप्तीत ज्ञान नसून मूर्तीकडे चित्ताची एकतानता होते. त्यामुळे तेथेही ते ब्रह्मसुखच भोगतात म्हणजे तिन्ही अवस्थेत त्यांचे देवाशीच ऐक्य असते व त्यामुळे त्यांना परमानंद प्राप्त असतो. ''द्वैतस्याग्रहणं तुल्यमुभयोः प्राज्ञतूर्ययोः'' सुषुप्ती आणि समाधी या दोहोत अद्वैत असते पण सुषुप्तीत अज्ञान असते व समाधीत

(७०)



अज्ञान नसते, इतकाच भेद. भक्तांना मात्र अज्ञानपूर्वक सुषुप्ती नसते. हे 'सर्वकाळ' या पदावरून सिद्ध आहे. तुकाराम महाराजही ''जागृती स्वप्नी पांडुरंग'' असे म्हणतात. म्हणजे दोन अवस्थेचाच उल्लेख करितात त्यावरूनही भक्तांना अज्ञानपूर्वक सुषुप्ती नसते हे सिद्ध होते.

सारांश, अखंड नामस्मरण करणे हेच एकमेव माझे रम्य समाधान आहे व ह्यायोगेच अद्वैत ज्ञानाची व परमानंदाची प्राप्ती होते. ''मुक्तिवरील भक्ति जाण। अखंड मुखी नारायण'' यालाच श्रीतुकाराममहराज ज्ञानोत्तर भक्ती म्हणतात. तसेच गोस्वामी श्रीतुलसीदास महाराजांनी नाममाहात्म्याचे स्वानुभवाचे बोल कितीतरी ठिकाणी लिहून ठेविले आहेत. रामायण बालकांडांत ते म्हणतात–

''रामनाम काले अभिमत दाता । हित परलोक इह पितु माता ॥ नही कलि कर्म, न भक्ति, विवेकु । रामनाम अवलंबन एकु ॥ रामनामको अंक है सब साधन है सून । अंक गये कछु हाथ नहि । अंक रहे दसगुण ॥

॥ श्रीमद्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

*

**पाठक्रम : १४** **अर्थक्रम : १६**

**नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी। कळिकाळ त्यासी नातळती ॥१।**

**रामकृष्ण वाचा अनंतराशी तप। पापाचे कळप जळती पुढे ॥२॥**

**हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा। म्हणती जे वाचा तया मोक्ष ॥३॥**

**ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ॥४॥**

*

प्रतिज्ञा - स्वोपदेश महिमा, नामधारकाची जीवन्मुक्ती, देवतांचे हृदयी विष्णुनामाची ख्याती, नामधारकाविषयी कालनिषेध, नामधारकास दोषांची बाधा नाही. नामाने सर्व साधन सिद्धी व नामधारकास आश्वासन.

*

सरळ अर्थ - जो कोणी रोज अंतःकरणापासून या हरिपाठाचे किंवा हरि हरि या नामाचे रोज नियमाने प्रेमाने पठण करील त्याला कळिकाळाचा स्पर्श होणार नाही. रामकृष्ण हे नाम ज्याच्या वाणीवर अखंड आहे, त्याला अगणित

तपाच्या राशी प्राप्त होतात व पापाचे कळप त्या नामापुढे भस्म होतात. भगवान् शिवही हरि हरि हा मंत्र जपतात. असा हा मंत्र जो कोणी वाचेने उच्चारील त्याला अत्यंत दुःखनिवृत्ती व परमानंद प्राप्तिरूप मोक्ष प्राप्त होईल. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की नारायण नामाचा पाठ केल्याने मी उत्तम स्थानाला गेलो.

## नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी ।

## कळिकाळ त्यासी नातळती ॥१॥

***स्वोपदेश महिमा व नामधारकास कालनिषेध***

विवरण - जो कोणी नित्य म्हणजे रोज नियमाने, सत्य म्हणजे अंतःकरणापासून कळकळीने, मित म्हणजे नियमित संख्येने या हरिपाठाचे पाठ किंवा हरिनामाचा जप करील त्याला देखील कळिकाळची भीती नाही. कळिकाळ हा एक शब्दही होतो व त्याचा अर्थ, या अत्यंत पापरूप कलियुगात असा होईल किंवा कळी व काळ असे दोन वेगळे शब्दही घेता येतील. त्यांचे अर्थ कली व यम असे होतील. नामधारकास किंवा हरिपाठ करणाऱ्याला कलीचे दोष लागत नाहीत. कलीचे दोष त्याला स्पर्श करीत नाहीत व काळही त्याला शिवत नाही.

''कलिकाळा नाही बळ। नाम जपे तो सबळ ॥१॥ हरिचिया दासा साचे। नाही भय कळिकाळाचें ॥२॥ एका जनार्दनी काळ। काळ होय तो कृपाळ॥ *तुका म्हणे सत्ता। ज्याची काळाचिये माथा ॥३॥''

रोज नियमित संख्येने नामस्मरण करणाऱ्याला किंवा हरिपाठाचा पाठ करणाऱ्याला जर कळिकाळ शिवत नाही तर अखंड नामस्मरण करणाऱ्याला त्याचा स्पर्श होणे कधीही शक्य नाही हे काय सांगायचे!

सारांश, मिळेल तितका अधिक वेळ नामस्मरणात घालविल्यास जन्माचे सार्थक होईल. नामधारकास कलियुगातील दोषांची व यमाची किंवा यमदूतांची बाधा होणे शक्य नाही. कळिकाळ हा सर्व युगांत अत्यंत दोषाचा काळ सांगितला आहे, व अशा काळात मनुष्य दोषमुक्त राहू शकत नाही. तरी पण अखंड नामधारक हा घोर पापयुक्त अशा कलियुगांत पापनिर्मुक्त राहतो, व म्हणूनच पापकर्माचे शासन करणारा काळ म्हणजे यमधर्मराज हा नामधारकाच्या वाटेला जात नाही. अजामिळाने अंतकाळी नारायण नामाचा उच्चार केला व अंतकाळच्या नामस्मरणाने तो पापमुक्त झाला. यमदूतांच्या पाशातून मुक्त होऊन विष्णुदूतांनी त्यास वैकुंठात





नेले. एवढा नामाचा अगाध महिमा आहे.

''अयं हि कृतनिर्वेशो जन्म कोट्यंहसामपि । यद्व्याजहार विवशो नाम स्वस्त्ययनं हरेः ॥७॥ ऐतेनैव ह्यघोनोऽस्य कृतं स्यादघनिष्कृतम् । यदा नारायणायेति जगाद चतुरक्षरम् ॥८॥ सर्वेषामप्यघवतामिदमेव सुनिष्कृतम् । नामव्याहरणं विष्णोर्यस्तद्विषया मतिः ॥१०॥ (श्रीमद्भागवत स्कंध ६ अ. २)

भावार्थ - श्रीविष्णुदूत यमदूतांस सांगतात की, मोक्षसाधनभूत अशा श्रीहरीच्या नामाचा, ज्या अर्थी अजामिळाने अंतकाळी बेशुद्धीत असतानाही उच्चार केला, त्याअर्थी अनंत जन्मांतील पातकांचे ह्याने प्रायश्चित्त घेतले आहे. भगवन्नामोच्चारण हेच एक सर्वश्रेष्ठ समस्त पापाचे प्रायश्चित होय; कारण नामोच्चारण करणाऱ्या जीवाविषयी नामधारक हा माझा जीवाचा सखा आहे, म्हणून मी सर्व प्रकारे त्याचें संरक्षण केलेच पाहिजे अशी भगवंताची प्रतिज्ञा आहे.

''कलेर्दोषनिधे राजन्नस्ति ह्येको महान् गुणः। कीर्तनादेव कृष्णस्य मुक्तबंधः परं व्रजेत् ॥५१॥ कृते यद् ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः। द्वापरे परिचर्यायां कलौ तत् हरिकीर्तनात् ॥५२॥ (भागवत स्कंध १२ अ. ३)

भावार्थ - हे परिक्षितीराजा, कलियुग समस्त दोषांचा महासागर आहे हे खरे आहे. पण त्यात एक सर्वोत्तम गुण हाच की, भगवंताचे नामसंकीर्तन सतत केल्याने तो समस्त पापदुःखापासून मुक्त होऊन त्याला अखंड परमानंदाची प्राप्ती होते. सर्व युगधर्माचे फळ कलीत एका नामसंकीर्तन साधनाने प्राप्त होते हे त्रिवार सत्य आहे.

''चहुं जुग श्रुति नामप्रभाऊ । कलि विशेष नही आन उपाऊ ।
नहि कलि करम, न भगति विवेकु । रामनाम अवलंबन एकू ॥''
(श्री तुलसीदास- रामायण)

## रामकृष्ण वाचा अनंत राशीतप ।

## पापाचे कळप जळती पुढे ॥२॥

***नामधारकास दोषाची बाधा नाही***

''रामकृष्ण वाचा अनंत राशी तप'' या चरणाचे दोन अर्थ होतात.

(१) एक अर्थ असा आहे की, - पूर्वीची पापे इतर व्रताचरणाने नाहीशी होऊन पुण्यरूप तपाच्या अनंत राशी जेव्हा मनुष्याच्या पदरी असतात, तेव्हाच मनुष्याच्या तोंडाला नाम येते.

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''पुण्य पोषिलीं असाधारणें । तिये तुझें गुण वानणें । देऊनि मज उत्तीर्ण । जालीं आजी ॥ जें जन्मसहस्त्री ओळगिजे । एकवेळ यावया''

''येन जन्मशतैः पूर्वम् वासुदेवः समर्चितः। तन्मुखे हरिनामानि तदा तिष्ठन्ति भारत''

नामदेव महाराज म्हणतात -''अनंत पुण्यराशी घडे ज्या प्राण्यासी । तरीच मुखासी नाम येत''

(२) दुसरा अर्थ असा आहे की - मुखाला हरिनाम आल्याबरोबर अनंतराशी तप केल्याचे पुण्य प्राप्त होते. एका नामस्मरणापुढे देखील अनंत पापांचे समूह भस्म होतात. पापक्षालनाकरिता नामस्मरणाची आवृत्ती केली पाहिजे असे नाही. सकृन्नामस्मरणाने देखील अनंत पूर्व जन्मांतील पापांचे कळप जळून भस्म होतात. ''नामाग्नींने न जळे । ऐंसे पाप कोणी नाही केलें । वाल्मिके बहु पाप जोडिलें । परी नाहीं उरलें नामापुढे ॥६॥ गणिका आणि अजामिळ । इहीं केले दोष कल्लोळ । परि नामाचे अद्‌भूत बळ । जाळी सकळ क्षणार्धे ॥७॥(श्रीधरस्वामी हरिविजय अ.१६)

अजामिळाने काही सारखा अखंड नामजप केला नाही. पुत्रमिषाने कळवळून एकदाच नारायण नामोच्चार केला पण तेवढ्यानेच तो उद्धरून गेला. नामस्मरणाने भूत पापांची निवृत्ती होते; भविष्य पापांची निवृत्ती होत नाही. म्हणून नामस्मरण केल्यावर पुनः पाप करता कामा नये. भविष्य पापनिवृत्तीकरिता पापप्रवृत्तीच नाहीशी झाली पाहिजे व त्याच्या करिता अखंड नामस्मरणाची अत्यंत जरूरी आहे.

''समुद्रवलयांकित पृथ्वीचे दान । करतां समान नये नामा ॥१॥ म्हणऊनि कोणी न करावा आळस । म्हणा रात्रंदिवस राम राम ॥२॥ सकळहि शास्त्रें पठण करतां वेद । सरी नये गोविंद नामे एके ॥३॥ सकळहि तीर्थ प्रयागादि काशी । करतां नामाशी तुळती ना ॥४॥'' नामस्मरणासारखे पुण्य कशानेही प्राप्त होत नाही.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात -''तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नासिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे । जें नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें'' नामधारकाचे ठिकाणी ''वसो न शके पाप'' म्हणजे पाप राहूच शकत नाही.

श्रीतुकाराम महाराज म्हणतात की- हेंचि माझें तप, हेंचि माझें दान । हेंचि अनुष्ठान नाम तुझें ॥१॥ हेंचि माझें तीर्थ, हेंचि माझें व्रत । सत्य हें सुकृत नाम तुझें ॥२॥ हेंचि माझें कर्म, हाचि माझा धर्म । हाचि नित्यनेम नाम तुझें ॥३॥ हाचि

**(७२)**



माझा योग, हाचि माझा यज्ञ । हेंचि तप ध्यान नाम तुझें ॥४॥ हेंचि माझें ज्ञान, श्रवण, मनन । हेंचि निजध्यासन नाम तुझें ॥५॥ हाचि कुळाचार, हाचि कुळधर्म । हाचि नित्यनेम नाम तुझें ॥६॥ हा माझा आचार, हा माझा विचार । हा माझा निर्धार नाम तुझें ॥७॥ तुका म्हणे दुजें सांगायासी नाही । नामेंविण कांही धन वित्त ॥८॥

## हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा।
## म्हणती जे वाचा तया मोक्ष ॥३॥

***देवतांच्या हृदयीं नामख्याती व नामधारकाची जीवन्मुक्ती***

भगवान् आदिगुरु श्रीशंकर श्रीविष्णूच्या नामाविषयी अत्यंत आदर बाळगतात. म्हणूनच सदा हरि हरि मंत्राचा जप करितात. भगवान् श्रीशंकराप्रमाणे सर्वच देवतांचे अंतःकरणात भगवन्नामाविषयी अत्यंत पूज्य भाव आहे. या एका नामानेच सच्चिदानंद सगुण श्रीहरीशी ऐक्यरूपी मोक्ष साधतो व नामधारक जीवन्मुक्त होतो. अत्यंत दुःखनिवृत्ती व परमानंदप्राप्ती हेच मोक्षलक्षण येथे घेतले आहे. पण हा मोक्ष साधण्याकरिता ज्या प्रेमाने भगवान् श्रीशंकर हरिनाम अखंड जपतात तितक्या प्रेमाने अखंड नामस्मरण ज्याचे होईल त्यालाच मोक्ष मिळतो यात शंका नाही.

नाथ म्हणतात - ''नाम घेतां हे वैखरी । चित्त धांवे विषयांवरी ॥१॥ कैसें होताहे स्मरण । स्मरणामाजीं विस्मरण ॥२॥ नाम रूपा नव्हता मेळ । नुसता वाचेचा गोंधळ ॥३॥ एका जनार्दनीं छंद । बोलामाजीं परमानंद ॥४॥

नानाप्रकारचे विषयाचे प्रेम चित्तातून नाहीसे झाले नसल्यामुळे, नामस्मरण करताना नामस्मरणाबरोबर भगवंताचे रूप चित्तात यावयास पाहिजे पण ते न येता कोणता तरी विषयच चित्ताला ओढतो व त्याचे ध्यान नामस्मरणाचे वेळीही राहते, म्हणून नामस्मरणाबरोबर भगवंताच्या रूपाचे स्मरण व्हावयाचे ते न झाल्यामुळे भगवंताचे तेथे विस्मरणच असते. अशा स्थितीत नामरूपांचा मेळ नसतो व असे नामस्मरण वाचेचा गोंधळ होय, असे नाथ म्हणतात. नाथ स्वतःचा अनुभव सांगतात की, आम्हाला जनार्दनकृपेने नामाचा छंद म्हणजे नामाची अत्यंत आवड उत्पन्न झाली, त्यामुळे नामस्मरण केल्याबरोबर परमानंद होतो. हा परमानंदच नामस्मरणाने होणारा मोक्ष होय.

कसेही नाम घेतले तरी पाप जळते हे खरे, पण ते तेवढ्याच उपयोगाचे

असते. नामस्मरणद्वारा भगवंताचे नामोच्चारण घडत असले तरी हृदयात भगवंताच्या रूपाचे ध्यान नसल्यामुळे त्या नामोच्चारात भगवंताचे विस्मरण असते. नामस्मरण एकाचे व ध्यान दुसऱ्याचे ह्यालाच वाचेचा गोंधळ म्हटले आहे. नामस्मरणाच्या आवडीने नाम घेतले असता विषयाचे प्रेम अनायासे तुटते व विषयाचे ध्यान जाऊन भगवद्रूपाचे ध्यान चित्तात ठसावते. जसजसे चित्तात भगवंताचे रूप दृढ राहील, तसतसा जीवाचा अहंकार गलीत होऊन तो भगवत्स्वरूप बनत जातो. ''ज्याचे जया ध्यान । तेंचि होय त्याचे मन ।। गोविंद गोविंद । मना लागलीया छंद ।। मग गोविंद ते काया । भेद नाही देवा तया ।। तुका म्हणे अळी। जेवीं नुरेचि वेगळी ।।''

सगुण श्रीहरिप्राप्ती किंवा परमानंदप्राप्ती करून घ्यावयाची असेल तर हरिनामाचे निर्गुण प्रेम म्हणजे विनासाहित्य प्रेम उत्पन्न होईल अशी खटपट केली पाहिजे. ज्याप्रमाणे, आपला गुणवान् नसलेलाही मुलगा आपल्याला आवडतो, त्याप्रमाणे गायन व त्याचे साहित्य-सामुग्रीच्या सहाय्यावाचून देखील गायिलेले नाम चित्ताला ओढून घेणारे वाटले पाहिजे. असे भगवन्नामाचे प्रेम भगवानच आपण याचना करीत राहिल्यास देतो,

***नामाचे दहा अपराध***

पण भगवन्नामस्मरण निरपराध म्हणजे नामाचे अपराध न होतील याची काळजी घेतली पाहिजे. नाथ म्हणतात– ''नाम स्मरता म्हणुनि आचराल दोष । तरी श्रवण मनन भक्ति पडली ओस''

नामस्मरण आम्ही करितो, आता आमच्याकडून पापही घडले तरी हरकत नाही असे म्हणून जर नामस्मरण कराल तर श्रवण-मनन-भक्ती मुळीच घडणार नाही.

पद्मपुराणात नामाचे दहा अपराध सांगितले आहेत. भगवत्प्राप्तीकरिता ते टाळले पाहिजे.

(१) नामधारक संतांची निंदा

(२) इतर पापकर्मे करून भगवन्नामाचीही निंदा करणारा जो असेल अशा दुर्जनांस नाममाहात्म्य सांगणे.

(३) शिव विष्णु यात भेद पहाणे.

(४) नाममाहात्म्य सांगणाऱ्या श्रुतिशास्त्र व संत वचनावर श्रद्धा नसणे.

**(७३)**



(५) भगवन्नामाचे प्रेम असलेल्या भगवद्भक्त श्रीगुरुवचनावर विश्वास न ठेवणे.

(६) नामावर विश्वास नसून स्मृत्यादी शास्त्रांची निंदा करणे.

(७) नामाचे माहात्म्य सांगणारी शास्त्रवचने खोटी मानणे.

(८) आम्ही नामस्मरण करितो, आता आम्हाला पापाची भीती नाही असे म्हणून शास्त्राने निषिद्ध ठरविलेले आचरण करणे.

(९) नाम जपतो म्हणून मद्यमांस सेवन करणे. भंग्याच्या मुलीशी लग्न लावणे. महारामांगाबरोबर जेवणे. विष्णुनाम जपतो म्हणून शिवाचा द्वेष करणे. नामधारक म्हणून वैश्वदेवादी पंचमहायज्ञ न करणे. इत्यादी, अशा अनेक प्रकारच्या विहित धर्मांचा त्याग करणे.

(१०) शिवविष्णूंच्या नामासमान इतर इंद्रादी देवतांची नामे समजणे.

असे हे दहा अपराध न होऊं देता अकृत्रिम प्रेमाने अखंड भगवन्नास्मरण केल्यास श्रीहरीचा प्राप्तीरूप मोक्ष निःसंदेह तात्काळ होतो.

''तीव्र अग्निवीण न पेटे पर्वत । वरील गवत बीजासह ।।१।। तैसे मुखी नाम जंव तीव्र नाहीं । तंव हा विदेही न होय कीं ।।२।। पाकासीं उशीर उगी उतावेळ । करिता जवळ तृप्ति न ये ।।३।। तैसें नामीं मंद सुखी उतावेळ । शुष्क तळमळ दुःख देई ।।५।। उतावळी जैसी तैसें नाम तीव्र । जपतां साचार सुख नित्य ।।६।। तीव्र स्मरणाने जरी न आनंद । पश्चिमे मार्तण्ड उदयेल ।।७।। ज्ञानेश्वरकन्या हातावरी हात । ठेवोनी सांगत सुख नामी''(अभग ४५)

**ज्ञानदेवा पाठ नारायण नाम ।**

**पाविजे उत्तम निजस्थान ।।४।।**

***नामधारकास आश्वासन***

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मी नित्य नारायण नामाचा जप करितो, म्हणूनच मी सर्व दुःखरहित परमानंदरूप झालो. हे माझे मूळचे स्थान होय व याच मूळच्या आपल्या स्थानाप्रत आलो; किंवा जो कोणी नारायण नामाचा नित्य पाठ करील तो आपल्या निजस्थानाला प्रात होईल; अर्थात तो ईश्वरस्वरूप होईल.

।। श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ।।

० ० ०

।।श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ।।श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ।।

*

**पाठक्रम : १५** **अर्थक्रम : १७**

**एकनाम हरि द्वैत नाम दुरी । अद्वैत कुसरी विरळा जाणे ।।१।।**

**समबुद्धि घेता समान श्रीहरि । शमदमावरी हरि झाला ।।२।।**

**सर्वाघटीं राम देहादेहीं एक । सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मी ।।३।।**

**ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा । मागिलिया जन्मा मुक्त झालो ।।४।।**

*

प्रतिज्ञा - वैराग्य व संसाराचे मिथ्यात्व, समबुद्धीचे तात्पर्य, सगुण ध्यानाने शमदमांची प्राप्ती, जीवेश्वर भिन्न ठेवून नाम घेणाऱ्याचा निषेध, अद्वैताचे अंतर् महापुरुष जाणतो.

*

सरळ अर्थ - हरिनाम एक आहे व द्वैत नाम हे दूर आहे. नामाचे अद्वैतवर्म जाणणारा विरळा! नास्मरणानेच समबुद्धी प्राप्त होते व त्या समबुद्धीने परमात्मा सर्वत्र सम आहे असा अनुभव येतो व त्यायोगे शमदमादी साधतात. सर्व स्थावर जंगम प्राण्यांच्या ठिकाणी एक श्रीहरीच वास करितो. ज्याप्रमाणे सहस्त्ररश्मी सूर्य सर्व सृष्टीचा प्रकाशक आहे त्याप्रमाणे एक श्रीहरीच भरला आहे. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, माझ्या चित्तात एक हरिपाठाचाच नेम आहे व त्यामुळे मागील जन्मापासूनही मुक्त झालो.

**एक नाम हरि द्वैत नाम दुरी ।**

**अद्वैत कुसरी विरळा जाणे ।।१।।**

### ***वैराग्य व संसाराचे मिथ्यात्व***

विवरण - ''द्वैत नाम'' म्हणजे वेदादी शास्त्रे होत. एका हरिनामावाचून जेवढे काही सृष्टीत शब्द आहेत ते द्वैताचा बोध करून देणारे असल्यामुळे, अद्वैतरूप श्रीहरिपासून दूर आहेत किंवा त्या शब्दांपासून श्रीहरी दूर आहे. त्यांच्या साह्याने श्रीहरीची प्राप्ती होत नाही. हे सर्व शब्द, वेदापासून त्यांच्या वाच्यार्थासह प्रगट





झालेले आहेत. शब्दाचा व त्याच्या वाच्यार्थाचा औत्पत्तिक म्हणजे स्वाभाविक नित्य संबंध आहे. तो संबंधही अनादी सृष्टिव्यवहारानुसार जीवांनीच कल्पिलेला आहे.

हे वेदापासून प्रगट झालेले शब्द तीन प्रकारचे आहेत. लौकिक, अलौकिक व अभावरूप.

घट, पट, मनुष्य, पशु, वृक्ष, पाषाण, हे सर्व शब्द लौकिक होत व त्यांचे अर्थ त्या त्या नावाचे पदार्थ होत. म्हणजे मृत्युलोकात जीवंतपणी प्रत्येकाच्या ज्ञानाने कळणाऱ्या पदार्थांच्या वाचक शब्दांना * लौकिक शब्द म्हणतात.

मेल्यावर परलोकात ज्ञात होणाऱ्या पदार्थांच्या वाचक शब्दांना * अलौकिक शब्द म्हणतात. जसे स्वर्ग, इंद्र इत्यादी.

आणि पदार्थाचे अस्तित्व नाही असा बोध करून देणाऱ्या शब्दांना *अभाव-वाचक शब्द म्हणतात. *प्रागभाव,*प्रध्वंसाभाव वगैरे. ''वाचारंभणं विकारो नामधेयम् मृत्तिकेत्येव सत्यम्'' ज्याप्रमाणे मातीचे घडे इत्यादी कार्ये, मातीवाचून स्वतंत्र वस्तुस्वरूपाने नसतात, त्या सर्वांत एक माती वस्तुच खरी असते, घडे वगैरे कार्य नुसते नाममात्रच असते, त्याप्रमाणे वेदापासून शब्दार्थरूप सर्व सृष्टी, श्रीहरीच्या ठिकाणी भासते. तिला स्वतंत्र वस्तुत्व व अस्तित्व नाही. ती शब्दमात्र आहे म्हणून त्या सृष्टिविषयीची सत्यबुद्धी सोडून देऊन विषयासक्ती सोडावी असे वेदान्तशास्त्राचे म्हणणे आहे.

ज्याप्रमाणे दोरीवर भासणारा सर्प, मुळीच अस्तित्वात नसल्यामुळे, वस्तुतः सर्प हा शब्द आपण खरी वस्तु असलेली जी दोरी तिलाच लावला. तिचाच तो वाचक होतो असे म्हणावे लागते, त्याप्रमाणे ज्या श्रीहरीच्या अधिष्ठानावर वेदापासून शब्दद्वारा सृष्टी निर्माण झाली ती वेदान्तविचारानुसार काल्पनिक म्हणजे मुळीच अस्तित्वात आली नसल्यामुळे सृष्टी म्हणजे श्रीहरीरूप अधिष्ठानाची विपरीत कल्पना होय व त्या विपरीत कल्पनेनुसार श्रीहरीचाच, आपण सृष्टीतील शब्दांनी निर्देश करितो. म्हणून ते सर्व शब्द अशारीतीने श्रीहरीचेच वाचक ठरतात मग सृष्टीतील शब्द भगवंतापासून दूर आहेत किंवा त्याच्या योगाने श्रीहरीची प्राप्ती होत नाही, असे कां म्हणावे?

अशी शंका उद्‌भवली तर तिचे उत्तर हे आहे की, सृष्टीतील सर्व शब्द भगवंताचे वाचक होतील पण तसे ते वाचक होण्याकरिता, अनादी अविद्याभ्रमाने आत्मस्वरूप विसरून प्रत्येक शब्दाच्या एका विवक्षित अर्थाची जीवाने जी कल्पना केली आहे व त्यामुळे अमुक शब्दाचा अमुक अर्थ असे जीवाच्या मनाने दृढ घेतले

आहे ते त्यांच्या अंतःकरणातून निःशेष निघून गेले पाहिजे; नव्हे त्या अर्थाचा विसर पडल्यावाचून सृष्टीतील शब्द भगवंताचे वाचक होणार नाहीत. याच अर्थाने ''यावन्ति वेदाक्षराणि तावन्ति हरिनामानि'' हे वाक्य, सर्व वेदातील अक्षरे हरीचीची नावे आहेत असे म्हणते. वेदाक्षरांतून दुसऱ्याच पदार्थाचा बोध होत असतानाही तशी वेदाक्षरे हरीची नामेच आहेत असा त्या वाक्याचा अर्थ केल्यास, भगवन्नामस्मरणाचा उपदेश करणाऱ्या संतांना कोणीही विचारील की ''महाराज! आम्ही भगवन्नामाशिवाय क्षणभर देखील रिकामे राहत नाही. आम्हाला कशाला नामाचा उपदेश करता!'' सारांश, वेदातील शब्द व तेथूनच उत्पन्न झालेले सर्व सृष्टीतील शब्द यांच्या जीवकल्पित अर्थाची लक्षणा केल्याखेरीज- म्हणजे त्यांचा व्यवहारात जो अर्थ होतो तो सोडून दिल्याखेरी- ते शब्द भगवन्नामे होत नाहीत. शब्द ऐकल्याबरोबर जो अर्थ एकदम लक्षांत येतो तो त्यांचा वाच्यार्थ द्वैतरूप आहे म्हणून ते हरीपासून दूर आहेत.

पण हरिनामाचे सृष्टीतील नामासारखे नाही. हरी हे नाम साक्षात् श्रीहरीचे वाचक असून जीवही तसेच समजतो. मागे दाखविल्याप्रमाणे स्वयं श्रीहरी परिपूर्ण सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप असल्यामुळे, त्याचे नावही, त्याच्या रूपाप्रमाणे पूर्ण सच्चिदानंदघन ब्रह्मच आहे असे नाथ म्हणतात ''एका जनार्दनी नाम। शुद्ध चैतन्य निष्काम॥'' तुकाराम महाराज म्हणतात, ''तुका म्हणे नाम। चैतन्य निजधाम॥'' श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''नाम परब्रह्म वेदार्थी'' सर्व संतांचे एकच म्हणणे आहे. म्हणूनच ते साक्षात् श्रीहरीचे वाचक झाले आहे. *किंवा नामाला वाचक म्हणणेही शोभत नाही कारण नाम व भगवान् यांचा वाचक वाच्य संबंध किंवा तादात्म्यसंबंध आहे व ॐकाराचा तसा वाच्यवाचक संबंध आहे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी भगवदुक्त गीतेचे माहात्म्य वर्णन करिताना असे म्हटले आहे की,'गीता जाणा हे वाङ्मयी । श्रीमूर्ति प्रभूची ॥१६८५॥ शास्त्रें वाच्ये अर्थे फळे । मग आपण मावळे। तैसे नव्हे हे सगळे । परब्रह्मची ॥''[ज्ञाने.] शास्त्रांतील शब्द निरनिराळ्या पदार्थांचे वाचक असल्यामुळे ते पदार्थ प्राप्त झाले की ते वाचक शब्द सुटून जातात पण गीतेचा अर्थ जो भगवान् तो प्राप्त झाला तरी गीतेचे शब्द मावळत नाही म्हणून गीता हीही भगवंताची मूर्तिच होय.

त्याचप्रमाणे नामाविषयीही असे म्हणता येते की, नामाने भगवत्प्राप्ती झाली तरी वेदादी शास्त्र-शब्दाप्रमाणे नाम मावळत नाही; ते राहते व त्या नामस्मरणानेच ज्ञानोत्तर पराभक्ती घडते म्हणून हरीनाम भगवंताचे वाचक नसून भगवत्स्वरूपच





आहे. म्हणूनच ज्या ॐकारापासून वेदादी शब्द वाङ्मय निर्माण झाले तो ॐ कार हरिनामापासून झाला.

नामदेवमहाराज म्हणतात. ''नामा म्हणे नाम ॐकाराचे मूळ ॥'' आणि ॐकारापासून सर्व वेद निर्माण झाले हे शास्त्रांचे म्हणणे आहे, तेव्हा नामापासून ॐ कार व, ॐ कारापासून वेद आणि वेदांपासून सर्व शब्दसृष्टी अशी उत्पत्ती परंपरा असल्यामुळे द्वैतसृष्टी उत्पन्न होण्यापूर्वी असणाऱ्या श्रीहरीचे 'हरी' हे नाम सृष्टीतील इतर शब्दाप्रमाणे द्वैतरूप किंवा द्वैताचा बोध करीत नाही ते अद्वैतरूप श्रीहरीचाच बोध करून देते, म्हणून ते अद्वैतरूप आहे. म्हणूनच ते अद्वैतरूप हरीला प्राप्त करून देणारे होते व वेदाक्षरांपेक्षा श्रेष्ठ आहे. पण हरिनामाची अद्वैतस्थिती किंवा अद्वैतवर्म विरळा जाणतो.

**समबुद्धि घेतां समान श्रीहरि ।**

**शमदमावरी हरि झाला ॥२॥**

***समबुद्धीचे तात्पर्य व सगुणध्यानानें शमदमांची सिद्धी***

समबुद्धी म्हणजे रागद्वेषरहित ब्रह्मबुद्धी. वास्तविक पाहता आत्मस्वरूपाचे ठिकाणीच स्थिर होणे हा बुद्धीचा स्वाभाविक धर्म आहे पण ती मन, इंद्रिये यांच्या स्वाधीन झाल्यामुळे इंद्रिये व मन यांना आवडणाऱ्या विषयाविषयी राग व नावडणाऱ्या विषयी द्वेष असे रागद्वेष तिच्या ठिकाणी उत्पन्न होतात व त्या रागद्वेषांच्या द्वारा बुद्धीत विषय शिरलेले असता, या मनइंद्रियांच्या तावडीतून बुद्धी मोकळी झाली असतां ती सम होते. या समबुद्धीने सर्वत्र समस्वरूपाने असलेला श्रीहरीच घेतला जातो. निर्गुण स्वरूपाने जसा श्रीहरी सर्वत्र सम आहे तसा तो सगुण स्वरूपानेही सर्वत्र सम आहे, सम म्हणजे कोठेही कमी जास्त नसणे. नामरूप रहित सत्तामात्र परमात्मा सर्वत्र सारखाच असतो. यात शंका येऊच शकत नाही, कमीजास्तपणा किंवा विषमपणा गुणांच्या कमीजास्त होण्यावर अवलंबून असतो. त्रिगुणात्मक सृष्टीतील सत्त्वादी गुण सर्वत्र सारखे नाहीत. कोणत्या पदार्थात सत्व अधिक, तर कोठे रजतम अधिक असा सर्वत्र सृष्टीत निरनिराळ्या प्रमाणांत गुणांचे मिश्रण असल्यामुळे, सृष्टीत सर्वत्र विषमपणा दिसून येतो. पण त्रिगुणरहित परमेश्वराच्या निर्गुण स्वरूपात गुणच नसल्यामुळे ते समच असते व परमेश्वराच्या त्रिगुणरहित सच्चिदानंद षड्गुणैश्वर्यसंपन्न सगुण साकार स्वरूपातही, सच्चिदानंदादी गुण, कमी जास्त जास्त नसून सर्वत्र निरतिशयच असून तो त्या निरतिशय

षड्‌गुणांसह सर्वत्र अणुरेणूत व्यापून आहे, म्हणून सगुण श्रीहरीही सर्वत्र सम आहे.

अशा रीतीने परमेश्वराची दोन्ही सगुणनिर्गुण रूपे समच आहेत.

जीवाच्या अंतःकरणातील रागादी दोषामुळे जीवाला सगुण परमात्मा विषम वाटतो. ज्यांनी इंद्रिये आणि मन यांना, शमदमाने आपल्या स्वाधीन केले अशा भक्तांना सगुण परमात्माही सर्वत्र समच अनुभवाला येतो. शमदम पूर्णपणे साधल्यावाचून भगवंताची सम प्रतीती येत नाही. इंद्रिये सर्वस्वी मनाच्या स्वाधीन व मन इंद्रियांच्या स्वाधीन असल्यामुळे दमाशिवाय शम साधत नाही व शमाशिवाय दम साधत नाही. एकाचा निरोध करावयाला आपण गेलो की, दुसरे खवळते, म्हणून बळजबरीने इंद्रियांचा किंवा मनाचा निरोध करून शमदम साधत नाहीत. शमदमाने मन इंद्रिये यांचा निरोध करून बुद्धीची, इंद्रिये व मन यांच्या तावडीतून सोडवणूक करून तिला आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर करणे हेच समबुद्धीचेही तात्पर्य आहे; आणि हे कार्य भगवन्नामस्मरणानेच सुलभ व निश्चित होते.

''शमदम साधन । नामावांचून न करी जाण ॥'' असे तुकाराममहाराजांचे म्हणणे आहे. समबुद्धीस लागणारी जी शमदमादी साधन संपत्ती आहे, तेथपर्यंतची सर्व साधने नामस्मरणानेच प्राप्त होतात. स्वतंत्र निरोधरूपी प्रयत्न करण्याची आवश्यकता नाही.

नाथ म्हणतात. - योगी विषय त्यागिती । त्यागितां देहदुःखी होती । भक्त भगवंती अर्पिती । तेणें होती नित्यमुक्त ॥ असो.

समबुद्धीचे तात्पर्य, श्रीहरीची सर्वत्र अद्वैतसत्ता पाहून त्याचे आत्मप्रेम करणे

**पाहोनिया डोळा सगुण सावळे ।**
**विषय-सोहळे लया जाती ॥**
**मोकळी इंद्रिये न पाहती विषय ।**
**झाला क्षयरोग वासनेते ॥**

॥ श्रीगुलाबरावमहाराज अभंग ८२४ ॥

(७६)



हे आहे. नामस्मरण हे शमदमादी साधून, श्रीहरीची अद्वैतसत्ता अनुभवाला आणून देते व श्रीहरीचे अवीट प्रेमही प्राप्त करून देते.

## सर्वांघटी राम देहादेहीं एक ।
## सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मी ॥३॥

### *जीवेश्वर भिन्न ठेवून नाम घेणाऱ्याचा निषेध*

वरील चरणातील समबुद्धीचे तत्त्वच, या चरणात श्रीहरीची व्यापकता सांगून दर्शविले आहे. ज्याप्रमाणे हजारो किरणांनी प्रकाशमान होणारा सूर्य सर्व सृष्टीला प्रकाशित करणारा एकच आहे त्याप्रमाणे चराचर सर्व ब्रह्मांडांतील देहांत वास करणारा श्रीहरी एकच आहे. प्रत्येक घटात निरनिराळा श्रीहरी नाही.

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, सर्व भूतांच्या अंतरी । हृदय महा अंबरी । चिद्‌वृत्तीच्या सहस्त्रकरी । उदयला असे जो ॥ श्रीहरी परमात्माही, सहस्त्ररश्मी सूर्याप्रमाणे हजारो चिद्‌वृत्तींच्या किरणांनी युक्त असा प्रत्येक जीवाच्या हृदयात वास करतो. यावरून श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सुचवितात की, सर्व देहांत श्रीहरीच एक असून त्याचीच, दुसऱ्यावाचून, एक अद्वैतसत्ता असल्यामुळे नामस्मरण करताना आपल्याला श्रीहरीहून व श्रीहरीला आपल्याहून निराळे मानून नामस्मरण करणे योग्य नव्हे. जीवाने आपले स्वतंत्र अस्तित्व न वागविता भगवन्नामस्वरूप होऊन राहिले पाहिजे.

## ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा ।
## मागिलिया जन्मा मुक्त झालो ॥४॥

### *अद्वैताचे अंतर् महापुरुष जाणतो*

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मी आपल्या चित्तात हरिनामस्मरण करण्याचा नेम केला व त्यामुळे मी यापुढील जन्माला मुकलो. इतकेच नाही तर मागील म्हणजे या जन्मांमागील जितके जन्म झाले त्यांनाही मुकलो. म्हणजे मी कधीच जन्मलो नाही, जन्मत नाही व जन्मणार नाही असा मी अजन्मा आहे; असा मला अनुभव आला. आता मी मुक्त झालो असे नाही तर माझी अनादी मुक्तता आहे. म्हणजे मी कधी बद्ध झालो नाही म्हणून मला मुक्तीही नाही. मी नित्यमुक्त आहे व नित्य निरुपाधिक आहे, असाच अनुभव आला असा अर्थ.

अर्जुनाला भगवान् म्हणतात की, तूं माझे ऐकणार नाहीस तर, '' तरी नित्यमुक्त अव्यय । तूं आहासी ते होऊनि वाव । देहसंबंधाचा घाव । वाजेल आंगी ॥'' म्हणजे मुळात जीव नित्यमुक्त ब्रह्मस्वरूपच आहे. नित्यमुक्ताला जन्म कोठले आले! मागील जन्म नाही, वर्तमान जन्म नाही व पुढील जन्म नाही. वेदान्तात मुक्ती ही त्रैकालिक मानिली आहे. ज्याला मी कधीच उपाधीने बद्ध नाही असा अनुभव आला तोच खरा मुक्त व त्यालाच खरे अद्वैत प्राप्त झाले, किंवा तोच खरा अद्वैतस्वरूप झाला. अज्ञान उपाधीच मुळी नाही. म्हणून मी कधी बद्ध नाही असा अनुभव येणे यालाच खरा अनुभव म्हणतात. हा अनुभव ज्याला आला तोच खरा महात्मा, आणि अशा महात्म्यालाच अद्वैत स्थिती बाणली हे समजते. मी आता मुक्त झालो, आता पुढे मला जन्म नाही असे म्हणणाऱ्याला पूर्ण अद्वैत स्थिती बाणली, असे महात्मे समजत नाहीत असा भाव.

नाथ म्हणतात, ''प्रपंच मुळी झाला नाही । हे कळले ज्याच्या ठायी । तोचि देही विदेही । निरस्तोपाधि पाही तो एकु ॥''

सारांश, प्रेमयुक्त व ध्यानयुक्त नामस्मरण अखंड झाल्यास भगवत्साक्षात्कार होऊन भगवंताशी ऐक्य होते व भगवंताचे अविनाशी धर्म नामधारकाच्या अनुभवास येतात.

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

॥श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

---

**पाठक्रम : १६ अर्थक्रम : १३**

---

**हरि नाम जपे तो नर दुर्लभ । वाचेसी सुलभ रामकृष्ण ॥१॥**

**रामकृष्णनामी उन्मनी साधिली। तयासी लाधली सकळसिद्धी ॥२॥**

**सिद्धिबुद्धिधर्म हरिपाठीं आले । प्रपंची निमाले साधुसंगें ॥३॥**

**ज्ञानदेवा नाम रामकृष्णी ठसा । तेणें दशदिशा आत्माराम ॥४॥**

*

प्रतिज्ञा - नामस्मरणांत सर्व सिद्धींचा समन्वय.

*

सरळ अर्थ - वाणीनेच केवळ उच्चारावे लागणारे रामकृष्ण हे श्रीहरीचे नाव

(७७)



अत्यंत सुलभ साधन होय पण तेवढेही करणारा दुर्लभ आहे. ज्यांनी श्रीहरीच्या रामकृष्ण नामाचे ठिकाणी मनाचा लय केला त्याला सर्व सिद्धी प्राप्त होतात. सिद्धी, बुद्धी, धर्म हे सर्व हरिनामानेच साधतात व साधूच्या संगतीने प्रपंचात राहूनच पूर्ण मनाचा लय साधून श्रीहरीस्वरूप होऊन राहातात. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, माझे वाणीचे ठिकाणी हरिनाम व हृदयात रामकृष्णाचे रूप दृढ ठसले आहे. त्यामुळे मला दशदिशा आत्मारामस्वरूप झाल्या.

**हरिनाम जपे तो नर दुर्लभ ।**

**वाचेसी सुलभ रामकृष्ण ॥१॥**

***नामधारकाची दुर्लभता***

विवरण - श्रीहरीचे नाम खरोखर सुलभ आहे, नुसते वाचेने उच्चारावे लागते. त्यात काही श्रम नाहीत, पण नामाच्या श्रद्धेने व आवडीने नाम जपणारा मात्र दुर्लभच असतो.

कसेही नाम तोंडाला आले तरी ते पावन करिते हे खरे, पण नामस्मरण करणारा किंवा ज्याच्या मुखाला श्रीहरीचे नाम आले तो नामाच्या प्रेमानेच नाम घेतो असे म्हणता यावयाचे नाही.

* गायक रागाची तालीम करिताना दिसतो, पण त्याच्या मुखातून निघालेले नाम, नामाच्या प्रेमाने निघालेले नसते.

* एखाद्या दुःखी माणसाचे तोंडातूनही हरिनाम येते पण ते नामाच्या प्रेमाने हरिनाम आले असे म्हणणे जरा कठीण जाते.

* केवळ नामानेच सर्व कार्यसिद्धी होते अशा दृढ श्रद्धेने व आवडीने सदा सर्वकाळ नामस्मरण करणारा पुरुष फारच विरळा सापडतो. इतकी दांडगी प्रचंड श्रद्धा फारच थोड्या नामधारकांच्या ठिकाणी असते. इतकी दृढ श्रद्धा ज्यांची असेल त्यांनीच खरोखर नाममाहात्म्य जाणले असे समजावे.

नामाच्या जोडीला आणखी काही साधन केले पाहिजे - असा विकल्प येता कामा नये.

''नामाची आवडी तोचि जाणा देव । न धरी संदेह काही मनी ।
नामा म्हणे तया उरले साधन । ऐसे हे वचन बोलो नये ॥''

असे श्रीतुकाराममहाराज सांगतात, आपल्या श्रुतिस्मृतिपुराणांप्रमाणे तसेच संतवचनांप्रमाणे इतर धर्मांतही नामसंकीर्तनादी भक्तीचे माहात्म्य ठिकठिकाणी

सांगितले आहे.

मुसलमानांचा मुख्य धर्मग्रंथ कुराण आहे. कुराण अध्याय पांचवा सूरतुल माईद व अध्याय सातवा सूरतुल-आअराफमध्यें ईश्वराच्या नामाचे व भक्तीमार्गाचे विवरण केले आहे. त्याचप्रमाणे ख्रिस्ती धर्मांतही विस्तारपूर्वक सांगितले आहे.

सारांश, नामाच्या नितांत गोडीमुळे हरिनामाचा वारंवार ज्याच्या वाणीतून उच्चार होतो तोच खरा नामधारक होय.हरिनामाचा ज्याच्या वाणीला सारखा चाळा लागला व ''माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे'' या श्रीतुकाराम महाराजांच्या वचनाप्रमाणे ज्याचे नामस्मरण होत असेल असा नामधारक दुर्मिळ, यांत शंका नाही.

**रामकृष्ण नामीं उन्मनी साधिली ।**

**तयासी लाधली सकळ सिद्धी ॥२॥**

***नामस्मरणांत सर्व सिद्धींचा समन्वय.***

नामाने उन्मनी दशा.

**उन्मनी** म्हणजे मनाचा लय.

मन हे संकल्प-विकल्पात्मक आहे म्हणजे ते नेहमी बाह्य विषयांचा संकल्प-विकल्प करीत असते.

**संकल्प** म्हणजे एखादा विषय आहे व तो चांगला आहे असे वाटणे.या मनाच्या संकल्पामुळे मनात त्या विषयाच्या प्राप्तीची कामना उत्पन्न होते.

**विकल्प** म्हणजे विषय नाही किंवा तो बरा नाही असे वाटणे. मनाच्या या विकल्पामुळे विषय नकोसा वाटतो.

अर्थात् या संकल्प-विकल्पामुळे विषयांविषयी रागद्वेष उत्पन्न होतात व याचमुळे सुखदुःखही भोगावे लागते. म्हणून -

मनाचा बाह्य विषयांविषयी चाललेला संकल्प विकल्पात्मक व्यापार बंद पडून अखंड सुखस्वरूप अशा श्रीहरीकडे ते लागले म्हणजे मन उन्मन झाले असे समजावे.

अखंड रामकृष्ण नामाचा जप नामाच्या गोडीमुळे, ज्यांच्या अंतःकरणात चालू आहे व त्या अखंड जपामुळे ज्यांच्या अंतःकरणात श्रीहरीचे ध्यान प्रकट होऊन मन तेथेच रमले की, मन पुनः देहावर येत नाही. अशी मनाची उन्मनदशा, नामधारकास हरिनामस्मरणाने प्राप्त होते. अशा हरिभक्तास सर्व सिद्धी प्राप्त



होतात. तपाने, योगाने, धर्माने प्राप्त होणारे सामर्थ्य व शेवटी अत्यंत दुःखरहित परमानंदप्राप्ती अशी परमसिद्धी प्राप्त होते. हरिभक्तास अप्राप्य काहीच नसते. जे संपूर्ण सिद्धिसामर्थ्य श्रीहरीचे ठिकाणी अनंत निरतिशय आहे, तोच श्रीहरी ज्यांच्या हातात आवळ्यासारखा संपूर्ण येतो त्या नामधारकाला काय अप्राप्त राहणार आहे!

सारांश, मनाचा मनपणा नाहीसा होणे ह्यालाच उन्मनी अवस्था म्हणतात. संकल्प विकल्प करणे हे मनाचे लक्षण आहे.''वांया मन हे नांव। एरव्ही कल्पनाचि सावेव॥'' या संकल्पविकल्पात्मक मनामुळेच जीवदशा भासते. भगवत्स्वरूपाच्या ठिकाणी मन लागले म्हणजे उन्मन झाले असे समजावे.एवढी ही उन्मनदशा अखंड नामस्मरणादी भक्तीने सहज साध्य होते; कारण मनात एकाच वेळी अनेक रूपे आपण धरू शकतो. पण वाणीने एकाचवेळी अनेक शब्द आपण उच्चार करू शकत नाही. त्यामुळे -

नामस्मरण करिताना अक्षरावर लक्ष ठेवून नाम जपले असता अनायासे वाणीतून निघणाऱ्या एका एका वर्णावर लक्ष राहून मनाला एकाग्रतेचा अभ्यास घडतो व ते इतर कल्पना करणे सोडून देते.

वैखरी वाणीने नामजप करण्याचा अभ्यास सुरू होऊन तो अभ्यास दृढ वाढत गेला की नामाची अवीट गोडी उत्पन्न होते. नंतर नामाच्या गोडीनेच नामस्मरण सतत चालत राहते.

मनाला नामस्मरणाची खरी गोडी लागली की ते मध्यमा वाणीने होऊ लागते व याच चढत्या पायरीने वैखरी, मध्यमा, पश्यंति व परा अशा चार वाणींवर नामस्मरण सतत चालूच राहते. मनाबरोबर बुद्धिही तद्रूप होते.

अशा रीतीने मन व बुद्धीला भगवंतावाचून दुसरा विषयच राहत नसल्यामुळे, विषयांची कल्पना करण्याकरिता मनाला सवडच राहत नाही. हीच मनाची उन्मनी दशा होय. मनाच्या विपरीत कल्पनेमुळे जीवदशा भासते म्हणजे जीवाचे पारमेश्वरैश्वर्य नाहीसे होते. मन हे उन्मन झाल्यावर जीव आपल्या मूळच्या पारमेश्वरैश्वर्याने तळपू लागतो.''जैं कृष्णचि होईजे आपण । तै कृष्ण होय आपले अंतःकरण । तेव्हां संकल्पाचे आंगण । ओळंगती सिद्धि ॥''

उन्मन अवस्थेत मन परमेश्वरस्वरूपच होते व मग त्या त्या मनाने जो जो संकल्प होईल तो तो ईश्वरसंकल्प होतो. म्हणून ''सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥'' असे श्री तुकाराम महाराज सांगतात.

श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात - ''आणि आपलेनि कांतेसी । ते जगदंबा

जयापाशी । अणिमादिक काय दासी । नव्हती तयातें ॥ तयाचें बिसाट शब्द। सुखें म्हणो येती वेद । सदेह सृ्दिानंद । कां नोहावे ते ॥ म्हणोनि जिया वाहीं उभा । तो लक्ष्मीयेचा वल्लभा । तेथ सर्व सिद्धि स्वयंभा । येर मी नेणें ॥ (ज्ञा.अ.१८ ओ. १६४५-१६४७)

## सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठी आले ।
## प्रपंची निमाले साधुसंगें ॥३॥

### ***नामाने सर्वसाधनसिद्धी***

**सिद्धी** म्हणजे सामर्थ्य,
**बुद्धी** म्हणजे आत्मनिश्चय,
**धर्म** म्हणजे शुद्धाचरण.

ह्या सर्व गोष्टी हरिपाठानेच साध्य होतात.''काय नव्हे केले । एका चिंतितां विठ्ठलें ॥१॥ सर्व साधनांचें सार । भवसिंधु उतरी पार ॥२॥'' असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात.

(१) नामस्मरणाने सर्वसमर्थ हरी वश झाला असता नामधारकही हरीच्या साह्याने सर्वसमर्थ होतो.

(२) नामस्मरणाने आपल्या सृ्दिानंदरूपाचाही निश्चय होतो, आणि

(३) नामाच्या आवडीने नामस्मरण करणारा नामधारक पूर्वी पापाचरणी असला तरी ''क्षिप्रं भवति धर्मात्मा'' त्याचे अधर्माचरण सुटून तो अत्यंत शुद्धाचरणी होतो.एवढेच नाही तर तो शुद्ध ब्रह्मच होतो.- पण हरिनामस्मरणाचे असे फळ अनुभवाला येण्याकरिता भगवद्भक्ताची संगती पाहिजे.

''संतचरणरज लागतां सहज । वासनेचें बीज जळोनी जाय ॥ मग रामनामीं उपजे आवडी । सुख घडोघडीं वाढों लागे ॥ कंठीं प्रेम दाटे नयनीं नीर लोटे । हृदयीं प्रकटे रामरूप ॥'' (श्रीतुकाराममहाराज)

भगवन्नामस्मरणात जे तल्लीन होतात, ज्यांना देहादिकांचा पूर्ण विसर पडतो अशा संतांजवळ भगवंताचे वास्तव्य असते. संत भक्ती, ज्ञान, वैराग्याचे माहेरघर आहेत.

प्रेमपूर्ण अखंड नामस्मरणाने देहीचा विदेही होतो, व त्याचा जड देहही भगवत्स्वरूप होतो.

अशा भगवद्भक्त संतांचे संगतीतच नामस्मरणाचे व त्याबरोबर भगवद्भक्तीचे

(७९)



प्रेम प्राप्त होते. त्या प्रेमाने केलेले नामस्मरणच हृदयांत भगवतांचा आविर्भाव करिते. त्या आविर्भावाबरोबर सामर्थ्य, आत्मनिश्चय व शुद्धाचरण हे सर्व प्राप्त होतात. एवढेच नाही, तो प्रपंचांत राहूनच गुणातीत होऊन राहतो. त्याचा जीवभाव निःशेष नाहीसा होतो.

''संतसंगति घडे । ब्रह्मसायुज्यता जोडे ॥१॥ मुक्ती लागती चरणीं । ब्रह्मज्ञान लोटांगणी ॥ एका जनार्दनी सांगात । घडतां होय देहातीत ॥२॥

निळोबाराय म्हणतात- ''संतसंगें निर्विकल्प । होय मानस निश्चळ ॥''

पुनः एकनाथ म्हणतात - ''संतासी शरण गेलिया वांचुनी । एका जनार्दनी न कळे नाम ॥''

## ज्ञानदेवा नाम रामकृष्णीं ठसा ।
## तेणें दशदिशा आत्माराम ॥४॥

### ***नामस्मरणाने प्राप्त होणारी दशा***

श्रीज्ञानेश्वर माउली म्हणते, माझ्या वाचेच्या ठिकाणी रामकृष्ण हे नाम व हृदयात रामकृष्णाचे रूप दृढ ठसल्यामुळे मला दहाही दिशांत आत्माराम भरलेला दिसतो. हाच आत्मज्ञानपूर्वक भक्तीने येणारा पूर्णानुभव होय.''तैसा मी एक वांचूनि कांही । तयाहि सकट नाही । हे चौथी भक्ति पाही । माझी तो लाहे'' आपल्यासह भक्ताला सर्व साकार भगवत्स्वरूपच भासते.''पैं माझिये सहजस्थिति । भक्तिनाम ॥'' आत्म्याचे आत्म्याला प्रेम ही सहज स्थिती होय. अंतःकरणविरहित आत्म्याचे ठिकाणी ती प्रेमरूप सहजस्थिती आहेच, पण अंतःकरणात तशी आत्मप्रेमरूप सहज स्थिती राहिली नाही. अंतःकरण आपले आत्मस्वरूप विसरले व ते बाहेरही आत्मरूपाहून निराळे जगत् पाहते. तरंगाच्या बाहेर व आत जसे पाणीच असते, तसे अंतःकरणाचे आत बाहेर प्रेमरूप आत्माच आहे. म्हणून बाहेरचे नामरूपात्मक जगत् आपल्यासह म्हणजे देहासह आत्मस्वरूप दिसले पाहिजे, आणि तेथे आत्मबुद्धीने आत्मप्रेम बसले पाहिजे. या अशा बाहेरच्या नामरूपासह भासणाऱ्या आत्मरूपावर आत्मप्रेम करणे याला भक्ती किंवा सहजस्थिती असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

शंका :- कोणी अशी शंका घेतात की, ज्ञानोत्तर भक्ती हे केवळ खूळ आहे. ज्ञान म्हणजे ''ज्ञातृज्ञेया विहीन। नुसुधेंचि जें ज्ञान'' हे खरे ज्ञान होय. याचा ज्ञानाने

''ज्ञानें मोक्षु घडे। तें निमालेनि'' मोक्ष होतो, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज अमृतानुभवात म्हणतात. असे ज्ञान झाल्यावर ''मग ज्ञानाचिये वेळे। झांकती जाणिवेचे डोळे। तैसी तीरी नांव न ढळे। टेकिली सांतीं॥ तैसी जाणीव जेथे न रिगे। विचार मागुता पाऊली निघे। तर्क आयणी नेघे। आंगी जयाच्या'' (ज्ञा. ७ आहे. ४-५) जाणीववृत्तीच लीन होते. व ''जें जाणितलियासाठी। संसार काढूनिया कांटी। जिरोनी जाईजे पोटी। नित्यानंदाच्या।'' (ज्ञा.१३-८६६) ज्ञानानेच नित्यानंद प्राप्त होतो. मग परमानंदाकरिता ज्ञानानंतर भक्ती केली पाहिजे असे म्हणणे एक खूळच नव्हे का?

निरसन :- अशी शंका घेणारे अहंमन्य ज्ञानी असा विचार करीत नाहीत की, ज्ञानोत्तरही भक्तीचा उत्कर्ष जो मोठमोठ्या संतांनी वर्णन केला आहे, तो मग कां केला? ज्ञातृज्ञेयविहीन ज्ञान त्या संताना प्राप्त झाले नव्हते का? असेल तर कोणत्या ज्ञानापेक्षा भक्तीचा उत्कर्ष त्यांनी वर्णिला? ज्ञातृज्ञेयविहीन ज्ञानस्थिती जीवाला एकदम प्राप्त होते किंवा भक्तीनेच प्राप्त होते? ज्ञातृज्ञेयविहीन ज्ञानस्थिती, ज्ञानप्रधान आहे की प्रेमप्रधान?

'आम्हाला वेदान्त समजला तो बरोबर समजला' हा समज, मोठमोठ्या संतांच्या अनुभवाशी विरुद्ध असल्यामुळे, नुसता कोरडा ज्ञानाभिमानच म्हणावा लागतो. जोपर्यंत जीवब्रह्मैक्यज्ञानाची जाणीव उरते तोपर्यंत त्या जाणीवरूप ज्ञानदशेपेक्षा सगुण श्रीहरीची भक्ती श्रेष्ठ मानून सर्व संतांनी सगुण साकार श्रीहरीची भक्ती करण्याचा ज्ञान्यालाही उपदेश केला आहे.

जाणीवरूप ज्ञान आहे तोपर्यंत अहंकार असतो व अहंकारामुळे बाहेर व्यवहारकाळी परमानंद मिळत नाही.म्हणून व्यवहारकाळीही परमानंद भोगण्याकरिता सगुण श्रीहरीची भक्ती केली पाहिजे. या भक्तिप्रेमाने सगुण श्रीहरीचे ध्यान घडून नामरूपात्मक जगताचा भास जाऊन सर्व नामरूपाने नटलेला श्रीहरीच अनुभवाला

**जाणोनी निर्गुण भजावे सांवळे ।**
**भक्तीचे सोहळे तेव्हा साच ॥**

॥ श्रीगुलाबरावमहाराज अभंग ८४६ ॥





येतो. सगुण श्रीहरीच्या प्रेमाने असा सर्व नामरूपात्मक परमात्मा अनुभवाला येणे यालाच वेदांतात अन्वय म्हणतात, आणि सर्व नामरूपाने एक परमात्माच नटलेला अनुभवाला आल्यावर सहज जाणीव खुंटते व श्रीहरीवर आत्मप्रेम बसते.अशा सहज प्रेमाला श्रीज्ञानेश्वरमहाराज सहजस्थिती म्हणतात. या प्रेमांत जाणीव राहत नाही म्हणूनच -

ज्ञातृज्ञेय-विहीन ज्ञानमात्र स्थिति हीच प्रेमभक्ति.

प्रेमाधिक्यावाचून ज्ञानाची जाणीव-वृत्ती मावळत नाही.

एऱ्हवी स्रृदिानंद भेदें । चालिली तिन्ही पदें । परी तिन्ही उणीं आनंदें । केली येणें ॥ असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. म्हणजे शेवटी जाणीवरूप ज्ञान राहत नाही.प्रेमच राहते असा अर्थ.या प्रेमालाच क्रियारहित भक्ती म्हणतात हीच सहजावस्था होय.

नाथांनी चतुःश्लोकी भागवतात - ''अन्वय माझी पूर्ण भक्ति । व्यतिरेक शुद्ध स्वरूपस्थिति ।'' असा ज्ञान व भक्ती यातील फरक दाखविला आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीही ''ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे । तेथ भक्ति माझी उल्लसे ॥'' ज्ञाननिष्ठा म्हणजे अन्वय ज्ञान झाल्यावर नामरूपासह सगुणाचे जे प्रेम लागते तीच भक्ती होय.व सगुण भगवत्प्रेम म्हणजे भक्ती असा सर्व संतांचा आशय आहे.''इया ज्ञानभक्ति सहज । भक्त एकवटला मज ॥'' ज्ञान व भक्ती एकरूपच असती व काहीच वृत्तीचा फरक नसता तर ज्ञान / भक्ती म्हणून पृथक् उल्लेख करणे योग्य नव्हते. पुनः -

''हें विश्वचि माझें घर । ऐसी जयाची मति स्थिर । किंबहुना चराचर । आपण जाहला ॥ याहीवरी पार्था । माझिये भजनीं आस्था । तरी तयातें मी माथां । मुकुट करी ॥ उत्तमासी मस्तक । खालविजे हें काय कौतुक । परी मान करिती तिन्ही लोक । पायवणिया ॥ तरी श्रद्धावस्तूसि आदरू । करिता जाणिजे प्रकारू। जरी होय श्रीगुरु। सदाशिव ॥'' (ज्ञा.अ.१२ ओ.२१३ ते २१६)

अव्यापक व व्यापक किंवा अहं ब्रह्मास्मि व सर्वं खल्विदं ब्रह्म अशा दोन्ही प्रकारच्या ब्रह्मप्रतीतीचा उल्लेख करून त्यानंतरही सगुण साकार श्रीहरीचे भजन करणारा विशेष श्रेष्ठ म्हणून सांगितला. हे ज्ञान व भक्ती यांत काही फरक नसेल तर कसे संभवते?

ज्ञान झाल्याबरोबर नित्यानंदांत ज्ञानी बुडून जातो असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी

जे म्हटले आहे ते व्यतिरेक ज्ञानापुरते आहे. देह, इंद्रिये, मन, बुद्धि, अहंकार यांच्याहून मी निराळा आहे असा व्यतिरेक करून म्हणजे आपल्याहून निराळे केलेल्या देहादिक पदार्थांना विसरून जो आत्म्याशी ऐक्य पावेल, तो नित्यानंदरूप आत्म्यांत निमग्न होईल हे सर्वांना मान्य आहे. पण श्रीज्ञानेश्वरमहाराजादी संतांचा कटाक्ष, ज्ञान्याच्या व्यवहार काळावर आहे. ज्ञानी व्यवहारकाळी देहावर आल्यावर, त्याचा तो नित्यानंद कायम राहत नाही. कारण नित्यानंदरूप ब्रह्मानंदाची स्थिती सांगताना ''यथा प्रियया संपरिष्वक्तः आंतरं बाह्यं वा न किंचित् वेद''- आतले बाहेरचे काही जाणले जात नाही असे श्रुती म्हणते व ज्ञान्याला तर व्यवहारकाळी जगताचा भास होतो व ते त्याविषयी उपेक्षा करितात. उपेक्षावृत्ती जोपर्यंत आहे तोपर्यंत व्यवहारकाळी परमानंद कसा राहणार! आत्मा उपेक्षणीय नाही, कारण तो परमप्रेमरूप आहे. अर्थातच ज्ञान्याचे ठिकाणी व्यवहारकाळी बाहेर जी उपेक्षावृत्ती राहते ती, ज्ञानविरोधी जगाचा प्रत्यय येतो म्हणूनच राहते, हे उघड आहे, आणि आत्मज्ञानाबरोबर अखंड ब्रह्मानंद मिळतोच असे नाही हे मागे विद्यारण्यांचे वचनाने मी सिद्ध केले आहेच. म्हणून व्यवहारकाळीही ब्रह्मानंद ठसावा एवढ्याकरिता सगुण भगवंताचे भजन करून जगताचा भास नाहीसा करणे आवश्यक आहे. ज्ञानानंतर सगुणाच्या प्रेमभक्तीने सर्व प्रपंचाचा लय होऊन सर्वत्र भगवत्प्रत्यय येतो व त्यामुळे अखंड भगवद्रूपाचे ठिकाणीच बुद्धी कायम राहते म्हणजे ज्ञानोत्तर भक्तीने अखंड समाधी प्राप्त होते.

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

**पाठक्रम : १७** | **अर्थक्रम : २०**

**हरिपाठ-कीर्ति मुखीं जरी गाय । पवित्र तो होय देह त्याचा ॥१॥**
**तपाचें सामर्थ्य तें भिनलें अमूप । चिरंजीव कल्प कोटी नांदे ॥२॥**
**मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊनि ठेले ॥३॥**
**ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधले । निवृत्तीने दिधलें माझे हातीं ॥४॥**





*

प्रतिज्ञा - गुरूपदेशकीर्तीनेच सर्वसिद्धी, नामस्मरणाचे व गुरूपदेश कीर्तीचे समान फल, गुरुमुखापासून नामस्मरण सफल, गीतोक्तिसमुद्धार, नामधारक प्रलयात नाश पावत नाही म्हणून तो अमर.
नामधारकाचे आईबाप विष्णुरूप,
सारूप्य मुक्तीत जीवाचा जीवपणा नाश पावत नाही,
तृप्तीचे ढेंकर आणि सद्गुरुकृपेचे आभार.

*

सरळ अर्थ - जो कोणी आपल्या मुखाने हरिपाठाची किंवा हरीनामाची कीर्ति गाईल त्याचा देह त्या पुण्याने अत्यंत पवित्र होईल. नामस्मरणाच्या तपाचे पुण्य त्याच्या रोमारोमात अत्यंत भिनून जाईल व तो त्यामुळे अनंत कल्प अमर होईल म्हणजे त्याचा नाश कधीच व्हायचा नाही. नामधारकाचे आई बाप, भाऊ, गोत्रज वगैरे असे कितीतरी, चतुर्भुज विष्णुरूप होऊन राहतात. अत्यंत गूढ व गूढपणेच गम्य होणारे हे ज्ञान श्रीसद्गुरु निवृत्तिनाथांनी माझ्या हाती दिले. म्हणूनच ते मला प्राप्त झाले असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

**हरिपाठकीर्ती मुखीं जरी गाय ।**
**पवित्र तो होय देह त्याचा ॥१॥**

***हरिपाठकीर्तीचे फळ***

विवरण - हरिपाठकीर्ती म्हणजे हरिनामस्मरणाची कीर्ती किंवा श्रीज्ञानेश्वर महाराजांनी रचलेल्या हरिपाठाची कीर्ती जो कोणी मुखाने गाईल त्याचा देह परम पवित्र होतो. श्रीगुरूने केलेल्या उपदेशाची कीर्ती जो गातो त्यालाही नामस्मरण करणाऱ्यासारखेच फळ मिळते. नामस्मरणाचे माहात्म्य गाताना त्यालाही नामस्मरण घडतेच व त्या नामस्मरणाने त्यालाही अनंत पुण्य प्राप्त होते. ज्याच्या योगाने परमात्मा संतुष्ट होतो तेच खरे पुण्य होय. ''स्वनुष्ठितस्य धर्मस्य संसिद्धिर्हरितोषणम्'' जो काही धर्म किंवा आचरण करायचे ते भगवंताच्या संतोषाला व कृपेला जीव पात्र होईल असे झाले पाहिजे. श्रीगुरूने हरिनामाचा उपदेश केल्यावर त्या हरिनामोपदेशाचे अत्यंत प्रेम वाढवीत - जो त्या उपदेशाची कीर्ती गातो, त्याचे कीर्तिगाण्याने, भगवंताला फारच संतोष होतो. भगवंताला भक्तीचे प्रेम किती असते, हे सांगताना श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, आत्मज्ञान झाल्यावरही जे माझ्या सगुण रूपाचे भजन करितात

''तया संगाचेनि सुरवाडें। मज विदेहा देह धरणें घडे। किंबहुना आवडें।

निरुपम ॥ म्हणोनि गा नमस्कारू। तयातें आम्ही माथां मुकुट करूं। तयांची टाच धरूं। हृदयीं आम्ही॥ तयाचिया गुणांचि लेणी। लेववूं आपुलिये वाणी। तयांची कीर्ति श्रवणी। आम्ही लेऊं॥'' (ज्ञा.१२-२२२)

अशा रीतीने सगुणाची भक्ती करणारे भक्त किती आवडतात हे सांगून भगवान् म्हणतात ''परी तयाचे चरित्र । ऐकती जे ॥ तेहि प्राणपरौते । आवडती हें निरुतें । जे भक्तचरित्राते । प्रशंसिती ॥ भक्ताची कीर्ती गाणारेही मला भक्तासारखेच प्रिय होतात. भक्त व भक्ताची कीर्ती गाणाऱ्याविषयी हे जसे भगवंताचे उद्‌गार आहेत, तसेच या चरणात श्रीज्ञानेश्वर महाराज, नामस्मरण करणारा व नामस्मरणाची महती गाणारा दोघेहि परम पावन होतात म्हणजे श्रीहरीस्वरूपच होतात असे प्रतिपादन करीत आहेत. श्रीनिवृत्तिनाथांनी केलेल्या हरिनामोपदेशाची कीर्ती वर्णन करण्याकरिता श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी हा हरिपाठ ग्रंथ रचला. तो हरिपाठ म्हणजे नामोपदेश करणाऱ्या स्वगुरूच्या उपदेशाची कीर्ती गाणारा झाल्यामुळे, गुरूच्या उपदेशाची कीर्ती गावयाची तर हरिपाठाचे पाठ केले म्हणजे पुरे! अर्थात् हरिनामस्मरण करणारा व हरिपाठाचे पाठ करणारा दोघेहि अत्यंत निष्पाप होऊन भगवंताला अत्यंत प्रिय होतील असा भाव.

नाथ म्हणतात, ''पवित्र तो देह सदा ज्याचा नेम । वाचे गाये नाम सर्व भावे ॥ एकाजनार्दनी धन्य ते शरीर । परमार्थ संसार एकरूप ॥'' असा नामकीर्तीचा फायदा गुरुमुखाने घेतलेल्या नामाचाच होतो.

## तपाचें सामर्थ्य तें भिनलें अमूप ।
## चिरंजीव कल्प कोटि नांदे ॥२॥

### *नामधारक अमर होतो : गीतेचे प्रमाण*

नामस्मरणाने होणाऱ्या पुण्याची गणना करणे शक्य नाही. नामस्मरणाचे तप अगाध आहे व त्या अगाध पुण्यबळावर नामधारक अखंड विष्णुलोकात वास करितात. अखंड नामस्मरण करणारा पुण्याचा महामेरूच होय. स्वर्गादी लोकातून पुण्यक्षयानंतर पतन सांगितले आहे; तसे विष्णुलोकातून ''नामधारकाचे पतन होतच नाही. कारण तेथील वास्तव्यास कालमर्यादाच नाही. ''न मे भक्तः प्रणश्यति'' ही तर भगवंताची जगजाहीर प्रतिज्ञा आहे. नामाचा महिमा गाणाऱ्या भक्तांच्या ठिकाणी नामकीर्तीचे इतके पुण्य होते, की त्याने गायिलेली नामकीर्ती एक फार





मोठे तप होते व त्याचे पुण्य, त्याचे शरीरातील रोमारोमांत भिनून जाते व त्या पुण्यसामर्थ्याने त्याच्या शरीराचा नाश होत नाही. म्हणजे शरीरासह तो ब्रह्मरूप होतो असा अर्थ. कल्पकोटी म्हणजे अनंत कल्प.

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात -''आतां अवसरे मजसारिखा होईल । ऐसा हन भाव तुज जाईल । हा गा अमृता आंत राहील । तया मरण कैचे ॥ म्हणोनि तयाचिया चित्ता । माझी जवळिक पांडुसुता । तेव्हांचि तो तत्त्वता । स्वरूप माझें॥

''नामकीर्ती गातां गातां भगवंताचे ध्यान जेव्हा त्याचे अंतःकरणांत होऊ लागते तेव्हाच तो भगवद्रूप झाला. काही वेळाने तो भगवद्रूप होईल असे म्हणण्याचे कारण नाही. भगवद्रूप झाला म्हणजेच नित्य अमर झाला. उत्पत्ति, नाश वगैरे या संसारात ब्रह्मलोकापर्यंतच आहेत. ''आणिकहि शाखा उपरता। जिया सनकादिक नामे विख्याता। तिया फळीमूळी नाडळितां। भरलिया ब्रह्मी॥''(ज्ञा. अ. १५-२०५) ब्रह्मलोकाच्या पलीकडे सनकादिक नावाच्या नामधारकांच्या शाखा आहेत, त्या परब्रह्मांतच स्थित आहेत. परब्रह्माप्रमाणे त्यांनाही उत्पत्ती प्रलय नाहीत, अखंड ब्रह्मस्वरूप आहेत असा अर्थ.

## मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार ।
## चतुर्भुज नर होऊनि ठेले ॥३॥

### *नामधारकाचे संबंधी नातलगही विष्णुस्वरूप होतात*

नामधारकांस चारी मुक्ती प्राप्त होतात. एवढेच नाहीतर नामधारकाचे आईबाप वगैरे जी काही संबंधी नातलग मंडळी असतात ती देखील चतुर्भुज विष्णुस्वरूप होतात त्यांना सरूपता मुक्ती मिळते. - फरक एवढाच की, नामधारकाला सायुज्यता मुक्ती मिळून त्याचा भगवदैक्याने जीवपणाच नाहीसा होतो व आईबाप इत्यादी नातलगांना जी सरूपता मुक्ती मिळते त्या मुक्तीत जीवपणा नाश पावत नाही म्हणजे त्यांना सायुज्यता मुक्ती होत नाही.

इतर पुण्याची गोष्ट अशी आहे की, ते पुण्यफळ कर्त्यासच मिळते. पण ते कर्त्याच्या संबंधी मनुष्यांना मिळत नाही. पण नामस्मरणाने घडणारे पुण्य इतकें थोर व अगणित आहे की नामधारकाचा तर उद्धार होतोच पण आणखी त्याच्या आईबाप इत्यादि संबंधी माणसांचाही उद्धार होतो. संबंधी माणसांना जी सरूपता मुक्ती (ती) नामधारकाच्या पुण्यानेच मिळते; पण ती टिकविण्यासाठी नामापराध मात्र त्यांनी

करिता कामा नये.

शंका :- ''अपहाय निजं कर्म कृष्ण कृष्णेति वादिनः । ते हरेर्द्वेषिणो मूढा धर्मार्थं जन्मयद्धरेः॥'' हा शूद्रकमलाकरांतला श्लोक प्रमाण मानून कोणी असे प्रतिपादन करितात की, धर्म सोडून नामस्मरण करणारा भगवंताचा द्वेष्टा होय. धर्म सोडून केवळ नामस्मरणाने उद्धार होत नाही.

उत्तर - पण हा श्लोक अठरा पुराणांपैकी कोणत्याही पुराणात नाही; आणि या एका श्लोकाच्या विरुद्ध सर्व पुराणात केवळ नामस्मरणाने देखील सर्व सिद्धी व परमेश्वरप्राप्तीही होते असे सांगणारे शेकडो श्लोक आहेत. शेकडो श्लोकांच्या विरोधी एक श्लोक प्रमाण मानणे बुद्धिवाद्याला तरी शोभत नाही.

खरोखर भगवंताला प्रमाण मानणारा कोणता भगवद्‌भक्त मुद्दाम धर्म सोडून वागणे शक्य आहे? ''स्वामीची आज्ञा सेवका प्रमाण'' सेवकाला स्वामीची आज्ञा मोडून वागणे शक्यच नाही.आज्ञा मोडणे हे सेवकाच्या स्वामीविषयक प्रेमाचे लक्षण नव्हे.

पुनः नामस्मरणाच्या अभिमानाने धर्माचा त्याग करणे हा नामाचाच अपराध होतो असे नामधारकाला नाममहात्म्य सांगणारे शास्त्र सांगते. म्हणून खरा नामधारक मुद्दाम नामस्मरणाच्या अभिमानाने धर्माचा त्याग करू शकत नाही. पण धर्माचा कैवार घेऊन नाममाहात्म्याचा उच्छेद करणारा असा कोण धार्मिक पुरुष धर्माचे तंतोतंत अनुष्ठान करू शकतो? शास्त्राने जसा धर्म विहित केला तसे पातित्य-शास्त्रही सांगितले आहे. म्हणजे कोणत्या अधर्मरूप पापाचरणाने आपला विहित कर्म करण्याचा अधिकार नाहिसा होऊन आपण पतित होतो, हेहि सांगितले आहे.

आज समाजात पुष्कळशा लोकांचे जे आचरण पाहण्यात येते ते कर्माधिकार नाहिसा करणारे असेच आहे. अशा स्थितीत केलेल्या विहित कर्माचा कोणत्याही पुरुषार्थाचे दृष्टीने उपयोग होत नाही. मग श्रेयप्राप्तीचे साधन काय उरते? — या कलिकालामध्ये धर्माचा आसरा मिळत नाही म्हणूनच वेदादिशास्त्राने नाममहात्म्य प्रगट केले आहे व संतमहंतांनी त्याचा प्रसार सुरू केला. खून करूनही खून करणाऱ्याला माफी देण्याचे सामर्थ्य जसे राजात असते तसे धर्म सोडून भगवन्नामस्मरण करणाऱ्याला उद्धरण्याचे सामर्थ्य नामात आहे, याला काय करावे?





समर्थ म्हणतात, ''कांहीच न करोनी प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तालागी सांभाळी ॥ (दासबोध दशक४. समास३. २१) राजाचा अधिकार जसा कायद्याने मर्यादित होऊ शकत नाही, तसे परमेश्वराचे सामर्थ्यही धर्माने मर्यादित होऊ शकत नाही. नाममाहात्म्यद्वारा भगवंतानी आपले सामर्थ्यच प्रगट केले आहे. त्याच्या नावाने कर्मठांनी कितीही बोटे मोडली तरी काय उपयोग? नामाचे माहात्म्य व सामर्थ्य काही कमी होत नाही.

***नामाचे पथ्य***

''नाम घेता वायां गेला । ऐसा कोणी आयकिला ॥ सांगा विनवितों तुम्हांसी । संत महंत सिद्ध ऋषी ॥''असे श्रीतुकाराम महाराज हे संत, महंत, सिद्ध व त्रिकालज्ञ ऋषिमुनी ह्या सर्वांना अत्यंत विनयशीलपणाने पण आव्हानपूर्वक विचारतात की, जगाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत कोणता नामधारक वाया गेला, असे मला एकतरी उदाहरण दाखवा.

नाम हे वस्तुतंत्र असून त्याची स्वयंसिद्ध शक्तीच अगाध व अतर्क्य आहे. औषधाचा ज्याला लवकर गुण पाहिजे त्याने काळजीपूर्वक पथ्य मात्र सांभाळले पाहिजे ''जेणें विठ्ठलमात्रा घ्यावी । त्याने पथ्य सांभाळावी'' पद्मपुराणात श्री सनत्कुमारांनी श्रीनारदमुनीला नामस्मरणाचे दहा अपराध जे सांगितले आहेत ते वर्ज्य करून साधकाने नामस्मरण केले तरच ''मुखी नाम, हाती मोक्ष'' असा नामाचा रोकडा साक्षात्कार नामधारकाला आलाच पाहिजे.

## नामाचे दश अपराध

सन्निन्दाऽसति नामवैभवकथा श्रीशेशयोर्भेदधीः।
अश्रद्धा श्रुतिशास्त्रदेशिकगिरां नाम्न्यर्थवादभ्रमः॥
नामास्तीति निषिद्धवृत्तिविहितत्यागो हि धर्मान्तरैः।
साम्यं नाम्नि जपे शिवस्य च हरेर्नामापराधा दश ॥

माझी श्रीगुरुमाऊली सांगते की -

''नामाचे अपराध दहा । ते न करूनि पाहा । नाम घेत राहा । जैसें तैसे ॥
[१]नामविश्वासें निंदणें संता ।
[२]दुर्जना नाम-वैभवकथा ।
[३]रमाकांता आणि उमाकांता । भेदबुद्धि पाहणें ॥
[४]श्रुति [५]स्मृति [६]सद्‌गुरुवचन । येथ न विश्वासें मन ।

आणि [७]नामे पातके जळती संपूर्ण । हें स्तावक म्हणणें भ्रांतीस्तव ॥
[८]नाम आहे आम्हांपाशीं । म्हणोनि निषिद्ध आचरणासी । प्रवृत्ति लागली
विशेषी । जयाची होय ॥
[९]जवळी नामस्मरण चांग । मानुनी करी विहित त्याग ।
[१०]अन्य देवता आणि श्रीरंग । यांची नामे समचि म्हणे ॥
एवं हरिहर मंत्र जपतां । हें अपराध दशक सर्वथा ।
येवों न द्यावें माथां । प्राण गेलियाही ॥
अपराध चुकवूनि करणें स्मरण । तरीच नामे उजळें मन ।
पातकें जळती संपूर्ण । फळ श्रीकृष्ण सांपडे ॥''

*(श्रीगुलाबरावमहाराजकृत, सूक्तिरत्नावलि प्रथम यष्टि श्रीमत् भगवद्गीतासंगति ओ. २८३ ते २८९)*

सारांश, वरीलप्रमाणे नामस्मरणांत दहा अपराध टाळून निःसीम भक्तिप्रेमाने नामस्मरण अखंड करीत राहिल्याने नामधारक सदेह सद्दिानंदस्वरूप होतो. येवढेच नव्हे तर त्याच्या सन्निधानांत वावरणाऱ्यांना व संबंधी लोकांनाही सरूपता मुक्ती मिळते.

## ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधले ।
## निवृत्तीने दिधलें माझे हाती ॥४॥

वास्तविक पाहता मागे सांगितल्याप्रमाणे निर्गुण सगुण दोन्ही स्वरूपाची प्राप्ती दुर्घटच आहे. कारण सगुण निर्गुणाचे यथार्थ ज्ञान होऊन ते आंगी बाणण्याकरिता जी मनाची अत्यंत श्रद्धायुक्त, संदेहरहित, अत्यंत वैराग्ययुक्त, विषयवासनारहित, निर्विकल्प, कामक्रोधरहित अशी स्थिती पाहिजे ती भगवद्भक्तिवाचून प्राप्त होत नाही, आणि भगवत्प्रेम संतकृपेवाचून मिळत नाही.

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.- ''तरी हे काम क्रोध पाही । जयातें कृपेची सांठवण नाही । हे कृतांताच्या ठायी। मानिजति ॥ हे ज्ञाननिधीचे भुजंग । विषयदरीचे वाघ । भजन मार्गीचे मांग। मारक जे ॥ साध्वी शांति नागविली ॥ मग माया मांगी शृंगारिली । तिये करवी विटाळविली । साधुवृंदे ॥ इही विवेकाची त्राय फेडिली । वैराग्याची साल काढिली । जितया मान मोडिली । उपशमाची ॥ हे आंगा तंव घडले। जीवीचि आथी जडले । परी नातुडती गिंवसले । ब्रह्मादिकां ॥ हे चैतन्याचे शेजारी । वसती ज्ञानाच्या एका हारी । म्हणोनि प्रवर्तले महामारी । सांवरती ना ॥ तैसे ज्ञान तरी शुद्ध । परी इही असे प्ररुद्ध । म्हणोनि ते अगाध



। होऊनि ठेले ॥ (ज्ञा.अ.३.ओ.२४०ते२६३)

असे हे आत्मस्वरूप, कामक्रोधादी विकाराने पक्के जखडून ठेवलेले आहे. संतांच्या अत्यंत निष्कपट सेवेने त्यांची कृपा संपादन केल्यावाचून निर्गुण सगुण दोन्ही स्वरूपाचे ज्ञान होऊ शकत नाही. हे परमेश्वरस्वरूपाचे ज्ञान, ग्रंथ वाचून स्वतःचे बुद्धीने करून घेऊ म्हणणाऱ्यांना नाथांनी एक दृष्टांत दिला आहे.-

''अमावस्येचा अंधकारू । त्यामाजी काजळाचा डोंगरू । तेथ विभाग आला करूं । आंधळा जैसा ॥ जसे अपथ्य करणाऱ्या माणसाला व्याधिमुक्त होणे शक्य नाही, किंवा कामी पुरुषाला स्त्री जिंकणे शक्य नाही, त्याप्रमाणे जीवाला स्वबुद्धीने ज्ञान होणे कठीण आहे.''येथ एकचि लीला तरले । जे सर्व भावे मज भजले ॥'' भगवद्भक्तीवाचून ज्ञान हाती गवसत नाही.

नाथ म्हणतात, ''न करिता भगवद्भक्ती । ब्रह्मयासी नव्हे मुक्ति ॥'' मग इतर जीवांचे काय सांगावयाचे ! सारांश इतकाच की शमदम साधल्यावाचून निर्गुण स्वरूपाची प्राप्ती दुर्लभ आहे आणि प्रेमावाचून सगुणाची प्राप्ती दुर्लभ आहे.दोहोंचीही प्राप्ती सत्संगतीवाचून होत नाही.असे हे भगवंताचे रूप वरील प्रतिबंधामुळे अत्यंत गूढ झाले आहे व केवळ संतकृपेनेच त्यांची प्राप्ती होते आणि संतही प्रेमळ, शुद्धमती आणि श्रीगुरूच्या उपदेशावरून आपला सर्व जीव ओवाळून टाकणारा, अशा शिष्याशिवाय स्वरूपप्राप्ती कोणाच्या हाती देत नसल्याने ती प्राप्तिही गूढगम्य झाली आहे.श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, असे गूढ आणि गूढगम्य साकार निराकाराचे ज्ञान श्रीनिवृत्तिनाथांनी माझ्या हाती दिले.

तात्पर्य, शब्दज्ञान शास्त्रांतून सांगितले असले तरी तसा वृत्तीने अनुभव येणे, हे कार्य शास्त्र करून देत नाहीत.ते सर्व श्रीगुरूचे हाती असल्यामुळे निर्गुण सगुणाचे ज्ञान अत्यंत गूढ झाले आहे. ते श्रीगुरुपासूनच मिळविले पाहिजे. श्रीगुरूकृपेने मग संसारदर्शनच ब्रह्मदर्शन होते. भ्रांतिच मुक्ती होते. आपल्या देहाचे स्फुरणच पूर्णब्रह्म होते. स्वैराचारच समाधी होतो. दृश्यदर्शनच महाबोध होतो.

॥ श्रीमद्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

**पाठक्रम : १८** **अर्थक्रम : १९**

**हरिवंश पुराण हरिनाम कीर्तन । हरिविण सौजन्य नेणें काहीं ॥१॥**
**त्या नरा लाधलें वैकुंठ जोडलें । सकळ घडलें तीर्थाटन ॥२॥**
**मनोमार्गी गेला तो येथे मुकला । हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥३।**
**ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । रामकृष्णींआवडी सर्वकाळ ॥४॥**

*

प्रतिज्ञा - पुराणांचा अंगीकार व नामास त्यांचे प्रामाण्य,
नाम घेणारास वर्णाश्रम चुकल्याची बाधा नाही, नामधारकास भूमीवरच
वैकुंठ, स्वोपदेशी स्थिरता करण्याची आज्ञा,नामावाचून ध्यानाचा निषेध.

*

सरळ अर्थ - पुराण ग्रंथात श्रीहरीची वंशावळी वगैरे व श्रीहरीच्या लीला यांचेच प्राधान्याने वर्णन असल्यामुळे - (१) पुराणांचे श्रवण, (२) हरिनामाचे व हरीच्या गुणानुवादाचे कीर्तन आणि (३) श्रीहरीवाचून काहीच गोड न वाटणे;

या तीन गोष्टी ज्याने साधल्या त्या पुरुषाला येथेच बसल्याजागी वैकुंठ लोकाची किंवा भगवंताची प्राप्ती झाली. त्याला सर्व तीर्थाटनांचे पुण्य प्राप्त झाले. आपल्या मनाच्या मागे जो गेला तो मात्र या परमार्थसुखाला आचवला. हरिनामाचे ठिकाणी जो स्थिर झाला तोच खरोखर धन्य होय. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मला हरिनामाची जोडी लाभण्यातच सर्वस्वी गोडी वाटते व त्यामुळे सदा सर्वकाळ रामकृष्णी म्हणजे रामकृष्णाच्या नामरूपाची आवडी जडली. मी सदा वाचेने नाम घेतो व ध्यानाने रूप पहातो.

**हरिवंश पुराण हरिनाम कीर्तन ।**
**हरीविण सौजन्य नेणें कांहीं ॥१॥**

### *पुराणांचा अंगीकार व नामास त्यांचे प्रामाण्य*

विवरण - पुराणे ही श्रीहरीचा वंश, त्याचे चरित्र व लीला कथन करणारे ग्रंथ आहेत. अर्थातच त्या ग्रंथांतून भगवन्नामाचे माहात्म्य व सगुण भगवंताचे भक्तिमाहात्म्य यांचे वर्णन केलेले आहे. यावरूनच कोणी असे म्हणतात की, नाममाहात्म्य व सगुणभक्ती हे प्रकार पौराणिक धर्माचे आहेत व पौराणिक धर्म शूद्रांसाठी सांगितलेला आहे. यागादिक वैदिक धर्म त्या पौराणिक धर्मापेक्षा श्रेष्ठ असून तोच ब्राह्मणादी त्रैवर्णिकांना विहित आहे.

पण शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रातील देवताधिकरणात ''तस्मात्



समूलमितिहासपुराणम्'' इतिहासपुराणे ही वेदमूलक आहेत असे म्हटले आहे. म्हणून पुराणातील नामस्मरण, भगवद्भक्ती इत्यादी धर्म, वैदिक धर्माहून निराळे नाहीत किंवा गौणही नाहीत.

स्मृतिग्रंथ व पुराणे, ही अनुक्रमे वेदांतील कर्ममार्गाचे व ज्ञानमार्गाचे विशेष विवरण करणारे ग्रंथ आहेत असे सूतसंहितेच्या टीकेत विद्यारण्यस्वामी म्हणतात.

''इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत्'' इतिहास पुराणानुसार वेदाचा अर्थ करावा असा आर्ष दंडक असून भारत, स्मृतिकार यांनी तो स्पष्टपणे मान्य केला असल्यामुळे वेदांच्या प्रामाण्याइतकेच पुराणांचेही प्रामाण्य मानावे लागते. कारण पुराणे वेदापेक्षा गौण असती तर पुराणानुसार वेदाचा अर्थ करावा असे कसे म्हणता आले असते?

पुनः नामस्मरण व सगुण भक्ती हे वैदिक धर्म आहेत असे स्वतः श्रीशंकराचार्यांनीच म्हटले आहे. ''अपि च संराधने प्रत्यक्षानुमानाभ्याम्'' या सूत्रावरील भाष्यांत ते म्हणतात, ''संराधनं च भक्तिध्यानप्राणिधानाद्यनुष्ठानम् । प्रत्यक्षानुमानाभ्यां श्रुतिस्मृतिभ्याम् ॥'' संराधन म्हणजे भगवंताचे प्रेम, ध्यान व नामस्मरणपूर्वक सर्व कर्मसमर्पण होय. हे श्रुतिस्मृतीतून सांगितले आहे.

''उत्पत्त्यसंभवात्'' या सूत्रावरील भाष्यांत ते म्हणतात - ''यदपि तस्य भगवतोऽभिगमनादि-लक्षणम् आराधनम् अजस्त्रम् अनन्यचित्ततया अभिप्रेयते तदपि न प्रतिषिध्यते । श्रुतिस्मृत्योरीश्वरप्रणिधानस्य प्रसिद्धत्वात् ॥''

श्रीहरीचे, अभिगमनादी पंचविधलक्षणात्मक अनन्यभावाने अखंड आराधन वैष्णव करितात ते आराधन श्रुतिस्मृती यांनीच सांगितले असल्यामुळे त्यांचे आम्ही खंडन करीत नाही. पुनः ''सर्ववर्णानां पुराणेषु अधिकारः ज्ञायते'' पुराणांचे ठिकाणी सर्व वर्णांना अधिकार आहे. या वचनावरून व वरील वचनावरून ब्राह्मणादी त्रैवर्णिकालाही नामस्मरण विहित आहे हे सिद्ध होते.

समर्थहि म्हणतात. ''चहुंवर्णास अधिकार। नामीं नाही लहान थोर । जड मूढ पैलपार। पावती नामे'' (दासबोध दशक ४ समास ३)

१. ज्यात हरीचा वंश, हरीच्या लीला वर्णन केल्या आहेत, त्या पुराणांचे श्रवण.
२. त्यातील उपदेशानुसार हरि नामस्मरण व हरीच्या गुणांचे कीर्तन.
३. आणि श्रीहरीवाचून काहीच बरे न वाटणे.

या तीन गोष्टीचाच सारखा अभ्यास ज्या पुरुषाला असेल त्यालाच येथे बसल्या ठिकाणी वैकुंठाची प्राप्ती होते.

सारांश, श्रीहरीची अवतारचरित्रे संपूर्ण सांगण्याकरिताच पुराणे आहेत. पुराणांत वेदांतील शुद्ध धर्म विस्तारपूर्वक सांगितला आहे. म्हणूनच पुराणे ही वेदतुल्य आहेत. ''श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं संख्यं आत्मनिवेदनम् ॥'' (श्रीमत् भागवत स्कंध ७ अ.५) नवविधा भक्तीलाच भागवत धर्मात विशेष प्राधान्य सांगितले आहे. विषयभोगांचा संकोच करीत करीत चित्त भगवंताकडे लागावे येवढ्याच एका हेतूने श्रौतस्मार्तधर्मही सांगितला आहे.

## त्या नरा लाधलें वैकुंठ जोडलें ।
## सकळ घडलें तीर्थाटन ॥२॥

***नामधारकास येथेच वैकुंठ***

सगुण साकार भगवंताचे दर्शन, अखंड भगवन्नामस्मरण, संतांची संगती व भगवंताच्या गुणांचे श्रवणकीर्तन, इतक्या गोष्टी वैकुंठांत असतात. नामधारकाच्या ठिकाणी ह्या सर्व गोष्टी येथेच असतात. म्हणून इहलोकीच त्याला वैकुंठ प्राप्त होतो. ''परि तयांपाशीं पांडवा । मी हारपला गिंवसावा । जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥' नामधारकाच्या नामस्मरणाने ''हरिकीर्तना लोभला देवो । विसरला वैकुंठा जावो ॥' नामधारकापाशीच देव नित्य राहतो. ''जेथें राहिला यदुनायक । तेथेंचि ये वैकुंठलोक ॥'' अर्थातच भगवंताच्या नामधारकापाशी राहण्याने भूमीला वैकुंठाचे रूप येते. पहिल्या अभंगांत सांगितल्याप्रमाणे, अखंड नामस्मरण करणाऱ्याला चारी मुक्तींची अखंड प्राप्ती होते.

***चारी मुक्तींची अखंड प्राप्ती***

नाथ म्हणतात - ''नामकीर्तन निजगजरी । भक्ता निकट धांवे हरी । तेचि समीपता मुक्ति खरी । भक्तांच्या करी हरिकीर्तनें ॥ जेथें राहिला यदुनायक। तेथेंचि ये वैकुंठ लोक । यापरी मुक्ति सलोक । कीर्तनें देख पावती भक्त ॥ कीर्तनें तोषला अधोक्षज । भक्ता प्रत्यक्ष गरुडध्वज । श्यामपीतवासा चतुर्भुज । तें ध्यान सहज ठसावें ॥ भक्त कीर्तन करी जेणें ध्यानें । तें ध्यान दृढ ठसावें मनें । तेव्हां देवांची चिन्हे । भक्त पावती संपूर्ण ॥ ही सरूपता भक्ताते वरी ॥ – तेव्हां देवभक्त समसमान । समान अवयव समान चिन्ह ॥ वृत्ति स्वानंदी निमग्न । परतोनी कदा नोहे भिन्न । सायुज्यमुक्ति हीचि जाण । जेथें दुजेपण असेना ॥''

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात ''कहीं एकादेनि वैकुंठा जावें । तें तिही

(८६)



वैकुंठचि केलें आघवें । ऐसें नामघोष गौरवें । धवळलें विश्व ॥''अशा नामधारकाला सर्व तीर्थ, व्रत, नेम, धर्म यांचे पुण्य नामस्मरणाने मिळते. ''प्रयाग वाराणसी । अवघीं तीर्थे पायापाशीं ॥'' तीर्थाटन हे उपलक्षण आहे, हरिनामस्मरण करणाऱ्याच्या नामस्मरणात सर्वांचा अंतर्भाव होतो. हरिनामस्मरण करीत असताना किंवा हरिनाम श्रवण करीत असताना जर विहित धर्माचा लोप झाला तर दोष लागत नाही. उलट नाथ म्हणतात, ''भागवतधर्मे राहे कर्म । तंव तंव सुखावे पुरुषोत्तम । सप्रेम भक्ता बाधी कर्म। हा वृथा भ्रम भ्रांतासी ॥'' भगवंताला आनंद होतो, कारण ''काम्यकर्मसु प्रवर्तमानस्यैव सर्वात्मना विधिप्रतिषेधाधिकारः'' विषयवासनेच्या पाठी लागून काम्यकर्म करू पाहणाऱ्याच्या विषयवासनेला आळा घालण्याकरिता विधिनिषेधात्मक काटेरी धर्म भगवंतानी प्रवृत्त केला आहे. अर्थात् भगवंताच्या प्राप्तीकरिता विषयसुखाची वासना सोडून साक्षात् भगवंताची प्राप्ती करून देणाऱ्या नामस्मरणादी धर्माचे आचरण करताना प्रवृत्तिधर्माचा लोप झाला असता दोष लागणे कसे शक्य आहे?

''स स्नातः सर्वतीर्थेषु सर्वयज्ञेषु दीक्षितः।
स च दानं फलं प्राप्तो यस्तु संकीर्तयेत् हरिम् ॥''(वैष्णव चिंतामणि)

श्रीनाथ महाराजही असेच सांगतात ''नित्य रामनाम गर्जे वाणी । त्या तीर्थे येती लोटांगणी । सुरवर लागती चरणी । यम पायवणी स्वये वंदी ॥४२५॥ श्रीनाथभाग. अ.२) नामधारकाला स्वतःकरिता परमार्थ साधन म्हणून तीर्थाटन करण्याची आवश्यकता नाही, उलट समस्त तीर्थे नामधारकाच्या दर्शनाने पुनीत होऊन जाण्याकरिता त्याच्या पायांपाशी येतात. एवढा नामाचा वेदकालापासून अगाध महिमा आहे.

***पंडित गागाभट्ट***

अशी एक गोष्ट सांगतात की, छत्रपती श्रीशिवरायांच्या राजदरबारांत गागाभट्ट या नावाचे मोठे वैदिक अहंमन्य पंडित होते. ''श्रीसमर्थ हे स्वतः ब्राह्मण असून त्यांनी श्रुतिस्मृतिप्रणीत धर्ममार्गाचा उपदेश करणे सोडून केवळ नामस्मरणाचे बंड निष्कारण माजवून वैदिक धर्मास कमीपणा आणला.'' असा मिथ्या व दुष्ट निराधार आरोप करून गागाभट्टांनी शिवरायापाशी समर्थांची निर्भत्सना केली. श्रीसमर्थ हे अंतर्ज्ञानी असल्यामुळे, शिवरायांच्या दरबारात गागाभट्टांसमोर वेणूआक्काकडून नाममाहात्म्यावर कीर्तन करविले.

तसेच वामनपंडितांनी 'विधेवेने हरिकीर्तन करावे की नाही?' या आक्षेपास

धरून नामस्मरणाबद्दल जेवढे आक्षेप होते तेवढ्यांचे सप्रमाण निःशेष खंडन केले.

वेदच हरिनामाची स्तुती करितात म्हणून वेदापेक्षाही हरिनाम वरिष्ठ आहे. 'वेदाहूनि नाम वरिष्ठ । हे आम्ही म्हणों मुक्तकंठ । आचारहीनं न पुनन्ति वेदाः स्पष्ट । स्मृति ऐसी ॥५८॥(संप्रदाय सुरतरू अ.२) आणि नामस्मरणाने आचारहीनही पुनित होतात.

## मनोमार्गी गेला तो येथें मुकला ।
## हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥३॥

***आपल्या उपदेशाचे ठिकाणी चित्ताची स्थिरता करण्याची आज्ञा***

मनोमार्ग म्हणजे विषयसुखाकडे मनाची धांव. या मनाच्या धावेबरोबर जो वाहावत गेला तो मात्र या परमार्थसुखाला मुकतो.''वाया बागूल, इये दुर्जने। इंद्रिये करिती'' विषयसुखाचे ठिकाणी सोकावलेल्या इंद्रियांना परमार्थाचा मोठा बागुलबोवा वाटतो.''पाहे पां आयुष्याते आढळ करी । जे सरते जीवित वारी । तया औषधाते वैरी । काय जिव्हा न म्हणे'' रोगमुक्त करून आयुष्य देणारे औषध, पण जिभेला ते कोठे आवडते! त्याप्रमाणे 'ऐसे हितासी जे जे निके । ते सदांचि या इंद्रियां दुःखे'(ज्ञा.अ.६.३६१ ते ३६३) आपल्या कल्याणाचे जे असेल तेच नेमके या इंद्रियांना आवडत नसते असा इंद्रियांचा स्वभाव आहे.या इंद्रियांच्या स्वाधीन मन झाले म्हणून या मनाच्या व इंद्रियांच्या स्वाधीन झालेल्या पुरुषाला ''विषय विषाचा पडिपाडू । गोड परमार्थ लागे कडू । कडू विषय तो गोडु । जीवासी जाहला ॥'' (ज्ञा.१०-१५९) आत्मघातक विषयसुख गोड वाटते व खरे अविनाशी आत्मसुख दुःखदायक वाटते. विषय-सुखाकरिता रात्रंदिवस मनुष्य खपतो पण सुलभ नाम घेववत नाही. विषयसुखाच्या वासनेने देहबुद्धीच दृढ होत जाते व तितके तितके आत्मविस्मरणही दृढ होते. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज आपणा सर्वांस हरिनामस्मरण करा व हरिनामाच्या ठिकाणी पूर्णविराम करून स्थिर चित्त होण्याची आज्ञा करितात.मनाचे धावेबरोबर धावणाऱ्याला परमेश्वरप्राप्ती होणे कधीच शक्य नाही, म्हणजे अखंड सुखाची इच्छा कधीच तृप्त होणे शक्य नाही. अशा नाशिवंत सुखाचे पाठीमागे लागून शाश्वत सुखाला आंचवणे योग्य नाही, आणि नामावाचून इतर साधनांनी शाश्वत सुख मिळणे अशक्य.असा सुविचार करून जो नामस्मरणाचेच साधन अत्यंत दृढ चित्ताने करील तोच धन्य होय.''धन्य जगी तोचि एक हरिरंगी नाचे ॥ रामकृष्ण

(८७)



वासुदेव सदा स्मरे वाचे । (श्रीनाथमहाराज)

## ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी।
## रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ॥४॥

***नामावांचून ध्यानाचा निषेध***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मला हरिनामाची जोड मिळाली व त्या हरिनामांतच अत्यंत गोडी वाटते. अखंड रामकृष्ण नामाच्या गोडीने अनायासे रामकृष्णाच्या रूपाचीही अखंड गोडी लागली म्हणजे वाणी क्षणभर देखील नामस्मरण सोडत नाही, आणि अंतःकरण क्षणभरही भगवद्रूपाला सोडून राहत नाही.नामस्मरणाने सहज श्रीहरीचे ध्यान घडते.ध्यानाची क्रिया करावी लागत नाही.

नामावाचून ध्यान साधले जात नाही. कारण तशा ध्यानात जडप्रत्यय कायम राहतो व नामस्मरणाने सिद्ध होणाऱ्या ध्यानात सचेतन भगवदाविर्भाव होतो.

म्हणून येथे महाराजांनी नामावाचून ध्यानाचा निषेध केला आहे. हरिनामस्मरणपूर्वक केलेले ध्यान सफल होते.श्रीहरिनाम न घेता केवळ ध्यानाचा काहीच उपयोग नाही.प्रेमपूर्वक नामस्मरण करणाऱ्याच्या चित्तांतून भगवान् निघून जाऊ शकत नाही. तो सदासर्वकाळ नामधारकाच्या बरोबर राहतो. रात्रंदिवस आपल्या एका परमप्रिय वस्तूवाचून इतर काहीच नकोसे वाटणे, एवढेच नव्हे तर दुसरी वस्तू मनातच न येणे, ही शुद्ध प्रेमाची व खऱ्या आवडीची मुख्य कसोटी आहे. म्हणून आहार, निद्रादी निसर्ग देहधर्माचा व बाह्य जगाचा त्यास विसर पडतो.

''विषयी विसर पडला निःशेष । अंगी ब्रह्मरस ठसावला ॥१॥ माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ॥'' असे श्रीतुकाराम महाराज स्वानुभवाने सांगतात.

प्रेम सर्वकाळ असणे याला स्वाभाविक प्रेम म्हणतात. प्रत्येकाला आपले स्वतःचे जे प्रेम आहे ते स्वाभाविकच आहे.ते सर्वकाळ असते.आपला आपणास कधीही विसर पडत नाही व वीटही येत नाही.स्वतःचे प्रेम जसे गुणनिरपेक्ष असते त्याप्रमाणे भगवन्नामही निरपेक्ष आवडले पाहिजे.

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

o o o

**पाठक्रम : १९** **अर्थक्रम : १८**

**वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचे वचन । एक नारायण सार जप ॥१॥**
**जप तप कर्म क्रिया नेम धर्म । वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ॥२॥**
**हरिपाठी गेले ते निवांतचि ठेले । भ्रमर गुंतले सुमनकळिके ॥३॥**
**ज्ञानदेवा मंत्र हरिनामाचे शास्त्र । यमे कुळगोत्र वर्जियेले ॥४॥**

*

प्रतिज्ञा - सनत्कुमार व नारदसंवादाचे अभिनंदन,
नामास वेदशास्त्र प्रमाण, शाक्तादी काम्यमंत्रजपनिषेध,
अज्ञानपूर्वक नीतिशास्त्र- धर्मशास्त्र- मीमांसादी शास्त्रांचा निषेध,
नामधारकाचे कुळास यम भीतो.

*

सरळ अर्थ - एका भगवंताचे नामाचा अखंड जप करणे हेच सर्व साधनांचे सार असून याला वेदशास्त्र उपनिषदे यांचे प्रमाण आहे. जप तप कर्म क्रिया नेम धर्म हे सर्व एका नामावाचून व्यर्थ आहेत. ज्याप्रमाणे फुलाच्या कळीत सापडलेला भ्रमर परत बाहेर येत नाही, तेथेच प्रेमाने गुंतून पडतो, त्याप्रमाणे हरिनामस्मरण हेच एक साधन करण्याचा ज्यांनी निश्चय केला ते श्रीहरीचे ठिकाणी प्रेमाने इतके ऐक्य पावतात की, पुनः श्रीहरीहून भिन्न होत नाहीत. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, हरिनामाचे मंत्रशास्त्र एवढे प्रभावी आहे की, यमधर्म नामधारकाच्या कुळास व गोत्रास स्पर्श करीत नाही, त्यांना भितो.

**वेद शास्त्र प्रमाण श्रुतीचे वचन ।**
**एक नारायण सार जप ॥१॥**

***प्रवृत्ति धर्म व निवृत्तिधर्म***

जीवाच्या इच्छेप्रमाणे परमेश्वराने धर्माचे दोन प्रकार सांगितले आहेत. एक प्रवृत्तिधर्म व दुसरा निवृत्तिधर्म.

ज्या धर्माच्या आचरणाने मनुष्य पुनः पुनः संसारात येऊन सुखदुःख भोगतो, त्या धर्माचरणाला प्रवृत्तिधर्म म्हणतात व ज्या धर्माच्या आचरणाने मनुष्य पुनः संसारात म्हणजे नाना प्रकारच्या जीवयोनीत जन्म घेत नाही व कायमचा सुखदुःखांतून सुटतो, त्याला निवृत्तिधर्म म्हणतात.



विषयसुखप्राप्तीचा साधनमार्ग म्हणजे प्रवृत्तिधर्म व
अखंड परमेश्वरसुखप्रप्तीचा साधन मार्ग म्हणजे निवृत्तिधर्म होय.

विषयसुखप्राप्ती हेच आपले ध्येय असे जरी अज्ञ जीव समजत असला, तरी विषयसुख नाश पावते व आपण पुनः पुनः दुःखांत लोटले जातो, हा नित्याचा अनुभव असल्यामुळे त्या विषयसुखाला तो आपले आत्यंतिक किंवा परम कल्याण समजत नाही. विषयसुखात मग्न असणाऱ्या जीवांना देखील सुख हे अखंडित असावे असेच वाटते. जीवाला अखंड सुखाची इच्छा आहे व नाशवंत सुखाची इच्छा नाही; म्हणूनच परमेश्वराने देखील जो काही प्रवृत्तिधर्म सांगितला आहे, तो केवळ विषयसुखाच्या प्राप्तीकरिता सांगितला नसून त्याचे अंतिम साध्य परमेश्वरप्राप्ती आहे असे स्पष्ट सांगितले आहे.

जया जे विहित । ते ईश्वराचे मनोगत । म्हणोनि केलिया निभ्रांत । सांपडेच तो ॥९११॥ हे विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य ओलावा । आणि हेचि परमसेवा । मज सर्वात्मकाची ॥९०६॥ (ज्ञानेश्वरी अ.१८)

विषयसुखाची इच्छा सोडून परमेश्वरप्राप्तीकरिताच विहित कर्माचे अनुष्ठान केल्यास चित्तशुद्धिद्वारा तोच धर्म भगवत्प्राप्ती करून देतो. जीव आपल्या विषयवासनेने त्या धर्माचे आचरण विषयसुखप्राप्तीकरिता करतो व भगवंताने त्या धर्माचरणाने त्यास विषयसुख मिळावे अशी व्यवस्थाही करून ठेवली आहे.

***निवृत्ति धर्म म्हणजे भागवत धर्म***

विषयसुखाला विटून पूर्व सुकृतामुळे ज्या भाग्यवान् जीवाला भगवत्प्राप्तीची तळमळ उत्पन्न झाली असेल, त्याच्याकरिता भगवंतानी निवृत्तिधर्म सांगून ठेवला आहे. भगवन्नामस्मरण, भगवत्कथाश्रवण, कीर्तन, पूजन करून शास्त्रशुद्ध विहित कर्मे करून ती सर्व भगवंताला समर्पण करणे व त्यास सर्वथा शरण जाणे हा मुख्य निवृत्तिमार्ग होय. यालाच भागवतधर्मही म्हणतात. प्रवृत्तिधर्मालाही जर तो केवळ भगवंताची प्राप्ती व्हावी अशा निष्काम व निर्विषय चित्ताने आचरला गेला तर भागवतधर्म म्हणता येते.

सारांश, भगवत्परायण होऊन भगवन्नामस्मरणपूर्वक जेवढे म्हणून लौकिक, वैदिक कर्म जीवाकडून होत असेल ते सर्व भगवत्प्रीत्यर्थ करणे हे भागवत धर्माचे स्वरूप होय. भागवत धर्माचे माहात्म्य अगाध आहे. मनुष्यमात्रालाच नव्हे तर सर्व प्राणिमात्राला याचा अधिकार आहे. प्रवृत्ति धर्माचे आचरण करणारा काही

पापकर्मामुळे पशुपक्ष्यादि योनीत गेल्यास त्याच्या ठिकाणी पूर्वी आचरण केलेल्या प्रवृत्तिधर्माचा काहीही मागमूस राहत नाही, पण भागवतधर्म आचरण करणारा पुरुष काही पापकर्मामुळे पक्षुपक्ष्यादि योनीत गेल्यास त्या योनीतही भागवत धर्माचे संस्कार कायम राहतात. त्याच्या ठिकाणचा भागवतधर्म केव्हाही नष्ट होत नाही; म्हणूनच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी

''रानीचिया पालेखाईरा । नेवाणे करविले लंकेश्वरा ॥'' तसेच

''पै रंकु एक आडलेपणे । काकुळती अंती धांव गा धांव म्हणे ॥ (ज्ञा.अ.८-१२८)

इत्यादी ओव्यात जंगलात राहणाऱ्या वानरांची श्रीरामभक्ती व गजेंद्राची भक्ती, त्या त्या योनीत कायम होती; हे स्पष्ट सांगितले आहे.जटायूचे ठिकाणी पक्षी योनीतही श्रीरामभक्ती कायम होती.इतर धर्माच्या अनुष्ठानाने अनुष्ठान करणारा अनेक प्रत्यवायामुळे स्वतः एकटा देखील तरणे कठीण; पण निष्काम भागवत धर्माचे अनुष्ठान करणारा स्वतः तरून त्यांच्या संगतीत असणाऱ्या जीवांसही तारतो; असे भक्तिसूत्रांत श्रीनारदमहामुनींनी स्पष्ट सांगितले आहे.''स तरति स तरति स लोकांस्तारयति'' असो.

जे केले असता सर्व काही केले होते व जे न केले असता सर्व केले तरी काहीच उपयोगाचे होत नाही; ज्याच्यावाचून सर्व साधने व्यर्थ आहेत त्याला सार म्हणतात.

भगवन्नामस्मरण सर्व साधनांचे सारसर्वस्व आहे. एका भगवन्नामस्मरणाने सर्व साधने केल्याचे श्रेय मिळते व भगवन्नामस्मरणावाचून कोणतेही भगवत्प्राप्तीचे साधन सिद्धीस जात नाही.म्हणून भगवन्नामस्मरण हे सर्व साधनांचे सारसर्वस्व आहे. छांदोग्योपनिषदांत भगवान् सनत्कुमारांनी नारदांना या नामब्रह्माची उपासना सांगितली आहे. भागवतादी पुराणांतून हरिनामस्मरणालाच मुख्य भागवत धर्म म्हटले आहे.भागवत धर्म म्हणजे अज्ञानी भोळ्या जीवांनादेखील भगवत्प्राप्ती सुलभ आणि निर्विघ्न होईल या उद्देशाने भगवंताने स्वमुखाने सांगितलेला धर्म होय. या धर्मात भगवन्नामस्मरण करणे, भगवंताचे गुणानुवाद श्रवण करणे व त्याचे कीर्तन करणे; ही मुख्य अंगे असून सर्व कर्मे भगवंताचे उद्देशाने करून भगवंताला समर्पण करणे हे दुसरे गौण अंग आहे.

### *सर्व धर्म भागवत धर्म आहे*

ज्याप्रमाणे यज्ञयागादी धर्म वेदशास्त्र पुराणे इत्यादी ग्रंथांतून सांगितला



गेला आहे, त्याप्रमाणे हा भागवत धर्मही वेदशास्त्रपुराणे यांतून सांगितला आहे. भागवत धर्म हा साक्षात् भगवत्प्राप्तीला कारण असून यज्ञादिधर्म परंपरेने भगवत्प्राप्ति करून देणारा आहे. किंवा ''धर्मस्य ह्यापवर्ग्यस्य'' भगवत्प्राप्ती उद्देशानेच सर्व धर्म खरोखर सांगितला गेला असल्यामुळे, विषयसुखाच्या अभिलाषाने त्याचे अनुष्ठान न करता भगवत्प्राप्ती व्हावी या उद्देशाने त्याचे अनुष्ठान करावे असाच वेदशास्त्रांचा आशय आहे म्हणून सर्व धर्म भागवत धर्म आहे.

वरवर पहाणाऱ्याला नानाप्रकारचे विषयसुख प्राप्त करून घेण्याकरिता यज्ञादी धर्म सांगितला आहे असे दिसत असले व जीव तसाच धर्माचा उपयोग करीत असला तरी भगवंताचा व शास्त्रकारांचा यज्ञादिधर्म प्रगट करण्यात तसा हेतु नाही, असेच गीताभागवत इत्यादी ग्रंथांतून स्पष्ट म्हटले आहे.

गीतेत भागवतधर्म हे नाव नाही, तेथे भागवत धर्माला कर्मयोग हे नाव दिले आहे.भागवतकारांनी भागवतधर्म हे नाव दिले आहे.पण दोहोंतील लक्षणाचा विचार केला तर लक्षणे एकच असल्यामुळे, कर्मयोग व भागवतधर्म भिन्न आहेत असे समजणे सयुक्तिक नाही.

भागवत धर्माचे मुख्य अंग नामस्मरण करणे, श्रीहरीचे गुणानुवाद श्रवण करणे, त्याचे स्वतः कीर्तन करणे, हे यज्ञादी धर्मात प्राधान्याने किंवा स्वतंत्रपणे दिसत नाही हे खरे, पण यज्ञादी कर्मांतही, कर्माच्या वैगुण्यनिवृत्तिकरिता व सांगतेकरिता भगवन्नामस्मरण सांगितलेच आहे आणि भगवंताच्या प्राप्तीच्या उद्देशाने कर्म करून ते भगवंताला समर्पण करणे हे भागवत धर्माचे गौण अंग मात्र यज्ञादी कर्मात भगवत्प्राप्तीकरिता मुख्यत्वाने सांगितले असल्यामुळे, या दृष्टीने यज्ञादी धर्म खरोखर मुळांत भागवत धर्म आहे यांत संशय नाही.

वैदिकधर्म व भागवतधर्म असे धर्माचे भेद नसून एकच धर्म अनुष्ठानातील उद्देशाप्रमाणे वैदिक धर्म किंवा भागवत धर्म होतो.विषयसुखाकरिता इंद्रादी देवतांचे उद्देशाने केलेला यज्ञादी वैदिक धर्म काम्य धर्म होतो व तोच भगवत्प्राप्तीच्या उद्देशाने व भगवत्प्रीत्यर्थ म्हणजे इंद्रादी रूपाने भगवान् येथे यजिला जातो असे भगवंताकडे अनुसंधान ठेवून निष्काम बुद्धीने अनुष्ठिला असता, भागवत धर्म होतो.

भागवत धर्म हा शुद्ध वैदिक धर्म असून सर्व धर्मात श्रेष्ठ आहे, असेच समस्त श्रुतिस्मृतिपुराणे व संतमहात्मे कंठ शोषून सांगत आलेले आहेत. हा धर्म ऋग्वेद, श्रीकृष्णोपनिषद, रामतापनीय, कृष्णतापनीय, नृसिंहतापनीयादी उपनिषदे, वेदांतशास्त्रे, भागवतादी अठरा पुराणे, इत्यादिकांत उत्तमप्रकारे वर्णिला आहे.

श्रीशंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्यादी श्रेष्ठ आचार्य तसेच श्रीज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व समर्थादी अवतारी संत विभूतींनी याच धर्माचे स्वतः आचरण करून भागवत धर्माचा उपदेश प्राणिमात्रांस केला आहे.

आक्षेप - ''काही अज्ञ जीव असा आक्षेप घेतात की, नामस्मरणादी भागवत धर्म हा खरा वैदिक धर्म नाही. योगयागादी धर्म हा खरा वैदिक धर्म असून नामस्मरणादी भागवत धर्म स्त्रीशूद्रादिकांकरिता सांगितला आहे. ब्राह्मणादी त्रैवर्णिकाकरिता तो सांगिंतलाच नाही;''

ह्या आक्षेपाचे खंडण भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराज वरील अभंगाच्या पहिल्या चरणात करतात.

***वेद शास्त्र प्रमाण***

काही बोलावयाचे असल्यास स्वकपोलकल्पित बोलणे तसेच पूर्वप्रमाणरहित बोलणे हा मोठा अक्षम्य दोष आहे. स्वयंप्रमाणस्वरूप असा जो परमात्मा त्या परमात्म्याने निर्माण केलेली वेदादी शास्त्रे आमच्या आर्यधर्मात परमप्रमाण मानली जातात.

''वेदशास्त्रप्रमाण'' - मंत्र संहिता व ब्राह्मण मिळून वेद आहे. येथे -

१) **'वेद'** शब्दाने मंत्रसंहिता व

२) **श्रुतीचे वचन** या शब्दाने उपनिषदादी ब्राह्मण भागाचे ग्रहण केले आहे.

३) **शास्त्र** म्हणजे मन्वादिकांचे स्मृतिग्रंथ व भागवतादी महापुराणे.

मंत्रसंहितेत म्हणजे ऋग्वेदाच्या आठव्या मंडलात - ''मर्त्ता अमर्तस्य ते भूरि नाम मनामहे। विप्रासो जातवेदसः'' असा एक मंत्र आहे व ''अस्य जानन्तो नाम चिद्विवक्तनमहस्ते विष्णो सुमतिं भजामहे'' असा दुसरा मंत्र आहे.

पहिल्या व दुसऱ्या मंत्राचा भावार्थ असा की, आम्ही मरण पावणारे, विनाशी असे जीव तुझे नाम तप दान नित्यकर्मादिक सर्व धर्मांहून अत्यंत श्रेष्ठ समजतो. ही दोन श्रुतिवचने शंकराचार्यांनी विष्णुसहस्रनाम भाष्यांत, तसेच श्रीधरस्वामींनी (भागवतातील सहावा स्कंध अजामिळ आख्यान) प्रमाणार्थ घेतली आहेत.

नामस्मरणादी भागवत धर्माचे वैदिकत्व दाखविण्याकरिता ऋग्वदेतील पुरावा सांगून ह्याशिवाय उपनिषद् भागांतूनही नाममाहात्म्य वर्णिले आहे. असे वरील अभंगांत श्रीज्ञानेश्वर महाराज सांगतात.

याप्रमाणे हरिनामाचे माहात्म्य वेद म्हणजे खास मंत्रसंहितेत आहे. नामाचे





माहात्म्य सांगणारे भागवत, पुराणादी ग्रंथ भक्तिशास्त्र आहे. त्या शास्त्रातूनही नाममाहात्म्य विस्ताराने सांगितले आहे.

नामाची पापदाहक शक्ती

नाम्नोस्ति यावती शक्तिः पापनिर्हरणे हरेः।
तावत्कर्तुं न शक्नोति पातकं पातकी जनः॥
सकृदुच्चारितं येन हरिरित्यक्षरद्वयम् ।
बद्धः परिकरस्तेन मोक्षाय गमनं प्रति ॥ स्कंद पुराण.

इत्यादी हजारो वचने पुराणांतून सांगितली आहेत. गीतेच्या दहाव्या अध्यायांत भगवंताच्या दिव्य मुख्य मुख्य अशा ७५ विभूती सांगण्यात आल्या; व त्यात ''यज्ञानां जपयज्ञोऽस्मि'' (१०-२५) म्हणजे समस्त श्रौतस्मार्त यज्ञापेक्षा जपयज्ञाची महती विशेष सांगून जपयज्ञास दिव्य विभूतिमत्व सांगितले आहे.

हरिनाम हे साक्षात् परब्रह्म आहे.

'आपल्या मते सर्व धर्मात श्रेष्ठ धर्म कोणता?' ह्या युधिष्ठिराच्या प्रश्नास उत्तर देताना भीष्मपितामह म्हणतात, ''एष मे सर्व धर्माणां धर्मोऽधिकतमो मतः। यद्भक्त्या पुंडरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरः सदा ॥'' भगवंताचे सदा सर्वकाळ नामस्मरण व स्तवन करणे हाच सर्वधर्मात एकमेव परमश्रेष्ठ धर्म आहे व हेच माझे निश्चित मत आहे. जप्यैनैव तु संसिध्येद् ब्राह्मणो नात्र संशयः। (मनुस्मृति २-८७) केवळ नामजपानेच सर्वसिद्धी होते असे नामजपाचे माहात्म्य मन्वादी स्मृतिकारांनीही स्पष्ट सांगितले आहे.

श्रुतिस्मृतिपुराणादिकांनी येवढे सांगूनही काही पढतमूर्ख या नाममाहात्म्याला केवळ बुद्धिभ्रष्ट झाल्यामुळे अर्थवाद म्हणतात. त्याबद्दल त्यांची जेवढी कीव करावी तेवढी थोडीच वाटते. अद्वैतमार्तंड शंकराचार्यानीदेखील नाममाहात्म्यास ''अर्थवाद'' न म्हणता श्रुति-स्मृति-पुराणादिकांची शेकडो वचने विष्णुसहस्रनाम भाष्यांत प्रमाणार्थं देऊन नाममाहात्म्यच मुक्त कंठाने वर्णिले आहे. भगवन्नाम माहात्म्य सर्व वेदादिकांच्या प्रमाणाने सर्वश्रेष्ठ सिद्ध होत असल्यामुळे व कलियुगांत त्याच्याशिवाय तरणोपाय नसल्यामुळे जगाच्या उत्पत्तीपासून तो आजपर्यंत झालेल्या सर्व संतमहात्म्यांनी स्वानुभवाने त्याचाच सर्वस्वी पुरस्कार केला आहे.

सकळ धर्मांचे कारण । नामस्मरण हरिकीर्तन । दया क्षमा समाधान । संतजन साधिती ॥१॥ निजधर्म हा चोखडा । नाम उच्चार घडघडा । भुक्तिमुक्तीचा सवंगडा । हा भवसिंधुतारक ॥२॥(श्रीज्ञानेश्वरमहाराज)

करितां साधनांच्या कोटी । नामाहून त्या हिपुटी ॥१॥ नाम वाचें आठवितां। साधनें सर्व येती हातां ॥२॥ एक नाम सत्य सार । वाऊगा पसार शीण तो ॥३॥ (श्रीनाथमहाराज)

नामावांचुनी मंत्र नाहीं त्रिभुवनी । ऐसी बोले वाणी वेदशास्त्रीं ॥ पहा विचारूनि अनुभव तो मनीं । नका आडरानी झणी शिरूं ॥ नामा म्हणे नाम ॐकाराचें मूळ । परब्रह्म केवळ रामनाम ॥ सर्व सुखा अधिकारी । मुखें उच्चारी हरिनाम॥ सर्व साधनांचें सार । भवसिंधु उतरी पार ॥(श्री तुकाराम महाराज)

नाम सारांचेंही सार। नाम सकळांसी आधार ॥ दास म्हणे सांगो किती । नामावीण नाही गति ॥(श्रीसमर्थ)

श्रौतस्मार्त कर्माचाच नेहमी युगपरत्वे ऱ्हास होत असतो. युगपरत्वे जे निरनिराळ्या धर्मांचे श्रेष्ठत्व किंवा कनिष्ठत्व सांगितले आहे, ते निरनिराळ्या श्रौतस्मार्त कर्मामध्येच होय. भगवन्नामस्मरणादी भागवतधर्म कोणत्याही युगात बदलत नाही, किंवा कोणत्याही युगात त्याचे महत्वही कमी होत नाही, सर्वत्र कर्मकांडात विष्णुस्मरण हेच एक त्या कर्माची पूर्णता करणारे असून श्रीविष्णुस्मरणावाचून कोणतेही कर्म अपूर्णच राहते असे गीतेत भगवान् म्हणतात. कलियुगात श्रौतस्मार्त धर्माचा ऱ्हास होत असल्यामुळे, नामस्मरणादी भागवत धर्माचेच विशेष माहात्म्य व तोच एक मुख्य धर्म आहे, असा समस्त वेदशास्त्रपुराणे व संतमाहात्म्यांचा उपदेश आहे.

***एक नारायण सार जप***

भगवंताला विन्मुख राहून विषयसुखाची इच्छा करणारे जे विषयासक्त पुरुष आहेत, त्यांना संसारात दुःख वाटून ते भगवंताकडे वळावेत ह्यासाठीच प्रवृत्तिधर्मात नानाप्रकारचे विधिनिषेधाचे काटे पसरलेले आहेत असे श्रीधरस्वामी म्हणतात (भागवत स्कं.११ अ.२० श्लो.८). विषयसुखाची इच्छा सोडून भगवत्प्राप्तीची इच्छा करणाऱ्याला तितके विधिनिषेध सांगितले नाहीत. नामधारकाचे अहोरात्र निरंतर भगवन्नामस्मरणाकडे चित्त राहिल्यामुळे यदाकदाचित वर्णाश्रमांचे त्याच्याकडून आचरण घडले नाही तर त्याच्याबद्दल त्याला दोष नाही.

''माझी करिता सप्रेम भक्ति । भक्तांची नित्य कर्मे राहती ।
तेहतीस कोटी ऋषि महंती। संपूर्ण करिती कर्मे त्यांची ॥''

असे श्रीएकनाथ महाराज सांगतात, मनुस्मृती अध्याय २ श्लोक ८६ व ८७ मध्ये असे स्पष्ट सांगितले आहे की, वैश्वदेव, होम, बलिकर्म, नित्यश्राद्ध व अतिथिभोजन



हे जे चार पाकयज्ञ आहेत ते दर्शपौर्णमासादी विधियज्ञासह नामजप यज्ञाच्या सोळाव्या कलेचीही बरोबरी करू शकत नाहीत. ब्राह्मण वैदिक कर्म करो किंवा न करो, तो केवळ नामजपाच्या योगानेच उत्तम सिद्धीस पूर्ण अधिकारी होईल यात काही संशय नाही. ''सर्व यज्ञांत जपयज्ञ हे माझे स्वरूप होय.'' (श्रीगीता अ.१० श्लो.२५) असे स्वतः भगवंतांनीही स्पष्ट सांगून ठेवले आहे.

''या वै साधनसंपत्तिः पुरुषार्थचतुष्टये ।
तया विना तदा भाति नरो नारायणाश्रयः॥''

धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या पुरुषार्थांकरिता जी काही साधने सांगितली आहेत ती न करता एका भगवंताच्या आश्रयाने अनायासे सर्व पुरुषार्थ प्राप्त होऊ शकतात.

''समस्तांही यज्ञाच्या पैकीं । जपयज्ञ तो मी ये लोकीं । जो कर्मत्यागे प्रणवादिकीं । निपजविजे ॥२३२॥ नामजपयज्ञ तो परम । बाधूं न शके स्नानादि कर्म । नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थी ॥२३३॥'' (ज्ञानेश्वरी अ.१०)

एक भगवन्नामजपयज्ञाने सर्व सिद्धी होते. कारण भगवन्नाम हे केवळ शुद्ध भगवत्स्वरूप आहे. असा वेदशास्त्रादिकांचा अंतिम निर्णय असल्यामुळे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, नारायण नामाचा जप हे सर्व वेदशास्त्र पुराणांचे सारसर्वस्व आहे.

## जप तप कर्म क्रिया नेम धर्म ।
## वाऊगाचि श्रम व्यर्थ जाय ॥२॥

या दुसऱ्या चरणात भगवन्नामावाचून इतर जपतपादिक कर्मांचा निषेध केला आहे. भगवंतावाचून जपतप, क्रियाकर्मादी करणे सर्व व्यर्थ आहे. कारण ती कर्मे भगवत्प्राप्ती तर करून देत नाहीतच, पण चित्तशुद्धी देखील त्यांनी होत नाही. म्हणून अशी निष्फल कर्मे करण्याचा हव्यास म्हणजे व्यर्थ श्रम आहेत. प्रस्तुत अभंगाच्या पहिल्या चरणांत नारायण नामाचा जप साराचे सार सांगितल्यामुळे इतर गौण क्षुद्र देवतांचा जप परमार्थात काहीच उपयोगी नाही असे सांगतात. भगवान् श्रीविष्णु किंवा त्यांचे श्रीरामकृष्णादी अवतार यांच्या नामावाचून शाक्तादी काम्य मंत्राचा जपनिषेध येथे माउलीने सांगितला आहे; कारण इतर देवतांचे मंत्रांचे जप भगवत्प्राप्तीला कारण होत नाहीत. श्रीहरीच्या अखंड नामजपानेच श्रीहरीची प्राप्ती होते. इतर देवतांचे काम्यमंत्र संसार बंधन वाढविणारे आहेत म्हणून परमार्थात त्यांचा काहीच उपयोग नाही.

श्रीहरीच्या सगुण किंवा निर्गुण स्वरूप-साक्षात्काराला सत्वगुणाची अत्यंत आवश्यकता असते. राजस देवातांच्या मंत्राने रजोगुणाची वृद्धी होते, सत्वगुणाची वृद्धी होत नाही. म्हणून सत्त्वाश्रय विष्णुनामाचा जप करणेच श्रेयस्कर आहे. म्हणून येथे राजस तामस देवतांच्या मंत्रांचा व काम्य मंत्राच्या जपाचा निषेध केला आहे. मागे ''विष्णुविणे जप'' या अभंगांत हेच सांगितले आहे.

***१) तपनिषेध***

तप या शब्दाने भगवंताच्या प्राप्तीचा उद्देश ज्यांत नाही असे तप येथे सांगितले आहे. नाथ म्हणतात, ''माझे भक्तीविण तप। शरीर शोषणादि अमूप। तें पूर्वाद्दष्टे भोगी पाप॥'' भगवद्‌भक्तीवाचून तप म्हणजे पूर्वजन्मीचे पाप भोगणे होय.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'तेविचि सटवीचिये राती। न विसंबिजे जेवी वाती। तैसा ईश्वरनिर्णय चित्ती। वाहणे सदा॥ ज्ञा.(१८८३७) अखंड भगवृतिनाला तप म्हणतात. या तपाचा निषेध केला नाही.

***२) कर्म-निषेध***

कर्म म्हणजे संध्यावंदन, पंचमहायज्ञादी कर्मे. कलियुगात ''कर्मधर्म नव्हती चांग। उण्या आंगी पतन॥ स्वैर वागण्याने ही कर्म करण्याचा अधिकार नष्ट होत जातो व ज्यांचा अधिकार कायम आहे अशा पुरुषांकडूनही ती चांगल्या रीतीने यथाशास्त्र पार पडत नाहीत. 'कर्माची येथे जी निंदा केली आहे ती भगवन्नामाला गौण लेखून व कर्माला मुख्य लेखून विषयसुखाकरिता केल्या जाणाऱ्या कर्माची होय. भगवंताप्रीत्यर्थ भगवन्नामाचा आदर करून केलेले कर्म भगवत्प्राप्तिकारक होते. म्हणून तशा कर्माची येथे निंदा नाही.'

नामस्मरणादी कर्म करीत असताना कर्माची वेळ चुकते म्हणून नामस्मरण सोडून कर्माचा आग्रह धरू नये. भगवन्नामाकडे लक्ष नसता इतर व्यवहार करीत असताना, व्यवहाराबरोबर विहित कर्मे केलीच पाहिजेत. भगवन्नामाचे साह्य घेऊन ही कर्मे यथाविधी जशी होतील तशी करून भगवंताला समर्पण करावी. भगवन्नामावाचून कर्मे चित्तशुद्धीही करीत नाहीत. सारांश, श्रीहरीच्या प्राप्तीकरिता कर्मानुष्ठान पुरे आहे असे समजून नामाचा अव्हेर करू नये असा अर्थ.

***३) क्रिया-निषेध***

क्रिया म्हणजे श्राद्धादिक नैमित्तिक क्रिया. याही क्रियेचा येथे जो निषेध केला

(९२)



आहे तो, श्रीहरीला गौण लेखून व श्राद्धीय देवता व पितर यांना मुख्य लेखून श्राद्धादी क्रिया करू नये या अर्थी आहे.

***४) श्राद्धात प्रथम नैवेद्य दाखवावा***

कर्मठ लोक श्राद्धीय देवता व पितर यांना प्रथम अन्न समर्पण करून मग श्रीहरीला नैवेद्य दाखवितात. भागवत धर्मात प्रथम श्रीहरीला अन्न समर्पण करून मग श्रीहरीच्या उच्छिष्टान्नाने देवपितरांचे यजन करितात. ''विष्णोर्निवेदितान्नेन यष्टव्यं देवतांतरम्'' असे वचन प्रमाण आहे.

नाथ म्हणतात - श्राद्धी मुख्य संकल्प जाण। पितरस्वरूपी जनार्दन। ऐसें असोनिया जाण। नैवेद्य मदर्पण न करिती॥ मी सकळ जगाचा जनिता। मुख्य पितरांचाहि पिता। त्या मज कर्म न अर्पितां। विरुद्ध सर्वथा ते श्राद्ध॥''

ज्या रामकृष्णांची आपण उपासना करतो, ते रामकृष्ण साक्षात् पूर्ण ब्रह्म आहेत व कर्मांग देवता, पितर वगैरे सर्व जीव आहेत. तेव्हा रामकृष्णाला प्रथम नैवेद्य समर्पण करून पितरांना व देवतांना रामकृष्णाला निवेदन केलेले अन्न द्यावे किंवा देवता पितर यांना समर्पण केलेले अन्न परमेश्वर श्रीहरीला निवेदन करावे; याचा कर्मठ लोक विचार करीत नाहीत. रामकृष्णादिस्वरूप विष्णूला गौण मानून कर्मकांडातील देवतांना मुख्य समजावयाचे असा आचार किंवा असे कर्म भगवंताचे प्राप्तीला साधक नाही म्हणून अशा क्रियेची येथे निंदा केली आहे.

***५) व्रतनेम-निषेध कोणता ?***

नेम म्हणजे प्रातःस्नान देवदर्शन, एकादशी, वारी, सोमवार, गुरुवार एकभुक्तव्रत इत्यादी अनेक प्रकारचे नियम मनुष्य करीत असतो. त्यांत साक्षात् भगवंताच्या प्राप्तीला उद्देशून जे एकादशी, सोमवार, शिवरात्र इत्यादी व्रतनेम आहेत त्यांचा येथे निषेध केला नाही.

भगवत्प्राप्तीचा उद्देश मनांत नसता विषयसुखाच्या कामनेने जे व्रतनेम केले जातात, त्यांचा येथे निषेध असून एकादशी इत्यादी नेम देखील भगवन्नामस्मरण प्रमाण व मुख्य मानूनच केले पाहिजे, असा निषेधाचा अर्थ आहे.

भगवद्दर्शनाचा नेम, वारीचा नेम साक्षात् भगवतांला व भगवन्नामाला प्राधान्य देऊनच प्रचारांत आले असल्यामुळे, त्याच हेतूने त्यांचे पालन होत असल्याने त्यांचा येथे निषेध केलेला नाही.

***६) धर्मनिषेध कोणता ?***

धर्म म्हणजे अग्निहोत्रादी यागानुष्ठान, आश्रमधर्म, वर्णधर्म इत्यादिकांचे ग्रहण केले जाते. स्मृत्यादी ग्रंथांत चार युगांचे चार निरनिराळे धर्म सांगितले आहेत व मुख्य भागवत धर्म म्हणजे नामस्मरण, भगवद्‌गुणानुवादाचे श्रवण, कीर्तन हा सर्व युगात सारखाच राहतो, असे सर्व शास्त्रावरून निश्चित होते. युगायुगांचे ठिकाणी अवतार धारण करून युगधर्मालाही, भागवतधर्माचे स्वरूप देऊन युगधर्माचे आचरण करण्याचा भगवान् उपदेश करितात. म्हणून

धर्मः स्वनुष्ठितः पुंसां विष्वक्सेनकथासु यः।
नोत्पादयेत् यदि रतिं श्रम एव हि केवलम् ॥

आचारलेला धर्म, भगवत्प्रेम उत्पन्न करणारा नसला तर व्यर्थ श्रम मात्र होय. ''मजविण पाविजे स्वर्ग । तो अज्ञानाचा पुण्य मार्ग ॥'' भगवत्प्राप्ती अंतरेल असा धर्म काय उपयोगाचा? म्हणून नामस्मरणाला प्राधान्य देऊन व त्यावरच भरंवसा ठेवून व्यवहारकाळी (करण्यात येणाऱ्या) धर्माचरणाचा येथे निषेध नाही. नामस्मरणाचा भरंवसा न धरता केवळ धर्माचरणाने भगवत्प्राप्तीची अपेक्षा करणाऱ्यांचा येथे निषेध आहे.

सारांश, भगवंताचे नामस्मरणाचे ठिकाणी प्रेमादर न ठेवता इतर जपतपांच्या विश्वासावर संसार करण्याची इच्छा करणे व्यर्थ आहे अशा रीतीचे धर्माचरण म्हणजे वाळूचा घाणा गाळण्यासारखे निरर्थक श्रम मात्र होय. तुलसीदास महाराज म्हणतात, ''भरोसो जाहि दुसरो सो करो'' दुसरे हजारो लोक इतर हजारो साधनांचा भरंवसा करोत बिचारे, पण मला तर कलियुगात एक रामनाम महाकल्पवृक्षच सांपडला आहे. हे सर्व रामनाम माहात्म्य कविकल्पनातिशयोक्ती नसून त्रिवार सत्य आहे. हे मी स्वानुभवपूर्वक माझ्या उपास्य श्रीरामरायाची शपथ घेऊन सांगतो. रामनाममाहात्म्य खोटे ठरल्यास माझी जीभ झडून जावो! (श्रीतुलसीदासकृत विनयपत्रिका)

## हरिपाठीं गेले ते निवांतचि ठेले ।
## भ्रमर गुंतले सुमकळिकें ॥३॥

ह्या तिसऱ्या चरणात श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, हरिनामस्मरणादी भगवद्‌भक्ती केल्याने निर्विकल्प समाधी प्राप्त होते. अमृतानुभव ग्रंथांत जीवाला कोणती स्थिती प्राप्त व्हावयास पाहिजे ह्याचे मार्मिक सुंदर निरूपण केले आहे. येथे निवांत शब्दाचा एक अर्थ असा आहे- ब्रह्मज्ञानाने अज्ञान व भक्तीने ब्रह्म अंगी मुरले



की जीव निर्विकल्प अवस्थेला प्राप्त होतो. स्मरण राहणे हा ज्ञानाचा स्वभाव तर सर्व विसरणे हा प्रेमाचा स्वभाव आहे. प्रेमामुळे जाणतेपणाचा व नेणतेपणाचा दोघांचाही विसर पडतो.

''माझी मज झाली अनावर वाचा। छंद या नामाचा घेतलासे'' (श्रीतुकाराम महाराज)

असे झाल्यावरही प्रयत्नावाचून अखंड नामस्मरण होतच राहते. भगवद्‌भक्ताचे अंतःकरण भगवत्प्राप्ती झाल्यावरही भगवंताचा क्षणभरही वियोग होऊ नये म्हणून सतत तळमळत राहते. ''निवांत'' शब्दाचा दुसरा अर्थ निर्विघ्न व निर्धास्त असा आहे. संसारांत असो किंवा परमार्थात असो. जेवढी म्हणून विघ्ने येतात ती सर्व त्या जीवाच्या पापकर्मामुळे येतात.

धर्मशास्त्रांतील एका विशिष्ट प्रायश्चित्ताने एकच पाप नाहीसे होते, पण पापप्रवृत्ती नाहीशी होत नाही. हरिनामस्मरण असे सर्वश्रेष्ठ प्रायश्चित्त आहे की, त्याच्या योगाने मागील सर्व संचित पाप नाहीसे होते व अखंड नामस्मरणाने पापप्रवृत्तीही क्षीण होत जाते. सर्वसमर्थ परमात्मा नामधारकाचे संरक्षण करणारा असल्यामुळे, ग्रहपीडांचे व देवतादिकांच्या विघ्नांचे त्याला भय उरत नाही. एकच मुख्य गोष्ट ही की, तनमनधनाने मात्र देवावर प्रेम केले पाहिजे. निरपराध नामधारकास भगवंताच्या भक्तवात्सल्याचा अनुभव पदोपदी येतो. सापराध नामस्मरण भक्तीला पोषक नाही.

नाम स्मरतां म्हणुनि आचराल दोष । तरी श्रवण मनन भक्ति पडली ओस ॥ (श्रीएकनाथ महाराज)
इंद्रियासी नेम नाही । मुखीं राम म्हणोनि कायी ॥१॥ जेवि मासीसंगे अन्न । सुख नेदी ते भोजन ॥'' (श्रीतुकाराममहाराज)

मकरंदाच्या लोभाने कमळाच्या फुलावर बसलेला भ्रमर जसा प्रेमात तल्लीन होऊन आतबाहेरचे काही स्मरत नाही, तसे भक्तही भगवत्प्रेमात अत्यंत शांत व निर्विकल्प असे भगवंताशी ऐक्य पावून राहतात. हीच ब्रह्मानंदाची अवस्था; असे श्रुतीत वर्णिले आहे.

सर्व साधनांचे सार एक हरिनाम आहे. ही हरिनामाची महती लक्षात घेऊन ज्यांनी हरिपाठीं म्हणजे नामस्मरणाचे ठिकाणी पूर्ण श्रद्धा ठेवून हरिनामस्मरणाचाच सारखा लाहो घेतला ते, ज्याप्रमाणे कमळाच्या कळीत सापडलेला भ्रमर कमळाचे प्रेमाने कमळाचे कळीबाहेर येणे विसरतो, त्याप्रमाणेच श्रीहरीचे नामस्मरणाने प्राप्त झालेल्या प्रेमाने हरीशी सायुज्यता पावल्यावर नामधारक श्रीहरीपासून अलग

होतच नाहीत. श्रीहरीच्या ठिकाणी त्यांची अखंड गाढ प्रेमसमाधी लागते. म्हणजे श्रीहरीच्या प्रेमसुखात निमग्न होऊन त्या सुखामुळे आत बाहेरचे काहीच त्यांना जाणवत नाही.सर्व विसरणे हा सुखाचा धर्मच आहे.अखंड भगवदाकारच चित्त असते. भगवान् म्हणतात, ''म्हणोनि तिहीं जे प्रेम धरलें । तेंचि आमुचें देणे उपाइलें । परी आम्ही देयावें हेंहि केले । तिहिंची म्हणीये ॥ आतां यावरी येतुलें घडे । जें तेंचि सुख आगळे वाढे । आणि काळाची दृष्टि न पडे । हें आम्हां करणें ॥''

भक्तांनी माझे जे चित्तांत प्रेम धरले तेच माझे भक्तांना देणे असते. पण मी त्यांना प्रेम देण्याच्या आधीच त्यांनीच प्रेमाची प्राप्ती करून घेतली, तेव्हा मला त्यांची माझ्या ठिकाणची प्रेमगोडी पाहून, त्यांच्या प्रेमसुखाची निस्सीम वाढ होऊन, त्या प्रेमाला काळाची दृष्टी लागणार नाही, ते खंडित होणार नाही, किंवा ती प्रेमस्थिती भंग पावणार नाही, इतकेच मला करणे उर्वरित राहते.भक्ताचे भगवत्प्रेम भगवंतच परमकोटीला पोहोचवितो व परमकोटीला पोहचलेल्या प्रेमाचे संरक्षणही तोच करितो आपल्या भक्ताची प्रेमसमाधी श्रीहरी भंगू देत नाही. जेथे भगवानच स्वतः भक्ताच्या प्रेमसमाधीचे रक्षण करितो, तेथे भक्ताला भगवदैक्यरूप प्रेमसमाधीतून कोण उठविण्यास समर्थ होणार? म्हणून भगवन्नामस्मरणाने भगवंताशी ऐक्य पावलेल्या नामधारकाची अखंड समाधी असते. ही समाधी दोन कारणांनी भंग पावण्याचा संभव असतो. एक - ऐक्याची जाणीव स्फुरली तर किंवा प्रारब्ध भोगाकरिता वृत्ती देहावर आली तर! पण स्वतः भगवान् भक्ताच्या हृदयात शिरून त्याचे सर्व व्यवहार करितो व भक्ताला देहावर येऊ देत नाही. भक्तांना अहंकारच स्फुरत नाही.

श्री तुकाराममहाराज म्हणतात - प्रारब्ध क्रियमाण । भक्ता संचित नाहीं जाण ॥ अवघा देवचि झाला पाही । भरोनिया अंतर्बाहीं ॥ विषय तो त्यांचा झाला नारायण'' भक्तांचे सर्वच परमात्मा होतो. मग भक्तांचे व्युत्थान कसे होऊ शकेल?

## ज्ञानदेवा मंत्र हरिनामाचें शास्त्र ।
## यमें कुळगोत्र वर्जियेलें ॥४॥

***अज्ञानपूर्वक नीतिशास्त्र व धर्मशास्त्रांचा निषेध.***
***नामधारकाचे कुळास यम भितो.***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, हरिनाम हा अगाध सामर्थ्यशाली मंत्र आहे असे मंत्रशास्त्र सांगत आहे.श्रीनारदसूत्रे, शांडिल्यसूत्रे, नारदपंचरात्र, श्रीमद्भागवत, विष्णुपुराण, पद्मपुराण, मत्स्यपुराण इत्यादी हरिनामाचे मंत्रशास्त्र होय. द्वादश





महाभागवतात ज्यांची गणना होते अशा यमधर्मराजाला हरिनाममहिमा माहीत असल्यामुळे, नामधारकास नाही पण नामधारकाच्या कुळाकडेदेखील तो नजर टाकीत नाही. एवढेच नाही तर श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ''तुका म्हणे सत्ता। ज्याची काळाचिये माथा'' नामधारकाच्या आज्ञेत यमराज असतो.यमधर्मराजाचाही शास्ता भगवान् श्रीहरी ज्यांच्या हृदयात वास करितो त्या नामधारकाकडे यम वाकड्या नजरेने कसा पाहू शकतो? अज्ञानी लोकांकरिता ''अविद्वद्विषयाणि सर्वाणि शास्त्राणि'' सर्व शास्त्रे भगवंतांनी निर्माण केली व त्यांचे अध्ययन न करणारे व त्यांच्याप्रमाणे न वागणारे जे अज्ञानी लोक आहेत त्यांचाच यमधर्मराज शास्ता आहे. हरिनाम मंत्रशास्त्राचे अध्ययन करणाऱ्या लोकांवर यमाचा अधिकार नाही. ''मन्त्रामरुद्राक्षविभूतिधारिणो ममाग्रतो यस्तु पुराणवक्ता । प्रशास्म्यहं नैव यमाधिकारः॥'' सर्व शास्त्रांचे अध्ययन करून एका हरिनाम मंत्रशास्त्राचे अध्ययन नसल्यास इतर सर्व अध्ययन व्यर्थ आहे. यमाचा पाश चुकविण्याकरिता हरिनाम हा निर्वाणीचा अचूक रामबाण आहे. नामधारक प्रारब्धकर्मानुसार पाप करणारा असला तरी यम त्याला दंड करू शकत नाही.(पद्मपुराण पातालखंड अ.१०७ श्लोक ४४ व श्रीमद्भागवत स्कंध ६ अ.२ श्लोक ९-१०) तसेच -

यम सांगे दूता । तुम्हां नाहीं तेथे सत्ता । जेथें होय कथा । सदा घोष नामाचा ॥१॥ नका जाऊं तया गांवा । नामधारकाच्या शिवा । सुदर्शन यावा । घरटीं फिरे भोंवती ॥२॥ चक्र गदा घेऊनि हरि । उभा असे त्याचे द्वारीं । लक्ष्मी कामारी । ऋद्धिसिद्धि सहित ॥३॥ ते बळिया शिरोमणि । हरिभक्त ये मेदिनीं । तुका म्हणे कानीं । यम सांगे दूतांचे ॥४॥''

एवढा हरिनामाचा अगाध महिमा समस्त वेदशास्त्रपुराणे तसेच सर्व संतमहात्मे यांनी एकमुखाने वर्णिला आहे.धर्म हा श्रद्धामूलकच असल्यामुळे व प्रत्येक पुरुष ''श्रद्धामयोऽयं पुरुषः'' (श्रीगीता १७-३) श्रद्धावान् असल्यामुळे व्यवहारात किंवा परमार्थात श्रद्धा ठेवल्याखेरीज भागतच नाही.

अर्थवादं हरेर्नाम्नि संभावयति यो नरः।
स पापिष्ठो मनुष्याणां नरके पतति स्फुटम् ॥'' (कात्यायनसंहिता)

कर्मकांडांतील धर्माधर्म प्रायश्चित्ते यावर जर श्रद्धा ठेवावीच लागते तर मग नाममाहात्म्यावर श्रद्धा कां ठेवू नये? व नाममहिमा अर्थवादरूप असे समजून कां घोरतम पाप आपल्या पदरी बांधून घ्यावे?

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

० ० ०

।।श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ।।श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ।।

**पाठक्रम : २०** **अर्थक्रम : १**

**नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी । पापें अनंतकोडी गेली त्यांची ।।१।।**
**अनंत जन्मांचें तप एक नाम । सर्व मार्ग सुगम हरिपाठ ।।२।।**
**योग याग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठीं ।।३।।**
**ज्ञानदेवीं यज्ञ योग क्रिया धर्म । हरिविणें नेम नाही दुजा ।।४।।**

*

प्रतिज्ञा - नामसाधनाचा उपक्रम

*

सरळ अर्थ – नामस्मरण व संकीर्तन ही वैष्णवांची जोडी होय. हरिनामस्मरणाने अनंत पातकांच्या पर्वतप्राय राशी भस्म होतात. अनंत जन्मांत केलेले तप म्हणजे एक हरिनाम होय. ते नाम सर्व मार्गांपेक्षा सोपे आहे. योग, याग, क्रिया, धर्म, अधर्म ही सर्व माया आहे. हरिपाठांत सर्वांचा लय होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, यज्ञ, योग, क्रिया, धर्म हे सर्व माझे एक हरिनामच आहे. हरिनामावाचून मला दुसरा नेम नाही.

**नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी ।**
**पापें अनंत कोडी गेली त्यांची ।।१।।**

***नामसाधनाचा उपक्रम : वैष्णव धर्म***

विवरण - जीवाने त्रिगुणात्मक मायेची कल्पना केली आहे. सत्वरजतम हे तिचे तीन गुण आहेत. या तीन गुणांना परब्रह्म आधार आहे. त्रिगुणांच्या आश्रयभूत परब्रह्माच्या गुणाला धरून तीन संज्ञा झाल्या. सत्वगुणाश्रय परब्रह्म विष्णु, रजोगुणाश्रय परब्रह्म ब्रह्मा व तमोगुणाश्रय परब्रह्म शंकर! परब्रह्माचा साक्षात्कार बुद्धी किंवा अंतःकरणवृत्तीच्या साह्यानेच होत असतो. ''सत्त्वं यद् ब्रह्मदर्शनम्'' साक्षात्काराला सत्वगुणाची आवश्यकता असते.

ज्याप्रमाणे आरसा, पाणी व चिखल यांत आपले मुख आपण पाहिजे असता,

(९५)



चिखलात तोंड दिसत नाही. पाण्यात ते अस्पष्ट दिसते व आरशात अगदी स्पष्ट दिसते. त्याप्रमाणे तमोगुणी बुद्धिवृत्तीत - तमोगुणाच्या झाकून टाकणाऱ्या धर्मामुळे, बुद्ध्याश्रय आत्म्याचे पडलेले प्रतिबिंब दिसून येत नाही. म्हणजे त्याचा अनुभव येत नाही. रजोगुणी बुद्धिवृत्तीत - रजोगुणाच्या चांचल्य धर्मामुळे परब्रह्माचा अनुभव स्पष्ट नसतो. पण सत्वगुणी बुद्धिवृत्तीत- सत्त्वगुणाच्या निर्मल प्रकाशक धर्मामुळे आत्म्याचा स्पष्ट अनुभव येतो. म्हणून आत्मसाक्षात्काराकरिता आपली बुद्धी सत्वगुणी होणे जरूर आहे. बुद्धि सत्वगुणी होण्याकरिता सत्वगुणाश्रय विष्णूची शास्त्रांतून उपासना सांगितली आहे. विष्णूची उपासना म्हणजे विष्णूच्या रामकृष्ण अवतारांची उपासना असे समजावे. उपासना म्हणजे प्रेमभक्ती होय. तसेच विष्णु या शब्दाने शिवाचेही ग्रहण केले जाते कारण शिव विष्णु एकरूप आहेत. शिवाच्या भक्तीवाचून विष्णूची भक्ती व विष्णूच्या भक्तीवाचून शिवाची भक्ती सिद्धीस जात नाही.

''शंकरप्रिय ममद्रोही । शिवद्रोही मम दास । ते नर करहि कल्पभरि । घोर नरकमहै वास ।। शिवद्रोही मम भगत कहावा । सो नर सपनेहु मोहि न पावा । शंकर विमुख भगति चह मोरी । सो नरकी मूढमति थोरी ।।'' (तुलसीदास महाराज)

हे हरिहर उपासनेचे प्रक्रियामय रहस्य आहे. असेच श्रीज्ञानेश्वर महाराजादिक सर्व संत मंडळी मानतात. भागवत धर्माचे निष्कामबुद्धीने आचरण करून विष्णूची निःसीम उपासना करणाऱ्यास वैष्णव म्हणतात. या वैष्णवांचे जोड कर्तव्य आहे. ते म्हणजे 'हरिनामस्मरण व संकीर्तन' होय. नाम शब्दाने हरिनामस्मरण व संकीर्तन या शद्बाने भगवंताच्या लीलांचे श्रवण करणे व स्वतः त्याचे वर्णन करणे घेतले जाते. याप्रमाणे नाम व संकीर्तन हे वैष्णवांचे मुख्य जोड कर्तव्य होय. यालाच भागवत धर्मही म्हणतात. हा मुख्य भागवतधर्म असून याच्यासह सर्व लौकिक, अलौकिक व स्वाभाविक असे कायिक, वाचिक व मानसिक कर्म भगवंताच्या प्राप्तीच्या उद्देशाने करून ते भगवंताला समर्पण करणे हा मिश्र भागवतधर्म होय. अशा प्रकारे वैदिक प्रवृत्तिधर्मही भागवतधर्म होतो, हे सर्व मागील अभंगात स्पष्ट केलेच आहे.

सारांश, भागवत धर्माचे आजन्म अनुष्ठान करणारा वैष्णव म्हटला जातो.

''धीर बोलिलें आत्मज्ञानीं। वीर बोलिले षडरिमर्दनीं। वैष्णव बोलिले नामस्मरणीं। रामकृष्णीं ज्ञाारु ।।६११।। कळीकाळाचे भार पळालें। येणे युगधर्मादि बंधनें आटलें। बैसलिया ठायीं फावलें। ईश्वर कृतयुग ।।६१२।। (श्रीगुलाबरावमहाराजकृत संप्रदाय सुरतरू अ. २)

श्रीतुकाराम महाराजांनीही ''वैष्णव म्हणूं तया। अवघी देवावरी माया॥'' असे वैष्णवाचे लक्षण केले आहे.

आई, मुलगा, भाऊ, मित्र, पती, इत्यादी अनेक स्नेहसंबंधाने, संसारांत जे आपण निरनिराळ्या व्यक्तींच्या ठिकाणी प्रेम करितो, ते विखुरलेले प्रेम एका श्रीहरीचेच ठिकाणी सर्व स्नेहसंबंध लावून करणे याला भक्ती म्हणतात व अशी भक्ती करणाऱ्याला वैष्णव म्हणतात. अशी प्रेमभक्ती भागवत धर्मानुष्ठानानेच प्राप्त होत असल्यामुळे दोन लक्षणांत विरोध नाही. ही भक्ती पूर्ण अद्वैत स्थितीतली होय. येथे द्वैत अगदीच राहत नाही.

या मुख्य भागवत धर्माचे अनुष्ठानाने म्हणजे भगवन्नामस्मरण व भगवत्कथांचे कीर्तनाने पापांच्या अनंत राशी नाहीशा होतात. जीवाचे ठिकाणी दोन प्रकारचे पाप आहे. एक अविद्याजन्य पाप व दुसरे पूर्व जन्मातील दुष्कर्मजन्य पाप, अविद्याजन्य पापच सर्व पापांचे जनक आहे. आपण स्वतः सच्चिदानंदस्वरूप असताना जीवाला 'देह म्हणजेच मी' असे वाटते. देह वासनेच्या सर्वस्वी स्वाधीन होऊन आपल्या मूळ सच्चिदानंद स्वरूपाला तो विसरला हेच ते अविद्याजन्य पाप होय. याचे

''बळें देह मी म्हणतां । कोटी ब्रह्महत्या माथा ॥''

असे श्रीतुकाराममहाराज वर्णन करितात. गर्भात अत्यंत दुःख होते. नवव्या महिन्यात जीव जातस्मर होतो. म्हणजे त्याला पुष्कळ जन्मांचे ज्ञान होते. पण पापामुळे तो तें सर्व बाहेर पडल्यावर विसरतो. चेतनाला विस्मृती नसावी पण जीव चेतन आहे तरी तो आत्मस्वरूपाला जाणत नाही. ही विस्मृती किंवा मी म्हणजे देह हा आरोप पापच होय. ज्ञान्यालाही प्रारब्धोपष्टब्ध पापामुळेच ज्ञानानंतरही विषयवासना उत्पन्न होते.

''ग्रंथिभेदेऽपि संभाव्या इच्छा प्रारब्धदोषतः॥''

ज्ञानाने अंतःकरणांतील अज्ञानग्रंथीचा भेद म्हणजे नाश झाला तरी पापरूप प्रारब्धामुळे विषयवासना उत्पन्न होते, असे विद्यारण्यादी ज्ञानियांचे म्हणणे आहे. म्हणजे या समस्त पापांची निःशेष निवृत्ती भक्तीरहित ज्ञानाने किंवा कर्माने होत नाही असे दिसते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी गीतेच्या चवथ्या अध्यायांत

''जरी कल्मषांचा आगर। तूं भ्रांतीचा सागर । व्यामोहाचा डोंगर । होऊनि अससी ॥ तरी ज्ञानशक्तीचेनि पाडें । हें आघवेंचि गा । ऐसे सामर्थ्य आहे चोखडें । ज्ञानी इये ॥'' (ज्ञा.अ.४-१७४-१७५)

असे म्हणजे ज्ञानाने सर्व कर्म नाहीसे होते म्हटले आहे खरे. पण ते त्यांचे

(९६)



म्हणणे संचित क्रियमाण कर्मापुरतेच आहे. ज्ञानेश्वरी इत्यादी ग्रंथांकडे पाहता श्रीज्ञानेश्वरमहाराज भक्तिविरहित कोरडे ज्ञानच मानीत नाहीत असे स्पष्ट दिसते. तेव्हा 'सर्वकर्मदाहक भक्तिसहित ज्ञान नामस्मरणादी भक्तीनेच प्राप्त होते' असे त्यांचे मत असल्यामुळे, नामस्मरणाने जे अनंत पुण्य उत्पन्न होते त्या पुण्याने पूर्व जन्मातील दुष्कृतजन्य पाप नाहीसे होऊन, नामस्मरणाने सगुण भगवत्साक्षात्कार होऊन जीव श्रीहरीशी ऐक्य पावला असता देहात्मबुद्धिरूप पापही नष्ट होते व भक्तीने प्रारब्धही नाहीसे होते, असा अर्थ. वेदाच्या दृष्टीने कोटी पापे म्हणणे पर्वतप्राय पापांच्या राशी. अशा अनंतकोटी पापांच्या राशी भगवन्नामस्मरणाने व भगत्कथासंकीर्तनाने निवृत्त होतात.

''अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् । साधुरेव स मंतव्यः सम्यक् व्यवसितो हि सः॥'' (गी.९-३०) ''क्षिप्रं भवति धर्मात्मा'' असे भगवंताने स्वमुखाने म्हटले असून, श्रीज्ञानेश्वरमहाराजही ''म्हणोनि जीवित जेणें भक्ति । दिधलें शेखीं ॥ तो आधीं जरी दुराचारी । सर्वोत्तमचि अवधारी ॥ म्हणोनि तयाचिया चित्ता । माझी जवळिक पांडुसुता । तेव्हांचि तो तत्त्वता । स्वरूप माझे ॥''

आधी अत्यंत दुराचारी असला तरी भक्तीने तो महात्मा होतो. (ज्ञाने.अ.९)

विषयवासना देखील भक्तीनेच नाहीशी होते. भक्तीवाचून विषयवासना नाहीशी होत नाही. ज्ञानी विषयवासना नाहीशी करण्याचा प्रयत्न विषयांत दोष पाहून करीत असतो. म्हणून विषयतिरस्काररूपी द्वेष त्याचे ठिकाणी राहून जातो व भक्त प्रथम स्वतःचेच दोष पाहतो व दोष नाहीसे करण्यासाठी आपण असमर्थ आहो असे समजून देवाचा धावा करितो. त्यामुळे भक्तांचे ठिकाणी दीनता व निःसाधनता उत्पन्न होते. ह्या दोन गोष्टी भक्तीला फार साधक आहेत. जोपर्यंत स्वसामर्थ्याचा अभिमान आहे तोपर्यंत परमात्मा धावून येत नाही. देवाला माता, पिता, बंधू, त्राता, मित्र अशा संबंधाने भक्त हाक मारतात. कारण कोणता तरी संबंध भगवंताशी लावल्याखेरीज भगवंताला हांका तरी कशा मारता येतील? त्याला निर्गुणाला हाका मारता येणे शक्य नाही. सगुण परमेश्वरालाच हांका मारणे, त्याचा धांवा करणे शक्य आहे. निर्गुण परमात्मा सगुण होत असेल तरच त्याचा धांवा करणे योग्य होईल, नाहीतर ती निरर्थक क्रिया होईल. सर्व भक्तांचा स्वानुभव असा आहे की, निर्गुण परमात्मा सगुण होतो व म्हणूनच भक्त भगवंताचा धावा करितात; व भक्ताची दीनता व निःसाधनता पाहून भगवान् तत्काळ धावून येतो. ''तिहीं जे वेळी मी स्मरावा । तें वेळीं स्मरला की पावावा'' असे स्वतः

ज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणणे आहे. आपल्या जड देहाशी आपण ऐक्य करितो म्हणजे मी देहस्वरूप आहे अशी देहबुद्धी धारण करितो. पण हे महत्पाप आहे. ज्ञानाने देहात्मबुद्धिरूप पाप नाहीसे झाले की, सर्व संचित क्रियमाण कर्मांचा संबंधच सुटतो हे खरे आहे पण प्रारब्धकर्म राहते. पण जोपर्यंत पाप आहे तोपर्यंत ज्ञानच उत्पन्न होत नाही, आणि ज्ञान उत्पन्न होत नाही तोपर्यंत पापाचा संबंध सुटत नाही, ही बिकट समस्या सुटण्याचा नामस्मरण हाच मार्ग आहे. नामस्मरणाने संचिताचा पूर्ण नाश होऊन क्रियमाणही बाधत नाही आणि पुढे ज्ञान होऊन ज्ञानोत्तर भक्तीने प्रारब्धही क्षीण होते. नामस्मरणाने शुद्ध चित्त झाले असता अंतःकरणांत ज्ञान दृढ होते. नामस्मरणाने जी चित्तशुद्धी होते तशी कोणत्याही कर्माने होत नाही.

**अनंत जन्मांचें तप एक नाम ।**

**सर्व मार्ग सुगम हरिपाठ ॥२॥**

***नाम माहात्म्य***

चार युगांत जीवाचे अनंत जन्म होतात. या अनंत जन्मांमध्ये जर तप केले तर ते एक वेळ हरिनाम घेतल्याच्या बरोबर होते. तप करायचे ते तरी पाप होऊ नये म्हणूनच व स्वर्गादिक लोकांच्या प्राप्तीकरिताच; पण तपाचे पुण्य क्षीण होते. नामाचे तसे नाही. नामाने सर्व पापक्षय होऊन तसेच निरंतर नाम घेत राहिल्यास श्रीहरिप्राप्तीही होते.

जे जन्म सहस्त्रीं वोळगिजे । एक वेळ यावया ॥'' (ज्ञा.९-२०६) हजारो जन्म तप करावे, तेव्हा एक वेळ तरी हरीचे नाम मुखाला येते. ''पुण्यें पोषिली असाधारणें । तिये तुझें गुण वानणें । देऊनि मज उत्तीर्णे । झालीं आजी ॥'' पूर्व अनंत जन्मांत संचित केलेल्या महत्पुण्याची राशी आपल्या पदरी असेल तरच भगवंताचे गुण श्रवण करण्याकडे व गुणवर्णन करण्याकडे प्रवृत्ती होते.

हे तप दोन प्रकारचे आहे. मखोपासन तप व व्रतोपासन तप. मखोपासन तप म्हणजे यज्ञांतील ज्या इंद्रादी देवता त्यांच्या प्रीत्यर्थ यज्ञादिक कर्मे करणे. यात इंद्रादी देवताच प्रधान मानल्या जातात. ध्यानाकरिता श्रीहरीची मूर्ती नसते व हे तप केवळ सकाम असते. व्रतोपासन तप म्हणजे ध्यान करण्याकरिता एखादी श्रीहरीची मूर्ती घेऊन, तिच्या प्राप्तीकरिता निष्काम असे एकादशी, शिवरात्री, सोमवार इत्यादी व्रते करणे. निष्काम व्रताचरणाने पुराणश्रवणाकडे प्रवृत्ती होते.





उपास्य देवता आपल्या उपासकावर दया करण्यास संतांस प्रार्थना करितात.

'पुराण श्रवण करता करता भगवंताच्या लीला व नाम यांचे ठिकाणी गोडी लागते व अंतःकरणात भगवंताचा आविष्कार होतो.' या दृष्टीने पाहता वेदापेक्षा पुराणाने भगवदाविर्भाव लवकर होतो; म्हणूनच पुराणे वेदापेक्षा श्रेष्ठ ठरतात. कर्माच्या योगाने लवकर चित्तशुद्धी होत नाही. पण भगवन्नामस्मरणाचा आरंभ केल्यापासूनच चित्तशुद्धी होऊ लागते. हरिनामस्मरण करीत राहिल्याने अनायासे प्रायश्चित्तही होते व ते पुढे तसेच निस्सीम भक्तिभावाने अखंड घेत राहिले तर नित्य सुखरूप जी ईश्वरप्राप्ती तीही मिळते. कारण चिखल धुवावयाचा म्हणजे पहिले पाण्याने तो धुऊन टाकावा लागतो व त्यामुळे ते पाणी व्यर्थ जाते, तसा प्रकार नामस्मरणाचा नाही. नामस्मरण केव्हाच वाया जात नाही. कृत, त्रेता, द्वापार, कली या चार युगांचे निरनिराळे धर्म सांगितले आहेत पण नामसंकीर्तनाने सर्व युगांतल्या धर्मांचे श्रेय मिळते.

ध्यायन् कृते यजन् यज्ञैस्त्रेतायां द्वापरेऽर्चयन् ॥ यदाप्नोति तदाप्नोति कलौ संकीर्त्य केशवम् ॥ हरेर्नामैव नामैव नामैव मम जीवनम् । कलौ नास्त्यैव नास्त्यैव गतिरन्यथा ॥ प्रायश्चित्तान्यशेषाणि तपःकर्मात्मकानि वै । यानि तेषामशेषाणां कृष्णानुस्मरणं परम् ॥

शंकरानंदानी आपल्या गीतेच्या टीकेत, कर्माने बहुत जन्माने चित्तशुद्धी होते पण नामस्मरणाने तात्काळ चित्तशुद्धी होऊ लागते, असे म्हटले आहे. चित्त शुद्ध झाले की, चित्ताची चंचलता ज्याला विक्षेप म्हणतात ती नाहीशी होते.

याप्रमाणे नामस्मरणाने मलदोष म्हणजे पापकर्म करण्याची प्रवृत्ती नष्ट होते व चित्ताची चंचलता हा विक्षेप दोषही नाहीसा होतो. विक्षेप नाहीसा होऊन नामाच्या वाढत्या प्रेमाने चित्त भगवंताचे ठिकाणी एकाग्र होते व त्या एकाग्र झालेल्या मनात भगवदाविर्भाव झाल्यावर जीवाचा जीवपणा नाहीसा होऊन तो भगवद्रूप होतो. कर्माने चित्तशुद्धी, उपासनेने एकाग्रता व ज्ञानाने जीवब्रह्मैक्य असे तीन साधनांनी जे तीन लाभ होतात ते तिन्ही लाभ एका हरिनामस्मरणाने होतात. पुनः कर्म, उपासना, ज्ञान ही साधने करताना कष्ट तरी पडतात. पण नामस्मरणात कष्ट काहीच नाहीत. नुसते तोंडाने हरिनाम घ्यावयाचे. हरिनाम इतके सोपे व एकटेच पूर्ण भगवत्प्राप्ती करून देणारे असल्यामुळे, सर्व भगवत्प्राप्तीच्या मार्गांपेक्षा श्रेष्ठ आहे.

**योगयाग क्रिया धर्माधर्म माया ।**
**गेले ते विलया हरिपाठीं ॥३॥**

***नामस्मरणांत सर्व साधनांचा लय***

योग म्हणजे चित्तवृत्तीचा निरोध.इंद्रियदमन करणे हा मोक्ष मार्ग आहे खरा; पण त्यात इंद्रियांचे दमन करताना क्लेश होतात.इतकेही करून तेवढ्यापुरते चित्त निरुद्ध झाले तरी प्रारब्धबलाने चित्त तेथून व्युत्थान पावते.योगी आपलीच चित्तशुद्धी करून घेऊन सिद्धी प्राप्त करून घेऊ शकतो. हरिनाम, ते घेणाऱ्याची शुद्धी तर करितेच पण दुसऱ्या ऐकणाऱ्याचीही चित्तशुद्धी करिते; आणि सिद्धी तर नामधारकाच्या पायी लोटांगण घालतात. नामधारकाचे योग्याप्रमाणे व्युत्थान होत नाही. व्युत्थान म्हणजे मनाचा निरोध असताना जे मन विषयांचा आकार सोडून असते ते पुनः विषयाकार होणे.

योगशास्त्रात अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश असे पाच क्लेश सांगितले आहेत. अविद्या म्हणजे विपरीत समजणे- जसे अशुद्ध वस्तूला शुद्ध समजणे, जड देहाला आत्मा समजणे वगैरे. जड देहाला मी समजणे ही अस्मिता होय. सुखाची आवड हा राग होय. दुःखाचा तिटकारा हा द्वेष होय मरणाची भीती याला अभिनिवेश म्हणतात. सर्व दुःखाला कारण आपल्या मनाची विषमता आहे. म्हणून विवेकाने समभावना करणे, हेच योगाचे ध्येय आहे; व समभावनेलाच योगशास्त्रात समाधी म्हणतात. जो जीव शिवापासून अलग झाला, त्या जिवाचे शिवाशी लययोगाने ऐक्य करणे याला गोरक्षनाथ समाधी म्हणतात. संप्रज्ञात समाधीत विषयांचा वीट येतो व असंप्रज्ञात समाधीने गुणाचा म्हणजे सत्वरजतम या मायागुणांचा वीट येतो.तरी योगी सत्वगुणाचे बंधन तोडू शकत नाही.हा सत्वगुण नाहीसा होण्याकरिता म्हणजे गुणातीत होण्याकरिता त्याला हरिभक्तीच केली पाहिजे.

म्हणूनच भगवान् म्हणतात की, तपस्व्यापेक्षा, कर्मयोग्यापेक्षा किंवा ज्ञान्यापेक्षा योगी श्रेष्ठ असला तरी ''योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना। श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः'' (गी.६-४७) माझ्या सगुण स्वरूपाचे भजन करणारा माझ्याशी अत्यंत ऐक्य पावतो म्हणून भक्त सर्वात श्रेष्ठ होय.

याग म्हणजे काम्य यज्ञ कर्म. यागादी कर्मांने हरिप्राप्ती कशी होत नाही, हे मागे सांगितलेच आहे. क्रिया म्हणजे श्राद्धादी क्रिया. कर्ममार्गाप्रमाणे ही क्रिया

(९८)



केल्यास परमेश्वर प्राप्ती होत नाही हेही मागे आलेच आहे.

धर्म म्हणजे संध्यावंदनादी विहित कर्म आणि अधर्म म्हणजे निषिद्ध कर्म किंवा धर्मत्याग.

'योगयाग क्रिया धर्माधर्म' हे सर्व मायारूप आहे. मायारूप बंधने अज्ञानी लोकांकरिता आहेत. जोपर्यंत अज्ञान आहे व त्या अज्ञानाने द्वैत भासते तोपर्यंत या सर्वांची सिद्धी आहे. अज्ञान नाहीसे होऊन श्रीहरीची अद्वैत सत्ता प्रत्ययाला आली म्हणजे यापैकी कोणाचेही अस्तित्व सिद्ध होत नाही. पुनः वर निर्दिष्ट केलेल्या योगयागादिकाने जे सुख होते त्यापेक्षा नुसत्या रामकृष्णादि नामस्मरणाने कितीतरी पटीने श्रेष्ठ सुख प्राप्त होते. म्हणून योगयागादिकां पेक्षा हरिनाम सर्व श्रेष्ठ आहे.

तात्पर्य, योगयाग क्रियादी सर्व एका नामस्मरणानेच घडतात व नामस्मरणाने मायेचे आवरणविक्षेपही नाहीसे होऊन समाधी साधली जाते. मनाचा स्वभाव असा आहे की ते जिकडे लागते त्यावाचून दुसरा पदार्थ मनात येत नाही. वाणीने नामस्मरण करीत असताना व मन तिकडे लागले असतांना नामावाचून व त्याचा अर्थ जो श्रीहरीचे रूप त्यावाचून मनात दुसरे काहीच येत नाही.ज्ञानमार्गात मायाआवरणभंगास व्यतिरेक वगैरे करावा लागतो. तो व्यतिरेक नामस्मरणाने सहज साधतो. विषयाच्या आकाररहित मन होणे यालाच मायावरणभंग म्हणतात. नामस्मरणाने अशारीतीने विषयरहित मन होऊन भगवद्रूप होते व पुढे अष्ट सात्त्विक भाव उत्पन्न होऊन समाधी सिद्ध होतो.

वाणीने नामस्मरण करण्यात वितर्क राहत नाही.वितर्क म्हणजे शब्दार्थाच्या संबंधाचा विचार करणे. नामस्मरणाबरोबर भगवंताच्या रूपाचे ध्यान झाले असता सविचार समाधी नाहीसा होतो.भगवंताच्या ध्यानाने दुःखही नाहीसे होते.भगवंताची सेवा करण्यात अस्मिता नाहीशी होते.भगवंताविषयीच्या प्रेमाने, असंप्रज्ञात समाधीने साधणारे गुणवैतृष्ण्य म्हणजे सत्वादिगुणांचाही वीट येतो.' शांति क्षमा दया । त्याही नको पंढरीराया'' हे श्रीतुकाराममहाराजांचे भगवंतापाशी मागणे आहे.

भगवत्प्रेमापुढे या सात्विक गुणांची महती नाही. हे याचेच द्योतक आहे. हरिनामस्मरणाने अनंतकोटी यज्ञाचे पुण्य प्राप्त होते किंवा नामधारकाच्या पाऊलापाऊली यज्ञ होत असतो. श्राद्धादी क्रिया करून जी आपल्या पितरांना सद्गती द्यावयाची त्यापेक्षा कितीतरी ज्ञा सद्गती म्हणजे वैकुंठवास, नामधारकाच्या

नामस्मरणाने त्याच्या पितरांना प्राप्त होतो. संध्यावंदनादिक नित्यकर्म देखील, नामस्मरणानेच संपादित होते.

''नामें स्नान संध्या केलें क्रिया कर्म । त्याचा भवभ्रम निवारला ॥'' असे श्रीतुकाराममहाराजांनी म्हटले आहे. ''संध्या कर्मध्यान जपतप अनुष्ठान । अवघे घडे नाम उच्चारितां । योगयागतपे केलीं तयानें अमूपें ॥'' हीही त्यांचीच वचने आहेत. नामधारकांना दक्षिणायन उत्तरायण वगैरेची काही गरज नाही. नामधारकास ब्रह्मज्ञानास लागणारी शमदमादी संपत्ती यासह ब्रह्मज्ञान होते म्हणून त्यांना ब्रह्मज्ञानाचीही खटपट नको. नामधारकास अधर्माची बाधाच होत नाही.

सारांश, योग, याग, क्रिया, धर्म, अधर्म हा सर्व मायिक पसारा हरिनामस्मरणाने लयास जातो. म्हणजे निष्ठावंत अखंड नामधारकास यांचे अनुष्ठान करावे लागत नाही.

**ज्ञानदेवी यज्ञ योग क्रिया धर्म ।**

**हरीविणें नेम नाहीं दुजा ॥४॥**

***हरिनामस्मरण हा एकच नेम***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, नामाने सर्व धर्म घडतो, नामानेच योग्यापेक्षा अत्यंत श्रेष्ठ असे अखंड सुख मिळते व नामानेच पितरांनाही सद्‌गती मिळते व नामाने अधर्मजन्य पाप लागत नाही म्हणून मला एका हरिनामावाचून दुसऱ्या योगादिकांच्या अनुष्ठानाची आवश्यकता नाही. कारण वरील सर्व साधनांपेक्षा हरिनाम सर्वश्रेष्ठ आहे. सर्व धर्म हरिनामानेच होत असून मायारूप आवरणभंग साध्य होत असून मायारूप आवरणभंग होऊन एका हरिनाम साधनानेच समाधी उत्पन्न होतो. घेरंडसंहितेत हेच सांगितले आहे. नामधारकाने हे मात्र पूर्ण लक्षात ठेवावे की,

नामस्मरणादी भक्तीत तल्लीन होऊन देहादिकांचा पूर्ण विसर पडला असता, त्यायोगे नित्यनैमित्तिक कर्म यत्कदाचित् न घडले तर त्याबद्दल दोष सांगितला नाही. - परंतु विषयभोग सुखात मन तल्लीन होऊन जर नित्यनैमित्तिक कर्मभंग घडला तर मात्र मोठा दोष व पाप आहे हे केव्हाही विसरता कामा नये.

श्रीज्ञानेश्वर महाराज स्वतः विषयी सांगतात की, मला स्वतःस यज्ञ, याग, क्रिया व धर्म हे सर्व, तसेच वेदातील व शास्त्रांतील नियम एका श्रीहरीवाचून दुसरे नाहीत म्हणजे सर्व धर्म हरिनाम घेतल्याने केलेसे होतात. एतदर्थ भागवत पहा ''हरिं





विना नैव मृतिं तरन्ति'' (भाग. वेदस्तुति)

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमहाराजर्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

**पाठक्रम : २१** **अर्थक्रम : २३**

**काळवेळ नाम उच्चारितां नाहीं । दोन्ही पक्ष पाही उद्धरती ॥१॥**
**रामकृष्णनाम सर्व दोषां हरण । जडजीवां तारण हरि एक ॥२॥**
**हरिनामसार जिव्हा या नामाची । उपमा त्या दैवाची कोण वाणी ॥३॥**
**ज्ञानदेवी सांग झाला हरिपाठ । पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा ॥४॥**

*

प्रतिज्ञा - नामस्मरणास काळनियम निषेध (नाही), श्रोतृपक्षाचे व वक्तृपक्षाचे कल्याण. पाषाण-पशुपक्षादि श्रोतृपक्ष व ब्राह्मणादी मनुष्यजाती वक्तृपक्ष, तेच जड-जीव, या दोहोंचा उद्धार. माहात्म्य कळो न कळो नाम घेतच राहावे. भक्तीत पाषाणादिकांपासून देवांपर्यंत सर्व जीवांचा समान अधिकार. दुसऱ्यास उपदेश करताना आपलेही आईबाप उद्धरतात. याची ऐतिह्य प्रमाणाने सिद्धी.

*

सरळ अर्थ - नामस्मरणास वेळ काळाचे बंधन नाही. नामस्मरण हे श्रोता व वक्ता या दोघांचा उद्धार करिते. रामकृष्ण नामाचा जप सर्व दोषांची होळी करणारा आहे. जड व जीव दोन्ही नामस्मरणाने तरतात. जिव्हेचे सर्व सार्थक हरिनाम हेच आहे. नामधारकाच्या भाग्याचे कोणालाही वर्णन करता येत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, हरिपाठ हा सर्व साधनसंपत्तीसह श्रीहरीची प्राप्ती करून देणारा असून त्याच्या योगाने नामधारकाच्या पूर्वजांना मोक्षमार्ग किंवा वैकुंठमार्ग अत्यंत सोपा होतो.

**काळवेळ नाम उच्चारितां नाहीं ।**

**दोन्ही पक्ष पाही उद्धरती ॥१॥**

**रामकृष्ण नाम सर्व दोषां हरण ।**

**जडजीवां तारण हरि एक ॥२॥**

### *नामस्मरणास काळनियमनिषेध नाही व दोन्ही पक्षांचा उद्धार*

विवरण - नामस्मरण करण्यास कोणत्याही प्रकारची बंधने सांगितली नाहीत.कारण ते स्वतःच वस्तुतंत्र आहे.संध्यावंदनादिक वैदिक कर्माला ज्याप्रमाणे प्रातःकाळ इत्यादी काळाचे बंधन आहे, किंवा संमार्जनाने पवित्र झालेल्या जागेवर ती कर्मे करावी लागतात त्याप्रमाणे भगवन्नामस्मरणाला देश काळाचे बंधन नाही. ''नामजप यज्ञ परम । बाधूं न शके स्नानादि कर्म । नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थी ॥'' (ज्ञा.१०-२३३) असे माउलीचे म्हणणे आहे.उलट नामानेच अपवित्र देशकाल पवित्र होतात व अधर्मही धर्मरूप होतो. ''अशौच ते बाधी आणिकां अक्षरां । नाम निदसुरा घेतां तरे ॥'' अशुद्धी वगैरे हे हरिनामावाचून इतर मंत्रजपाविषयीच सांगितली आहे.गायत्रीमंत्र अशुद्ध राहून अकाली जपल्यास मंत्रचळ उत्पन्न होतो.''मंत्रचळ पिसें लागते सत्वर'' पण हरिनामाचे तसे नाही. हरिनाम निजून घेतले तरी चालते. भलते ठिकाणी व भलते काळी घेतले तरी चालते.

''कर्म धर्म नव्हती सांग । उण्या आंगी पतन ॥ भलत्या काळी नामावळी । सुलभ होळी भाविकां ॥ म्हणोनि गोड सर्वभावे । आंघोळी न लगे तोंड धुवावें ॥'' असे हे हरिनाम सर्व अमंगलाला मंगल करणारे आहे.

कर्म, ज्ञान व योग या मार्गांचे फळ एकट्या कर्त्यालाच मिळते. पण नामस्मरणाचे तसे नाही. नामस्मरण करणारा तर तरतोच, शिवाय त्याबरोबर नामश्रवण करणाराही तरतो. नामाचा कीर्तनघोष करणाऱ्या वक्तृवर्गामध्ये मनुष्य जातीचा अंतर्भाव होतो व नामश्रवण करणाऱ्या श्रोतृवर्गात जीवंत चेतन प्राणी व वृक्षपाषाणादी अचेतन प्राणी यांचा अंतर्भाव होतो. भगवन्नामस्मरणाचा असा थोर अगाध महिमा आहे की, ''ऐसे माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाचीं दुःखे । अवघे जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥'' (ज्ञा. ९-२००)

### *पशू आणि जड जीवांचाही उद्धार*

भगवन्नामस्मरणाने जड-चेतन अशा सर्व प्रकारच्या प्राण्यांचे दुःख नाहीसे होते.पाषाणापासून तर देवापर्यंत जो कोणी भगवन्नाम श्रवण करील किंवा भगवन्नाम उच्चारील तो संसार तरून जातो. महाभारतात, वृक्षपाषाणादी जीवयोनींत इंद्रियज्ञान आहे, ''तस्मात्पश्यन्ति पादपाः।'' इत्यादी वचनाने सांगितले आहे. भगवन्नाम श्रवणाने त्यांच्या तमोगुणी योनीतील तमोगुणाचा नाश होऊन सत्वगुणाचा



प्रादुर्भाव होतो व त्यांचा उद्धार होतो. याच तत्त्वाला धरून शुकाला हरिनाम शिकविता शिकविता गणिका व शुक दोघेहि तरून गेले.

श्रीसंत बहिणाबाईंच्या संगतीत असलेले पशुजातीतील गायीचे वासरू कीर्तन व भगवन्नाम श्रवण करून तरून गेले हे प्रसिद्ध आहे. संतांच्या संगतीत नामस्मरण श्रवणाने वृक्षपाषाणादिकही उद्धरून जातात म्हणून उद्धवाने –

''तद्भुरिभाग्यमिह जन्म किमप्यटव्यांम् ।
यद्गोकुलेऽपि कतमांघ्रिरजोभिषेकम् ॥''

वृंदावनांतील ज्या वृक्षपाषाणांना गोपगोपीसारख्या माहात्म्यांच्या रजधूळीचा लाभ होऊन त्यांच्या संगतीत भगवन्नामश्रवण करावयाला मिळते अशा त्या वृक्षपाषाणादी योनीत माझा जन्म व्हावा अशी उत्कट इच्छा प्रगट केली व असा जन्म प्राप्त होणे थोर भाग्य होय असे, त्यांनी धन्योद्गार काढले आहेत.

''जपतो हरिनामानि स्थाने शतगुणाधिकः।
आत्मानं च पुनात्युच्चैर्जपन् श्रोतृन् पुनाति च ॥''

एका ठिकाणी बसून नामस्मरण केले असता नामस्मरण करणारा परम पुनीत होतो; पण मोठ्याने नामघोष केला असता नामस्मरण करणारा व नामस्मरण ऐकणारा दोघेही पुनीत होतात. म्हणून जागेवर बसून नामस्मरण करण्यापेक्षा मोठ्याने नामस्मरण करणे शतपट चांगले आहे.

''पशु पक्षी कीट आदि बोलीते ना पारे । शुनी लेई हरिनाम तारा सब तरे ॥ जपीले से हरिनाम आपनी से तरे । उच्चा संकीर्तन पर उपकार करे ॥ अत एव उच्चा करी कीर्तन करीले । शत गुण फल हय सर्व शास्त्र बोले ॥ (श्रीचैतन्य चरित्रामृत)

## **हरिनामसार जिव्हा या नामाची ।**
## **उपमा त्या दैवाची कोण वाणी ॥३॥**

### *माहात्म्य कळो किंवा न कळो, नाम घ्यावे*

जिव्हेचे सारभूत आद्य कर्तव्य हरिनाम घेणे हेच आहे. जीवाला वाणी वगैरे इंद्रिये जी प्राप्त झाली ती त्या सर्व इंद्रियांनी भगवंताची सेवा करावी म्हणूनच भगवंतांनी दिली. त्यात वाणीने भगवंताचे नामस्मरण करावे एवढेच तिच्या अस्तित्वाचे सार होय म्हणून ''सा वाग् यया तस्य गुणान् गृणीते'' जी जिव्हा

भगवंताचे नामस्मरण करिते तिलाच जिव्हा हे नाम सार्थ आहे. बाकीच्या जिव्हा ''जिव्हा ह्यसति दार्दुरिकेव'' मेंडक्या जशा ओरडतात तशा ओरडणाऱ्या समजाव्या. हरिनाम न घेणारी जिव्हा 'जिव्हा' या नामास योग्य नाही.तिने आपले नाव निरर्थक केले व हरिनाम घेणाऱ्या जिव्हेने आपले नाव सार्थ केले,

''न कळें तें कळों येईल उगलें । नामें या विठ्ठले एकाचिया ॥१॥ न दिसें तें दिसों येईल उगलें । नामें या विठ्ठले एकाचिया ॥२॥ न बोलो तें बोलों येईल उगलें । नामें या विठ्ठले एकाचिया ॥३॥ न भेटे ते भेटो येईल आपण । करितां चिंतन विठोबाचें ॥४॥ अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर म्हणतां वाचें ॥५॥ तुका म्हणे जीव आसक्त सर्व भावें । तरतील नावें विठोबाच्या ॥६॥''

असा नामस्मरणाचा अगाध महिमा आहे म्हणून हरिनामाचे माहात्म्य कळो किंवा न कळो नामस्मरण करीत राहावे. ज्यांनी आपल्या जिव्हेस नामस्मरणाचा स्वाभाविक चाळा लावला, त्या भाग्यवानाचे भाग्य कोण वर्णन करण्यास समर्थ आहे? त्याच्यासारखा भाग्यवान् नाही असा भावार्थ.

त्यामध्ये इतर व्यावहारिक शब्दांचा जिव्हेला विटाळ न होऊ देता तिला एका हरिनामाचा छंद लावणे हे खरे मौन आहे.

अशा हरिनामाच्या प्रेमाने पुढे भक्तिप्रेमसुख प्राप्त होते. हे भक्तिप्रेमसुख अत्यंत दुर्मिळ आहे.

तुकाराममहाराज म्हणतात,

''भक्तिप्रेमसुख नेणवें आणिका । पंडित वाचका ज्ञानियासी ॥१॥
आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त । तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां ॥२॥

भक्तिप्रेमसुख अत्यंत दुर्लभ आहे म्हणून भगवत्कृपेने नामस्मरणाचे द्वारा भक्तिप्रेमसुख ज्यांना प्राप्त झाले त्यांचे भाग्याचे वर्णन करवत नाही असे माउली म्हणते. अर्थात् हरिनामस्मरण सर्व साधनांचे सारसर्वस्व आहे.

जी जिव्हा हरिनामस्मण करीत नाही ती पशुपक्षांची जिव्हा किंवा हरिनाम सोडून व्यर्थ कथालाप करिते ती जिव्हा मेंडकीच्या जिव्हेसारखी समजावी - असे पुराणादि ग्रंथ व संत म्हणतात.

अखंड हरिनास्मरण करणारा प्रेमाने तल्लीन होऊन साक्षात् हरिस्वरूपच होतो. अशा अखंडित हरिनामाने श्रीहरिस्वरूप झालेल्या दैवाचे म्हणजे भाग्यवानाचे भाग्य कोण वर्णू शकेल? ''उपमा त्या देवाची कोण वाणी'' असा पाठ कित्येक लोक





घेतात.

''नामाची आवडी तोचि जाणा देव । न धरी संदेह काही मनी ॥'' असे तुकाराममहाराजही म्हणतात. जो नामस्मरण करता करता अद्वैत श्रीहरिस्वरूप झाला त्याला कशाची उपमा देऊन स्तुति करता येईल? अद्वैतांत त्याच्यावाचून काही दुसरे नसल्यामुळे तो निरूपम झाला असा अर्थ.

**ज्ञानदेवीं सांग झाला हरिपाठ ।**
**पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा ॥४॥**

***नामधारकाच्या पूर्वजांस वैकुंठप्राप्ती***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, माझ्या ठिकाणी हरिनामस्मरण सांग झाले, म्हणजे श्रीहरीच्या प्राप्तीकरिता ज्या ज्या गोष्टींची किंवा साधन सामुग्रीची आवश्यकता लागते, ती सर्व हरीप्राप्तीची अंगभूत सामुग्री एका भगवन्नामानेच पूर्ण होऊन भगवत्प्राती झाली. कर्ममार्गात कर्माचे, देवतांचे, विधियुक्त पदार्थांचे वगैरे ज्ञान हे कर्मानुष्ठानाचे अंग असते. योगांत वैराग्य व अभ्यास हे योगसिद्धीचे अंग आहे. शमादी साधनचतुष्टयसंपत्ती हे ब्रह्मज्ञानाचे अंग समजले जाते, पण भक्तिमार्गात हरिनामस्मरण हेच अंग व अंगी आहे. हरिनामस्मरणास प्रवृत्त झाल्यापासून एका हरिनामानेच सर्व साधनांची पूर्ती होऊन कोणत्याही साधनाचे स्वतंत्र साह्य घ्यावे लागत नाही.हरिनाम सर्व साधनांचे काम म्हणजे निर्गुण व सगुण या दोन्ही रूपाची प्राप्ती करून देऊन पुनः उर्वरित राहते. श्रीतुकाराममहाराज म्हणतात.

''मुक्तीवरील भक्ति जाण । अखंड मुखी नारायण ॥''

म्हणून हरिनाम हे प्रथम साधन असून शेवटी साध्यही तेच होते.

''बीज आणि फळ । हरीचें नाम ॥''

तात्पर्य, श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मला एका हरिनामावाचून दुसरे काही करावे लागले नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज स्वतः नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, पूर्ण सदानंद ब्रह्मस्वरूपाची मूर्ति.ते साधनाने पूर्ण झालें असे म्हणताच येत नाही. पण लोकांना अचूक मार्ग दाखविताना त्यांच्या मनात दृढ व अचल विश्वास उत्पन्न करण्याकरिता, आपल्या ठिकाणी साधकपणा घेऊन त्यांनी साधकाची भाषा येथे वापरली आहे. सिद्धी अचूक होणे हे सांगतेचे लक्षण मानले जाते. मरण समयी घेतलेल्या नुसत्या नामाने अजामिळ उद्धरला म्हणून हरिनाम स्वयंपूर्ण,

सर्वसाधनरूप आहे असे हे सांग नाम उच्चारणारा पूर्ण होतोच पण त्याचे पूर्वजांनाही वैकुंठप्राप्ती होते. श्रीहरीच्या नामाचे माहात्म्य एवढे आहे की, नामधारक ज्यांच्या कुळांत जन्मला त्यांना नामधारकाचे पूर्वज होण्याचे भाग्य लाभले इतक्याच संबंधामुळे, नामधारकाचे पूर्वजांना वैकुंठलोकाची प्राप्ती होते. 'नामधारकाचा संबंध' यावाचून त्यांच्या वैकुंठप्राप्तीचे दुसरे साधन नाही असा भाव.

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

(१०२)

## पाठक्रम : २२ अर्थक्रम : २१

**नित्य नेम नामीं ते प्राणी दुर्लभ । लक्ष्मीवल्लभ तयां जवळी ॥१॥**
**नारायण हरि नारायण हरि । भुक्तिमुक्ति चारी घरीं त्यांच्या ॥२॥**
**हरिविणे जन्म नर्कचि पै जाणा । यमाचा पाहुणा प्राणी होय ॥३॥**
**ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड । गगनाहूनि वाड नाम आहे ॥४॥**

*

प्रतिज्ञा :- नामसाधन करण्याविषयी आज्ञा. नामधारकाचा रक्षक वासुदेव.
हरीनामस्मरण न करणाऱ्यास जीवन्नरकप्राप्ती.
नामधारकास ज्याप्रमाणे जीवन्मुक्ती व विदेहमुक्ती
त्याप्रमाणे नाम न घेणाऱ्यास जीवन्नरक व मेल्यावरी नरक.
सच्छिष्याचा श्रीगुरूस प्रश्न, नाम पंचभूतमय नसून व्यापक आहे,
असे सद्गुरुचे उत्तर. आकाशाचे शब्दपण नामास लागू नाही.

*

सरळ अर्थ - भगवन्नामाच्या नित्य स्मरणाचा नियम ज्याला आहे असा पुरुष फार विरळा दिसतो. नित्य नामस्मरण करणाऱ्यापाशी लक्ष्मीवल्लभ भगवान् नित्य राहतो. त्याच्या मुखातून 'नारायण हरी नारायण हरी' असा नामजप सारखा चालला आहे अशा पुरुषाचे घरी चारी मुक्ती वास करितात व त्याला परमानंदाचाही लाभ होतो.हरीचे नाम ज्याच्या मुखाला येत नाही, अशा पुरुषाला जीवंतपणी दुःख भोगावे लागते व मरणानंतरही तो यमलोकास जातो. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी,



सद्गुरु निवृत्तिनाथांना आपल्या मनातील नाममाहात्म्याविषयी प्रश्न विचारला तेव्हा सद्गुरु निवृत्तिनाथांनी सांगितले की, बाबा! ''हरिनाम हे आकाशापेक्षाही मोठे आहे. नाममाहात्म्य अगाध व अतर्क्य आहे.''

**नित्य नेम नामीं ते प्राणी दुर्लभ ।**
**लक्ष्मीवल्लभ तयां जवळी ॥१॥**

### *नामसाधनाची आज्ञा व नामधारकाचा रक्षक हरी*

विवरण - मागे सांगितल्याप्रमाणे भगवंताला नामाची अत्यंत आवडी आहे. ''समुझत सरस नाम अरू नामी । प्रीति परस्पर प्रभु अनुगामी ॥'' असे तुलसीदास महाराजांचे वचन असून

''करितां आठव। धांवोनिया घाली कव ॥ नाम उच्चारितां कंठीं । पुढें उभा जगजेठी ॥'' असे तुकाराममहाराजही म्हणतात.

नाम-रूपांचा कधी संबंध तुटत नाही.ते अखंड प्रभूचे ठिकाणी राहतात.नाम-रूपांपासून व रूप नामापासून अलग होत नाही व दोन्ही प्रभूपासून अलग होत नाहीत.हेच तिघांतील परस्परांच्या प्रेमाचे द्योतक आहे.यामुळेच श्रीज्ञानेश्वरमहाराज ''परी तयापाशी पांडवा । मी हारपला गिंवसावा । जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥'' (ज्ञा. ९-२०८) असे निर्धारपूर्वक सर्व नामधारकाना आश्वासन देऊन भगवन्नामस्मरण करण्याची आज्ञा करीत आहेत.ते म्हणतात, नित्य भगवन्नामस्मरण करणाऱ्या नामधारकापाशी भगवान् लक्ष्मीवल्लभ नित्य वास करितो. पण नित्य नामस्मरणाचा ज्याने दृढ निश्चयपूर्वक नियम केला असा नामधारक मात्र विरळा दिसतो.असे पुरुष थोर भाग्यवान समजले पाहिजेत, कारण भगवान् त्यांचेपाशी अखंड राहून त्यांचा अखंड सांभाळ करितो. त्याच्या नित्य नामस्मरणाच्या नियमात काही विघ्ने येऊ देत नाही व आपल्या भक्ताचे उणे पडू देत नाही.

नामधारकास आपल्या भक्तीचा अहंकार उठला की मात्र नामधारक भक्ताच्या प्रेमास ओहोटी लागून त्याच्याजवळ राहाणारा सगुण परमात्मा अंतर्धान पावतो.आपण इतरापेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ अधिकारी आहोत अशा अहंकाराची उर्मी गोपींच्या मनात उत्पन्न होताच रासक्रीडा चालू असता सर्वसाक्षी भगवान् श्रीकृष्ण तत्काळ तेथेच अंतर्धान पावले. भगवान् अखंड जवळ राहाण्यासाठी तिळमात्रही अहंकाराची उर्मी भक्ताच्या मनास शिवता कामा नये.

**नारायण हरि नारायण हरि ।**

**भुक्तिमुक्ति चारी घरीं त्यांच्या ॥२॥**

***नामधारकाची जीवन्मुक्ति व विदेहमुक्ति***

ज्यांच्या मुखातून 'नारायण हरि नारायण हरि' या नामाचा सारखा जप चालू आहे व त्यात कधी खंड पडत नाही, अशा त्या भगवद्भक्तांना सरूपतादी चारी मुक्तींचा लाभ होऊन अखंड परमानंदाचाही लाभ होतो. कारण भगवान् लक्ष्मीवल्लभच स्वतः त्यांचे सर्वतोपरी रक्षण करणारा असल्यामुळे, त्यांना लागलेली नामस्मरणाची गोडी कधी कमी होऊ देत नाही. भगवान् त्यांना आपले अवीट प्रेमदान करितो. भगवत्प्राप्तीमुळे उठू पाहणारा धन्यताभिमान भक्ताचे ठिकाणी भगवान् उठू देत नाही. कारण अहंकार उठला की, प्रेम कमी होते व प्रेमामुळेच साकार झालेले परब्रह्मही अंतःकरणात अंतर्धान पावते हा भक्तांचा अनुभव आहे. म्हणून ''आतां यावरी येतुलें घडे । जें तेंचि सुख आगळें वाढे। आणि काळाची दृष्टि न पडे । तें आम्हां करणें ॥'' (ज्ञा.१०-१३३) भक्तांची प्रेमस्थिती सांभाळण्याची जबाबदारी भगवान् आपल्यावर घेतो.

भगवान् भक्तांच्या प्रेमस्थितीचे ऋण अशा रीतीने फेडू पाहतो की, ''भक्तांचे ठिकाणी अहंकार उठू देत नाही व त्यांचा भक्तिप्रेमभाव कमी होऊ देत नाही'' अखंड प्रेम राहिल्याने अखंड परमानंद राहतो व त्रिविध दुःखांचाही भास होत नाही.

'परमेश्वराशी एकरूप झालेल्या वृत्तीला आतले किंवा बाहेरचे काहीही जाणवले न जाणे हेच ब्रह्मानंदाचे लक्षण श्रुतीने सांगितले आहे.'

हा ब्रह्मानंद व्यवहार करीत असतानाही थोर भगवद्भक्ताला असतो. व्यवहारकाळीही अखंड आनंद असणे याला दृष्ट-परमानंद किंवा मुक्ती म्हणतात.

आत्मज्ञानावाचून उपासकाच्या सरूपतादी मुक्ती अनित्य असतात, पण ज्ञानीभक्ताच्या अन्वयदृष्टीमुळे त्याच्या चारी मुक्ती अविनाशी असतात. अन्वयज्ञानाने सर्वच नामरूप ब्रह्मरूपाशी ऐक्य पावून अविनाशी होते. म्हणून ज्ञानी भक्तांच्या चारी मुक्ती नित्य असतात. हा मुक्तीचा लाभ घेण्याकरिता ज्ञानी भक्तांना देशांतराला जावे लागत नाही. ते जेथे असतात तेथेच त्यांचा वैकुंठलोक असतो. षड्गुणैश्वर्यसंपन्न सृदिानंद परमात्मा त्यांच्याजवळ अखंड राहतो म्हणून त्यांचा वैकुंठलोक ज्या देशात ते राहतात तोच देश होतो. त्यांना काही कमी नसते. पण भगवत्प्रेमाने ते

(१०३)



इतके मस्त असतात की, एका भगवंताच्या प्रेमावाचून चुकूनही त्यांना दुसऱ्या कशाचीही इच्छा होत नाही.

***जीवन्मुक्ती व विदेहमुक्ती***

नामधारकास जीवन्मुक्ती व विदेहमुक्ती जीवंतपणीच प्राप्त होतात व त्यांची अखंड तशीच स्थिती राहते. जीवंत असतात व मुक्त असतात म्हणून जीवन्मुक्ती असते

व जाणीवनेणीवरहित समाधीप्रमाणे त्यांची अंतःकरणस्थिती असते म्हणून विदेह मुक्ती असते.

**हरिविणें जन्म नरकचि पैं जाणा ।**

**यमाचा पाहुणा प्राणी होय ॥३॥**

***हरिनाम-विन्मुखास जीवंतपणीं व मरणानंतरही नरक***

ज्याप्रमाणे नामधारकांना जीवन्मुक्ती व विदेहमुक्ती दोन्ही प्राप्त होतात, त्याप्रमाणे हरिनामविन्मुखांना जीवंतपणी नरक व मरणानंतर यमलोक म्हणजे नरकच प्राप्त होतो. हरिनामस्मरणावाचून जो काळ जातो तो नरकभोगाचाच काळ होय. नरकातील किड्यांनाही तेथे थोडे सुख वाटते पण विचारी पुरुषाच्या दृष्टीने ते सुख नव्हे. हरिनामविन्मुख पुरुष विषयसुखांतच गढलेले असावयाचे पण असे विषयासक्त पुरुष विषयभोगात जे सुख अनुभवतात ते अत्यंत अल्पकाळ टिकणारे असते. दुःख म्हणून दुसरे काही निराळे नसून ''दुःखम् अल्पसुखं स्मृतम्'' क्षणिक सुखच दुःख होय. क्षणिक सुखाची प्राप्ती हेच दुःख आणि विषयासक्त पुरुषाला हेच नित्य अनुभवावे लागते; कारण शाश्वत सुखाचा मार्ग जे हरिनामस्मरण इकडे त्याची प्रवृत्तिच नसते. तेव्हा हरिनामविन्मुखांना, जीवंत असतात तोपर्यंत कधी समाधान नसते. विषयवासनारूप आध्यात्मिक दुःखाने तर ते सारखे तळमळतच असतात व विषयवासनेने जे काही करितात ते, सूक्तासूक्त मार्गाचा विचार न करताच अविवेकाने करितात म्हणून –

''निंब निंबोळिया मोडोनियां आला । तरी तो काउळियांसीचि सुकाळ झाला । तैसा मद्भक्तीविण वाढिन्नला । दोषांचि लागीं ॥'' (ज्ञा.९-४३८)

त्यांचे सर्व करणे, दुःखरूप असे क्षणिक सुख मिळविण्याकरिताच होते किंवा मेल्यानंतर नरकाची प्राप्ती करून देणारे होते. ''म्हणोनी स्वधर्म जो सांडील ।

तयातें काळ दंडील । चोर म्हणूनी हरील । सर्वस्व तयाचे ॥ देखे प्राप्तहि न लाहे । भोग भोगूं ॥'' (ज्ञा.३-११२)

हरिविन्मुखांना, त्यांच्या कर्माने प्राप्त झालेले भोगहि भोगण्यास अनुकूल परिस्थिती राहत नाही. तात्पर्य, हरिनामस्मरण न करणाऱ्यांना, जीवंतपणी प्रिय विषयांचे वियोगदुःख, अप्रिय विषयांचा संबंध झाल्याचे दुःख, आधिदैविक व आध्यात्मिक दुःख, असे दुःखच सतत भोगत राहावे लागते. त्यांना नामस्मरणाचा सुखाचा मार्गच नसल्यामुळे, त्यांच्या मनात सुखसमाधान कधीच राहणे शक्य नाही व मेल्यावरही त्यांना पापाचे फळ, नरकयातनादी दुःख भोगावे लागते.

सर्वश्रेष्ठ स्वधर्म हा खरा सगुणभक्तिप्रधानच आहे. एका परमेश्वराप्रीत्यर्थच धर्माचे अनुष्ठान सांगितले आहे. समस्त धर्मानुष्ठानांच्या द्वारे एक भगवान् यजिला जातो. सर्व कर्मरूप धर्मानुष्ठानाला आदी, मध्य व अंती सांग करणारे म्हणजे पूर्णता देणारे एक हरिनामच असल्यामुळे -

अखंड व आजन्म नामस्मरण करीत राहणे हा तर अत्युा परमश्रेष्ठ धर्म आहे.

सर्व श्रौतस्मार्त कर्माहून नाममहात्म्य किती अगाध व अतर्क्य आहे व नामाची स्तुती तिळमात्र असत्य नसून किती यथार्थ आहे हे श्रीधरस्वामींनी श्रीमद्भागवताच्या सहाव्या स्कंधातील अजामिळ आख्यानावर भाष्य करिताना बिनतोड सिद्ध केले आहे.

''नारायणेति शब्दोऽस्ति, वागस्ति वशवर्तिनी ।
तथापि नरके घोरे, पतन्तीति किं अद्भुतम्'' (पांडवगीता)

भगवंताचे नाम एवढे सुलभ व सर्व इहपर दुःखापासून सोडविणारे असताना ते न घेता लोक नरकाला जातात हे आश्चर्य आहे.

**ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड ।**

**गगनाहूनि वाड नाम आहे ॥४॥**

***हरिनाम आकाशापेक्षाही व्यापक आहे***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मी आपल्या मनातील इच्छा श्रीनिवृत्तिनाथांना विचारली की, महाराज नाम म्हणजे शब्द व शब्द हा तर आकाशाचा गुण आहे. आकाश हे पंचभूतापैकी एक भूत असून त्याला उत्पत्ती व नाश आहे. अर्थात् त्याच्या शब्द गुणालाही उत्पत्तिनाश असणारच. अशा भौतिक नाशिवंत नामाचा एवढा महिमा कसा राहू शकतो?



यावर श्रीनिवृत्तिनाथांनी उत्तर दिले की, आकाशाचा गुण जो शब्द तो नामास लागू नाही. नाम आकाशाचा गुण नव्हे, आकाशाचा गुण शब्द जो आहे तो ध्वनिरूप शब्द होय. ''प्रतिध्वनिर्वियच्छब्दः'' प्रतिध्वनीरूप शब्द आकाशाचा गुण होय असे पंचदशीकार म्हणतात.

वर्णरूप नाम हा आकाशाचा गुण नव्हे, अर्थात् नाम जर आकाशाचा शब्दगुण नव्हे, तर ते नाम भौतिक नाही. ज्या ''आत्मन आकाश संभूतः'' आत्म्यापासून आकाश उत्पन्न झाले. त्या आत्म्याचा वाचक शब्द नाम असल्यामुळे, ते आकाशापूर्वीच अस्तित्वात असते व आत्मा जसा आकाशापेक्षा व्यापक आहे तसे त्याचे नामही अर्थातच आकाशापेक्षा व्यापकच असणार.

परमेश्वराची निर्गुण सगुण दोन्ही रूपे प्रकृतीच्या पलीकडे आहेत असे शंकराचार्य मान्य करितात. निर्गुण स्वरूप प्रकृतीच्या पलीकडे आहे हे आचार्य मानतात हे बहुतेक सर्व वेदान्ती मान्य करतील, पण भगवंताच्या सगुण रूपाविषयी मात्र त्यांना, तेही प्रकृतीच्या पलीकडे आहे असे आचार्य मानतात, हे मान्य होणार नाही. पण वैष्णवमताचे खंडन करताना ब्रह्मसूत्रभाष्यात त्यांनी ते मान्य केले आहे. ते म्हणतात,

''तत्र यत्तावदुच्यते योऽसौ नारायणः परोऽ व्यक्तात्प्रसिद्धः परमात्मा सर्वात्मा स आत्मनात्मानमनेकधा व्यक्त्यावस्थितः इति तन्न निराक्रियते ॥''

शंकराचार्यांप्रमाणे परमात्मा निर्गुण आहे असे वैष्णव मानीत नाहीत. ते फक्त सगुण परमात्माच मानतात. तो परमात्मा प्रकृतीच्या पलीकडे आहे असे वैष्णवांचे म्हणणे आहे. आणि आचार्यांनी त्या म्हणण्याचे आम्ही खंडण करीत नाही असे स्पष्ट म्हटले आहे. म्हणजे त्यांनाही सगुण परमात्मा मायेच्या पलीकडे आहे म्हणजे मायारहित आहे हे वैष्णवमत मान्य असल्याचे स्पष्ट दिसते. तेव्हा सगुण परमेश्वराचे नामरूप दोनही अमायिक म्हणून आकाशापेक्षाही व्यापक आहेत हे शंकराचार्यांचे वेदान्तानेच सिद्ध आहे; व म्हणूनच सगुण भगवंताचे नामरूपाचे एवढे थोर माहात्म्य संतांनी सांगून ठेविले आहे. प्रकृतीच्या पलीकडे म्हणजे अमायिक किंवा मायारहित होय. यालाच श्रीसद्गुरु गुलाबरावमहाराजांनी आपल्या ग्रंथातून अनध्यस्त विवर्त असे नाव दिले असून श्रीअमृतानुभव ग्रंथात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी स्फुरण म्हटले आहे. ''पाणी कल्लोळाचेनि मिषें। आपणपे धांवे जैसे । वस्तु वस्तुत्वे खेळो ये तैसे । सुखे लाहे ॥ लेणें आणि भांगारे। भांगारचि एक स्फुरे ॥'' इत्यादी दृष्टान्तांनी श्रीज्ञानेश्वर महाराजांनी स्फुरणाची कल्पना

मांडली आहे.

त्याच दृष्टान्तांनी आचार्यांनी विवर्ताची कल्पना मांडली आहे. विवर्त म्हणजे अध्यस्त विवर्त असाच अर्थ आचार्यांना मान्य आहे; व स्फुरणात अध्यस्त कल्पना नाही.मग विवर्त व स्फुरण एकच आहेत असे कसे म्हणता येईल असा कित्येक प्रश्न करितात.

पण ज्यांनी आचार्यांचा वेदान्त लक्षपूर्वक वाचला असेल त्यांना हे सहज कळून येईल की, श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अनुभवामृतात द्रष्टा-दृश्याला स्फुरण म्हटले आहे व आचार्यांनी त्याला विवर्त म्हटले आहे. द्रष्टा-दृश्य हे जोपर्यंत परस्पराहून भिन्न वाटतात तोपर्यंत आचार्य तशा प्रकारच्या भिन्न भासाला अध्यस्त विवर्त म्हणतात. श्री ज्ञानेश्वरमहाराजही ''तैसे दृश्य कां द्रष्टा । दोन्ही दशा वांझटा'' दृश्यद्रष्टा यांचा भिन्नपणा खोटा म्हणतात; आणि दृश्यद्रष्टा दोन नसून एक आत्माच दोहो ठायी स्फुरतो असे श्रीज्ञानेश्वरमहाराज आपल्या ज्ञानदृष्टीने म्हणतात. तसेच आचार्यही द्रष्टादृश्य दोन नसून एक आत्माच दोन रूपाने आहे असेच म्हणतात. द्रष्टादृश्य या भावाला *कोणी स्फुरण म्हटले, *कोणी प्रकाशणे म्हटले, *कोणी भासणे म्हटले, *कोणी विवर्त म्हटले म्हणून काही बिघडत नाही, कारण शब्द निराळे पण त्या सर्वांचा अर्थ एकच आहे.

ज्ञानाने द्रष्टादृश्य यांचा भिन्नपणा निघून गेला की, आचार्यांच्या दृष्टीने सर्व ब्रह्मस्फुरणच आहे. मग त्या स्फुरणाला ते अध्यस्त विवर्त म्हणत नाहीत. ''विभाति यस्य भासा'' या श्रुतीचेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अमृतानुभवाच्या सातव्या अध्यायात विवेचन केले असल्यामुळे या श्रुतीतील भाति, विभाति या शब्दांच्या अर्थाला धरूनच स्फुरण शब्द योजिला आहे हे स्पष्ट आहे.

शंकरायार्चांनीही आपल्या आत्मबोध नावाच्या प्रकरणग्रंथात ''हृदाकाशोदितो ह्यात्मा बोधभानुस्तमोपहृत् । सर्वव्यापी सर्वाधारी भाति भासयतेऽखिलम्'' हृदयाकाशात उदय पावलेला, कल्पित अज्ञानतमाचा नाश करणारा ज्ञानरूप आत्मसूर्य, सर्वव्यापक, सर्वाधार असा भासतो व सर्व भासवितो.अशा श्लोकाने वरील श्रुतीचेच विवेचन केले आहे.

सारांश, अज्ञान्याच्या दृष्टीने जो दृश्य प्रपंच अध्यस्त विवर्त असतो तोच ज्ञानानंतर ब्रह्मस्फुरण किंवा अनध्यस्त विवर्त होतो. याचा विचार मागे सविस्तर केला आहे, पण संदर्भाने पुनः येथे थोडासा विचार करावा लागला.

उज्ज्वलनीलमणीच्या आनंदचंद्रिका नामक टीकेत विश्वनाथ चक्रवर्ति





म्हणतात, ''भगवन्नामानि तु अखंडशब्दब्रह्मरूपाणि यथा भगवत् स्वरूपशरीरे लौकिकत्वभानं ग्राहकदोषात् तथा नामस्वपि'' ज्याप्रमाणे सृदिानंदघन भगवत्शरीराच्या ठिकाणी अज्ञानी लोक आपल्या अज्ञानामुळे सामान्य माणसाच्या शरीराप्रमाणे पांचभौतिकत्व मानतात, त्याचप्रमाणे भगवन्नामाच्या ठिकाणी लौकिक शब्दभ्रम अज्ञान्याला होतो.

वास्तविक पाहता भगवत्शरीर व त्याचे नाव दोन्ही पूर्ण ब्रह्मस्वरूपच आहेत. ब्रह्म आकाशरूपच कार्याच्या पलीकडे आहे तसेच हरिनामही आहे, यात तिळमात्र शंका नाही.

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

---

## पाठक्रम : २३ — अर्थक्रम : २२

---

**सात पांच तीन दशकांचा मेळा । एकतत्त्वीं कळा दावी हरी ॥१॥**
**तैसें नव्हे नाम सर्वमार्गा वरिष्ठ । येथें कांहीं कष्ट न लगती ॥२॥**
**अजपा जपणें उलट प्राणाचा । येथेंही नामाचा निर्धार असे ॥३॥**
**ज्ञानदेवा जिणे नामेविण व्यर्थ । रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥४॥**

*

प्रतिज्ञा :- सर्व शास्त्रांत अधिष्ठानाची परोक्षता व नामात अपरोक्षता, ईश्वर कर्ता म्हणणाराकडे गौणत्व, निःसाधन नामसिद्धी, भक्तीचे असाध्यत्व, प्रणवादिनाम जपण्यापुरताच योगियांचा अर्धा अंगीकार, नाम सोडून योगियांना योग साधता येत नाही.

*

***वाणीने रामकृष्ण-जपाचा घोष ही संप्रदायाची कर्तव्यता.***

सरळ अर्थ - पंच प्राण व मनबुद्धी मिळून एकूण सात, पाच महाभूते; सत्व, रज, तम हे तीन गुण; दशक म्हणजे पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेन्द्रिय; ही पंचवीस तत्त्वे म्हणजे सर्व हा प्रपंच! श्रीहरीच जो एकतत्त्व तोच आपल्या ठिकाणी झाला आहे, पण श्रीहरीचे नाम मात्र तसे नाही.ते सर्व मार्गांपेक्षा वरिष्ठ आहे आणि तेथे सायासही काही लागत नाहीत. अजपाजपांतही श्रीहरीचे नाम कल्पावे लागतेच.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मला हरिनामावाचून एक क्षणभर देखील जगणे व्यर्थ वाटते व त्यायोगे मनाला असह्य दुःख होते; म्हणूनच सर्व गोष्टींचा सर्व बाजूने पूर्ण विचार करून अखेर शेवटी श्री रामकृष्णादी भगवन्नामस्मरणाचा अचूक राजमार्ग धरून त्याप्रमाणे मी निर्धास्त चालत आलो आहे.

**सात पांच तीन दशकांचा मेळा ।**

**एकतत्त्वीं कळा दावी हरि ॥१॥**

### *ईश्वर कर्ता नाही*

विवरण - सर्व सृष्टी म्हणजे पंचप्राण, मन, बुद्धी, पंचमहाभूते, सत्त्व, रज, तम, पंच ज्ञानेंद्रिये व पंच कर्मेंद्रिये इतक्यांचा समूह होय. ह्या तत्त्वांचा समूह जसा पिंडात आहे तसा ब्रह्मांडात आहे. म्हणून या सर्व समूहाला भगवंतांनी क्षेत्र हे नाव देऊन ते क्षेत्र म्हणजे हा देहच होय असे सांगितले. पण ही पंचवीस तत्त्वे निरनिराळी दिसत असली तरी त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नाही किंवा वस्तुत्व नाही; ही संपूर्ण एका तत्त्वावर भासतात. पूर्णब्रह्म श्रीहरी हाच एकतत्त्व व तोच पंचवीस तत्त्वस्वरूप झाला म्हणजे त्याच्याहून पंचवीस तत्त्वे निराळी नाहीत. श्रीहरीच सर्व पंचवीस तत्त्वात्मक सृष्टिरूप कसा झाला हे मागे सृष्टीचा व श्रीहरीचा कार्यकारण भाव सांगताना स्पष्ट केलेच आहे.

जेथे कार्याला, उत्पत्तिपूर्वी निमित्त कारण व उपादान कारण अशी दोन निरनिराळी कारणे असतात, तेथेच निमित्तकारण कर्ता होऊन तो उपादान कारणापासून कार्य निर्माण करीत असतो.

उदाहरणार्थ, घटाला माती ही उपादान कारण आहे म्हणजे मातीचा घट होतो किंवा घट करण्याकरिता माती घेतली जाते व घटाला निमित्त कारण कुंभार आहे. कुंभार मातीपासून घट करितो पण सृष्टी उत्पन्न होण्यापूर्वी एक परमात्माच असतो, दुसरी त्यावाचून काहीही वस्तू नसते असे श्रुतीने सांगितले असल्यामुळे, त्या अद्वितीय परमेश्वरापासून झालेल्या जगताचा तो कर्ता होऊ शकत नाही. कारण येथे उपादान कारण व निमित्त कारण ही दोन निराळी नसून तोच उभयविध कारण आहे. म्हणून येथे ईश्वर हा जगाचा कर्ता होऊ शकत नाही.

ईश्वरच जगद्रूप झाला व त्यानेच आपल्याला जगद्रूप करून घेतले. हे जगद्रूप होणे केवळ त्याची लीला आहे, कारण आपले एकतत्त्व रूप म्हणजे अद्वितीयत्व बिघडू न देता तो परमात्मा बहुरूप असताना तो एकरूपच असतो. ही कला त्याची तोच





जाणे. ही कला दुसऱ्यास साधणे शक्य नाही.

जैसा कां सर्वेश्वर । पाहिजे तंव निर्व्यापार ॥ परि तोचि रची विस्तार। त्रिभुवनाचा ॥ आणि कर्ता ऐसा म्हणीपे । तरी कवणें कर्मी न लिंपे । जे हात पावो न लिंपे । उदास वृत्तीचा ॥ योगनिद्रा तरी न मोडे । अकर्तेपणा सळू न पडे ॥ परी महाभूतांचे दळवाडें । उभारी भले ॥ जगाच्या जीवीं आहे । परी कवणाचा कहीं नोहे ॥ जगची हें होय जाये । तो शुद्धिहि नेणे ॥ (ज्ञा.अ.५.७६-७९)

साक्षीहि होऊं न ठाके । येरी गोष्टी कायसी ॥ तो सृजी पाळी संहारी। ऐसें बोलतीं जें चराचरीं । तें अज्ञान गा अवधारी । पांडुकुमरा ॥'' (ज्ञा.५-८२) म्हणून ईश्वर जगाचा कर्ता आहे असे म्हणणे ही केवळ अज्ञानदृष्टी आहे. म्हणजे मूळात सद्चिदानंद परमेश्वरापासून जड विनाशी जग उत्पन्न होणे शक्य नाही. जीवाला हे ज्ञान नसल्यामुळे जड विनाशी सृष्टी आहे व परमेश्वर तिचा कर्ता आहे अशी भ्रमाने कल्पना करितो असा अर्थ.

### *सर्व शास्त्रांत अधिष्ठानाची परोक्षता व नामांत अपरोक्षता*

वेदान्तांत माया जगताचे कारण मानिली आहे. त्याचा अर्थ माया काही वस्तु आहे व तिच्यापासून जगदुत्पत्ती होते असा अर्थ नाही; हे मागे सांगितले गेलेच आहे. नामरूपाच्या प्रगट पसाऱ्याला जगत् म्हणतात व नामरूपाने प्रगट होणे हा परमेश्वराचा नित्याचा खेळ आहे. ज्यांना हे वेदान्ततत्त्व समजत नाही, त्यांच्या ठिकाणी या नामरूपाचे योगाने भ्रम उत्पन्न होतो व त्यांना या नामरूपात्मक पसाऱ्याला आधार जो परमात्मा दिसत नाही व नामरूपाचा पसारा स्वतंत्र वस्तू वाटते. यालाच मायेने जग निर्माण झाले असे म्हणतात.

जोपर्यंत नामरूपे ही निराळी नसून परब्रह्मस्वरूप आहेत असा प्रत्यय येत नाही तोपर्यंत जगताचे अधिष्ठान जो परमात्मा तो अपरोक्ष होत नाही, परोक्षच राहतो. ज्ञानादी सर्व मार्गात नामरूपाचा भास कायम राहत असल्यामुळे त्या भासामुळे, आच्छादित अधिष्ठान परब्रह्म श्रीहरी अपरोक्ष होत नाही.

या मार्गांत श्रीहरीचा अपरोक्ष साक्षात्कार होण्याकरिता भगवंताच्या साक्षात्काराला प्रतिबंध करणारी नामरूपे टाकून देऊन परमेश्वराचा साक्षात्कार करून देणारा योगमार्ग सांगितला आहे.

पण नामस्मरणादी भक्तिवाचून योगाभ्यासही सिद्धीस जात नाही. म्हणून नामस्मरणावाचून सर्व मार्गात जगताचे अधिष्ठान परमात्मा परोक्षच राहतो.

परमेश्वराचे नामरूप स्दिानंद सगुण परमेश्वराचे ठिकाणीच असते व ते नामरूप दूर करून परमात्मा पहावा लागत नाही. नामाच्या साह्यानेच परमेश्वरसाक्षात्कार होतो.

## तैसे नव्हे नाम सर्वमार्गा वरिष्ठ ।
## येथे कांहीं कष्ट न लगती ॥२॥

***नामाने अधिष्ठानाची अपरोक्षता***

नामस्मणाचे योगाने अत्यंत निरुपाधिक अशा सगुण साकार श्रीहरीचे ध्यान घडून तोच मग चराचरांत भरलेला अनुभवास येतो. सर्व नामरूपाने श्रीहरीच नटलेला आहे असा प्रत्यक्ष अनुभव येतो. किंवा वस्तुमात्र रामकृष्णस्वरूपाने भासू लागते, हे अनेक ठिकाणी हरिपाठांतच श्रीज्ञानेश्वरमाउलीने सांगितले आहे. म्हणून हरिनामस्मरण हे भगवत्प्राप्तीच्या सर्व शास्त्रीय मार्गांपेक्षा श्रेष्ठ आहे.

नामस्मरणादी भक्तिमार्ग हा दुसऱ्या कशाचेही साह्य न घेता एकटा स्वतंत्र भगवत्प्राप्ती करून देणारा आहे. निःसाधन नामस्मरणानेच पूर्ण सिद्धी होऊ शकते. इतर साधनांचे कष्ट करण्याची आवश्यकता नाही. नामस्मरणावाचून इतर साधने कर्मरूप किंवा अनुष्ठानरूप आहेत. परमात्मा श्रीहरी नित्यवस्तू आहे. कर्मरूप अनुष्ठानाने, उत्पन्न होणारी व नाश पावणारी वस्तूच प्राप्त होऊ शकते. परमात्मा नित्यसिद्ध वस्तू असल्यामुळे, कर्माने त्याची प्राप्ती होऊ शकत नाही, म्हणूनच त्याच्या प्राप्तीकरिता भक्ती सांगितली आहे. भक्ती ही परमप्रेरूपच आहे. आणि भगवानही परमप्रेमरूप आहे म्हणजे भक्तीने भगवत्प्राप्ती सहजच होते. भक्तिही परमप्रेमरूप असल्यामुळे तीही साधनाने साध्य होणारी नाही. सर्व साधनांची खटपट सोडून देऊन निःसाधन भगवन्नामस्मरण करण्याने भगवत्कृपा होऊन परमप्रेमरूप आत्मा श्रीहरीच भक्तिरूप परमप्रेमवृत्तिरूपाने भक्ताच्या अंतःकरणात प्रगट होतो.

जसे प्रत्येकाच्या ठिकाणी आत्म्याचे परम प्रेम आहे तसे ते बाहेरच्या नामरूपाने नटलेल्या श्रीहरीचे ठिकाणीही कायमचे परमप्रेम होणे याला भक्ती म्हणतात. हीच शेवटली अखंड राहणारी सहजस्थिती होय. या भक्तीने आत बाहेर सारखी एक प्रेममयच स्थिती होते.

ही स्थिती सर्वकर्मसमर्पण, नामस्मरण व संकीर्तन म्हणजे भगवद्‌गुणानुवादाचे श्रवण, कीर्तन याने प्राप्त होते.

## अजपा जपणें उलट प्राणाचा ।

(१०७)



## येथेंहि नामाचा निर्धार असे ॥३॥

***प्रणव जपापुरता योगियांचा अंगीकार***

पूरक प्राणायामाने हृदयकमल ऊर्ध्वमुख करून योगीलोक ''हंसः'' या अज्ञात जपामध्ये ॐ या ज्ञातजपाचा समन्वय करून अजपाजप करितात. म्हणून अजपाजपात ॐ या (ज्ञात जपाचा) हरिनामाचा निर्धार असतोच. योगी लोक अजपाजप करितात पण तेथे तरी ॐ काराचा जप करावाच लागतो.

श्वासामध्ये ॐ काराचा जप करणे याला अजपाजप म्हणतात.

अजपाबद्दल माझ्या श्रीगुरु आईने ''ध्यानयोगदिवाकर'' ग्रंथात जी माहिती लिहिली आहे. त्यांतील सारांश थोडक्यात असा की -

वाणीने केलेला ज्ञातजप परमेश्वराच्या ठिकाणी अर्पण करून तो मानस झाला म्हणजे ध्यान होते. हे नित्य राहण्याकरिता श्वासासह होत असलेला अज्ञात जप भगवंताच्या ठिकाणी समर्पण करावा. याप्रमाणे नित्य होत असलेल्या अज्ञात २१,६०० अजपाजपापैकी :-

**अजपाजप** -

| | |
|---|---|
| ६,००० | श्रीशिवाला |
| ६,००० | श्रीविष्णूला |
| ६,००० | ब्रह्मदेवाला |
| १,००० | श्रीसद्‌गुरूला |
| १,००० | आत्म्याला |
| १,००० | जीवाला |
| ६०० | श्रीगणेशाला |
| २१,६०० | एकूण जप |

वरीलप्रमाणे सर्व जप समर्पण झाल्यानंतर नादोत्पत्ती होत असते. त्याचे दहा प्रकार व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या सिद्धि (या सर्वांचा तिरस्कार करून त्या सर्वांना चिदाकाशात मिळवावे. (श्रीगुलाबरावमहाराजकृत सूक्तिरत्नावली- द्वितीययष्टि उतरार्ध- 'ध्यानयोगदिवाकर'अ.२.ओवी ८० ते ८६पृ६३ते ६५)

अजपाजप कमी झाल्यास देवतांचा क्षोभ होतो. व जास्त झाल्यास प्राणाचा

क्षोभ होतो. अजपाजप योगांतही हरिनामस्मरणाचा निर्धार करावा लागतो. निर्धार म्हणजे अचल पक्कानिश्चय. अजपाजपही नामस्मरणावाचून किंवा नामाची कल्पना केल्यावाचून साधणे शक्य नाही.

ॐ कार हे ''तस्य वाचकः प्रणवः'' या सूत्राप्रमाणे निर्गुण परमात्म्याचे नावच आहे. ॐ काराचा जप करणे म्हणजेच नामस्मरण करणे होय किंवा श्वासोश्वास चालताना जो नाद होतो त्या नादाचे ठिकाणी ''सोऽहं हंसः'' अशी अक्षरे निघतात असे अनुसंधान केले तरी तेही नामस्मरणच होते.

येथे योग्यांच्या अजपाजपाचे उदाहरण घेतले ते योग्यांनाही कोणत्यातरी रीतीने हरिनामाचा निर्धार करावा लागतो एवढ्यापुरतेच घेतले आहे. योग्याचा अजपाजपांतील ॐ काराचा जप किंवा 'सोऽहं हंसः' असे अनुसंधान हे हरिनामस्मरणच होय असे दाखविण्याकरिता योग्याचे उदाहरण घेतले नाही. योग्याचा अजपाजप व हरिनामस्मरण सारखेच किंवा एकच होय असे सांगण्याकरिता येथे योग्याच्या अजपाजपाचे उदाहरण घेतले नाही. कारण हरिनाम हे – ''नामा म्हणे नाम ॐ काराचे मूळ । ब्रह्म तें केवळ विटेवरी ॥'' ॐ काराचे मूळ असून पूर्ण ब्रह्म आहे आणि श्रीहरीनामाच्या ठिकाणी ब्रह्मभावना करण्याची आवश्यकता नाही पण ॐ काराच्या ठिकाणी ब्रह्मभावना करण्याची आवश्यकता आहे.

**ज्ञानदेवा जिणें नामेविण व्यर्थ ।**

**रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥४॥**

***संप्रदायाची इतिकर्तव्यता***

''जीवना वेगळी मासोळी । तुका तैसा तळमळी ॥'' पाण्यांत मासा आनंदाने व प्रसन्न चित्ताने जीवंत राहू शकतो. पाणी हे त्या माशाचे सर्वस्वी जीवन आहे. पाण्यावेगळा होताच तो तडफड करून मृतप्राय होतो.

अगदी त्याचप्रमाणे मलाही श्रीहरीनामस्मरणावाचून एक क्षणभर देखील जगणे व्यर्थ वाटते व त्यायोगे मनाला असह्य दुःख होते असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सर्वांना निक्षून सांगतात.

मी तर संपूर्ण सर्व साधनमार्गाचा सर्व बाजूने सूक्ष्म व पूर्ण विचार करून अखेर शेवटी श्रीरामकृष्णादी भगवन्नामस्मरणाचा अचूक राजमार्ग धरिला असून



त्याप्रमाणे मी निःशंक चालत आलो आहे व हेच माझ्या सांप्रदायिकांचे आद्य कर्तव्य व इतिकर्तव्यता होय. श्रीज्ञानेश्वर माउलीची आपल्या सर्व सांप्रदायिकांना ही प्रेमाची आज्ञा आहे.

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

**पाठक्रम : २४** **अर्थक्रम : २५**

**जप तप कर्म क्रिया नेम धर्म । सर्वांघटीं राम भाव शुद्ध ॥१॥**
**न सोडीरे भावो टाकीरे संदेहो । रामकृष्णी टाहो नित्य फोडी ॥२॥**
**जाति वित्त गोत कुळ शीळ मात । भज कां त्वरित भावयुक्त ॥३॥**
**ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । वैकुंठ भुवनीं घर केलें ॥४॥**

*

प्रतिज्ञा – प्रेमात सर्व कर्मांचे तात्पर्य. नामस्मरणावाचून वर्णाश्रमाचा निषेध. प्रेमयुक्त नामस्मरण मुखी असता वैराग्याची व संसाराची समानता. नाम घेतले असता वर्णाश्रम सोडावाच असा आग्रह नाही. नामधारकाची वैकुंठात विष्णु आधीच व्यवस्था करून ठेवितो.

*

सरळ अर्थ – जप तप क्रिया नेम धर्म या सर्वांचा उद्देश, सर्वत्र श्रीहरी भरला आहे असा शुद्ध भाव होणे हाच आहे. म्हणून सर्वत्र एक श्रीहरीच हा भाव किंवा अशी अद्वैत सत्ता विसरू नये आणि विनाकारण संशय धरू नये. रामकृष्णाचे नामाचा अखंड घोष करावा. उ्च स्वराने त्याचा धांवा करावा. जाती, वित्त, गोत, कुळ, शील ह्या काल्पनिक गोष्टी आहेत म्हणून आदराने भगवंताचे नामस्मरण करण्यास लवकर लाग. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मी मनांत रामकृष्णाचे नाम व ध्यानात रामकृष्णाचे रूप साठविल्यामुळे, मी अखंड वैकुंठभुवनातच वस्ती केली आहे.

**जप तप कर्म क्रिया नेम धर्म ।**

**सर्वां घटीं राम भाव शुद्ध ॥१॥**

***हरिप्रेमांत सर्व कर्माचे तात्पर्य***

विवरण - वर्णाश्रमाप्रमाणे गायत्री मंत्रादिकांचा जप करणे, कृच्छ्र, चांद्रायणादी व्रताचरणरूपी तप करणे, संध्योपासन यज्ञादी कर्म करणे, पिंड पितृतर्पणादि क्रिया करणे, एकादशी वगैरे व्रतनियमांचे आचरण करणे; हे सर्व चराचर सृष्टीत एक श्रीहरीच भरला आहे असे अन्वय दृष्टीने जाणून त्याचेच प्रेम करावे याकरिताच आहे.

''धर्मः स्वनुष्ठितः पुंसां विष्वक्सेनकथासु यः।
नोत्पादयेद्यदि रतिं श्रम एव हि केवलम् ॥''

जेवढा धर्म आपण करितो त्या धर्माने भगवत्प्रेम जर उत्पन्न झाले नाही तर तो सर्व धर्म व्यर्थ निष्फळ होतो, असे भागवतधर्माचे शास्त्र जो श्रीमद्भागवतग्रंथ त्यात म्हटले आहे. भगवंताचे प्रेम प्राप्त व्हावे म्हणून भगवत्प्रीत्यर्थ सर्व धर्माचरण केले पाहिजे. सच्चिदानंद भगवंताशिवाय जड विनाशी जगद्वस्तु आहे अशी समज धारण करून जगातील पदार्थांवर प्रेम करणे हा अशुद्ध भाव होय; आणि सच्चिदानंद श्रीहरीवाचून जड विनाशी असे काहीच नाही असे दृढ समजून श्रीहरीचे प्रेम करणे याला शुद्ध भाव म्हणतात. या शुद्ध भावामुळे व्यवहारकालीही अखंड आनंदाचा अनुभव येतो.

**न सोडी रे भावो टाकी रे संदेहो ।**

**रामकृष्णीं टाहो नित्य फोडीं ॥२॥**

***नामस्मरणावाचून वर्णाश्रमाचा निषेध***

ही अन्वयदृष्टी सोडून वर्णाश्रमादी धर्म केल्याने भगवत्प्राप्ती होत नाही. म्हणून ही अन्वयदृष्टी कधी सोडू नये व या अन्वयदृष्टीने सिद्ध होणाऱ्या श्रीहरीच्या अद्वैतसत्तेविषयी मनांत संशयही धरू नये. दृढ विश्वास ठेवून संशय निःशेष नाहीसा करावा व मोठ्या उल्हासाने भगवन्नामाचा टाहो फोडून भगवंताचा धावा करावा. ''टाहो फोडी'' या शब्दयोगाने भगवन्नाम स्मरताना अंतःकरणांत निःसीम प्रेम व अत्यंत तळमळ असावयाला पाहिजे असे माउली सांगत आहे.

**जाति वित्त गोत कुळ शीळ मात ।**

**भज कां त्वरित भावयुक्त ॥३॥**

***प्रेमयुक्त नामस्मरणाने वैराग्य व संसार यांची समानता***



अशा प्रेमाने व कळवळ्याने नामस्मरण करणाऱ्याला वैराग्य व संसार समान होतात. भगवत्प्रेम उत्पन्न झाले असता संसाराची आसक्ती आपोआप नाहीशी होते. नामधारकाला संसार सोडून जाण्याची आवश्यकता नाही. जाती, वित्त, गोत, कुळ, शील वगैरेचा अभिमान हाच संसार होय. या संसारात दोष पाहून याविषयी वैराग्य उत्पन्न करताना, त्याविषयी द्वेष उत्पन्न होतो. भगवत्प्रेमाने संसाराची आसक्ती नाहीशी होताना, संसाराचा द्वेष उत्पन्न न होता, सहज उपेक्षा होते. द्वेषांत विरोध राहतो, उपेक्षेत अविरोध असतो. म्हणून जाती, वित्त, गोत, कुळ, शील या गोष्टी राहू दे. ते सर्व काल्पनिक आहे. श्रीहरीची अद्वैतसत्ता लक्षात ठेवून नामस्मरण कर. खोट्या जातिवित्तादिकांच्या अभिमानाने त्यांना चिकटून राहू नको, किंवा भक्तीच्या अभिमानाने त्यांना सोडूही नकोस. जाती, वित्त, गोत, कुळ, शील ह्या सर्व गोष्टी आहेत म्हणजे नुसते शब्दच आहेत. या शब्दांचे अर्थरूप पदार्थ नहीत. एका श्रीहरीची अद्वैतसत्ताच जेथे सिद्ध आहे, तेथे दुसऱ्या पदार्थाची सत्ता कशी सिद्ध होणार? पण मी अमुक जातीचा, मी श्रीमान्, माझे असे कुळ आहे, माझे असे शील आहे, इत्यादी खोट्या अभिमानाने जात्यादिकांचे मिथ्या अस्तित्व स्वीकारले जाऊन श्रीहरीच्या अद्वैत सत्तेलाच बाध येतो, आणि मी भगवंताचे नाम घेतो किंवा मी भगवंताचा भक्त आहे, मला जाती कुळ धर्माचे कशाला पालन केले पाहिजे? अशा भक्तीच्या अभिमानाने जाती कुळाचा द्वेष वाढून त्या द्वेषाने जातिकुळच अंतःकरणांत दृढ होतात. भगवंताची प्राप्ती होण्यास जाती, वित्त इत्यादी गोष्टी आवश्यक आहेत असे नाही. नामस्मरणादी एक भक्तीच भगवत्प्राप्तीचे मुख्य साधन आहे. जाती कोणतीही असो, वित्त असो नसो, गोत, कुळ, शील कसेही असो, अंतःकरणांत एक भक्ती असली की पुरे. भक्तिवाचून दुसरे तिसरे काहीच भगवान् पाहत नाही. ''अगा नांवें घेता वोखटीं। जें आघवेया अधमांचिये शेवटीं। तिये पापयोनीही किरीटी। जन्मले जें ॥४४३॥ ते पापयोनि मूढ। मूर्ख ऐसे जे दगड। परि माझ्या ठायी दृढ। सर्व भावें ॥४४४॥ एऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें। परि इंद्रहि सरी न लाहे उपरें। म्हणोनि भक्ति गा एथ सरें। जाति अप्रमाण ॥४५२॥ तैसें उत्तमत्व तैंचि तरे। तैंचि सर्वज्ञता सरे। जैं मनोबुद्धि भरे। माझेनि प्रेमें ॥४५५॥ म्हणोनि कुळ जाति वर्ण। हें आघवेंचि गा अकारण। एथ अर्जुना माझेंपण। सार्थक एक॥४५६॥'' (ज्ञा. अ. ९) म्हणून जातिकुळाचा किंवा नामस्मरणाचा अभिमान न धरता जाति कुळ यांच्याकडे लक्ष देऊ नको, त्यांची उपेक्षा कर व आहेत तसे राहू दे. आता तरी बाकी उरलेल्या आयुष्याचा दुरूपयोग

न करिता, इतर साधनांच्या नादी न लागता, ताबडतोब आज ह्या चालू क्षणापासून प्रेमयुक्त अखंड नामस्मरण करण्याचा दृढनिश्चय कर म्हणजे तूं कृतार्थ होऊन धन्य होशील.

**ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं ।**

**वैकुंठ भुवनीं घर केलें ॥४॥**

***नामधारकाची वैकुंठात वस्ती***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, माझ्या ध्यानांत रामकृष्णाचे रूप व मनाने रामकृष्ण नामाचे अखंड स्मरण असल्यामुळे, माझी वैकुंठ भुवनांत कायमची वस्ती झाली. मी सदा वैकुंठातच असतो; आणि जे कोणी अशा रीतीने मनात नाम व ध्यानांत भगवंताचे रूप धरतील त्यांचीही भगवान् वैकुंठात अगोदरच राखीव व्यवस्था करून ठेवील, ही खूणगांठ नामधारकाने पूर्ण लक्षात ठेवावी.

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

---

**पाठक्रम : २५** **अर्थक्रम : २७**

---

**जाणीव नेणीव भगवन्ती नाही । हरि उच्चारणी पाही मोक्ष सदां ॥१॥**

**नारायण हरि उच्चार नामाचा । तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥२॥**

**तेथील प्रमाण नेणवे वेदांसी । तें जीव जंतूसी केवी कळे ॥३॥**

**ज्ञानदेवा फळ नारायणपाठ । सर्वत्र वैकुंठ केलें असें ॥४॥**

*

प्रतिज्ञा - संकेतदृष्टीचे स्वरूप. ज्ञान व अज्ञान यांचे खंडन.
इतकेही होऊन हरिनाम चालूच असावे. उत्तर भक्तीचे स्वरूप.
सर्व लोकांत वैकुंठ व्यापक आहे. ज्ञानेश्वरस्मरण.

~

सरळ अर्थ - श्रीहरीचे ठिकाणी जाणीव नेणीव दोन्ही नाही. म्हणून त्या श्रीहरीच्या नामस्मरणाने सदा मोक्ष मिळतो. नारायणहरी या नामाचा उच्चार जेथे



होतो तेथे कळिकाळाचा मुळीच शिरकाव होत नाही. श्रीहरीच्या नामरूपाचा महिमा वेदांसच कळत नाही तेथे सामान्य माणसास काय कळणार? श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, नारायण नामाच्या पाठाचे फळ म्हणजे अखंड नारायण नामस्मरण हेच आहे. यामुळे वैकुंठ लोक सर्व लोकांत व्यापून आहे असा अनुभव येतो.

**जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं ।**

**हरि उच्चारणी पाही मोक्ष सदा ॥१॥**

***संकेत दृष्टीचें स्वरूप व ज्ञान-अज्ञान खंडण***

विवरण - मी सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप आहे, मी मुक्त आहे, मी अकर्ता, अभोक्ता, सुखदुःखरहित आहे असा जो आपल्याला आपला आत्मानुभव येतो त्याला जाणीव म्हणतात. ही जाणीव आत्मस्वरूपाचा यथार्थ विचार केला असता उत्पन्न होते. प्रथम जीवाने मी ब्रह्म जाणत नाही, मी देहस्वरूप आहे, मी कर्ता भोक्ता आहे, अशी आपल्याविषयी विपरीत समजूत करून घेतलेली आहे. या विपरीत समजुतीलाच त्याचे अज्ञान म्हटले आहे. वेदान्तानुसार आत्मस्वरूपाचा विचार केला असता, त्याला सर्वदुःखरहित मी सच्चिदानंदरूप आहे असा वर सांगितल्याप्रमाणे, अनुभव येतो व विपरीत ज्ञान किंवा अज्ञान नाहीसे होते. अज्ञान किंवा विपरीत ज्ञान यालाच नेणीव म्हणतात. अर्थात जेथे नेणीव म्हणजे अज्ञान किंवा विपरीत ज्ञान आहे तेथेच विचाराने जाणीव किंवा ज्ञान उत्पन्न करण्याची आवश्यकता असते व तेथेच विचाराने जाणीव किंवा यथार्थ ज्ञान उत्पन्न होत असते. जीव हा नेणीवयुक्त असतो म्हणून तो विचाराने जाणीवयुक्त होतो. जो आपले ब्रह्मस्वरूप विसरला असेल त्यालाच ब्रह्मस्वरूपाची जाणीव किंवा स्मरण होणे आवश्यक आहे. मी ब्रह्मस्वरूप आहे अशी जाणीव विचारानंतर उत्पन्न होते म्हणून ती जाणीव काही ब्रह्म नव्हे.

ब्रह्म सदासर्वदा राहणारे, उत्पत्तिनाशरहित आहे. ते अज्ञानदशेतही राहते. मी ब्रह्मस्वरूप आहे ही जाणीव वृत्तिरूप आहे व ती अज्ञान किंवा विपरीतज्ञानाच्या नाशाकरिता उत्पन्न केली जाते. या वृत्तिरूप जाणिवेला ज्ञान म्हणत असले तरी, मूळ जे चिन्मात्र ज्ञानरूप ब्रह्मस्वरूप आहे त्या दृष्टीने पाहता, हे जाणीवरूप ज्ञानही पूर्वीच्या अज्ञानाचा किंवा विपरीत ज्ञानाचाच भाग होय असे म्हणावे लागते. कारण हे जाणीवरूप वृत्तिज्ञान उत्पन्न होण्यापूर्वी ते ज्ञानरूप ब्रह्म होतेच आणि मी अज्ञानी

आहे, कर्ताभोक्ता आहे, अशी अज्ञानवृत्ती किंवा विपरीत ज्ञान होते तेव्हाही ते ज्ञानरूप ब्रह्म होतेच. त्याच ब्रह्मरूप ज्ञानाने, आपले विपरीत ज्ञान आपण जाणत असतो व ज्ञानाने आपण अज्ञानाचा नाश व जाणीवरूप वृत्तिज्ञान जाणत असतो. जाणीव ज्ञान व अज्ञान परस्पर सापेक्ष व परस्पर विरोधी असून दोन्ही एका चिन्मात्र ज्ञानरूप ब्रह्मावर भासतात. अर्थात मूळची ज्ञानरूप ब्रह्मस्थिती, नित्य ज्ञानस्वरूप अविनाशी आहे. अज्ञान किंवा विपरीत ज्ञान म्हटले गेले हे देखील 'म्हणोनि अज्ञान सद्भावो। कोणे परी न लाहो । म्हणोनि अज्ञान वावो । पाहो ठेलियाहि ॥' वस्तुरूप नाही. ती जीवाने आपल्याविषयी केलेली खोटी कल्पना आहे आणि त्या खोट्या अज्ञानाला नाहीसे करण्याकरिता उत्पन्न केली जाणारी ''मी ब्रह्मस्वरूप आहे'' अशी जाणीव देखील खोटीच कल्पनारूप आहे. म्हणून ते अज्ञानच होय. वर सांगितल्याप्रमाणे मूळ ब्रह्मस्थिती ही अज्ञानवृत्ति व ज्ञानवृत्तिरहित आहे. म्हणून जीवाला शुद्ध मूळची ब्रह्मस्थिती प्राप्त व्हायची म्हणजे –

''तैं मी नेणें आतां जाणेन । हें सरलें जया दुःस्वप्न । झाला ज्ञातृज्ञेयाविहीन। चिदाकाश ॥९७५॥ तैसे नेणणें जे गेलें । तेणे जाणणेंहि नेलें। मग निष्क्रिय उरले । चिन्मात्रचि ॥९७७॥ तैसें आपलें नेणणें । फेडिजें का जाणणें। तेहि गिळून असणें । ऐशी जे दशा ॥९८२॥ ऐक्याचे एकपण सरे । जेथ आनंदकणहि विरे। कांहीचि नुरोनि उरे । जे कांही गा ॥१००५॥ (ज्ञा.अ.१८) कां भूमि कुंभ ठेविजे । तै सकुंभता आपजे । तो नेलिया म्हणीजे । तेणेंविण॥ परी हे दोन्ही भाग । न शिवती भूमीचें आंग । तेवेळीं भूमि तैसें चांग । चोख जें असणें ॥(अमृतानुभव)''

ती मूळची ब्रह्मस्थिती जाणीवनेणीवरहित असल्यामुळे, आपले अंतःकरणही जाणीवनेणीवरहित झाले पाहिजे. असे अंतःकरण जाणीवनेणीवरहित होणे याला संकेतदृष्टी म्हणतात. या संकेतदृष्टीत ज्ञानअज्ञान काही राहत नाही.

### *सगुण भगवंताचे निर्विकल्पत्व*

ही जी संकेतदृष्टी किंवा ज्ञातृज्ञेयविहीन जाणीव-नेणीवरहित मूळ ब्रह्मस्थिती सांगितली तिलाच निर्विकल्प अवस्था, सहजस्थिती इत्यादी नावे आहेत.

''दर्शनादर्शने हित्वा स्वयं केवलरूपतः।
यस्तिष्ठति स तु ब्रह्मन् ब्रह्म न ब्रह्मवित्स्वयम्'॥ (पंचदशी प्र.द्वैतविवेक ६८)

''यो ब्रह्म जानामि न जानामीति व्यवहारद्वयं परित्यज्य स्वयं अद्वैतचैतन्यरूपेण, अवतिष्ठते स स्वयं ब्रह्मैव न ब्रह्मवित् इत्यर्थः॥''



या विद्यारण्यांच्या श्लोकाचा व टीकेचा अर्थ वरीलप्रमाणेच आहे. जाणीव व नेणीव दोन्ही नाहीशा होऊन जो राहिला तो ब्रह्म झाला, ब्रह्मज्ञानी राहिला नाही. या जाणीव-नेणीवरहित स्थितीलाच निर्विकल्पस्थिती किंवा निर्विकल्प समाधी म्हणतात. ही निर्विकल्प स्थिती श्रीहरीचे ठिकाणी आहे म्हणजे सगुण श्रीहरी निर्विकल्प सगुण ब्रह्म होय असे या चरणात श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगत आहेत. जी मूळची जाणीव नेणीवरहित निर्विकल्प समाधिरूप ब्रह्मस्थिती आहे तीच सगुण श्रीहरीचीही स्थिती होय. कारण सगुण श्रीहरीच्या ठिकाणीही जाणीव नेणीव नाही. ''नित्याविद्यानिवृत्तत्वात्'' परमेश्वराचे ठिकाणी कधीच अविद्या म्हणजे आत्मविस्मरण नाही म्हणून त्याच्या मूळच्या स्वरूपस्थितीत मुळीच फरक होत नाही. ती तशीच कोणत्याही अवस्थेत म्हणजे अवतारकाळी देखील तशीच कायम राहते. कारण जो परमात्मा नित्य अविद्याउपाधि रहित आहे, तोच अवतार घेत असतो. जीवाचीही मूळची ब्रह्मस्थितीच आहे, पण त्यानीच कल्पिलेल्या अविद्याउपाधीमुळे ती त्याची स्थिती नाहीशी झाली. म्हणजे मी ब्रह्मस्वरूप नाही असे त्याला वाटते. म्हणून हा त्याचा भ्रम नाहीसा करून त्याला ब्रह्मस्वरूप असल्याची जाणीव उत्पन्न करावी लागते. पण परमेश्वराला म्हणजे श्रीहरीला आत्मविस्मरणरूप अविद्याभ्रम कधीच नसल्यामुळे, त्याला ब्रह्मैक्याची जाणीव उत्पन्न करण्याची आवश्यकताच नाही म्हणून त्याचे ठिकाणी नेणीव म्हणजे आत्मविस्मृतिरूप अविद्याभ्रम नाही व आत्मस्मृतिरूप जाणीवही नाही. जाणीव-नेणीवरहितच मूळची ब्रह्मस्थिती आहे. तिलाच निर्विकल्प अवस्था म्हणतात किंवा सहजावस्था म्हणतात. नेणिवेची व जाणिवेची या दोन्ही अवस्था कल्पित आहेत. हीच जाणीव नेणीवरहित निर्विकल्प अवस्था श्रीहरीच्या ठिकाणी जाणीव नेणीव नसल्यामुळे सगुण साकार श्रीहरीचीही आहे, असे ज्ञानेश्वर माउलीचे म्हणणे आहे.

ज्या षड्गुणैश्वर्याने परमात्मा सगुण साकार होतो ते ऐश्वर्यही अविद्योपाधी किंवा मायोपाधिजन्य नसल्यामुळे म्हणजे निरूपाधिकच असल्यामुळे, ब्रह्मस्वरूप आहे म्हणूनच सर्व दृष्टीने पूर्ण ब्रह्मस्वरूप असलेल्या सगुण श्रीहरीचे ब्रह्मस्वरूप नामस्मरणाने, नामधारक जाणीव-नेणीवरहित होऊन जाणीव-नेणीवरहित अशा सृद्दिदानंदमात्रैक सगुण श्रीहरीशी ऐक्य पावून निर्विकल्प होतो. नामधारक श्रीहरीशी ऐक्य पावल्यावरही त्याचे नामस्मरण चालूच राहते. कारण ते ब्रह्मरूपच असल्यामुळे व ब्रह्म परमप्रेमास्पद असल्यामुळे नामस्मरण सुटू शकतच नाही.

सारांश, नामधारक श्रीहरीच्या नामस्मरणाने सगुण श्रीहरीसारखा अखंड

निर्विकल्प समाधिस्थ राहतो. जीवाची निर्विकल्प अवस्था खोट्या देहाहंकाराने नाहीशी झाली. तो अहंकार सर्वस्वी नाहीसा होऊन निरवधि निरहंकार स्थिती राहणे यालाच नाथ ''निरभिमान निरवधि। त्या नांव अखंड समाधि'' अखंड समाधि म्हणतात. तेच परम भाग्य होय.

शंका - कोणी म्हणतील, निर्विकल्प समाधीचे लक्षण तर असे आहे की, ''यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता'' (गी.६-१९) चित्त यत्किंचित् देखील स्फुरत नाहीं. म्हणजे अशा समाधिस्थ पुरुषाला व्यापार करणे संभवतच नाही आणि भगवान् व भक्त तर व्यवहार करताना दिसतात, तेव्हा सगुण भगवान् व भक्त अखंड समाधिस्थ असतात असे कसे म्हणता येईल?

समाधान - या शंकेचे समाधान असे की, योगक्रियेने साधणारी समाधी एकदेशी आहे म्हणजे योगांत नामरूपात्मक प्रपंचाचा त्याग करून देहादिकांच्या अंतर्यामी असणाऱ्या आत्मस्वरूपाचे ठिकाणी चित्तवृत्ती स्थिर केली जाते व प्रारब्धबलाने योगी जेव्हा व्यवहार करितो, तेव्हा द्वैतानुभवामुळे त्याची समाधिस्थिती भंग पावते. भगवंताला विजातीय, सजातीय किंवा स्वगत या तिन्ही प्रकारच्या द्वैतापैकी कोणतेच द्वैत कधीच भासत नाही व भक्तालाही त्याच्या भक्तीनेच तशीच स्थिती प्राप्त होत असल्यामुळे भक्तही प्रारब्धानुसार व्यवहार करीत असला तरी, त्याचा तो व्यवहार, श्रीहरीप्रीत्यर्थ होऊन श्रीहरीलाच समर्पण होतो आणि तो स्वतःला, व्यवहाराला, व समर्पणाला देखील श्रीहरीस्वरूपच पाहत असल्यामुळे त्याची चित्तवृत्ती श्रीहरीचे ठिकाणी अखंड स्थिर राहते. म्हणून भक्ताची समाधी अखंड असते. भगवंताला प्रारब्धच नाही म्हणून तेथे व्युत्थानाचा प्रश्नच नाही म्हणजे भगवान् अखंड समाधिस्थच आहे.

''निवृत्ताविद्यस्य च पुनरुत्थानमनुपपन्नम् एतेनेश्वरस्योत्थानं प्रत्युक्तम्''

ज्याची अविद्या संपूर्ण नाहीशी झाली, त्याला पुनः प्रपंचाचे भान होत नाही. प्रपंच वस्तू वाटणे व प्रपंच मिथ्या वाटणे असे दोन प्रकारचे भान आहे. पहिले अज्ञान्याचे ठिकाणी व दुसरे ज्ञान्याचे ठिकाणी असते. भक्ताचे ठिकाणी आत्मज्ञानाने पहिले भान व भक्तीने दुसरेही प्रपंचाचे भान नाहीसे होत असल्यामुळे, ज्ञानभक्तीने पूर्ण उपाधीरहित झालेल्या भक्ताला पुनः व्युत्थान होत नाही. म्हणून प्रपंचाचे भान कोणत्याच रूपाने होत नाही. त्यांना सर्वत्र एक श्रीहरीच दिसतो. भगवंताला तर कधी अविद्या उपाधीच नाही; तेव्हा अविद्येमुळे होणारे प्रपंचाचे भान किंवा व्युत्थान याचा तेथे मुळीच संबंध नाही.



सारांश, श्रीहरी व भक्त दोघेही अखंड समाधिस्थच असतात व त्यांचे ठिकाणी दुसऱ्याला व्यवहार दिसतो, तरी त्याची समाधिस्थिती भंग पावत नाही. म्हणूनच नाथ म्हणतात, ''कर्माचरणीं समाधि । एक म्हणती न घडे कधीं । ते पावले नाहीं निजात्मबोधी । जाण त्रिशुद्धि विदेहा ।। ताटस्था नांव समाधि । म्हणे त्याची ठकली बुद्धि ।।''

गीतेत भगवान् मायेच्या योगाने जन्म घेतो असे म्हटले आहे खरे पण त्याचा अर्थ ''जीवाप्रमाणे भगवंतालाही माया उपाधी आहे व त्या उपाधीमुळे भगवंताला आत्मविस्मृती होते व त्याला कर्म असते व ते कर्म पुढे प्रारब्धरूप होते व त्या प्रारब्धामुळे त्याला पांचभौतिक देहाची प्राप्ती होते'' असा नाही.

अवतार घेण्यापूर्वी तो उपाधिरहित ज्ञानसंपन्न असतो.

''स भगवान् ज्ञानैश्वर्यशक्तिबलवीर्यतेजोभिः सदा संपन्नः''

असे शंकराचार्यांनीच म्हटले आहे. त्यांच्याच मताप्रमाणे मायेच्या योगाने जन्म घेतो म्हणजे जीवाप्रमाणे आपली मूळ स्थिती विसरून मी जन्मलो असे तो समजत नाही. असे ''न परमार्थतो लोकवत्'' या पंक्तीने स्पष्ट केले आहे. ''देहवानिव, जात इव'' देह धारण केल्याप्रमाणे, जन्मल्यासारखे, अशा शब्दप्रयोगाने देहधारी जीवाप्रमाणे भगवान् देहधारी झाल्यासारखे, हरीची माया दुसऱ्या अज्ञानी लोकांना भासविते.

वास्तविक, जीवाप्रमाणे भगवंताला जन्म नाही व तो देहवानही होत नाही. देह जड असून तो देह धारण करणारा चेतन जीव देहवान् म्हटला जातो. कारण जीव स्वतः चेतन असून जड देहाचा मी म्हणून अभिमान धरतो म्हणून तो देहवान् होतो. पण परमेश्वराला अविद्या नाही. प्रारब्ध नाही म्हणून त्याला पांचभौतिक जड देहाची प्राप्ती नाही व अहंकार नाही म्हणून तो जड देहाचा अभिमान धरू शकत नाही व देहवान् होऊ शकत नाही. भगवंताची माया अज्ञानी लोकांना भगवान् जन्मला, देहवानासारखा झाला असे फक्त भासविते किंवा भ्रांती उत्पन्न करिते, असा मायेने भगवान् जन्म घेतो, या म्हणण्याचा अर्थ आहे; असे शंकराचार्यांनी योजिलेल्या पदांवरून स्पष्ट दिसते.

असाच अर्थ सर्व वेदान्तसिद्धान्तांशी सुसंगत होतो. असा अर्थ न करता भगवान् अवतार धारण करताना त्याचे पूर्वीचे निरुपाधिकत्व राहत नाही असा अर्थ केल्यास - अनेक वेदान्तसिद्धान्तांचा विरोध येतो हे मागे दाखविलेच आहे; आणि अवतार घेतल्यावर सगुणस्वरूपात श्रीहरी पूर्ण ईश्वरस्वरूप राहत नाही.

''या वासुदेवेऽनीश्वरासर्वज्ञाशंका मूर्खाणाम्''

असे अज्ञानी मूर्खांना वाटते, असे म्हणून आचार्यांनी, अवतारकाळीही भगवान् अवतारापूर्वी जसा पूर्ण असतो, तसाच परिपूर्ण असतो असे दाखविले आहे. तात्पर्य, सगुण श्रीहरी परिपूर्ण व निर्विकल्प आहे. हा विषय मागे सविस्तर मांडलाच आहे. स्मरणार्थ पुनः येथे थोडे दिग्दर्शन केले आहे.

**नारायण हरि उच्चार नामाचा ।**
**तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥२॥**
**तेथील प्रमाण नेणवे वेदांसी ।**
**तें जीवजंतूसीं केवीं कळें ॥३॥**

ज्या ठिकाणी नारायणहरी असे श्रीहरीचे नामस्मरण सतत चालू असते, तेथे कळिकाळाचा शिरकावच होत नाही. कारण जेथे पाप असेल तेथेच कळिकाळाचा प्रवेश होतो. पण भगवन्नामस्मरणाने पापच शिल्लक रहात नाही. अशा या भगवन्नामाच्या माहात्म्याचे प्रमाण वेदालाच माहीत नाही. ज्या नामात पापक्षालन करण्याचा प्रभाव किती आहे हे वेदालाही सांगता आले नाही त्या नामाचा प्रभाव इतरांना काय कळणार?

भगवंताच्या गुणांचा जसा पार नाही, ते निरतिशय आहे, त्याप्रमाणे भगवंताच्या नाममाहात्म्याचेही प्रमाण नाही. नाममाहात्म्य इतके थोर आहे असे त्याच्या माहात्म्याचे मोजमाप करता येत नाही. नामाचे माहात्म्यही निरतिशय आहे. शब्दाने सांगता येण्याजोगे नाही. नामस्मरणाने जी स्थिती प्राप्त होते ती अनिर्वाच्य आहे. तशी स्थिती योगज्ञानादी कोणत्याही साधनांनी साधली जात नाही.

नामस्मरणाने अकृत्रिम ब्रह्मस्थिती साधते, तर इतर साधनांनी कृत्रिम ब्रह्मस्थिती साधते.

**ज्ञानदेवा फळ नारायण पाठ ।**
**सर्वत्र वैकुंठ केलें असें ॥४॥**

***उत्तरभक्तीचे स्वरूप व वैकुंठाचे व्यापकत्व***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, नारायण नामाचा अखंड पाठ हेच शेवटचे फळ मी मानतो. श्रीहरीशी ऐक्य झाल्यावरही हरिनामाची गोडी कायम राहणे हेच ज्ञानोत्तर किंवा मुक्तीवरील भक्तीचे लक्षण होय.





श्रीतुकाराममहाराजांनीही - ''मुक्तीवरील भक्ति जाण । अखंड मुखी नारायण'' असेच उत्तरभक्तीचे लक्षण केले आहे.

या उत्तरभक्तीच्या योगाने वैकुंठाची एकदेशी स्थिती जाऊन ते वैकुंठ सर्वदेशव्यापी होते. नामधारक वैकुंठावाचून राहूच शकत नाही. तो जेथे असतो तेथेच वैकुंठ अशी स्थिती होते. म्हणजे समस्त नामे हरिनाम होतात, सर्व रूपे हरिरूप होतात म्हणून सर्व देशच वैकुंठ होतो. हरीवाचून व हरिनामावाचून भिन्न नामरूपाचा विकल्पच उठत नाही. अशी नामधारकाची, श्रीहरीचे ठिकाणी जडलेली, अंतःकरणवृत्ती निर्विकल्प होते. म्हणून माझी सद्गुरु आई म्हणते की ज्ञानेश्वरमहाराजांचे स्मरण करा.

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

० ० ०

॥श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ॥श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ॥

## पाठक्रम : २६ अर्थक्रम : २४

**एक तत्त्व नाम दृढ धरी मना । हरीसी करुणा येईल तुझी ॥१॥**
**तें नाम सोपे रे रामकृष्ण गोविंद । वाचेसी सद्गद जपा आधीं ॥२॥**
**नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा । वायां आणिका पंथा जासी झणी ॥३॥**
**ज्ञानदेव मौन जपमाळ अंतरीं । धरूनी श्रीहरी जपे सदां ॥४॥**

*

प्रतिज्ञा :- संकेत जाणून नामाची विशेषता, भगवंताचे दयाळुत्वगुणवर्णन, रामकृष्ण नामावाचून इतर साधने नकोत. कळकळीने नामाचा उपदेश. नामांत मनाची एकाग्रता. नाम हे तत्त्व तर साऱ्या वृत्ती. लोकांस दुसऱ्या मार्गाने न जाऊ देण्याची सक्ती, भक्तेतर जनांशी भाषणनिषेध, नित्य नाम जपा मग माळ नसली तर नसो.

*

सरळ अर्थ - मना, नाम हे अद्वैततत्त्व आहे हे पक्के समज. अशा दृढ विश्वासाने नामस्मरण करशील तर खात्रीने तुझी श्रीहरीला दया येईल. ते नाम म्हणजे रामकृष्ण गोविंद हे होय आणि ते सोपेही आहे. पण इतर साधने सोडून सद्गद अंतःकरणाने मात्र जपत जा. नामाव्यतिरिक्त दुसरे निराळे तत्त्व नाही.

नामस्मरणावाचून व्यर्थ दुसरा मार्ग धरू नकोस. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मी मौन धारण करून अंतःकरणात श्रीहरीला धरून व मनाची माळ करून सदा नामस्मरण करीत असतो.

(११४)

## एक तत्त्व नाम दृढ धरी मना ।
## हरीसी करुणा येईल तुझी ॥१॥

***संकेत जाणून नामस्मरणाची विशेषता, श्रीहरीचे दयाळुत्व***

विवरण - श्रीहरी या संपूर्ण नामरूपात्मक जगताचे अधिष्ठान होय आणि तो या जगाच्या आत बाहेर व्यापून असून त्याच्यावाचून दुसरी वस्तू मुळीच नाही. म्हणून त्या श्रीहरीला एक तत्त्व म्हणतात. तत्त्व म्हणजे अविनाशी. मागे सांगितल्याप्रमाणे कार्यात कारणाशिवाय निराळी वस्तू नसते म्हणून कार्यही, पूर्ण कारणस्वरूप आहे असे पाहणे याला संकेत म्हणतात. या संकेत दृष्टीने पाहता

''परी आश्रय आकाशा । आकाशचि कां जैसा । या नामा नामीं आश्रय तैसा । अभेद असे ॥ उदयिला आकाशीं । रवींचि रवीतें प्रकाशी । हे नाम व्यक्ति तैसी । ब्रह्मचि करी ॥ घेऊनि येथीचे वर्म । जैं विचारसी हें नाम । तैं केवळ हेंचि ब्रह्म । जाणसी तूं ॥'' (ज्ञा.अ.१७)

श्रीहरीच्या नामाचे श्रीहरीशी अत्यंत ऐक्य असून श्रीहरी अविनाशी आहे म्हणून श्रीहरीचे नाम हेहि अविनाशी तत्त्वच आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज, आचार्य, तुकारामादी संतांनी नामाला शुद्ध परब्रह्मच मानिले आहे. हे त्यांची मागे वचने प्रमाण देऊन सांगितलेच आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज मनाला उपदेश करितात की, बा मना! संकेतदृष्टीने नामस्मरण करशील व नामाबरोबर हृदयांत श्रीहरी दृढ धरशील तर श्रीहरीला तुझी खास दया येईल. श्रीहरी स्वभावतःच दयाळू आहे. दयाळुत्व हा श्रीहरीचा स्वभावगुण होय.

मैं तो हूं अधिन तीन गुणके न मान मेरो । भक्त वात्सल्य गुण सबहीको टारे है ॥''

ब्राह्मणभक्ती, न्यायप्रियता, भक्तवात्सल्य, असे तीन गुण भगवंताचे ठिकाणी आहेत, पण प्रसंग पडल्यास भक्तवात्सल्य हा गुण बाकीच्या गुणांला दूर करितो असे प्रियादास वैष्णव म्हणतात. नाम अविनाशी तत्त्व आहे हे पक्के लक्षांत ठेवून नामस्मरण अखंड केले पाहिजे. अन्वय किंवा संकेत दृष्टीने केलेले नामस्मरण



साक्षात् परमेश्वरप्राप्ती करून देणारे आहे. त्या दृष्टीवाचून केलेले नामस्मरण सामान्य स्वरूपाचे व पापनाशक होते. ज्याप्रमाणे वासराला पाहिल्याबरोबर गाईला पान्हा धरवत नाही त्याप्रमाणे संकेतदृष्टिसह भगवन्नामस्मरण करणाऱ्या नामधारकाला पाहून भगवंतालाही प्रेम धरवत नाही कारण अन्वय किंवा संकेतदृष्टी झाल्यावर तेथे श्रीहरीच्या प्रेमाशिवाय काही राहात नाही.

## तें नाम सोपें रे रामकृष्ण गोविंद ।
## वाचेसी सद्‌गद जपा आधीं ॥२॥

***कळकळून नामाचा उपदेश व नामानें एकाग्रता***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मना, मी जो तुला हरिनामाचा जप करण्यास सांगतो ते हरिनाम म्हणजे रामकृष्ण गोविंद हे होय. ते नुसते तोंडाने उच्चारावे लागते. म्हणून अत्यंत सोपे आहे. ते नामस्मरण करण्यास काही कष्ट पडत नाहीत. म्हणून आधी म्हणजे दुसऱ्या साधनांचा विचार करण्यात वेळेचा अपव्यय न करिता ताबडतोब एकदम नामस्मरण सुरू कर. नामस्मरण करताना, जसे लहान मूल आपल्या आईकरिता कळवळून व तळमळून रडते तसेच निःसाधन होऊन अती दीन अंतःकरणाने कळवळून श्रीहरीचा धावा कर; व असे करिताना अंतःकरण आपोआप एकाग्र होते. अशा सद्‌गद अंतःकरणाने नामस्रण करशील तर सहजच तू परमेश्वराचे ठिकाणी एकाग्र होशील. त्यावाचून एकाग्रता प्राप्त व्हावयाची नाही.

## नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा ।
## वांया आणिका पंथा जासी झणी ॥३॥

***नामतत्त्व व इतर वृत्ती***

हरिनाम हे तत्त्व म्हणजे अविनाशी आहे. हरिनामावाचून इतर साधने विनाशी आहेत. साधन व साध्य नेहमी निराळे असते. साध्य साधले की, साधन संपते. हरिनामावाचून जेवढी साधने आहेत ती त्यांचे साध्य प्राप्त झाले की संपतात. पण हरिनाम हे साधन असे आहे की, त्याचे साध्य, परमानंद श्रीहरीची प्राप्ती व सर्वत्र घनदाट श्रीहरीचाच प्रत्यय, हे प्राप्त झाल्यावरही श्रीहरीच्या प्रेमाने श्रीहरीचे नामस्मरण अखंड चालूच राहते. म्हणजे नामस्मरण हे साधन व शेवटी साध्यही होते.

"अवघाचि आकार गिळियेला काळें । एकचि निराळें हरिनाम ।। नामा म्हणे तत्त्व नाम गोविंदाचे । हेंचि धरी साचें येर वृथा" हरिनामावाचून इतर सर्व नाशिवंत भासमात्र आहे म्हणून तेच हरिनाम हृदयात धरावे असे नामदेवमहाराज, तुकाराममहाराज यांचेही म्हणणे आहे.

सगुण परमात्माही अविनाशीच आहे व त्याचे नामरूपही अविनाशीच आहे. श्रीहरीच्या नामरूपाविषयीचा भक्तांचा प्रयत्न प्रेमामुळे, अविनाशी आहे. दुष्टांचा वध व सज्जनांचे परिपालन करण्याकरिता भगवंताला अवतार धारण करण्याची प्रार्थना करणाऱ्या देव, ऋषी यांचा भगवद्विषयक प्रत्यय विनाशी आहे. कारण त्यांनी तेवढ्याच कार्यापुरते भगवंताला सगुणरूप घेऊन येण्याची प्रार्थना केलेली असते. म्हणून देव, ऋषींना, त्यांचे कार्य झाले की, सगुण परमात्मा अंतर्धान पावला असा अनुभव येतो. पण भगवंताचे अवतार घेणे व अंतर्धान पावणे म्हणजे नाथ म्हणतात जन्मणे व मरणे नव्हे.

"श्री नारायण साकारला । तंव तो इंद्रियां विषय केला ।
तोचि इंद्रियातीत जाहला । या नांव पावला अंतर्धान ।। *(चतुःश्लोकी भागवत)*

इंद्रियातीत असलेला परमात्मा जेव्हा देवादिकांना डोळ्याने दिसतो तेव्हा साकार सगुण झाला किंवा जन्मला असे त्यांना वाटते व तोच व्यक्त होण्याचे कार्य संपले की, त्यांच्या डोळ्यांना न दिसण्यासारखा होतो, त्याला तो अंतर्धान पावला असे म्हणतात. पण परमात्मा नित्यच असतो. तो जन्मत नाही व अंतर्धानही पावत नाही. परमात्म्याचे जन्मणे किंवा अंतर्धान पावणे हे पाहणाऱ्या देवांच्या अंतःकरणाचा प्रकार आहे.

ज्याप्रमाणे सर्व नामरूपात्मक सृष्टी वस्तुतः नामरूपासह सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप आहे, पण अज्ञान्याला तशी दिसत नाही; त्यांना ती जड विनाशीच दिसते. पण ज्ञान्याला ती सृष्टी वस्तुतः जशी आहे तशी अनुभवाला येते. त्याप्रमाणे भक्तांना सगुण श्रीहरीचा अविनाशी प्रत्यय असून देवादिकांना अनित्य प्रत्यय असतो. अशा श्रीहरीची प्राप्ती सोप्या नामस्मरणानेच होत असल्यामुळे श्रीज्ञानेश्वरमहाराज आपल्या मनाला नामस्मरणावाचून दुसऱ्या मार्गाने न जाण्याची सक्ती करितात व कळवळ्याने सर्वांसच तशी आज्ञा करितात.

**ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरीं ।**

**धरूनि श्रीहरि जपे सदां ।।४।।**

(११५)



श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात -

मी मौन धरले व भक्तेतर जनांशी भाषण वर्ज्य केले. अंतःकरणात श्रीहरीचे सतत ध्यान ठेवून श्रीहरीचे अखंड नामस्मरण करीत असतो. अंतःकरणाचीच जपमाळ केली असा अर्थ. म्हणजेच नित्य नामस्मरण करावे. नित्य नामस्मरण करणाऱ्याला हाती जपमाळ पाहिजेच असे नाही. माळ असो नसो, नित्य नामस्मरण करावे असा भाव.

।। श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।।

०००

।।श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ।।श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ।।

---

**पाठक्रम : २७** **अर्थक्रम : २६**

---

**सर्व सुख गोडी साही शास्त्रें निवडी । रिकामा अर्धघडी राहूं नको ।।१।।**

**लटिका व्यवहार सर्व हा संसार । वायां येरझार हरिवीण ।।२।।**

**नाम मंत्र जप कोटी जाईल पाप । रामकृष्णी संकल्प धरूनि राहे ।।३।।**

**निजवृत्ति काढी सर्व माया तोडी । इंद्रियां सवडी लपूं नको ।।४।।**

**तीर्थी व्रतीं भाव धरी रे करुणा । शांति दया पाहुणा हरी करी ।।५।।**

**ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान । समाधि संजीवन हरिपाठ ।।६।।**

*

प्रतिज्ञाः- उपदेशाचे चुटके. जगात वागण्याची रीती.
हरिनामावाचून वेदशास्त्र खोटे. जीवंत समाधी. नामस्मरण.

*

सरळ अर्थ - सर्व शास्त्रांनी सुखगोडी एका हरिनामांत आहे असा अबाधित अंतिम निर्णय करून ठेविला आहे. म्हणून हरिनामावाचून एक क्षण देखील रिकामा राहू नकोस. सर्व संसार खोटा आहे. हरिनामावाचून संसाराची येरझार चुकणार नाही. हरिनाममंत्रजपाने अनंतकोटी पापे जळून जातील. म्हणून हरिनामाचे ठिकाणीच दृढ संकल्प करून राहा. संसारातून आपली वृत्ती काढ. सर्व आसक्ती सोड व इंद्रियांच्या संधीत लपू नकोस. तीर्थ व व्रते यांचे ठिकाणी भाव ठेव व श्रीहरीला

शांती, दया इत्यादी वृत्तींचा पाहुणा कर. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, मला श्रीनिवृत्तिनाथांचे ज्ञानच निःसंदेह प्रमाण आहे. हरिपाठ हा जीवंत समाधी होय.

**सर्व सुख गोडी साही शास्त्रें निवडी ।**

**रिकामा अर्धघडी राहूं नको ॥१॥**

***उपदेशाचे चुटके, जगात कसें वागावे?***

विवरण - सर्व शास्त्रांनी असा अबाधित अंतिम निर्णय केला आहे की सर्व सुखाची गोडी म्हणजे पूर्णसुख एका सगुण साकार श्रीहरीचे ठिकाणीच मिळते. मनाला नेहमी सुख पाहिजे व त्या सुखाकरिताच ते इंद्रियरूप होऊन विषयाकडे धावते. मनाचे हे, इंद्रिये व विषय यांच्या संयोगाने मिळणारे सुख क्षणभरच असते. म्हणून मन वारंवार सुखाकरिता तळमळून कोणत्या तरी इंद्रियाद्वारा सुख भोगण्याचा प्रयत्न करीत असते. त्याला सर्व सुखाची गोडी, एका विषयाचे ठिकाणी स्थिर होऊन मिळत नाही. रूपाचे सुख डोळ्याचे द्वारा भोगत असताना, ते पूर्ण मिळत नाही. कारण सृष्टीत सर्व सौंदर्याचा साठा असा एकही पदार्थ नाही आणि केव्हा केव्हा विद्रूप दर्शनाने दुःख भोगण्याचाही प्रसंग येतो. याप्रमाणे ज्या ज्या इंद्रियांद्वारा मन शब्दादी विषयाचे सुख भोगण्याचा प्रयत्न करिते त्या त्या इंद्रियांद्वारा मिळणारे सुख पूर्ण मिळत नाही, व केव्हा केव्हा मनाजोगा विषय न मिळाल्यामुळे किंवा मनाविरुद्ध विषय मिळाल्याने दुःखही भोगण्याचा प्रसंग येत असल्यामुळे, मनाची सर्वसुखगोडीची तळमळ शांत होत नाही. पण ही मनाची सर्वसुखगोडी भोगण्याची तळमळ शांत होऊन पुनः सुखाच्या पूर्णतेमुळे मन सुख भोगण्याची इच्छाच करणार नाही, इतके ते मन जेथे सुखमय होऊन राहील अशी वस्तू म्हणजे सगुण श्रीहरीच होय. सगुण श्रीहरीच्या ठिकाणी सर्वसुखगोडी भोगण्याची मनाची हाव पूर्ण शांत होते.

श्रीहरीच्या स्वरूपाविषयीचा आपला अनुभव सांगताना गोपी म्हणतात,''येनैकदेशेऽखिलसर्गसौष्ठवमद्राक्ष्म'' भगवंताच्या सगुण मूर्तीचे ठिकाणी, हे ब्रह्मदेवा! तुझे सर्व ब्रह्मांडातील सौंदर्य एकवटलेले आम्ही पाहत होतो. म्हणजे भगवंताचे सौंदर्याइतके सौंदर्य कोठेच नसल्यामुळे, भगवंताची रामकृष्ण मूर्ती ज्यांच्या डोळ्यांना दिसली त्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटून ते बाहेरचे रूप पाहणेच विसरतात. भगवंताचे शरीर इतके कोमल आहे की, ब्रह्माण्डांतील सर्व कोवळेपणा

(११६)



तेथे एकवटला आहे; त्यामुळे ज्यांना परमेश्वराशी आलिंगन देण्याचे भाग्य लाभले त्यांचे स्पर्शेन्द्रिय बाहेरच्या विषयांचे स्पर्शजन्य सुख घेणेच विसरते. भगवंताच्या अंगाचा सुवास एकदा अनुभवाला आला असता मग घ्राणेंद्रिय, बाह्य गंध विषयच विसरते. भगवंताची मधुर-वाणी श्रवण केली की, कान बाहेरचा शब्दविषय विसरतात. आणि भगवंताचे नाम इतके मधूर आहे की एकदा त्याची गोडी कळली की, रसनेंद्रिय बाहेरचा रसच विसरते. म्हणजे भगवत्स्वरूप साक्षात्कारात सर्व इंद्रियांची पूर्ण तृप्ती होऊन भगवंताकडे लागलेली इंद्रिये पुनः तेथून माघारी फिरतच नाहीत- समाधिस्थ होऊन राहतात. हीच पूर्ण सुखाची निर्विकल्प स्थिती श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी - ''की आघवियाची करणीं । विषयाची घेणी । करितांचि एके क्षणीं । जे कीं आहे'' या ओवींत वर्णिली आहे व सर्व ''सुखाचें आगर । बाप रुक्मादेवीवर ॥'' म्हणून स्वतःचा सगुणसाक्षात्कारानुभवही सांगितला आहे.

या सर्वसुखगोडीलाच खरा मोक्ष म्हणतात. हीच सहजावस्थाही होय. हिला सगुणसाकार श्रीहरीही म्हणतात. - पण ही स्थिती भगवन्नामस्मरणावाचून मिळतच नाही, म्हणून माउलीचे आग्रहाने सांगणे आहे की, नामस्मरणावाचून अर्ध घडी देखील रिकामी जाऊ देऊ नये.

**लटिका व्यवहार सर्व हा संसार ।**

**वांया येरझार हरिवीण ॥२॥**

भगवंताच्या नामस्मरणाकडे लक्ष लागत नाही व अर्धघडीच काय पण दिवस रात्रीतून कितीतरी तासानुतास भगवन्नामावाचून जातात. त्याचे कारण एकच आहे की, हा नामरूपात्मक द्वैतरूप, जड, विनाशी व दुःखरूप संसार सत्य वाटतो. त्यामुळे मन या संसारसुखात अत्यंत आसक्त झालेले आहे. संसार सत्य वाटतो तोपर्यंत भगवतांकडे मन लागणे दुरापास्तच! म्हणून श्रीज्ञानेश्वर माउली उपदेश करिते की, बाबा! तू हा संसार जसा पाहतोस किंवा अनुभवतोस तसा तो सत्य नाही. तो सर्व खोटा आहे. विनाशी व दुःखरूप असा जगताचा तुला अनुभव येत असताना तू त्याला सत्य कसे समजतोस! द्वैतप्रपंच सत्य असणे कसे शक्य आहे? द्वैत म्हणजे प्रत्येक पदार्थ स्वतंत्र निराळा आहे असे समजणे होय. दोन पदार्थ सत्य झाले की, त्यांना मर्यादितपणा आलाच व मर्यादित पदार्थ नाशिवंतच असतात म्हणून आपण सर्व प्रपंच नाशिवंत पाहतो. सच्चिदानंद परब्रह्मापासून

झालेला प्रपंच जोपर्यंत सच्चिदानंद असा प्रत्ययाला येत नाही, आणि जड, विनाशी व दुःखस्वरूप, परब्रह्माहून निराळा, प्रतीत होतो, तोपर्यंत तो लटिका आहे किंवा त्या धर्माने तो लटिका आहे. अशा संसारात चित्त आहे तोपर्यंत भगवंताकडे किंवा भगवन्नामस्मरणाकडे चित्त लागणे कसे शक्य आहे! जोपर्यंत हरीचे चिंतन मनात होत नाही तोपर्यंत संसाराची खेप चुकणेही शक्य नाही, म्हणून जो हा संसार जड विनाशी दुःखरूप आहे असा जो प्रत्यय येतो तो खोटा आहे. तसा संसार मुळीच अस्तित्वात नाही. आहे तो संसार, एका श्रीहरीचीच सर्वत्र अद्वैत सत्ता असल्यामुळे, श्रीहरीस्वरूपच आहे असे दृढ जाण. म्हणजे संसार खेप चुकेल व तूं परमानंदरूप होशील.

संसार सुखाचा वाटतो तोपर्यंत संसारप्राप्तीचा मनुष्याकडून प्रयत्न होणार यात शंका नाही. व त्यामुळे त्या प्रयत्नाने संसाराचीच प्राप्ती होणार. आणि संसार म्हणजे मनुष्यादी नाना योनीत जन्म घेणे. मनात अखंड सुखाची इच्छा असूनही त्या सुखाच्या प्राप्तीकरिता प्रयत्न न होता विनाशी संसारसुखाकरिता प्रयत्न होतो. अशा प्रकारे या संसारातील प्रत्येक येरझार व्यर्थ जाते. मनुष्यजन्मांतील येरझारच भगवत्प्राप्तीकरिता उपयोगी पडते. ती विषयसुख मिळविण्यातच उपयोगात आणली तर व्यर्थ गेली व बाकीच्या योनीतील येरझार तर व्यर्थ आहेच. यावरून एक निष्कर्ष निघतो की, हरिभक्तिवाचून मनुष्यजन्मातली येरझार व्यर्थ असली तरी हरिभक्तीसह येरझार व्यर्थ नाही. ''तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी'' असे तुकाराम महाराज भक्तीच्या आवडीने म्हणतात.

शंका - येथे कोणी शंका घेतील की, ज्ञानी पुरुषाला पुनः जन्म नाही, व भगवद्भक्ताला जर पुनः जन्म घेणे शक्य असेल तर तो ज्ञान्यापेक्षा गौणच होईल, भक्तीचीही ज्ञानापेक्षा मातब्बरी सांगता येणार नाही.

या शंकेचे निराकरण असे आहे की, - येथे गर्भवास हा शब्द नुसता जन्माचा दर्शक आहे, गर्भवासातील दुःखाचा दर्शक नाही. ''न स पुनरावर्तते'' या श्रुतीने ज्या जन्माची ज्ञान्याला पुनः प्राप्ती नाही असे सांगितले आहे तो जन्म म्हणजे अविद्याजन्य जन्म होय. अविद्या म्हणजे आत्मविस्मृती या आत्मविस्मृतीमुळे पांचभौतिक, नाशिवंत, असा देह प्राप्त होतो. असा देह ज्ञान्याला ज्ञानानंतर प्राप्त होत नाही. कारण तोच बंधनकारक आहे. नुसता देह प्राप्त होणे हे दुःखाला कारण नाही. भक्तालाही अविद्याजन्य जन्म नसतो पण

***भक्ताचा जन्म अवताराप्रमाणेच***





भगवतांच्या भक्तीची गोडी म्हणून भगवंताच्या अवताराप्रमाणे तेही जन्म घेतात. पण त्यांचा जन्म अवताराप्रमाणेच असतो. अवतारांना गर्भवासाचे दुःख नसते व तसेच भगवद्भक्तांनाही गर्भवासाचे दुःख नसते. दोघेही लीलेनच जन्म घेतात. याचा अर्थ वर सांगितल्याप्रमाणे लोकांना त्यांचा जन्म झाला असे दिसते. वास्तविक वेदान्तांतील अन्वयज्ञानानुसार सर्व नामरूपात्मक विश्व सत्य असल्यामुळे संतांचे देहही नित्य आहेत. ते भगवदाज्ञेप्रमाणे प्रगट होतात व कार्य संपले की, भगवंतात अंतर्धान पावतात.

तुकाराम महाराज स्वतः म्हणतात - देवासी अवतार भक्तासी संसार । दोहोंचा विचार एकरूप ॥ नित्यमुक्त परमात्मा आपली नित्यमुक्तता बिघडू न देता जसा अवतार घेतो त्याप्रमाणे ज्ञान, भक्तीने पूर्ण झालेले संतही, दुसऱ्या अज्ञानी लोकांना परमार्थाचा साधनमार्ग व त्यातील वागणूक दाखविण्याकरिता, अवताराप्रमाणे पुनः संसारात प्रगट होतात.

जसा उत्तम नटच, स्वतः काही एक त्यापैकी न अनुभवता, एखाद्या पात्राची भूमिका उत्तम प्रकारे करून दाखवितो, त्याप्रमाणे संतही पुनः पुनः जन्म घेऊन खरोखर काही एक स्वतः न अनुभविता उत्तम प्रकारे साधकाची भूमिका घेऊन उत्तम प्रकारे नटून दाखवितात.

यात या त्यांच्या नटण्यात साधकांना मार्ग सापडतो व त्यांना श्रीहरीला भक्तिप्रेमही समर्पण करता येते. अशी दोन्ही कार्ये साधतात. श्रीहरि व संत यांनी अवतार, घेऊन, या संसारांतून कसकशा रीतीने सुटावे? कसे ज्ञान संपादन करावे? कसे भगवत्प्रेमाचे संगोपन करावे? कसे जगत् व त्यातील आघात मिथ्या मानावेत? असे अनेक प्रकारचे शिक्षण अज्ञानी जनांना देण्याकरिता, जे लीलात्मक चरित्र करून दाखविले.

त्यावरून देवाच्या अवताराला व थोर थोर संतांनाही प्रारब्ध सुटले नाही असे म्हणणाऱ्यांचा सर्व वेदांताभ्यास, शंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर महाराजादिक थोर माहात्म्यांच्या वेदांताभ्यासाहून अगदीच विलक्षण असल्यामुळे, तशा वेदान्तविचाराने ते काय आत्मानुभव घेत असतील व काय त्यांची ब्रह्मस्थितीची कल्पना असेल; हे त्यांचे त्यांनाच माहीत. शंकरायार्चादिकांच्या वेदांताचा अभ्यास करणाऱ्यांना त्यांचा अनुभव अगम्य आहे. किंवा -

***गर्भवासाचे मिथ्यात्व***

''तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावे आम्हांसी'' या वचनाने श्रीतुकाराम महाराजांनी स्वतःचे निरहंकारित्व व गर्भवासाचे मिथ्यात्व दाखविले आहे. ब्रह्मज्ञानाने सर्व जगत् मिथ्या ठरल्यावर, ज्ञानी पुरुष मला गर्भवास नको म्हणेल तर तो ज्ञानी गर्भवास सत्य समजला की, मिथ्या समजला? हा प्रश्न उत्पन्न होतो.

मिथ्या शब्दाचे वेदान्तात दोन अर्थ आहेत.

१) एक अर्थ असा आहे की, ज्या वस्तूला आपण मिथ्या म्हणतो ती वस्तु मुळीच अस्तित्वात नाही, नुसती कल्पना होय, व

२) दुसरा अर्थ असा आहे की, ती वस्तु सच्चिदानंद परब्रह्माहून निराळी नाही, सच्चिदानंदरूपच आहे, गर्भवासादी प्रकार मिथ्या आहे म्हणजे नुस्ता खोटा भास होय;

असे ज्या ज्ञान्याला पूर्ण कळले तो ज्ञानी मला गर्भवास नको असे म्हणणे शक्य नाही.कारण तशा मिथ्या वस्तूचा तो कसा विरोध करू शकेल? विरोध करील त्याला तो सत्यच वाटला पाहिजे. गर्भवासादी प्रकारही परब्रह्मरूपच आहेत, असे ज्या ज्ञान्याच्या अनुभवाला आले तो तर गर्भवास नको म्हणणे शक्यच नाही.

पुनः पूर्ण ब्रह्मस्वरूप झालेल्या पुरुषांना आपली पूर्णता टिकविण्याकरिता, पूर्णतेचा अभिमान उत्पन्न होणार नाही अशा रीतीने अत्यंत निरहंकारपणे वागण्याचा शास्त्रोपदेश आहे.तेव्हा पूर्ण पुरुषांना पूर्ण होऊनही अपूर्णासारखी भाषा वापरण्यावाचून कोणत्या दुसऱ्या रीतीने निरहंकार राहता येईल? श्रीमंताने मी श्रीमंत आहे असे म्हटले असता त्याचा निरभिमानपणा दिसून येईल की मी आपला एक गरीब मनुष्य आहे असे म्हटले असता त्याचा निरभिमान दिसून येईल? ''जाणोनि नेणतें करी माझें मन'' अशी संतांची भगवंतापाशी मागणी असते. म्हणून तुकाराममहाराजांचे वरील वचन निरभिमानमूलक व प्रेममूलक आहे व गर्भवासादी सर्व संसार मिथ्या दाखविणारेही आहे.

गर्भवासादी प्रकार खरे समजून, तुकाराम महाराजांनी प्रार्थना केल्याप्रमाणे ज्ञान्याला पुनः गर्भवास प्राप्त होतो असे मानावे काय? असे जे आक्षेप करितात त्यांना ब्रह्मज्ञानाने कोणत्या देहाची निवृत्ती होते, कशाप्रकारचा देह ब्रह्मज्ञानाला विरोधी नाही वगैरे सिद्धान्त माहीत नसल्यामुळे असे लोकच अनेक शंका घेतात. ''आम्ही वैकुंठनिवासी । आलों याचि कारणासी'' असे तुकाराम महाराजांनीच स्वतःविषयी म्हटले आहे.वैकुंठनिवासी होते पण त्यांना ब्रह्मज्ञान नव्हते असे ज्यांना भक्तीचा महिमा माहीत आहे ते, म्हणून शकत नाहीत. सारांश इतकाच की,



ज्ञानानंतर अविद्याजन्य पांचभौतिक, गर्भदुःख भोगणारा देह प्राप्त होत नाही. पण ज्ञानी भक्त, भगवंतासारखाच देह धारण करू शकतात. ज्ञानी भक्त होऊन पुनः पुनः जन्म घेऊन, भगवदाज्ञेप्रमाणे अज्ञानी जनांचा उद्धार केलेल्या पुष्कळ संतांची उदाहरणे आहेत.

**नाममंत्र जप कोटी जाईल पाप ।**

**रामकृष्णीं संकल्प धरूनि राहे ॥३॥**

श्रीहरीच्या नामस्मरणाने अनंत जन्मातील अनंत प्रकारची कोट्यावधी पापे नष्ट होतात. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, लटक्या संसारात आसक्ती न ठेवता रामकृष्णनामाचे ठिकाणी दृढ संकल्प धरून रहा. म्हणजे ''भगवंताचे नामच जपावयाचे दुसरे काही करावयाचे नाही'' असा मनाचा निश्चय करून रहा.

**निजवृत्ति काढी सर्व माया तोडी ।**

**इंद्रियां सवडी लपूं नको ॥४॥**

निजवृत्ती म्हजणे अहंवृत्ती. सर्वमाया म्हणजे ममतावृत्ती. ज्ञानेश्वरीत माउली म्हणते ''म्हणोनि माझेचि मी नव्हती । माझेंचि मज नोळखती । अहंममता भ्रांती। विषयांध झाले'' (ज्ञा. ७-६७) जीव सर्व परमेश्वरस्वरूपच व परमेश्वराचेच अंश, पण देहावर अहंता ठेवून व विषयांवर ममता ठेवून इतके विषयांध झाले की, मला पूर्ण ओळखेनासे झाले. परमार्थात ब्रह्मज्ञान संपादन करण्याकरिता व जगात अत्यंत सद्‌गुणांचा, सर्व संसारी जीवांपुढे आदर्श नमुना ठेवण्याकरिता, देहावर मीपणा न ठेवता, आपल्या मूळ स्वरूपाचे ठिकाणी ते मीपण नेऊन ठेवणे व सर्व विषयांची आसक्ती सोडणे, अत्यंत आवश्यक आहे. व्यवहारांत अत्यंत सद्‌गुणी मनुष्य ज्या कोणत्या सद्‌गुणांनी संपन्न असावा म्हणून ज्या सद्‌गुणांची प्रशंसा आपण करितो, त्या सर्व सद्‌गुणांची बैठक अध्यात्मावरच असते.

देहावरच जोपर्यंत मीपण आहे म्हणजे देहच मी असे जोपर्यंत मनुष्य समजतो तोपर्यंत तो आपल्या देहाचेच सुख पाहतो. देहाचे सुख पाहाणे यालाच स्वार्थ म्हणतात. या स्वार्थात आपल्या देहाच्या सुखाकडे दृष्टी असताना देहसुखाला कारणीभूत होणाऱ्या स्त्रीपुत्र, घरदार इत्यादी विषयांच्या ठिकाणी ममता ठेवून आपल्या देहसुखाकरिता व स्त्रीपुत्रादिकांच्या देहसुखाकरिता मनुष्य अहर्निश खटपट करीत असतो, आणि या खटपटीतच आपला स्वार्थ साधण्याकरिता त्याच्या

ठिकाणी लबाडी, विश्वासघात, परदुःखविन्मुखता इत्यादी अनेक सामाजिक दुर्गुणांचा प्रादुर्भाव होतो. असा मनुष्य इहलोकात समाजाच्या दृष्टीने अधम गणला जातो व मरणानंतर नरकाला जातो. अशा रीतीने इहपर त्याची दुर्गती होते. पण या सर्व दुर्गतीचे कारण जो देहावरचा मीपणा तो निघून आत्मस्वरूपाचे ठिकाणी बसला असता व स्त्रीपुत्रावरील ममता निघून ती दृश्य अशा जगद्रूप भगवंताच्या सगुण स्वरूपावर बसली असता, असा पुरुष पूर्ण ज्ञानी भक्त व आदर्श नागरिक बनतो.

***सुखाचा संसार ?***

आता असा पुरुष ''अज्ञानी व संसारासक्त पुरुषांच्या मनाप्रमाणे वागून त्यांचा संसार सुखाचा करील'' असा मात्र अर्थ नव्हे, कारण हा जड विनाशी संसार पूर्ण खोटा. कर्मानुसारच फळ येथे मिळणार व कितीहि प्रयत्न केला तरी तो पूर्ण सुखरूप होणे शक्य नाही, असे ते पूर्ण जाणत असतात. आपण स्वतः देहावरची अहंता व विषयावरची ममता सोडून जसे पूर्ण झालो तसेच दुसऱ्यालाही पूर्ण होण्याचा ते उपदेश करितात. एवढा उपकार करण्यापुरतेच ते समाजात राहात असतात. असे असले तरी प्रारब्धाने होणारा संसार ते करीत नाहीत व शक्य तोंवर होण्याजोगी असलेली मदत समाजाला देत नाहीत असा अर्थ नव्हे. पण आपल्या परमार्थानुभावाला बाध येणार नाही असे सामाजिक कल्याणाचे ते कार्य सतत करीतच असतात. म्हणजे देहाचे ठिकाणी जो मीपणा होता तो तेथून काढून आत्मस्वरूपाचे ठिकाणी ठेवला. आता आत्म्याचे ठिकाणी हे मीपण पुनः पूर्ववत् देहाचे ठिकाणी बसून पूर्ववत् अज्ञानी अवस्था येऊ नये ही खबरदारी तर घेतलीच पाहिजे. ही खबरदारी घेताना इंद्रियारूढ होऊन आत्मस्वरूप विसरणार नाही असे नेहमी वागणे व्यवहारात भाग आहे.

ज्याप्रमाणे तरंग उठण्यापूर्वी व तरंग नाहीसा झाल्यानंतर, पाण्याची अत्यंत एकरूप अवस्था असते व तरंग उठल्यावर, दोन तरंगांचे मध्ये पाण्याची ती अवस्था असते. तरंगाकडे पाहणारा जो पुरुष असतो त्याचे तरंगाच्या संधीतील पाण्याच्या तरंगरहित अवस्थेकडे लक्ष नसते; पण तरंगाकडे दृष्टी न देणारा पुरुष मात्र तरंगाच्या संधीतील पाणी कसे निस्तरंग आहे, हे जाणू शकतो.

त्याप्रमाणे इंद्रियांच्या ओढीप्रमाणे, त्यांच्याबरोबर स्वैराचाराने धावणाऱ्या पुरुषाला आपल्या निर्विकल्प स्वरूपाचा विसर पडतो. कारण त्याचे आत्मस्वरूपाचे





ठिकाणी मीपण इंद्रियांवर बसले जाते आणि इंद्रियसंधीत जरी तसे त्याचे निर्विकल्प स्वरूप असते तरी इंद्रियावर आरूढ झाल्यामुळे, त्याचे तिकडे लक्ष नसते. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, बाबा इंद्रियांवर मीपणा आरूढ होऊ देऊन तू त्यांच्या संधीत लपू नकोस, म्हणजे आत्मस्वरूपाला विसरू नकोस.

**तीर्थी व्रतीं भाव धरी रे करुणा ।**

**शांति दया पाहुणा हरि करी ॥५॥**

तीर्थे, व्रते यांचे ठिकाणी, श्रीहरीची अद्वैतसत्ता पाहून व त्यांचे ठिकाणी श्रद्धा ठेव व करुणा, शांती, दया हे गुण, श्रीहरीची अद्वैतसत्ता जाणून व त्याचे नामस्मरण करून प्राप्त करून घे; व श्रीहरीला या गुणांचा पाहुणा कर. ज्याप्रमाणे प्रेमाने आदरसत्कार केला असता पाहुणा अत्यंत प्रसन्नचित्त होतो, त्याप्रमाणे हरिनामस्मरणाने ज्यांनी आपल्या अंतःकरणात दया, क्षमा, शांती हे सद्‌गुण सांठवले व या गुणांनी श्रीहरीचा आदर केला, त्याला श्रीहरीही प्रसन्न होतो. मागे तीर्थव्रतादिकांचा जो माउलींनी निषेध केला तो अर्थात्‌च श्रीहरीची अद्वैतसत्ता न जाणता व नामस्मरणावर श्रद्धा नसून केलेल्या तीर्थव्रतांचा होय'' हे स्पष्ट आहे व ते केव्हाही विसरता कामा नये.

**ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान ।**

**समाधि संजीवन हरिपाठ ॥६॥**

***अखंड नामस्मरण : जीवंत समाधि***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, श्रीनिवृत्तिनाथांनी दिलेले सगुण श्रीहरीच्या नामरूपाचे माहात्म्यज्ञानच मला अत्यंत प्रमाण आहे व तेथेच माझा पूर्ण विश्वास आहे. भगवंतानी ''त्रैगुण्यविषया वेदा'' (गीता २-४५) असे स्वमुखाने सांगितले आहे. भगवान् स्वतः त्रिगुणातीत आहे. या त्रिगुणातीत भगवंताची प्राप्ती, त्रिगुणात्मक वेदातील ज्ञानाने होणे शक्य नाही. त्रिगुणातीत भगवंताच्या प्राप्तीकरिता, जीवच त्रिगुणातीत झाला पाहिजे, आणि जीवाला त्रिगुणातीत होण्याचाा मार्ग

''मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते'' (गी.१४-२६) श्रीहरीची अद्वैतसत्ता जाणून त्याची नामस्मरणादी भक्ती करणे हा भगवंतानेच मार्ग सांगितला आहे. सगुण श्रीहरीची अद्वैतसत्ता जाणून नामस्मरणादी प्रेमरूप भक्ती करणे हा मार्ग व हे ज्ञान श्रीनिवृत्तिनाथांनी मला दिले. याच मार्गाने मी गुणातीत होऊन गुणातीत

श्रीहरीस्वरूप झालो. म्हणून या ज्ञानावाचून मला दुसरे मार्ग व ज्ञान प्रमाण वाटत नाहीत. त्रिगुणात्मक संसाराचे व संसारप्राप्तीकारक कर्ममार्गाचे प्रतिपादन करणारा वेदातील कर्मकांडाचा भाग व लक्षणेने जीवशिवांचे ऐक्य सांगणारा उपनिषद्‌भाग, यापेक्षा शक्तिवृत्तीने श्रीहरीची प्राप्ती करून देणारे नाम व त्याचे माहात्म्य ज्ञान, हेच श्रेष्ठ होय. सर्वत्र एका श्रीहरीचीच अद्वैतसत्ता असल्यामुळे व दुसरे काहीच नसल्यामुळे एका श्रीहरीवाचून व त्याच्याशी अत्यंत ऐक्याने राहणारे नाम यावाचून दुसरे काही सत्य नाही. म्हणून हरिनामावाचून जीवकल्पित अज्ञान व तज्ञन्य कर्मादिकांचे वर्णन करणारी वेदादी शास्त्रे खोट्या वस्तूचे वर्णन करणारी आहेत, म्हणून खोटी होत.

***भगवन्नामस्मरण : समाधीचे संजीवन***

पुनः भगवन्नामस्मरण समाधीचे संजीवन होय म्हणजे जीवंत समाधीच होय. नामधारकाची शेवटी जीवंतपणीच अखंड समाधिस्थिति होते. म्हणजे

''जीवंतपणीच त्यांना विदेहमुक्तीची अवस्था प्राप्त होते.''

समाधी व विदेहीमुक्ती या दोन्ही स्थिती सारख्या आहेत. दोन्ही अवस्थेत जाणीव न स्फुरता केवळ आनंदाकारच चित्त असते, या आनंदातून कधीही व्युत्थान न होणे हीच विदेहमुक्ती व हीच नामधारकाला जीवंतपणी लाभते असा अर्थ.

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

।।श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ।।श्रीपांडुरंगनाथमाउलीसमर्थ।।

---

**पाठक्रम : २८** **अर्थक्रम : २८**

---

**अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस । रचिले विश्वासें ज्ञानदेवें ॥१॥**

**नित्य पाठ करी इंद्रायणी तीरीं । होय अधिकारी सर्वथा तो ॥२॥**

**असावे स्वस्थ चित्त एकाग्री मन । उल्हासें करून स्मरण जीवीं ॥३॥**

**अंतकाळी तैसा संकटाचे वेळी । हरि तया सांभाळी अंतर्बाह्य ॥४॥**

**संत सज्ञनांनी घेतली प्रचीती । आळसी मंदमती केंवि तरे ॥५॥**



**(१२०)** **श्रीगुरु निवृत्ति वचन प्रेमळ । तोषला तात्काळ ज्ञानदेव ॥६॥**

*

प्रतिज्ञा :- नामाची गुरुगम्यता. गुरुमुखापासून नामप्राप्तीचा संतोष इतरत्र नाही. हरिपाठ साधन करण्याचा क्रम. श्रीगुरुप्रसन्नता, गुरुमुखापासून नामप्राप्ती झाली असता प्रेम एकदम उत्पन्न होते. आळंदीस राहण्याची आज्ञा. माझा उपदेश ग्रहण करणारास हरी निश्चयाने रक्षील असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे म्हणणे. अंतर प्रेमरूप व बाहेर सगुणरूप. हरीची स्थापकता. हरिपाठाची फलश्रुती. अभंगांची संख्या. स्वतःचा विश्वास. शिष्याला उद्देशून आळशी होऊं नको म्हणण्याची प्रवृत्ती म्हणून प्रश्न. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा संतोष. श्रीगुरु निवृत्तिनाथ यांची कीर्ती.

*

सरळ अर्थ - हरिपाठाचे अभंग अठ्ठावीस आहेत व श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, ते मी विश्वासाने रचिले आहेत.

आळंदीला राहून इंद्रायणीचे काठी जो कोणी नित्य पाठ करील तो सर्वथा अधिकारी होईल.

स्वस्थचित्त करून व एकाग्र मन करून अत्यंत उल्हासवृत्तीने अंतःकरणात नामस्मरण करावे. संकटकाळी व मरणाचे वेळी श्रीहरी त्याचे आतबाहेर संरक्षण करील. संतांनी माझ्या म्हणण्याचा अनुभव घेतला आहे. शिष्याने, सांगितल्याप्रमाणे नामस्मरण करण्याला आळस करू नये व त्याने आळस सोडून हरिनामस्मरण करावे हे शिष्याचे मनावर बिंबवण्याकरिता श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, नामस्मरणाचे ठिकाणी आळस करून नामस्मरण न कराणारा मंदमती कसा बरे तरेल? नामस्मरणासारखी सोपी गोष्टही जो आळसाने करू शकत नाही त्या अभागी आळशी पुरुषाचा तरणोपायच नाही असा भाव.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, श्रीगुरुनिवृत्तिनाथांनी माझ्या मुखावाटे आपल्या नामाची महती किंवा कीर्ती आणि हरिपाठाची फलश्रुति जी वदविली ती ऐकून मी फार संतुष्ट झालो मला फार समाधान वाटले. श्रीसद्‌गुरुनिवृत्तिनाथांची कीर्ती अशी थोर आहे.

**अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस ।**

**रचिले विश्वासें ज्ञानदेवें ॥१॥**

***अभंग संख्या २८***

विवरण - श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, मी ज्ञानदेवाने दृढ विश्वासाने

हे हरिपाठाचे अभंग रचले व त्यांची संख्या अठ्ठावीस आहे. वारकरी संप्रदायांत काही ठिकाणी यापैकी सत्तावीस अभंग म्हणण्याचा परिपाठ आहे. काही वारकरी हा अठ्ठाविसावा अभंग न म्हणता सत्तावीस अभंग म्हणून अठ्ठाविसावा अभंग ''नामसंकीर्तन साधन पै सोपे'' हा तुकाराममहाराजांचा अभंग म्हणतात.

हरिपाठाची अभंग संख्या अठ्ठावीस आहे, हे स्वतः माउलीने सांगितले असताना, हा अठ्ठाविसावा अभंग कां गाळतात व श्रीतुकाराममहाराजांचा अभंग त्याऐवजी कां म्हणतात व ही पद्धत श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वेळेपासून होती की मध्ये कोणी सुरू केली व मध्ये सुरू झाली असल्यास कोणी सुरू केली याचा उलगडा होत नाही.आम्ही मात्र श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनाप्रमाणे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी हरिपाठाचे अठ्ठावीस अभंग रचिले आहेत असेच विश्वास पूर्ण मानतो आणि अठ्ठावीस अभंगांचा पाठ करितो.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''आधी केले मग सांगितलें'' या वचनाप्रमाणे निवृत्तिनाथांच्या मुखाने हरिनामाचा उपदेश ग्रहण केला व श्रीगुरुमुखाने नामग्रहण केले असता जे पूर्ण समाधान किंवा अनिर्वचनीय जो आनंद होतो तो इतरत्र नाही. हे प्रत्यक्ष सतत अनुभवून गुरुगम्य नामाचे अनुभूत माहात्म्याविषयी माझे मनांत जो कायमचा दृढ विश्वास उत्पन्न झाला त्या विश्वासाने प्रेरित होऊन लोकोद्धारार्थ मी भगवन्नामाची यथार्थ वस्तुस्थिती व अजरामर कीर्ती गाणारे हे अठ्ठावीस अभंग रचिले आहेत.

**नित्य पाठ करी इंद्रायणीं तीरीं ।**

**होय अधिकारी सर्वथा तो ॥२॥**

***हरिपाठ साधन.***

***आळंदीस राहण्याची आज्ञा.***

***प्रेमप्राप्ति ही फलश्रुती.***

या चरणांत हरिपाठाचे साधन सांगतात.आळंदीला राहून इंद्रायणीचे तीरी बसून नित्य हरिपाठ करावे. अशा रीतीने नित्य नियमाने हरिपाठ केल्यास श्रीगुरु प्रसन्न होऊन स्वमुखाने हरिनामाचा उपदेश करतील.हरिपाठाने श्रीगुरुकृपेला पात्र होऊन श्रीगुरुमुखाने नाम ग्रहण झाले की, त्या नामस्मरणाने एकदम प्रेम उत्पन्न होते. इंद्रायणीचे तीरी हरिपाठ करण्याची आज्ञा म्हणजेच आळंदीस राहण्याची





आज्ञा होय. अशा रीतीने हरिपाठ केल्यास पाठ करणारा भक्तिप्रेमाचा पूर्ण अधिकारी होतो.

**असावें स्वस्थ चित्त एकाग्री मन ।**

**उल्हासें करून स्मरण जीवीं ॥३॥**

***प्रेम प्राप्तीचें चिन्ह***

श्रीगुरुमुखाने भगवंताचे नाम प्राप्त झाल्यावर त्या नामस्मरणाने भगवत्प्रेम प्राप्त होते.याचे हेच चिन्ह की, नामधारकाचे चित्तातून विषयांकडील ओढ नाहीशी होऊन नामस्मरणाचे ठिकाणी चित्त संपूर्ण स्थिर होते व एकाग्रचित्ताने नामस्मरण होत जाऊन उत्तरोत्तर नामस्मरणांत उल्हास वाढत जातो.कंटाळा कधीच येत नाही. हेच खरे प्रेम होय.

**अंतकाळीं तैसा संकटाचे वेळीं ।**

**हरि तया सांभाळी अंतर्बाह्य ॥४॥**

***नामधारकास श्रीहरी निश्चयाने सर्वस्वी सांभाळतो***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, माझा नामस्मरण करण्याचा उपदेश ग्रहण करणाऱ्याला श्रीहरी निश्चयाने तारील. मरणसमयी योग्यांना व ज्ञान्यांना आपापला अभ्यास सांभाळून राहावे लागते, नाहीतर पुनरावृत्ती चुकत नाही. पण हरिभक्तांचे तसे नाही.

''तयां देहावसान जैं पावे । तैं तिहीं मातें स्मरावें । मग म्यां जरी न पावावें। तरी उपास्ति ते कायसी ॥ पै रंक एक आडलेपणें । काकुळती धांव गा धांव म्हणे। तरी तयाचिये ग्लानी धावणें । काय न घडे मज ॥ आणि भक्तांहि तेचि दशा । तरी भक्तीचा सोस कायसा । म्हणुनि हा ध्वनि ऐसा । न वाखाणावा ॥ तिहीं जे वेळीं मी स्मरावा । ते वेळीं स्मरला कीं पावावा । तो आभारहि जीवां । साहवेचि ना ॥ तें ऋणपण देखोनि आंगी । मी आपुलियाची उत्तीर्णत्वालागीं । भक्तांचिया तनुत्यागीं । परिचर्या करी ॥ म्हणोनि देहांतींचे सांकडें । माझिया काहीच न पडे। मी आपुलियातें आपुलीकडे । सुखेंची आणी'' (ज्ञा.अ.८ ओ.१२७-१३४)

श्रीज्ञानेश्वरमहाराज प्रतिज्ञापूर्वक म्हणतात की, नामधारकाने जे भगवंताचे नामस्मरण करून भगवंतावर ऋण करून ठेविले असते ते फेडण्याकरिता, त्याच्या

मरणकाळी तो भगवंताला विसरणार नाही, त्याला भगवंताचे स्मरण राहून नामधारक सुखाने भगवंताला प्राप्त होईल, अशी सर्व व्यवस्था स्वतः भगवानच करितात. म्हणून नामधारकाला - मरणसमयी कसे होईल? भगवंताची स्मृती राहिली नाही तर आपली गती कशी होईल? अशी काळजी करण्याचे मुळीच तिळमात्र कारण नाही.

त्याचप्रमाणे नामधारक जीवंत आहे तोपर्यंत प्रारब्धाने येणाऱ्या विपत्तीने तो गांगरून जाऊन तो भगवंताचे नामस्मरण सोडून देईल किंवा भगवत्प्रेमापासून त्याचे चित्त ढळेल असेही भगवान् होऊ देत नाही.

''तुका म्हणे तुझा न पडो विसर। दुःखाचे डोंगर आले तरी''

संकट निवारण करण्याची भगवंताला प्रार्थना करणे म्हणजे भगवंतापेक्षा या जड देहावर अधिक प्रेम करणे होय व त्यामुळे देहबुद्धीच दृढ होते आणि जगन्मिथ्यात्वही बाणत नाही, असे भक्ताला वाटते.म्हणूनच भक्त संकट निवारणाचा भार भगवंतावर चुकूनसुद्धा टाकीत नाही.उलट संकटसमयी भगवंताकडे आणखी जास्त लक्ष लागते म्हणून भक्त दुःखाचीच मागणी करितात, हाच तुकाराममहाराजांच्या वचनाचा भावार्थ आहे.

तरीपण दुःख प्राप्त झाले असता ते दुःख भगवत्प्रेमाने मोठ्या आनंदाने सहजासहजी भक्ताला सहन करता येईल असे आपले प्रेम मात्र परमात्मा त्यांना देतो व त्यांस सर्वतोपरी सतत साह्य करीत असतो म्हणजे श्रीहरी भक्तांच्या हृदयांत प्रेमरूपाने व बाहेर सगुण रूपाने राहतो व भक्तांचा सांभाळ करितो. त्याला दुःख होऊ देत नाही. याला पांडवाचे उदाहरण आहे.

## संतसज्जनांनी घेतली प्रचीति ।
## आळसी मंदमति केंवि तरे ॥५॥

***प्रश्नाच्या मिषाने - आळशी होऊ नये, ही सूचना***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, नाममाहात्म्याची प्रचीती आजपर्यंत हजारो संतमहंतांनी घेतली आहे.शिष्याने आळशी होऊ नये व प्रयत्न करण्यास कसूर करू नये, म्हणून प्रश्न विचारतात की, आळशी मंदमती म्हणजे सांगितल्याप्रमाणे नामसाधन करण्यात कसूर करणारा तरून जाईल का? अर्थात तरून जाणार नाही हे त्याचे सरळ उत्तर होय.परमार्थमार्गात साधकाला काहीच करावयाचे नसते,





केवळ श्रीगुरूच्या वरदहस्ताने शिष्य कृतकृत्य होतो असे नाही.भगवान् वसिष्ठांनी रामचंद्राला उपदेश करताना सांगितले

''उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्रपालनम् ।
ज्ञप्तेस्तु कारणं साक्षात् शिष्यप्रज्ञेव केवला ॥

याचा अर्थ माझ्या श्रीसद्गुरुनाथांनी दिला आहे.-

''रघुराया उपदेश तत्त्वतां । दाखवी नानापरी व्यवस्था । परी शिष्याचा प्रयत्न नसता । होय वृथा सकळही ॥ जरी शिष्य प्रयत्नावीण । गुरूपदेशें होईल कल्याण । तरी श्वान आणि वृक्षपाषाण । जावेत उद्धरोन क्षणमात्रें ॥ मग वेदीं मनुष्य जन्म प्रशंसा । ही व्यर्थ कां केली दंत मीमांसा । एवढा आयता मोक्ष ठसा। असता हातीं ॥ जरी मस्तकीं हस्त ठेवून । मुक्त होऊं शकेल जाण । तरीं ''ज्ञानदेव तु कैवल्यम्'' हे श्रुतिवचन । पावलें मरण सर्वस्वी ॥ उपदेशविनाहि कृपें करून। जरी होतें म्हणावें ज्ञान । तरी महावाक्यांचे कारण । नाहींच जाण सर्वथा ॥ आतां श्रवण केलियावीण निश्चिती । महावाक्येंहि येतील चित्ती । हे मनसाहि कल्पितां नये स्थिति । मग घडेल ती रीति । आम्ही नेणों ॥ म्हणोनि गा दशरथनंदना। गुरूपदेश व्यवस्थापालना । तरी व्यवस्थाहि जाणा। नानापरी ॥ श्रवणीं श्रुत्यविरोध व्यवस्था । मननी साधकयुक्ति व्यवस्था । निदिध्यासनी वृत्तिव्यवस्था । अथवा रहस्यव्यवस्था ऐकान्तिकी ॥ प्रेमभक्ति संप्रदाय व्यवस्था । एवमादिक तत्त्वतां। या सर्वांवरी सत्ता । श्रीगुरूचीं ॥ परी बोधानुसार ब्रह्म अनुभवणें । हें शिष्य अनुभवावीण न होणें । ऐसें स्पष्ट बोलणें । वसिष्ठांचें ॥'' योगवासिष्ठ

या ओव्यांचाही सारांश एका ओवीत त्यांनी सांगितला आहे.ते म्हणतात, ''सद्गुरूपदेश स्थिति । यत्ननिश्चय आपल्या हातीं । ईश्वर दूर करी विघ्नपंक्ति। तै जीवन्मुक्ति सांपडे ॥'' गुरुंनी सांगितल्याप्रमाणे प्रयत्न करणे एवढे शिष्याने केले पाहिजे.

## श्रीगुरु निवृत्ति वचन प्रेमळ ।
## तोषला तात्काळ ज्ञानदेव ॥६॥

***श्रीज्ञानेश्वर महाराजांचा संतोष***

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, श्रीगुरु निवृत्तिनाथींनी अत्यंत प्रेमळ वाणीने हे जे हरिनाममाहात्म्य व त्याची फलश्रुती माझ्या मुखाने सांगितली ती ऐकून मी पूर्ण निःशंक झालो व अत्यंत सुखसमाधान प्राप्त होऊन अखंड नामस्मरणात

पूर्णविराम पावलो.

हा हरिपाठ म्हणजे श्रीगुरुनिवृत्तिनाथांचा पूर्ण कृपाप्रसाद व त्यांची अजरामर कीर्ती होय.

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहराजार्पणमस्तु ॥
॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥
०००

## ॥ अभंग २९ ॥

कोणाचे हे घर देह हा कोणाचा । आत्माराम त्याचा तोचि जाणे ॥१॥
मी तूं हा विचार विवेके शोधावा । गोविंदा माधवा याच देही ॥२॥
ध्येय ध्याता ध्यान त्रिपुटी वेगळा । सहस्रदळी उगवला सूर्य जैसा ॥३॥
ज्ञानदेव म्हणे नयनाची ज्योती । या नांवेरूपें ती तुम्ही जाणा ॥४॥

संत श्रीगुलाबरावमहाराजांच्या श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदायात हा अभंग शेवटी म्हटला जातो. ०००

## उपसंहार

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

***नामस्मरण हा अनादि वैदिक धर्म***

भगवंताच्या नामाचा महिमा अनादि व अगाध आहे, असा श्रुति स्मृतिपुराणे यातून तो वर्णिला आहे.तेव्हा तो काही आधुनिक विद्वान् म्हणतात त्याप्रमाणे नंतर प्रवृत्त झालेला धर्म नव्हे.

१-''मर्ता अमर्तस्य ते भूरि नाम मनामहे । विप्रासो जात वेदसः॥'' व

२-''अस्य जानन्तो नाम चिद्विवक्तनमहस्ते विष्णो सुमतिं भजामहे ॥''

असे दोन नाममाहात्म्य सांगणारे मंत्र ऋग्वेदात दिलेले आहेत व त्यांचा अर्थ, सर्व यज्ञयागादि साधनांपेक्षा नामसाधन श्रेष्ठ आहे असा श्रीधरस्वामींनी भागवतात अजामिळाच्या आख्यानावर टीका करिताना व श्रीशंकराचार्यांनी विष्णुसहस्रनामावर भाष्य करिताना दिला आहे.वेदाने नाममाहात्म्य सांगितले म्हणून नामस्मरण हा वैदिक धर्म आहे.

पूर्वी कृतयुगामध्येच सृष्टीच्या आरंभी हा नामस्मरण धर्म प्रगट झाला.तदनंतर यज्ञयागादि धर्म हे त्रेतायुगामध्ये मागाहून प्रगट झाले असे भारत, भागवत व स्मृति इत्यादि ग्रंथांत सांगितले आहे.

''अपि च संराधने प्रत्यक्षानुमानाभ्याम्'' हे ब्रह्मसूत्र आहे व परमात्मा अव्यक्त असला तरी तो संराधनेने साक्षात्कृत होतो हे श्रुतिस्मृतीवरून दिसून येते, असा त्याचा अर्थ आहे.

(१२३)



संराधन म्हणजे काय हे सांगताना आचार्य आपल्या भाष्यांत म्हणतात ''भक्तिध्यानप्रणिधानाद्यनुष्ठ्यम्'' भक्ती म्हणजे सगुणाचे प्रेम, त्याचे ध्यान व त्याच्या नामाचा जप याला संराधन म्हणतात.अर्थात् आचार्यांच्या मते नामस्मरणादि भक्तिमार्ग हा वैदिक व अनादि आहे.

''कृते ध्यायते विष्णुम्'' म्हणजे सृष्टीच्या आरंभी भगवंताचे नामस्मरण व त्याच्याद्वारा भगवंताचे ध्यान करणे हाच धर्म होता असा या चरणाचा अर्थ आहे.ज्याप्रमाणे कोणत्याहि औषधीने गुण येईनासा झाला तर अशा वेळी एक अमृतच उपयोगी पडते त्याप्रमाणे ह्या घोर कलियुगांत कोणतेही यथासांग कर्म घडत नाही व लोकांचा वैदिकधर्माचरणाचा अधिकारही तितका राहिला नाही, शिवाय पापाचरणाचा तर जिकडे तिकडे कळस झाला असताना कलियुगांतील लोकांचा उद्धार व्हावा ह्या हेतूने या नामस्मरणधर्माला, त्याच्या अगाध माहात्म्याला पाहून, कलियुगांत प्राधान्य देण्यात आले आहे.श्रुति, हरितादि स्मृति, सर्व पुराणे यांतून नाममहिमा परोपरीने गायिला आहे.वेद, पुराणे, स्मृति, भारत, भागवतादि ग्रंथांतून गायिलेल्या नाममहिम्याकडे लक्ष देऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजादि सर्व संतांनी नामस्मरणाचा ध्वज उभारला व कलिजनांना तरून जाण्याला सर्वसुलभ अचूक मार्गदर्शन केले.

श्रीज्ञानेश्वरमाउलीने रचलेला ''हरिपाठ'' हा लहानच पण सूत्रप्राय ग्रंथ नाममहिमा कसा अगाध आहे व कां आहे ? याचे थोडक्यात विवरण करणारा आहे.नित्यकर्मात ब्राह्मणास जशी संध्या तसेच वारकरी संप्रदायांत 'हरिपाठ' ग्रंथाचे पठन नित्यकर्म समजले जाते, व आबालवृद्ध, सुशिक्षितअशिक्षित, ब्राह्मणापासून अन्त्यजापर्यंत लक्षावधि भाविकजन या ग्रंथाचे नित्यनियमपूर्वक पठन करतात.

ज्याप्रमाणे बालपणांत पाठ केलेल्या अष्टाध्यायी सूत्रग्रंथांत, पुढे सूत्रार्थ समजून घेऊन व्याकरण शास्त्रांत प्रवीण पंडित होण्यापुरते ज्ञान साठविलेले आहे, त्याप्रमाणेच ह्या लहानशा हरिपाठ ग्रंथांत केवळ नामस्मरणानेच पुरुष ज्ञानी भक्त होऊन जीवन्मुक्त होईल इतके सगुण परमेश्वराच्या स्वरूपाचे ज्ञानभांडार श्रीज्ञानेश्वरमाउलीने संग्रहीत केलेले आहे.

अत्यंत अडाणी, खेडवळ येवढेच नव्हे तर अक्षरशत्रू देखील हरिपाठ ग्रंथाचे पठन करीत असला तरी तशा अज्ञानी जनांना ज्ञानी व मुक्त होण्याकरिताच तो ग्रंथ निर्माण झाला असल्यामुळे हरिपाठाचे पाठ करता करता जसजशी चित्तशुद्धी होत जाईल तसे त्याला परमेश्वराच्या सगुण स्वरूपाचे निरुपाधिकत्व कळावे व भगवन्नामावर त्याचे स्वाभाविक प्रेम जडावे या उद्देशाने माउलीने हरिपाठ रचला हे त्यांतील अभंगांवरून सिद्ध होते.

नामसाधन अत्यंत सोपे

नामसाधन हे अत्यंत सोपे आहे. इतर योगयागादिसाधनांत जसे शरीराला कष्ट

पडतात तसे नामस्मरणामध्ये कोणतेच कष्ट पडत नाहीत.नुसते वाणीने नामोच्चार करणे, एवढे केले की पुरे आहे.नामस्मरणाकरिता निराळा स्वतंत्र वेळ काढावयाला नको.कोणतेही लौकिक व्यवहार करीत असताना देखील नामस्मरण होऊ शकते.संसारात जेवढे आपण रात्रंदिवस कष्ट करतो तितकेच कष्ट जर नामस्मरणांत केले तर सर्वच साधले.

नामाचे सामर्थ्य : चारही पुरुषार्थप्राप्ती

जो दुसऱ्याच्या साह्यावाचून एकटाच सर्व प्राप्त करून देऊ शकतो व ज्याच्या साह्यावाचून दुसरे काहीच करू शकत नाहीत त्याला समर्थ म्हणतात. हरिनाम हे असेच सर्वसमर्थ आहे.कोणाचेही साह्य न घेता एकटे हरिनाम चारही पुरुषार्थ प्राप्त करून देऊ शकते व योगयाग इत्यादि जी साधने आहेत त्यांना मात्र हरिनामाच्या साह्यावाचून स्वतंत्रपणे फळ देता येत नाही.

हरिनामाच्या साह्यावाचून किंवा भक्तिवाचून योग सिद्ध होत नाही. सगुणाच्या नामस्मरणादि भक्तिवाचून केलेला निर्गुण योग अत्यंत दुःखदायक आहे हे श्रीज्ञानेश्वरमाउलीने ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायांत सिद्ध केले आहे.यज्ञयागादिकांत कर्म पूर्ण होण्याकरिता ''यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपोयज्ञक्रियादिषु। न्यूनं संपूर्णताम् याति ...'' असे म्हणून शेवटी नामस्मरण करतातच.नामस्मरणाने ''असात्त्विकं विगुणमपि... सगुणं भवति'' असात्विक कर्म सात्विक कर्म होते व व्यंग कर्म ते पूर्ण होते असे श्रीशंकराचार्य गीताभाष्यांत म्हणतात.श्रीज्ञानेश्वरमाउली म्हणते की, ''प्रयोजिला करी साधु। कर्मांते यया'' कर्मात नामाचा प्रयोग केला असता केलेले कर्म सत्कर्म होते.

* ज्ञानेदवा पाठ नारायण नाम । पाविजें उत्तम निजस्थान ।।
* ज्ञानेदवा चित्तीं हरिपाठ नेमा । मागिलिया जन्मा मुक्त झालो ।।
* वैकुंठभुवनी घर केले ।।
* समाधि संजीवन हरिपाठ ।।
* येणें दश दिशा आत्माराम ।।
* तुटेल धरणें प्रपंचा**चे ।।**

इत्यादि हरिपाठांतील अभंगांतच माउलीने एका नामानेच पूर्ण ब्रह्मस्थिती कशी बाणते हे स्वानुभवाने दाखविले आहे. पुनः

*नामधारकाच्या कुळाला यम स्पर्श करीत नाही,

*नामधारकाचे आईबापही वैकुंठात जातात.*नामधारक थोर भाग्यवान् होय.

*नामधारकाच्या पुण्याची गणतीच करता येत नाही;

इत्यादी अभंगात नामधारकाच्या योगाने त्याच्या कुळाचा उद्धार होतो असे माउलीने



सांगितले आहे.

कोणी म्हणतील की,नामस्मरणानेच पूर्ण ब्रह्मस्थिती कशी बाणणे शक्य आहे? पण अशी शंका अनुभवी पुरुष घेणार नाही व अनुभव नसलेल्या पुरुषाने अनुभवी पुरुषांच्या बोलण्यावर विश्वास ठेवण्याऐवजी शंका घेणे परम आश्चर्य होय.आंधळ्याने डोळसाशी वाद घालण्यासारखेच होय.

श्रीज्ञानेश्वरमाउली म्हणते की परमेश्वरप्राप्तिकरिता नामस्मरणा बरोबर सगुण रूपाचे ध्यान घडले पाहिजे.सगुण भगवंताच्या ध्यानाने ''योगयाग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठीं'' योगयागादि क्रिया सर्व माया किंवा अज्ञान आहे असे कळून येते व हे कळल्याबरोबर माया नाहीशी होते.माया नाहीशी होणेच ब्रह्मप्राप्ति होय.

याप्रमाणे सगुण भगवंताच्या नामस्मरणाने व त्याच्याद्वारा घडणाऱ्या ध्यानाने सगुण भगवंताची प्राप्ति होते.ही सगुणाची प्राप्ति निर्गुणाच्या प्राप्तीहून गौण आहे असे नाही कारण परमेश्वराचे सगुण रामकृष्णादी स्वरूपही पूर्ण ब्रह्मच आहे असा ब्रह्मसूत्रांतील चवथ्या अध्यायाच्या चवथ्या पादांत (श्रीशंकराचार्यांनी) सिद्धान्तच प्रतिपादिला आहे.

नामाचे पापदाहकत्व

सगुण परमेश्वराच्या ध्यानांत जसे माया निरसन करून मुक्त करण्याचे सामर्थ्य आहे, त्याप्रमाणेच परमेश्वराच्या नामांत अनंत कोटी पाप जाळण्याचे सामर्थ्य आहे.एवढे ते अगाध प्रायश्चित्तरूप आहे. 'नामाने जळणार नाही असे पापच मनुष्य करू शकत नाही', अशी वचने आहेत.अर्थात् प्रायश्चित्ताने प्रायश्चित्त घेण्यापूर्वीचे केलेले पाप नाहीसे होते.हरिनामही प्रायश्चित असल्यामुळे हरिनाम घेण्यापूर्वीची संपूर्ण संचित पापे जळतात.नाम घेऊन पुनः नंतर पाप केल्यास तें नाम घेईपर्यंत तसेच राहील व पाप केल्यानंतर नाम घेण्यांतच आले नाही तर ते पाप भोगावे लागते.नामाचा पापदाहक महिमा एवढा थोर आहे की, एकदा जरी नाम घेतले व त्या नामानंतर पाप करण्यात आलेच नाही म्हणजे अगदी मरतेवेळीच नाम घेतले गेले तर तो पुरुष तेवढ्या एक वेळच्या नामस्मरणाने देखील भगवंताचे ध्यान घडून वैकुंठाला जातो, असे वचन आहे.अजामिळ ब्राह्मणाने मरतेवेळी नारायण नामाचा उच्चार केला पण त्याला ध्यान पुत्राचे होते- परमेश्वराचे ध्यान नव्हते म्हणून तो परत आला, पण तेवढ्याच एका नामाने भगवंताचे ध्यान नसताही त्याच्या कृतपापांचा नाश होऊन तो यमपाशांतून सुटला.

नामस्मरणाचे माहात्म्य रोचक नाही

असे हे नामस्मरणाचे माहात्म्य रोचक म्हणजे अर्थवादरूप किंवा स्तुतिरूप नाही. नामस्मरणाचा महिमा अर्थवाद म्हणणे म्हणजे नामाचा अपराध होतो असे पद्मपुराणात म्हटले आहे.

अर्थवादं हरेर्नाम्नि संभावयति यो नरः।
स पापिष्ठो मनुष्याणां नरके पतति स्फुटम् ॥

हरिनामाचा महिमा अर्थवाद आहे असे म्हणणारा अत्यंत पापी होय व तो नरकात पडतो असे पद्मपुराणच म्हणते.

एखादे वाक्य अर्थवाद आहे असे नुसते म्हटल्याने अर्थवाद होत नाही.एखादे विधान अर्थवादरूप आहे, हे ठरविण्याची कसोटी आहे.अर्थवाद हा पूर्वमीमांसेतील पारिभाषिक शब्द आहे.''एखादे वाक्य रोचक आहे असे तेव्हाच म्हणता येते की, जेव्हा त्या वाक्यात स्वतंत्र काही करण्याला सांगितले नसून त्या वाक्यातील विधानाचे स्वतंत्र फळही सांगितलेले नाही.'' पण नामस्मरणाचे वेदपुराणादिकांतून विधान असून प्रत्यक्ष कर्मकांडातही कर्माचे आदि अंती ''यस्य स्मृत्या च नामोक्त्या'' इत्यादि श्लोकांनी नामस्मरण केले जाते व ''न्यूनं संपूर्णतां याति'' हे त्याचे फळही सांगितले आहे.

नामस्मरण न करणारा व नाममहिमा अर्थवाद म्हणणारा या दोघांनाही दोष सांगितला आहे तसेच, नाम घेणाराचे सर्व पाप नाहीसे होते असे नामस्मरणाचे फळही सांगितले आहे.म्हणून नामस्मरणाचा महिमा अर्थवाद म्हणता येत नाही.

कर्मकांडांतील प्रायश्चित्ते विश्वास ठेवला तरच पाप नाहीसे करितात.अविश्वास असला तर पाप नाहीसे करीत नाहीत म्हणून प्रायश्चित्ते वस्तुतंत्र नाहीत.परंतु नाम कसेही- श्रद्धा नसूनही- घेतले तरी पाप नाहीसे करिते.हे नामाचे वैशिष्ट्य वस्तुतंत्र होय.सारांश, नामाचा महिमा रोचक म्हणणाऱ्याला दोष घडतो व नाम घेणाऱ्याच्या पापांचा नाश होतो अशी दोन फळे सांगितली असल्यामुळे नाममाहात्म्य केव्हाही रोचक म्हणता येत नाही.

अर्थवादाचे प्रकार व नाममाहात्म्य

बरे, अर्थवादाचे जे प्रकार शास्त्रांतून सांगितले आहेत त्यापैकी एखादा प्रकार नाममाहात्म्याचे ठिकाणी आढळून आल्यास नाममहिमा अर्थवाद ठरविता आला असता, पण तसेही नाही.शास्त्रांतून अर्थवाद तीन प्रकारचा मानिला आहे.

एक अनुवाद, दुसरा गुणवाद व तिसरा भूतार्थवाद.

अनुवादरूप अर्थवाद

१ - ज्या वाक्यांत काही करावयास सांगितले नसून प्रत्यक्ष डोळ्यांनी जे पाहतो तेच शास्त्राने त्या वाक्याने सांगितले असेल तर तो अनुवादरूप अर्थवाद होतो.उदाहरणार्थ- ''अग्निर्हिमस्य भेषजम्'' हे श्रुतिवचन आहे व अग्नी हे थंडीचे औषध होय असा त्याचा अर्थ आहे; पण या वाक्यात काही करावयास सांगितले नाही व जे सांगितले ते श्रुतीने न सांगताही आपण अनुभवतो म्हणून ते वाक्य आपल्या अनुभवाचे रुतावक आहे.





गुणवादरूप अर्थवाद

२ - गुणवादरूप अर्थवाद असलेल्या वाक्यांतील विधान प्रत्यक्ष प्रमाणाचे विरोधी असते. जसे ''यजमानः प्रस्तरः'' हे श्रुतिवचन आहे.यजमान दगड आहे असा त्याचा अर्थ आहे पण या वाक्यातही काही करावयास सांगितले नाही व प्रत्यक्ष यजमानाला आपण दगडरूप पाहात नाही.

भूतार्थवाद

३ - तिसरा अर्थवाद भूतार्थवाद होय. ''आदित्यः पुरुषो भूत्वा कुंतिमुपजगामह'' हे भूतार्थवादाचे उदाहरण होय.आदित्य मनुष्यरूप धारण करून कुंतीकडे आला हा त्या वाक्याचा अर्थ आहे.या वाक्यातही काही करावयास सांगितले नाही, पण पूर्वीचा इतिहास दिला आहे.

वरील तीन अर्थवादांपैकी कोणत्याही अर्थवादाच्या कक्षेत नाममहिमा येत नाही.कारण हरिनाम व त्याचा जो शास्त्रांतून महिमा सांगितला आहे त्याचा संबंध आपल्याला प्रत्यक्ष दिसत नाही.पंचगव्य घेतल्याने पाप गेले हे प्रत्यक्ष दिसत नसते.शास्त्र म्हणते त्यावर विश्वास ठेवायचा एवढेच. नाममाहात्म्य अनुवादरूप अर्थवाद आहे किंवा गुणवादरूप अर्थवाद आहे हे ठरविण्याकरिता नाम व त्याचा वर्णिलेला महिमा यांचा संबंध प्रत्यक्ष दिसला पाहिजे व तो तर दिसत नाही म्हणून पहिल्या द

नाममहिम्याविषयी तिसरा अनुवाद मानिला तर तो इतिहासरूप असल्यामुळे व इतिहास म्हणून घडलेली सत्य गोष्ट होय, म्हणून नाममहिमा सत्यच मानावा लागतो. हे आम्ही अर्थवादाचे प्रकार लक्षात घेऊन विधान करीत आहोत.वास्तविक, नामस्मरणाचे विधान असल्यामुळे व नामाचे सर्व साधनांहून स्वतंत्र सामर्थ्य व स्वतंत्र फळही सांगितले असल्यामुळे नाममहिमा केव्हाही अर्थवाद सिद्ध होऊ शकत नाही.

संत वचनांत विरोध नाही.

***पापनाश व भगवत्प्राप्ति***

भाव असो किंवा नसो कसेही नाम घेतले तरी नामाने पाप नाहीसे होते, असा नामाचा सर्व संतांनी गौरव केला असून पुनः त्यांनीच इंद्रियाचे नियमन केले नाही तर नाम काय करील? असेही म्हटले आहे.नाममहिमा जर रोचक नाही तर या संतवचनांचा विरोध कसा नाहीसा होईल? अशी शंका कित्येक लोक घेतात.पण या वचनांची संगती अशी आहे की, नामस्मरणाची मुख्य दोन कार्ये आहेत.

(१) एक पापाचा नाश व (२) दुसरे भगवत्प्राप्ति.

पापाचा नाश कसेही नाम घेतले तरी होतो पण भगवत्प्राप्ति मात्र नामस्मरणाबरोबर भगवतांच्या रूपाचे ध्यान घडल्याशिवाय होतच नाही.पण हे कार्यही क्रमाक्रमाने नामस्मरणानेच होते.

एकाच जन्मांत नामस्मरणाने भगवत्प्राप्ति करून घेणे असल्यास इंद्रिये, मन व बुद्धी यांचे पूर्ण नियमन करून व कोणतेही पाप न होऊ देता व नामाचे अपराधही न करिता अविरत अविश्रांत नामस्मरण व त्याबरोबर भगवंताच्या सगुण रूपाचे ध्यान घडले पाहिजे.भगवंताच्या ध्यानाने इंद्रिये, मन व बुद्धी यांचे नियमन होते. सारांश, १) संतांची काही वाक्ये केवळ पापक्षयाच्या दृष्टीने आहेत तर २) काही वाक्ये भगवत्प्राप्तीच्या दृष्टीने आहेत म्हणून त्यांचा बिलकूल विरोध नाही.एकाच हेतूने जेव्हा दोन विरोधी वाक्ये असतात तेव्हा ती विरोधी मानली जातात, एऱ्हवी नाही.

नामाने अगाध पुण्य

नामस्मरणाने सर्व पापे नाहीशी होऊन अनंत पुण्याचा संचय होतो व ''बहुत सुकृताच्या जोडीने विठ्ठली आवडी'' उत्पन्न होते.एकदा देखील केलेल्या नामस्मरणाने होणाऱ्या पुण्याची, अनंत जन्मांत केलेल्या इतर पुण्यकर्माने झालेल्या पुण्यसंचयाशी तुलना करता येते. तेव्हा वारंवार नामस्मरण करीत राहिल्यास नामधारकाच्या पुण्याची गणनाच करणे होत नाही.असे नामस्मरणाचे अगाध पुण्य आहे व म्हणूनच नामसाधन सर्व साधनांपेक्षा अत्यंत श्रेष्ठ आहे असे ''यज्ञानां जपयज्ञोऽस्मि'' या गीतावाक्याने भगवंताने स्वमुखाने स्पष्ट सांगितले आहे. व भारतातही युधिष्ठिराने भीष्माला प्रश्न केला, की, ''को धर्मः सर्वधर्माणां भवतः परमो मतः'' सर्व धर्मात श्रेष्ठ धर्म कोणता ?

त्यावर भीष्म सांगतात, ''यद् भक्त्या पुंडरीकाक्षं स्तवैरर्चयेन्नरः सदा ।। अखंड प्रेमाने * भगवंताचे अविरत नामस्मरण करणे, *भगवंताची स्तुती करणे हा सर्व धर्मांत म्हणजे सर्व श्रौतस्मार्त धर्मांत परम श्रेष्ठ धर्म होय. कृतयुगामध्ये देखील केवळ नामस्मरणपूर्वक प्रेमभक्तीनेच कित्येक पुरुष भगवंताला प्राप्त झालेले आहेत.''काहींच न करोनी प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तालागीं सांभाळी'' (दासबोध)

शंकानिरसन :- अपहाय निजं कर्म कृष्ण कृष्णेति वादिनः। ते हरेर्द्वेषिनो मूढा धर्मार्थं जन्मयत् हरेः ।। इत्यादि वचने बहुवचनांचा विरोध असल्यामुळे क्षेपक व अप्रमाण आहेत. कृतयुगांत प्रल्हाद, अंबरीष, रुक्मांगद हे भक्त झालेत.त्रेतायुगांत बिभीषण, हनुमंत, अंगद, भरत इत्यादि भक्त झाले.द्वापारांत उद्धव, अर्जुन, अक्रूर, इत्यादि भक्त झाले.कलियुगांत तर श्रीज्ञानेश्वरमहाराज नाथतुकाराममहाराजादि भक्तमंडळी प्रसिद्धच आहे.

नामस्मरणाने परमसिद्धी

नामस्मरणाने भगवंताचे ध्यान घडत जाते व समाधि-संजीवन होते म्हणजे समाधी साधते.अणुरेणूंतही सर्वत्र श्रीहरी भरला आहे असा अनुभव येतो.मनात अखंड भगवंताचे नाव व बुद्धीत भगवंताचे रूप सांठविले गेले की हेच परमभक्तीचे स्वरूप होय.ही स्थिती परमसुखाची

(१२६)



व निर्विकल्प आहे.या स्थितीत जाणीव नेणीव काही राहात नाही.यालाच सहज ब्रह्मस्थिति म्हणतात.''तैसे आपलें नेणणें। फेडिजे कां जाणणें। तेंहि गिळूनी असणें। ऐसी जे दशा ।।९८२।। तया परतें कांहीं। निपजणें येथ नाहीं। म्हणूनि म्हणिपे पाही। परम सिद्धि।।९८३।।(अ.१८)ज्ञानेश्वरीत श्रीज्ञानेश्वरमाउलीने ह्या ओव्यांनी हीच परमसिद्धी सांगितली आहे.

सगुण परमात्मा निर्विकल्प परमसिद्धिरूपच

सर्व जाणीवनेणीवरहित होणे यालाच परमसिद्धी म्हणतात.हेच माउलीने या लहानशा ग्रंथात त्याच्या नामस्मरणरूप साधनासह सांगितले आहे व तेच ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, पासष्टी या ग्रंथांत निवेदन केले आहे.ही परमसिद्धी ज्या सगुण भगवंताच्या आश्रयाने मिळते तो सगुण परमात्माही स्वतः ''जाणीव नेणीव भगवंती नाही'' जाणीव नेणीवरहित निर्विकल्प परमसिद्धिरूपच आहे म्हणूनच त्याचा आश्रय करणाऱ्याला जाणीवनेणीवरहित अशी परमसिद्धिरूप अवस्था प्राप्त होते.भगवंताची सगुण रामकृष्णादि विग्रहरूपे वेदान्तविचाराने पूर्ण ब्रह्मस्वरूपच ठरतात व ती भक्तप्रेमानेच घेतली जातात म्हणून ती जाणीवनेणीव रहित असतात; कारण 'प्रेमात जाणीव मुरते' असा अनुभव आहे.

भगवंताच्या निर्गुणरूपाचे ठिकाणी सत्वगुण राहतो म्हणून तेही औपाधिक ठरते. म्हणूनच समर्थांनी तिला नाशिवंत ठरविले आहे.अनिर्वाच्य ब्रह्मदशा जी सांगितली आहे तीहि सगुणाच्या भक्तीनेच प्राप्त होते व ती अनिर्वाच्य दशा जाणीवनेणीवदशेहून निराळी नाही.एका दशेला ती दोन नावे आहेत.समर्थांनी जे सगुण नाशिवंत ठरविले आहे ते ''येर पांचभौतिक सगुण । नाशिवंत ।। (दशक६,समास२) पांचभौतिक सगुण होय हे त्यांनीच स्पष्ट केले आहे.सगुण रामकृष्णादि रूपे पांचभौतिक नाहीत हे वेदान्तानेच सिद्ध आहे म्हणून ती नाशिवंत नाहीत.म्हणूनच ज्ञानेश्वर माउलीने ''ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ। न करवे अर्थ उपनिषदां।।'' असे म्हटले आहे.

**माउलीचा आशीर्वाद**

नामस्मरणाने किंवा हरिपाठाने ही परमस्थिती कशी मिळवावी हे शेवटी माउलीने सांगितले आहे.

संसाराची आसक्ती सोडून व
इंद्रायणीच्या तीरावर बसून
स्वस्थ, उल्हासपूर्ण एकाग्र चित्ताने
जो हरिपाठाचे नित्य, विश्वासाने पाठ करील;
तो या परमसिद्धीचा अधिकारी होईल

असा श्रीज्ञानेश्वर माउलीने आशीर्वाद दिला आहे.

।। श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहराजार्पणमस्तु ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

# हरिपाठ रहस्य

(श्रीगुलाबरावमहाराजकृत हरिपाठाच्या प्रतिज्ञांसहित)







***************************

: विवरणकार :

श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी

**वेदान्तकेसरी नारायण पैकाजी अर्थात् श्रीबाबाजीमहाराज पंडित**

संस्करण १३ वे कलियुगाब्द : ५११०/ इ.सन २००९

।। प्रकाशक ।।

श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहिसाथ, अमरावती. साठी

**श्री.जयंतराव खटी,प्लॉट १८१,पदकमजा अपार्टमेंट,लक्ष्मीनगर, नागपूर**

मो.९४२१७०८२९८ / २२४३७८६

**रु. ५०/-**



## ।। ग्रंथोपलब्धि ।।

**श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ,**
दहीसाथ, अमरावती
०७२१-२६७६३०७

*

**श्रीज्ञानेश्वर संस्थान**
पाताळेश्वर मार्ग, महाल, नागपूर ४४०००२

*

**सु. श्री. फणसाळकर,** 'सिद्धान्त'अपार्टमेंट,बी- ३ सुयोग
मंगलकार्यालयामागे शनिवार, पुणे २९ टे. ०२०-.४४८०६४५

*

**श्रीरंग घटाटे,** 'गोकुळ' घटाटे ले आउट-९,
व्हीआयपी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर. ४४०००१
मो.९३७२५२९७७० / टेली.०७१२-२५३३९९७

*

**संत श्रीगुलाबरावमहाराज भक्तिधाम,**
चांदूरबाजार, जि. अमरावती.
टे.०७२२७-२४३१३१

*

**श्रीगुलाबरावमहाराज सर्वोदय ट्रस्ट**
आळंदी,, ता. खेड, जि. पुणे.
मो.९८२२४४०५९१.

**www.gulabraomaharaj.org**

# विषयानुक्रमणिका


**श्रीगुलाबरावमहाराजांचा परिचय, आलेख व १३५ ग्रंथांची सूचि**
**श्रीबाबाजीमहाराज पंडित**
**हरिपाठाचा अर्थक्रम**
**ग्रंथकाराचे दोन शब्द**

**१. देवाचिये द्वारी - १**
देव म्हणजे सगुण श्रीहरी- लक्षणा नको- सगुणाचे सगुणपण स्वरूपभूत- नामधारकास चारी मुक्तींची प्राप्ती- नाममहिमा- श्रीहरी साक्षात्काराचा उपाय- नामधारकास संन्यास नको- भागवताचे प्रामाण्य.

**२. चहूं वेदी जाण - ११**
अखंड हरिनामाकरिता अद्वैत सत्तेची जाणीव- अद्वैतसत्तेची परोक्ष जाणीव- अनंताला घ्यावे कसे ? श्रीहरीची लक्षणे- श्रीहरीच सर्वांचा मार्गदर्शक- विश्वाभासाचा आडवारा- श्रीहरी व जगत् यांचा संबंध- मंथन विचार- जीवस्वरूप विचार- जीव मुळात ईश्वरस्वरूप- दुसरी श्रीहरीची प्राप्ती- जगाच मिथ्यात्व- मायावादाचा उगम- व्यतिरेकान्वय : द्विविध ब्रह्मानुभव- नामस्मरणावाचून दुसरे काही नको- आक्षेप- सगुण निर्गुण ऐक्य- सगुणसाकार पांचभौतिक ही कल्पना- वास्तविक चिद्विलास- श्रीज्ञानेश्वरमहाराजादिकांचा अनुभव- माया उपाधीचे स्पष्टीकरण- भौतिक देहाची सामुग्री- सगुण श्रीहरी निर्विशेष- जीव सविकल्प श्रीहरी निर्विकल्प- जीवशिवात परमेश्वर- श्रीहरि व्याप्तीचा अनुभव- भक्ति मार्ग सोडून इतर मार्ग दुर्गम.

**३. त्रिगुण असार निर्गुण - ४४**
त्रिगुणात्मक सगुण व निर्गुण औपाधिकच-

**४. भावेविण भक्ति - ५५**
श्रीहरीच्या भक्तिवाचून सर्व व्यर्थ- मुक्तीचा विचार- इतर देवताफळ निषेध- श्रीहरीच्या साह्यावाचून प्रयत्न व्यर्थ- नामाने संसार निवृत्ती.

**५. योगयाग विधि - ६२**
इतर साधनांचा निषेध- भावाचून देव कळत नाही- गुरुवाचून संदेह जात नाही- गुह्य म्हणजे अनुभव क्रिया- सत्संगती हाच तरणोपाय- संतसंगतीचे प्रकार.

**६. साधुबोध झाला - ७१**
साधूचे लक्षण- हरि भक्तीचा लाभ स्वलोप- भक्तिभाग्य.

**७. पर्वताप्रमाणे पातक - ७८**
नाममहिमा व अभक्ताचा निषेध- अभक्त लक्षण व अभक्त ज्ञानाचा निषेध.

**८. संतांचे संगती - ८६**
भगवत्प्राप्ती करिता सत्संगतीचे महत्त्व- भक्तीने लययोगाची सहज सिद्धी- हरिनाम हेच जीवशिवाचे मूळ स्वरूप- सगुणाचे भक्तीने निःशेष द्वैनिवृत्ति- वैष्णवांची थोरवी व भक्तिरहित योगाचा निषेध.

**९. विष्णुविणे जप १०२**
विष्णुनामाचे श्रेष्ठत्व व इतर साधन निषेध- शिव विष्णु हे शुद्ध ब्रह्म- नामस्मरण व करणारा अभागी- गुरुवाचून ज्ञान निरुपयोगी- सगुण ध्यानाने प्रपंच निवृत्ती.

**१०. त्रिवेणीसंगमी- १०९**
नामस्मरण प्रमाण व इतर साधने अप्रमाण- हरीवाचून त्राता नाही- नाममहात्म्याला ऐतिह्य प्रामाण्य- नामधारकाचे कुळ पवित्र- श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात्कार.

**११. हरिज्ञारणी- ११३**
नाममहिमा- नामस्मरणाने नामधारक हरिरूप- नामस्मरणाने सर्व दुःखनिवृत्ती- श्रीहरीचे ठिकाणी वेदाचीही गती कुंठित- अंतःकरण निर्विकल्प करणारे स्वरूप निर्विकल्प- सद्दिदानंदाची अंशप्रतीती.

**१२. तीर्थव्रत नेम- १२५**
हरिनामाविषयी मानसिक प्रयत्न- इतर बाह्यसाधनांचा भक्तीत उपयोग- सद्‌गुरु गुणातीत- गुरुकृपेचे आभार.

**१३. समाधी हरीची- १३१**
हरिनामाने ऐक्य समाधी- बुद्धीचे थोरपण हरिरूपऐक्यफळ- इतर सिद्धीचा निषेध- भक्ताचे हरिरूपी समाधान

**१४. नित्य सत्य मित- १३५**
स्वोपदेश महिमा व नामधारकास कालनिषेध- नामधारकास दोषाची बाधा नाही- देवतांच्या हृदयी नामख्याती व नामधारकाची जीवनमुक्ती- नामाचे दशापराध-

नामधारकास आश्वासन.

**१५. एक नाम हरि- १४१**

वैराग्य व संसाराचे मिथ्यात्व-
समबुद्धीचे तात्पर्य व सगुण ध्यानाने शमदमाची सिद्धी-
जीवेश्वर भिन्न ठेवून नाम घेणाऱ्याचा निषेध-
अद्वैताचे अंतर महापुरुष जाणतो.

**१६. हरिनाम जप- १४८**

नामधारकाची दुर्लभता-
नामस्मरणात सर्व सिद्धीचा समन्वय-
नामाने सर्व साधन-सिद्धी-
नामस्मरणाने प्राप्त होणारी दशा.

**१७. हरि पाठ कीर्ती- १४५**

हरिपाठ कीर्तीचे फळ-
नामधारक अमर व गीतेचे प्रमाण-
नामधारकाचे संबंधी नातलग विष्णुस्वरूप-
नामाचे पथ्य-
दशापराध

**१८. हरिवंश पुराण- १६३**

पुराणाचा अंगिकार व नामास त्यांचे प्रामाण्य-
नामधाकास येथेच वैकुंठ-
आपल्या उपदेशाचे ठिकाणी चित्ताची स्थिरता करण्याची आज्ञा-
नामावाचून ध्यानाचा निषेध.

**१९. वेदशास्त्र प्रमाण- १६९**

प्रवृत्ती धर्म-निवृत्ती धर्म-
भागवत धर्म-
वेदशास्त्र प्रमाण-
नेमनिषेध-धम्र निषेध-
नामधारकाचे कुळास यम भितो.

**२०. नाम संकीर्तन- १८२**

नामसाधनाचा उपक्रम-
वैष्णव धर्म-
नाम माहात्म्य-
नामस्मरणात सर्व साधनांचा लय-
हरिस्मरण हा एकच नियम.

**२१. काळ वेळ नाम- १९२**

नामस्मरणास काळनियम निषेध नाही-
पशू आणि जड जीवांचाही उद्धार-
महात्म्य कळो, न कळो नाम घ्यावे-
नामधारकाच्या पूर्वजांस वैकुंठ प्राप्ती.

**२२. नित्य नेम नामी - १९७**

नामसाधनाची आज्ञा व
नामधारकाचा रक्षक हरी-
नामधारकाची जीवनमुक्ती-
हरिनाम विन्मुखास जीवंतपणी नरक व मरणानंतरही नरक-
हरिनाम आकाशापेक्षाही व्यापक.

**२३. सात पांच तीन- २०४**

ईश्वर कर्ता नाही-
सर्व शास्त्रात अधिष्ठानाची परोक्षता-
व नामात अपरोक्षता-
प्रणव जपापुरता योगियांचा अंगिकार-
संप्रदायाची इतिकर्तव्यता.

**२४. जप तप कर्म - २१०**

हरिप्रेमात सर्व कर्माचे तात्पर्य-
नामस्मरणावाचून वर्णाश्रमाचा निषेध-



**२४. जप तप कर्म - २१०**

हरिप्रेमात सर्व कर्माचे तात्पर्य-



नामस्मरणावाचून वर्णाश्रमाचा निषेध-
-प्रेमयुक्त नामस्करणाने वैराग्य व संसार-नामधारकाची वैकुंठात वस्ती.

**२५. जाणीव नेणीव- २१२**

संकेत दृष्टीचे स्वरूप व ज्ञान-
अज्ञान खंडण-
सगुण भगवंताचे निर्विकल्पत्व-
नाममहिमा अतर्क्य आहे-
उत्तर भक्तीचे स्वरूप-
व्यापक वैकुंठ.

**२६. एक तत्त्व नाम - २२०**

जाणून नामस्मरणाची विशेषता-
श्रीहरीचे दयाळुत्व-
कळवळून नामाचा उपदेश-
नामतत्त्व व इतर वृत्ती-
भक्तेतर जनांशी भाषण वर्ज्य व नित्य नामस्मरण,
माळ असो नसो.

**२७. सर्व सुख गोडी- २२४**

उपदेशाचे चुटके-
जगात कसे वागावे-
अखंड नामस्मरण जीवंत समाधी.

**२८. अभंग हरिपाठ- २३३**

अभंग संख्या-
हरिपाठ साधन,
आळंदी राहण्याची आज्ञा,
प्रेमप्राप्ती ही फलश्रुती-
प्रेमप्राप्तीचे चिन्ह-
नामधारकास श्रीहरी निश्चयाने सर्वस्वी सांभाळतो
प्रश्नाच्या मिषाने आळशी होऊ नये





ही सूचना-
श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा संतोष.

**उपसंहार - २३४**

नामस्मरण हा अनादी वैदिक धर्म-
नामसाधन अत्यंत सोपे-
नामाचे सामर्थ्य-
चारही पुरुषार्थ प्राप्ती नामाचे-
पाप दाहकत्व-
नामस्मरणाचे माहात्म्य रोचक नाही-
अर्थवादाचे प्रकार व नाममाहात्म्य-
संतवचनांत विरोध नाही-
नामाचे अगाध पुण्य-
नामस्मरणाने परमसिद्धी-
सगुण परमात्मा निर्विकल्प परमसिद्धिरूपच-
माउलीचा आशीर्वाद.

# मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज : परिचय

*इ.स.१८८१ ते १९१५*

श्रीगुलाबरावमहाराज माधानच्या पाटील घराण्यातील मोढवंशीय क्षात्रकुळाचे कुलपुरुष होते.बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीनत्व, खेड्यातील जन्म, शिक्षणाचा अभाव, आयुष्य केवळ ३४ वर्षाचे; अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या वाग्यज्ञाचे कार्य अजोड आहे.

त्यांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ति असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.पुढे त्यांनी श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय प्रवृत्त केला.हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संताची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली. भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सृदिानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे.तो ज्ञानानेही नाश पावत नाही म्हणजे 'अनध्यस्तविवर्त' असतो.ही नवीन शब्दयोजना सुचवून शांकर वेदान्तशास्त्रात नवीन मौलिक योगदान दिले.

डार्विन, स्पेन्सर, बेझंट वगैरे पाश्चात्य तत्त्वेत्त्यांच्या विचारसरणी किंवा इलेक्ट्रॉनिक थियरीज सारख्या अत्याधुनिक मीमांसा देखील युक्तिपरिपूत आर्यसिद्धान्तांपुढे कां टिकत नाहीत,याचे सडेतोड युक्तिवादाने प्रतिपादन केले.न्याय दर्शनातील प्रत्यक्ष खंडातून आर्यांच्या पुरातन भौतिकशास्त्रांचे पुनरुज्जीवन कसे करावे, याचेही उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

भारतीयांच्या उज्वल इतिहासाची आणि अक्षुण्ण शिक्षणपरंपरेची ख्रिस्ती इंग्रजांनी बुद्धिपूर्वक केलेली विकृती उघडकीस आणली.आर्य हा वंश नाही, आर्य बाहेरून भारतात आले नाहीत.''आर्य म्हणजे सुसंस्कृत मनुष्य'' येवढाच अर्थ असून ३००० वर्षापूर्वी सर्व जगात सनातन आर्य संस्कृतीच होती हा ऐतिहासिक सिद्धान्त पुनः प्रस्थापित केला.

हे सर्व करीत असताना भक्ती, वेदान्त, सांख्य, योग, न्याय, आयुर्वेद, संगीत, साहित्य, नाटक, व्याकरण, कोश, क्रीडा वगैरे अनेक विषयांवर 'सूत्र' रचनेपासून 'भाष्य'रचनेपर्यंत विविध प्रकारची ग्रंथनिर्मिती करून त्या त्या शास्त्रात महाराजांनी नवनवीन मौलिक योगदान दिले.पण असे करताना वेद, पुराणे, रामायण, महाभारत, स्मृती वगैरेंचा संतवचनांच्या आधाराने ''समन्वय करण्याचे मूळ सूत्र'' कुठेही तुटलेले नाही.हा आधुनिक काळात सहसा न सांपडणारा फार मोठा विशेष महाराजांच्या ठिकाणी आहे.

धर्माधर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वय विचार सर्वांपुढे मांडला.आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, ब्राह्मण-ब्राह्मणेतर इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्याचे समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

अशा नवविचारांनी भरलेल्या महाराजांच्या वाङ्मयाचा आवाका बराच मोठा आहे ग्रंथसंख्या १३०, पत्रे व समीक्षा ११९, अभंग २५००, पदे २५००, गीते



१२५० श्लोकादि कवित्व १०००, ओवीसंख्या २३००० असून अंदाजे ६००० पृष्ठे छापली गेली आहेत.ही सर्व रचना संस्कृत, मराठी, हिन्दी, वज्रभाषा व वऱ्हाडी या भाषांतून झाली आहे.साहित्यिक दृष्टीनेही प्रस्तुत वाङ्मयाचा कस ज्ञानेश्वरांच्या कन्येला शोभण्यासारखाच आहे. झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या अल्प आयुष्यात झालेल्या या प्रचंड वैचारिक लिखाणाचा विचार केला असता अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या श्री आद्य शंकराचार्य व श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचीच आठवण येते. तैसे वयसेचिया गावा न येता । बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ।। हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केलेले योग्याचे वर्णन ज्ञानेश्वरकन्येच्या बाबतीत तंतोतंत लागूं पडते हेच खरे !

## जीवनाचा आलेख

* **व्यावहारिक नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ.स.१८८१ ते १९१५.**
* नाथसांप्रदायिक नांव : पांडुरंगनाथ.
* **माता - पिता :- श्री गोंदुजी व सौ.अलोकाबाई मोहोड.**
* **६ जुलै १८८१, आषाढ शु.१०. अमरावतीजवळ लोणीटाकळी येथे जन्म.**
* **चवथ्या महिन्यात अंधत्व आणि अल्पायुषी : वय चौतीस वर्षे.**
* **वयाची पहिली चार वर्षे माधानला वास्तव्य.**
* **इ.स.१८८५ : मातृवियोग**
* **त्यानंतरची सहा वर्षे आजोळी-लोणीटाकळीला वास्तव्य.**
* **या काळात प्रज्ञाचक्षुत्वाचा प्रत्यय.**
* **यांनतरचा इ.स.१९०० पर्यत माधानाच्या घरी वास्तव्य.या काळात दैवी गुणांचा उदय आणि सर्वज्ञतेचा परिचय.लोकांकडून ग्रंथ वाचनासाठी आत्यंतिक परिश्रम.**
* **इ.स.१८९६ : विवाह. पत्नी : सौ.मनकर्णिका.**
* **इ.स.१८९७ पासून निबंध व अभंगांची रचना, आनंदमार्ग खंडन.पितृवियोग**
* **इ.स.१९०० बालसवंगड्यांना अनुग्रह सिरसगाव, चांदूरबाजार, यावली इत्यादी ठिकाणी लोकोद्धारासाठी भ्रमंती. घरच्या विषप्रयोगादि कटकटींना कंटाळून आणि पाटीलकीवर पाणी सोडून गृहत्याग..**
* **इ.स.१९०१ श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह.**
* **इ.स.१९०२ - ग्वाल्हेरचे स्वानंदसाम्राज्यकर्ते श्रीमंत जठार यांना पत्र.त्यात *मानभावमत समीक्षा, * डार्विन मतसमीक्षा, * स्पेन्सरमत समीक्षा केली.*स्त्रीगीते या झोपाळ्यावरील व जात्यावरील लोकगीतांची रचना.* पंढरपूर यात्रा.* अमरावतीला आगमन.* हरिभाऊ केवले या शिष्योत्तमाची भेट.**
* **इ.स.१९०३ - *कात्यायनी व्रताचा आरंभ - माधान व नंतर देउरवाडा.**
* **इ.स.१९०४ - *पूर्वजन्म - गुजरातेतील झिंझुरवाडा येथील श्रीबेचरानंदस्वामी संबंधी संस्मरण.* आर्वीचे सत्पुरुष दामोदर आपाजी महाराज यांची भेट. *ज्ञानेश्वरीच्या निरूपणास आरंभ- * ज्ञानेश्वरीतील उपलब्ध प्रतीत नसलेली ओवी सांगितली.*माधुर्यामृतसागरास भरती, * विविध विषयावर निरूपणे, बालसवंगडी व प्रथम शिष्य असलेल्या रामचंद्रबापूंना मृत्युसमयी दिलेल्या सूचना.* आळंदीवारीचा आरंभ.*स्त्रीव्रतांचा आरंभ.*रुक्मिणी स्वयंवराची रचना.*कात्यायनी व्रत देउरवाडा.**
* **इ.स.१९०५ - *महाराजांचा श्रीकृष्णाशी विवाह.*श्रीकृष्णमूर्ती व ज्ञानेश्वरमाउलीच्या पादुकांची प्राप्ति.*नित्यपूजा.*प्रियशिष्य आणि उत्तराधिकारी नारायण पंडितांशी**

भेट.*मुलगा-अनंत यांचा जन्म.*ल.रा.पांगारकरांची व लोकनायक बापूजी अणे यांची भेट.

* इ.स.१९०७- *नागपूरला ज्ञानेश्वर मुद्रणालयाची स्थापना, व ग्रंथछपाईला आरंभ. *जगदीशचंद्र बोसांच्या ग्रंथांची समीक्षा. *कलकत्ता येथे प्रा.प्रियनाथ मुकर्जीकडे मुक्काम.*जगन्नाथपुरीयात्रा. *मायर्सची समीक्षा.*योगप्रभाव.चित्तोपदेश व सद्वैजयंति, प्रियलीलामहोत्सवादि ग्रंथांची रचना. *शिवपार्थिवपूजनाचा आरंभ.
* इ.स.१९०९ - *अंतर्विज्ञानसंहिता, *अलौकिक व्याख्यानमालादि ग्रंथ-रचना. *वृन्दावनाची यात्रा.
* इ.स.१९१० - *डॉ.मुंजेना पत्र, *न्याय वैशेषिकातून भौतिक विज्ञानासंबंधी मार्गदर्शन.*साहित्यसम्राट न.चि.केळकरांशी भेट.
* इ.स.१९११ ते १९१३- विविध विषयांवर पत्रे, लेख व अनेक ग्रंथांची निर्मिती.
* इ.स.१९१४ - *श्रीनिवृतिनाथांचा दृष्टांत, *देवासच्या राजांशी पत्रव्यवहार व देवासभेट.*संगीतकार पं.भातखंडेशी चर्चा व गानसोपानाची रचना.*धुळ्याचे सत्पुरुष बाबा गर्दे यांचेशी भेट.
* २० सप्टेंबर १९१५ - भाद्रपद शुद्ध वामनद्वादशीला पुणे मुक्कामी चाकण ऑइलमिलच्या परिसरातील घरातून महाप्रयाण.

## कार्याचा आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ.स.१८८१ ते १९१५.
* नवव्या महिन्यात अंधत्व.
* गोपीभाव : ज्ञानेश्वकन्या आणि कृष्णपत्नी.
* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोत्तेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्‌विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : वेदान्तातील नवीन परिभाषा.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्‌दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर्‌ आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्व मीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन.त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.





* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादासंबंधी तौलनिक विवेचन.
* लो.टिळक, विवेकानंद, रामतीर्थ वगैरेंच्या काही मतांची परखड चिकित्सा.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्‌दर्शनानुसार प्रस्तुतीकरण..
* इतिहास कोणी कसा लिहावा आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा याचे मार्गदर्शन..
* आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे या ऐतिहासिक सिद्धांतांचे मुद्देसूद प्रतिपादनः लो.टिळकांच्या उत्तरधृवीय मताचा परामर्श..
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या ऐतिहासिक सत्याची प्रमाण पुरस्सर पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना,भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत किंवा आर्ष वाङ्‌मयाला लागू पडत नाहीत याचे स्व-उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश.
* स्त्रियांसाठी खास गीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन.
* नाटक लेखन.
* आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीचा उपाय : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी आणि व्रजभाषेत एकूण १३४ ग्रंथांची रचना. *अभंग-२०९९, *पदे-२२५२, *गीत-१२५०, *श्लोक-१०००, *ओव्या- २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

० ० ०

# श्रीगुलाबरावमहाराज
# २० खंड
# विषयानुरूप साहित्यसूची


अनुक्रम यष्टी

सूत्रग्रंथ

१. अन्तर्विज्ञानसंहिता (सं) य १६
२. ईश्वरदर्शनम् (सं) य १६
३. समसूत्री (सं) य १६
४. दुर्गातत्त्वम् (सं) य १६
५. काव्यसूत्रसंहिता (सं) य १६
६. शिशुबोधव्याकरणम् (सं) य १६
७. न्यायसूत्राणि (सं) य १६
८. एकादशीनिर्णयः (सं) य १६
९. पुराणमीमांसा (सं) य १६

आकर ग्रंथ

१०.संप्रदाय सुरतरु, (भा.१,२) य ११

भाष्यग्रंथ

११.नारदीयभक्त्यधिकरणन्यायमाला संस्कृतभाष्यं (सं) य १६
१२.ना.भक्तिसूत्रभाष्य ओ.५२८ य१४
१३.प्रियलीलामहोत्सव (भागवतभाष्य) आमंत्रणविलास य ३
१४.प्रियलीलामहोत्सव (भागवतभाष्य) आगमनविलास य १४
१५. श्रीधरोच्छिष्टपुष्टिः(सं)य १६
१६.श्रीधरोच्छिष्टपुष्टिलेशः(सं) य १६
१७.ब्रह्मसूत्रव्याख्या य १५
१८.निगमान्तसुभा य १५
१९.ब्रह्मसूत्रांवर निरूपणे य १८
२०.भगवद्गीतासंगति य १
२१.मनोहारिणी (हिन्दी) य १९
२२.गीत निरूपणे य१७
२३.गीत प्रवचने (अन्नपूर्णा)य १७
२४.ऐश्वर्यार्थदीपिका (ई.गीता)य १५
२५.षट्पदध्वनिः य १५
२६.ईशावास्योपनिषद् य १५
२७.ऋग्वेदटिप्पणी (सं) य १६
२८.चौसष्टी (अमृ.अ१) य १
२९.चिरंजीवपदाभ्यास य २(पू)
३०.बालवासिष्ठ (सं) य १६
३१.योगवासिष्ठ तत्त्व य १७
३२.योगवासिष्ठ निरूपणे (मातोश्री रंगूताईस) य १८

शास्त्रग्रंथ

३३.सुखवरसुधा य १३
३४.वेदान्तपदार्थोद्देशदीपिका य १३
३५.शास्त्रसमन्वयः (सं) य १६
३६.आगमदीपिका (सं) य १६
३७.युक्तितत्त्वानुशासनम् (सं)य १६
३८.प्रेमनिकुंज य १०
३९.शांतिसुधाकर य २पू
४०.वेदान्तप्रक्रियासमुदाय य १५
४१.वेदान्तनिरूपण य१५
४२.तत्त्वबोधः (सं) य१६
४३.षड्दर्शनलेशसंग्रहः(सं)य१६

भक्तिग्रंथ

४४.भक्तिपदतीर्थामृत (तत्त्वमसि) य१
४५.निगमान्तपथसंदीपक य १
४६.भगवद्भक्तिसौरभ य २उ
४७.प्रीतिनर्तन य २उ
४८.नित्यतीर्थ य २पू
४९.प्रिय पाहुणेर य २पू
५०.भक्तितत्त्वविवेक (सं) य १६
५१.प्रियप्रेमोन्माद (सं) य १६
५२.गोपिकापादपीयूषलहरी य १५
५३.गोविन्दानन्दसुधा (सं) य २उ
५४.कान्तकान्तावाक्यपुष्पम्(सं)य१/१६

योग ग्रंथ

५५.निदिध्यासनप्रकाश य १
५६.ध्यानयोगदिवाकर य २उ
५७.सोपानसिद्धि य २पू
५८.हिरण्ययोग (स्वप्नयोग)य १५
५९.योगांगयमलक्षण य १५
६०.योगप्रभाव (पद्य) य १५
६१.योगप्रभाव (गद्य) ४४ सूत्रे य २०
६२.ज्ञा कुंडलिनी निरूपण. य १५

सांख्य ग्रंथ

६३.सांख्यसुरेंद्र/कपिलसूत्रओवी य१४
६४.सांख्यसुरेन्द्र गद्य य १७
६५.सांख्यतत्त्व सूत्रविचार य १५
६६.सांख्यसार एक निबंध य १५
६७.सांख्यसार य १८ / य १४
६८.सांख्यकारिका निरूपणय१८







संगीत ग्रंथ

६९.छंद प्रदीप य १५
७०.गानसोपान य १५

आयुर्वेद ग्रंथ

७१.मानसायुर्वेद (सं) य १६
७२.मानसायुर्वेदावर२लेख य १५
७३.भिषगिंद्रशचीप्रभा (सं) य १६
७४.वैद्यवृंदावन य १८
७५.वैद्यनन्दिनी य १८
७६.भिषग्पाटवोपपत्तिः य १८

प्रकरणग्रंथ

७७.स्वमतनिर्णयः (सं) य १६
७८.संप्रदायकुसुममधु (सं)य १६
७९.सृष्टिनिर्णयः (सं) य १६
८०.चित्तोपदेश य २पू
८१.सद्वैजयंती (आर्या) य २पू
८२.बाराखडी य २पू
८३.त्रिकांडसार य २पू
८४.प्रमाद कल्लोळ य १५

गाथा

८५.अभंगांची गाथा (२१५७)य ९पू
८६.पदांची गाथा(२२४४पदे) य ९उ

निबंध

८७. अलौकिक प्रवास य २पू
८८.अमोघनिरूपण य २पू
८९.बौद्ध निबंध य १५
९०.वेदान्तनिरूपण य१५/य १८
९१.सिद्धिसार य १५
९२.अलौकिक-व्याख्यानमाला य५
९३. युक्त्या य १८
९४. गुरुचरणकौमुदी य १८
९५. स्फुट निरूपण (नीळकंठ)य १८

संवाद* व बोधवाक्ये

९६. साधुबोध य ८
९७.मणिमंजुषा य २उ
९८.सुवर्णकण य १८
९९.स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषार य६
१००दुर्मतहृदयभंजन य १५
१०१. प्रश्नोत्तरे य १५
१०२. वृत्तिक्षीरसागर य १५
१०३.बालबुद्धिविवर्धिनी य १८
१०४. बोधवाक्ये य १८

पत्रे ११४

१०५.अकरा पत्रे य १
१०६.वीस पत्रे य २उ
१०७. सदतीस पत्रे य ७
१०८.चवरेचाळीस पत्रे य १२
१०९.एकपत्र (श्रीखापरें) य १५
११०.एकपत्र (कुर्याभाईना)य१८

लोकगीते

१११.स्त्रीगीते-५अध्या. य२/४
११२.स्त्रीगीतसंग्रह१०९२गीते य४
११३.तुंबडी य २पू
११४.रुक्मिणीस्वयंवर-लावणी य९उ
११५.रुक्मिणीचे पत्र य ९उ

स्तोत्रे

११६.ज्ञाने.मातृपितृभावनाष्टक य२उ
११७.कृष्णपंचपदी य २पू
११८.गुरुपंचपदी य२उ

चरित्र - आख्याने

११९.आत्मचरित्र य १५
१२०.सूचना प्रकरण य १
१२१. सूचना प्रकरण य २उ
१२२. सूचना प्रकरण य ३
१२३.अभंगात्मक१९आख्याने य९पू
१२४.पदात्मक७आख्याने य९उ
१२५.पतिव्रताचरितामृत य १५

विविधरचना

१२६.सुखपर्व/महाभारतावरनाटकय१५
१२७.मात्रमृतपानम् (सं) य १६
१२८.पत्नीप्रेमपराग चरित्र / य२उ
१२९.नवी भाषा'नावंग' य १५
१३०('') शब्दकोश य १५
१३१.('') लिपी य १८
१३२.मोक्षपट/श्रौतक्रीडापट य १८
१३३.हरिपाठाच्या प्रतिज्ञा य१८
१३४.हरिपाठाचा अर्थक्रम य१८
१३५.मायर्सवर टीपा य १८
१३६. शिक्षणरत्नाकर य १८
१३७. ज्ञानपाठ य ९पू.
१३८.गायत्री-अन्वयार्थ य १
१३९.स्व-समाजनियम य १८

श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी

## श्रीबाबाजीमहाराजांचे ग्रंथ

* हरिपाठरहस्य
* अमृतानुभवकौमुदी
* ज्ञानेश्वरीगूढार्थदीपिका
* आर्यधर्मोपपत्ति
* अभंगगाथा (अभंग १२००)
* विविध लेखसंग्रह
* संतकथा
* वेदस्तुतिदीपिका
* पंचदशीप्रवचने
* भागवतप्रवचने
* हरिपाठ (सार्थ)
* गीता (सार्थ)
* भक्तिपदतीर्थामृत (सार्थ)
* रुक्मिणी पत्रिका (सार्थ)
* नित्यतीर्थ (सार्थ)
* स्वमतनिर्णयः (सार्थ)
* निगमान्तपथसंदीपक (सार्थ)



श्रीगुलाबरावमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार

# श्रीबाबाजीमहाराज पंडित

**'गुरुभक्तीची परी । सांगो गा अवधारी । चतुरनाथा ॥**

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत तेही प्रमुख होते. त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीही मागितलं नाही. त्यांचे ते निर्व्याज प्रेम पाहून महाराजांनी उद्गार काढले -

''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं ? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला- ''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही.
माझे ग्रंथ वाच. तुला समजतील !''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली. दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित होऊन सर्वांना उपलब्ध झाल!

# दोन शब्द

## ॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठावर श्रीगुलाबराव महाराजांनी प्रतिज्ञा लिहून ठेवल्या होत्या. त्या प्रतिज्ञा म्हणजे प्रत्येक अभंगांतील प्रतिपाद्य विषयाची यादीच होत. त्या प्रतिज्ञेनुसार, व त्यांनी आपल्या ग्रंथांतून प्रतिपादिलेल्या वेदांत विचारानुसार, श्रीज्ञानेश्वर माउलीच्या हरिपाठाचें विवरण करावे असें मनांत आलें व श्रीसद्गुरुनाथांच्या कृपेनें तो मनोरथ पूर्ण झाला.

श्री सद्गुरु गुलाबरावमहाराज यांच्या मतें हरिपाठांतील अभंगांचा पाठक्रम व अर्थक्रम भिन्न असल्यामुळे, प्रत्येक अभंगाचे शिरोभागी मी पाठक्रम व अर्थक्रम दिला आहे.

पाठक्रम म्हणजे हरिपाठाचा पाठ करावयाचा असल्यास ज्या क्रमानें अभंग म्हणावयाचे तो क्रम आणि अर्थक्रम म्हणजे हरिपाठाचा अर्थ सांगावयाचा असल्यास ज्या क्रमानें तो सांगितला पाहिजे तो क्रम होय.

हा नियम त्यांच्या संप्रदायाचें अनुकरण करणाऱ्याकरितां मुख्य असल्यामुळे त्यांच्या करितांच म्हणून पाठक्रम व अर्थक्रम दिला आहे. दुसऱ्यानें कोणी त्यांचें अनुकरण करूं नये असा निर्बंध नाही.

श्रीमाउलीचा हरिपाठ छोटासा ग्रंथ खरा, पण त्यांत सर्व वेदांत सिद्धान्त भरलेले आहेत व त्यांतल्या त्यांत भगवंताच्या सगुण स्वरूपाविषयी व नामस्मरणादि भक्तिमार्गाविषयीं ज्या शास्त्रबाह्य कल्पना रूढ आहेत त्या सर्वांचा माउलीनें थोडक्यांत उल्लेख करून परामर्ष घेतला आहे.

त्या सर्वांचे दिग्दर्शन व थोडक्यात त्या विषयाचें शास्त्रीय मत काय आहे हें मी या विवरणांत दाखविण्याचा यथामति प्रयत्न केला आहे. जीव सर्वज्ञ नाहीं व प्रमादशीलहि आहे, हें जाणून सहृदय वाचक 'उणें तें पुरें' करून घेतील अशी आशा करितों व श्री सद्गुरु नाथांचे चरणीं हें लिखाण समर्पण करितो.

– ***नारायण पंडित***





*श्री गुलाबराव महाराजांनी सांगितलेला*

## पाठक्रम आणि अर्थक्रम


| पाठक्रम | | अर्थक्रम | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी | ९ | १ |
| २ | चहूं वेदी जाण षड्शास्त्रीं कारण | ११ | ११ |
| ३ | त्रिगुण असार निर्गुण हें सार | ६ | ४४ |
| ४ | भावेंविण भक्ति भक्तिविणें मुक्ति | ३ | ५५ |
| ५ | योगयागविधि येणें नोहे सिद्धि | २ | ६२ |
| ६ | साधुबोध झाला नुरोनिया ठेला | १४ | ७१ |
| ७ | पर्वताप्रमाणे पातक करणें | ७ | ७८ |
| ८ | संतांचे संगती मनोमार्गगति | ८ | ८६ |
| ९ | विष्णुविणें जप व्यर्थ त्याचें ज्ञान | ४ | १०२ |
| १० | त्रिवेणी संगमीं नाना तीर्थे भ्रमी | १० | १०९ |
| ११ | हरि उच्चारणी अनंत पापराशी | ५ | ११३ |
| १२ | तीर्थव्रत नेम भावेंविण सिद्धि | १५ | १२५ |
| १३ | समाधि हरीची समसखेंविण | १२ | १३१ |
| १४ | नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी | १६ | १३५ |
| १५ | एक नाम हरि द्वैत नाम दुरी | १७ | १४१ |
| १६ | हरिनाम जपे तो नर दुर्लभ | १३ | १४८ |
| १७ | हरिपाठ कीर्ति मुखीं जरी गाय | २० | १५६ |
| १८ | हरिवंश पुराण हरिनाम कीर्तन | १९ | १६३ |
| १९ | वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचें वचन | १८ | १६९ |
| २० | नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी | १ | १८२ |
| २१ | काळ वेळ नाम उच्चारितां नाही | २३ | १९२ |
| २२ | नित्य नेम नामीं ते प्राणी दुर्लभ | २१ | १९७ |
| २३ | सात पांच तीन दशकांचा मेळा | २२ | २०४ |
| २४ | जप तप कर्म क्रिया नेम धर्म | २५ | २१० |
| २५ | जाणीव नेणीव भगवंती नाही | २७ | २१२ |
| २६ | एक तत्त्व नाम दृढ धरीं मना | २४ | २२० |
| २७ | सर्व सुखगोडी साही शास्त्रें निवडी | २६ | २२४ |
| २८ | अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस | २८ | २३३ |

*

## होय अधिकारी

**नित्य पाठ करी इंद्रायणी तीरीं ।**
**होय अधिकारी सर्वथा तो ॥**

*

## हरी सांभाळी

**अन्तकाळी तैसा संकटाचे वेळी ।**
**हरी तया सांभाळी अन्तर्बाह्य ॥**

*(हरिपाठ अभंग २८)*

*

## वारकरी संप्रदायाचे अध्वर्यु आदरणीय सोनोपंत अर्थात् मामासाहेब दांडेकर यांची प्रस्तावना

*॥ श्रीविठ्ठल ॥*

*प्रस्तुतच्या 'हरिपाठ रहस्य' या ग्रंथाचे कर्ते वैदर्भीय जन्मसिद्ध दिव्य संत विभूति* ***श्रीगुलाबरावमहाराज यांचे पट्टशिष्य, वेदान्तकेसरी ह.भ.प.बाबाजी महाराज पंडित*** *यांचा आध्यात्मिक क्षेत्रांत इतका मोठा अधिकार आहे कीं, त्यांच्या या ग्रंथास प्रस्तावनेची मुळींच गरज नाहीं, हे मी जाणतो.असें असूनसुद्धां मी पुढील चार ओळी लिहीत आहें.यांचें कारण जरी त्यांचा अधिकार मोठा आहे तरी ते आपल्या पुणें-मुंबई विभागांत जितकें प्रसिद्ध असावेत तितकें नाहीत.ही प्रस्तावना लिहिण्याचें कारण म्हणजे त्यांचा या भागास परिचय करून देण्याची आपणांस ही सुसंधि प्राप्त झाली आहे असें मी समजतो म्हणून पुढील चार ओळी लिहीत आहे.*

***'मी पंडितला वश झालों आहे.''***

*ह.भ.प.बाबाजी महाराज हे एक थोर तपी, विद्वान असे विदर्भांतील नामवंत गुरुपुत्र आहेत.त्यांचें नाव नारायण पैकाजी पंडित. पण श्री गुलाबरावमहाराजांच्या सांप्रदायिक मंडळींत ते ''बाबाजी महाराज'' या नांवाने संबोधले जातात. त्यांचें मूळ गांव चंद्रपूर अथवा चांदा.पण हल्लीं त्यांचा मुक्काम बहुतेक अमरावतींतच असतो.एफ्.ए.पर्यंत शिक्षण झाल्यावर त्यांनी कॉलजचें पुढील शिक्षण सोडून श्रीगुलाबरावमहाराज यांच्या सत्संगतींतच ते राहिले.पुढें तर इ.स.१९०८ सालीं कायमची सरकारी नोकरी, तसेंच तनमनधनादिकांचा मोह सोडून देऊन आपल्या सात्त्विक पत्नीसह त्यांनी श्रीगुरुसेवेस आपणांस सर्वस्वी आजन्म वाहून घेतलें; व त्यामुळें त्यांना कौटुंबियांचा पुष्कळसा त्रास सहन करावा लागला व तो त्यांनी प्रशांत चित्तानें सहनही केला पण गुरुदास्यांत यत्किंचितहि अंतराय केव्हांहि पडूं दिला नाही.त्यांनी कायावाचामनानें श्रीगुरूची उपास्ति इतक्या कसोशीने व निष्कामतेनें केली की, त्यांच्या श्रीगुरुमाउलीनें म्हटलें की ''मी पंडितला वश झालों आहे.'' निष्ठावंत गुरुपुत्रास यांपेक्षा आणखी काय पाहिजे? यापरता त्याला दुसरा लाभ कोणता?*

*श्रीगुलाबराव महाराज हयात होते तोंपर्यंत तर ही सेवा अविरत चालूं होतीच, पण श्रीमहाराजांची दृश्य मूर्ति अंतर्धान पावल्यानंतरहि पुढें श्रीगुरुसेवा उत्तरोत्तर सतत वृद्धिंगतच होत आहे.* श्रीरामजन्म महोत्सव, * श्रीकृष्णजन्माष्टमीचा महोत्सव, मार्गशीर्ष महिन्यांतील * कात्यायनीव्रत महोत्सव, * महाशिवरात्र महोत्सव इत्यादि श्रीगुलाबराव महाराजांची प्रतिसांवत्सरिक सर्व व्रतें त्यांनी अखंडित चालूंच ठेविली आहेत.''अमानित्वादि'' ज्ञान लक्षणें, तशीच 'अमर्याद' दैवी संपत्ति यांच्या ठिकाणी उत्कटपणें दृष्टोत्पत्तीस येते.सांगण्यासारखी एक गोष्ट अशी आहे की, आपल्या श्रीगुरुमाउलीची इच्छा होती म्हणून त्यांच्या पाठीमागे इ.स.१९३५ मध्यें सहकुटुंब सहपरिवारें, तसेंच शे-दीडशें भक्तजनांच्या समुदायासह त्यांनी प्रयाग क्षेत्राहून गंगेची कावड प्रत्येकानें खांद्यावर घेऊन अनवाणी पायानें भर उन्हाळ्यांत आळंदीस आणून श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरमाउलीस सर्व मंडळीनें शुद्ध गंगोंदकाचा महा अभिषेक केला व आळंदी क्षेत्रांतील सर्व गांवकरी लोकांस पक्वान्नाचे यथेच्छ सुग्रास भोजन दिलें व ह्यायोगें त्यांनी आपल्या श्रीगुरुमाउलीची इच्छा पूर्ण केली! इतकें करूनहि पूर्व तजवीज अशी कीं, हें कोणांस फारसें कळूं नये अशी सक्त ताकीद त्यांनी श्रीमहाराजांचे अनुग्रहित श्री.मांढरे यांना दिलेली होती.ह.भ.प.बाबाजी महाराज पंडित हे स्वतः प्रसिद्धिपराङ्गमुख असे थोर गुरुपुत्र आहेत.त्यांच्या श्रीगुरुसेवकडे पाहिले कीं, ज्ञानेश्वरी अध्याय तेराव्यांतील श्रीगुरुभक्तीपर ओव्या डोळ्यांपुढे उभ्या राहतात!*

*ह.भ.प.बाबाजी महाराजांनी अशा रितीनें श्रीगुरुसेवा करून आध्यात्मिक ठेवा त्यांच्यापासून मिळविला.ते तपी गुरुपुत्र आहेत, येवढेंच नव्हे तर ते मोठे सुप्रसिद्ध व्युत्पन्न पंडितहि आहेत.*

*श्रीज्ञानोबामाउलीच्या हरिपाठाचें रहस्य विशद करून सांगण्यास असें थोर अधिकारी पुरुष लाभले हा अपूर्व योग, असेंच मी समजतों; कारण हरिपाठाचें रहस्य विस्तृत रितीनें सांगून हरिपाठाची योग्यता जगास, विशेषतः चिकित्सक सुशिक्षितांस समजून देणें आज आवश्यक झालें आहे.श्रीज्ञानेदवांची ज्ञानेश्वरी असांप्रदायिक अशा सुशिक्षित समाजात जितकी प्रसिद्ध आहे तितका हरिपाठ प्रसिद्ध नाहीं.ज्यांना तो माहीत आहे ते, तो ज्ञानेदवांचाच आहे किंवा नाही याविषयीं थोडे साशंकच असतात कारण ज्ञानेश्वरीची भाषा व हरिपाठाची भाषा एकच दिसत नाही.*

*पण वास्तविक स्थिती अशी आहे कीं, जरी हरीपाठ हा सुशिक्षितांस फारसा परिचित नसला तरी ''ज्ञानोबा माउलीचे आपण'' असे म्हणवून घेणारा अखिल भारतांत जो वारकरी संप्रदाय आहे त्यांच्या आचारधर्मात हरीपाठास फार मोठें स्थान आहे.उपमाच जर द्यावयाची तर* ***ब्राह्मणांची जशी संध्या तसा वारकऱ्यांचा हरिपाठ.*** *प्रत्येक वाकऱ्यांस तो पाठ हवाच व त्यानें रोज म्हणावा अशी अपेक्षा! यामुळें हरिपाठ हा हजारो स्त्रीपुरुषांच्या तोंडी कायमचें स्थान करून राहिला. पण त्याचा परिणाम त्यांचे वेषांतर होण्यांत झाला व तें अगदीं स्वाभाविकच आहे.भाषा बारा कोसावर बदलते.ज्ञानेश्वरीसंबंधाने लोकांना फार आदर आहे, हें खरें पण तो ग्रंथ कठीण, कांहीं ओव्याच वाचनांत अथवा पाठांत.यामुळें त्यांतील शब्दांच्या वेषांत रूपांतर कमी.यामुळें ज्ञानेश्वरी व हरिपाठ हे एकाच कर्त्याचे दोन्ही ग्रंथ असूनहि आज या दोन भावंडांचा बाह्य वेष असा होऊन बसला आहे कीं, वर वर पाहाणाऱ्यास ही एकाचीच दोन अपत्यें असतील असें वाटेनासे झाले आहे!*

*पण असा वेषभूषेंत जरी फरक झालेला असला, तरी 'प्रमेयस्वरूप कायमच आहे' व तिकडे ज्यांचें लक्ष जाईल तो हें दोन्ही ज्ञानराजांचेच ग्रंथ आहेत असें मान्य करील यांत शंकाच नाहीं.हरिपाठांतील ''*चहु वेदीं जाण *विष्णुविण जप व्यर्थ त्याचें ज्ञान *साधुबोध झाला नुरोनिया ठेला *समाधि हरीची समसुखेवीण'' इत्यादि अभंग पाहिले तरी सुद्धां दोन्ही ग्रंथ एकाच कर्त्याचें आहेत अशी खात्री पटेल.पण स्वतःच्या बुद्धीवर भर देवून हरिपाठाच्या अभंगाचें हृदगत कळणें हें तितकेंच कठीण आहे.*

*ह.भ.प.बाबाजीमहाराज पंडित यांच्या हरिपाठ रहस्यानें हरिपाठांतील प्रमेयांवर उत्कृष्ट प्रकाश पडून त्यांतील प्रमेयांकडे सुक्षितांचे लक्ष जाईल.व ज्ञानेश्वरी व हरिपाठ हे दोन्ही ग्रंथ एकाच कर्त्याचे आहेस अशी खात्री होईल.''हरिमुखें म्हणा, हरी मुखें म्हणा '' हें काय सांगणें? श्रीज्ञानोबा माउली सारख्यांच्या बुद्धिवैभवास योग्य असें हें क्षेत्र आहे काय? अशा समजुतीनें हरिपाठाकडे सुशिक्षितांचे दुर्लक्ष होतें.या हरिपाठरहस्याच्या वाचनानें तो गैरसमज दूर होईल व हा हरिपाठ 'प्रमेय रत्नांची खाण' आहे हें सुशिक्षित वाचकांच्या प्रत्ययास येईल.*

***श्रीगुलाबराव महाराजकृत सूत्रमय 'प्रतिज्ञा'***

*या ग्रंथात हरिपाठांतील अभंग प्रथम देऊन त्याचें सारसर्वस्व चटकन लक्षांत यावें म्हणून त्यावर श्रीगुलाबराव महाराजकृत सूत्रमय 'प्रतिज्ञा' दिल्या आहेत.नंतर सरळ अर्थ देऊन पुढें शास्त्रशुद्ध, सप्रमाण व सविस्तर विवरण दिलेलें आहे.* ***त्यांत ठिकठिकाणीं स्वानुभवाच्या गुरुगम्य खुणा प्रगट झालेल्या आहेत.*** *यामुळेंच ही ज्ञानमृताची जान्हवी आपल्या घरीं अनायासें चालून आली आहे, असें विचरवंतास निश्चित वाटेल.*

*ह.भ.प.बाबाजी महाराज पंडित यांनी वाचकांसमोर जें हें 'हरिपाठ रहस्य' सांगितलें आहे त्याच्या सेवनानें हरिपाठावरील श्रद्धा उत्तरोत्तर दृढ होऊन 'सुलभ' पण 'सर्वत्र दुर्लभ' असणाऱ्या ''हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा'' या धृवपदाकडे अधिकाधिक प्रवृत्ति वाढून श्रीज्ञानराज माउलीच्या मनोगताप्रमाणे जग सर्वसुखानें परिपूर्ण होऊन आदि पुरुष भगवान् श्रीहरीची भक्ति करण्याकडे प्रवृत्त होवो, अशी जग्ाालक भगव्ारणीं माझी नम्र प्रार्थना आहे.*

*श्रीक्षेत्र पंढरपूर.*

*बलिप्रतिपदा शके १८७६ (इ.स.१९५४)* ***– शं.वा.दांडेकर***

*(माजी प्रिन्सिपॉल सर परशुरामभाऊ कॉलेज पुणें.*
*संचालक – वारकरी शिक्षण संस्था, श्रीक्षेत्र आळंदी.)*

## श्री बाबाजीमहाराज पंडित

*आज श्री बाबाजीमहाराज पंडित 'शिव' होण्यास बरोबर एक वर्ष होत आहे.तत्पूर्वी बरेच दिवस ते अंथरुणाला सतत खिळून होते.जराजीर्ण व व्याधिशीर्ण झालेले त्यांच्या शरीराचे 'नेसूं' नियतीलाही पाहवले नाही.शेवटी ते गळून पडले. ती वेळ दुपारी १॥ ची होती. आंघोळ करून महाराजांनी पार्थिवपूजा केली व शंकराच्या मृण्मय मूर्तीबरोबर आपल्या शरीराचेही विसर्जन केले.कविसृष्टीतच शोभणारी असली वेधक नि वेचक 'तुल्ययोगिता' प्रत्यक्षात पहावयास मिळाली.शिळी झालेली देवावरची फुले दुसरे दिवशी सहज बाजूला सारावी त्याप्रमाणे अगदी लीलेने आपल्या तनूचे निर्माल्य महाराजांनी दूर सारले. महाराजांच्या बाबतीत असे न घडते तरच नवल! कारण अर्धशतकापेक्षा अधिक काळाची त्यांची तपस्या ह्या रीतीने 'शेवटचा दिस' गोड करण्यासाठीच अट्टाहास करीत होती.*

***पूर्ववृत्त***

*महाराजांचे नाव नारायण पैकाजी पंडित.त्यांचा जन्म चंद्रपूर येथे इ.स.१८८६ च्या मकर संक्रमणाचे दिवशी झाला.चंद्रपूर व नागपूर येथे त्यांचे ¯.॰. च्या प्रथम वर्षापर्यंत शिक्षण होऊन परिस्थितीमुळे त्यांना नोकरी धरावी लागली. दैवयोगाने त्यांचा वऱ्हाडातील श्रीगुलाबराव महाराजांसारख्या संत विभूतीशी संबंध आला व त्यांचे पारमार्थिक भाग्य उजळून निघाले.श्रीगुलाबरावमहाराजांचे नाव माहिती नसणारा तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी महाराष्ट्रात तरी विरळा! अगदी बालपणीच श्रीगुलाबराव महाराजांची दृष्टी गेली व अंध बनून बाह्य व्यवहारात ते परावलंबी बनले; निदान तसे ते दाखवीत! परंतु आपल्या अलौकिक सामर्थ्याने त्यांनी वयाच्या केवळ चवतीस वर्षांच्या अल्पावधीत संस्कृत, मराठी व हिंदी भाषेत प्रचंड वाङ्मयसंपदा निर्माण करून ठेवली.मोठमोठ्या विद्वान् लोकांना ती आजही स्तिमित करून टाकते.*

*ज्ञानोत्तर भक्तीचे सांगोपांग विवेचन, विश्लेषण नि मंडन श्रीगुलाबराव महाराजांच्या ग्रंथाइतके इतरत्र कुठेही आढळणार नाही.नरसी मेहतांप्रमाणे श्रीगुलाबरावमहाराज प्रसंगोपात्त स्त्रीवेष घेत व स्वतःला श्रीकृष्णपत्नी म्हणवून भगवंतांची* ***''पंचलतिका''*** *म्हणून आळवणी करीत.ह्याच कान्तभक्तीला 'मधुरा भक्ती' असे पारिभाषिक नाव असल्याने त्यांच्या संप्रदायाला 'मधुर संप्रदाय' असेही म्हणतात.श्रीगुलाबरावमहाराजांनी पुढील श्लोकात आपल्या पारमार्थिक परिवाराची स्पष्ट कल्पना दिली आहे.*

*** उमा माता * पिता शंभुः * गुरुर्ज्ञानेश्वरो महान् ॥**
*** पतिः कृष्णो * राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥**

*वरील श्लोकातील पंचायतनाची आराधना श्रीगुलाबरावमहाराजांच्या संप्रदायात चाललेली असते.ह्या पंचायतनाप्रमाणेच श्रीगुलाबरावमहाराजांची मनोभावाने सेवा करण्यासाठी- लेखन वाचन इ.कामे करण्यासाठी काही निष्ठावंत मंडळी त्यांच्याभोवती जमा झालेली होती.त्यापैकी पांच जणांना महाराजांनी आपल्याकडे नम्रपणा घेऊन वन्दन देखील केले आहे. श्रीगुलाबरावमहाराजांचा ह्या पांच अन्तरंग शिष्यांपैकी चारजण पूर्वीच इहलोक सोडून गेले होते.श्रीबाबाजीमहाराज त्या पाचांत / पंचायतनात- अधिकाराने थोरले मानले जात.तेही आता निघून गेल्याने महत्त्वाचा दुवाच निखळून पडला आहे.यापुढे श्रीगुलाबरावमहाराजांच्या विभूतिमत्त्वाचा समज वा उमज त्यांच्या ग्रंथावरून जो काय होईल तेवढ्यावरच समाधान मानावे लागणार!*

*श्रीगुलाबरावमहाराजांचे सांन्निध्य लाभले त्यावेळी श्रीबाबाजी महाराजांनी वयाची विशी देखील ओलांडली नव्हती. त्यांना नुकतीच नोकरी लागली होती.लोकबहिष्कृत स्त्रीवेष घेणाऱ्या 'अवधूत' वेषात राहणाऱ्या आपल्या गुरूची थोरवी कळण्याइतके त्यांचे वय नव्हते.श्रीगुलाबरावमहाराजांचे सिद्धांत कळण्याइतपत त्यांचे शिक्षण नव्हते.'अनध्यस्त-विवर्त / पुनर्व्यतिरेक' इ.नव्यानव्या पारिभाषिक संज्ञांची नाणी व लेणी घडवून श्रीगुलाबरावमहाराजांनी ती वेदान्तशास्त्रात रूढ केली नि ज्ञानोत्तर भक्तीचा आपला लाडका सिद्धान्त सजविला.आजही त्या पारिभाषिक संज्ञांचा अर्थ आकलन करण्यास श्रम पडतात. तेथे पोरसवदा विशीच्या जवळपास असणाऱ्या उणेपुरे इन्टरपर्यंत शिकलेल्या नारायण पंडिताला श्रीगुरूंच्या निरूपणातील मर्म काय कळणार? तर मग श्रीगुलाबरावमहाराजांचे शिष्यत्व नारायण पंडिताने कां स्वीकारावे? खरोखरी हा मोठा प्रश्नच आहे.परंतु असले प्रश्न उत्तरासाठी नसतात हीच गोष्ट खरी.सूर्याचा उदय झाला की सूर्यविकासी कमलेच विकसतात ह्याची तरी संगती काय? गुरु व शिष्य ह्या दोन भिन्न व्यक्ती नसून एकाच संकल्पाच्या दोन अविलग अभिव्यक्ती आहेत असे*

मानण्याशिवाय गत्यंतर नाही.श्रीविष्णूने श्रीरामरूपाने अवतार घेण्याचे ठरविले त्याचवेळी इतरांनीही अंशरूपाने अवतरण्याचे ठरले होते असे अध्यात्मरामायणात वर्णन आहे.ते ह्या दृष्टीने मोठे अर्थपूर्ण आहे.श्रीगुरुचरित्रात देखील 'गुरु-शिष्य रूपे क्रीडती' असे वर्णन आहे.

**अधिकारी शिष्य**

इ.स.१९१५ मध्ये श्रीगुलाबरावमहाराज पुणे मुक्कामी समाधिस्त झाले.आपला संप्रदाय पुढे चालविण्यास त्यांनी नारायण पंडितांना आज्ञा केली व **'तूं वाच, तुला समजेल'** असा आशीर्वादही देऊन ठेवला. आधीच उपासनेच्या माध्यमातून श्रीगुलाबरावमहाराजांच्या तत्त्वज्ञानात मुरलेल्या श्री पंडितांना श्रीगुरूचा वरील आशीर्वाद मिळाल्यानंतर शाब्दिक परोक्षज्ञान मिळण्यास कितीसा उशीर लागणार! वेदशास्त्रसंपन्न श्रीनिवासशास्त्री हरिदास यासारखी श्रीगुलाबरावमहाराजांशी चर्चा करण्यात भाग घेणारी जी काय मंडळी त्यावेळी होती त्यांनाही केवळ सेवेकरी म्हणून आजवर राहिलेल्या नारायणराव पंडितांचे हे उत्स्फूर्त ज्ञान पाहून आश्चर्य व आदर वाटू लागला.'बोला आधी झोंबीजे प्रमेयासी' ह्याच पद्धतीने श्रीबाबाजीमहाराजांना शास्त्रज्ञान अवगत झाले असे म्हणण्यास हरकत नाही.

आठदहा वर्षापूर्वीची गोष्ट. ज्ञानेश्वरीवर निरूपण सुरू होते.अध्याय पंधरावा असावा.संतवचनातील सामर्थ्याचा विषय निघाला.त्यावेळी महाराजांनी भूतकाळातील एकदोन उदाहरणे दिली व एक क्षण थांबून मनाशी काही तरी विचार करून महाराज म्हणाले-''दूरची उदाहरणे कशाला देऊ? मला तरी काय येत होते? श्रीमहाराज जेव्हा बोलू लागत तेव्हा वेड्यासारखा तोंडाकडे मी पाहत बसे.एक अक्षरही त्यातले कळेना.आज चार दोन अक्षरे तोंडातून बाहेर पडतात ते तरी कशाचे फळ? 'तूं वाच तुला समजेल' ह्या आशीर्वादाचेच ना?'' असे म्हणून त्यांनी डोळ्यांतून अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

**निरूपणाची शैली**

गुरुकृपेने प्रमेयाची ओळख त्यांना प्रथम झाली असल्याने कोणताही वेदान्तग्रंथ समजावून सांगत असता श्रीबाबाजी महाराज 'पदकृत्याकडे' कधीच लक्ष देत नसत.ते काम विचारणाऱ्याकडे वा विद्यार्थ्याकडे सोपवीत.सिद्धान्ताची उकल मात्र भराभर करीत सुटत.त्याबाबतीत त्यांचा हात धरणे कठीण होते.

**ब्रह्मण्यज्ञाननाशाय वृत्तिव्याप्तिरपेक्षिता।**
**फलव्याप्तिरेवास्य शास्त्रकृद्‌भिर्निवारितम्॥**

पंचदशीतील वरील श्लोकात सांगितलेले जटिल प्रमेय असो की;
सत्पद ते ब्रह्म। चित्पद ते माया। आनंदपदी जया। म्हणती हरि।।

हा एकनाथांचा अभंग असो किंवा ज्ञानेश्वरीतील ओवी असो त्यावर बोलतांना त्यांचा वाग्वेग कमी झालेला आढळेना. भाषेच्या फुलोऱ्याकडे त्यांचे लक्षच नसे.आपण भाषादरिद्री आहो अशी प्रांजळ कबुली त्यांनी ''अमृतानुभव कौमुदी'' च्या प्रस्तावनेत दिली आहे.प्रमेय पारदर्शक शब्दांची शास्त्रीय मांडणी हेच महाराजांच्या प्रवचनाचे, अध्यापनाचे वा लेखनाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.श्रीबाबाजीमहाराजांकडे जन्माष्टमी, कात्यायनी व शिवरात्री असे तीन मोठे उत्सव दरवर्षीच होतात.जन्माष्टमीच्या रात्री कृष्णजन्म होत असतो. नन्द, यशोदा, भाट, व्रजवासी स्त्रिया, गर्गाचार्य व गोकुळवासी लोक अशा वेगवेगळ्या भूमिका घेऊन श्रीकृष्णमूर्तीचा मंगल सोहळा चालला असतो.त्यात भजनपूजनाचा सर्व सोहळा आटोपल्यानंतर उत्तररात्री श्रीकृष्णमूर्तीचे जातक वर्तविण्याच्या निमित्ताने ''नन्द, यशोदे व व्रजवासी जनहो'' असे संबोधून महाराज जेव्हा निरूपण करू लागत तेव्हा श्रीकृष्णमूर्तीवर चढविण्यासाठी शुद्ध प्रमेयरत्नाचा मुकुटच घडवित आहेत असा भास होई.वेदान्तशास्त्रातील व भक्तिशास्त्रातील सारी प्रमेये कुठेही डागळूं न देता ते लीलेने मांडत.भाषेच्या अवगुंठणाकडे अप्रमाण लक्ष पुरवून मूळ सिद्धांतांना क्षति पोचविण्याचा प्रमाद त्यांचेकडून कधीच होण्याची शक्यता नसे.कारण गुरुकृपेच्या बळावर त्यांनी ते सिद्धांत कधीच आकलन केले होते.

**संवादचातुर्य**

कात्यायनी नावाचे दुसरे व्रत हेमंतऋतूत एक महिनाभर चालते.त्या व्रताच्या सांगतेसाठी गावोगावची व अनुगृहीत मंडळी जमा होत असत.दुसऱ्या दिवशी सकाळी सांगतेसाठी जमलेली मंडळी एकत्र जमून महाराजांना परमार्थ विषयक प्रश्न विचारीत.ह्या 'प्रश्नोत्तरांच्या तासात' महाराजांच्या प्रत्युत्पन्नमतित्वाची जणूं परीक्षाच असे.एकदा एकाने कर्मविपाक व आत्मस्वातंत्र्य या संबंधीचा प्रश्न टाकला व आपल्या म्हणण्याच्या समर्थनासाठी 'प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति?' हे गीतावचन उद्‌धृत केले.

महाराज म्हणाले- ''होय. ते खरे आहे; परंतु ''मम वाऽ न्यस्य'' चा ''स्वस्य निग्रहः स्वेनैव कर्तव्यः इति भावः'' वरील गीताश्लोकावरील शांकरभाष्यच महाराजांनी आपल्या म्हणण्याच्या बळकटीसाठी उद्‌धृत केले.प्रश्न पूर्वसूचित असल्याप्रमाणे ताडदिशी उत्तर देण्याची त्यांची हातोटी मोठी विलोभनीय वाटे.शंकांची उत्तरे देताना आचार्यभाष्य व संतवचने यांचा दाखला नेहमी त्यांच्या जवळ सज्ज असे.त्यांच्या निरूपणातील कोणताही युक्तिवाद श्रद्धेत घोळलेला व श्रद्धासंवलितच असायचा हे अगदी ठरलेले! कात्यायनीच्या वेळचे शंकासमाधान व जन्माष्टमीच्या वेळचे प्रवचन हे दोन प्रसंग भाविकांच्या कायमचे लक्षात राहतील.तशी सवडीप्रमाणे प्रवचने नेहमीच चालत, तो भाग वेगळा.

**संप्रदायाचे संवर्धन**

श्रीगुलाबराव महाराजांनी वारकरी संप्रदायाला जोडून एक नवा संप्रदाय स्थापन केला.ह्या संप्रदायाला त्यांच्या देखत बाळसे येऊ लागले होते.परंतु ह्या नवजात संप्रदायाचे लालन, पालन व संगोपन करण्यास श्रीगुलाबरावमहाराज फार दिवस राहिले नाहीत.ते काम श्रीबाबाजी महाराजांकडे त्यांनी सोपविले.श्रीबाबाजी महाराजांनी देखील ते बिकट काम अतिशय सहृदयतेने व सूज्ञपणाने सांभाळले असाच निर्णय कोणालाही द्यावा लागेल.संप्रदायाला त्यांनी आळसू दिले नाही. *संप्रदायासाठी नागपूर, अमरावती येथे घरे उभारली.गुरूच्या आज्ञेला धरून प्रशस्त व मजबून ग्रंथालय अमरावतीला बांधून काढले.*संस्थानासाठी शेतीची जमीन घेऊन कायम उत्पन्नाची सोय केली.*गुरुमहाराजांचे सारे अप्रकाशित वाङ्मय उजेडात आणले.*प्रयागची गंगा कावडीने भरून पायी चालत आळंदीला श्रीज्ञानेश्वरसमाधीवर समर्पण करण्याची श्रीगुरूंची इच्छाही त्यांनी पूर्ण केली.*संप्रदायातील सर्व व्रते, उत्सव मोठ्या उत्साहाने व मोठ्या प्रमाणात साजरे होऊ लागले.गुरूने सोपविलेले हे कार्य आहे, त्यात मुळीचा अंतर पडू नये अशी महाराजांची धारणा असे.कात्यायनी- वेळेचा एक प्रसंग! एकाने प्रश्न विचारला -''मोठ्या महाराजांप्रमाणे कोणीही स्त्रीवेष घेऊन स्वतःला श्रीकृष्णपत्नी समजण्यास काय हरकत आहे?''

महाराज म्हणाले- ''होय तर! माधुर्यभक्ती फक्त ज्ञानोत्तरदशेतच होऊ शकते.तत्पूर्वी देहाभिमान नष्ट न होता स्त्रीवेष घेणे अधःपतनालाच कारण होणार!''

''तर मग?'' विचारणाऱ्याने अर्धवट प्रश्न केला.

''तर मग तुम्ही हे कात्यायनीव्रत कां करतां असेच ना तुझे म्हणणे?'' महाराज हंसून म्हणाले - ''अरे, हे व्रत माझे नाही.ते माउलीचे आहे.आईला अडचण असली म्हणजे तिच्या देवाची पूजा आपण करतो ना? हाही तसाच प्रकार!''

माधुर्ये दीक्षितः कुर्यात् कात्यायन्युत्सवं परः।
मातृधिया तु अन्येषामिति स्वमतनिर्णयः।।

वरील संवाद पुरेसा बोलका असून श्रीबाबाजी महाराजांच्या श्रद्धाकोमल व हळूवार मनाची त्यावरून कल्पना येते. ह्याच भावुकतेने त्यांनी आजवर संप्रदायाचा प्रतिपाळ केला.

**ग्रंथलेखन**

वाङ्मय निर्मितीचे आपल्या गुरूचे व्रतही श्रीबाबाजी महाराजांनी खंडित होऊ दिले नाही.श्रीगुलाबराव महाराजांनी अनेक ग्रंथ लिहिले.संतवचनांची ती सारी भाष्येच होत.परंतु तेवढ्याने काम भागणारे नव्हते.कारण, वारकरी संप्रदायाचे प्रणेते आळंदीचे राजे श्रीज्ञानेश्वर महाराज यांचे जे तीन ग्रंथ- हरिपाठ, ज्ञानेश्वरी व अमृतानुभव- वारकरी संप्रदायात प्रस्थानत्रयीप्रमाणे मान्यता पावलेले आहेत.त्यांच्यावर सविस्तर व सान्वय निरूपण करण्याच्या दृष्टीने त्यांनी हरिपाठाच्या अर्थनिर्णायक 'प्रतिज्ञा' व अमृतानुभवातील पहिल्या प्रकरणावर चौसष्ठी म्हणून ६४ ओव्या लिहून ठेवल्या होत्या.त्यावर श्रीबाबाजी महाराजांनी भाष्ये लिहिलीत 'आर्यधर्मोपपत्ति' हा ग्रंथ लिहून मधला बराच काळ लेखणीला विराम दिल्यानंतर गेली दहावर्षे अगदी न थांबता हरिपाठ रहस्य, अमृतानुभवकौमुदी व ज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका असे जे तीन ग्रंथ त्यांनी एकामागून एक लिहावयास घेतले नि त्यासाठी वार्धक्याने खंगलेल्या प्रकृतीची मुळीच गय केली नाही.विसरलेले काम प्रवासाला निघण्यापूर्वी संपविण्याची जणू घाई व्हावी तसत्याच तातडीने शेवटच्या गूढार्थदीपिकेचा शेवटचा खंड(अध्याय१८) पूर्ण होऊ शकला नाही.त्यापूर्वीच त्यांना निघावे लागले.'जशी महाराजांची इच्छा' एवढेच ते या संबंधात बोलले.

**आधुनिक आनंदगिरी**

श्रीबाबाजी महाराजांनी आपल्या परमगुरूंच्या- श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या- तीन ग्रंथावर सविस्तर निरूपणे लिहून काढून भक्तिमार्गाला शास्त्रीय अधिष्ठान आहे हे सप्रमाण दाखवून दिले.ही त्यांची श्रीगुलाबराव महाराजांच्या वाङ्मय निर्मितीला पोषक, पूरक व उपकारक असणारी अजोड कामगिरी होय. वरील तीनही ग्रंथांचे एकाच लेखणीतून उतरलेले सविस्तर विवेचन आज तरी मराठी सारस्वतात हेच एकमेव होय. अद्वैत वेदान्तशास्त्रात प्रस्थानत्रयीवरील (दशोपनिषदे, ब्रह्मसूत्रे व गीता) शांकरभाष्याचे रहस्य समजून घेण्याच्या दृष्टीने शांकरभाष्यावरील आनंदगिरीकृत टीकेला अतिशय महत्त्व व मान दिला जातो.तोच मान श्रीगुलाबरावमहाराजांचे सिद्धान्तरहस्य हरिपाठ, अमृतानुभव व ज्ञानेश्वरी ह्या ग्रंथांच्या आधारे उकलून दाखविण्याऱ्या श्रीबाबाजीमहाराजांना दिला पाहिजे.असे सांगतात की पातंजल महाभाष्याची काही पाने बकरीने खाऊन टाकली. त्यामुळे पाणिनीय व्याकरणाची जी हानी झाली असेल तीच हानी गूढार्थदीपिकेचे काम अपुरे राहिल्याने वारकरीवाङ्मयाची झाली आहे.(अध्याय १८ तील २२३ ओव्यानंतरचे लेखन त्यांचे चिरंजीव डॉ.वा.ना.पंडित यांनी पूर्ण केले.)

**संप्रदाय सिद्धान्त**

हरिपाठ रहस्य अमृतानुभवकौमुदी व ज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका ह्या तीन ग्रंथात पुढील सिद्धान्ताचे सोपपत्तिक विवेचन केलेले आहे.

(१) भगवंताचा देह पाञ्चभौतिक नसतो- चिन्मय असतो.(२) सगुण-निर्गुण ही दोन्ही भगवंताची खरी रूपे आहेत.(३) केवळ व्यतिरेकज्ञानी असणाऱ्या पुरुषांना समाधिव्यतिरिक्त- काळी दुःखभोग टळत नाही.(४) व्यवहारकाळी देखील परमानन्दप्राप्ति होण्यासाठी ज्ञानीपुरुष भक्तीचा आश्रय घेतात.

ह्याशिवाय इतरही प्रासंगिक व संबंधित विचारांचा परामर्श येथे घेतलेला दिसून येईल.उदा-*'ॐ नमोजी आद्या' ह्या ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच ओवीवर लिहिताना श्रीबाबाजी महाराजांनी मंगलाचरण ओंकाराचे केले नसून भगवंताचे केले आहे.हे उत्तम रीतीने स्पष्ट केले आहे.

अमृतानुभवकौमुदीला महाराजांनी ऐंशीपानी विस्तृत भूमिकाच लिहून- श्रीज्ञानेश्वर महाराजांचा वेदान्तविचार ज्ञानेश्वरीत किंवा अमृतानुभवात एकच आहे; तो श्रीशंकराचार्यांच्या वेदान्तविचाराहून मुळीच भिन्न नाही.हे स्पष्टपणे दाखविले आहे. श्रीशंकराचार्य हे मायावादी तर ज्ञानेश्वरमहाराज स्फूर्तिवादी हे वर्गीकरण व पृथक्करण साफच झिडकारून टाकले आहे.

महाराजांच्या मौलिक विवेचनाची साक्ष, अनेक रम्य स्थळे जाणत्यांना त्यांच्या वरील तीनही ग्रंथात आढळतील. ती दाखविण्याची माझी पात्रताही नाही व हे स्थळही नव्हे. ह्या सर्व विवेचनात महाराजांनी सगुणाराधनेला जागोजाग उचलून धरले हे मात्र कोणाच्याही सहज ध्यानात येईल.

*'देवाचिये द्वारी' म्हणजे सत्संगती असले लाक्षणिक अर्थ पुढे करून सगुणपूजेला कमी लेखणाऱ्या विवेचनांना हरिपाठातील महाराजांचे लिखाण निःसंशय हार घ्यावयास लावील इतकी त्यात मार्मिकता व उपपत्ती खचून भरलेली आहे. श्रीबाबाजी महाराजांच्या लिखाणाचे हे वैशिष्ट्य प्रत्ययास आल्यामुळे ह.भ.प.दासगणु महाराज, त्रिखंडकीर्ती तत्त्वज्ञ श्री.रामभाऊ रानडे, श्री.चित्रावशास्त्री, ह.भ.प.दांडेकर, श्री.पांडुरंगशर्मा ह्यासारखी संतवाङ्मयात अहर्निश अवगाहन करणारी मंडळीही मुग्ध होऊन गेली.भाविकांची बाजू इतक्या शास्त्रशुद्धरीतीने उचलून धरणारे, त्यांना 'उजागर' करणारे व प्रासादिक प्रतिभा नि तलस्पर्शी पांडित्य यांचे पानोपानी दर्शन घडविणारे लिखाण मराठी वाङ्मयात इतरत्र आज तरी दुर्मिळ आहे हे निश्चित!

**त्यांची वंदावी पाऊले**

श्रीगुरूच्या निर्याणानंतर श्रीकृष्णमूर्ती व श्रीज्ञानेश्वरपादुका एवढेच भांडवल श्रीबाबाजीमहाराजांच्या जवळ होते.त्यात

आपल्या जवळच्या अपार गुरुनिष्ठेची महाराजांनी भर घातली.संस्थानाचा पसारा थाटला.त्यासाठी मन, वाणी काया सारखी राबविली.सारे गुरुपायी वाहिले.स्वतः लिहिलेल्या पुस्तकांचे प्रकाशनाचे हक्क, शेती, मिळालेला पै पैका, घर, शेती संस्थानाला देऊन टाकला.मुलाबाळांची माया आड येऊ दिली नाही.वेदांताच्या परिभाषेत आर्थिक पातळीवरील हे त्वंपदाचें शोधनच म्हणावे लागेल.अशा शुद्ध जीवनाचीच यावज्ञीव त्यांनी गुरुचरणावर धार धरली आणि ते गुरुपायी लीन झाले.वारकरी संप्रदायाचीच बहरलेली शाखा म्हणजे माझा मधुर संप्रदाय होय असे श्रीगुलाबराव म्हणत.ह्याच मोहरलेल्या फांदीवर बसून आज पन्नास वर्षे सुरु असलेले 'मधुर' कूजन श्रीबाबाजी महाराजांच्या निर्याणाने बंद पडून भाविकांचा हिरमोड झालेला आहे.महाराजांच्या स्मृतीला अनंत प्रणाम .... !

दि. १-२-१९६४ — **गुणाकर पिंपळापुरे**

एम. ए. पीएच. डी

## 'हरिपाठ-रहस्य' या ग्रंथाची अपूर्वता

**लोकनायक डॉ. मा. श्री.** ऊर्फ **बापूजी अणे**

(नेक नामदार बिहार प्रांताचे माजी गव्हर्नर)

वारकरी संप्रदायांतील व इतर लक्षावधि लोक ''हरिपाठ'' नित्य म्हणतात. एकादे वेळीं श्रोत्रिय ब्राह्मण संध्या करावयास चुकेल पण भाविक हरिनाम संकीर्तनात तन्मय झालेला वारकरी ''हरिपाठ म्हणण्यास कधींहि चुकावयाचा नाहीं. अशा श्रेष्ठ ग्रंथाची ओळख करून देण्याची काय आवश्यकता आहे? संप्रदायाशीं संबंध नसणाऱ्यांना तर तें करणें कठीणच आहे. ''हरिपाठ'' हा ग्रंथ सूर्यासारखा स्वयंप्रकाशित आहे. तरीपण सूर्याला ज्याप्रमाणें लहान निरांजनींत तूप टाकून एक फुलवात लावून भक्तिभावानें ओंवाळून आपण पूजा करतो; तद्वतच् ''हरिपाठा'' सारख्या तेजःसंपन्न व उपनिषद्प्राय ग्रंथास प्रस्तावना, पुरस्कार, उपोद्घात वगैरे प्रकारचें लिखाण या निरनिराळ्या भक्त भाविक लोकांनी प्रेमानें केलेले निरांजनच आहे इतकाच त्याचा अर्थ.

***'हरिपाठ-रहस्य' या ग्रंथाची अपूर्वता***

हरिपाठ हा वारकरी संप्रदायांतील भाविकांच्या नित्यपाठांत असल्यामुळें हा ग्रंथ अनेक वेळां छापला गेला आहे. परंतु श्री बाबाजी महाराजांचा ''हरिपाठ रहस्य'' या ग्रंथाचें वैशिष्ट्य आहे तें हें कीं, यांत हरिपाठाच्या प्रत्येक अभंगावर सुप्रसिद्ध वैदर्भीय संत श्रीसद्गुरु गुलाबराव महाराज यांच्या 'प्रतिज्ञा' व टीपा आहेत. त्याला ''हरिपाठ दीपिका'' हे नांव आहे. नंतर त्या अभंगांचा सरळ अर्थ दिलेला आहे व त्यापुढें बाबाजी महाराजांनी विवरण या नांवाखाली वरील प्रतिज्ञेंतील दीपिकेच्या आश्रयानें विस्तृत भाष्य लिहून वेदान्त शास्त्रांतील अनेक गूढ व जटिल प्रश्नांची सांगोपांग, आणि सशास्त्र; तर्कशुद्ध चर्चा केली आहे व आपली मतें प्रस्थापित केली आहेत. श्रीज्ञानेश्वर वाङ्मयाच्या अर्वाचीनं अभ्यासकांनी घेतलेल्या अनेक आक्षेपांचे व शंकांचे निरसन त्यांनी मोठ्या सप्रमाण रीतीनें करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळें हा ग्रंथ निव्वळ सांप्रदायिकांकरितांच नसून साहित्यिकांनाहि आह्वान देणारा आहे.

सर्व वेदांचे सार उपनिषद् ग्रंथ आहेत. त्यांत त्रिकालज्ञ ऋषि मुनींनी अनंत काळ तपश्चर्या करून त्यात आपल्या ब्रह्मविद्येचे सिद्धांत व उपासनेच्या पद्धतीचें वर्णन केलेलें आढळतें. त्या उपनिषदांतील ज्ञानाला शास्त्रीय रूप देण्यासाठी बादरायण भगवान् व्यासांनी ब्रह्मसूत्रें लिहिलीं. सर्व उपनिषदांचा अभ्यास करून त्यांतील ज्ञानाचा
साकल्यानें बोध होण्याकरितां व मुमुक्षूंना मोक्षाचा मार्ग त्यांतून शोधून काढणें सुलभ जावें म्हणून बादरायण व्यासांनी एक प्रकारच्या टीपाच लिहिल्या होत्या.त्या टीपांच्या म्हणजे सूत्रांच्या आधारें उत्तर मीमांसचें अध्ययन गुरुसंप्रदाय परंपरेने पूर्वीचे पंडित करीत होतें.श्रीमत् शंकराचार्यांनी त्या सूत्रांवर शारीर भाष्य लिहून त्यांचें सविस्तर विवरण करून पांडित्याची बैठक देऊन वेदांताचा अभ्यास सर्व मुमुक्षूंस सुलभ करून दिला आहे. त्याप्रमाणे श्री बाबाजीमहाराजांनी हरिपाठावरील श्रीमहाराजांच्या प्रतिज्ञांच्या आधारावर हें विवरणात्मक भाष्य लिहून श्रीसद्गुरु गुलाबराव महाराजांना अभिप्रेत असलेल्या अध्यात्मविद्या व सगुणोपासना यांच्या समन्वयासंबंधीचे ज्ञान सर्वांस सुलभ करून दिलें आहे.**त्यांच्या इतका दुसरा अधिकारी पुरुष आज तरी महाराष्ट्रांत विद्यमान नाहीं.**

***युगें अट्ठावीस विटेवरी उभा***

हरिपाठाच्या २८ अभंगाच्या रूपाने श्रीज्ञानेश्वरमहारजाांनी २८ युगें विटेवर भक्तोद्धार करण्याकरितां उभा असलेल्या परब्रह्माच्या प्राप्तीस्तव बांधलेल्या सोपान परंपरेच्या २८ अभंग पायऱ्या आहेत. त्यांच्या साह्याने परब्रह्म प्राप्तीच्या मार्गाने जाणाऱ्या यात्रिकांचा मेळा उत्तरोत्तर वाढत जावो व त्यांच्या भक्तिज्ञानवैराग्यपूर्ण तपस्येने भरतभूमि ही आपली पूर्व प्रतिष्ठा प्राप्त करून घेवो; अशी त्या युगें अट्ठावीस उभा राहणाऱ्या परब्रह्म पांडुरंगाच्या चरणी नम्र भावानें माझी प्रार्थना आहे. शेवटी भगवान् व्यास महर्षींनी नाममहात्म्याचें वर्णन केलेला एक श्लोक उधृत करून हे लेखन भवारणी समर्पण करतो.

इदं हि पुंसस्तपसः श्रुतस्य वा स्विष्टस्य सूक्तस्य च बुद्धिदत्तयोः।
अविच्युतोऽर्थः कविभिर्निरूपितो यदुत्तमश्लोकगुणानुवर्णनम् ।।

भाग. १-५-२२
पुणें,
शके १८७६ कार्तिक
शुद्ध एकादशी

श्रीसद्गुरु गुलाबरावमहाराजांचा
कृपांकित,
– **मा. श्री. अणे**

## ग्रंथाची खरी योग्यता

***महामहोपाध्याय श्री. बाळशास्त्री हरदास***

श्रीगुलाबरावमहाराजांनीं आपलें तेज व तपःसामर्थ्य श्रीबाबाजी महाराज यांच्यात संक्रमित केलें असल्यामुळें श्रीज्ञानेश्वरमहाराजादि संताच्या व भारतीय तत्त्वज्ञानाच्या रहस्याचें उद्घाटन करावयास श्री बाबाजी महाराज पंडित यांच्यासरखा दुसरा अधिकारी पुरुष आज तरी महाराष्ट्रात दुसरा नाहीं असें जें लोकनायक बापुजी अणे यांनी प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनेंत म्हटले आहे तें अक्षरशः खरें आहे.

आज श्रीगुलाबरावमहाराजांच्या मधुराद्वैत संप्रदायाच्या कार्याची धुरा त्यांच्याच नेतृत्वाखाली चालत असून श्रीगुलाबरावमहाराजांची सर्व भक्तमंडळी वेदान्त केसरी श्रीबाबाजीमहाराजांना त्यांच्याच ठिकाणी समजतात.महाराजांची सर्व प्रतिसांवत्सरिक व्रतें तर त्यांनी चालविलींच; पण त्यांच्या लहानसहान इच्छासुद्धांत त्यांनी कसोशीनें पूर्ण केल्या. केवळ गुलाबराव महारजांची इच्छा होती म्हणून ते समाधिस्थ झाल्यावर बाबाजी महाराजांनी इ. स. १९३५ मध्यें शें दीडशें सांप्रदासिक भक्तांसह प्रयागहून गंगेची कावड अनवाणी पायानें भर उन्हाळ्यांत चालत येऊन आळंदीस आणली व श्री ज्ञानेश्वर महाराजांना शुद्ध गंगाजलाचा महाभिषेक केला.श्रीबाबाजीमहाराजांच्या थोडेहि सहवासांत राहिलें कीं, पाश्चात्य आणि पौरस्त्य ज्ञानाचा महानिधीच पहात असल्याचा भास होतो. या अधिकारी व्यक्तीच्या लेखणींतून हें हरिपाठ रहस्य प्रकाशित झालें आहे, हें ध्यानांत घेतलें म्हणजे या ग्रंथाची खरी योग्यता कळून येईल.

**समालोचन,**

दि. १९ - ८ १९५६ ***रविवारचा महाराष्ट्र, नागपूर.***

०००

## अपूर्व व बिनतोड विवेचन

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ ही मराठी भाषेतल्या पारमार्थिक वाङ्मयामध्ये एक उज्ज्वल हिरकणी आहे. नामस्मरणप्रधान भक्तिमार्गावरची ती प्रधान दीपिका आहे. ''हरिमुखे म्हणा हरि मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी'' हा झंकार या चिमुकल्या तंबोरीनें तमाम मराठी प्रदेशांत घरोघरी दुमदुमविला आहे अट्ठावीस अभंगांच्या या लहानशा प्रकरणांत श्रीज्ञानराज माउलीनें आपलें तत्त्वज्ञान साररूपानें ओतलेले आहे आणि नामस्मरणाचा मार्ग पराकोटीच्या आग्रहानें आळविलेला आहे. भाग्य मराठी वाचकांचें कीं, वऱ्हाडांतील जन्मसिद्ध अलौकिक संतविभूति श्रीगुलाबरावमहाराज यांचें अनुग्रहीत शिष्योत्तम श्रीबाबाजीमहाराज पंडित, अमरावती, यांना हरिपाठावर भाष्य लिहून तें प्रसिद्ध करण्याची प्रेरणा झाली. ह.भ.प.वेदान्त केसरी श्री.नारायण पैकाजी ऊर्फ बाबाजी महाराज पंडित हे पराकोटींतील अधिकारी श्रीगुरुपुत्र व साधुपुरुष आहेत.संत वाणीचें अंजन, झापड आलेल्या लोकांच्या डोळ्यांत घालायचें तर तें चिकित्सापूर्ण, तर्कशुद्ध, युक्तिवादाच्या लोण्यांत घोटून घालावें ही तर त्यांची प्रतिज्ञा दिसतें.म्हणूनच त्यांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठावर सप्रमाण तर्कशुद्ध सयुक्तिक विस्तृत विवरणात्मक भाष्य लिहून आबालवृद्धांस जाणत्या नेणत्यास परमार्थाचा राजमार्ग स्पष्टपणें दाखविला.बिहार प्रांताचे माजील गव्हर्नर लोकनायक डॉ. बापूजी अणे यांनी या ग्रंथाला लिहिलेल्या उपोद्घातांत बादरायणाच्या वेदान्तसूत्रावर शंकराचार्यांनी लिहिलेल्या शारीरभाष्याशीं हरिपाठावर श्रीबाबाजी महाराजांनी केलेल्या विवरणात्मक भाष्याची जी तुलना केली आहे ती यथार्थ आहे.महाराजांच्या विद्वत्तेचा, युक्तिवाद-पटुत्वाचा दाखला या ग्रंथाच्या प्रत्येंक पृष्ठांत स्पष्ट पटतो. आपल्या विवरणांत वेदान्त ज्ञानाचें भांडार त्यांनी खुलें केलेले आहे. बुद्धिवादी चिकित्सकाला हार खावयास लावून त्यांच्याकडून ते अजिंक्यपत्र खास घेतील.कोणताहि मुद्दा मांडतांना त्याच्या पुष्ट्यर्थ श्रीज्ञानेश्वरीतील वचनें तर त्यांनी जागोजाग आणून खडीं केलेली आहेतच, पण श्रीतुकोबांचे अभंग व श्रीनाथ तसेंच श्रीसमर्थादि संतमहात्म्यांच्या ओव्या यांचीहि ठायींठायी पेरणी केली आहे. कबीर, तुलसदास, सूरदास, नरसीमेहतादि उत्तरेकडील संतहि पाचारिलें आहेत. गीता आणि भागवत हे तर भागवत धर्माचे मूलाधार! त्यांना क्षणभर तरी विसंबून कसें चालणार! त्या खेरीज श्रुति, स्मृति व पुराणें व पाश्चात्य भक्तांच्या आणि तत्त्वज्ञान्यांच्या युक्ति यांनाहि आपल्या प्रतिपादनाचा पाठपुरावा करण्याकरिता इष्ट तेथें ग्रंथकारांनी दाखल केलेल्या आहेत. इतके बुद्धीसामर्थ्य ओतणाऱ्या या विवरणाकारांच्या म्हणजे बाबाजीमहाराज पंडित यांच्या अंगी अभिमानाचा लवलेश तरी आहे काय? त्यांची वाणी किती प्रासादिक, नम्र आणि गोड! संतश्रेष्ठ श्रीगुलाबराव महाराज यांना ते ''माझी श्रीसद्गुरु आई'' व श्रीज्ञानेश्वर महाराजांना ''श्रीमाउली'' म्हणतात हें तर सहजच आहे पण इतर शास्त्रकार व संतमहंत यांच्याविषयींहि त्यांनी तशीच पूज्यबुद्धि दाखविलेली आहे.आणि ती ओढून ताणून मुद्दाम म्हणून नव्हे, तर त्यांची तशी सहजवृत्तिच वाणींतून प्रकट झालेली आहे. कोठेहि ''आम्हाला असें वाटतें. आमचें मत असें आहे.'' अशी मीपणाची भाषा नसून ''असें महाराज सांगतात. असें माउलीचें म्हणणे आहे.'' अशा निरहंकार पद्धतीचे प्रयोग आहेत. ग्रंथज्ञानाच्या भारानें ''तैसा चित्तीं अहंते ठावो। आणि जिभे सकळ शास्त्रांचा सरावो'' (ज्ञाने.अ.१५.३९६) अशी स्थिति झालेली येथे तिळमात्र दिसत नसून ''अखंड अगर्वता होऊनि असती। तयांची विनय हेंचि संपत्ति'' (ज्ञाने.अ.९-२२६) अशा अवस्थेचा प्रत्यय येतो. ..चिकित्सक विद्वानांची बौद्धिक भूक भागविण्याचें थोर सामर्थ्य या ग्रंथांत आलेलें आहे.... बुद्धि, व श्रद्धावादी अशा सर्वांचेंच समाधान या ग्रंथाने होईल यांत शंकाच नाहीं. (महाराष्ट्र मासिक, सप्टेंबर १९५५)

**— प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी**

## *अत्यंत प्रासादिक*

**।। श्री ज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ।।**

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे हरिपाठाचे अभंग माहीत नाहीत, असा मनुष्य महाराष्ट्रांत तरी विरळा.इतके ते लोकांच्या तोंडी आहेत.एखादा विषय लहानथोरांच्या कसा गळीं उतरवावा याचा हे अट्ठावीस अभंग उत्कृष्ट नमुना आहे.'हरिमुखें म्हणा , हरिमुखें म्हणा' येथपासून शेवटपर्यंत हरिनामस्मरणाचा संदेश देत देत त्यामागील तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमि अगदीं सहज कळेल अशी या अभंगांत सांगितलेली आहे.ती सोपी दिसली तरी सर्वांनाच कळणे कठीण आहे.या अभंगांत नामजपाचें माहात्म्य ठसवितांना जी शब्दयोजना केली आहे, ती अत्यंत प्रासादिक आहे. त्या प्रत्येक शब्दांतील रहस्य कसें 'उघडें गुपित' आहे, हें समजावून सांगण्याचा अधिकार कोणालाहि सहज प्राप्त होण्यासारखा नाहीं. या ग्रंथात अनेक जन्मांच्या तपश्चर्येने

*ज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दांतील रहस्य प्रगट करण्याची ज्यांना उपजतच सिद्धि प्राप्त झालेली होती, असे अलीकडच्या काळांतील वऱ्हाडांतील अलौकिक सन्तविभूति श्रीगुलाबरावमहाराज यांची* ***अधिकरण*** *वाक्यें प्रत्येक अभंगाच्या खालीं दिलेली आहेत, हा या ग्रंथाचा विशेष आहे. त्या सिद्धान्तभूत* ***प्रतिज्ञा*** *वाक्याला अनुसरून प्रत्येक अभंगाचा सरळ अर्थ व पुढे अभंगांतील एक एक चरण प्रतिज्ञेसह देऊन त्याचें विवरण विस्तृतपणें केलें आहे असें याग्रंथाचें थोडक्यांत स्वरूप आहे.... असा हा तपश्चर्या आणि गुरुपरंपरा ह्यांनी पावन झालेला अनुभवी विवरणकर्ता भक्तिमार्गाच्या तत्त्वज्ञानाची पाणपोई आपल्याकरितां उघडत आहे हें आपलें भाग्य आहे. आमच्या साधुसंतांनी सहज-स्फूर्तीनें उभारलेला भोळा भक्तिमार्ग तत्त्वज्ञानाच्या कोंदणांत बसविण्याचा यांचा हा प्रयत्न अपूर्व आहे.* ***भक्तिमार्ग तत्त्वज्ञानाच्या भाषेंत मांडण्याचा यासारखा प्रयत्न आजपर्यंत माझ्यातरी पाहण्यांत आलेला नाहीं.*** *या भागवतधर्माच्या तत्त्वज्ञानांत आम्ही अद्वैताची कास सोडावयास तयार नाही. अद्वैत हें आमचें ध्येय आहे. ज्ञाननिष्ठेवर आमची पूर्ण श्रद्धा आहे. गीतरहस्य ज्ञानोत्तर कर्मच करीत राहिले पाहिजे असे प्रतिपादिते. त्याप्रमाणे आमच्या संतांचा मार्ग सगुण भक्तिच करीत राहिलें पाहिजे, असें सांगतो. ज्ञानपूर्व अवस्थेंतील सगुण उपासनेपेक्षा ज्ञानोत्तर भक्तिमार्गातील सगुणतेंत फरक आहे इत्यादि सिद्धान्तांचें या विवरणांत फार मार्मिक विवेचन केलेलें आहे. अनेक संस्कृत, प्राकृतादि, ग्रंथांचे आधार देऊन अनेक कोडी उलगडून दाखविण्याचा मोठा मार्मिक प्रयत्न या ग्रंथांत केलेला आढळतो. ग्रंथकारानें आपल्या नव्याजुन्या, देशीपरदेशी वाङ्मयांतील पाण्डित्य आणि अनुभव यांचा सुंदर मेळ घालून भक्तिमार्गाचे जुनेंच तत्त्वज्ञान आधुनिक भाषेंत लोकांना देऊन मोठे उपकार केले आहेत, याबद्दल त्यांना अभ्यासक मनापासून धन्यवाद देतील याबद्दल शंका नाही. श्रीगुलाबरावमहाराजांनी आमचा भागवतसांप्रदाय तत्त्वज्ञानाच्या भाषेंत पद्धतशीरपणें मांडण्यास सुरवात केली. तेंच कार्य आमचे बाबाजीमहाराज पुढें चालवीत आहेत. तें काम त्यांनीं ग्रंथरूपांत लोकांच्यापुढें मांडावें अशी त्यांना विनंति करून या ग्रंथलेखानाबद्दल पुनः धन्यवाद देतों.*

**कार्तिक वद्य ।। १३ शके १८७६ / २३ नोव्हेंबर १९५४**      ***– ज्ञानेश्वर त्रैमासिक,***

## अनेक आक्षेपांचे निरसन

**।। श्री ज्ञोश्वरमाउलीसमर्थ ।।**

*ज्यांना ज्ञानदेवांनी प्रत्यक्ष अनुग्रह दिला, आणि कै. दादासाहेब खापर्डे यांसारखे नामवंत पुढारी ज्यांना जगांतील बौद्धिक आश्चर्य समजत, शालेय शिक्षण नसतांहि हिंदी/मराठी व संस्कृत भाषेंत ज्यांनी अलौकिक ग्रंथ निर्माण केले, त्या जन्मांध व जन्मसिद्ध सद्‌गुरु श्रीगुलाबरावमहाराज यांचे एकमेव अधिकारी पट्टशिष्य व सुप्रसिद्ध ज्ञानी भक्त हे प्रस्तुत पुस्तकाचे लेखक आहेत. सूर्यासारखा स्वयंप्रकाशित आणि वारकरी संप्रदायांतील भाविकांच्या नित्यपाठांत असलेल्या या ज्ञानदेव माउलीच्या २८ अभंगांकित हरिपाठावर श्रीसद्‌गुरु गुलाबरावमहाराज यांच्या 'प्रतिज्ञा' व टीपा आहेत. मूळ अभंग प्रतिज्ञा, सरळ अर्थ आणि विवरण असें या ग्रंथांचे स्वरूप आहे. भारत भागवताचें संक्षिप्त रूप म्हणजे जशी श्रीभगवद्‌गीता, दासबोधाचा जसा मनोबोध; तसाच हा ज्ञानेश्वरीचा 'हरिपाठ' हाये. लोकनायक अणे यांनी प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणे बाबाजीमहाराजांनी 'विवरण' या नांवाखाली विस्तृत भाष्य लिहून वेदांतशास्त्रातील अनेक गूढ व जटिल प्रश्नांची सांगोपांग आणि सशास्त्र चर्चा करून श्रीज्ञानेश्वर वाङ्‌मयाच्या अर्वाचीन अभ्यासकांनी घेतलेल्या अनेक आक्षेपांचे व शंकांचे निरसन मोठ्या सप्रमाण रीतीनें केल्यामुळे हा ग्रंथ निव्वळ सांप्रदायिकांकरतांच नसून साहित्यिकांनाहि आह्वान देणारा आहे.*

**– ''धर्मचक्र'' १५ मार्च १९५५**

०००

## तर्कशुद्ध व सप्रमाण

*सुमारें ६५० वर्षे होऊन गेली तरी श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठाचे २८ अभंग महाराष्ट्रांत रोज नित्यनियमानें व भक्तिभावानें आज पठण करणारे लाखो लोक आहेत. ''प्रकट गुह्य बोले। विश्व ब्रह्मचि केलें'' अशा थोर योग्यतेचा हा ग्रंथ असून त्यांत भागवतधर्म-तत्त्वज्ञानाचें सारसर्वस्व सूत्ररूपानें सांगितलें आहे. वऱ्हाडांतील जन्मांध, उपजतच ज्ञानी, जन्मसिद्ध संतविभूति श्रीसद्‌गुरुगुलाबरावमहाराज यांनी हरिपाठावर सिद्धांत भूत प्रतिज्ञा लिहिलेल्या आहेत. हरिपाठ रहस्य या ग्रंथाचें वैशिष्ट्य असें कीं, प्रथम हरिपाठाचा अभंग, त्यावर श्री गुलाबरावमहाराज यांच्या प्रतिज्ञा, अभंगाचा सरळ अर्थ व पुढें अभंगांतील एक एक चरण घेऊन त्यावर अनुभव व विद्वत्ताप्रचुर विस्तृत विवरण श्रीबाबाजीमहाराज यांनी जें तर्कशुद्ध, सप्रमाण केलेलें आहे तें अगदी अपूर्व व बिनतोड आहे.*

**– दैनिक भारत, ३० जुलै १९५५**

०००

## भाग्याची गोष्ट

***प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे***
*नागपूर विद्यापीठ*

*हरिपाठाचें रहस्य अनेक तपें त्याचा पाठ, मनन व चिंतन करून त्यांतील सिद्धान्ताचा अनुभव घेतलेल्या थोर भगवद्भक्तालाच सांगणें शक्य होते. ज्ञानेश्वरांच्या कृपेनें असा पुरुष हें रहस्य सांगण्यास लाभला ही भाग्याची गोष्ट होय. 'हरिपाठ-रहस्य' या प्रस्तुत ग्रंथाचे लेखक वेदान्तकेसरी श्रीबाबाजीमहाराज पंडित हे अनुभवी असे थोर भगवद्भक्त आहेत. त्यांच्या पराकाष्टेच्या प्रसिद्धिपराङ्‌मुखतेमुळें ही गोष्ट पुष्कळांना माहीत नाहीं. त्यांचे सद्‌गुरु श्रीगुलाबरावमहाराज यांची त्यांच्यावर पूर्ण कृपा झाली होती. या गुरुशिष्यांची श्रीज्ञानेश्वरांवरील भक्ति केवळ अतुलनीय आहे. श्रीगुलाबरावमहाराज हे ज्ञानेश्वरांना 'तात' म्हणत. त्यांच्या इच्छेप्रमाणे श्रीबाबाजींनी प्रयागच्या त्रिवेणी संगमावरील पवित्रोदकानें भरलेल्या घागरींची कावड खांद्यावर घेऊन अनवाणी पायानें आळंदीस आणून श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीला स्नान घातलें, ही एकच गोष्ट त्यांच्या निष्ठेची अपारता दर्शविण्यास पुरेशी आहे.*

*श्रीज्ञानेश्वर हे अद्वैती होते आणि या अद्वैताची भूमिका न सोडतां सगुण-साकार श्रीहरीच्या भक्तीचा पुरस्कार श्रीज्ञानेश्वरांनी हरिपाठांत कसा केला आहे, याचें मार्मिक विवेचन या ग्रंथांत वाचावयास मिळतें. हें विवेचन करतांना श्रीबाबाजींची अद्वैताची बैठक कुठेंहि ढळलेली नाही. श्रीबाबाजी जसे एकनिष्ठ भक्त आहेत, तसे गाढे पंडितहि आहेत. श्रीशंकराचार्यांचा वेदान्त त्यांनी काळजीपूर्व अभ्यासिला असल्यामुळे त्यांच्या मायावादानें ते यत्किंचितहि विचलित झालेले नाहींत आणि शंकरार्यांच्या व संतांच्या अद्वैतांत त्यांनी भेदहि केला नाही. ते म्हणतात,* **''श्रीज्ञानेश्वर महाराजादि सर्व संत भगवान् आचार्यांप्रमाणें पूर्ण केवलाद्वैतवादी आहेत. संतांचा वेदान्तविचार तोच आचार्यांचा वेदान्तविचार व आचार्यांचा जो वेदान्तविचार तोच संतांचा वेदान्तविचार होय.''** *श्रीतुकाराममहाराज, श्रीगुलाबरावमहाराज, श्रीबाबाजीमहाराज यांसारख्या सात्त्विक, सदाचारी सत्पुरुषांचे नुसतें अस्तित्वहि समजाला उपकारक असतें. मग त्यांचा उपदेश समाजाचें कल्याण करील यांत संशय कसला?*

०००

**ज्ञानमृताची जान्हवी**

*या ग्रंथात हरिपाठांतील अभंग प्रथम देऊन त्याचें सारसर्वस्व चटकन लक्षांत यावें म्हणून त्यावर* ***श्रीगुलाबराव महाराजकृत सूत्रमय 'प्रतिज्ञा'*** *दिल्या आहेत. नंतर सरळ अर्थ देऊन पुढें शास्त्रशुद्ध, सप्रमाण व सविस्तर विवरण दिलेलें आहे. त्यांत ठिकठिकाणीं स्वानुभवाच्या गुरुगम्य खुणा प्रगट झालेल्या आहेत. यामुळेंच ही ज्ञानमृताची जान्हवी आपल्या घरीं अनायासें चालून आली आहे, असें विचरवंतास निश्चित वाटेल.*

***– वारकरी पंथाचे अध्वर्यु***
*ह. भ. प. मामासाहेब दांडेकर,*

## TW0 IMPORTANT BOOKS

Two books, recently published in Marathi, deal m by ***Vedant Kesari Shri Babaji Maharaj Pandit,*** the well-known disciple  the great, saint- - letest saint of Vidarbha] Shri Gulab Rao Maharaj.

I have been,  for some months,  going through the volumes written by Shri Gulabrao Maharaj. This great saint of the twentieth century is  a phenomenon  which is standing challenge to the modern Science. His keen insight into  modern scintific theories, his vast erudition, his rootfinding profoundity, his amazing mastery over Shad Darshanas, Puranas, Bhashya-karas and the entire Vedic lore. his mysterious miraclemaking powers and his entire life and work charged with divine communion, leave an indelible impress on the mind of any one who would care to go through his works with genuine intellectual curiosity.

Shri Babaji Maharaj (N.P.Pandit) is the first successor in the office of the Madhuradwaita Sampradaya established by Shri Gulabrao Maharaj. `Madhuradwaita,' or Blissful Nondualism, is a unique contribution to the Vedant philosophy, chiefly founded on the works of Saint Dayaneshwar- the great and gifted founder of the Warkari Sampradaya of Maharashtra.

The two Books written by Babaji Maharaj, entitled as ***Hari-Patha Rahasya*** and ***"Amrutanubhava-Kaumudi"*** are commentaries on the two well-known works of Saint Dnyaneshwar. These commentaries are based on the doctrine of "Madhuradwaita" (Blissful Non-Dualism) ably propounded by Saint Gulabrao Maharaj in his books. Babaji Maharaj has elaborated the thesis and has cogently answered  many controversial questions.

The intelligentsia of our country is badly in need today of an anchorage. For this they can do no better than studying the works of Shankaracharya and Dnyaneshwar. These two books by Shri Babaji Maharaj furnish a very valuable introduction to the thought- forms of both Shankaracharya and Dnyaneshwar.

**- P.Y. Deshpande**
(Nagpur Times)

***“प्रत्यक्ष ज्ञानेश्वर विभूती प्रकटली”***

***ह.भ.प.पूज्य श्री विष्णुबुवा जोग महाराज*** *हे श्रीज्ञानेश्वरमाउलीचे एकनिष्ठ भक्त व वारकरी संप्रदायाचे एक मोठे अध्वर्यु होते. ते श्रीगुलाबरावमहाराजांना प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वरमाउलीची विभूतीच म्हणत. पुण्यातील ज्ञानेश्वरीचे सुप्रसिद्ध प्रवचनकार* ***ह.भ.प.केशवराव महाराज देशमुख*** *हे आपल्या ओवीबद्ध श्रीनारदभक्तिसूत्रविवरणांत लिहितात की,*

***जोग महाराज वर्णन करिती । खात्री झाली ऐसें म्हणती।***
***प्रत्यक्ष ज्ञानेश्वर विभूती । प्रकटली म्हणती जगांत ॥१६॥***

*श्रीजोग महाराज यांनीच श्रीमहाराजांचा पूर्व परिचय त्यांना करून दिलेला होता.पूज्य केशवरावमहाराज देशमुख यांनी श्रीनारद भक्तिसूत्रांचे विवरण १२१६ ओवीबद्ध ग्रंथात केले आहे. त्या ग्रंथाच्या प्रारंभी २०० ओव्यांत श्रीगुलाबरावमहाराज यांचे स्तुतिस्तोत्र गाऊन प्रस्तुत ग्रंथ त्यांनी श्रीगुलाबराव महाराज यांच्या चरणी निःस्सीम भक्तिप्रेमाने समर्पण केला आहे.*

*“श्रीज्ञानेश्वर माउलीचें दर्शन मला आपल्यासारखे कसें होईल?”*

*अशी पूज्य केशवरावमहाराज देशमुख पुणे यांनी पत्रद्वारें पृच्छा केल्यावरून त्यांना पत्रोत्तर म्हणून ओवीबद्ध जे पत्र ता.१९-१-१९०६ रोजी पाठविले त्यांतील सारांश खालीलप्रमाणे :-*

*स्मरण, ज्ञान आणि ध्यान। या त्रयीचें हेंचि लक्षण। लिहिले तैसे अभ्यासून। पहावें तुम्ही॥७॥ मग जेथें पहाल तेथें श्रीज्ञानेश्वर माऊली तत्वतां। ओ देतील हांक मारितां। हें रूपक नव्हें, यया अर्था। प्रमाण आहे॥८॥ व्यासें शुकाचिया आवडी। या प्रत्ययाची घेतली गोडी। तोचि श्लोक सुख परवडी। लिहितो येथें॥९॥*

*यं प्रव्रजंतमनुपेतमपेतकृत्यं द्वैपायनो विरहकातर आजुहाव ॥*

*पुत्रेति तन्मयतया तरवोऽभिनेदुस्तं सर्वभूतहृदयं मुनिमानतोऽस्मि ॥ भागवत.* ***अलकावतीहूनि तात यावे। हे बोलणे कोणे सहावें। पै केशकेश ज्ञानेश्वर म्हणावे । तैंचि फावे ॥१०॥*** *उदित चक्रांचिया आवांका। निकियापरी मारितां हांका। तैं ऐसा हा कां। हातां नये? ॥११॥ येथें तुम्ही बोलाल ऐसें। कीं गुह्य काय सांगितलें असें। तरीं हे लिहिलें तैसे। अभ्यासावें॥१२॥ मग हे गुह्य होय किंवा नाहीं। प्रत्यय येईल लवलाही। परी बुद्धि ते सर्वदाही। सरळ असावी ॥१३॥ सांडुनि परमतजाल वितंड। मोडावें आग्रहाचें बंड। करावा कामक्रोध दंड। विवेकानी ॥१४॥ वाचेनें जपावे श्रीहरिनाम। अंतरी असावें अतिनिष्काम। मानापमान मानावें सम। एकदेशीय मतही सांडोनि ॥१५॥ दैवी सिद्धीची ऐसी रीति। त्या इच्छा असतां दुरी जाती। इच्छा नसता लोळती। पायातळी ॥१६॥*

*(श्रीगुलाबरावमहाराजकृत पत्रव्यवहार भाग१ द्वितीय आवृत्ति पत्रनं. २०पृ. ५३)*